गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

सेनेका व एपिक्टेटस यांची चरित्रे व बोधवचने

कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक

राजन गवस

सेनेका आणि एपिक्टेटस यांची चरित्रे व बोधवचने

लेखक

कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक : राजन गवस

प्रस्तावना : नीतीन रिंढे

वाय ५३८-१

- **सेनेका आणि एपिक्टेटस यांची चरित्रे व बोधवचने**
  Seneka and Apictetus yanchi Charitre & Bodhvachne

- **लेखक : कृष्णराव अर्जुन केळूसकर**

- **संपादक :** राजन गवस

- **पुनःप्रकाशन :** २०१८

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला,
  पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी आवार,
  सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

- **© प्रकाशकाधीन**

- **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

- **किंमत : रु. १८४/-**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षांचे मनोगत

सेनेका आणि एपिक्टेट्स यांची बोधवचने

शाळेत अभ्यासात हुशार असलेला, गुरुवर्यांनी सांगितले चटकन ग्रहण करणारा, वेगवेगळ्या परीक्षांत प्रावीण्य मिळवून पहिला क्रमांक पटकावणारा बुद्धिमान विद्यार्थी, विचारलेला अभ्यासाचा अथवा अभ्यासाबाहेरचा प्रश्न सहजतेने सोडविणारा प्रतिभावंत विद्यार्थी आपण म्हणत असतो; पण प्रज्ञावंत या सगळ्या गुणविशेषासह अधिक काही गुणवैशिष्ट्ये असलेला असतो.

प्रज्ञावंताच्या मनात सतत असे का, हे वादळ घोंगावत असते. या एका प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी तो आणखी मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतो. जे आपणास माहिती नाही, ते समजून घेण्याची ऊर्जाच त्याला गप्प बसू देत नाही. प्रसंगी शिकविणाऱ्यास तो नको ते प्रश्न विचारतो. यातून त्याचा उद्धटपणा डोकावतो. एखाद्या प्रश्नाने अस्वस्थ होणे, त्या प्रश्नांचा पाठलाग करणे, हा मूलभूत शिक्षणाचा पायाच असतो. यात नेहमी एका चाकोरीत घोकंपट्टी करणे, प्रश्नांची उत्तरे बिनचूक देऊन मार्क पटकावून पहिला येणे, याहून एक वेगळीच अस्वस्थतेची जिज्ञासा तळाशी उकळ्या मारत असते, जी नवनिर्मितीचे बीजारोपण करत असते. ही सर्जनशीलतेची सुरुवात असते. यात पारंपरिक शिकणे, कृती करणे, साचेबंदपणाची चौकटच जवळ बाळगणे यास एक प्रकारे फाटा दिलेला असतो. बरेचदा हे सर्जनशील वेगळे काम करणे हे सर्वसाधारण दृष्टिकोनातून वेडेपणाचे अव्यवहारी काम असते.

प्रज्ञावंत चारचौघांपेक्षा वेगळे असण्याचे आणखी एक कारण असते. ही व्यक्ती सतत दूरद्रष्टी असते. नवनवीनतेचा ध्यास हेच तिचे व्यसन असते. येणाऱ्या अडचणी, होणारा कोंडमारा, परीक्षा पाहणारे संकट हे आपल्याचसाठी आहेत. त्यांनी गांगरून न जाता, त्यांचा द्वेष न करता, त्यांना शरण न जाता, सकारात्मक दृष्टीने त्यातून मार्ग कसा काढता येईल? या प्रश्नातून अंतर्मुख झाले की, प्रश्न हळूहळू सुटत जातात. हे आपणास जमणार नाही या विचारांशी त्याने कायमची फारकत घेतल्याने प्रश्नांची उकल होत जाते.

प्रज्ञावंतास येणारा दिवस हा आपल्यासाठीच आहे, हा आत्मविश्वास आत्मबळ वाढवीत जातो. त्यामुळे अशक्य कोटीतले प्रश्न सहज सुटत जातात. याचे कारण येणारा प्रत्येक क्षण माझ्यासाठीच आहे. मी तो आहे तसाच स्वीकारावा, ही भावना त्याची आत्म ऊर्जाच साथीदार बनते. अशी माणसं जगात जन्मतात, संघर्षास मित्र बनवून अलौकिक काम करून जातात.

या प्रज्ञावंतपणाचे उत्तम उदाहरण म्हणजे तरुण सयाजीरावांना जगाचा इतिहास आणि तत्त्वज्ञान या विषयाची लागलेली आवड याकडे बघता येईल. राजा होईपर्यंत अक्षरओळख नसलेल्या चोवीस वर्षांचे सयाजीराव पत्रात लिहितात, मला ज्ञानसाधनेची खूप आवड आहे. आपल्या गुरुवर्य इलियट यांना कळवतात, आपण मला राष्ट्राचा उदय आणि विकास या विषयांवरची पुस्तके पाठवा. प्रकृतिस्वास्थ्याच्या कारणाने युरोपचा प्रवास होतो; पण हा जिज्ञासू राजा प्रकृतीसोबतच तिथली प्रशासन व्यवस्था, साम्राज्याचे बलस्थान असलेली शिक्षणप्रणाली अन् साहित्य संस्कृती आगार असलेल्या अक्षरवाङ्मयाचाही शोध घेतो. एवढ्यावरच न थांबता आपल्या दिवाणांना पत्राने कळवितात, 'देशी भाषांमध्ये ज्ञानाचे आदान-प्रदान व्हावे, भाषा-भाषांमध्ये ज्ञान आणि माहिती यांची देवघेव व्हावी म्हणून देशी भाषेत भाषांतराची फार गरज आहे. भाषांतराचे काम एज्युकेशन कोडमध्ये समाविष्ट करावे. दरवर्षी किमान १० ते १५ पुस्तकांचे मराठी व गुजरातीत भाषांतर व्हायला हवे.'

इतिहास, राज्यशास्त्र आणि नीतिशास्त्र हे सयाजीराव महाराजांचे चिंतन विषय असल्याने या विषयांवरील वैचारिक चिकित्सेच्या ग्रंथांचे ते नियमित वाचन करत. यातून सयाजीरावांनी राष्ट्रकथामालेत निवडलेले पुस्तक 'सेनेका व एपिक्टेट्स यांची बोधवचने' या पुस्तकाचे भाषांतर कृष्णराव अर्जुन केळूसकरांकडे सोपविले. रोमन संस्कृतीच्या पहिल्या शतकातील स्टॉईकपंथीय तत्त्वज्ञ सेनेका होते, तर एपिक्टेट्स हे त्यांच्या अगोदर तीन शतके होऊन गेले होते. ज्ञानलालसी सयाजीरावांनी दोन हजार वर्षांपूर्वीचे जुने स्टॉईक तत्त्वज्ञानाची ओळख मराठी वाचकांना व्हावी, वाटावी, ही या प्रज्ञावंताची दूरदृष्टीच म्हणता येईल. पहिल्या शतकात मार्क्यूज ऑरेलियस या तत्वज्ञाने Medition वर ग्रंथ लिहिला होता. तो सयाजीरावांना खूप आवडल्याने त्याचे भाषांतर करण्याची जबाबदारी सिमियन बेंजामिन वॉकर यांच्याकडे प्रथम सोपविली. या कामात गुरुवर्य केळूसकरांनी सिमियन यांना भाषांतरासाठी मदत केली. हा ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर सेनेका व एपिक्टेट्स यांची बोधवचनेचे भाषांतर पूर्ण केले. इ.स. १८९७ मध्ये तो ग्रंथ बडोद्याच्या राष्ट्रकथामालेत प्रकाशित झाला.

या ग्रंथाच्या भाषांतराने स्टॉईक विचारांची ओळख मराठी वाचकांसाठी झाली आहे. स्टॉईक तत्त्वज्ञान आणि भारतीय अध्यात्मशास्त्रांची सारखेपणाची ओळख या ग्रंथामुळे होऊ शकली. असा हा महत्त्वाचा ग्रंथ पुनर्प्रकाशनाची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने घेतली, त्याचे संपादन डॉ. राजन गवस यांनी केले. या ग्रंथास अभ्यासपूर्ण प्रस्तावना प्रा. नितीन शिंदे यांनी लिहिली. या सर्वांचे या निमित्ताने आभार.

बाबा भांड

दि. २०-१२-२०१८

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई.

संपादकीय...

गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर हयातभर लेखन आणि वाचन करीत राहिले. घरच्या परिस्थितीमुळे मॅट्रीक झाल्याबरोबर नोकरी पत्करावी लागल्यामुळे आपल्याला पुढचे शिक्षण घेता आले नाही, ही सल गुरुवर्य केळूसकरांच्या मनात सततच होती. त्यामुळे त्यांनी आयुष्यभर हजारो ग्रंथांचे अध्ययन करून निरनिराळ्या विषयांचे ज्ञान संपादन केले. इंग्रजी व संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवले. प्रारंभी इस्त्राईल साप्ताहिकाचे संपादन करत असताना हा व्यासंग अधिकच वाढत गेला. जगतवृत्त नावाचे वर्तमानपत्र सलग सात वर्षे त्यांना चालवावयास मिळाले. हे काम त्यांनी शाळेची नोकरी सांभाळून केले. योवळी झालेल्या करारात त्यांनी 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' या इंग्रजी पत्राचे मालक गॉर्डन यांच्याशी केलेल्या करारात 'जगद्वृत्त' मधून मी माझ्या देशाच्या विरुद्ध काहीएक लिहिणार नाही तसेच अमूक मजकूर पत्रात छापावा असे सांगितल्यास तो माझ्या देशहिताविरुद्धचा असेल तर तो मी या पत्रात छापू देणार नाही. देशाशी विरोध करून माझे पोट जाळावयास मी तयार होणार नाही. असे स्पष्ट नमूद केले होते. हे पत्र चालवत असताना त्यांनी विविध स्वरूपाचे लेखन 'जगद्वृत्त'मधून केले. आज जगद्वृत्तचे अंक उपलब्ध होत नसलेमुळे केळूसकरांचे यांतील बहुमोल लेखनही एकत्रित करणे शक्य होत नाही. त्यांनी डॉ. मॅकिकन साहेब व रेव्हंडर कॅनन जोशी यांना बायबलच्या भाषांतरात गुरुवर्य केळूसकरांनी मदत केली. आयुष्यातील प्रत्येक क्षण वाचनात गेला पाहिजे असे त्यांना वाटत असल्यामुळे अनेक बोधपर ग्रंथ त्यांनी सखोल अभ्यासले. डॉ. वुईल्सनच्या शाळेत नोकरी लागल्यावर काही काळ त्यांनी वकिलीचाही अभ्यास केला. पण नंतर वकिलीचा नाद त्यांनी सोडून दिला. आणि नीतीशास्त्र व समाजशास्त्रातील महत्त्वाचे सर्व ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. बकल यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ त्यांनी दोनवेळा वाचून काढला कारण त्यात सुधारणेचा इतिहास होता. तत्त्वज्ञ कॉमेट यांचा पॉझिटिव्हीझम वरील ग्रंथ त्यांनी सखोलपणे अध्ययन करून घेतले. चार्लस ब्रँडला व ॲनी बेझंट यांचे ग्रंथ व जॉन स्टुअर्ट मिल यांचे तत्त्वज्ञानपर ग्रंथ, डार्विनचा उत्क्रांतीवाद, प्रा. हक्सले यांचे जीवशास्त्र, तत्त्वज्ञान व धर्मशास्त्रावरील ग्रंथ, अर्थशास्त्रावरील ग्रंथ त्यांनी मुळातून वाचून एखाद्या उच्च विद्याविभूषित व्यक्तीपेक्षाही अधिक ज्ञान संपादित केले. या सर्व ज्ञानाचा उपयोग त्यांना त्यांच्या लेखनकार्यात झाला.

श्रीमंत छत्रपती सयाजीराव गायकवाड यांनी गुरुवर्य केळूसकरांना दोन ग्रंथ लिहावयाची आज्ञा केली. त्यापैकी एक सेनेका व एपिक्टेटस हा ग्रंथ होय. हे दोन महासाधू स्टोईक तत्त्वज्ञ होते. इसवी सनाच्या आरंभी रोमन बादशाहीत ते होऊन गेले. यांचे तत्त्वज्ञान नीतिपर असल्यामुळे युरोपात अधिक प्रसिद्ध होते. हे तत्त्वज्ञान नीतिपर असल्यामुळे युरोपात अधिक प्रसिद्ध होते. या तत्त्वज्ञांचे विचार आपल्या भाषेत प्रसिद्ध व्हावेत असे सयाजीराव महाराजांच्या मनात आले. त्यांनी या संदर्भात सिमियन बेंजानिम यांना विचारले. त्यांच्या नावाने मार्क्स ॲरोलियस यांची बोधवचने प्रसिद्ध झाली होती. त्यांनी हे काम स्वीकारले नाही म्हणून महाराजांनी हे

काम गुरुवर्य केळूसकरांच्यावर सोपवले. पण आई आजारी असल्यामुळे या कामात त्यांचे चित्त लागले नाही. नंतर प्लेगाची साथ आली. यावेळी गुरुवर्य केळूसकर सगळे कुटुंब घेऊन गावाकडे गेले. तिथे तीन महिन्यांत अर्धे काम आटोपले. आणि नंतर दोन महिन्यांत नारायण शंभू वराडकर व गुरुवर्य केळूसकरांचे लहान बंधू यांच्या मदतीने हे काम पूर्ण केले. सेनेका व एपिक्टेटस हा ग्रंथ आजही तितकाच महत्त्वाचा आहे, कारण आजही या तत्त्वज्ञानाबद्दल नव्याने शोध घेतला जात आहे.

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या पुनर्प्रकाशनाच्या निमित्ताने

कोणतेही साहित्य आणि त्यात मांडलेले तत्त्वज्ञान, विचार यांना टिकून राहण्यासाठी काळाचे अनेक उंबरठे ओलांडावे लागतात. लोकांचे जगणे बदलते; जगण्याचे प्रश्न बदलतात. बदलत्या काळात उभ्या राहणाऱ्या समस्यांना नवी उत्तरे देण्याचे सामर्थ्य बाळगून असलेले जुने तत्त्वज्ञान नव्या नव्या भाषांमध्ये, समाजांमध्ये शिरून टिकून राहते. स्टॉइक तत्त्वज्ञान त्यापैकी एक आहे.

सेनेका आणि एपिक्टेटस या रोमन संस्कृतीतील दोघा तत्त्वज्ञांनी आपले तत्त्वज्ञान लॅटिन भाषेत मांडून आता दोन सहस्रकांहून अधिक काळ उलटला; आणि कृष्णराव केळूसकर यांनी या तत्त्वज्ञानाचा इंग्रजीवरून मराठी भाषेत अनुवाद केला त्यालाही आता सव्वाशे वर्षांहून अधिक काळ झाला. सेनेका आणि एपिक्टेटस हे स्टॉइक पंथाचे तत्त्वज्ञ होते. स्टॉइक पंथाचा संस्थापक झिनो हा ग्रीक संस्कृतीच्या काळात अथेन्स नगरीत होऊन गेला असला, तरी स्टॉइक तत्त्वज्ञानाचा खरा प्रसार आणि विकास ग्रीक संस्कृतीच्या पतनानंतर रोमन संस्कृतीच्या उदयकाळात सेनेका, एपिक्टेटस आणि ऑर्फियस या तत्त्वज्ञांनी केलेल्या तात्त्विक उपदेशांद्वारे झाला. हा काळ राजकीय-सामाजिकदृष्ट्या अस्थिरतेचा आणि अराजकाचा होता. ग्रीकांची सुसंस्कृत नगरराज्ये लयाला जाऊन रोमन राजांनी त्यावर ताबा मिळवला होता. आणि अधिकाधिक राज्यविस्ताराच्या हव्यासापोटी त्यांच्यात अंतर्गत संघर्ष मोठ्या प्रमाणावर सुरू होता. सर्वत्र युद्धे आणि अराजक माजले होते. सर्वसामान्य मनुष्याचे जीवन मोठ्या प्रमाणावर अस्थिर झाले होते. अशा अस्थिर सामाजिक-राजकीय स्थितीत भांबावलेल्या 'व्यक्ती'ला स्टॉइक तत्त्वज्ञानाने तिच्या अंगी सुप्तावस्थेत असलेल्या एका स्थिर अशा आत्मिक'स्व'ची ओळख करून दिली. या अखंडित 'स्व'मध्ये 'स्थिरबुद्धीने' राहून व्यक्ती भोवतालच्या विखंडित जगाशी दोन हात करू शकते याची शिकवण दिली. नीती हीच जीवनाची खरी आणि आवश्यक शक्ती आहे ही धारणा मनावर बिंबवली. त्या काळातील स्थित्यंतरांच्या वेगाने गोंधळून गेलेल्या समाजाला हे तत्त्वज्ञान बरेच उपयुक्त ठरले असावे.

दरम्यान ख्रिस्ती धर्माचा उदय आणि ख्रिस्ती धर्मविचाराचा विकास होत असताना त्याच्या अनेक तत्त्वांना आकार आणि बळ देणारा जीवनरस स्टॉइक तत्त्वज्ञानातील कल्पना, मर्मदृष्टी यांच्यामधून मिळाला असे अभ्यासकांनी नमूद करून ठेवले आहे. थोडक्यात लोकांच्या आचरणातून स्टॉइक पंथ नाहीसा होत असताना ख्रिस्ती धर्मात शिरकाव करून त्यातील अनेक तत्त्वांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले. स्वतंत्रपणे लॅटिनमध्ये स्टॉइक तत्त्वज्ञान लिखित स्वरूपात उपलब्ध असले तरी हळूहळू लॅटिन भाषाच लोकव्यवहारातून नाहिशी होऊ लागल्यामुळे हे स्टॉइक साहित्यदेखील बेदखल राहिले असावे.

पुढे रनेसान्स काळात युरोपीय समाज लॅटिन भाषा आणि त्या भाषेतील विस्मरणप्राय झालेले ग्रीक तत्त्वज्ञान यांच्या पुर्नराभ्यासाची लाट आली. या लाटेत स्टॉइक तत्त्वज्ञान युरोपीय समाजाच्या पुन्हा हाती लागले. आधुनिक काळाच्या उंबरठ्यावर असताना ग्रीक तत्त्वज्ञानातील सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांसारख्या ग्रीक तत्त्वज्ञांच्या लेखनाचे अनुवाद इटालियन, फ्रेंच, इंग्रजी अशा आधुनिक युरोपीय भाषांमध्ये सुरू झाले. त्याबरोबर स्टॉइक तत्त्वज्ञ सेनेका, एपिक्टेटस, ऑर्लियस यांच्याही लेखनाचे, उपदेशाचे अनुवाद होऊ लागले.एकोणिसाव्या शतकात कलेच्या क्षेत्रातील रोमँटिसिझम, समाजविचाराच्या क्षेत्रातील उदारमतवाद यांचा प्रभाव वाढल्यानंतर व्यक्तीच्या स्वतंत्र अशा 'आत्म'स्वरूपावर अधिक जबाबदारी येऊन पडली. ईश्वर, धर्म यांचा प्रभाव कमी होऊन व्यक्तीच्या जीवनाची नैतिक जबाबदारी खुद्द व्यक्तीवरच येऊन पडली. तिच्या अंगी 'विवेकी' अशी आत्मशक्ती असते, असली पाहिजे, असे गृहीत धरले जाऊ लागले. स्टॉइक तत्त्वज्ञानात ईश्वर, धर्म या कल्पनांना थारा नाही. संघटित ख्रिस्ती धर्माच्या स्थापनेपूर्वीचा हा पंथ आहे. त्यामुळे आधुनिक काळात नव्याने उदयाला आलेली ईश्वरविरहीत नीतीकल्पना, अशा नैतिकतेसाठी व्यक्तीच्या अंगी आवश्यक असणारा विवेक याविषयी तात्त्विक मर्मदृष्टी पुरवणारे तत्त्वज्ञान म्हणून सेनेका, एपिक्टेटस, ऑर्लियस यांच्या विचारांचा पुन्हा एकदा अभ्यास या काळात युरोपात सुरू झाला.

एकविसाव्या शतकात प्रवेश केल्यानंतरही युरोपात स्टॉइक तत्त्वज्ञानाचा अभ्यास अनेक विद्यापीठांमध्ये नव्या दृष्टीने सुरू आहे. एकोणिसाव्या शतकातील विचारवंतांनी स्टॉइक तत्त्वज्ञानात आधुनिक इहवादी नीतिविचाराला बळ देणारी तत्त्वे शोधली. आताचे विचारवंत-अभ्यासक या तत्त्वज्ञानाकडून पुन्हा एकदा भोवतालच्या अस्थिर वातावरणात व्यक्तीच्या जाणिवेला स्थिर करणारी तत्त्वे मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. आजचे युरो-अमेरिकी मानसशास्त्रज्ञ बौद्ध तत्त्वज्ञान, स्टॉइक तत्त्वज्ञान यांचा पुनर्विचार व्यक्तीला मानसिक स्थैर्य देणारे तत्त्वज्ञान म्हणून करत आहेत.

आधी म्हंटल्याप्रमाणे ग्रीकांच्या पडझडीच्या आणि रोमनांच्या उदयाच्या अत्यंत अराजकसदृश काळात जगणाऱ्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात स्टॉइकांनी 'स्वजाणिवे'ची स्थिर अशी 'भूमी' घडवली. तत्कालीन सामाजिक जीवनाचा आणखी एक पैलू असा की, रोमनांच्या साम्राज्यवादामुळे आजवर ज्यांच्या अस्तित्वाचीही माहिती नव्हती, अशा जगातील अनेक वंश आणि समाजांशी, त्यांच्या संस्कृतीशी रोमनांचा संपर्क आला. युद्धखोरी होतीच. संघर्ष वाढले. पण या काळात सेनेका आणि एपिक्टेटस यांनी आपल्या उपदेशात लोकांना परसंस्कृतीच्या लोकांवर प्रेम करणे, त्यांच्यासोबत शांततापूर्ण सहजीवन जगणे कसे आवश्यक आहे ते पटवून दिले. स्टॉइक तत्त्वज्ञानाचा हा पैलू आजच्या जागतिकीकरणोत्तर समाजात समतोलपणे जगण्यासाठी उपयोगी पडतो. विविध संस्कृतींच्या संपर्कातून जेव्हा एकीकडे संस्कृतीसंघर्षाची भाषा केली जाते, त्यावर सिद्धान्त रचले जातात, तेव्हा परसंस्कृतीकडे सहृदयतेने, आदराने पाहण्याची दृष्टी हे तत्त्वज्ञान देते; या दृष्टिकोनातूनही या तत्त्वज्ञानाचा विचार अलीकडे युरोपात होतो आहे.

मराठीमध्ये सेनेका आणि एपिक्टेटस यांचे तत्त्वज्ञान येऊन एक शतक उलटले. एकोणिसाव्या शतकात आधुनिक युरोपीय भाषांमध्ये स्टॉइक तत्त्वज्ञांची पुस्तके प्रकाशित होत होती, तेव्हाच नेमका भारत इंग्रजांच्या राजकीय वसाहतवादी वर्चस्वाखाली येण्याची प्रक्रिया पार पडली. या वसाहतवादामुळे इंग्रज आणि भारतीय-

महाराष्ट्रीय या दोन संस्कृतींचा संपर्क आला. या राजकीय वर्चस्ववादामुळे संस्कृतिसंपर्काच्या क्रियेत भारतीयांकडून आदानच अधिक घडले; प्रदान फारसे नाही. या आदानाच्या माध्यमातून स्टॉइक तत्त्वज्ञान मराठीत येऊन पोहोचले. पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करणारे सयाजीराव गायकवाड यांना, भारतीयांसाठी आजवर अपरिचित असलेले हे तत्त्वज्ञान मराठीसारख्या देशी भाषेत आणावेसे वाटले. व्यासंगी कृष्णराव केळूसकर या लेखकाने ते अनुवादित केले.

पण या प्राचीन तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रीय संस्कृतीतील प्रवास त्याच्या सव्वाशे वर्षांपूर्वीच्या त्याच्या मराठीतील आगमनापाशीच स्तब्ध झाला. सेनेका, एपिक्टेटस (आणि ऑर्लियस) यांच्या विचारांची चर्चा पुढे मराठीत झाली नाही. ज्या काळात या तिघांच्या साहित्याचा अनुवाद मराठीत झाला, त्या काळातील मराठीसह भारतीय संस्कृतीचे स्वरूप हे बरेचसे एकारलेले होते. ज्या तथाकथित उच्चवर्णीयांचे वर्चस्व समाजावर होते, त्यांना अभिप्रेत असणारा पारंपरिक धर्मविचार, परंपरा यांचेच वर्चस्व संस्कृतीवर होते. त्याहून निराळे तत्त्वज्ञान, निराळे जीवनविषयक दृष्टिकोन यांना येथील सांस्कृतिक अवकाशात स्थान नव्हते, त्यांच्याविषयी स्वागतशीलताही नव्हती. स्टॉइक तत्त्वज्ञान तर पाश्चात्त्य, आणि म्हणून तोवर अपरिचित असणे स्वाभाविक होते; परंतु बौद्ध तत्त्वज्ञानासारखे भारतीय परंपरेतील प्राचीन काळी अग्रेसर राहिलेले तत्त्वज्ञान देखील एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारतीय समाजाच्या पूर्णपणे विस्मरणात गेले होते. इंग्रज पुरातत्त्वशास्त्रज्ञांना बौद्ध स्तूपांचे अवशेष सापडू लागल्यानंतर त्या वास्तू कोणत्या परंपरेतील आहेत याविषयी त्या परकीय पुरातत्त्वशास्त्रज्ञांइतकेच देशी लोकही अनभिज्ञ होते. सन १९००मध्ये गोव्यातला धर्मानंद दामोदर कोसंबी हा बौद्ध धर्माच्या अभ्यासाच्या कल्पनेने झपाटून गेलेला एक जिज्ञासू तरुण घरदार सोडून बाहेर पडला, तेव्हा भारताला बौद्ध धर्माचा आज उपयोग काय, आणि बौद्ध धर्माची शिकवण तुम्हाला आज भारतात कुठेही मिळू शकणार नाही, असे म्हणून रा. गो. भांडारकरांसारख्या जाणकार आणि प्रगल्भ इतिहाससंशोधकाने त्यांना नाउमेद करण्याचा प्रयत्न केला होता. नव्याने आकार घेऊ लागलेल्या मराठी ज्ञानविश्वात स्व-परंपरेबद्दल इतके संकुचित एकारलेपण असतानाच्या काळात प्राचीन रोमन संस्कृतीतील स्टॉइक तत्त्वज्ञानाचा अनुवाद दुर्लक्षित राहणे स्वाभाविकच होते. गेल्या शंभर वर्षांत कृष्णराव केळूसकर यांच्या एकूणच लेखनाकडे मराठी वाङ्मयीन संस्कृतीत दुर्लक्ष झाले आहे. एका परिघावरच्या लेखकाने हे अनुवाद केलेले असणे हे देखील हे अनुवाद बेदखल राहण्याचे एक कारण असावे.

गेल्या सव्वाशे वर्षांत परिस्थिती बऱ्यापैकी बदलली आहे. जग जवळ आले आहे, जगातील वेगवेगळ्या ज्ञानविश्वांमधून परस्परांशी आदानप्रदान अधिक समानतेच्या पातळीवरून होते आहे. मराठीतील संस्कृतिविचार आणि तत्त्वचर्चा आता त्या काळाइतकी एकारलेली राहिलेली नाही. तिच्यात विविध देशी-विदेशी दृष्टिकोन अवतरू लागले आहेत. अशा संवादी काळात मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या परिघावरच राहिलेल्या कृष्णराव केळूसकरांच्या एकूण साहित्याचे पुनर्प्रकाशन होऊन ते पुन्हा एकदा वाचकांसमोर येणे ही स्वागतार्ह बाब आहे.

केळूसकरांनी महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या प्रेरणेने केलेल्या सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांचा हा अनुवाद पुनर्प्रकाशित होणे आणखी एका अर्थाने आवश्यक आहे. आज जागतिक पातळीवर स्टॉइक तत्त्वज्ञानाचा नव्या दृष्टिकोनातून विचार होतो आहे हे वर सांगितलेच आहे. गेल्या अर्धदशकाच्या काळात मराठी तत्त्वचर्चेत भारतीय परंपरेतील तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांविषयीचे अनुवाद, परिचयात्मक लेखन

झाले आहे. ग्रीक परंपरेतील सॉक्रेटिस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या तीनही महत्त्वाच्या तत्त्वज्ञांचे विचार मराठीत अनुवादित झाले आहेत. सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या अनुवादाने हा पट अधिक रुंदावला आहे. ग्रीक-रोमन परंपरा आणि भारतीय परंपरा या दोन्ही प्राचीन तत्त्वज्ञान परंपरांचा तौलनिक विचार होण्याची शक्यता यातून निर्माण होते. सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या मराठी अनुवादाच्या पुनर्प्रकाशनाची आवश्यकता आजच्या मराठी वाङ्मयीन संस्कृतीत पुन्हा एकदा भासावी ही घटना स्टॉइक तत्त्वज्ञानाचे महत्त्व आणि कृष्णराव केळूसकरांची वाङ्मयीन महत्ता या दोन्ही बाबींना अधोरेखित करणारी आहे.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गुरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्मयसेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याबरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी माझी असेल मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

– राजन गवस

प्रस्तावना

'सेनेका व एपिक्टेटस यांची बोधवचने' हे कृष्णराव अर्जुन केळुसकर (१८६०–१९३४) यांचं अनुवादित पुस्तक बडोदानरेश महाराजा सयाजीराव गायकवाड पुरस्कृत ग्रंथमालेत सन १८९७ मध्ये प्रकाशित झालं.

सेनेका आणि एपिक्टेटस हे रोमन संस्कृतीमध्ये इसवी सनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेले स्टॉइक पंथाचे तत्त्वज्ञ होते. स्टॉइक पंथाचा उदय सेनेकाच्या तीन शतकं आधी, ग्रीक संस्कृतीच्या अवनतीच्या काळात झाला. मूळचा फिनिशियन असलेल्या झिनो या तत्त्वज्ञाने ग्रीसमध्ये या पंथाचं प्रवर्तन केलं. इ.स. पूर्व ३२० ते इ.स. पूर्व २५० हा झिनोचा काळ. ग्रीक सम्राट अलेक्झांडर याच्या मृत्यूनंतर ग्रीकांवर रोमनांनी सत्ता प्रस्थापित केली आणि ग्रीक संस्कृतीला ओहोटी लागली. छोटेमोठे स्थानिक रोमन राजे, त्यांचे आपसातले संघर्ष, रक्तपात यांमुळे समाजात जे अराजकाचं वातावरण तयार झालं, त्याच्या पार्श्वभूमीवर स्टॉइक विचाराचा उदय झाला. 'स्टॉइक' या संबोधाचं मूळ 'स्टोआ' (stoa) या ग्रीक शब्दात आहे. स्टोआ म्हणजे व्हरांड्यासारखी, एका बाजूने बंदिस्त असलेली आणि कमानी असलेली जागा. अशा जागी बसून झिनो प्रवचन देत असे.

जीवनाचं अंतिम मूल्य ज्ञान नसून नीती हे आहे, हा स्टॉइक पंथाचा पायाभूत सिद्धान्त आहे. प्लेटोने मानवी जीवनात ज्ञान हे सर्वोच्च मूल्य मानलं. ॲरिस्टॉटलनंतरच्या तत्त्वविचारात ज्ञानाची जागा नीतीने घेतली. तत्कालीन सार्वत्रिक अवनतीच्या काळात स्टॉइकांनी देखील नीतीचाच पुरस्कार केला. ग्रीसमधल्या अराजकाच्या स्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थिरबुद्धीने कसं जगायचं याविषयी स्टॉइकांनी मार्गदर्शन केलं. ग्रीक साम्राज्य नाश पावून छोट्या छोट्या राज्यांमध्ये तो समाज विखंडित झाला तेव्हा स्टॉइकांनी विश्वबंधुत्वाचा विचार रुजवण्याचा प्रयत्न केला. झिनोनंतर पुढच्या तीनशे वर्षांत क्लिअन्थिस (Cleanthes), क्रायसिपस (Chrysippus), पॉसिडोनस (Posidonus) हे चिंतक स्टॉइक परंपरेत निर्माण झाले. पण आज झिनो किंवा त्याचे वरील शिष्य यांच्यापैकी कोणाचंही साहित्य उपलब्ध नाही. स्टॉइक तत्त्वज्ञान म्हणून संपूर्ण स्वरूपात उपलब्ध असलेलं सर्वाधिक प्राचीन लिखाण सेनेका (इ.स. ४ ते इ.स. ६५), एपिक्टेटस (इ.स. ५० ते १३५) आणि मार्क्युज ऑरेलिअस (इ.स. १२१ ते १८०) या तिघांचं आहे. सेनेका हा रोमन सम्राट निरो याचा गुरू होता, तर एपिक्टेटस निरोचा गुलाम होता. दुसऱ्या शतकात होऊन गेलेला मार्क्युज ऑरेलियस इ.स. १६० ते १८० या काळात रोमन सम्राट होता.

त्यातही सेनेकाचं साहित्य संख्येने अधिक आहे. त्याने वीसहून अधिक तत्त्वज्ञानपर ग्रंथ लिहिले. शिवाय निसर्गविज्ञान, खगोलशास्त्र या विषयांवरही त्याची पुस्तकं आहेत. नाटककार म्हणूनही त्याची

ओळख आहे. नऊ शोकान्तिका आणि अनेक प्रहसनं त्याच्या नावावर आहेत. राजघराण्याशी जवळीक साधून असलेल्या सेनेकाच्या जीवनचरित्राचे तपशील केळूसकरांनी आपल्या अनुवादाच्या सुरुवातीला दिले आहेत. एपिक्टेटसने स्वतः काहीही लिहिलं नाही. त्याने आपल्या शिष्यांना मौखिक स्वरूपात वेळोवेळी केलेला उपदेश त्याचा शिष्य आरियन (Arrian) याने लिहून ठेवला होता. तो पुस्तकरूपाने उपलब्ध आहे. ऑरेलियस हा रोमन सम्राट स्वतःच्या जीवनात स्टॉइक तत्त्वांचं पालन करत असताना, स्वतःचे विचार, अनुभव, चिंतन नोंदवून ठेवत असे. या 'जर्नल्स'चंच नंतर पुस्तक झालं.

'स्टॉइक तत्त्वज्ञान' म्हणून युरोपीय परंपरेत उपलब्ध असलेलं तत्त्वज्ञान प्रामुख्याने या तीन तत्त्वचिंतकांचं आहे. युरोपमध्ये काळाच्या प्रत्येक टप्प्यावर या तत्त्वज्ञानाला वेगवेगळ्या अंगांनी प्रतिसाद मिळाल्याचं दिसतं. ख्रिस्ती आणि ज्यू धर्मामधल्या निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध, नैतिकता, सामाजिकता इत्यादी विषयांसंबंधीच्या कल्पनांना स्टॉइक तत्त्वज्ञानाने आकार दिला असं अभ्यासकांचं म्हणणं आहे. पुढे इस्लामच्या घडणीवरही काही बाबतींत स्टॉइक विचारांचा प्रभाव दिसतो. मध्ययुगात सिसेरोसारख्या तत्त्वज्ञांनी स्टॉइक तत्त्वज्ञानाचं पुनरुज्जीवन केलं. रनेसान्स (चौदाव्या-पंधराव्या शतकानंतर) काळात स्टॉइक तत्त्वज्ञानातल्या राजकीय आणि नैतिक विचारांचा ठळकपणे स्वीकार झाला. रनेसान्स काळातले राजकीय वर्चस्व आणि शैक्षणिक सुधारणा या विषयांसंदर्भातले विचार स्टॉइक तत्त्वज्ञानाला अतिशय जवळचे आहेत. तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्टॉइक तत्त्वज्ञानातला व्यक्तिगत नैतिकतेचा विचार अधिक प्रभावी ठरला.

गायकवाड ग्रंथमालिका आणि केळूसकर

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, ब्रिटिश भारतात, बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांना पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या परंपरेतलं हे स्टॉइक तत्त्वज्ञान मराठी भाषेत यावं असं वाटलं. स्वतःच्या जीवनात ज्ञानप्राप्तीला अतिशय महत्त्व देणाऱ्या सयाजीराव गायकवाडांनी बडोदा संस्थानाचा राज्यकारभार हाती घेतल्यानंतर ज्ञानाचा प्रसार बडोदा राज्यात (आणि एकंदर मराठी समाजातही) व्हावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. यात ग्रंथालय चळवळ आणि पुस्तकांचं प्रकाशन या दोन प्रमुख उपक्रमांचा समावेश आहे. आपल्या राज्यात तर त्यांनी गावोगावी ग्रंथालयांची स्थापना केलीच, पण महाराष्ट्रातही अनेक ग्रंथालयांना, ग्रंथनिर्मितीप्रकल्पांना त्यांनी अर्थसहाय्य दिलं. त्यांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेली वेगवेगळ्या विषयांवरची मराठी पुस्तकं हा वसाहतकालीन महाराष्ट्राच्या पुस्तक-इतिहासातला एक महत्त्वाचा अध्याय आहे.

सन १८८५ मध्ये पाटण इथल्या जैन ग्रंथालयातला संग्रह पाहून प्रभावित झालेल्या सयाजीरावांनी त्यातल्या काही ग्रंथांचं अनुवाद करवून घेण्याचा आदेश दिला (श्रीसयाजीगौरवग्रंथ, भाग सहावा - आठवणी : ६९). १८९० मध्ये गोविंद सखाराम सरदेसाई यांची बडोदा सरकारात सयाजीराव महाराजांचे 'रीडर' म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांच्याकडून महाराजांनी मॅकियाव्हेलीचं 'प्रिन्स' आणि जे. आर. सीली याचं 'एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड' या दोन पुस्तकांचा अनुवाद करवून घेतला (गो. स. सरदेसाई १९५६ : ९५). त्यानंतर या उपक्रमाची व्याप्ती वाढवून इंग्रजी, संस्कृत, पर्शियन भाषांमधले अनेक ग्रंथ मराठी व गुजराती भाषांमध्ये अनुवादित स्वरूपात प्रकाशित करण्यासाठी ग्रंथमालांची योजना त्यांनी राबवली. १८९४ पर्यंत ग्रंथमालांची जबाबदारी सरदेसाई यांच्यावरच होती. 'राष्ट्रकथामाला' व 'महाराष्ट्रकथामाला' या मालिका सरदेसाई यांनीच सुचवल्या

होत्या. त्यानंतर ग्रंथप्रकाशनाचं काम विद्याखात्याकडे सोपवण्यात आलं (दंडवते १९२५ : ३९). पुढील सुमारे चाळीस वर्षांत बडोदा सरकारच्या विद्याखात्याद्वारे अनेक ग्रंथप्रकाशन मालिका राबवल्या गेल्या. नंतरच्या काळात दामोदर सावळाराम यंदे यांच्यासारख्या खाजगी प्रकाशकांना ग्रंथमालिकांसाठी अनुदानं देण्यात आली. या सर्व उपक्रमांद्वारे अनुवाद आणि स्वतंत्र लेखन या दोन्ही स्वरूपांत शेकडो ग्रंथ निरनिराळ्या ग्रंथमालिकांमधून प्रकाशित झाले.

१८९२ च्या सुमारास 'राष्ट्रकथामाला' या मालिकेअंतर्गत विविध युरोपीय राष्ट्रांचा इतिहास पुस्तकरूपाने प्रकाशित होऊ लागला. त्यातला फ्रान्सचा इतिहास प्रकाशित करण्याची जबाबदारी कृष्णराव केळूसकरांकडे आली. याच दरम्यान पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अनुवाद मराठीत करण्याचाही उपक्रम सयाजीरावांनी सुरू केला. त्याअंतर्गत स्टॉइक तत्त्वज्ञ मार्क्युज ऑरेलियस याच्या ग्रंथाच्या अनुवादाचं काम मुंबईतल्या सिमियन बेंजामिन वॉकर या इस्रायली विद्वानाकडे सोपवण्यात आलं. कृष्णराव केळूसकर हे सिमियन वॉकर यांचे समविचारी स्नेही होते. तत्त्वज्ञानाचा उत्तम व्यासंग आणि अतिशय परिश्रमपूर्वक कमावलेली मराठी लेखनशैली असलेल्या केळूसकरांनी वॉकर यांना ऑरेलियसच्या या ग्रंथाचा अनुवाद करण्यात मोठी मदत केली असं केळूसकरांनी आत्मकथनात सांगितलेल्या हकिगतीवरून दिसतं (धनंजय कीर १९७७ : ९३). सिमियन वॉकर यांचा ऑरेलियसचा अनुवाद आणि केळूसकरांनी केलेला फ्रान्सच्या इतिहासाचा अनुवाद ही दोन्ही पुस्तकं गायकवाड सरकारतर्फे १८९३ मध्ये प्रकाशित झाली.

स्टॉइक तत्त्वज्ञान आणि सयाजीराव महाराज

सुमारे सव्वादोन हजार वर्षं पुरातन स्टॉइक तत्त्वज्ञान मराठीत यावं असं सयाजीरावांना का वाटलं असावं, आणि हे तत्त्वज्ञान मराठीत आणताना त्यांनी सर्वप्रथम ऑरेलियसच्या तत्त्वज्ञानाचीच निवड अनुवादासाठी का केली असावी, याचा मागोवा घेता येतो.

स्टॉइक तत्त्वज्ञांपैकी सेनेका हे सतराव्या शतकात युरोपमध्ये बहुचर्चित व्यक्तिमत्त्व होतं, पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तो युरोपीय समाजाच्या काहीसा विस्मरणात गेला होता. हा युरोपीय समाजाच्या आधुनिक अवस्थेचा आरंभकाळ होता. सामाजिक विचारात व्यक्तिवाद आणि कलाविचारात आत्मनिष्ठा ही तत्त्वं प्रस्थापित होऊ पाहात होती. या व्यक्तिवाद आणि आत्मनिष्ठा यांचं नातं तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्व पावू लागलेल्या व्यक्तिसापेक्ष नैतिकतेच्या कल्पनेशी होतं. स्टॉइक तत्त्वज्ञानामध्येदेखील ही नैतिकता अतिशय महत्त्वाची मानली गेली आहे. त्यामुळे युरोपीय विचारवंत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पुन्हा स्टॉइक विचाराकडे वळू लागले होते. पण या काळात सेनेकाचं शैलीदार लेखन लोक काहीसं विसरले होते आणि ऑरेलियस आणि एपिक्टेटस यांचं भावपूर्ण लिखाण युरोपीय समाजाला अधिक प्रिय वाटत होतं. उदाहरणार्थ, अर्नोल्ड बेनेट या तत्कालीन प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकाराला ऑरेलियस हा सर्वात थोर स्टॉइक लेखक-चिंतक आहे आणि एपिक्टेटस तर लोकांच्या नित्यपठणातच असायला हवा, असं वाटत होतं (Frances and Henry Hazlitt १९८४ : १-२). बेनेटचं हे मत तत्कालीन युरोपीय समाजाचं स्टॉइक साहित्याबद्दलचं प्रातिनिधिक मत म्हणून स्वीकारायला हरकत नाही.

सयाजीरावांचा पाश्चात्त्य शास्त्रं, इतिहास, तत्त्वज्ञान यांचा अभ्यास दांडगा होता. सर्व युरोपीय तत्त्वज्ञान परंपरांशी त्यांचा परिचय होता. स्टॉइक तत्त्वज्ञानासंबंधी तत्कालीन युरोपीय चर्चाविश्वात चालू असलेल्या चर्चेशी ते परिचित असणारच. स्टॉइक तत्त्वज्ञानातल्या विरक्तीची कल्पना, सर्व अनुभवांच्या प्रति समभाव ठेवून जगणं, मनःशांतीची आवश्यकता अशा काही कल्पनांचं भारतीय तत्त्वज्ञानाशी अतिशय साम्य आहे, याची जाणीव सयाजीरावांना झाली होती, असं कृष्णराव केळूसकरांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद केलं आहे. यामुळे हे तत्त्वज्ञान आपल्या वाचकांना जवळचं वाटेल अशी त्यांना अटकळ असावी.

मार्क्युज ऑरेलियस हा तेव्हा लोकप्रिय आणि श्रेष्ठ स्टॉइक चिंतक मानला जात होता. सयाजीरावांना तो दुसऱ्याही एका बाजूने अधिक ज्ञात होता. एडवर्ड गिबन याचा 'राईज अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' हा रोमन साम्राज्याच्या उत्कर्ष आणि पतनाविषयीचा जगप्रसिद्ध ग्रंथ सयाजीरावांना अतिशय प्रिय होता. इतका, की सयाजीरावांनी स्वतः या त्रिखंडीय महाग्रंथाचा सारांश इंग्रजीत लिहून 'फ्रॉम सीझर टू सुलतान' या शीर्षकाने प्रसिद्ध केला. त्याचा मराठी अनुवादही पुढे त्यांनी राजारामशास्त्री भागवत यांच्याकडून करवून घेतला. या ग्रंथात रोमनांच्या इतिहासाचा प्रारंभ स्टॉइक मताचा रोमन सम्राट मार्क्युज ऑरेलियस याच्यापासूनच होतो. या इतिहासाद्वारे ऑरेलियस सयाजीराव महाराजांचा चांगलाच परिचयाचा असणार हे उघड आहे. या कारणांमुळे स्टॉइक तत्त्वज्ञानाच्या अनुवाद प्रकल्पाची सुरुवात त्यांनी ऑरेलियसच्या जर्नल्सपासून केली असण्याची शक्यता आहे.

ऑरेलियसच्या जर्नल्सचा अनुवाद सिमियन बेंजामिन वॉकर यांनी पूर्ण केल्यानंतर सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या अनुवादाविषयी बडोदा सरकारने वॉकर यांच्याकडे विचारणा केली होती. परंतु त्यांनी ते नाकारल्यानंतर या अनुवादाचं काम कृष्णराव केळूसकरांकडे सोपवण्यात आलं. केळूसकर याबाबत आपल्या आत्मकथनात अधिक माहिती पुरवतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे १८९३मध्ये सिमियन वॉकर यांना सर्वप्रथम बडोदा सरकारने ऑरेलियसच्या वचनांच्या अनुवादाचं काम दिलं तेव्हा त्या कामात केळूसकरांनी वॉकर यांना बरीच मदत केली होती. १८९६मध्ये सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या वचनांच्या अनुवादाचा प्रस्ताव बडोदा सरकारकडून वॉकर यांच्यासमोर आला खरा, पण या वेळी केळूसकरांकडून आपल्याला अनुवादात सहकार्य मिळणार नाही हे समजल्यानंतर वॉकर यांनी हे काम करण्याबाबत असमर्थता दर्शवली. त्यानंतर हा अनुवाद करण्याची जबाबदारी केळूसकरांवरच सोपवण्यात आली (धनंजय कीर, १९७७ : ९३).

सन १८९३ मध्ये, फ्रान्सचा इतिहास मराठीत अनुवादित करण्याचं काम सयाजीराव महाराजांनी त्यांचे दिवाण रामचंद्र विठोबा धामणसकर यांच्या शिफारशीवरून कृष्णराव केळूसकरांना दिलं होतं. केळूसकरांचं ज्ञान आणि अभ्यासूपणा यांच्याशी धामणसकरांचा परिचय सत्यशोधक चळवळीतले कार्यकर्ते रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या घरी झाला होता. केळूसकरांनी भरपूर स्पष्टीकरणात्मक तळटीपा आणि पूरक आवश्यक ती परिशिष्टं जोडून केलेला फ्रान्सच्या इतिहासाचा हा अनुवाद सयाजीरावांच्या अतिशय पसंतीला उतरला होता. शिवाय कदाचित केळूसकर आणि सिमियन वॉकर यांच्यातील स्नेहाचं नातं ध्यानात घेता स्वतः वॉकर यांनी देखील आपल्याऐवजी केळूसकरांकडे सेनेका-एपिक्टेटस यांची वचनं अनुवादित करण्याची

जबाबदारी सोपवण्याची शिफारस बडोदा सरकारकडे केली असावी. त्या त्या विषयातल्या अनेक पारंगत लेखक-अनुवादकांना शोधून सयाजीरावांनी त्यांना लिहितं केलं होतं. अशा कारणांमुळे स्टॉइक तत्त्वज्ञांच्या वचनांचा अनुवाद करण्याची संधी केळूसकरांना मिळणं स्वाभाविकच होतं.

अभ्यासू व विवेकवादी लेखक म्हणून जडणघडण

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या अनुवादाचं काम कृष्णराव केळूसकरांकडे आलं तेव्हा नुकतीच वयाची पस्तिशी ओलांडलेले केळूसकर मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी करत होते. एक सुधारकी, उदारमतवादी विचाराचा अभ्यासू लेखक म्हणून पंचविशीत असल्यापासूनच केळूसकरांच्या लेखनाने विद्वान-जाणकारांचं लक्ष वेधून घेतलं होतं. १८८७ मध्ये मुंबईतल्या हेमंत व्याख्यानमालेत वामन आबाजी मोडक या प्रसिद्ध प्रार्थनासमाजिस्टांनी दिलेल्या धर्मपर व्याख्यानावर केळूसकरांनी 'इंदूप्रकाश' या नियतकालिकात केलेली टीका मुंबईतल्या बुद्धिजीवी लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरली होती (धनंजय कीर १९७७ : १३३). सामाजिक आणि राजकीय विषयांवरचे त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रसिद्ध होऊ लागले होते. लक्ष्मण पांडुरंग नागवेकर यांच्या मालकीच्या 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली' या मासिकातून केळूसकरांचं भगवद्गीतेवरचं भाष्य क्रमशः प्रसिद्ध होत होतं. मूळ गीतेतल्या प्रत्येक श्लोकावर वामन, मोरोपंत, श्रीधर, तुकाराम आणि उद्धवचिद्धन यांच्या टीका उद्धृत करून त्याखाली स्वतःचं भाष्य अशा पद्धतीने केळूसकर ते लिहीत होते. याच मासिकासाठी केळूसकरांनी क्रमशः लिहिलेलं तुकाराम चरित्र १८९६ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालं होतं आणि गौतम बुद्धाची चरित्रमालिका क्रमशः सुरू होती.

महाराष्ट्रातले एक बुद्धिवादी, विवेकवादी लेखक म्हणून कृष्णराव केळूसकर यांचा उदय एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात कसकसा झाला ते आत्मकथनात त्यांनी सांगितलेल्या अनेक घटनांवरून ध्यानात येतं (धनंजय कीर : १९७७). लेखक म्हणून केळूसकरांच्या झालेल्या जडणघडणीमागे ज्ञानसंपादनासाठी प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी लहानपणापासून केलेले प्रयत्न आणि प्रचंड श्रम होते. वाचन तर त्यांच्या जीवनाचा श्वासच होता. म्हणूनच उतारवयात जेव्हा दृष्टी अधू बनून त्यांना वाचणं अशक्य झालं तेव्हा वाचन करता येत नसेल तर आता आपला जगून काय उपयोग अशी विफलतेची भावना त्यांच्या मनात घर करून राहिली होती.

कृष्णरावांच्या वडलांना, अर्जुनरावांना नोकरी-व्यवसायासाठी सतत स्थलांतर करावं लागलं. त्यामुळे कृष्णरावांच्या बालपणी गावं आणि शाळा सातत्याने बदलत राहिल्या. पण या अस्थिरतेचा आपल्या मुलाच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होऊ नये याची अर्जुनराव काळजी घेत. कृष्णरावांनाही लहानपणापासून वाचन-श्रवणाची गोडी होती. आर्थिक परिस्थिती गरिबीची आणि सामाजिक उतरंडीत मराठा जातीचे असल्यामुळे शिक्षणात येणाऱ्या अडचणी; अशा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत या बापलेकांनी केलेली मात अनेक अर्थांनी उद्बोधक आहे.

लहानपणापासून संधी मिळेल तिथं पोथ्यांची पारायणं आणि प्रवचनं यांना हजेरी लावून कृष्णराव पारंपरिक साहित्याचे जाणकार झाले. मालवणातल्या एका जमीनदाराकडे काम करत असताना मोडी लिपी

येत नाही म्हणून त्याने हिणवल्यावर जिद्दीने काही दिवसांतच मोडी शिकले. मुंबईतल्या फणसवाडीतल्या अमरचंद शाळेत कृष्णशास्त्री गोडबोले हे शिक्षक कृष्णरावांना लाभले. व्याकरणकार आणि खगोलशास्त्राचे अभ्यासक म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासात यांच्या नावाची नोंद आहे. त्यांनी कृष्णरावांवर आधुनिक विचारांचे, निरीश्वरता-बुद्धिवाद यांचे संस्कार केले. कृष्णरावांमधल्या बुद्धिवादी लेखकाचा पाया या संस्काराने रचला गेला.

१८८१ मध्ये मॅट्रिक झालेल्या कृष्णराव केळूसकरांना बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण थांबवून नोकरी पत्करावी लागली. हाईम साम्युएल केहीमकर (१८३१-१९०८) हे ज्यू गृहस्थ मुंबईच्या माझगाव भागात १८७५ पासून इस्रायली-ज्यू मुलांसाठी इंग्रजी आणि मराठी शाळा चालवत होते. या शाळेत केळूसकरांना नोकरी देताना केहीमकरांनी, तुम्ही जातीचे मराठे आहा, आमच्या मुलांबरोबर तुम्हांला शुद्ध मराठी भाषा बोलण्यास जपले पाहिजे, अशी ताकीद दिली. केहीमकरांचं हे बोलणं केळूसकरांच्या जिव्हारी लागलं आणि त्यांनी पुढची दोन वर्षं आपल्या मराठी भाषेवर विशेष मेहनत घेतली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'तल्या भाषाशैलीचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला आणि त्याच प्रकारची भारदस्त ग्रांथिक मराठी शैली कमावली. या शैलीचा उपयोग पुढे केळूसकरांना वैचारिक लेखनासाठी झाला. त्यामुळे आपल्या लेखकीय कारकिर्दीच्या सुरुवातीलाच 'इंदूप्रकाश', 'सुबोधपत्रिका', 'दीनबंधू' इत्यादी नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले केळूसकरांचे वैचारिक निबंध वि. कों. ओक, मामा परमानंद, रामचंद्र विठोबा धामणसकर, सयाजीराव गायकवाड अशा मान्यवरांच्या नजरेत भरले.

पण केवळ शैलीदार लेखन हे केळूसकरांच्या लेखनाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य नाही. वसाहतकालीन मराठी साहित्याच्या इतिहासात केळूसकर उठून दिसतात ते त्यांच्या लेखनातील बुद्धिवादी, विवेकवादी भूमिकेमुळे. शिक्षण संपवून नोकरीला लागल्यावर केळूसकरांची ज्ञानलालसा वाढतीच राहिली. विशेष म्हणजे विद्यापीठीय शिक्षणाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद झालेले असताना विद्वज्जनांशी चर्चा आणि पुस्तकांचं वाचन या माध्यमातून केळूसकर अखेरपर्यंत ज्ञान संपादन करत राहिले. आणि मराठीत ग्रंथनिर्मिती करून त्यांनी हे ज्ञान समाजाला उपलब्ध करून दिलं.

आपल्या ज्ञानसंपादनाबद्दल 'स्वाध्याय' नावाचं स्वतंत्र प्रकरणच कृष्णरावांनी आत्मचरित्रात लिहिलं आहे. त्यावरून वाचनाद्वारे केळूसकरांची वैचारिक जडणघडण कशी झाली याचा बोध होतो. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी लहानपणीच केलेल्या उपदेशामुळे नास्तिक विचाराचं, बुद्धिवादाचं बीज केळूसकरांच्या मनात पेरलं गेलं होतंच. इस्रायली शाळेत नोकरीला लागल्यानंतर केळूसकरांचा सिमियन बेंजामिन वॉकर यांच्याशी परिचय झाला. सिमियन वॉकर, रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी १८८२ पासून 'नीतिप्रसारक मंडळी' नावाचं चर्चामंडळ सुरू केलं होतं. रामय्या अय्यावारू हे मुंबईतल्या सत्यशोधक समाजाचे संस्थापक-धुरीण होते. सिमियन वॉकर, त्यांची पत्नी रिबेका, रामय्या अय्यावारू, नारायण मेघाजी लोखंडे, विनायक दादाजी, सखाराम विश्राम राजवाडकर इत्यादी मंडळी पायधुणीच्या एका शाळेत दर रविवारी जमत व चर्चा करत (मनोहर कदम १९९९ : ४९). या मंडळात केळूसकर दाखल झाले.

सिमियन वॉकर आणि त्यांचं मित्रमंडळ हे 'फ्री थिंकर' होते. या विचाराची पार्श्वभूमी अशी : युरोपात आधुनिक विज्ञानाच्या उदयामुळे धर्मप्रणीत जीवन कालबाह्य ठरलं, तरी धर्माचा त्याग करायला अनेक विचारवंत तयार नव्हते. कारण मानवी जीवनाचं नैतिक अधिष्ठान धर्मामुळेच टिकून राहतं अशी त्यांची धारणा होती. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात 'I think therefore I am' अशा शब्दांत मानवी विवेकशक्तीला केंद्रस्थानी मानणारा देकार्तसारखा तत्त्वचिंतकसुद्धा मनुष्याला नैतिकतेने जगण्यासाठी धर्माचा 'धाक' आवश्यक आहे, असं मानत होता. या भूमिकेला विरोध करणारा फ्री थिंकर्सचा विचार सतराव्या शतकात इंग्लंडमध्ये पुढे आला. मानवी जीवनातल्या सत्य, नीती या तत्त्वांना कोणत्याही धर्मश्रद्धेचा आधार देण्याची काहीच आवश्यकता नाही. तर्कबुद्धी, विवेकशीलता यांच्या आधारे जीवनात सत्य, नीती यांची स्थापना झाली पाहिजे असं त्यांचं म्हणणं होतं.

एकोणिसाव्या शतकात भारतात आधुनिक इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारामुळे धार्मिक आणि सामाजिक सुधारणांचे विचार समाजात रूजू लागले. परंतु यातून निर्माण झालेल्या सुधारणावादी चळवळींनी धर्मविचाराची कास सोडली नाही. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज हे नैतिकतेचं मूल्य धर्मनिष्ठेलाच जोडत होते. प्रार्थना समाजाच्या विचारात 'विवेकशील श्रद्धे'ला महत्त्वाचं स्थान होतं.

याउलट 'नीतिप्रसारक मंडळी'त येणारे बहुतेक लोक नास्तिक मताचे होते. नैतिक मूल्यं ही धर्माशी निगडीत असतात ही भूमिका त्यांना अमान्य होती. काही अज्ञेयवादी होते. लहानपणापासून बुद्धिवादी मताचा संस्कार झालेल्या कृष्णराव केळूसकरांना या 'फ्री थिंकर्स'चं आकर्षण वाटणं स्वाभाविक होतं. सलग तेरा वर्षे दर रविवारी भरणाऱ्या मंडळाच्या वादसभेत त्यांनी भाग घेतला. त्यासाठी भरपूर वाचन केलं. सॉक्रेटिसपासून आधुनिक काळातल्या मिल्ल आणि स्पेन्सर यांच्यापर्यंत संपूर्ण पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास त्यांनी केला. जोडीला समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, शरीरशास्त्र, उत्क्रांतिवाद या आधुनिक ज्ञानशाखांवरचे इंग्रजी ग्रंथही बारकाईने वाचले.

तत्कालीन महाराष्ट्राच्या विचारविश्वात पुराणमताभिमानी-सनातनी विचारांचा एक प्रवाह होता, तर दुसरा प्रवाह धार्मिक-सामाजिक सुधारणांचा मध्यममार्ग पुरस्कारणारा प्रार्थना समाजाचा होता. या दोन्ही विचारप्रवाहांहून निराळा असा नास्तिक-विवेकवादी वैचारिक दृष्टिकोन एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस शिक्षित मराठी समाजात उदयाला आला. कृष्णराव या विचारप्रवाहाचे कट्टे पुरस्कर्ते होते. या भूमिकेतून त्यांनी प्रार्थना समाजाच्या धर्मप्रधान नीतिविचारावर टीकाही केली. प्रार्थना समाजापेक्षा महात्मा फुल्यांचा सत्यशोधक समाज त्यांना वैचारिकदृष्ट्या अधिक जवळचा वाटत होता. सत्यशोधक समाजात निर्मिकाची कल्पना मानलेली असली तरी प्रत्यक्ष आचरणात निर्मिकाला फार महत्त्वाचं स्थान नव्हतं. महात्मा फुल्यांनी हिंदू धर्मपरंपरा आणि पुराणसाहित्य यांना दिलेला स्पष्ट नकार, जातीय विषमतेवर केलेले प्रहार यांमुळे बुद्धिवादी केळूसकरांना सत्यशोधक चळवळीविषयी आत्मीयता असणं स्वाभाविक होतं. १८७३ मध्येच, वयाच्या तेराव्या वर्षीच ताडदेवमधल्या नागू सयाजी यांच्या वाड्यात केळूसकरांनी महात्मा फुल्यांना सर्वप्रथम पाहिल, ऐकलं. पुढे शिक्षक म्हणून नोकरी करताना, नीतिप्रसारक मंडळीच्या माध्यमातून नारायण मेघाजी लोखंडे, रामय्या अय्यावारू या सत्यशोधकांच्या संपर्कात ते आले. सत्यशोधक सभांमधून ते भाषणं

देऊ लागले आणि लोखंडे यांच्या 'दीनबंधू' पत्रातून त्यांचे लेख प्रसिद्ध होऊ लागले. कामगारांच्या हितासंदर्भात केळूसकर 'दीनबंधू'त लेख लिहीत असत. त्यांचे एक स्नेही मोरो विठ्ठल वाळवेकर १८८३ मध्ये प्रार्थना समाजाच्या 'सुबोधपत्रिका' या पत्राचे संपादक झाल्यानंतर ते देखील केळूसकरांचं लेखन प्रकाशित करू लागले.

१८९३ मध्ये केळूसकरांचे एक स्नेही लक्ष्मण पांडुरंग नागवेकर यांनी त्यांच्या 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली'साठी कोणत्यातरी 'आध्यात्मिक साधूं'विषयी लिहावं असं केळूसकरांना सुचवलं. तेव्हा केळुस्करांनी आपले चरित्रनायक म्हणून तुकाराम आणि गौतम बुद्ध यांची निवड केली. ही निवड त्यांच्या वैचारिक भूमिकेला सुसंगत होती. तोवर मराठीत या दोन्ही महापुरुषांवर फारसं साहित्य उपलब्ध नव्हतं. केळूसकरांनी लिहिलेली चरित्रं ही या दोघांचीही मराठीतली संपूर्ण अशी पहिलीच चरित्रं होती. यानंतर उत्तरायुष्यात केळूसकरांनी शिवाजी महाराजांचं चरित्र लिहिलं. चमत्कारप्रधान तपशिलांना फाटा देऊन चिकित्सक दृष्टीने लिहिलेल्या या चरित्रांद्वारे नव्या वस्तुनिष्ठ चरित्रलेखनाचा पायंडा आधुनिक मराठी साहित्यात केळूसकरांनी पाडला. तसंच ब्राम्हणेतर समाजातल्या कर्तबगार पुरुषांची चरित्रं लिहून त्यांनी आपली लेखकीय बांधिलकी स्पष्ट केली.

केळूसकरांचं संघर्षमय लेखनकार्य

कृष्णराव केळूसकरांनी आपली विद्वत्ता आणि लेखनशैली कठोर बौद्धिक परिश्रमांनी घडवली होती. जीवनविषयक निश्चित दृष्टिकोन आणि ठाम विवेकवादी वैचारिक भूमिका असणारा हा लेखक होता. संबंधित विषयाचा सांगोपांग अभ्यास केल्यावाचून केळूसकर कोणताही ग्रंथ लिहीत नसत. फ्रान्सचा इतिहास आणि गीतेवरचं भाष्य लिहिताना, उपनिषदांचं भाषांतर करताना आपण परिश्रमपूर्वक किती संदर्भ शोधले, पक्की कशी पूर्वतयारी केली याची साद्यंत हकिगत त्यांनी लिहून ठेवली आहे. पण केळूसकरांच्या वाचन-लेखनाची ही हकिगत केवळ त्यांनी घेतलेल्या बौद्धिक परिश्रमांपाशी संपत नाही. या कहाणीला सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यातल्या संघर्षांचे बोचरे पदर आहेत. केळूसकर नास्तिक मताचे आहेत, ख्रिस्ती धर्ममतावर टीका करतात म्हणून त्यांना जुन्या कराराचा अनुवाद करण्याचं काम देण्यास ख्रिस्ती धर्माभिमान्यांकडून विरोध झाला. प्रार्थना समाजावर त्यांनी केलेल्या टीकेमुळे प्रार्थना समाजिस्टांचाही रोष त्यांनी ओढवून घेतला होता. प्रार्थना समाजाचं मुखपत्र असलेल्या 'सुबोधपत्रिके'त केळूसकरांचं लेखन त्यांचे स्नेही मोरो विठ्ठल वाळवेकर हे निनावी छापत असत. केळूसकरांसारख्या तथाकथित शूद्र जातीच्या गृहस्थाला सयाजीराव महाराजांनी उपनिषदांचा अनुवाद करायला सांगितला म्हणून हिंदूंमधल्या तथाकथित उच्चवर्णीयांनी खळखळ केली. नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन याच्या खुनाच्या खटल्याविषयी 'जगद्वृत्त' पत्रात लिहिताना केळूसकरांनी महाराष्ट्रात उदयाला आलेल्या ब्राम्हणी राष्ट्रवादाकडे प्रथमच लक्ष वेधलं. याची 'शिक्षा' म्हणून त्यांच्या लिखाणावर अप्रत्यक्षपणे नियंत्रण आणण्याचा प्रयत्न झाला. 'सेन्सॉरशीप'च्या अशा विविध अवतारांना केळूसकरांना तोंड द्यावं लागलं.

अशा प्रतिकूल सामाजिक वातावरणात असूनही सातत्यपूर्ण कसदार लेखन करताना केळूसकरांना निदान वैयक्तिक आयुष्यात तरी निवांतपणा, स्वास्थ्य मिळावं; पण तेवढं सुखही त्यांच्या वाट्याला आलं

नाही. विद्वत्ता असूनही केवळ मॅट्रिक उत्तीर्ण असल्याने शिक्षकीपेशातल्या केळूसकरांना इतर पदवीधर शिक्षकांपेक्षा अतिशय कमी पगारावर काम करत राहावं लागलं. तशात आर्थिक विवंचनेने त्यांचा आयुष्यभर पाठपुरावा केला. एकत्र कुटुंबातली आजारपणं, निष्क्रीय भावंडांची जबाबदारी यांचा भार कायमच त्यांच्यावर राहिला. आर्थिक बाजू सावरण्यासाठी जादा शिकवण्या कराव्या लागल्या. मिशनऱ्यांना मराठी आणि संस्कृत शिकवण्याचं काम त्यांना बरे पैसे मिळवून देई. अगदी 'घोस्ट रायटर' म्हणूनही केळूसकरांनी अनेकांसाठी लेखनकाम केल्याचं त्यांच्या आत्मचरित्रावरून उघड होतं.

बडोदा सरकारच्या ग्रंथमालिकांची कामं मिळवण्याचा प्रयत्न केळूसकरांनी केला; किंवा होळकर, शाहू महाराज अशा संस्थानिकांकडे ग्रंथनिर्मितीसाठी मदत मागितली, त्यामागे त्यांची सततची आर्थिक निकड हे मुख्य कारण होतं. पण या काहीशा अगतिक परिस्थितीतही लेखनविषय निवडताना स्वतःच्या वैचारिक भूमिकेशी त्यांनी मुळीच तडजोड केली नाही. पैशासाठी आपल्या भूमिकेशी विसंगत विषयावर लिहायचा उद्योग त्यांनी केला नाही. तुकारामांचं चरित्र लिहिताना परंपरेने तुकारामाविषयी चालत आलेल्या चमत्कारिक प्रसंगांची त्यांनी बुद्धिवादी दृष्टिकोनातून नवी मांडणी केली. गीतेवर भाष्य लिहिताना आणि उपनिषदांचा अनुवाद करताना त्यांनी हिंदू धर्मविचाराचा एक तत्त्वज्ञान म्हणूनच अभ्यास केला. कोणताही ग्रंथ लिहिताना त्या त्या विषयाचा अभ्यास, बौद्धिक तयारी यांची त्यांनी पराकाष्ठा केली.

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांचा अनुवाद करण्याचं काम एका परीने केळूसकरांच्या मनोभूमिकेशी आणि विचारसरणीशी जुळणारं होतं. स्टॉईक तत्त्वविचारात धार्मिक आचार-विचाराला महत्त्व नाही. स्टॉईक पंथाचा प्रणेता झिनो याच्यावर सॉक्रेटिसच्या विचारांचा प्रभाव होता. सॉक्रेटिसने धर्म आणि नीतिविचार यांची फारकत केली म्हणून केळूसकरांनाही सॉक्रेटिस प्रिय होता. स्टॉईक पंथाचे तत्त्वचिंतक नीतीची धर्मनिरपेक्ष कल्पना मानत होते. त्यामुळे सेनेका, एपिक्टेटस यांच्या विचारांचा अभ्यास केळूसकरांनी विशेष आत्मीयतेने केला असण्याची शक्यता आहे. ते आपल्या प्रतिपादन विषयाशी किती एकरूप झाले होते याची उदाहरणं या पुस्तकात सर्वत्र आढळतात.

१८९६ मध्ये केळूसकरांकडे हे काम आलं तेव्हा त्यांची आई दम्याच्या आजाराने अंथरुणाला खिळली होती. अनुवादापोटी मानधन म्हणून केळूसकरांना एक हजार रुपये मिळणार होते. सहा महिन्यांत अनुवाद पूर्ण करून द्यायचा होता. पण त्यातले जवळजवळ तीन महिने केळूसकर आपल्या आईच्या शुश्रूषेत गुंतलेले असल्याने त्यांना अनुवादाला सुरुवातही करता आली नाही. या आजारपणातून केळूसकरांची आई वाचली नाही. नोव्हेंबर १८९६ मध्ये ती वारली आणि त्याच दरम्यान मुंबईत प्लेगची मोठी साथ आली. केळूसकरांची शाळा प्लेगमुळे नाताळानंतर बंद झाली. मुंबईच्या अनेक लोकांनी स्थलांतर केलं. केळूसकर देखील कुटुंबियांसह कोकणातल्या आपल्या गावी जाऊन राहिले आणि तिथं त्यांनी तीन महिन्यांत सेनेका-एपिक्टेटसच्या वचनांच्या अनुवादाचं कार्य पूर्ण केलं. त्यांचा धाकटा भाऊ सीताराम याने सुवाच्य अक्षरात हस्तलिखित प्रत तयार करायला मदत केली. यापूर्वी सयाजी ग्रंथमालेसाठी केळूसकरांनी केलेल्या 'फ्रान्सचा जुना इतिहास' या अनुवादाची हस्तलिखित प्रतही त्यानेच तयार केली होती. आपल्या या लेखक असलेल्या थोरल्या भावाचं सीतारामाला फार अप्रूप वाटे. तुटपुंजी कमाई आणि वाढता खर्च यांपायी होणारी

कृष्णरावांची ओढाताण त्याला पाहवत नव्हती. तो क्षयाने आजारी होता. मी लवकर या आजारातून बरा होईन, आणि नोकरी-व्यवसाय करून तुझा सगळा आर्थिक भार माझ्या खांद्यावर घेईन; मग तू निवांत लेखन कर, असं तो कृष्णरावांना म्हणत असे. केळूसकरांच्या लेखनाचं मोल जाणणारा कुटुंबातला तो एकमेव सदस्य असावा; एरवी इतर आप्त-स्नेही त्यांच्या सततच्या वाचन-लेखनाची कुचेष्टा करत असत. पण सीताराम दुखण्यातून बरा होऊ शकला नाही. लवकरच तो वारला. केळूसकरांच्या इतर लेखनाप्रमाणे याही पुस्तकाच्या लेखनाला संघर्ष आणि व्यथा यांच्या अनुभवाचा असा पदर आहे.

सेनेका-एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या केळूसकरकृत अनुवादाचं स्वरूप

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या सुरुवातीला प्रस्तावनेत केळूसकरांनी स्टॉइक तत्त्वज्ञानाची आजच्या काळातली आवश्यकता सांगताना त्यातल्या नीतिचर्चेला अधोरेखित केलं आहे. त्या काळातला युरोपीय समाजही याच नीतिप्रधान दृष्टिकोनातून स्टॉइक तत्त्वज्ञानाकडे पाहात होता हे वर सांगितलेलंच आहे. केळूसकर म्हणतात, प्रकृत ग्रंथास जोडलेल्या उपोद्धाताच्या आरंभीं स्टोइक तत्त्वज्ञानाचा ग्रीस देशांमध्यें उदय व प्रसार झाला तेव्हां ग्रीक राष्ट्रांची कशी काय अवस्था होती याचें निरूपण केलें आहे. या अवस्थेशीं बहुतेक सदृश अवस्था आम्हां महाराष्ट्रीयांस सांप्रत प्राप्त झाली आहे. तेव्हां अशा अवस्थेमध्यें स्टोइक लोकांचा नीतिबोध जेवढा आमच्या मनावर ठसेल तेवढें आमचें कल्याणच होण्यासारखें आहे.

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांचा अनुवाद वाचण्यापूर्वी मराठी वाचकांना हे दोन्ही तत्त्ववेत्ते आणि स्टॉइक त्यांचा पंथ यांचा परिचय असला पाहिजे या हेतूने सुरुवातीला सेनेका आणि एपिक्टेटस यांचं संक्षिप्त चरित्र आणि त्यानंतर उपोद्धातामध्ये स्टॉइक तत्त्वविचाराचा परिचय केळूसकरांनी करून दिला आहे. हा सर्व भाग अनुवाद नसून सारांशरूपाने केलेलं स्वतंत्र लेखन आहे. सेनेकाचं जीवन अतिशय वादळी होतं. त्याने आपल्या लेखनात गरिबीचे गोडवे गायले असले, तरी प्रत्यक्ष जीवनात मात्र प्रचंड संपत्ती गोळा केली. राजघराण्याशी असलेल्या जवळिकीमुळे त्याने अतिशय सुखासीन पद्धतीने जीवन व्यतीत केलं. या अफाट धनसंपत्तीपायी सम्राट निरोला देखील सेनेकाविषयी संशय येऊ लागला आणि त्याने सेनेकाला आत्महत्या करून जीवन संपवायला भाग पाडलं. हा सर्व घटनाक्रम सांगताना सेनेकाच्या विचार आणि व्यवहार यांतल्या अंतर्विरोधाबद्दल केळूसकरांनी नापसंती व्यक्त केली आहे. सेनेकाच्या विचारांचं मोठेपण सांगतानाही, साधी जीवनसरणी, अपरिग्रह यांचं गुणगान करणाऱ्या सेनेकाने एवढी संपत्ती मिळवणं ही त्याने स्वतःच्या नैतिक विचारांशी केलेली प्रतारणा होती असं केळूसकर स्पष्टपणे म्हणतात. सेनेका आणि एपिक्टेटस यांचं चरित्र केळूसकरांनी जे. बी. लाईटफूट यांचं 'सेंट पॉल अँड सेनेका' (१८९२) आणि एफ. डब्ल्यू. फरार यांच्या 'सीकर्स आफ्टर गॉड' (१८८१) या पुस्तकांच्या आधारे लिहिलं आहे.

स्टॉइक विचारांचा परिचय केळूसकरांनी तत्त्वविचार, सृष्टिशास्त्र, नीतिशास्त्र आणि धर्मसंबंधी विचार अशा चार भागांमध्ये विभागला आहे. यातही नीतिशास्त्राचं विवेचन सर्वात दीर्घ आहे. या विचारांचे सामाजिक संदर्भ, त्यांच्या उगमाची तत्कालीन परिस्थितीतली कारणं यांचाही मागोवा केळूसकरांनी घेतला आहे. उदाहरणार्थ, 'निसर्गक्रमास अंकित व्हावे', 'विश्वक्रमास सर्वथा वश व्हावे' अशा नियतीवादी विचाराचं मूळ तत्कालीन ग्रीक राष्ट्रांच्या समाजस्थितीत होतं; रोमन राजांनी ग्रीसवर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ग्रीक

समाजात परवशतेची भावना वाढीस लागली आणि तिचं प्रतिबिंब या स्टॉइक विचारातल्या नियतीवादात दिसतं, असं ते म्हणतात.

यानंतर सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या अनुवादाचा विभाग सुरू होतो. त्यातल्या सेनेकाच्या वचनांच्या विभागाचे दोन पोटविभाग आहेत : पहिला, 'सेनेकाची बोधवचने' आणि दुसरा, 'सेनेकाची पत्रे व इतर स्फुट विचार'. यानंतरच्या एपिक्टेटसच्या बोधवचनांच्या विभागाला स्वतंत्र पृष्ठक्रमांक दिले आहेत. सेनेकाची बोधवचनं आपण 'स्कॉट लायब्ररी' नामक ग्रंथमालिकेंतील एका इंग्रजी ग्रंथाच्या आधारे' घेतली आहेत, असं केळूसकरांनी प्रस्तावनेत सांगितलं आहे. हा ग्रंथ म्हणजे 'द मॉरल्स ऑफ सेनेका' हे वॉल्टर स्कॉड संपादित स्कॉट लायब्ररी या मालिकेत १८८८ मध्ये प्रकाशित झालेलं संकलन होय. सतराव्या शतकात सेनेकाच्या तत्त्वज्ञानाची बरीच चर्चा समाजात चालू असताना त्याच्या लेखनाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या होत्या. त्यातली एक महत्त्वाची आवृत्ती म्हणजे रॉजर एस्ट्रेंज या विद्वानाने १६७८ मध्ये सेनेकाच्या वेगवेगळ्या तात्त्विक ग्रंथांमधून वेचे निवडून इंग्रजीत तयार केलेलं एक उत्कृष्ट प्रातिनिधिक संकलन. याशिवाय सेनेकाच्या पत्रांचं आणि विखुरलेल्या स्फुट विचारांचं एक संकलन इंग्रजीत १६१४ मध्ये थॉमस लॉज या विद्वानाने प्रसिद्ध केलं होतं. या दोन्ही पुस्तकांवरून वॉल्टर स्कॉड याने स्कॉट लायब्ररीची संपादित आवृत्ती तयार केली होती.

याच स्कॉट लायब्ररी मालिकेतल्या 'एपिक्टेटस' या टी. डब्ल्यू. रोलस्टोन अनुवादित-संपादित पुस्तकावरून (१८९०) केळूसकरांनी एपिक्टेटसच्या वचनांचा अनुवाद केला. एपिक्टेटसने केलेला सर्व मौखिक उपदेश त्याचा शिष्य आरियन याने लिहून ठेवल्याचं वर सांगितलंच आहे. त्याच्या या समग्र उपदेशाच्या आवृत्तीवरून एक संक्षिप्त आवृत्तीदेखील आरियन याने स्वतःच तयार करून ठेवली होती. रोलस्टोन यांनी आरियनकृत ग्रीकमधील संक्षिप्त आवृत्तीवरून थेट इंग्रजीत हा अनुवाद केला. स्टॉइक तत्त्वज्ञ आणि तत्त्वज्ञान यांच्याविषयी लिहिण्यासाठी केळूसकरांनी त्यांच्या अगदी नजिकच्या काळात युरोपात प्रकाशित झालेली, अद्ययावत आणि विश्वासार्ह म्हणून मान्यताप्राप्त झालेली पुस्तकं निवडली होती हे लक्षात येतं. आपल्या प्रतिपादनविषयाचं अद्ययावत ज्ञान मिळवण्यात केळूसकर किती दक्ष असत हे यावरून दिसतं.

सेनेका आणि एपिक्टेटस यांची बोधवचनं अनुवादित करताना केळूसकरांनी मूळ इंग्रजी आवृत्त्यांमधला सर्व मजकूर जसाच्या तसा घेतलेला नाही. प्रस्तावनेत त्यांनी मजकुराच्या निवडीमागचं आपलं धोरण स्पष्ट केलं आहे - आतां या उभय ग्रंथांचा आधार घेतांना जितका मजकूर महाराष्ट्रवाचकांस अप्रयोजक किंवा अपरिचित भासण्यासारखा वाटला, तितका वगळला आहे. जेवढा नीतिबोध सर्वजनमान्य होण्याजोगा आहे असें वाटलें, तेवढ्याचाच प्रस्तुत ग्रंथांत संग्रह केला आहे. स्टोइकलोकांचे धर्मविचार पुष्कळांस अमान्य होण्यासारखे वाटल्यावरून ते यांत फारसे घेतले नाहींत. स्टॉइक तत्त्वज्ञानातला जो भाग भारतीय अध्यात्मशास्त्राशी असलेल्या साम्यामुळे आपल्या वाचकांना परिचित वाटेल तो प्रामुख्याने केळूसकरांनी अनुवादासाठी निवडला आहे हे यावरून स्पष्ट होतं. सेनेकाच्या स्कॉट लायब्ररी आवृत्तीमधली चार प्रकरणं केळूसकरांनी अनुवाद करताना वगळली आहेत. एपिक्टेटसच्या स्कॉट लायब्ररी आवृत्तीच्या सुरुवातीला स्टॉइक तत्त्वज्ञानाचा परिचय करून दिलेला आहे. केळूसकरांनी आपल्या अनुवादाच्या सुरुवातीला लिहिलेला स्टॉइक पंथाचा

आणि तत्त्वज्ञानाचा भाग रोलस्टोनच्या या मजकुरावरून सारांशरूपाने घेतला असावा. तसंच, रोलस्टोनच्या पुस्तकातल्या दुसऱ्या विभागातली दोन प्रकरणं, तिसऱ्या विभागातली पाच प्रकरणं, पाचव्या विभागातली तीन प्रकरणं आणि चौथा विभाग संपूर्ण – एवढा मूळ मजकूर त्यांनी अनुवाद करताना वजा केला.

इंग्रजी संहितेवरून अनुवाद यथामूल न करता काही ठिकाणी मजकूर वगळला आहे, तर काही ठिकाणी स्पष्टीकरणात्मक जादा मजकुराची जोड दिली आहे. एपिक्टेटसच्या बोधवचनांच्या दुसऱ्या विभागातल्या पाचव्या प्रकरणात एपिक्टेटसने 'Fear not to die, but fear a coward's death' हे युरिपिडसचं वचन उद्धृत करून त्यावर भाष्य केलं आहे. केळूसकरांनी तो संदर्भ वगळला आहे. याच्या उलट – एपिक्टेटसच्या 'Things are what they are' या प्रकरणाचा अनुवाद केळूसकरांनी 'वस्तुमात्राचे वास्तविक स्वरूप लक्षांत आणावें' या मथळ्याखाली केला आहे. एपिक्टेटसच्या म्हणण्याचा सारांश असा की वस्तू, घटना, गुणधर्म जशा आहेत तशा स्वरूपात पाहणं आपण शिकलं पाहिजे. त्याऐवजी त्या आपल्याला जशा वाटल्या, त्यांच्या ज्या प्रतिक्रिया आपल्या मनावर झाल्या, त्यांना आपण अधिक महत्त्व देतो. आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी शेवटी एपिक्टेटसने घोड्याचं उदाहरण दिलं आहे. आपण देखणे दिसतो याचा अभिमान घोड्याला असला तर ठीक आहे; परंतु आपल्याकडे देखणा घोडा आहे असा अभिमान आपण बाळगणं योग्य नव्हे. केळूसकरांनी या उदाहरणाचा अनुवाद करून त्याला रामदासांच्या 'सांडितां विवेकें मिथ्या अभिमान। तरी समाधान पावशील।' या वचनाची पुस्ती जोडली आहे.

स्टॉइकांच्या बऱ्याच विचारांचं भारतीय विचार-कल्पनांशी साम्य आहे, ही गोष्ट सयाजीरावांनी केळूसकरांच्या लक्षात आणून दिली होती. त्यामुळे अनुवाद करताना त्याला आवश्यक त्या ठिकाणी भारतीय विचारपरंपरेतील वचनांचीही जोड द्यावी अशी सूचना त्यांनी केल्याचं केळूसकरांनी प्रस्तावनेत सांगितलं आहे. अर्थात, परक्या संस्कृतीतली अशी पूरक वचनं जोडताना मूळ प्रतिपादनाशी ती विसंगत ठरायला नको याची काळजी घेण्याचा इशाराही सयाजीरावांनी दिला होता. सयाजीरावांच्याच आज्ञेवरून बेकनच्या निबंधाचा अनुवाद करताना वासुदेव नरहर उपाध्ये यांनी केलेला 'विचार रत्नाकर' हा अनुवाद १८९२ साली प्रसिद्ध झाला. पण मूळ मजकुराला भारतीय परंपरेतली वचनं जोडताना तारतम्य न ठेवल्यामुळे हा अनुवाद बराच हास्यास्पद ठरला होता आणि त्यावर 'महाराष्ट्र कोकीळ' या पत्रात सलग दोन अंकांमध्ये सडकून टीका आली होती. त्या पार्श्वभूमीवर सयाजीरावांचा हा इशारा होता (कीर १९७७ : ९६). केळूसकरांना मात्र हा प्रयोग चांगला जमलेला दिसतो. सेनेका आणि एपिक्टेटस या दोघांच्याही वचनांचं स्पष्टीकरण करताना संस्कृतमधली सुभाषितं, मराठी संत आणि पंडित कवींच्या रचना केळूसकरांनी जागोजागी पेरल्या. नुकतंच केळूसकरांनी गीतेवरचं दीर्घ भाष्य आणि तुकाराम चरित्र लिहून हातावेगळं केलं होतं. या दोन पुस्तकांसाठी त्यांनी केलेलं संशोधनही या कामी त्यांना उपयोगी पडलं. गौडपादाचार्य, भवभूती, भर्तृहरी, रामदास, तुकाराम, नामदेव, वामनपंडित, मुक्तेश्वर इत्यादी कवींची आणि गीता, महाभारत, योगवाशिष्ठ इत्यादी ग्रंथांतली अनेक वचनं केळूसकरांनी आवश्यक त्या ठिकाणी पेरली आहेत.

उदाहरणार्थ, जो पूर्ण ज्ञाता असतो, तो पूर्ण सुखी असतो. म्हटले आहे : नास्ति ज्ञानात्परं सुखं. किंवा, आपण ज्या गोष्टींचा दुसऱ्यांस बोध करितो, त्यांप्रमाणे स्वतांचे आचरण ठेविले पाहिजे. म्हटलें आहे: जनी बोलिल्यासारिखे चाल बापा. किंवा, जो लोभ जिंकितो आणि खरा सात्विक असतो, तो ऐहिक

सुखतृष्णेस सहसा वश होत नाहीं. म्हटले आहे : 'निस्पृहस्य तृण जगत' विवेचनाच्या ओघात ही वचनं इतक्या सहजपणे मिसळून जातात की त्यांचं मूळ दोन भिन्न, परस्परांना परक्या असलेल्या वैचारिक संस्कृतींमध्ये आहे याचा विसर पडावा. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरचा हा काळ म्हणजे ग्रांथिक मराठी भाषेच्या घडणीचा काळ होता. मराठी वाङ्मयव्यवहारात गुंतलेले इंग्रज मिशनरी, एतद्देशीय शिक्षित व्याकरणकार, लेखक, भाषातज्ज्ञ यांच्या प्रयत्नांतून नवी परिभाषा, व्याकरणिक नियम, वाक्यरचनेचे संकेत स्थिर होऊ लागले होते. केळूसकरांनी या अनुवादासाठी केलेली मराठीतील पारिभाषिक शब्दांची निवड, वाक्यांची मोडणी या सर्वांद्वारे औपचारिक ग्रांथिक मराठीची आध्यात्मिक तत्त्वज्ञान प्रकट करणारी बाजू विकसित करण्यात केळूसकरांच्या या लेखनाचा मोठा वाटा आहे.

स्टॉइक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाच्या नव्या दिशा

सरतेशेवटी, कृष्णराव केळूसकरांनी सव्वाशे वर्षांपूर्वी केलेल्या या अनुवादाचं आजचं हे पुनर्पक्राशन काय साध्य करेल, याविषयीचे दोन शब्द. दोन हजार वर्षांपूर्वी ग्रीक भाषेत मांडलेलं हे तत्त्वज्ञान सयाजीराव गायकवाड आणि कृष्णराव केळूसकर या दोन जाणत्या ज्ञानप्रेमी माणसांमुळे मराठीत अवतरलं. केळूसकर हे मराठीत मुख्य प्रवाहातले मान्यताप्राप्त लेखक कधीच नव्हते. त्यांचं लेखन हे त्यांच्या हयातीतच मोठ्या प्रमाणावर अनुपलब्ध राहिलं. त्यांनी विवेकवादी भूमिकेतून केलेलं वैविध्यपूर्ण सखोल लेखन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात जवळजवळ अनुल्लेखितच राहिलं. त्यामुळे त्यांच्या या पुस्तकाच्या निमित्ताने मराठीत अवतरलेल्या स्टॉइक विचाराचीही मराठी चिंतनपरंपरेत पुढील काळात उजळणी झाल्याचं दिसत नाही.

सेनेका आणि एपिक्टेटस यांच्या बोधवचनांच्या या पुनर्प्रकाशनाच्या निमित्ताने केळूसकरांचं साहित्य आणि त्यातून प्रकटणारं केळूसकरांचं विचारविश्व, तसंच एकंदर स्टॉइक तत्त्वज्ञान याकडे डोळसपणे वळण्याची संधी मराठी वाचकांना पुन्हा एकदा उपलब्ध होत आहे. आजच्या पाश्चात्य जगात बौद्ध तत्त्वज्ञानाचा जसा आधुनिक दृष्टीने अभ्यास होत आहे तसाच स्टॉइक तत्त्वज्ञानाचाही अभ्यास सुरू झाला आहे. भारतीय परंपरेतली श्रमण परंपरा, बौद्ध तत्त्वज्ञान आणि पाश्चात्य स्टॉइक तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासाचा तौलनिक दृष्टिकोन केळूसकरांच्या या पुस्तकात सुप्तपणे उपस्थित आहे. त्याचा अधिक विकास करण्याची संधी या पुस्तकाच्या पुनर्प्रकाशनाच्या निमित्ताने मराठी विचारविश्वाला उपलब्ध झाली आहे.

संदर्भ :

१. धनंजय कीर (संपा.) १९७७ : गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर आत्मचरित्र व चरित्र, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.

२. गो. स. सरदेसाई, १९५६ : माझी संसारयात्रा, केशव भिकाजी ढवळे, मुंबई.

३. मनोहर कदम, १९९९ : मुंबईच्या उभारणीत तेलुगु समाजाचे योगदान, अक्षर प्रकाशन, मुंबई.

४. गणेश रघुनाथ दंडवते, १९२५ : बडोद्याचें मराठी साहित्य, सयाजी साहित्यमाला, बडोदे.

५. -------- १९३३ : श्रीसयाजीगौरवग्रंथ, (संपादक व प्रकाशक : वाढदिवस मंडळ), बडोदे.

६. Frances and Henry Hazlitt (Ed.) 1984 : The Wisdom of the Stoics, University of-merica.

सेनेका आणि एपिक्टेटस यांची
चरित्रे व बोधवचने

लेखक

कृष्णराव अर्जुन केळूसकर

तृष्णां छिद्धि मज क्षमां जहि मदं पापे रतिं मा कृथाः
सत्यं ब्रूह्यनुयाहि साधुपदवीं सेवस्व विद्वज्जनान।
मान्यान्मानय विद्विषोप्यनुनय प्रच्छादय स्वान्गुणान्
कीर्ति पालय दुःखितेने कुरु दयामेतत्सतां लक्षणम् ।।

प्रस्तावना

जनांस सदुपदेश करून सन्मार्गवर्ती करावयास झटणें हें साधुजनांचें परम व्रत होय. या व्रतास अनुसरून आजपर्यंत या भूतलावर अनेक साधुजनांनी स्वशक्त्यनुरूप उद्योग केला आहे. त्या उद्योगाचे मुख्य प्रकार दोन होत. एक जनांस तोंडीं उपदेश करणे आणि दुसरा गद्यपद्यात्मक ग्रंथ लिहून ठेवणे. या दुसऱ्या उद्योगप्रकारामुळें आजपर्यंत निर्माण झालेल्या पुष्कळ साधुपुरुषांचे अमृतरसोपम सद्‌बोध जनांस वाचावयास मिळून त्यांचें अनेक प्रकारी कल्याण होत आहे. परंतु ह्या सद्‌बोधप्रचुर ग्रंथांचा प्रसार, परिशीलन व त्यांतील बोधानुरूप वर्तन हीं केवळ मनुष्यप्रयत्नसाध्य होत; एरवी हें या थोर पूर्वजांनी ठेवलेलें अमोल वित्त असून नसून सारखेंच आहे. हें ध्यानांत आणून प्रत्येक स्वजनकल्याणेच्छु पुरुषाने स्वजनांस बोधपर ग्रंथ सुलभ व सुगम, करून देण्याचें मनावर घ्यावे हें त्याचें कर्तव्य होय. या कर्तव्यास जागून श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड यांनी आजपर्यंत पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध करविले आहेत; आणि प्रकृत ग्रंथ त्यापैकीच एक होय.

आतां या ग्रंथांतील विषयांची निवड श्रीमंत महाराज सरकारांनी जी केली आहे, ती अगदीं यथार्थ आहे हें येथें वाचकांस स्पष्ट करून सांगणे अवश्य होय. युरोपांत महासाधु सॉक्रेटिसाच्या वेळेपासून अनेक नीतिशास्त्रप्रणेते उत्पन्न होऊन, त्यांनीं आपआपल्यापरी मानवकर्तव्यविषयक सिद्धांतांचे प्रतिपादन केलें आहे. या नीतिशास्त्रप्रणेत्यांचे इतिहासज्ञ दोन वर्ग कल्पितात; एक प्राचीन नीतिशास्त्रप्रणेत्यांचा व दुसरा अर्वाचीन नीतिशास्त्रप्रणेत्यांचा. अर्वाचीन नीतिशास्त्रप्रणेत्यामध्ये प्रसिद्ध तत्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर व त्याचे अनुयायी यांचे नीतिसिद्धांत जसे आधुनिक विद्वज्जनांस हळूहळू मान्य होत चालले आहेत, तद्वत्‌च प्राचीन नीतिशास्त्रप्रणेत्यांमध्यें झिनो आणि त्यांचें अनुयायी, ज्यास स्टोइक असें म्हणत, त्यांचे नीतिसिद्धांत त्या काळच्या सुशिक्षित जनांस परम आदरणीय वाटत. फार काय पण बहुतेक अर्वाचीन नीतिशास्त्रवेत्त्यांनीं या स्टोइक लोकांचे बरेच सिद्धांत गृहीत केले आहेत; आणि ख्रिस्तीलोकांच्या नव्या करारामध्यें जें नीतीचें उज्वल स्वरूप दृष्टीस पडत आहे, त्यांतला बराच भाग या स्टोइक लोकांच्या नीतिशास्त्रांतून घेतला आहे, हें सेनेकाच्या चरित्राच्या शेवटीं सांगितलें आहे.* यावरून पाहता स्टोइक तत्वज्ञकृत नीतिबोध किती उत्कृष्ट आहे, हें कोणाच्याही लक्षांत येईल. दुसरे असें कीं, प्रकृत ग्रंथास जोडलेल्या उपोद्धाताच्या आरंभी स्टोइक तत्वज्ञानाचा ग्रीस देशामध्ये उदय व प्रसार झाला तेव्हां ग्रीक राष्ट्रांची कशी काय अवस्था होती याचे निरूपण केलें आहे. या अवस्थेशीं बहुतेक सदृश अवस्था आम्हां महाराष्ट्रीयांस सांप्रत प्राप्त झाली आहे. तेव्हां अशा अवस्थेमध्यें स्टोइक लोकांचा नीतिबोध जेवढा आमच्या मनावर ठसेल तेवढे आमचें कल्याणच होण्यासारखे आहे. आणखी

---

* पृष्ठ ४६ पहा.

असें की, उपोद्धातांत दर्शविल्याप्रमाणे* स्टोइक तत्वज्ञांच्या तात्विक सिद्धांतांस प्राच्यांच्या विचारांपासून थोडेसें वळण मिळाल्यामुळें त्यांची विचारसरणी आमच्या या भरतभूमींत निर्माण झालेल्या तत्वज्ञांच्या विचारसरणीशीं बरीच सदृश आहे. हें, उपोद्धातांत त्यांच्या तत्वज्ञानाचा सारांश दिला आहे तो वाचिला असतां, अभिज्ञ जनांच्या तेव्हांच ध्यानांत येईल. असो, तर अशा या तत्वज्ञानाच्या अनुरोधानें जो नीतिबोध मानवकल्याणासाठी साधुजनांनीं करून ठेविला आहे, तो आम्हांस किती मान्य झाला पाहिजे हें स्पष्टच होत आहे. हें विचारसादृश्य महाराष्ट्रवाचकांच्या ध्यानांत यावे एतदर्थ श्रीमंत महाराज सरकारांनी आज्ञा केल्यावरून, आमच्या देशातील प्राचीन व अर्वाचीन साधुपुरुषांनी जी बोधवचनें लिहून ठेविलीं आहेत, त्यांचा अनुवाद प्रकृत ग्रंथांत स्थलोस्थली केला आहे. त्यांवरून पाहता महामनस्क साधुजन कोठल्याही देशांत व कोणत्याही मनुष्यकृत भिन्न स्थितीमध्ये निर्माण झाले असले, तरी त्यांच्या लोकनियमनपर विचारांत अत्यंत साम्य असतें. तें दृष्टीस पडलें म्हणजे सहृदय वाचकांस परम आल्हाद वाटून, सर्व मानवजाति निसर्गतः अभिन्न आहे अशी त्यांची वृत्ति होते.

या सर्व गोष्टींवरून प्रकृत ग्रंथांतील निवड किती शहाणपणाची व दूरदर्शित्वाची आहे हें लोकांच्या लक्षांत येईल. आतां या स्टोईक तत्वज्ञांपैकी पुष्कळांचे ग्रंथ आज बहुतेक लोपले आहेत; आणि सेनेका, एपिक्टेटस व मार्कस ऑरेलिअस या तिघी स्टोईक तत्वज्ञांखेरीज आणखी कोणाचेही बोधपर ग्रंथ इंग्रजी भाषेमध्ये आज उपलब्ध नाहीत यास्तव या तिघांचींच बोधवचनें महाराष्ट्रजनांस वाचावयास मिळवून द्यावीं, या परम स्तुत्य बुद्धीने श्रीमंत महाराज सरकारांनी या तत्वज्ञांच्या ग्रंथांची निवड केली आहे. यांपैकी मार्कस ऑरेलिअस बादशाहाची बोधवचनें महाराष्ट्रग्रंथमालेंत आधींच प्रसिद्ध झाली आहेत; आणि प्रकृत ग्रंथांत सेनेका व एपिक्टेटस या महाविद्वान् स्टोइक तत्वज्ञांची बोधवचनें महाराष्ट्रवाचकांस श्रीमंत महाराज सरकारांच्या आज्ञेनें सादर केली आहेत.

आतां प्रकृत ग्रंथांतील विषय लिहितांना कोणकोणत्या ग्रंथांचा कितपत आधार घेतला आहे तें सांगतों. सेनेकाचीं बोधवचनें स्कॉट लायब्ररिनामक ग्रंथमालिकेंतील एका इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें घेतली आहेत. ह्या मूळ इंग्रजी ग्रंथाची हकीकत येणेंप्रमाणे आहे: सतराव्या शतकामध्यें सर रोजर एस्ट्रेन्ज म्हणून कोणी पंडित होऊन गेला. त्यानें आपल्या काळचे लोक फारच धर्महीन व नीतिभ्रष्ट झाले आहेत असें पाहून, त्यांच्या ठायीं सदाचारप्रीति उत्पन्न होण्यासाठी कांहीं तरी प्रयत्न करावा असें मनांत आणिलें. तेव्हा त्यानें सेनेकाच्या निरनिराळ्या ग्रंथांतून उत्कृष्ट वाटले तेवढे वेंचे काढून त्यांची प्रकृत पुस्तकांतल्याप्रमाणें रचना केली, आणि त्यांचे इंग्रजी भाषांतर पहिल्याने स. १६७८ या वर्षी प्रसिद्ध केलें. या त्याच्या साररूपग्रंथाच्या आधारानें सदरील इंग्रजी ग्रंथांतील सौख्याचें जीवन हा भाग रचिला असून, पुढील पत्रे व स्फुट विचार हा माग टॉमस लॉज म्हणून दुसऱ्या एका पंडिताने सेनेकाच्या ग्रंथांचे भाषांतर स. १६१४ त प्रसिद्ध केले होते, त्याच्या भाषांतररूप ग्रंथांतून निवडक उतारे घेऊन बनविला आहे.

एपिक्टेटसची बोधवचनेंसुद्धां स्कॉट लायब्ररींतील पुस्तकमालिकेंत प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या एका पुस्तकांतून घेतलीं आहेत. हें इंग्रजी पुस्तक टी. डब्ल्यु. रालेस्टननामक एका पंडितानें ग्रीक ग्रंथांच्या

---

* पृष्ठ ६७ पहा.

आधाराने रचिले आहे. एपिक्टेटस याने स्वतः कांहींच ग्रंथ रचिले नव्हते; तर त्याचीं बोधपर भाषणें आरियननामक त्याच्या एका परम शिष्यानें उतरून घेऊन पुढें लोकाग्रहावरून प्रसिद्ध केली; आणि याच भाषणांचें पुढें त्यानें सार काढून एक संक्षिप्त ग्रंथ रचिला. या साररूप ग्रंथाचा प्रसार ख्रिस्तीलोकांत इतका झाला होता की, तितका प्रसार टॉमस आकेम्पिसकृत 'ख्रिस्ताचे अनुकरण'* नामक पुस्तकावांचून दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाचा झाला नव्हता. सदरहू इंग्रजी भाषांतरकाराने या लोकमान्य संक्षिप्त ग्रंथाचें आपल्या पुस्तकांत समग्र अवतरण केलें असून, येथे जेथे त्यांतील बोधाचें स्वरूप त्याला फारच त्रोटक वाटलें, तेथें तेथें त्यानें मूळ भाषणांतून भर घातली आहे. यावरून पाहतां हा इंग्रजी ग्रंथ एपिक्टेटसच्या बोधाची बरीच यथार्थ प्रतिमा आहे, असे मानण्यास प्रत्यवाय नाहीं.

आतां या उभय ग्रंथांचा आधार घेतांना जितका मजकूर महाराष्ट्रवाचकांस अप्रयोजक किंवा अपरिचित भासण्यासारखा वाटला, तितका वगळला आहे. बाकीचा मजकूर बहुतेक जशाचा तसा ठेविला आहे. ही बोधवचनें निवडितांना आणखी एक अशी खबरदारी घेतली आहे कीं, जेवढा नीतिबोध सर्वजनमान्य होण्याजोगा आहे असें वाटलें, तेवढ्याचाच प्रस्तुत ग्रंथांत संग्रह केला आहे. स्टोइकलोकांचे धर्मविचार पुष्कळांस अमान्य होण्यासारखे वाटल्यावरून ते यांत फारसे घेतले नाहींत.

स्टोइक तत्वज्ञांच्या या बोधवचनांचें रहस्य महाराष्ट्र वाचकांच्या लक्षांत नीटपणे यावें, या उद्देशानें त्यांच्या तत्वज्ञानांतील मुख्य मुख्य सिद्धांत आरंभी उपोद्धातरूपानें दिले आहेत, त्यांकडे वाचक दुर्लक्ष करणार नाहींत अशी उमेद आहे.

शेवटीं ज्या स्वप्रजाजनहितैषी राजचूडामणीच्या कृपाप्रसादानें ही अल्पमात्र महाराष्ट्रजनसेवा स्वशक्त्यनुसार करण्याचा मला हा द्वितीय प्रसंग आला, त्यांचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक व मनापासून आभार मानून, व ही सेवा माझे देशबांधव गोड करून घेतील अशी सविनय विनंति करून, हा प्रस्तावलेख समाप्त करितों.

ता. ५ मार्च स. १८९७ **कृ. अ. केळूसकर**

---

* याही पुस्तकाचें सार श्रीमंत महाराज सरकारांच्या आशेने मराठीत 'सदुपदेशसंग्रह' या नावाने प्रसिध्द झाले आहे.

अनुक्रमणिका

सेनेकाचें चरित्र.

एपिक्टेटसचें चरित्र.

उपोद्घात.

स्टोइक लोकांचे तत्त्वविचार – इतिहास–विशेष स्वरूप.

सृष्टिशास्त्र – मूलभूत सिद्धांत–सृष्टीचा क्रम, स्वरूप आणि व्यवस्था–विवेकहीन निसर्ग– मानव.

नीतिशास्त्र – तात्विक विचार–व्यवहारदृष्ट्या झालेले फेरफार–व्यवहारनीति.

धर्मसंबंधी विचार.

सेनेकाचीं बोधवचनें

सौख्याचे जीवन

भाग पहिला – सौख्याचें जीवन आणि त्याचें स्वरूप–खरें सौख्य.

भाग दुसरा – मानवी सौख्याचा पाया ज्ञान आणि नीति यांवर आहे–ज्ञान म्हणजे काय–ज्ञातापुरुष सर्व

स्थितींमध्यें स्वकर्तव्य करितो–शुद्ध विवेकाने मानवी स्वभावाची पूर्णता सिद्ध होते–ज्ञानी पुरुषाच्या तीन अवस्था

भाग तिसरा – सदाचरणावांचून सौख्य नाहीं–सदाचरणाचे महात्म्य–सद्हेतु सत्कृत्याप्रमाणेच मान्य

समजावा–सदाचरणाचीं दोन अंगें – विचार आणि आचार – सदाचरण अखंड असावें –सदाचरण कदापि लपलें जात नाहीं

भाग चवथा – ज्ञानाच्या योगानें जीवितक्रम कोणत्या प्रकारे ठेवावा ते समजतें – नीति, निसर्ग आणि तर्क असे तत्वज्ञानाचे तीन भेद आहेत – एक ज्ञाता पुरुष दुसऱ्या ज्ञात्या पुरुषास साहाय्य करितो–निरनिराळ्या विद्या ह्या जिज्ञासातृप्तीचीं साधने होत; त्यापासून नीतीचा उत्कर्ष होत नाही–शुष्क शब्दवादात शिरणें ज्ञात्यास शोभत नाहीं.

भाग पांचवा – बोधवचनांचें सामर्थ्य–आपण कितीही उत्तम असलों तरी आपणांस जितका अधिक सद्बोध होईल तिकेत आपलें हितच होणार आहे–बोधवचनांचा प्रभाव– मनुष्य जातीची उत्तम सेवा म्हटली म्हणजे तिला सद्बोध करणें ही होय–कोणतेंही कृत्य करूं लागण्यापूर्वी तीन गोष्टींचा विचार करावा–जें आशा करण्याजोगे असून न्याय्य असेल, तेंच प्राप्त करून घेण्याविषयी जनांस बोध करावा–बोध करण्याची रीति.

भाग सहावा – मनाच्या शांतीसारखें दुसरें सौख्य नाहीं–मनुष्याचें मन त्याच्या कर्माचें परीक्षक आहे. प्रत्येकानें आत्मपरीक्षण करावें

भाग सातवा – सदाचारी पुरुष कदापि दुःखी असावयाचा नाहीं; आणि दुराचारी पुरुष कदापि सुखी असावयाचा नाहीं–सदाचारी पुरुषाच्या हातून मानवजातींचें कल्याण होतें– दैव प्रतिकूळ असलें तरी त्यापासून मनास काही एक अपाय होणें नाहीं.

भाग आठवा – सर्व कांहीं निसर्गक्रमाप्रमाणे घडत आहे असें मनांत आणिल्यानें साऱ्या संकटांपासून उद्भवणाऱ्या साऱ्या पीडेचा परिहार होईल–अनिष्ट प्रसंगांपासून आपलें हितच होतें–आपणांस प्राप्त होणारे प्रसंग इष्टही नसतात किंवा अनिष्टही नसतात–संकटांनीं नीतिमत्तेची पारख होते–कोणत्याही प्रसंगांस बरे वाईट म्हणणें युक्त नव्हे.

भाग नववा – मनाची क्षुद्रता आणि इतर सौख्यविघातक गोष्टी– सौख्यविघातक गोष्टी मनाच्या क्षुद्रत्वानें आपल्या स्वास्थ्यास प्रत्यवाय घडतो–स्थलाचा पालट केल्याने चित्ताचा पालट होत नाहीं मनाची स्थिरता सर्व कठीण प्रसंगीं उपयोगीं पडते–जगाशीं आपण होईल तेवढा कमी संबंध ठेवणें इष्ट होय.

भाग दहावा – प्रसंगानुरूप घडणाऱ्या गोष्टींवर भरंवसा ठेवणाऱ्या मनुष्याच्या चित्तास शांति प्राप्त होत नाहीं– मानवी प्रपंचाची शाश्वति नाही–जे आपलें आहेसें वाटतें तें वास्तविक पाहता कांहीं वेळ प्राप्त झालें आहे–लहान थोरास दैवगति चुकत नाहीं.

भाग अकरावा – ग्राम्य सुखोपभोगांत घालविलेलें जीवित दुःखमय होतें–ऐषआरामीच्या पदार्थांचे अतिरिक्तपणे सेवन केल्याने दुःख व विपत्ति हीं प्राप्त होतात–इंद्रियतृप्तीच्या विषयांनी जर सौख्य प्राप्त होण्यासारखें असेल तर मनुष्यापेक्षां पशु अधिक सुखी समजावयाचे– मिष्टान्नाचे सेवन जितके अधिक करावे तितके अधिक रोग आपणांस जडावयाचे–दारूबाजी मुद्दाम पत्करलेले वेड होय–ऐष आराम हे केवळ व्यर्थ असून, त्यांत मग्न होणें हा मूर्खपणा होय–बदफैल मनुष्य सदाचारी असणें संभवत नाहीं.

भाग बारावा – लोभी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्य सर्वदा अतृप्त आणि अस्वस्थ असतो–लोभामुळें मनुष्यास दुःख प्राप्त होतें – सर्व कांहीं पैशासाठी होतें–लोभामुळें आपला स्वभाव बिघडून आपण दुःखित होतों–महत्त्वाकांक्षेमुळें उत्पन्न होणारे अपराध व चिंता–ज्यांस लोक थोर आणि सुखी समजतात ते दुःखी होत.

भाग तेरावा – आशा आणि भय ही मानवी जीवितास मोठीं अपायकारक होत–पुढें होतीलशा वाटणाऱ्या गोष्टींविषयी मनांत भीति बाळगणाऱ्या मनुष्याच्या विपत्तीस पारावार नाहीं–अतिघोर संकट आलें तरी तें सोसण्यांची सर्वदा तयारी असावी–दारिद्र्य रोगराई व सत्ताधीशांचा जुलूम यांस मनुष्याने अतिशयित भ्यावे

भाग चौदावा – आमचें सौख्य किंवा विपत्ति सत्य व किंवा असत्य वस्तुज्ञानावर अवलंबून असते प्रत्येक मनुष्याने प्राप्तस्थितींत उत्तम प्रकारें वर्तन करावें–आपण वृथाभिमानी व दुष्ट असतों, तथापि आपण तसे खरोखरीच आहो असें आपणांस वाटत नसतें.

भाग पंधरावा – मित आहारविहारांपासून उद्भवणारें सौख्य–पूर्वकाळच्या लोकांचे आहार–विहार मित असत–शांतीचा काळ–मित आहारविहार करणारा मनुष्य सुखी असतो–ज्ञानी जन इतरांस उपदेश करितात त्या प्रमाणें त्यांनीं सर्वदा वर्तन करावें–मोठी संपन्नता आली तरी काटकसर करणें इष्ट होय.

भाग सोळावा – मनाची स्थिरता असल्यानें मनुष्याचा लौकिक होतो; आणि त्याच्यावर कितीही संकटे आलीं तरी त्याचें सौख्य कायम रहातें–ज्ञाता पुरुष दुसऱ्याकडून घडणाऱ्या नुकसानास मोजत नाहीं–थोर मनाचा पुरुष कोणत्या वस्तूची अपेक्षा करीत नाहीं, किंवा कशाची आशा धरीत नाहीं–दुःखस्थितीपासून अतिशयित मोठा अनर्थ म्हटला म्हणजे तिच्यामुळे घाबरून जाणें हा होय–जी गोष्ट मनुष्याच्या जन्मासच लागून राहिली आहे, तीविषयीं मनुष्यानें मुळींच घाबरूं नये–दैवयोगानें ज्या गोष्टी घडत असतात, त्या इष्ट किंवा अनिष्ट म्हणणें रास्त नव्हे–आणीबाणीच्या प्रसंगीं नीतीचें तेज अप्रतिम प्रगट होतें–सदाचार अजिंक्य आहे.

भाग सतरावा – ज्या प्रकारची संगति आपण धरूं तसें आपणांस सौख्य प्राप्त व्हावयचें–अनाचाराचीं स्थलें आणि बदफैल सोबती यांचा अव्हेर करावा–जे बोलल्या सारखे वर्ततात, त्या ज्ञानी पुरुषांची संगति उत्तम होय–जेवढ्या अधिक लोकांची संगति धरावी तितका आपणांस धोका अधिक

भाग अठरावा – मित्रत्वाचें सौख्य–मित्राची निवड–मित्रत्वाच्या ठिकाणी संकोच धरूं नये–मित्रत्व औदार्ययुक्त असावें.

भाग एकोणिसावा – ज्याला सुखी व्हावयाचें असेल त्यानें आपला वेळ व्यर्थ दवडूं नये–आपल्या आयुष्यापेक्षा आपण आपल्या दैवगतीचीच परवा अधिक करितों–वर्तमान, भूत आणि भविष्य–आपल्या वेळाव्यतिरिक्त आपलें असें दुसरें कांहींएक नाहीं–मंडळींत जाऊन बसणेंउठणें व उद्योगधंदा यांमध्यें पुष्कळ काळ जातो.

भाग विसावा – ज्यास आपल्या धंद्याची निवड करण्याचें अनुकूल असतें, तो पुरुष सुखी समजावा–कांही झाले तरी मनुष्याने स्वातंत्र्य मिळविले पाहिजे–निरनिराळे लोक निरनिराळ्या उद्देशानें उद्योगधंद्यापासून निवृत्त होतात–कित्येक लोक लौकिक व्हावा म्हणून उद्योगधंद्यापासून निवृत्त होतात–तत्वज्ञानाच्या अभ्यासास एकांतवास व स्वातंत्र्य ही हवींत.

भाग एकविसावा – मरणाची परवा न केल्यानें संसारांतील सर्व विपत्ति सह्य होतात–मृत्यूस भिणें हा मूर्खपणा आहे–भरणभीति सहज दूर करितां येते–जो मरणास तुच्छ मानितो तो कशासही भीत नाहीं–मरण सर्वांस आहे–या जीविताचा लोभ आपण कां म्हणून धरावा?– मरणे म्हणजे निसर्ग नियमास अनुसरणें होय–मरणसमयी शोकाकुल होणे हें बालिशपणाचें कर्म आहे.

भाग बाविसावा – मरणप्राप्तीच्या संबंधाने समाधान–निसर्गक्रमाप्रमाणे आवश्यक असतें, त्यास मनुष्याने आनंदाने कबूल असावें.

भाग तेविसावा – मित्राच्या मरणाबद्दल अमर्याद शोक करूं नये–मित्रवियोगाबद्दल माफक शोक केला जो असतां चालेल–कांहीं बाबतींत शोक केला असतां चालेल व कांहीं प्रसंगीं तर तो अनावर होतो–आपण जो शोक करितों तो आपल्या मित्रांपेक्षा आपणा स्वतांसाठीच विशेष करितों–आपला मित्र गत झाला तरी मित्रत्वाच्या सुखास आपण अंरतरणार नाहीं–दुःखाच्या प्रथम झटक्याच्या वेळीं समाधान होणें नाहीं.

भाग चोविसावा – ज्ञात्या मनुष्यास दारिद्र दुःखदायक वाटणार नाहीं–दारिद्र आपणांस अनिष्ट वाटतें एवढेच काय तें–मध्यम स्थिति ही सतत उत्तम होय.

पत्रे व इतर स्फुट विचार

प्रकरण पहिलें – खरें सौख्य सद्वर्तनाने प्राप्त होतें.

प्रकरण दुसरें – खरी दौलत.

प्रकरण तिसरे – क्रोधाविषयीं.

प्रकरण चवथें – मरणाच्या संबंधानीं समाधान.

प्रकरण पांचवें – मित्रनाश.

प्रकरण सहावें – वृद्धापकाळांसबंधानें समाधान.

प्रकरण सातवें – मुलांचें शिक्षण.

प्रकरण आठवें – चाकरांशीं कसें वर्तन ठेवावें.

प्रकरण नववें – खरी थोरवी.

प्रकरण दहावें – प्रवासाविषयीं.

प्रकरण अकरावें – एकांतवासांत राहून कोणत्या प्रकारें काळ दवडावा.

प्रकरण बारावें – ढोंगाविषयीं.

प्रकरण तेरावें – मंडळींत जाऊन बसणेउठणें.

प्रकरण चौदावें – पुस्तकांची निवड.

प्रकरण पंधरावें – तालीमबाजी.

प्रकरण सोळावें – निद्रा.

प्रकरण सतरावें – सणाचे दिवस.

प्रकरण अठरावें – असंतोषाचा निषेध.

एपिक्टेटसची बोधवचने

पुस्तक पहिले

संसारयात्रा.

वस्तुमात्राचे वास्तविक स्वरूप लक्षात आणावें.

मनुष्यानें धैर्यवानही असावें व भीरुही असावें.

ज्ञात्याच्या व मुर्खाच्या भीतीचे कारण.

खरी आणि खोटी दर्शनें.

सर्व मानव परस्परांचे बांधव आहेत.

मृत्यूविषयी.

आत्मज्ञान.

वाईट मनुष्यांशी आपण कसें वर्तन ठेवावे.

हें जीवित जलप्रवासरूप आहे.

सुखदुःखाचा निवाडा.

मानसिक शक्ति.

प्रियवस्तुवियोग.

शांतीचें महात्म्य.

कोणती गोष्ट इष्ट आहे.

कोणत्याही बाह्य गोष्टीवर आपण मन ठेविले असतां तीमुळें परवश व्हावें लागतें.

आपले अंतर्याम शोकाकुल होऊ देऊं नयें.

आपणांस जी स्थिती प्राप्त होईल तद्नुसार वर्तन करण्यास सिद्ध असावे.

खरी निवड.

जनकृत निंदास्तुतीविषयीं बेपरवा असावें.

प्रत्येकाने आपलें कर्तव्य करावें.

लोकांकडून मान मिळावा अशी इच्छा असल्यास त्यांस योग्य मोबदला दिला पाहिजे.

निसर्गाचा हेतु.

मनाचें स्थैर्य.

मनुष्यानें कधीही बदलू नयें.

पुस्तक दुसरे

कर्तव्यकर्में.

दास्याविषयी.

मित्रत्वाविषयी.

काळप्रसंग.

एकांतवास.

भांडखोर व खुनशी लोकांचा निषेध.

पुस्तक तिसरें

ज्ञानीं पुरुषांचे वर्तन.

संवयीविषयी.

वादविवाद.

सुखानुभव घेण्यास आपण एकाएकीं प्रवृत्त होऊं नये.

आपले सारे व्यवहार खुले असावे.

स्वार्थ.

प्रत्येकानें आपली शक्ति पाहून वर्तन करावें

देहाच्या निवळ गरजा भागविण्यापुरतें वित्तार्जन करावें.

स्त्रियांची योग्यता.

जड देहाची फाजील निगा करूं नये.

खरा चांगुलपणा.

आपलें कोणीं नुकसान केलें असतां आपण तें कां सहन करावें?

क्षमा.

खरी थोरवी.

मनुष्यास वाटतें तसें तो वर्तन करितो.

ज्ञात्यानें सामान्य जनांस बोध करण्याऐवजी आपलें वर्तन स्वसंमत सिद्धांतांप्रमाणें राखावे.

व्रतस्थपणा.

ज्ञानी आणि अज्ञानी.

तर्कशास्त्राची आवश्यकता.

वैय्याकरण आणि ज्ञानी पुरुष.

गुणसंपादन.

दृढनिश्चय.

दिरंगाई.

———

सेनेकाचे चरित्र

या स्टोइक तत्वज्ञाचें जन्म स्पेन देशांतील कार्डोवा नामक प्रसिद्ध रोमन वसाहतीमध्यें इ. स. ७ या वर्षी झालें. याच्या पित्याचे नांव मार्कस आनिअस सेनेका असें असून तो मूळचा रोमन सरदार होता. याचे पूर्वज कार्डोर्वा येथें तें कळत नाहीत. आमच्या चरित्रनायकाच्या मातेचें नांव हेलविआ असें होतें. ही स्पेन देशातील एका सरदाराची कन्या होती.

सेनेका दोन वर्षांचा झाला तेव्हां त्याचा बाप त्यास रोमनगरींत घेऊन आला. लहानपणी त्याची प्रकृति वेळोवेळां बिघडून त्याला नाना व्याधींपासून पीडा सोसावी लागली. त्याला दम्याचा विकार आजन्म जडला होता. एके वेळीं तर तो रोगामुळें इतका त्रासला कीं आत्महत्या करून सर्व पीडेपासून मुक्त व्हावें असें त्याला वाटूं लागलें. परंतु आपल्या मरणानें आपल्या पित्यास अनिवार शोक होईल असें मनांत आणून त्याने आपला आत्मघाताचा बेत सोडला. पुढें प्रौढ वयातही आत्महत्या करण्याचें तो पुनः पुनः मनांत आणी. परंतु त्याची परम प्रिय स्त्री पालिना हिच्याकडे पाहून त्यानें आपला हा उद्देश कधींही सिद्धीस नेला नाहीं.

याप्रमाणे त्याचे प्रथम वय आजारीपणात गेलें; तरी एवढ्या अवकाशात त्यानें पुष्कळ विद्या संपादन केली. त्याचा पिता श्रीमंत असून मोठा कुलीन, सज्जन व ज्ञानसंपन्न होता. त्याला साहित्यशास्त्राचा फारच नाद असे. वक्तृत्वकला व अलंकारशास्त्र यांमध्ये तो निष्णात होता. त्याची माताही चांगली विनयसंपन्न, बुद्धिवान्, नीतिमान् व विदुषी स्त्री होती. या मानापितरांशिवाय आणखी एक सद्गुणी स्त्रीची सुशिक्षा सेनेका यास प्राप्त झाली होती. ही स्त्री त्याच्या आईची बहीण होती. या तिन्ही योग्य माणसांच्या सहवासाने व सुशिक्षेनें सेनेका यास लहानपणापासून उत्तम वळण लागून, त्याची प्रकृति अगदीं अशक्त होती, तरी त्याच्या हातून पुष्कळ विद्याभ्यास झाला. त्या वेळच्या शिक्षणक्रमांतील एकंदर विषयांचे अध्ययन केल्यावर वक्तृत्व व तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास सेनेका यानें आरंभिला. पण या दोहो विषयांपैकीं दुसऱ्याच विषयाकडे त्याचा ओढा विशेष होऊन, त्यानें या विषयांचे अभ्यास मोठ्या उत्साहानें केला. या विषयांचें अध्ययन त्यानें मुख्यत: दोघा गुरूंपाशी केलें. एकाचे नांव सोशन असें असून तो पायथ्यागोरसनामक तत्त्वज्ञाचा अनुयायी होता; आणि दुसऱ्याचें नांव अटालस असें होते. हा स्टोइकमतवादी होता. सोशन याचा पुनर्जन्मकल्पनेवर पूर्ण भरंवसा असल्याकारणाने तो स्वशिष्यांस मांसाहारनिषेधाविषयी बोध करीत असे. या बोधाची सत्यता तरुण सेनेका याच्या मनावर चांगली ठासून त्यानें मांसाहारत्याग केला. या त्यागामुळें आपली बुद्धि तीव्र व चपल झाली असें तो म्हणत असे. परंतु पुढें त्याच्या पित्यानें हें मांसाहारवर्जनाचे

व्रत त्याला सोडावयास लाविले. हे त्यानें कां केलें याचें कारण असें सांगतात कीं, त्या वेळचा बादशहा टायबेरिअस यानें परकीय धर्मांच्या सर्व जनांस रोमनगरींतून हांकून दिलें होतें. तेव्हां आपल्या पुत्रावरही कदाचित् अशीच पाळी येईल या भीतीनें त्यानें त्यास पूर्वोक्त व्रत सोडावयास लाविलें. वर सांगितलेल्या दोन गुरूंशिवाय आणखी एक दोन गुरूंपासून त्यानें बरेंच ज्ञान संपादन केलें होतें. परंतु अटालस याच्या पासूनच त्याला मुख्यत: पुष्कळ तत्त्वबोध झाला. म्हा विद्वान् व नीतिमान गुरूविषयीं सेनेकाच्या मनांत पराकाष्ठेची आदरबुद्धि वसत असे. या स्टोइक साधूच्या उपदेशामुळें सेनेकाच्या ठायीं सदाचारप्रीति व खरें वैराग्य ह्या वृत्ति उत्पन्न झाल्या होत्या. या वेळीं त्यांच्याठायीं जे सद्गुण उत्पन्न झाले, त्यांपैकीं कित्येक, पुढें सार्वजनिक कामांत मन घातल्यावर, त्यास थोडेसे सोडावे लागले हें खरें आहे; तथापि त्याचें घरगुती आचरण सर्वदा उत्कृष्ट असून, त्यास लागलेल्या कित्येक चांगल्या सवई त्याच्या अंगांतून आमरण गेल्या नाहींत. त्याला वित्ताची व ऐषआरामीची पूर्ण अनुकूलता असतां त्यानें आपले आहारविहार अगदीं बेताचे ठेविले होते. मद्यादि दुर्व्यसनें त्याच्या वेळीं सर्व रोमन लोकांमध्ये अतिशयित माजली होतीं. त्यांपासून तो सर्वथा मुक्त होता. त्या काळी एवढे मोहप्रसंग उपस्थित असतां, तो त्यांस कदापि वश झाला नाहीं, व त्यानें आपलें सद्वर्तन यत्किंचितही ढळू दिलें नाही; यावरून पूर्वोक्त स्टाईक तत्त्वज्ञाच्या बोधाचा त्याच्या मनावर किती उत्तम परिणाम झाला होता, हें चांगले दिसून येतें.

सेनेकाच्या वेळीं रोमन लोकांची स्थिति कशी होती तें कळलें असतां, मोठेपणी त्याचा कोणत्या प्रकारच्या लोकांशी सहवास घडला असून, त्याच्या अंगीं कोणते दोष उत्पन्न होण्यासारखे होते, तें ध्यानांत येईल. यासाठीं त्या स्थितीचा येथें थोडक्यांत निर्देश करितो :

(१) या वेळीं रोमन लोकांनी अनेक देश काबीज करून जिकडून तिकडून पुष्कळ संपत्ति लुटून आणिली होती. मोठमोठे सरदार टोलेजंग वाडे बांधून त्यांत सर्व प्रकारच्या ऐषआरामीचा मनमुराद उपभोग घेत असत. परंतु इतर सामान्य जन पराकाष्ठेच्या दारिद्र्यामध्यें होते. त्यांना भिक्षावृत्तीचा अवलंब करून या बड्या लोकांच्या दारोदार याचना करीत फिरावे लागें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या मुलखांतून पकडून आणलेल्या पुष्कळ लोकांस गुलाम केल्यामुळें हा गुलामलोकांचा समुदाय फारच वाढला होता. या गुलामांच्या संस्थेमुळें तर श्रीमंत लोकांच्या सुखसोहळ्यांस पारावर नाहीसा झाला होता. त्यांच्या अंगीं विलासीपणा, आळस, नेभळेपणा, तब्यतीपणा इत्यादि दुर्गुण पुष्कळच वाढले होते; आणि गरीब लोकांच्या अंगीं तोंडपुजेपणा लुब्रेपणा, ठकबाजी इत्यादि दोष उत्पन्न झाले होते. याप्रमाणें थोडेसे धनाढ्य लोक व हजारोंहजार कंगाल लोक रोमनगरींत झाले होते.

(२) या काळी रोमनगरींतील लोकांच्याठायी चालू धर्माविषयी पूर्ण अश्रद्धा उत्पन्न झाली होती. पुरातन धर्मांत ज्या देवता पूज्य मानिल्या होत्या, त्यांची पूजार्चा करण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं असें त्यांस वाटे त्याचप्रमाणे जे कित्येक धर्मविधि सर्वत्र प्रचलित होते, ते केवळ तमाशे आहेत असें ते समजत. तरी ते पराकाष्ठेचे भोळे होते. जादूगिरी, भूतेंखेतें, फलज्योतिष इत्यादि अज्ञानमूलक गोष्टींवर त्यांची श्रद्धा असे. याप्रमाणे नास्तिक्य व भोळवटपणा ही सर्वत्र पसरल्यामुळे लोकांची नीति बिघडून चोहोंकडे आनाचार माजला होता.

(३) पहिल्या कलमांत सांगितल्याप्राणें रोमन सरदारांस विपुल धनाची अनुकूलता असल्या कारणानें त्यांच्यामध्यें नाना प्रकारचे विलास अतिशयित माजले. आहारविहारामध्ये ते उमाप द्रव्याचा व्यय करूं लागले. त्या वेळच्या ज्ञात भूपृष्ठावरील सर्व देशांतील ऐषआरामीच्या वस्तूंचा खप रोमनगरींत होत असे. एकादी खाद्य किंवा पेय वस्तु कितीही दूर देशी असली, व ती मिळविण्यास कितीही धनव्यय झाला, तरी ती आणवावयाची असा त्यांचा क्रम असे. मेजवान्या, नाचरंग, तमाशे यामध्यें ते आपल्या द्रव्याची बेसुमार उधळपट्टी करीत. यथेष्ट इंद्रियतृप्ति करावी यांतच जीविताचे सार्थक्य आहे असें त्यांस वाटे. पण या अमर्याद विलासीपणामुळें त्यांचा पूर्वींचा सारा जोम व शौर्य हीं नष्ट होऊन ते अगदीं निर्बळ व भित्रे बनले. शिवाय नाना दुर्व्यसनें, व भलभलते ढंग यांमुळे ते अगदीं निर्लज्ज, अल्पायु व असुखी झाले.

(४) सदरीं सांगितल्याप्रमाणें केवळ ग्राम्यविषयमुखाच्या नादीं रोमन लोक लागल्यामुळें ते खऱ्या सौख्यास अंतरले. इंद्रियतृप्तीच्या विषयांचा उपभोग मनुष्यानें कितीही घेतला तरी त्यापासून त्याची तृप्ति होत नसते; आणि त्याच त्याच विषयांचा पुनःपुनः उपभोग घेऊन त्याच्या मनास कंटाळा येतो; यामुळें त्याचें मन अस्वस्थ व उदास होणें साहजिक आहे. ही मनाची उदासीनता त्या काळी रोमन लोकांमध्यें पुष्कळ आढळत होती. सुखाच्या पाठीस लागून तत्प्रीत्यर्थ अतोनात धननाश करूनही तें प्राप्त होत नाहीं, असें जेव्हां त्यांच्या अनुभवास येई तेव्हां त्याला या जीविताचा कटाळा येऊन कित्येक तर आत्महत्या करण्यासही प्रवृत्त होत!

(५) यावेळच्या रोमन लोकांच्या अंगीं निर्दयपणा फारच वाढला होता. मल्लयुद्धे, हिंस्रपशूंच्या टक्करा, देहांतशासनाच्या घोर शिक्षा, वगैरे क्रूरपणाचे प्रकार त्या लोकांच्या नेहमीं नजरे समोर घडत असल्या कारणानें त्यांच्या ठायीं ही अमानुषवृत्ति विकसित झाली होती. शिवाय त्या काळी रोमननगरीत गुलामगिरीची संस्था अगदी कळसास पोचलीं होती; यामुळे तर श्रीमान् लोकांचा तब्यतीपणा व कठोरपणा फारच वाढला होता तशांत आणखी त्या वेळचे गुलामांसंबंधाचे कायदेही अगदीं अमानुषपणाचे असत. यामुळें धनाढ्य लोक आपल्या दासांस पराकाष्ठेच्या कठोरपणानें वागवीत, व त्यांस अत्यंत नीच समजत. त्यांनीं दासांचे कितीही हाल केले, किंवा त्यांस कितीही मारहाण केली, तरी तीबद्दल त्या बापड्यांस न्याय मिळण्याचा कांहीं एक मार्ग नसे. पण एकाद्या धन्याचा कोणी खून केला असून त्याचा पत्ता लागेनासा झाला, तर त्याच्या सर्व गुलामांला देहांतशासन करावे असा त्या काळीं कायदा होता!

ही अशी रोमन लोकांची स्थिति असतां, तींत सेनेका सारखा साधुपुरुष निर्माण होऊन त्यानें लोकांत पसरलेल्या आनाचारांचा निषेध करावा, व स्ववर्तन आपल्या बोधाप्रमाणे ठेवण्यास झटावे हें खरोखरीच वाखाणण्यासारखे आहे.

विद्याभ्यास आटोपल्यावर कांही दिवसानीं सेनेका मिसर देशास गेला. तेथें त्याची पूर्वी सांगितलेली मावशी रहात असे. ह्या मावशीचा नवरा त्या देशाचा सुभेदार होता. पण सेनेका तेथें फार दिवस राहिला नाहीं असें दिसतें. त्याच्या मावशीचा नवरा आपल्या कुटुंबासह तेथून स्वदेशीं यावयास निघाला, तेव्हां त्याला त्यांच्या बरोबर परत येणे भाग पडलें. या जलप्रवासांत त्याचा मावसा मरण पावला असें म्हणतात.

(चाळीस)

मिसरदेशाहून आल्यावर त्याच्या बापानें त्यास तत्त्वज्ञानाचा अभ्यास करूं नको म्हणून सांगितलें. तेव्हां त्यानें वकिलीचा धंदा पत्करून त्यांत चांगला लौकिक मिळविला. या धंद्यांत त्याच्या अंगची बुद्धिमत्ता व वक्तृत्वशक्ति ह्या चांगल्या प्रत्ययास आल्या. पुढें त्यानें राजकीय गोष्टींमध्यें मन घातले असतां, त्याला पहिल्यानें फडनविसाचा हुद्दा मिळाला. या सुमारास त्याचा पहिला विवाह झाला. परंतु या प्रथम संबंधाच्या स्त्रीचे नांव काय होते तें कळत नाही. ही स्त्री नंतर लवकरच मरण पावली, व तिच्यापासून झालेली संततिही त्याच्या हयातींतच आटपली.

सेनेकानें वकिलीच्या धंद्यांत पुष्कळ द्रव्य मिळविलें असून, त्यानें आपले पैसे व्याजी लावूनही तें अतिशयित वाढविलें होतें. पण हें सारें वित्त त्यानें प्रामाणिकपणानें मिळविले होतें यांत मुळींच संशय नाहीं. त्याची मातापितरें मूळचींच मोठीं श्रीमंत असल्यामुळें त्यांच्यापासून त्यास बरीच संपत्ति मिळाली होती. तीत आणखी त्यानें स्वकष्टार्जित धनाची भर घातल्यामुळें त्याचें वित्त इतकें वाढलें होतें. यावरून पाहतां त्याच्या कित्येक शत्रूंनी त्याच्यावर खोट्या मार्गानें धन मिळविल्याचा जो आरोप केला आहे, तो केवळ व्यर्थ होय. आतां एवढे मात्र खरें कीं, त्यानें आपल्या ग्रंथांत दारिद्र्याचे इतके पोवाडे गाइले असून, व धनतृष्णेचा एवढा निषेध केला असून, स्वत: आपल्या बोधाविरुद्ध वर्तन करावे हे कांहीं चांगले नव्हे.

सेनेकाचे बाळपण आगस्टस बादशहाच्या अमदानीत गेलें. हा बादशहा जात्या सुस्वभावाचा होता; तरी त्याच्या कारकीर्दीत रोमन लोकांच्या स्वातंत्र्याचा बहुतेक नाश झाला.

याच्या नंतर टायबेरिअस बादशहाने तेवीस वर्षे राज्य केलें. हा बादशहा फारच क्रूर व लहरी असल्यामुळें त्यानें रोमन लोकांचा नाना परी छळ केला. याच्या नंतर कायसनामें बादशहा झाला. हा बादशहा गादीवर बसला तेव्हां सेनेकाचें वय पस्तीस वर्षांचे होतें. हा बादशहा पराकाष्ठेचा क्रूर व जुलमी होता. याने हजारों लोकांचे केवळ मौजेखातर प्राण घेतले! आपल्या अधिकाराचा उपयोग दुसऱ्यास त्रास व दुःख देण्याकडे करण्यांत त्यास मोठे समाधान वाटे; इतका त्याचा स्वभाव दुष्ट होता. कोणाच्या अंगीं चांगले गुण पाहिले कीं त्याच्याविषयी त्या दुरात्म्याच्या मनांत द्वेषबुद्धि उत्पन्न होऊन, तो त्याचा घात करण्यास प्रवृत्त होत असे. सेनेकानें या वेळीं कित्येक नाटके लिहिलीं असून हिंदुस्थान व मिसर या देशांच्या माहितीचे ग्रंथ केले होते; या शिवाय आणखी भूकंप व भोळसरपणा या विषयावर त्यानें लेख लिहिले होते. यामुळें त्याची रोमन लोकांत थोडीशी वाहवा झाली होती. त्याचप्रमाणें तो सदाचारी व निर्व्यसनी आहे अशी त्याची ख्याति झाली होती. ही त्या हेवेखोर बादशहाला मुळींच आवडली नाहीं. तो त्याच्या लेखांवर जेव्हां तेव्हां प्रतिकूळ टीका करू लागला. एके दिवशीं सेनेकाने एका पक्षकाराच्या तर्फे या बादशहापुढें वकिली करावयास येऊन उत्कृष्ट भाषण केलें. हें भाषण ऐकून त्याच्या मनांत सेनेकाविषयीं पुरी द्वेषबुद्धि बाणून त्याचा घात करण्याचा त्यानें बेत केला. परंतु त्याच्या एका परिचारकाने त्याची अशी समजूत केली कीं ह्या वकिलाची प्रकृति क्षयरोग लागून अगदीं क्षीण झाली आहे; तेव्हां तो लवकरच मरण पावणार आहे. मग त्याचा घात करण्याचा मुद्दाम बेत करण्यांत काय अर्थ आहे?

याप्रमाणें या बादशहाच्या द्वेषबुद्धीस पात्र होऊन त्याच्या तावडींतून सुटल्यावर तो वकिली करण्याचें व लोकांत वागण्याचें सोडून देऊन स्वस्थ घरीं बसून राहिला. हा सगळा काळ त्यानें एकसारखे विद्याध्ययन करण्यांत घालविला. पुढें कायस बादशहाचा एका योद्ध्याने खून केला; व त्याच्या गादीवर क्लाउडिअस

बादशहा आला. या बादशहाच्या कारकीर्दीत सेनेका पुनः लौकिकांत वागूं लागून त्याला दरबारांतील मोठमोठ्या कामगिऱ्या मिळाल्या. या कामगिऱ्या बजाविण्यांत त्यानें आपल्या अंगची अप्रतिम बुद्धिमत्ता व हुषारी हीं दाखविली. यामुळे त्याचें क्लाउडिअसाच्या दरबारांत मोठे वजन वाढलें. पण त्या बादशहाची त्याच्यावर लवकरच अवकृपा होऊन त्याला देशत्यागाची शिक्षा झाली. ही बिना येणेप्रमाणे घडली: ह्या बादशहाची मेसालिना म्हणून एक स्त्री होती. ती अतिशयित दुराचारी व दुष्ट होती. बादशहा तिच्या अर्ध्या वचनांत वागत असे. दरबारातील सर्व नेमणुका, किंबहुना राज्याचा एकंदर कारभार ती सांगे तसा चालत असे. हा तिचा वरपगडा बादशहाच्या दोघां पुतण्यांस मुळींच सहन न होऊन त्यांनीं तिचा नाश करण्याचा घाट घातला. या पुतण्यांची नांवे ज्युलिआ व आग्रिपिना अशीं होतीं. त्यांनी सेनेका याला आपल्या कटास अनुकूळ करून घेतलें. सेनेकालाही राणीचा दुराचार व दबदबा ही अगदीं असह्य झाली होतीं. यास्तव त्यानें त्यांच्या पक्षास साहाय्य केलें. पण पुढें मेसालिना हिने त्यांचा तो बेत पकडिला, आणि ज्युलिआ व सेनेका यांस सिनेटनामक न्यायसभेपुढें आणून त्यांवर खटला केला. पण या खटल्यांत काहीएक जीव नव्हता, तरी सदरील सभेनें बादशहाची मर्जी खुष राखण्यासाठी त्या दोघांसही देहांत शासन व्हावे व त्यांचें सारे वित्त जप्त करावें असें ठरविलें. या ठरावाप्रमाणे ज्युलिआ हिची तर वाट लागलीच. पण बादशहाने सेनेका याला देहांत शासन न करितां नुसते देशपार केलें, आणि त्याचें वित्त जप्त करण्याचा ठराव रद्द केला. ही अशी सेनेका यास मिळालेली कडक शिक्षा सौम्य करण्याचें एक कारण असें दिसते कीं, बादशहा स्वत: विद्वान् असून, तो विद्वान् लोकांस फारच मानीत असे. दुसरें कारण असें दिसते कीं, सेनेका ज्युलिआ व आग्रिपिना यांच्या पक्षास अनुकूळ होता हें खरें होतें, तरी त्याच्या हातून मोठासा गुन्हा झाला नव्हता; जर खरोखरीच कांहीं गुन्हा झाला असता, तर मेसालिना हिनें सिनेटनें केलेली कडक शिक्षा अंमलांत आणण्याचा आग्रह अवश्य धरिला असता.

याप्रमाणे सेनेका याने दरबारातील मोठमोठे हुद्दे बहिवाटून वित्त व कीर्ति मिळविण्याची हांव धरिल्यामुळे त्याच्यावर हा आरोप येऊन त्यास स्वदेशत्याग करावा लागला. आपली परम प्रिय माता, आपला गोजिरवाणा मुलगा, आपले इतर प्रिय सबंधिजन व आपली सारी संपत्ति सोडून त्याला जावे लागलें, तेव्हां त्याच्या चित्ताची कशी काय स्थिति झाली असेल याची कोणालाही कल्पना करितां येईल. सेनेकाची स्त्री यापूर्वी नुकतीच मरण पावून, त्याचा एक लहान मुलगा कांहीं आठवड्यांपूर्वी निवर्तला होता. या प्रिय जनांच्या वियोगाचें दुःख तो विसरतो न विसरतो तों त्याच्यावर हें परम असह्य संकट ओढवले. दुसरें असे कीं, रोमन लोकांस देशत्यागाची शिक्षा देहांत शासनाहूनही असह्य वाटे; आणि सेनेकाची तर त्या वेळच्या लोकांत मोठी मानमान्यता वाढलेली असून, त्याचें दरबारांत फारच वजन असल्यामुळें त्याचा मोठमोठ्या लोकांशी परिचय झाला होता; आणि तो स्वत: मोठा विद्वान् असल्याकारणानें त्याचें इतर ज्ञानी व विद्वान् पुरुषांशी पुष्कळ संघटन होते. या सर्व गोष्टींस त्याला मुकावे लागल्यामुळें त्याचें चित्त फारच उद्विग्न होणें स्वाभाविक होतें. परंतु ही शिक्षा त्यानें मोठ्या धैर्यानें सहन केली. त्याच्या वियोगानें त्याच्या प्रिय मातेस अतिशयित खेद झाला होता. यास्तव तिचें समाधान करण्यासाठीं त्यानें या वेळीं एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथांतील विचार वाचिले म्हणजे त्याच्या चित्तांत स्टोइकतत्वज्ञान किती पूर्णपणें ठसले होतें तें चांगले प्रत्ययास येतें.

परंतु ही त्याची धैर्यवृत्ति फार वेळ कायम राहिली नाहीं. त्याला भूमध्यसमुद्रांतील कॉर्सिकानामक एका खडकाळ बेटावर नेऊन सोडिलें होतें. तेथली हवा अतिशयित घाणेरडी असून तेथें अन्नपाण्याची सोय अगदीं बेताचीच होती. त्यामुळे त्याचे फार हाल होऊं लागले. शिवाय तो जात्याच सहवासप्रिय असल्यामुळें त्याला तो एकांतवास अतिशयित असह्य वाटूं लागला. पुनः त्याच्या मित्रांनी त्याची शिक्षा रद्द होण्याविषयीं पुष्कळ खटपटी केल्या, परंतु त्यांस मुळीच यश आलें नाहीं. तेव्हां त्यानें असें मनांत आणिलें कीं, आपला आतां या बेटावर अंत व्हावयाचा. आपलें श्रमसंपादित ज्ञान, आपलें अप्रतिम वक्तृत्व, आपली सारी बुद्धिमत्ता व्यर्थ जाऊन, आपण या जगांत येऊन कांहींच सार्थक्य केलें नाहीं असें होणार. असे विचार त्याच्या मनांत पुन: पुन: येऊन तो अत्यंत अस्वस्थ झाला. मग आपली सुटका करून घेण्यासाठी साधेल तो उपाय करून पाहावयाचा असा त्यानें निर्धार केला पॉलिबिअस नामेंकरून एक मनुष्य क्लाउडिअस बादशहाच्या अतिशयित मर्जीतला होता. हा मनुष्य सांगे त्याप्रमाणें बादशहा वागत असे. तेव्हां त्याला प्रसन्न करून घेतले नाही तर आपली शिक्षा रद्द होईल असें सेनेकानें मनांत आणून त्याच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. पुढें ह्या पॉलिबिअसचा बंधु मरण पावला, तेव्हां त्याचें समाधान करण्यासाठीं म्हणून सेनेकानें एक ग्रंथ लिहिला. त्यामध्यें त्यानें त्या मनुष्याची व बादशहाची फारच प्रशंसा व खुशामत केली. ह्या प्रशंसेस ते मुळीच पात्र नसतां, व त्यांची या तत्वज्ञान्यानें अन्यत्र पुष्कळ विटंबना केली असतां, केवळ स्वमुक्ततेच्या आशेनें त्यानें समजून उमजून हे मिथ्या प्रलाप केले. आतां ही कृति तेव्हांच्या त्याच्या दीन स्थितीस्तव त्याच्या हातून घडली हें सत्य आहे. पण ती खऱ्या स्टोइक तत्वज्ञास मुळींच शोभत नाहीं.

परंतु पॉलिबिअसच्या हातून त्याची सुटका झाली नाही. कारण या पॉलिबिअसवर मेसालिना हिने कांहीं कुभांड रचून त्याला देहांत प्रायश्चित्त द्यावयास लाविलें. पण पुढें या दुष्ट मेसालिनेचें दुर्वर्तन क्लाउडिअस बादशहाच्या नजरेस येऊन त्यानें तिचा खून करविला. तेव्हां बादशहाचा कोणत्या स्त्रीशीं विवाह करावा याविषयीं दरबारच्या लोकांत वाद सुरू झाला. शेवटी आग्रिपिना हिने आपल्या पक्षास दरबारचे मोठे मोठे मुतसद्दी सामील करून घेऊन बादशहाशी आपला विवाह करून घेतला. ही स्त्री क्लाउडिअस बादशहाची पुतणी असून हा जो आपल्या चुलत्याशीं विवाह करण्याचा घाट तिनें घातला, त्याचें कारण एवढेंच कीं, तिच्या प्रथम संबंधाचा एक निरोनामें मुलगा होता, त्यास राजपद मिळवून द्यावे असा तिचा उद्देश होता. म्हणून या जनरीतीविरुद्ध संबंधाबद्दल तिला मुळींच लज्जा वाटली नाहीं. तिचा स्वभावच मुळी अतिदुष्ट होता. स्वतांच्या कल्याणासाठीं पाहिजे तें कुकर्म करण्यास ती कधींही मागें पुढें पाहत नसे. ही आग्रिपिना राणी होतांच तिनें आपल्या विरुद्ध पक्षाच्या एकंदर माणसांचा संहार करविला, आणि आपल्या पक्षाच्या लोकांस बढत्या देवविल्या. या प्रसंगीं तिनें सेनेका याला झालेली देशत्यागाची शिक्षा रद्द करून स्वदेशी आणविलें. हें वर्तमान इ. स. ४९ या वर्षीं घडलें. या दुर्वृत्त स्त्रीची आमच्या चरित्रनायकावर एवढी मेहरनजर होण्याचें एक कारण तर उघडच आहे कीं, पूर्वी मेसालिना हिच्या विरुद्ध तिनें आणि तिच्या बहिणीनें कट केला होता, तेव्हां तो त्यांच्या पक्षास अनुकूळ होता. दुसरें कारण असें कीं, आग्रिपिना हिच्या हातून या वेळीं पुष्कळ क्रूर कर्मे घडली असल्यामुळें रोम नगरीतील एकंदर लोकांस ती अगदीं अप्रिय होऊन गेली होती. तेव्हां त्यांच्या मनातील आपल्याविषयीची अप्रीति अंमळ कमी व्हावी एतदर्थ त्यांना परम प्रिय होऊन राहिलेला तत्वज्ञ व ग्रंथकार जो सेनेका त्यास तिनें कॉर्सिका बेटांतून परत रोमनगरीत

आणविले. याप्रमाणे ती या तत्वज्ञास परत आणूनच राहिली नाहीं, तर त्याला न्यायाधिशाचा हुद्दा देऊन आपला पुत्र जो निरो त्याचा अध्यापक नेमिलें.

ही अशीं त्याची अगदीं अनपेक्षित मुक्तता होऊन त्याचा पुनः दरबारांत प्रवेश झाल्यामुळे त्याला आनंद झाला. परंतु वस्तुतः पाहतां यांत त्याचें मोठेच नुकसान झालें असे म्हणावें लागतें. त्याच्या सारख्या नितिमान् व ज्ञानी पुरुषाने आग्रिपिनेसारख्या पराकाष्ठेच्या दुष्ट, विश्वासघातकी, लोभी व उद्दाम स्त्रीने फेंकलेल्या आमिषास मोहून, तिच्या सेवेंत आहे आपल्या बुद्धीचा अपव्यय करून आपणास अक्षयींचा कालिमा लावून घ्यावा हें अत्यंत अनुचित होय. त्या कॉर्सिका बेटांतच तो हाल होऊन मेला असता तरी पतकरलें असतें. पण त्यास लोकांत वागून व मोठमोठे हुद्दे मिळवून आपल्या ज्ञानाचा व बुद्धीचा उपयोग करावा अशी हांव फार होती. ह्मणून त्याच्या हातून हा अविचार घडला; असो.

पुढें आग्रिपिना हिने आपल्या पुत्रास गादी मिळवून देण्याचा बेत लवकरच सिद्धीस नेला. तो असा: तिनें निरो याला पहिल्याने क्लाउडिअस बादशाहाकडून दत्तक घ्यावयाला लाविलें. पण ही गोष्ट त्यानें आपल्या औरस पुत्राच्या नुकसानाची केली असें त्याच्या कोणी लक्ष्यांत आणून देऊन त्याच्या मनांत आग्रिपिनेविषयी पक्का द्वेष उत्पन्न केला. ही तिच्यावर बादशहाची अवकृपा झालेली तिच्या हेरांच्या द्वारे तिला कळली. तेव्हां तिने लागलीच ताडलें कीं आतां आपला बेत सिद्धीस नेण्याचें लांबणीवर टाकिलें असता तो सिद्ध तर व्हावयाचा नाहींच, पण आपला व आपल्या पुत्राचा प्राण धोक्यांत पडेल. म्हणून तिनें लागलीच बादशहाला विषप्रयोग करून ठार मारिलें, आणि लष्करी लोकांस वश करून घेऊन त्यांच्याकडून आपल्या पुत्रास बादशहा निवडविलें. ही लष्करी लोकांची पसंती सिनेट सभेला मान्य करावी लागून बादशहाचा खरा खरा वारस मागें पडला. या भयंकर कटात सेनेकाचें अंग मुळीच नव्हतें असें म्हणतात.

निरो इ. स. ५५ या वर्षी गादीवर आला. हा आपल्या आईहूनही दुष्ट व भयंकर होता. तरी तो आपला गुरू सेनेका याच्या मसलतीने चालत होता तोपर्यंत त्याची कारकीर्द वाखाणण्यासारखी झाली. सिनेटसभेचे, सरदारांचे व इतर प्रजाजनांचे हक्क पाळिले जाऊन सर्वांस योग्य न्याय मिळू लागला. हुद्दे देण्याच्या सबंधाने पूर्वीसारखा पक्षपात होईनासा झाला. पण निरोनें आपल्या कारकीर्दीच्या पहिल्याच वर्षी क्लाउडिअस बादशहाचा मुलगा जो गादीचा खरा वारस होता, त्याचा आणि आपल्या आईचा वध करविला! हें अत्यंत घोर कर्म त्यानें करण्याचें कारण असें कीं, निरो गादीवर आल्यापासून सेनेकाच्या मसलतीनें वागूं लागून आईचे सांगणे फारस मनास आणिनासा झाला. तें त्या दुर्वृत्त व महत्वाकांक्षी स्त्रीला मुळींच आवडले नाहीं. तिचा हिशोब असा होता कीं, आपला मुलगा गादीवर आला म्हणजे आपल्या हातीं साऱ्या साम्राज्याची सूत्रे येऊन आपण मनास येईल तसा कारभार हांकूं; आणि याच हेतूने सेनेका याला आपल्या पुत्राचा अध्यापक केलें होतें. परंतु पुढें तिचा पुत्र राजपदारूढ झाला तेव्हां सेनेका हा तिचें काहीच चालू देईना, व तिचा मुलगाही तिला मुळीच मोजिना. तेव्हां तिला त्या दोघांचाही राग येऊन तिने असे उद्गार काढिले कीं, 'बरें आहे, कारट्यांच्या हातचा कारभारच मुळी काढून घेतें, आणि गादीचा खरा वारस जो क्लाउडिअसचा मुलगा त्याला गादीवर बसवितें.' ही क्रोधोक्ति निरो याला कळली तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. त्याला आपल्या आईचा स्वभाव चांगला माहीत होता. मग त्यानें क्लाउडिअसच्या

(चव्वेचाळीस)

मुलग्याचा खून करण्याचा घाट घालून, तो बेत त्यानें आपल्या आईला कळू न देता सिद्धीस नेला; आणि तिच्याशीही तो उघडपणे वैर करूं लागला; इतकेंच नव्हे तर तिचा प्राण घेण्याचेही तो बेत करूं लागला! एक वेळ त्यानें तिच्यावर आपल्याविरुद्ध कट केल्याचा आरोप आणिला होता. पण त्यांत काहीएक जीव नाहीं असें सेनेकानें ठरविल्यावरून त्यावेळेस ती सुटली. पण त्या अत्यंत भयंकर व धूर्त स्त्रीला जिवंत राहू दिल्यास आपल्या जिवास खचीत धोका आहे असें निरोस वाटून, त्यानें तिचा शेवटीं खून करविला! या मातृहत्येच्या बेतांत सेनेकानें त्याला मसलत दिली होती असें म्हणतात! हा मातृघात करून निरो नेपल्स येथें पळून गेला. आणि तेथून त्यानें हें अमानुष कृत्य आपण कां केलें, याचें कारण सिनेटसभेस पत्र लिहून कळविले. हें पत्र सेनेका याने लिहिले होतें, असें त्याच्या भाषेवरून लोकांनी ताडलें, या पत्रांत त्यानें आग्रिपिना हिच्या सर्व दुष्कर्मीचा फाडा वाचून तिच्या वधामुळे सर्व रोमन लोक सुखी झाले असें दर्शविले होतें. हें पत्र वाचून सिनेट सभेतील लोकांच्या अंगावर शहारे आले. तेव्हां प्रत्यक्ष सेनेका याला त्यांतला मजकूर जुळविताना काय वाटलें असावें बरें? पण तो बापडा करितो काय! निरोच्या मर्जीविरुद्ध वागल्याने देहांत प्रायश्चित्त खास मिळावयाचें हें तो पूर्णपणे जाणून होता. दुसरें असें कीं, आग्रपिनेला तिच्या क्रूर कर्मांबद्दल व घातकी हवभावाबद्दल असेंच काहीतरी शासन होणे उचित होतें असा खुद्द त्याचाही अभिप्राय होता; व तिला जिवंत राहूं दिलें असतें तर तिनें निरो, सेनेका व त्याच्या पक्षाचे इतर लोक यांचा खात्रीनें प्राणनाश केला असता; व सर्व साम्राज्यांत युद्धसंग्राम माजले असते. तेव्हां अशा खुनशी स्त्रीला देहांतशासन देऊन आपले व इतरांचे प्राण वाचवावे व सर्व राज्यावरचे संकट टाळावे असें त्याच्या मनांत येणे साहजिक होतें. सेनेकाचा दोष मिळून एवढाच होता कीं, त्यानें आरंभापासूनच आग्रिपिनेच्या आमिषास भुलतां नये होतें. पण कॉर्सिका बेटावर हाल होऊन मरण्यापेक्षां स्वकुटुंबांत येऊन पडणें व राज दरबारांत मोठेमोठे हुद्दे वहिवाटणें हीं त्याला विशेष प्रिय वाटणे साहजिक होतें. एकदा आग्रिपिनेच्या तडाक्यांत तो सांपडल्यावर तिच्याशीं किंवा पुढें निरोशीं तुटून वागण्याचे धैर्य त्याला झालें नाहीं हें खरें आहे. त्या दुष्टांची अवकृपा झाल्याने जीवितनाश होण्याची भीती होती. यास्तव साधेल तेथवर तो त्यांच्या तंत्राने वागला. आतां हें खरें आहे कीं, त्याच्या अंगीं स्टोइक तत्वज्ञान पूर्णपणे बाणलें असतें तर त्यानें सत्ताधीशांची अवकृपा व मरणभीती यांस मुळीच जुमानिलें नसतें. पण सर्वांच्याच ठायीं सॉक्रेटिसासारखें धैर्य व वैराग्य असणें शक्य नाहीं.

सेनेकावर कोणी दुसरा असा आरोप लादितात कीं, त्यानें निरोला योग्य प्रकारचे शिक्षण दिलें नाहीं, म्हणून तो असा दुर्वृत्त निपजला. पण हा त्यांचा श्रम आहे. निरोचें गुरुत्व सेनेकास प्राप्त झालें तेव्हां निरो सोळा वर्षांचा होता. एवढ्या अवकाशांत त्याच्या अंगांत सर्व प्रकारचे दुर्गुण कमी अधिक प्रमाणाने उद्भवले होते. तो जात्याच मोठा उच्छृंखल व हट्टी असल्या कारणानें बिचाऱ्या सेनेकाच्या शिक्षणाचा कोठून उपयोग व्हावयाला? त्याला जे विषय आवडत, तेच तो घेऊन बसें; आणि सेनेकाला ते त्यास शिकवणें भाग पडे. तेव्हां अशा स्थितीमध्यें या आडदांड कुशिष्याला आपल्या तत्वज्ञानाचा बोध करण्याचा फारच थोडा प्रसंग त्यास आला असेल, हे उघड आहे. गुरु कितीही सुज्ञ, नीतिमान् व हुशार असला तरी शिष्यच जर मुळापासून सर्व प्रकारच्या लाडांनीं व विलासांनी बिघडलेला असला, तर त्याच्या मनावर गुरूच्या सदुपदेशाचा कांहींएक परिणाम होणें नाहीं.

(पंचेचाळीस)

सदरी निर्दिष्ट केल्याप्रमाणें निरो नेपल्स येथें पळून गेला तो इ. स. ५९ सालापर्यंत लोक भीतीस्तव रोमनगरींत परत आला नाहीं. पण सदरील वर्षी त्याच्या विश्वासू माणसांनी रोमनगरीत परत जाण्यास कांहीं एक भय नाहीं अशी त्याची खात्री केल्यावरून तो स्वराजधानीस परत आला. येथून पुढे सेनेकावर त्याची इतराजी झाली. त्याच्या कृपेंतल्या माणसांस सेनेका दरबारातून केव्हां दूर होईलसें झालें असल्या कारणानें ते त्याच्यासंबंधानें बादशहाला भलभलत्या गोष्टी सांगू लागलें. सेनेकाची दौलत फारच मोठी असल्यामुळें ती त्यांच्या डोळ्यांत खुपत होती. ते बादशहाला सांगू लागले कीं, 'त्यानें ही दौलत कांहीं प्रामाणिकपणानें मिळविलेली नव्हे; शिवाय त्याच्या दौलतीपुढें खुद्द बादशहाचीही दौलत कांहींच नाहीं असे जनांस वाटत आहें.' या व अशाच दुसऱ्या खोट्यानाट्या गोष्टी निरोच्या मनांत भरवून देऊन त्यांनीं सेनेका विषयीं त्याच्या मनांत द्वेषबुद्धि व मत्सर हीं उत्पन्न केली. राजाची आपणावर अवकृपा होऊन आपल्यावरून त्याचा विश्वास उडाला आहे, असें सेनेकाच्या लक्षांत येतांच तो निरोपाशी जाऊन म्हणाला कीं, 'मी वृद्ध झालो असून माझी प्रकृति क्षीण झाली आहे, तरी मला दरबारची नोकरी सोडून घरीं बसण्याची परवानगी द्या; आणि आपल्याच कृपेनें व औदार्यानें मला मिळालेले सारें वित्त परत घ्या.' पण ही त्याची विनंति निरोनें अमान्य करून त्यास मोठ्या मानभावीपणानें आलिंगन देऊन म्हटले कीं, माझें वय अद्यापि अल्प आहे, तरी तुम्ही आणखी कांहीं वर्षें माझ्या संनिध राहून मला सल्लामसलत द्या. तुम्हांस दिले वित्त मी तुमच्याकडून परत घ्यावे हें माझ्या उदारत्वकीर्तीस कमीपणा आणणारें आहे.' निरोचें हें कृत्रिम वर्तन सेनेकाच्या लक्षांत येऊन चुकलें. बादशाहाचे आभार मानून तो घरीं आला; आणि तेव्हांपासून त्यानें आपला आयुष्यक्रम अगदीं पालटिला. त्यानें आपल्या मित्रांच्या भेटी घेण्याचें बंद केलें; आणि आपली प्रकृति नादुरुस्त आहे असें मिष करून तो आपला सारा काळ विद्याव्यासंगांत घालवू लागला. तो असा घरीं स्वस्थ बसून राहिला तरी त्याच्यावर त्याच्या शत्रूंनी राजद्रोहाचा खोटा आरोप आणिला. पण तो निराधार आहे असें सिद्ध करून सेनेका त्यांतून मुक्त झाला. याप्रमाणे शत्रु आपल्या नाशास एकसारखे टपले आहेत असें त्याच्या पूर्णपणें लक्ष्यांत आलें. तेव्हां 'रोमनगरीतून निघून जाऊन कोठे तरी स्वस्थ राहून आयुष्यातले उरलेले दिवस विद्याम्यासांत घालवावे असा माझा हेतू आहे, तर मला येथून जाण्यास परवानगी असावी,' अशी पुन: एकवार त्यानें निरोपाशीं विनंति केली पण ती त्यानें मान्य केली नाहीं. याप्रमाणे तो निरुपाय झाला तेव्हां अगदीं बेजार असल्याचें ढोंग करून घराबाहेर मुळींच पडेनासा झाला. या वेळीं निरोनें त्याला विष प्रयोग करून ठार मारण्याचा बेत केला होता असे म्हणतात. पण तो सेनेकाला कळून आल्यामुळे सिद्धीस गेला नाहीं. तो या वेळीं नुसती भाकर व फळें खाऊन झऱ्याचें वाहतें पाणी पीत असे म्हणून बचावला. हे अस सेनेकाच्या नाशाचे बेत चालेलें असतां रोमनगरीवर एक अतिभयंकर प्रसंग गुदरला इ. स. ६४ सालीं या नगरींत मोठा अग्निप्रलय माजून तेथील सारें प्राचीन वैभव विलयास गेलें; आणि हजारो लोक केवळ अनाथ व विषन्न झाले. या धांदलीमध्यें निरो सांपडल्यामुळे त्याचा सदरील दुष्ट उद्देश कांहीं वेळ असिद्ध राहिला.

पुढें कांहीं दिवसांनीं निरोचा खून करण्याचा कित्येक सरदारांनीं घाट घालून या आपल्या बेतास पुष्कळ लोक सामील करून घेतले या कटात सेनेकाचा पुतण्या होता. पण हा त्यांचा बेत लवकरच उघडकीस येऊन निरोनें पुष्कळ लोकांस नुसत्या संशयावरून ठार मारिलें. या प्रसंगीं सेनेकाच्या शत्रूंनी सेनेका या कटास सामील होता, असें निरोच्या मनांत भरवून दिल्यामुळें त्यानें त्यालाही देहांतशासनाची शिक्षा दिली. सेनेका

या वेळीं कंपानिया येथून रोमनगरीकडे यावयास निघाला असून, नगरापासून दोन कोसांवरील एका वाडींत मुक्कामास राहिला असतां, तेथें राजसेवक त्यास ठार मारण्याचीं आज्ञा घेऊन आले. ही राजाज्ञा ऐकून तो शांतपणें मरणास सिद्ध झाला. पण त्याची द्वितीय संबंधाची स्त्री* पॅलिना आणि इतर मित्र अतिशयित शोक करूं लागले. तेव्हां सेनेकानें त्यांस नानापरी बोध करून त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न केला. तो राजसेवकांपाशीं आपल्या मृत्युपत्रांत कांहीं फेरबदल करण्यासाठीं अवकाश मागू लागला; पण ते तो त्यास देईनात. तेव्हां निरुपाय होऊन आपल्या मित्रांचा त्यानें शेवटला निरोप घेतला. अखेरीस तो त्यांस इतकेंच म्हणाला कीं, जो दुरात्मा आपल्या बंधूचा व मातेचाही प्राण घ्यावयास चुकला नाहीं, त्याला आपल्या गुरूचा प्राण घेण्यास कोठून संकोच वाटणार? तो मरणास अगदीं सिद्ध झाला असें पाहून त्याची प्रिय स्त्री पालिना हीही त्याच्याबरोबर मरण्यास तयार झाली; आणि सेनेकानेंही तिची ही इच्छा मान्य केली. कारण त्याला ठाऊक होते कीं, आपल्यामागे आपल्या स्त्रीचे हाल व विटंबना करण्यास निरो चुकणार नाहीं.

त्या काळीं देहांतशासनाच्या पद्धति फारच क्रूरपणाच्या होत्या. सेनेका आणि पॉलिना यांच्या हाताच्या शिरा तोडून त्यांतून रक्त वाहूं दिलें. पण सेनेका वृद्धपणामुळें व व्रतस्थपणामुळें अगदीं अशक्त झाला असल्या कारणानें त्याच्या अंगांतून फारसें रक्त वाहले नाहीं. तेव्हां त्याच्या पायांच्याही शिरा तोडल्या; तरी त्याचा प्राण जाईना. तेव्हां आपले हाल आपल्या बायकोच्या दृष्टीस पडूं नयेत, व तिचे प्राण जातांना आपल्या डोळ्यांनी पाहण्याचा प्रसंग टळावा, म्हणून त्यानें तिला दुसऱ्या खोलींत न्यावयास सांगितलें. या वेळीं त्यास मरणसमयींच्या वेदना होत होत्या, तरी त्यानें लेखकास बोलावून आपले शेवटचे उद्गार लिहून घ्यावयास सांगितलें असें म्हणतात. पुढें रक्त वाहूनही प्राण जात नाहीं असें पाहून, त्यानें विष प्यावयास मागितले. तें त्यास दिलें. पण त्यानेंही त्याच्या देहावर मुळींच परिणाम होईना. कारण त्याच्या आधींच निःसत्व झालेल्या देहांतून सारें रक्त निघून गेल्यामुळें त्यास विषापासून कांहीं अपाय पडेना. मग तो उष्ण पाण्याच्या मोठ्या डोणींत जाऊन बसला, तरी त्याचा प्राण जाईना. तेव्हां शेवटी त्यानें वाफेच्या योगाने आपला श्वास कोंडून प्राण सोडिला. इकडे पालिना हिला दुसऱ्या खोलींत नेल्यावर राजाज्ञेवरून तिच्या शिरा बांधून तिला मरूं दिलें नाहीं. हें वर्तमान इ. स. ६५ या वर्षी घडलें.

याप्रमाणे या तत्त्वज्ञान्याचा त्याच्याच शिष्याच्या हातून वध झाला. कायस बादशहाच्या मनांत ज्याचा वध करण्याचें आलें होतें, क्लाउडिअस बादशाहाने ज्याला सडून मरण्यासाठीं एका खडकाळ बेटावर नेऊन सोडलें होते, त्याला निरोच्या आज्ञेवरून सदरीं सांगितल्याप्रमाणे अगदीं भयंकर रीतीनें प्राणांस मुकावे लागलें. हा सारा प्रभाव एका लोभाचा होय. त्याच्या अंगीं प्रौढ वयांत जे कांहीं दोष उत्पन्न होते, त्या सर्वांस ही अनावर लोभवृत्तिच कारण होय. या वृत्तीस्तव त्यानें एवढी दौलत मिळविली होती कीं, त्याच्या इतका श्रीमान् त्याच्या काळीं कोणीही नव्हता. त्याला द्रव्य लोभ एवढा अमर्याद होता कीं, त्याच्यापाशीं विपुल संपत्ति असतां तो आणखी व्याजबट्टा करीत असे. पण हा एक दुर्गुण खेरीज करून पाहतां त्याचें आचरण अगदीं शुद्ध होतें. त्याचा स्वभाव फारच उत्तम असून तो अत्यंत दयाळू व प्रेमळ होता. त्याचे आहारविहारही अगदी परिमित असत. कोणताही ढंग किंवा व्यसन त्याला कधींही लागलें नाहीं; आणि

* कार्सिका बेटांतून परत आल्यावर त्यानें हा द्वितीय विवाह केला होता.

त्याचें वांकडे पाऊल असें कदापि पडलें नाहीं. त्याला एवढी संपत्ति व ऐषआराम अनुकूळ असतांही तो आपला फुरसदीचा वेळ विद्याव्यासंगांत व ग्रंथ लिहिण्यांत घालवीत असे. त्याची बुद्धिमत्ता व विद्वत्ता हीं अप्रतिम असून त्याचे कित्येक विचार फारच उदात्त आहेत. त्याचा नीतिबोधही उत्कृष्ट आहे. या बोधाबरहुकूम त्याच्या स्वतांच्या हातून आचरण घडलें असतें, तर त्याची इतिहासज्ञांनी महासाधूंत गणना केली असती. 'जनी बोलिल्यासारखें चाल बापा' या रामदासोक्तीप्रमाणें त्याचें वर्तन घडले नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

सेनेकानें पुष्कळ बोधपर व सृष्टिशास्त्रविषयक ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय त्यानें कांहीं काव्येंही केलीं आहेत. त्याच्या बोधपर ग्रंथांत संसारातील निरनिराळ्या कर्त्कयांचे विवेचन उत्कृष्ट प्रकारे केलें आहे. या त्याच्या बोधाचें बहुतेक सार प्रकृत पुस्तकांत घेतलें आहे. डॉ. फरार सेनेकाच्या नीतिबोधासंबंधाने आपला अभिप्राय येणेंप्रमाणें प्रगट करितो; 'नीत्युपदेशक या दृष्टीनें पाहतां त्याचे विचार परम उदात्त आहेत.' सत्याचें अवलंबन करावे; धैर्य अढळ ठेवावे; सर्व मानव समान आहेत असें मानून सर्वांशी ममतेने वर्तावें; दासजनांशीं समतेच्या नात्यानें वागावें, पापी जनांच्या संबंधाने क्षमाशीलतेचें वर्तन करावे, कोणत्याही प्रकारच्या व्यवहारांत स्वार्थबुद्धि कदापि धरूं नये; सर्व वसुधा आपलें कुटुंब आहे अशी आपली वृत्ति होऊन देशाभिमान किंवा जात्यभिमान यांस कदापि वश होऊं नये इत्यादि परम उज्ज्वल नीतिसिद्धांतांचा उपदेश त्याच्या बहुतेक बोधपर ग्रंथांत ओतप्रोत भरला आहे.'

सेनेकाचें चरित्र येथें संपलें. आतां त्याच्या संबंधानें शेवटीं एकाच गोष्टीचा उल्लेख करून हा चरित्रलेख पूर्ण करूं. सेनेकाच्या बोधपर ग्रंथांतील पुष्कळ वचनांचे ख्रिस्त लोकांच्या नव्या करारांतील वचनाशीं व त्यातूनही मुख्यता सेन्टपॉलच्या वचनांशीं बरेंच सादृश्य आहे. यामुळे कित्येक प्राचीन ख्रिस्ती पंडितांचे असें म्हणणें आहे कीं, सेनेका ख्रिस्ती होता; आणि कांहीं अर्वाचीन पंडितांचा असा तर्क आहे कीं, त्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली नसली तरी त्याला सेन्टपॉल रोमनगरींत आला होता, तेव्हां त्याच्याकडून ख्रिस्ती धर्माचा उपदेश ऐकावयास मिळाला होता. पण हे दोन्ही तर्क खोटे आहेत असें कित्येक आधुनिक ख्रिस्ती पंडितांनी सिद्ध केलें आहे. उदाहरणार्थ डॉ. फरार आणि डॉ. लाइटफुट यांचे ग्रंथ पाहा. पहिल्या पंडिताने 'सीकर्स आफ्टर गॉड'* नांवाच्या पुस्तकांत सेनेकाविषयीं लिहिताना असें निर्विवाद सिद्ध केलें आहे कीं, सेन्टपॉल रोमनगरींत आला तेव्हां तेथल्या ख्रिस्ती लोकांविषयी रोमन लोंकांच्या ठायीं अत्यंत तिरस्काराची बुद्धि वसत होती, हें इतिहासप्रसिद्ध आहे. शिवाय ज्यूलोकांस रोमनलोक मुळेपासून नीच मानीत; आणि ख्रिस्ती धर्म हा त्या लोकांतीलच एक धर्ममत आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें, तो धर्म त्यांस पराकाष्ठेचा तुच्छ वाटणे साहजिक होतें. आणखी असें कीं, सेनेकाच्या वेळीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार अगदीं नीच मानलेल्या ज्यूलोकांत व इतर जातींच्या गुलाम वगैरे हलक्या लोकांतच मुख्यतः झाला होता. तेव्हां अशा धर्माचा उपदेश सेनेकासारखा श्रीमान्, विद्वान् व अधिकारसंपन्न पुरुष ऐकावयास कधीं गेला असावा, किंवा त्यांचे काय विचार आहेत तें समजून घेण्यास तो कधीं उत्सुक झाला असेल असें मनातही

* या पुस्तकांत या पंडितानें सेनेका, एपिक्टेटस व तें मार्क ऑरेलिअस या तिघां रोमन स्टोइकांचे जीवनवृत्त व बोधहीं साररूपात दिलीं आहेत. प्रकृत ग्रंथांतील चरित्रलेख मुख्यतः याच पुस्तकाच्या आधाराने लिहिले आहेत.

आणावयास नको. शिवाय सेनेकाचे बरेच ग्रंथ सेन्टपॉल रोमनगरींत येण्यापूर्वीच प्रसिद्ध झाले होते. आतां वर सांगितलेला दुसरा पंडित डॉ. लाइटफुट यानें सेन्टपॉल याचीं पत्रे स्वतंत्र छापून त्यांवर टीका केली आहे. त्या टीकेच्या शेवटी या वादाचा उल्लेख त्यानें एका स्वतंत्र भागांत करून त्याचा सर्व बाजूनीं चांगला ऊहापोह केला आहे. या त्याच्या ऊहापोहाचा इत्यर्थ इतकाच आहे कीं, सेनेकाच्या वेळीं नव्या करारांतील एकही पुस्तक प्रसिद्ध झालें नसल्यामुळे सेनेकाला ख्रिस्ती धर्माचा बोध वाचावयास मिळाला नव्हता हें उघड आहे; आणि उपदेशकांच्या तोंडून हा उपदेश ऐकण्याचा संभव तर कितपत होता हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां सेनेकाच्या ग्रंथांतील पुष्कळ वचने नव्या करारांतील वचनांशी इतकी सदृश असण्याचें कारण कांहीं तरी दुसरेंच असलें पाहिजे. तें कारण सदरील पंडिताच्या मतें असें आहे कीं, मिसरदेशांतील ॲलेक्झॅन्ड्रियानगरींत पूर्वेकडील व पश्चिमेकडील तत्वविचारांचें संमेलन झाल्यामुळे नवी धर्ममतें व तत्वज्ञानपद्धति निर्माण झाल्या. स्टोइक तत्वज्ञानपद्धति अशांतलीच एक होती या तत्वपद्धतीचा त्या काळी सर्वत्र प्रसार झाला होता. या तत्वपद्धतीचे मोठमोठे उपदेशक पूर्वदेशांतलेच होते. पुढें ख्रिस्ती धर्माच्या प्रवर्तकांनी अलंक्झॅन्ड्रिया येथील बरेच तात्विक विचार व स्टोईक लोकांचे नीतीसंबंधी कांहीं विचार यांचें आयतेंच साहाय्य घेऊन आपल्या धर्माचा सर्वत्र प्रसार मांडिला. आतां ज्या सेन्टपॉलकडून सेनेकानें आपले विचार चोरून घेतले असा अप्रबुद्ध लोकांचा समज आहे, तो सेन्टपॉल टार्सस येथील रहिवासी होता. हें टार्ससनगर त्या वेळीं ग्रीक लोकांचें मोठेंच प्रसिद्ध विद्यापीठ होतें. येथें निरनिराळ्या तत्वज्ञानपद्धतींचे शिक्षक स्वशिष्यांस तत्वबोध करीत असत. या सर्व तत्वपद्धतींमध्यें स्टोइक लोकांच्या तत्वपद्धतीची सरशी असून, तिचे शिक्षक व अनुयायी या नगरात पुष्कळच होते. तेव्हां अर्थात् सेन्टपॉल यानेही या तत्वपद्धतीचें अध्ययन केलें होतें यांत मुळींच शंका नाहीं; आणि त्याच्या कित्येक उपदेशपर लेखावरून तर हा तर्क अगदीं खरा आहे असें म्हणावें लागतें. याच कारणास्तव सेन्टपॉलच्या वचनांत व सेनेकाच्या वचनांत एवढे विलक्षण सादृश्य आहे. सेनेका पहिल्या प्रतीचा स्टोईक तत्वज्ञ असून, त्यानें पूर्वकालच्या स्टोइक तत्वज्ञांच्याच विचारांचा पुनःपुनः अनुवाद केला आहे आणि या स्टोइक लोकांनी तरी आपले बरेच विचार त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या तत्वज्ञांच्या ग्रंथांतून घेतले आहेत. दुसरें असें कीं, सेनेकानें ज्या तत्वज्ञांच्या विचारांचा अनुवाद केला आहे, ते, नवा करार व त्याचा मूळप्रवर्तक महासाधु येशू ख्रिस्त हे अस्तित्वांत येण्यापूर्वी तीन शतकें, होऊन गेले होते; आणि या स्टोइक तत्वज्ञांनी ज्या प्राचीन तत्वज्ञांच्या विचारांत अंमळ फेरफार करून आपले सिद्धांत जगांत प्रगट केले होते. ते इसवी सनापूर्वीं पांच सहा शतकें होऊन गेले होते, तेव्हां अशी वास्तविक पूर्वपीठिका असतां सेनेकानें सेन्टपॉलकडून किंवा नव्या करारांतून आपले विचार घेतले आहेत. असें म्हणणें केवळ हास्यास्पद होय. असा डॉ. लाइटफुटचा अभिप्राय आहे. आणखी या ख्रिस्ती पंडितानें स्टोइक तत्वज्ञानांतील विचारांहून ख्रिस्ती धर्मांतले विचार किती चांगले आहेत हें दर्शवून प्रस्तुत वाद उपस्थित करणारांचा मूर्खपणा दाखवून दिला आहे.

या गोष्टीचा येथें उल्लेख करण्याचें कारण एवढेच कीं, यावरून आमच्या चरित्रनायकाच्या वोधवचनांची मातबरी केवढी आहे तें वाचकांच्या लक्षांत यावें. आज विद्याचारसंपन्न ख्रिस्ती राष्ट्रांतील मोठमोठ्या नीतीशास्त्रवेत्त्यांचें असें म्हणणें आहे कीं, नव्या करारातील नीतीबोध सर्वोत्कृष्ट आहे. तेव्हां त्या बोधाशीं पुष्कळ बाबतींत साम्य पावणारा प्रकृत स्टोइक तत्वज्ञान्याचा बोधही किती उत्कृष्ट असला पाहिजे हें उघड होतें.

एपिक्टेटसचें चरित्र

या साधुपुरुषासंबंधाची फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. आम्हांला जी कांहीं सापडली आहे, ती येथे देतो.

एपिक्टेटसचे जन्म फिजिआप्रांतांतील हिरापॉलिस नामक शहरी इ. स. ५० या वर्षांच्या सुमारास एका अगदी हीन कुळांत झालें. याचे आईबाप अतिशयित गरीब होते. ते अगदीं लहान असतांच त्याला त्याच्या आईबापांनी गुलाम म्हणून विकिलें. त्याला इपाफॉडिटसनामक एका श्रीमान गृहस्थानें विकत घेतलें होतें. हा निरोबादशहाच्या मर्जीतल्या गृहस्थांपैकीं एक असून त्याचा चिटणीस होता. सेनेका निरो विरुद्ध चाललेल्या कटात आहे, असें त्या दुष्ट बादशहाच्या मनांत भरवून देणाऱ्या नराधमांमध्ये हा इपाफॉडिटस प्रमुख होता. पुढें निरोनें जीं मोठमोठी घोर कर्मे केली, त्या सर्वात या एपिक्टेटसच्या धन्याचे थोडेबहुत अंग होते. शेवटीं हा बादशहा इ. स. ६९ सालीं पळून गेला, तेव्हां हा त्याचा विश्वासू नोकर त्याच्या बरोबर होता; आणि अखेरीस आपणास लोक पकडून कैद करितील या भीतीनें या भितऱ्या बादशहाने आत्मघात करण्यासाठीं खंजीर उरात खुपसला, तेव्हां या त्याच्या प्रामाणिक नोकराने त्याचा तो खंजीर चांगला आत रेटून त्याचा प्राण अगदीं जाईसा केला! एपिक्टेटस त्याचा संबंधाच्या कांहीं गोष्टी सांगे. त्यांपैकीं आम्ही येथें दोनच देतोः त्याच्या गुलामांपैकीं एक जण त्याचे जोडे शिवणारा होता. ह्याचे काम इपाफॉडिटसला मुळींच आवडत नसे; म्हणून त्यानें त्याला विकून टाकिलें. पण कर्मधर्मसंयोगाने त्याला बादशहाच्या एका कोठवळ्यानें विकत घेऊन बादशहाचे जोडे शिवण्याचें काम सांगितलें. याप्रमाणें त्याचा राजवाड्यांत प्रवेश झाला, तेव्हां हाच इपाफॉडिटस त्याला मोठा मान देऊं लागला, व त्याच्याशीं प्रेमाने बोलू चालू लागला!

दुसरी गोष्ट अशी कीं, बादशहाविरुद्ध एका कटात सामील असल्याबद्दल एका सरदारावर तोहमत येऊन त्याचें शिर उडविण्याचा हुकूम झाला. तेव्हां त्याला हें देहांत शासन देतांना हा एपिक्टेटसचा धनी त्या हतभाग्य पुरुषाकडून कांहीं गोष्टी कबूल करून घेत होता. त्या सरदाराच्या मानेवर पहिला वार केला, त्यानें त्याचें शिर तुटले नाही, तेव्हां दुसरा वार करीपर्यंत या दुरात्म्यानें त्याला प्रश्न विचारण्याचे सोडिलें नाही! एवढे त्याचें हृदय कठोर होतें.

यावरून एपिक्टेटस याला कोणत्या प्रकारचा धनी मिळाला होता हें चांगले लक्षांत येईल. त्या वेळचे श्रीमंत लोक गुलामांस फारच क्रूरपणे वागवीत असत. धनी त्यांना वाटतील त्या भयंकर शिक्षा करण्यास किंवा त्यांचे नाना परी हाल करण्यास मुळींच मागेपुढें पाहत नसत. त्यांच्याकडून पाहिजे तें व पाहिजे तितके

काम करून घ्यावयाचे असा त्यांचा क्रम असे. या बाबतींत ते त्यांना जनावरांपेक्षांही कमी लेखीत.* एपिक्टेटसला त्याच्या धन्यानेंही अशाच प्रकारें वागविले असावें यांत शंका नाही. हा धनी त्याच्याशी किती क्रूरपणे वर्तत असे याचें एकच उदाहरण येथें देतो.

एपिक्टेटस लहान असतां एके दिवशीं त्याच्या ह्या दुष्ट धन्याची लहर लागून, तो त्या बापड्याचा एक पाय खोड्यात घालून पिरगळू लागला; तेव्हां तो गायांवायां करून म्हणाला कीं, 'तुम्ही हा असाच पिरगळीत रहाल तर हा मोडेल. परंतु त्याच्या विनवणीकडे लक्ष न देऊन त्या दुष्टाने त्याचा पाय पिरगळून पिरगळून शेवटीं मोडिला! तेव्हां तो बिचारा दुःखी झाल्याचें काहीएक चिन्ह न दाखविता म्हणाला: 'मीं, म्हटले होतें ना, तुम्ही तो मोडाल म्हणून!' इपाफॉडिटसच्या या दृष्टपणामुळे हा महासाधु पुढें जन्माचा लंगडा झाला!

सदरी निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्या वेळच्या गुलामांस त्यांचे धनी वागवीत असल्या कारणानें, त्या हतभाग्य लोकांच्या ठायी त्यांच्या स्थितीस अनुरूप असे पुष्कळ दोष उत्पन्न होत असत. त्यांची वृत्ति अगदीं नीच असून त्यांस स्वाभिमान कसला तो मुळीच नसे. यामुळे त्यांच्या हातून अनेक अनन्वित कर्मे होत असत. अशा लोकांच्या सहवासास एपिक्टेटस याला पुष्कळ वर्षे रहावे लागलें असूनही त्याच्या ठायीं एवढे साधुत्व व विद्वत्त्व ही कशी उत्पन्न झाली, याविषयीं वाचकांस मोठे नवल वाटेल. पण याचा उलगडा अगदीं सोपा आहे. त्याकाळचे विलासी बडे लोक जसे इंद्रियतृप्तीच्या विषयांचा संग्रह करीत, तसेच ते आपल्या चित्ताची करमणूक करण्याकरिता कांहीं शिकलेले लोक पदरी ठेवीत. या शिकलेल्या नोकरांनी धन्याला एकाद्या विषयाची माहिती हवी असल्यास ती निरनिराळे ग्रंथ वाचून मिळवून द्यावी. धनी स्वत: चांगला शिकलेला असून एकादा ग्रंथ रचण्याच्या कामांत गुंतला असला, तर त्याला लागेल तें साहाय्य त्यांनीं करावे, आणि त्याचा रचलेला ग्रंथ तपासून दुरुस्त करावा. त्यास नाना चमत्कारिक विचार व कल्पना ऐकवून त्याच्या चित्ताचें त्यांनीं रजन करावे. पुढें गुलामांची संख्या अमर्याद वाढली, तेव्हां बडे लोक आपल्या पदरच्या गुलामांकडून विद्याभ्यास करवून सदरी सांगितल्यासारखा त्यांचा उपयोग करून घेत असत. पण हे शिकलेले गुलाम कसे निपजत याची कल्पना सहज करितां येईल. त्यांस सर्वदा परवश राहून आपल्या संपादित विद्येचा उपयोग छांदिष्ट, क्रूर व विलासी धन्यांच्या मर्जीप्रमाणें करावा लागत असल्या कारणानें त्यांच्या ठायीं नसती फुशारकी, ढोंगीपणा, तोंडपुजेपणा इत्यादि नीच वृत्ति उत्पन्न होत असत.

असो, तर अशा ह्या त्या काळच्या चालीप्रमाणे इपाफॉडिटस यानें आपल्या या छोड्या लंगड्या गुलामास रोमनगरीतील एका अध्यापकाच्या स्वाधीन केलें. या अध्यापकाचे नांव मुसोनिअस असें होतें. हा आमच्या चरित्रनायकाचा गुरू मोठा विद्वान् असून स्टोइक तत्वज्ञानाचा त्या काळचा मुख्य प्रवर्तक होता. त्याची अप्रतिम विद्वत्ता व वकृत्वशक्ति निरोला असह्य होऊन, त्यानें त्याच्यावर कटांत सामील असल्याची नसती तोहमत घेऊन त्याला देशांतून हाकून दिले होतें. पुढे निरो आत्महर्त्या करून प्राणास मुकला तेव्हां तो रोमनगरीत परत आला. त्याचें अत्यंत शुद्ध आचरण व अद्वितीय विद्वत्ता यांच्या योगानें त्याची सर्वत्र ख्याति होऊन तो सर्वांना मान्य व पूज्य झाला; तो इतका कीं, पुढें वेस्पाशिअन बादशहानें सर्व तत्वज्ञांस

* या प्रकरणी सेनेकाचे काय उद्गार आहेत तें पुढे दिले आहेत.

रोमनगरींतून हाकून दिलें असतां एकट्या ह्या तत्वज्ञास मात्र नगरांत राहू दिलें. ह्या अशा योग्य गुरूपाशी विद्याध्ययन करावयास सांपडल्याबद्दल एपिक्टेटस आपणास मोठा भाग्यवान म्हणत असे. मुसोनिअसापाशीं जे शिष्य विद्या पढण्यासाठीं येत, त्यांच्या अंगीं आपला बोध ग्रहण करण्यास लागणारी योग्यता कितपत आहे हें तो प्रारंभीं पारखून पहात असे. या त्याच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणे त्यानें एपिक्टेटसचीही पारख केली असून, तो त्याच्या कसास पूर्णपणें उतरला होता. एपिक्टेटस जात्या मोठा बुद्धिवान असून त्याचा स्वभावही अगदीं गरीब होता. त्यामुळें ह्या गुरूचा तत्वबोध त्याच्या मनावर चांगला ठसून त्याच्या वर्तनांत अक्षयींचा पालट झाला. या शिक्षणामुळे त्याचें जें कल्याण झालें, त्यापुढे त्यास भोगावे लागणारें दास्य, दरिद्र्य व विपत्ति ही कांहींच नाहींत असें तो म्हणत असे; आणि आपल्या आईबापांनी आपणास गुलाम म्हणून विकिले, तो त्यांचा आपणावर मोठाच उपकार झाला असें तो मानी. याप्रमाणें एका उत्तम गुरूच्या शिक्षेत राहून त्या वेळच्या सर्वोत्कृष्ट तत्वपद्धतीचें त्यानें ज्ञान प्राप्त करून घेतल्यामुळें त्याच्या अंगीं खरें साधुत्व उत्पन्न होऊन, तो या संसारातील पाहिजे ते बरे वाईट प्रसंग व संकटे, चित्ताची स्थिरता व शांति ढळू नं देता, सहन करण्यास समर्थ झाला; आणि ही त्याची वृति आमरण कायम राहून त्याच्या हातून सर्वदा सद्वर्तन घडले; आणि स्टोइक लोकांच्या मताप्रमाणें त्याला खऱ्या सौख्याचा चिरकाल अनुभव घडला.

वर सांगितल्याप्रमाणे तत्वज्ञानाचा अभ्यास केल्यावर एपिक्टेटस आपल्या धन्यापाशी कांहीं वर्षे राहिला. पण पुढे त्याला त्यानें सोडून दिलें. ही त्याची मुक्तता केव्हा व कशी झाली याविषयी काहीएक कळत नाहीं. ही सुटका झाल्यावर त्याला आपला निर्वाह चालविण्याची मोठीच पंचाईत पडली. तरी कांहीं दिवस लोटल्यावर त्याची विद्वत्ता व नीतिमत्ता लोकांच्या नजरेस येऊन ते त्याला मानू लागले, व त्याचा बोध श्रवण करण्यास येऊ लागले. या त्याच्या शिष्यांच्या साहाय्याने त्याचा कसाबसा निर्वाह चाले. स्वतांस कळलेले सत्य इतर भ्रांतिष्ठ जनांस समजून सांगून त्यांची सदाचाराकडे प्रवृत्ति करण्याच्या उद्योगांत सदोदित गुंतून रहाण्यांत स्वजीविताचें सार्थक्य आहे असें त्यास वाटे; आणि हा क्रम त्यानें देहांत प्राण होता तो पर्यंत अव्याहत चालविला. या अत्यंत जनहिताच्या कामात यत्किंचित्ही व्यत्यय येऊ नये म्हणून या महासाधूने विवाह सुद्धा केला नाही. 'आपण विवाह कां करीत नाही?' असें त्यास कोणी एके प्रसंगीं पुसिले असतां तो म्हणालाः ''सांप्रत माझ्या सभोवतालच्या लोकांची स्थिति अगदी बिघडली आहे. तेव्हां ती सुधारण्याचा उद्योग जो करूं जाईल, त्यानें दुसऱ्या कोणत्याही गोष्टींने चित्त व्यग्र होऊं देता कामा नये. अशा मनुष्याने गृहस्थाश्रमाचा अवलंब केल्यास त्याला आपल्या बायकांमुलांसंबंधाची व सोयऱ्याधायऱ्यांसबंधाची पुष्कळ कर्तव्ये करणें प्राप्त होईल; आणि मग या कर्तव्यांची हिळसांड करणें नीतीस विरुद्ध होईल: आणि तीं तो यथासांग करू जाईल तर त्याचें लोकहिताकडे तितके दुर्लक्ष होईल. या संसाराचा एकदा अंगीकार केला की, कुटुंबभरणासाठी कांहीं तरी उद्योग म्हणून पाहावा लागणार; आणि मग सामानासुमानाचा पसारा वाढून व्यर्थ उपद्व्याप पाठीस लागणार. तेव्हां ज्याला आपल्या सभोवतालच्या लोकाचे कल्याण करावयाचें असेल, त्यानें या कुटुंबसुखाच्या नादी सहसा लागू नये.''

ह्या आपल्या समजाप्रमाणे तो आमरण वागला. त्याची झोपडी अगदीं साधी असून, तीत एक दिवा आणि निजावयाची एक खाट इतकें काय तें सामान असे. त्या झोंपडीचें दार होतें त्याला कडीकुलूप काहीएक नव्हतें. कारण तीत चोरण्या सारखे कांहीं नसल्यामुळे तिले दार बंद करण्याचें त्याला कधींच अगत्य पडत नसे! त्यानें एकदा एक लोखंडाचा दिवा विकत घेऊन तो आपल्या झोपडीतील देवापुढे ठेविला होता तो कोणी चोरून नेला; तेव्हा त्यानें त्याच्या जागी मातीचा दिवा ठेविला, आणि म्हटले कीं, आतां त्या चोराची पुरी निराशा होईल. एपिक्टेटस वारल्यावर एका गृहस्थाने हा दिवा तीन हजार रुपयांना विकत घेतला. ही एवढी किंमत देऊन त्यानें तो दिवा अशासाठी खरेदी केला होता म्हणतात की तो दिवा पेटवून आपण अभ्यास करावयास बसलों तर आपणास एपिक्टेटससारखी विद्या प्राप्त होईल असें त्या भोळ्या मनुष्याला वाटलें! या त्याच्या भोळ्या समजुतीवरून एपिक्टेटसविषयी त्या काळच्या लोकांत केवढी पूज्यत्वबुद्धि वसत होती तें चांगले लक्ष्यांत येतें.

एपिक्टेटस या झोपडीत पुष्कळ वर्षे एकाटच रहात असे. पण एके दिवशीं त्याच्या एका ओळखीच्या गृहस्थाने आपले नूतन जन्म पावलेले बालक टाकून दिलें तें पाहून एपिक्टेटसास त्याची दया आली; आणि त्या अनाथ प्राण्याचा आपण संभाळ करावा असें त्याच्या मनांत येऊन, त्यानें त्या मुलाला उचलून आपल्या झोपडीत नेले, आणि त्याच्या निगेसाठी एक वृद्ध बाई चाकरीस ठेविली! या गोष्टीवरून त्याच्या अंगीं किती भूतदया होती तें दिसून येतें.

पुढें इ. स. ९४ या वर्षी डॉमिशियन बादशहाने इतालि देशांतील एकंदर तत्वज्ञांनीं निघून जावे असा हुकूम केला. त्या हुकुमाअन्वये एपिक्टेटस याला रोमनगरी सोडून जावे लागलें. येथून तो नि नकोपॉलिसशहरीं जाऊन राहिला; आणि तेथें त्यानें जनांस बोध करण्याचा आपला क्रम एकसारखा मरेपर्यंत चालविला. यानंतर तो पुनः रोमनगरीस आला असावा असें दिसतें. कारण हेड्रिअन बादशहा त्याला फारच मानीत असे; व रोमनगरींतील मोठमोठ्या मुत्सद्यांशी व तत्वज्ञांशी त्याचा पुष्कळ परिचय होता असें इतिहासावरून समजते.

हा साधु अगदीं वृद्ध होऊन वारला. याचे पुष्कळ शिष्य असून त्या सर्वांचा त्याच्यावर पराकाष्ठेचा लोभ होता. त्याचा शिष्यसमुदाय एवढा वाढला होता तरी त्यानें आपली निरपेक्ष व साधी वृत्ति कधींही सोडिली नाहीं. हा परम जगदुदाहरक महासाधु कधी मरण पावला ते कळत नाही.

एपिक्टेटस याने आपले विचार लिहून ठेविले नाहींत. सॉक्रेटिसाप्रमाणे तो आपल्या शिष्यांस तोंडींच बोध करीत असे. आज जो त्याचा बोध उपलब्ध आहे, तो आरिअन नामक त्याच्या एका शिष्याच्या परिश्रमांचें फळ होय. हा या शिष्याचा जगावर मोठाच उपकार झाला आहे. हा आरिअन जात्याच मोठा बुद्धिवान व विद्वान् होता. हा पुढे सिनेट सभेचा सभासद झाला असून, कांहीं वेळ कॉन्सलचाही हुद्दा त्यास मिळाला होता. त्यानें शिकंदर बादशहाचा इतिहास लिहिला आहे, तो विद्वन्मान्य आहें. एपिक्टेटसानें निकोपालिस येथें असतां जो स्वशिष्यास वेळोवेळा बोध केला होता, तो ह्या भावीक शिष्यांनी जशाचा तसा शब्दास शब्द टिपून घेऊन संग्रही ठेविला होता. पहिल्याने हा बोध प्रसिद्ध करण्याचा त्याचा मानस

नव्हता. पण त्याच्याजवळील लेखांच्या लोकांनी नकला केल्यामुळें त्याचा प्रसार झाला. तेव्हा त्यानें निरुपाय होऊन आपल्या दस्तूरची प्रत लोकांत प्रसिद्ध केली. याचे कारण तो असे सांगतो की, ''लोकांस एपिक्टेटसचे खरे विचार काय होते ते साधार कळावे म्हणून ही माझी टिपणे मी जशीची तशी प्रसिद्ध करीत आहें. यांतील विषयांचे विवेचन पःद्वतवारीने केलेले वाचकांना आढळणार नाही. कारण तीं केवळ बोललेल्या भाषणाचे उतारे होत. एपिक्टेटससारखा अत्यंत प्रेमळ व आस्थेवाईक उपदेशक जनास अगदीं कळवळ्याचा बोध करूं लागला म्हणजे ते आपल्या शब्दांच्या योजनेकडे, वाक्यांच्या रचनेकडे वगैरे मुळींच पाहत नसतो; तर आपला बोध श्रोतृवृंदाच्या मनांवर कोणत्यारीतीने ठसेल एवढीच त्याला काळजी असते; आणि साधुपुरुषांच्या बोधाचा उपयोग काय तो एवढाच साहे. या दृष्टीनें पाहता लोक या भाषणातील दोषांकडे न पाहता त्यांतील आशयाकडेच विशेष लक्ष देतील अशी मला पूर्ण उमेद आहे.'' हे या शिष्याचे उद्गार वाचिले म्हणजे एपिक्टेटसचा बोध किती शुद्ध स्वरूपाने जगात आज राहिला आहे हें लक्षांत येतें. तरी पण आरिअन याने पुढे या आपल्या गुरूच्या बोधपर भाषणातील सिद्धांत एकवट करून एक पुस्तक प्रसिद्ध केलें. याच साररूप पुस्तकावरून एपिक्टेटसची युरोपीय पंडितांमध्ये पुष्कळ काळपर्यंत प्रसिद्धि होती. या शिष्याने आपल्या गुरूचे एक चरित्रही लिहिले होते म्हणतात. पाण तें आज उपलब्ध नाहीं.

सदरी सांगितलेला एपिक्टेटसच्या बोधाचा साररूप ग्रंथ प्राचीन ख्रिस्ती विद्वान् पंडितांस व साधुजनास प्रिय व मान्य होऊन, त्याचें अध्ययन करून, ते त्याच्या आधाराने स्वशिष्यास उपदेश करीत. पण ज्याच्या तोंडच्या ह्या उदात्त बोधाचे ते परिशीलन व मनन करीत, तो स्वतः ख्रिस्ती नसुन त्याला सेनेकाप्रमाणेच ख्रिस्ती धर्मातील सिद्धांतांची मुळींच माहिती नव्हती, हे येथे ध्यानात वागविण्यासारखे आहे. डॉ. फरार याचा तर या ग्रंथासंबंधाने असा अभिप्राय आहे कीं, या ग्रंथातील नीतीबोध फारच उत्कृष्ट व मनावर ठसणारा आहे. असा बोध दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात आढळावयाचा नाहीं. ज्याच्या ठायी ख्रिस्ती धर्माची तत्वे पूर्णपणे ठसली आहेत. त्यालासुद्धा या ग्रंथाच्या वाचनाने पुष्कळ बोध प्राप्त होईल. असा अभिप्राय आधुनिक पद्धतीने शिकून पंडितत्व मिळविलेल्या ख्रिस्तीधर्माभिमानी पुरुषाकडून ज्या ग्रंथाविषयी मिळाला आहे, तो ग्रंथ किती उत्कृष्ट आहे, याची वाचकांनीच कल्पना करावी. तेव्हा अशा ह्या परम मान्य ग्रंथाच्या आधारानें प्रस्तुत पुस्तकांतील एपिक्टेटसची बोधवचनें मराठी वाचकास सादर केली आहेत. ती त्यांस अवश्य आदरणीय होतील अशी उमेद आहे.

***

उपोद्घात

स्टोइक लोकांचे तत्वविचार

आमच्या या देशात प्राचीन काली कपिल, गौतम, कणाद, व्यास, जिन, बुद्ध आदिकरून महाविद्वान् पुरुष निर्माण होऊन, त्यांनीं जशी निरनिराळी तत्वदर्शनें प्रणीत केली तद्वत्च युरोपांतील साऱ्या विद्यांचे आदिपीठ जो ग्रीस देश तेथें थेलीज, पायथ्यागोरस, साक्रेटिस, प्लेटो, आरिस्टॉटल, झिनो इत्यादि मोठे बुद्धमान् पुरुष उत्पन्न होऊन, त्यांनीं भिन्न भिन्न तत्वविचारपद्धति प्रचलित केल्या. या विचारपद्धतीचा गुरुपरंपरेनें चोहोंकडे प्रसार होऊन, त्यांचा अभिमान वाहणारे पुष्कळ पुरुष पूर्वकाळी होऊन गेले; आणि सांप्रत जे तत्वविचार लोकसंमत आहेत, त्यांतील बहुतेक विचार या पूर्वकालच्या तत्वपद्धतींतून घेतले आहेत. आतां या तत्वज्ञानपद्धतींचीं मुख्य दोन अंगे आहेत. एक अंग असें कीं, त्यांत सृष्टिज्ञानविषयक सिद्धांताचा अंतर्भाव होतो; आणि दुसऱ्या अंगांत मानवी कर्तव्यविषयक नियमांचे प्रणयन केले असतें पहिले अंग दुसऱ्या अंगाचे साधक आहे. कारण सत्य सृष्टिज्ञानाव्यतिरिक्त वास्तविक कल्याणाच्या अशा नीतिनियमांचें ज्ञान प्राप्त होणें अशक्य होय. यास्तव खरे ज्ञाते पुरुष या उभय अंगाचे ज्ञान संपादन करून तदनुसार इतर जनांस उपदेश करीत असतात. या त्यांच्या उपदेशाचे रहस्य सामान्य जनांस चांगले समजण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे त्यांनीं तो उपदेश ज्या तत्वज्ञानाच्या पद्धतीस अनुसरून केला असेल, तिचे थोडेसे ज्ञान करून घ्यावे हा होय. यावरून पाहता प्रकृत पुस्तकांत ज्या दोन साधुपुरुषाच्या बोधाचे सार दिलें आहे, त्यांनीं तो बोध ज्या तत्वविचारपद्धतीच्या अनुरोधानें केला आहे, तिचे संक्षिप्त निरूपण ग्रंथारंभीं उपोद्घातरूपानें करणें उचित होय. सेनेका आणि एपिक्टेटस हे उभय साधुपुरुष ग्रीस देशांतील स्टोइक नामक तत्वज्ञानपद्धतीचे अभिमानी होते. यास्तव या पद्धतीचे येथें सूत्ररूपानें विवेचन करूं.

प्रथमारंभीं या तत्वज्ञानपद्धतीचा थोडासा इतिहास सांगू. प्राचीन ग्रीक लोक पराकाष्ठेचे स्वतंत्रताप्रिय असून, त्यांस स्वस्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं सर्वदा दक्षतेने परिश्रम करावे लागत; आणि प्रत्येक सार्वजनिक संस्थेमध्यें ते परस्परांशीं मोठी स्पर्धा करीत. यामुळे त्यांच्या ठायींच्या निरनिराळ्या शक्ति उपयोगांत येऊन, एकमेकांच्या चढाओढीस्तव त्या एकसारख्या विकास पावल्या. आणि त्यांचा प्रत्येक बाबतीमध्यें उत्तरोत्तर उत्कर्षच होत गेला. त्यांच्या इतर शक्तीप्रमाणे बुद्ध्यादि मानसिक शक्तींचाही अप्रतिहतपणे विकास होऊन, ते प्रत्येक प्रश्नाचा विचार अगदीं स्वतंत्रपणे व अनिरुद्धपणें करूं लागले. या कारणास्तव त्या लोकांमध्यें मोठेमोठे तत्वजिज्ञासु जन निर्माण होऊन, त्यांनीं बुद्धिबलेकरून स्वसंमत अशा तत्वपद्धति प्रणीत केल्या. जे सिद्धांत त्यांच्या बुद्धीस सत्य वाटत, त्यांचें प्रतिपादन ते कोणाची भीती किंवा संकोच न धरिता करीत. म्हणूनच प्रारंभी निर्दिष्ट केल्यासारखे महातत्वज्ञ पुरुष तिकडे निर्माण झाले.

परंतु पुढें या परम स्पृहणीय स्वतंत्रावस्थेस ग्रीकराष्ट्रें अक्षयींची मुकून, प्रथमतः म्यासिडोनियाच्या बादशहांच्या व नंतर रोमनलोकांच्या ताब्यात गेली. या परतंत्रतेच्या काळात त्यांच्या स्वभावांत हळूहळू पुष्कळ पालट होत गेला. पूर्वी ते आपल्या बुद्धीचा केवळ स्वतंत्रपणे उपयोग करून, मनास प्रशस्त व सत्य वाटतील ते विचार केवळ सार्वजनिकहितबुद्धीनें लोकांत प्रगट करीत, तसें करण्याचें त्यांनीं या काळी सोडून दिले. स्वतंत्रतेच्या काळी ते राष्ट्रीय हिताच्या गोष्टींचा विचार करण्यामध्ये आपल्या संपादित ज्ञानाचा विनियोग करीत, तसे आतां काहीएक करण्याची गरज त्यांना न वाटून, ते स्वतः खासगी व्यवहार व व्यक्तिमात्रास प्राप्त होणारी सुखदुःखे यांचाच विचार करूं लागले. याप्रमाणे या परतंत्रतेच्या काळी ज्ञात्या पुरुषाचे लक्ष केवळ व्यावहारिक गोष्टीकडेसच विशेष लागून तत्वज्ञानाचे हें अंग विकास पावले.

ही अशी ग्रीक राष्ट्रांची अवस्था असतां स्टोइक एपिक्युरिअन लोकांच्या तत्वविचारपद्धति अस्तित्वांत आल्या सार्वजनिक कृत्यात मन घालण्याची आवश्यकता न उरल्यामुळे ग्रीक लोकांना केवळ आत्मिक उन्नति करण्यांतच श्रेय वाटू लागलें. बाह्य स्थिति सर्वथा परस्वाधीन झाल्या कारणानें केव्हा काय घडेल याचा नेम उरला नाहीं. म्हणून ज्ञाते पुरुष बाह्य सुखाविषयी उदासीन राहून, सर्व सुखाचे खरे अधिष्ठान अंतर्याम आहे असें मानू लागले. समाजस्थितीच्या बहुतेक प्रारंभापासून ग्रीक लोकांनी स्वतंत्रतेचा अनुभव घेतला असून, तिचा अंती सर्वस्वी नाश होऊन, पुनरपि स्वतंत्रता लाभण्याची आशा त्यांना बिलकुल उरली नाही, तेव्हां त्यांच्याठायी एक प्रकारचे वैराग्य उत्पन्न होऊन ते स्वतःचें आचरण सुधारण्याच्या उद्योगास लागले. हा काळपावेतो परराष्ट्रांविषयी त्यांच्या मनांत भेदभाव वसत होता, तो विगलित होऊन सर्व वसुधा ते कुटुंबवत् लेखू लागले. ग्रीक लोकांच्या मनांतला हा राष्ट्रभेद मोडण्यास दुसरे कारण असें झालें कीं, म्यासिडोनियाच्या बादशहाचा व पुढे रोमन लोकांचा अंमल जिकडे जिकडे स्थापित झाला, तिकडे तिकडे त्या लोकांचा प्रवेश होऊन, इतर राष्ट्रांतील ज्ञानी पुरुषांशी त्यांचा समागम घडल्यामुळें त्यांच्या मनातील अन्य लोकांविषयींची तुच्छताबुद्धि बरीच कमी झाली; आणि दुसऱ्या राष्ट्राप्रमाणेंच आपणही हतवीर्य व परवश झालों असून, एकाच बलाढ्य साम्राज्याचे अंकित झालो आहो, असें त्यांच्या लक्षांत येऊन, त्यांचा स्वाभिमान बराच कमी झाला. या सर्व गोष्टींमुळें त्या वेळीं उपस्थित झालेल्या तत्वविचारपद्धतींमध्यें, सर्व मानव एकमेकांचे बांधव असून, एकाच प्रचंड राष्ट्राचे जानपद होत; प्रत्येक मनुष्याने इतर सर्वाशी नीतीने वागावे; राष्ट्रभेदास्तव किंवा कुलभेदास्तव कोणी कोणाशी अनीतीने किंवा अन्यायाने वागू नये, इत्यादि उन्नत सिद्धांतांचा समावेश होऊं लागला.

ही अशी अवस्था ग्रीक राष्ट्रास प्राप्त होण्यापूर्वी सॉक्रेटिसाने असें प्रतिपादन केलें होतें की, तत्वज्ञानाचे एक अंग जें सृष्टिविषयक विचारांचे, त्यातच ज्ञात्या पुरुषाने अगदी गढून न जाता, तत्वज्ञानाच्या दुसऱ्या नीतीसंबंधी अंगाकडे अवश्य लक्ष पूरवावे हे दुसरेच अंग प्रधान असून, पहिले अंग केवळ गौण होय, कारण मनुष्याचे खरे कल्याण नीतीज्ञानावर व तदनुसार वर्तण्यावर सर्वस्वी अवलंबून आहे, असा सिद्धांत त्यांने प्रणीत केला होता. याप्रमाणे सॉक्रेटिसाने नीतीचे महत्त्व प्रतिपादन करून तदनुसार स्ववर्तन आमरण ठेविले; आणि आपले पवित्र उदाहरण सर्व जगास घालून दिलें. या त्याच्या बोधामुळे ग्रीक लोकांचें थोडेसे लक्ष नीतिज्ञानाकडे लागलें होते. पुढे, सदरी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये पालट होऊन, तत्वज्ञानाच्या या नीतिविषयक अंगाकडेच त्यांचे अधिक लक्ष लागलें.

या अशा स्थितीमध्ये स्टोइक लोकांचें तत्वज्ञान प्रगट झालें. या तत्वज्ञानाचे प्रतिपादन करणाऱ्या पुरुषांनी नीतिविचारांचे व नीत्याचरणाचें महत्त्व उत्तम प्रकारे स्थापन केले. इतर सारे ज्ञान केवळ गौण असून तें नीत्याचरणास साहाय्यकारी आहे, म्हणूनच केवळ त्याचें महत्त्व आहे, एरवी त्याची मातबरी काहीएक नाही, असा जो सॉक्रेटिसाचा सिद्धांत, त्याचे समर्थन स्टोइक लोकांनी उत्तम प्रकारे केलें. बाह्य स्थिति अगदी वाईट असल्यामुळें त्यांस प्रतिपदी नाना संकटे प्राप्त होत. यास्तव खरी शांति व सुख ही आपल्या अंतर्यामाच्या सुस्थितीवर अवलंबून आहेत; त्यांचा बाह्य स्थितीशी कांहींएक संबंध नाहीं, असें स्टोइक लोकांनीच पहिल्याने प्रतिपादन केले. त्याप्रमाणेंच सर्व मानव एका कुटुंबातले असून एकमेकांचे बांधव होत, आणि ते एकाच राष्ट्राचे जानपद आहेत, असा स्टोईक लोकांनीच प्रथमतः जनांस बोध केला.

स्टोईक लोकांच्या तत्वज्ञानाची पूर्वपीठीका सांगताना आणखी एका गोष्टीचा येथे अवश्य उल्लेख केला पाहिजे. ती ही कीं, म्यासिडोनियाच्या बादशहांनीं ग्रीक राष्ट्रें पादाक्रांत केल्यापासून ग्रीक लोकांचे पूर्वेकडील राष्ट्रांतल्या लोकांशी संघटन घडून, त्यांच्या विचारपद्धतीचा थोडाबहुत प्रभाव ग्रीक विचारपद्धतीवर झाला. त्या काळी मिसरदेशांतील अलेक्झँन्ड्रियानामक शहर पूर्वेकडील व पश्चिमेकडील व्यापाराचे मुख्य नाके असून, प्राच्यांचे व पाश्चात्यांचे सर्व प्रकारचे दळणवळण येथेच मुख्यत्वेकरून होत असे. ग्रीक लोकांचा पूर्वदेशीयांशी जो संबंध घडून आला तो येथेच. याप्रमाणे प्राच्यांच्या विचारांचे ग्रीक लोकांच्या तत्वज्ञानावर पुष्कळ नवा संस्कार झाला. हा संस्कार त्या वेळच्या इतर तत्वज्ञानपद्धतीप्रमाणेच स्टोइक लोकांच्याही तत्वज्ञानपद्धतीवर झाला आहे. म्हणूनच त्यांचे कित्येक सिद्धांत आमच्या देशांतील तत्वदर्शनातल्या सिद्धांतांशी सदृश आहेत.

स्टोइक तत्वज्ञानाचा मूळप्रवर्तक झिनोनामेकरून एक पुरुष होता. हा सायप्रस बेटांतील सिटिअमनामक नगरीतला रहिवासी होता. याच्या पित्याचे नाव म्नासिअस असे असून, तो त्या शहराचा मोठा व्यापारी होता. झिनो याने हा आपल्या पित्याचा व्यवसाय काही दिवस चालविला होता. पण त्याचे लक्ष फावल्या वेळी ज्ञानसंपादनाकडे लागल्या कारणाने प्लेटो, आरिस्टॉटल इत्यादि पूर्वकालीन महातत्वज्ञाचे ग्रंथ त्याच्या वाचनात आले. याप्रमाणे तत्वविचारांकडे त्याची प्रवृत्ति झाल्यावर तो आपल्या वयाच्या तिसावे वर्षी (खिस्ती शकापूर्वी ३२० वे वर्षी) व्यापारासाठी काही माल घेऊन अथेन्सनगरीत आला. परंतु आणलेला माल विकल्यावर तो स्वदेशी परत गेला नाही. तर तेथल्या एकाद्या चांगल्या हुशार गुरूच्या साहाय्याने तत्वज्ञानाचा आणखी अभ्यास करण्याचा निश्चय करून, तो तेथेच राहिला. त्याने हा अभ्यास सतत वीस वर्षे मोठ्या आस्थेने व निश्चयाने केला. निरनिराळ्या गुरूंचे अंतेवासित्व स्वीकारून त्यांच्याकडून जितके शिकण्यासारखे होते तितके सारे तो शिकला.

याप्रमाणे दीर्घ काळ परिश्रम करून संपादिलेल्या ज्ञानाचा लाभ इतर जनांस करून देण्याच्या उद्देशाने तो ख्रिस्ती शकापूर्वी ३०० वे वर्षी स्टोआनामक एका ठिकाणी जाऊन उपदेश करूं लागला. या ठिकाणावरूनच पुढें त्याच्या अनुयायीजनांस स्टोइक हें नांव पडलें. ह्या तत्वज्ञ पुरुपाचें वर्तन अगदी निष्कपटपणाचें व परम शुद्ध असून, त्याची वृत्ति अतिशयित साधी होती; व त्याच्या अंगीं विनय, सौजन्य, प्रौढता इत्यादि गुण अप्रतिम होते. यास्तव अथेन्सनगरीतील एकंदर लोकांत त्याची फारच मान्यता झाली.

म्यासिडोनियाचा बादशहा ॲन्टिगोनस नोनाटस तर त्यास मोठाच सत्पुरुष मानी, आणि त्याची बोधपर व्याख्याने वारंवार जाऊन ऐकत असे; त्या बादशहाने झिनोह आपल्या दरबारी येऊन राहण्याची विनंती केली. पण त्या विरक्त पुरुषानें ती अमान्य करून आपल्या दोघी शिष्यांस त्याच्याकडे पाठविलें. अथेन्सनगरीतील लोकांस तो पुढें इतका पूज्य वाटू लागला होता कीं, त्यांनीं त्याची एके समयी प्रसिद्धपणें वाखाणणी करून त्याला सोन्याचा मुकुट अर्पण केला, व त्याचा पुतळा करून प्रसिद्ध ठिकाणी ठेविला. पुढें तो मरण पावला तेव्हां त्याला सिरामिकसनामक एका प्रसिद्ध ठिकाणी पुरिलें. झिनोच्या अंगीं वक्तृत्व कला मोठी वाखाणण्यासारखी नसूनही त्याच्या सद्‌बोधाचा प्रभाव असा विलक्षण होता कीं, त्याच्या हयातींतच त्याचे पुष्कळ अनुयायी झाले. त्याचें आचरण परम शुद्ध असून, त्याचे आहारविहार परिमित असल्या कारणानें तो अठ्याण्णव वर्षे जगला. एवढ्या उमरीत त्याला कधीं कसलाही रोग झाला नाहीं. एवढी त्याची प्रकृति निकोप होती. शेवटीं एके दिवशीं तो आपल्या शाळेतून बाहेर पडत असतां ठेच लागून खालीं पडला, आणि त्याच्या पायाचे एक बोट अंमळ दुखावलें. त्यासरशी त्यानें वर उठून जमिनीवर पाय आपटून म्हटले कीं, ''हे पृथ्वी, तुझें बोलावणे मला मान्य आहे.'' असे बोलून तो घरीं गेला, आणि त्यानें आत्महत्या केली.

झिनोनें पुष्कळ ग्रंथ केले होते. पण त्यांतला आतां एकही उपलब्ध नाहीं. त्याचे कित्येक त्रोटक विचार मात्र आजला उरले आहेत. झिनोच्या मागून स्टोइकमतवाद्याचें गुरुत्व क्लिआन्थिसनामक एका विद्वान् पुरुषास प्राप्त झालें. हा झिनोचा परम शिष्य असून मोठा उद्योगी व दृढनिश्चयी होता. त्याचें आचरणही शुद्ध होतें. त्यानें आपल्या गुरूच्या मताचे समर्थन व प्रसार ही उत्तम प्रकारे केला. परंतु त्यांत कांहीं भर घालण्याजोगे बुद्धिसामर्थ्य त्याच्या ठायीं नव्हते.

याच्या मागून स्टोइक लोकांचे गुरुत्व क्रिसिपसनामक एका महाविद्वान पुरुषाकडे आलें. हा झिनो व क्लिआन्थिस यांचा शिष्य असून, पुढे आपल्या बुद्धिबलेकरून व सतत अध्ययनाच्या योगाने सर्व स्टोइकमतवाद्यांत श्रेष्ठत्व पावला. त्याच्या इतका विद्वान् पुरुष त्या काळी फारच विरळा होता. या विद्वान् पुरुषाचा व्यासंग इतका प्रचंड होता की, त्यानें ७४५ ग्रंथ लिहिले होते असे म्हणतात! या ग्रंथांपैकी सांप्रत फारच थोडे केवळ अंशत: उपलब्ध आहेत. याने स्टोइक तत्वज्ञानपद्धतीत पुष्कळ भर घालून तीस बरेच पूर्णत्व आणिले. या पद्धतींत जी कित्येक दोषस्थलें होतीं, त्याचे त्यानें संशोधन करून कित्येक गूढ सिद्धांतांचें उत्तम प्रकारे उद्घाटन केलें. त्याप्रमाणेंच जे कित्येक सिद्धांत इतर मतवादी सदोष म्हणत असत, त्यांचें समर्थन त्यानें फार चांगलें केले. या कारणास्तव क्रिसिपस यास स्टोइक तत्वज्ञानाचा द्वितीय प्रवर्तक म्हणण्याचा प्रघात स्टोइक लोकांमध्यें असे. या पुरुषाच्या परिश्रमानें स्टोइक मताचा पुष्कळच पुरस्कार व प्रसार झाला.

क्रिसिपसच्या मागून डायओजेनिस हा स्टोइक मताचा मुख्य अध्यापक झाला. डायओजेनिसच्या मागून आन्टिपेटर हा अध्यापक झाला. या आन्टिपेटराचा पॅनिशिअसनामेंकरून एक शिष्य होता. त्यानें स्टोइक तत्वज्ञानाचा रोमन लोकांत प्रसार केला असें म्हणतात. यानंतर रोमनगरीमध्यें सेनेका एपिक्टेटस, मार्कस ऑरेलिअस, हिराक्लिटस आदिकरून स्टोइक मतवादी होऊन गेले. यांपैकी पहिल्या दोघांच्या ग्रंथांच्या आधाराने प्रकृत ग्रंथ रचिला आहे, हें वाचकांस कळलेच आहे. येथवर स्टोइक तत्वज्ञानाचा संक्षिप्त इतिहास सांगितला. आतां त्यांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचें कथन करूं.

प्राचीन स्टोइक लोकांची काय मते होती तें चांगलेंसें कळत नाहीं. कारण त्यांचे साद्यंत ग्रंथ असे मुळींच उपलब्ध नाहीत. जे कांहीं आहेत ते केवळ त्रोटक आहेत. रोमन लोकांत सेनेका, एपिक्टेटस, मार्कस ऑरेलिअस, हिरालटस वगैरे जे स्टोइक मतानुयायी झाले, त्यांचे मात्र ग्रंथ अद्यापि साद्यंत राहिले आहेत. परंतु या रोमन स्टोइकांचा परदेशांतील विचार पद्धतींशी परिचय घडल्या कारणानें त्यांच्या मूळ विचारांत पुष्कळ पालट झाला व कित्येक तर नवेच सिद्धांत त्यांनीं आपल्या तत्वविचारपद्धतींत सामील केले. या कारणांस्तव त्यांच्या ग्रंथांच्या आधारानें मूळस्टोइक लोकांच्या मतांचें यथावत् ज्ञान प्राप्त होण्यासारखे नाही. तरी या अर्वाचीन स्टोइकांचे मुख्यमुख्य सिद्धांत मूळतत्वपद्धतीस सोडून नव्हते. यास्तव त्यांचा पडताळा पाहून, उपलब्ध माहितीच्या साहाय्यानें झेलरनामक एका प्रसिद्ध जर्मन पंडिताने जो एक उत्कृष्ट ग्रंथ रचिला आहे, त्याच्या आधारानें आम्ही हें पुढील सार घेतलें आहे.

विशेष स्वरूप

स्टोइक लोकांच्या मतें तत्वज्ञानाच्या योगानें व्यवहारज्ञान प्राप्त व्हावें असें आहे. हें ज्ञान विवेकाच्या योगाने प्राप्त व्हावयाचें; आणि हा विवेक निसर्गक्रमास अनुसरून असावा. तत्वज्ञानाचे काम एवढेच कीं, त्याच्या साहाय्याने मनुष्यास आपलें वर्तन सुधरितां यावें. सृष्टपदार्थविज्ञान व तर्कशास्त्र यांचें जें अध्ययन करावयाचें, तें केवळ बरें काय व वाईट काय, कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें, आणि सत्य कोणतें व असत्य कोणतें हें कळण्यासाठी होय. यापलीकडे त्या शास्त्रांची मातबरीं नाहीं. त्यांच्या मते तत्वज्ञानाच्या तीन शाखा आहेत. १ तर्कशास्त्र, २ सृष्टिशास्त्र आणि ३ नीतिशास्त्र. यां पैकी पहिल्या शाखेतील त्यांचे सिद्धांत आरिस्टॉटलच्या एतद्विषयक सिद्धांतांपासून फारच थोड्या बाबतींत भिन्न आहेत. या सिद्धांताचे येथें कथन केलें असतां तें सामान्य वाचकांस दुर्बोध व रुक्ष वाटण्यासारखे असून, पुनः प्रकृत ग्रंथ समजण्यास त्या सिद्धांतांची काहीएक आवश्यकता नाहीं. यास्तव ते या उपोद्धातात वगळिले आहेत. बाकी राहिलेल्या दोन शाखांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचे निरूपण यथाक्रम करू.

सृष्टिशास्त्र

या शाखेतील आपले विचार पूर्वकालीन तत्वज्ञांनाच्या विचारांहून फारसे भिन्न नाहींत असें स्टोइक लोक म्हणत. तथापि याच एका शाखेंतले त्याचे विचार पूर्वींच्या तत्वज्ञांच्या विचारांहून बरेच भिन्न आहेत. इतर शाखातले विचार तितके भिन्न नाहींत. त्यांनीं प्रणीत केलेल्या सृष्टिशास्त्रविषयक विचारांचे चार विभाग करूं. (१) मूलभूत सिद्धांत, (२) विश्वाचा क्रम, स्वरूप व नियमन, (३) विवेकहीन निसर्ग, आणि (४) मानव.

मूलभूत सिद्धांत

या सृष्टीसंबंधानें स्टोइक लोकांचे मुख्य तीन सिद्धांत लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ते हे: (१) ही सारी सृष्टि जडस्वरूपी आहे; (२) हें समग्र जगत् चल आहे; (३) एकंदर विश्व देवरूप आहे. आतां या तिन्ही सिद्धांतांची थोडीसी फोड करू.

(एकोणसाठ)

१. सारी सृष्टि जडस्वरूपी आहे असें म्हणण्याचें कारण ते असें सांगत कीं, जीस आकारमान नाहीं, म्हणजे अर्थात् जीत जडपदार्थगत धर्म नाहींत, अशी कोणतीही वस्तु अस्तित्वांत असणें शक्य नाही. आत्मा, दैव, पदार्थांच्या ठायींचे गुणधर्म, मनोधर्म हे सारे त्यांच्या मते मूर्त होत. ते असें प्रतिपादन करीत कीं, पदार्थांच्या ठायी वायुप्रवाह आहेत, त्यांच्या योगानें पदार्थगत गुणधर्म उत्पन्न होऊन ते परस्परभिन्न झाले आहेत. मानसिक गुणधर्मही केवळ वायुरूप असून त्यांचें अधिष्ठान आत्म्याच्याठायीं आहे.

२. सर्व विश्व चल आहे असा जो त्यांचा द्वितीय सिद्धांत आहे, त्याचा अर्थ असा कीं, सर्व वस्तुजात ज्या प्रकृतीचे बनले आहे, ती केवळ निश्चल असून गुणधर्महीन आहे; तिच्या ठायीं जो गुणधर्माचा अभिनिवेश होतो, त्याचें कारण वायुप्रवाह होत आणि हे वायुप्रवाह शक्तीच्या प्रेरणेने उत्पन्न होतात. या शक्तिप्रेरणेच्या योगाने वस्तूच्या ठायीं विकास व संकोच होऊन त्यांस तें तें आकारमान प्राप्त झालें असतें. संकोचाच्या योगाने पदार्थांचे जडस्वरूप सिद्ध होतें, आणि विकासाच्या योगानें त्याच्याठायीं गुणधर्म उत्पन्न होतात. यावरून असें सिद्ध होतें कीं, समग्र चराचर विश्वाचें निमित्तकारण ही प्रेरक शक्तिच आहे; आणि एकंदर विश्वाची प्रकृति समानच असल्या कारणानें तिचे निमित्तकारणही अनन्य असलें पाहिजे, असें ते प्रतिपादन करीत. हें निमित्तकारण एकच कल्पिण्याचीं कारणें ते येणेप्रमाणें सांगत: ह्या साऱ्या विश्वाची व्यवस्था सुयंत्र चालली आहे याचे कारण एवढेच कीं, त्याचें नियमन कोणा तरी एकाच शक्तीच्या योगाने होत आहे. यास्तव सृष्टीतील एकंदर व्यापार या अनन्य शक्तीपासूनच उद्भवत आहेत. आतां हें निमित्त कारण ते अग्निरूप आहे असें प्रतिपादीत. हा तर्क ते यावरून करीत कीं, वस्तुमात्राचे पोषण व बुद्धि, जीवन व गति हि उष्णतेच्या योगानें होत असतात. प्रत्येक वस्तूच्या ठायीं उष्णता न्यूनाधिक प्रमाणाने असून तिचा उगम एका सूर्यापासूनच आहे याप्रमाणे जी गोष्ट विश्वाच्या एका अंशास लागू आहे, ती त्याच्या समग्र जगास लागू असली पाहिजे. यास्तव सर्व विस्वाचें जीवन व अस्तित्व यांस उष्णता किंवा अग्नि हाच आधारभूत आहे. हे अग्निरूप निमित्तकारण विश्वात्मा होय. आणि हा विश्वात्मा ज्ञानमय व दयामय देव होय. याच्याच सत्तेने या विश्वाचा सारा पसारा अस्तित्वांत आला आहे. सारांश काय कीं, निरवयव प्रकृति आणि अग्निरूप व ज्ञानमय ईशशक्ति यांच्या संयोगाने हें विश्व अस्तित्वांत आले आहे, असें त्याचे मत होतें.

३. आतां त्यांचा तिसरा मूलभूत सिद्धांत असा होता कीं, हें सारे विश्व अभिरूप ईशशक्तीपासून निर्माण झाले असून, त्याचा अंती या शक्तीतच पुनरपि लय व्हावयाचा. जडप्रकृति व तत्प्रेरक निमित्तकारण ही एका ईशतत्वापासून उद्भवली आहेत. यावरून पाहता हें सारे चराचर विश्व देवरूप किंवा देतापासून आविर्भूत झालें आहे, असें सिद्ध होत. या विश्वाच्या निरनिराळ्या अवस्था लक्षांत आणित त्यास जगत् म्हणावयाचे. परंतु त्याच्या एकंदर अवस्थांचे सामग्रेकरून अवलोकन केलें असता त्यास देव म्हणावयाचे आता देवास एक वेळ विश्वात्मा म्हणून पुन: विश्वरूप म्हटल्याने विरोधाभास होतो. याचे निवारण ते असें करीत कीं, आत्माजसा मनुष्यदेहामध्ये सर्वत्र संचार करीत असतो, तद्वत् या विश्वरूप प्रचंड देहाचा दैव हा आत्मा असून, त्याचा सर्वत्र सारखा संचार आहे. असें आहे तरी देहास आकारमान व गुणधर्म ही प्राप्त होतात याचे कारण अग्निरूप आत्मतत्वापासून उद्भवणारे वायुप्रवाह होत; तद्वतच हें विश्व जें आकार पावले आहे त्याचें कारण या विश्वात्म्यापासून उद्भवणारे वायुप्रवाह होत. आणखी असें कीं, या विश्वात्म्याचें जें शरीरसें आपणांस भासत असतें, तें त्या अग्निरूप तत्वापासूनच मुलारंभी उद्भवलेले असतें; आणि प्रलयसमयीं हें जड कलेवर पुनरपि त्या विश्वात्म्यामध्येच लीन व्हावयाचें.

(साठ)

सृष्टीचा क्रम, स्वरूप व व्यवस्था

सृष्टीची उत्पत्ति – आद्य अग्नि बाष्परूप पावला. या बाष्पास पुढे द्रवरूप प्राप्त झालें. या द्रवाचा एक अंश भूमिरूपाने विलग झाला; दुसऱ्या एका अंशास उदकरूप आले; आणि तिसरा अंश वायुरूप पावून वातावरण बनला. या वायूपासून पुनः अग्नि उत्पन्न होतो. याप्रमाणें पृथ्वी, आप, तेज आणि वायु या चार महातत्वांच्या संमेलनाने जगत् निर्माण झालें आहे. असें ते प्रतिपादन करीत.

सुष्टिप्रलय – या विश्वास पूर्वोक्त प्रकारें आदि आहे, त्याचप्रमाणे त्याचा अंतही व्हावयाचा. विश्वप्रकृति हळूहळू विनाश पावत जाऊन, अंती प्रचंड प्रलयाग्नि माजून सर्व वस्तुजाताचा विलय होऊन, तें आद्यस्वरूपी लीन होईल; म्हणजे अर्थात् तें सर्व विश्वाचा आदिकारण जो देव त्याच्याठायी मिळून जाऊन, केवळ अग्निरूप विश्वात्म शेष उरेल. हा सृष्टिप्रलयाचा क्रम अर्थात् सृष्ट्युत्पत्तीच्या उलट असावयाचा.

कल्प – याप्रमाणें विश्वप्रलय होऊन एक विश्वात्मा शेष रहातो न रहातो तो पुनरपि दुसरी सृष्टि निर्माण होऊ लागते. ही दुसरी सृष्टि पहिल्या सृष्टीशी सर्व प्रकारें सदृश असावयाची. अगोदरच्या सृष्टीत ज्या वस्तू व जे प्राणी निर्माण झाले असतील, तेच पुनः या दुसऱ्या सृष्टीमध्ये निर्माण होऊन एकंदर लहानमोठ्या गोष्टीही पूर्ववत् घडावयाच्या.

सृष्टीची व्यवस्था – सदरीं निर्दिष्ट केलेल्या सृष्टीच्या उत्पत्तिप्रलयकल्पनांमुळें स्टोइक लोकांच्या बुद्धीचा असा निश्चय झाला होता कीं, केव्हा काय घडेल याचा कांहीं भरवसा नाहीं. कारण एकंदर गोष्टी विश्वाच्या क्रमाप्रमाणें अवश्यक घडावयाच्या, त्यांची कार्यकारणघटना अबाधित असून तींत कदापि फेरबदल व्हावयाचा नाहीं. विश्वाच्या नियमाप्रमाणें सर्व कांहीं यथाक्रम घडावयाचें. या अखंड विश्वक्रमास ते भवितव्यता किंवा दैवगति म्हणत असत. परंतु ही विशेषणे केवळ विश्वात्म्याची वाचक होत. ते म्हणत की, या जगामध्ये कोणतीही गोष्ट योग्य कारणांवाचून घडणे नाहीं; आणि ज्या प्रकारे ती घडावयाची त्यामध्यें सहसा पालट व्हावयाचा नाहीं, कारण सर्व गोष्टींची योजना व घटना एका विश्वात्मशक्तीकडूनच होत असल्या कारणानें विश्वाच्या कार्यकारणसंबंधांत कदापि अंतराय घडावयाचा नाहीं. हा विश्वात्मा एकएका व्यक्तीची परवा मुळींच करीत नाहीं. तर त्याचें लक्ष समग्र विश्वाच्या सुव्यवस्थेकडे असतें. विश्वाची सुव्यवस्था साधनांना व्यक्तिमात्राचे जें कांहीं बरे वाईट होईल, तें तिने निमूटपणे सहन केलें पाहिजे. कारण व्यक्ति विश्वाच्या केवळ अंशरूप होत. यास्तव एकंदर विश्वाच्या कल्याणास जें आवश्यक असतें, तें त्याच्या अंशांनाही इष्ट असलें पाहिजे.

सृष्टीचे स्वरूप– या विश्वातील प्रत्येक वस्तु एकाच दैवी शक्तीपासून उद्भवली असल्या कारणानें त्याची रचना सुव्यवस्थित व निर्दोष असून, त्याचे निरनिराळे अंश परस्परांशीं स्नेहपाशांनीं बद्ध आहेत, असें स्टोइक लोक म्हणत. ही जगाची सुव्यवस्था व निर्दोषता ते अनेक प्रमाणांनीं सिद्ध करीत. त्यांतूनही मुख्यतः सृष्टिसौंदर्याची व प्राण्यास हितकर अशा अनेकविध योजनांची उदाहरणे ते देत. आतां जगांतील सारी व्यवस्था प्राणिमात्राच्या कल्याणासाठीं आहे म्हणावी तर जगांत अनिष्ट दृष्टोत्पत्तीस येतें तें कां? या प्रश्नाचें उत्तर ते असें देत कीं, एकंदर विश्वाची सुव्यवस्था व कल्याण साधण्यासाठी किरकोळ बाबतींत हें अनिष्ट आवश्यक आहे. हें अनिष्ट मुख्यत: तीन प्रकारचे आहे. एका प्रकारांत शारीरिक अनिष्ट येतें; दुसऱ्या

प्रकारांत मानसिक अनिष्ट मोडते; आणि तिसऱ्या प्रकारांत नीत्याचरणास बाह्यस्थितीची जी प्रतिकूळता तिचा अंतर्भाव होतो. पहिल्या प्रकाराविषयी त्यांचें असें म्हणणें असे कीं, हें मुळीं अनिष्टच नव्हे. उदाहरणार्थ शरीरास होणारा रोग; हा नैसर्गिक कारणांमुळें उद्‌भवत असून अपरिहार्य आहे. कारण निसर्गास कांहीं विवक्षित हेतू सधावयाचा असल्या कारणानें ही कारणपरंपरा अस्तित्वात आलेली असते. तीमुळे कांहीं व्यक्तींस अपाय घडला तर तो कांही जमेस धरावयाचा नाहीं. दुसरें असें कीं, कित्येक गोष्टीचा आपण भलताच उपयोग करितो, म्हणून त्या अनिष्टशा वाटतात; व कित्येक तर अतिशयित हिताच्या असतां आपणांस त्या भ्रमानें अनिष्टशा दिसतात. आतां मानसिक अनिष्टासंबंधाने त्यांचें असें म्हणणें असे कीं, मनुष्याच्या ठायीं दुर्वृत्ति किंवा दुराचार जो आहे तो सारा मनुष्याच्या दोषांमुळे आहे. तो मनावर घेईल तर त्यापासून त्यास सहज मुक्त होतां येईल. दुसरें असें कीं, सदाचार आहे तेथें दुराचार अवश्य असला पाहिजे, एरवी सदाचाराचे महत्त्व वाटणार नाहीं. आणखी असें कीं, हा दुराचार अंती ईशकृपेने नाहीसा व्हावयाचा आहे आतां नीत्याचरणास बाह्य स्थितीची प्रतिकूलता एतद्रूप जें तिसरे अनिष्ट त्याच्या संबंधानें त्यांचें असें म्हणणे असे कीं, जो सदाचारी आहे त्यास वास्तविक अनिष्ट असें कांहींच घडावयाचें नाहीं आणि जो दुराचारी आहे त्यास खरें सुख कदापि लाभावयाचें नाहीं. सदाचारी मनुष्यावर लोकदृष्टीने जे कांहीं अनिष्ट प्रसंग येतात, ते एक तर निसर्गक्रमानुसार येत असतात; व दुसरें असें कीं, ते प्राप्त झाल्याने त्याचे सद्गुण चांगले कसास लागून दृढ होतात. असा विवेक करून ज्ञात्या मनुष्याने या प्रसंगांमुळे चित्त व्यग्र होऊं देऊ नये.

विवेकहीन निसर्ग

सर्व वस्तुजाताची प्रकृति जड आहे, ह्या स्टोइक लोकांच्या सिद्दांताचें निरूपण पूर्वी केलेंच आहे. जेवढा जड निसर्ग आहे तेवढ्या साऱ्याचे भागप्रतिभाग अमर्याद होऊ शकतात. विश्वातील एकंदर वस्तूंमध्ये एकसारखा पालट होऊन त्यांच्या प्रकृतीमध्ये रूपांतर होत आहे. हा सर्व फेरफार गतीच्या योगाने होत आहे. ही गति पूर्वोक्त प्रेरकशक्तीच्या योगाने प्राप्त झाली असते. सृष्टीतील एकंदर वस्तूकडून घडणाऱ्या क्रिया व त्यांवर घडणारे परिणाम यांची उत्पत्ति या गतीमध्येच आहे, असें ते प्रतिपादन करीत.

आतां अवकाशाच्या संबंधानें त्यांचें म्हणणें असें होतें कीं, जडवस्तूने व्यापिलेले जें स्थल तेवढाच काय तो अवकाश म्हणावयाचा; याव्यतिरिक्त इतर सारी पोकळी होय. हें विश्व जड प्रकृतीचे बनले असल्या कारणानें अवकाशाची मर्यादा या विश्वाइतकी असून, त्याच्या पलीकडे अमर्याद पोकळी आहे. यावरून पाहता अवकाश म्हणजे कांहीं वस्तु आहे असें ते मानीत नव्हते. याप्रमाणेंच काळही ते अमूर्त समजत. काळाची व्याख्या ते अशी करीत कीं, जगाच्या व्यापारांचे जें परिमाण तोच काळ होय.

स्टोइक लोकांच्या मते हें विश्व पृथ्वी, आप, अग्नि आणि वायु या चार महाभूतांचे बनले आहे, हें मागें सांगितलेंच आहे. आतां ह्या तत्वांसंबंधानें येथें आणखी एवढेच सांगावयाचे कीं, अग्नि आणि वायु ही महाभूते हलकी असल्याकारणाने तीं विश्वाच्या मध्यापासून दूरदूर जातात; आणि पृथ्वी व आप ही जड असल्यामुळें तीं विश्वाच्या मध्याकडे येतात. याप्रमाणे विश्वाचे मध्यापासून परिघापर्यंत चार थर आहेत;

पहिला पूथ्वीचा, दुसरा उदकाचा, तिसरा वायूचा आणि चवथा अग्नीचा. विश्वाच्या मध्यभागीं भूगोल आहे. या भूगोलासभोवती उदकाचे आवरण आहे. या उदकाच्या थरावर वातावरण आहे. हा एवढा विश्वाचा गर्भ असून तो निश्चल असतो. याच्या सभोवार अग्नितत्व विरलत्वानें फिरत असतें. यास स्टोइक लोक इयर म्हणत. याच विरल तत्वांत तारे अडकविलेले आहेत. या ताऱ्यांचे पुन: निरनिराळे थर आहेत. पहिल्या अगदीं वरच्या थरांत स्थिर तारे आहेत. त्याच्या खालीं ग्रहांचा थर आहे. या दुसऱ्या थरांत शनि, बृहस्पति, मंगळ, बुध, शुक्र, सूर्य आणि चंद्र असे एकाखाली एक आहेत. हे थर एकास एक लागलेले आहेत. ताऱ्यांच्या संबंधाने त्यांची अशी कल्पना होती की, ते अग्निरूप तत्वाचे गोल असून त्यांचें पोषण उदक व भूमि यापासून उद्भवणाऱ्या वाफांच्या योगानें होत असतें. हे तारे विवेकसंपन्न दैवी विभुति आहेत. कारण ते आपआपल्या कक्षा सोडून न जातां नियत परिभ्रमणें विलक्षण नेमस्तपणाने करितात. पुनः ते ज्या तत्वाचे बनले आहेत तें तत्वही अत्युच्च प्रतीचे असून विवेकमय आहे. पृथ्वीच्या संबंधाने त्यांची कल्पना अशी होती कीं, तिच्या ठायीं जीवात्म्याचे सर्वत्र स्फुरण होत आहे. एरवी जीवविशिष्ट अशा उभ्दिज्ज कोटि आणि प्राणिकोटि यांचें उत्पादन तिजपासून होतेना. त्याप्रमाणेंच तारागणांसही तिच्यापासून पोषण प्राप्त झालें नसतें. त्यांचा एकंदरींत असा सिद्धांत होता कीं, या सर्व विश्वाचा आत्मा अनन्य असून त्याचा सर्वत्र सारखा संचार आहे.

स्टोइक लोक या विश्वातील एकंदर वस्तुजाताचे चार वर्ग करीत. एक निरिंद्रिय वस्तूंचा; दुसरा वनस्पतींचा; तिसरा प्राण्याचा; आणि चवथा विवेकयुक्त प्राण्यांचा. या वगा(पासष्ट)वाय ५३८-५(चौसष्ट)ंच्या संबंधाने त्यांनीं कांहीं दिशेष सविस्तर लिहून ठेवलेले आढळत नाहीं.

मानव

स्टोइक लोक जडवादी असल्या कारणानें मानवाचा आत्माही जड तत्वाचाच बनला आहे, असें ते मानीत. याचे कारण ते असे सांगत कीं, ज्याचा देहावर परिणाम होतो, आणि ज्यावर देहाचा परिणाम होतो. त्याप्रमाणेंच ज्याचा देहाशी संयोगवियोग होतो, तो जड पदार्थाचाच बनला असला पाहिजे. त्याचप्रमाणे आत्मा सर्व देहामध्ये सारखा स्फुरण पावत असतो; यास्तव त्याला परिमिति अवश्य असली पाहिजे. परंतु ज्यास परिमिति आहे तो जडस्वरूपी असलाच पाहिजे. आणखी असें कीं, प्राणांचे धारण व संवर्धन केवळ प्राणवायूच्या योगाने होत असतें. त्याचप्रमाणे मानसिक गुणधर्म जे आहेत, ते सारे या देहाच्या विवक्षित स्थित्यनुरूप उत्पन्न होत असतात; यास्तव मन म्हणजे केवळ प्राण्यांच्या ठायींचा एक उष्ण श्वास आहे; आणि आत्मा अग्निरूप किंवा श्वासरूपच आहे. हा आत्मा देहांत सर्वत्र संचरत असून, त्याच्या योगाने देहाच्या निरनिराळ्या अवयवांचा संयोग होऊन, त्यांचें एकत्र धारण झालें आहे; कसें? तर जसें विश्वात्म्याचा सर्व विश्वांत संचार होत असल्या कारणानें अखिल विश्वाचे एकत्र धारण झालें आहे तसें. आतां ह्या उष्णश्वासरूप आत्म्याचा देहांतील रुधिराशी संबंध असून, रूधिरांतून उद्भवणाऱ्या वाफांच्या योगानें त्याचें पोषण होत असते: कसें? तर जसे तारागणांचें पोषण पृथ्वीपासून निघणाऱ्या वाफांच्या योगाने होत असतें तसें.

आता या आत्म्याच्या उत्पत्तीसंबंधानें त्याचे असें म्हणणे होतें कीं, मातेच्या ठायीं संभवणाऱ्या गर्भात पित्याच्या व मातेच्या ठायींचे जसे इतर धर्म स्थापित होतात, तद्वत्च त्यांच्या ठायींचें आत्मतत्वही त्या गर्भात प्रविष्ट होतें. ह्या आत्म्याचें अधिष्ठान उरांत आहे असें ते प्रतिपादीत. येथून हा आत्मा आपल्या ठायींच्या वायुप्रवाहांच्या योगाने देहाच्या सर्व अवयवांमध्यें संचार पावून त्या त्या अवयवांचे व्यापार चालवीत असतो. या निरनिराळ्या व्यापारांस्तव ते आत्म्याचे सात विभाग करीत. ते हे: पांच ज्ञानेंद्रियें, एक जननेंद्रिय व एक वाचेचे इंद्रिय. याशिवाय या सर्वांचे नियमन करणारी जी बुद्धि ती निराळी आहे. ही बुद्धि किंवा विवेक प्रधान व आद्यशक्ति असून इतर शक्ति तीजपासून उद्भवतात.

आतां हा मनुष्याचा आत्मा विश्वात्म्याचा अंशरूप होय. आम्हा मानवांच्या आत्मतत्वाच्या ठायीं विवेकरूप दैवी अंश असल्या कारणानें आपला देवाशी विशेष प्रकारचा संबंध आहे. तेव्हां या दैवी अंशाचा आपल्या ठायीं जितका अधिक उत्कर्ष होईल, तितका देवाशीं आपला अधिक निकट संबंध जुळणार आहे; आणि प्रत्येक कल्पाच्या अंतीं हा जीवात्मा विश्वात्म्यास जाऊन मिळणार आहे. आतां सर्वच जीवात्मे जगत्प्रलयापर्यंत कायम राहून मग विश्वात्म्याच्याठायी लीन व्हावयाचे किंवा कसें, याविषयीं मात्र स्टोइक लोकांच्या बुद्धीचा काहीएक निर्णय झाला नव्हता. क्लिआन्थिस हे सर्व आत्मे शेवटपर्यंत रहावयाचे म्हणे; आणि क्रिसिपस याचा असा समज होता की, फक्त ज्ञानी पुरुषांचे आत्मे कल्पांतापर्यंत कायम रहावयाचे.

नीतिशास्त्र

मागे सांगितलेच आहे कीं, स्टोइक लोक नीतिशास्त्रास प्राधान्य देऊन तर्कशास्त्र व सृष्टिशास्त्र यांचें अध्ययन ते नीतिशास्त्राच्या अध्ययनास बुद्धि योग्य व्हावी म्हणून करीत. यास्तव तत्वज्ञानाच्या याच शाखेमध्यें त्यांचें बुद्धिसर्वस्व प्रकट झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

झेलर याने या त्यांच्या नीतिविषयक विचारांचें वर्गीककरण पुढीलप्रमाणें केलें आहे. (१) नीतिशास्त्रासंबंधी तात्विक विचार, आणि (२) व्यवहारदृष्ट्या या तात्विक विचारांत झालेलें रूपांतर. आतां नीतिशास्त्रासंबंधी तात्विक विचारांत मुख्य तीन गोष्टींचा विचार प्रसक्त होतो. (१) परम कल्याण, (२) वृत्ति आणि सदाचार, आणि (३) ज्ञानी पुरुष.

परम कल्याण

स्टोइक लोक म्हणत कीं, खरें कल्याण विवेकशुद्ध आचरणात आहे; आणि विवेकशुद्ध आचरण तोच सदाचार होय. आतां जें आचरण निसर्गास अनुसरून असतें, तेंच विवेकशुद्ध समजावयाचे. प्रत्येक प्राण्याचा स्वाभाविक कल म्हटला म्हणजे आत्मसंरक्षण व आत्मतृप्ति यांकडे असतो. ज्या गोष्टी त्याच्या निसर्गास अत्यंत हितावह असतात, त्यांच्याच प्राप्तीसाठी तो सर्वदा उद्युक्त असतो. यावरून पाहता जें निसर्गास अनुसरून असतें, तें परम कल्याण होय. परंतु जें विश्वक्रमास अनुसरून नसतें, तें प्रत्येक व्यक्तीच्या निसर्गास अनुसरून आहे असें कदापि म्हणतां यावयाचे नाहीं. हाच नियम विवेकयुक्त प्राणी जो मनुष्य त्यासही लागू आहे. मनुष्याचा वास्तविक निसर्ग म्हटला म्हणजे विवेक होय. यास्वव जें विवेकास अनुसरून असतें, तेंच मनुष्याच्या परम कल्याणाचें होय. परंतु हा मानवी विवेक ज्या मानाने विश्वक्रमास अनुसरून असेल, त्या मानानें हें परम कल्याण मनुष्यास लाभावयाचें. तेव्हां एकंदरींत काय की, विश्वक्रमास अनुसरून जें

विवेकशुद्ध आचरण, ज्यास सदाचार असें म्हणावयाचें, तेंच परम कल्याण होय. सदाचाराव्यतिरिक्त कांहींएक कल्याणप्रद नाहीं; आणि सदाचारामुळे काहीएक अकल्याण व्हावयाचें नाहीं. तेव्हां कल्याण व अकल्याण ही बाह्यगोष्टींवर अवलंबून आहेत असें मानणे योग्य नव्हे, तर त्यांचा मनुष्याच्या आचरणाशीच सर्वथा संबंध आहे.

कल्याण व अकल्याण – स्टोइक लोकांचा असा सिद्धांत होता कीं, ज्यास कल्याण म्हणावयाचें तें सापेक्ष नसावे. म्हणजे अर्थात् असें कीं, ज्याच्या योगाने दुसरी कोणती तरी इष्ट गोष्ट सिद्ध होते, किंवा जें इतर इष्ट वस्तूंशी तुलना करून पाहता अधिक इष्टतर वाटण्यासारखे असतें, त्यास कल्याण म्हणणें योग्य नव्हे. त्याचप्रमाणे कल्याण व अकल्याण यामध्ये जें भिन्नत्व आहे, तें केवळ तारतम्यावरूनच सिद्ध होतें असें नाहीं. तर कल्याण व अकल्याण यांच्या मुळीं जातिच परस्पर विसदृश आहेत. जें मूळचेच कल्याणप्रद नव्हे, तें इतर गोष्टींच्या तुलनेने कल्याणप्रद होऊं शकत नाहीं. तद्वत्च जें मूळचेंच अकल्याणकारक नव्हे, तें इतर गोष्टींच्या तुलनेने तसें आहे असें म्हणतां येत नाहीं. इतर साऱ्या गोष्टींचा आमच्या स्थितीवर केवढाही मोठा परिणाम घडला तरी त्या कल्याणकारकही नव्हत व अकल्याणकारकही नव्हत. उदाहरणार्थ आरोग्य, दौलत, कीर्ति व जीवित्व, आणि यांच्या उलट अवस्था म्हटल्या म्हणजे आजार, दारिद्र्य, अपकीर्ति व मरण ह्या बाह्य गोष्टी इष्टानिष्ट म्हणता येत नाहींत. या सिद्धांताच्या समर्थनार्थ ते असें प्रतिपादन करीत कीं, ज्या गोष्टी दैवगतीवर अवलंबून असून, ज्यांची प्राप्ति, कधीं कधीं सदाचाराचा भंग होऊन, घडण्यासारखी असते, त्या कल्याणप्रद आहेत असें कोण म्हणेल? पुन: या बाह्य गोष्टींचा मनुष्याच्या नैतिकवृत्तीशीं मुळीच संबंध नसतो. सदाचाराच्या योगाने मनुष्यास जर सौख्य प्राप्ति झालें पाहिजे, तर तें परिपूर्ण असून स्वतांच्या अंतर्यामापासूनच उद्भवलें पाहिजे. कारण ज्या गोष्टी मनुष्याच्या हातच्या नव्हत, त्यांच्या योगाने त्याचें सौख्य न्यूनाधिक झालें तर तेवढ्या मानानें सदाचाराचे महत्त्व कमी होऊन, मनुष्याच्या मनास अखंड शांति कदापि प्राप्त व्हावयाची नाहीं; आणि अशी शांति प्रा(सदुसष्ट)(सहासष्ट)जनक असतात, त्या स्टोइक लोकांच्या मते कल्याणप्रद नव्हत. जो आनंदप्राप्तीसाठी प्रयत्न करितो, त्याच्याकडून सदाचाराकडे दुर्लक्ष होतें. त्याच्या चित्तांत सदाचाराचे खरें महात्म्य ठसत नाही. तो आपल्या हातून घडणाऱ्या कृत्यांची परवा न करितां केवळ आपल्या इंद्रियांस घडणाऱ्या सुखानुभवाकडेच विशेष लक्ष पुरवितो. परंतु ही सुखाभिलाषाची वृत्ति विवेकसंपन्न मानवास मुळींच शोभत नाहीं. नुसत्या ग्राम्यसुखाची लालसा धरिल्यानें मनुष्याच्या ठायीं पशुवृत्ति विकास पावून त्यास नीचत्व प्राप्त होतें. यास्तव आनंदप्राप्तीसाठी झटणें आम्हां मानवास कदापि उचित नव्हे. सदाचारापासून आनंद प्राप्त होतो, म्हणून सदाचाराचा अवलंब करावा असें कोणी म्हणेल तर तेही योग्य नव्हे. सदाचाराच्या योगाने एका प्रकारचे समाधान, उल्हास व शांति ही प्राप्त होतात हें खरें आहे. या दृष्टीने पाहतां खरा आणि शाश्वत आनंद कोणता हें एका ज्ञानी पुरुषासच समजते. असें आहे तरी सदाचरणाच्या योगाने आनंद प्राप्त होण्यासारखा असतो म्हणून आपण सदाचरण करावें असें कोणी म्हटल्यास तें योग्य नव्हे. तर तो सदाचरणाचा केवळ स्वाभाविक परिणाम आहे असें समजून, त्यासंबंधानें मनुष्याने उदासीन रहावे.

त्याचप्रमाणे आनंद व सदाचार ही परम कल्याणाची दोन अंगे आहेत असेही समजता कामा नये. आनंद व सदाचार यांची मुळी जातिच भिन्न आहे. कारण आनंद दुराचारानेंही प्राप्त होण्यासारखा असून,

सदाचारी मनुष्यास कधीकधी नाना प्रकारची दुःखे व संकटे सहन करावी लागतात. आनंद क्षुल्लक, क्षणभंगुर व चित्ताची दुर्बलता वाढविणारा असतो. परंतु सदाचाराच्या योगाने चित्तास स्वास्थ्य प्राप्त होऊन तें थोर व दृढ होतें. जे बाह्य सुखानंदामध्ये कल्याण आहे असें मानितात, ते सुखानंदाचे अगदीं दास बनतात. परंतु जे सदाचारसंपन्न असतात, त्यांस सदाचाराव्यतिरिक्त अन्य कशातही कल्याण आहे असें न वाटून, ते बाम्हसुखानंदवासनेचें दमन करितात. तेव्हां सारांश काय कीं, सदाचाराच्या योगाने खरें सौख्य प्राप्त होतें. त्यास इतर कशाचीही अपेक्षा नाहीं; सदाचार निसर्गक्रमास अनुसरून असतो, म्हणूनच तो स्पृहणीय आहे; आणि दुराचार निसर्गक्रमास सर्वथा विरुद्ध असतो, म्हणून तो त्याज्य आहे इतकेंच. त्यांचा बाह्य सुखदुःखाशी बिलकुल संबंध नाहीं. जो कोणी विवेकबलेंकरून मनोनिग्रह करील, त्यास बाह्य स्थितीची मुळीच परवा वाटणार नाही; तर तो सर्वथा स्वतंत्र होऊन त्याची समाधानवृत्ति कायम राहील.

सौख्याचे स्वरूप– सदाचारी मनुष्यास जें सौख्य प्राप्त होतें तें कांहीं भावरूप नसतें. सदाचारापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदांत तें असत नाहीं; तर मनाचे स्वातंत्र्य व शांति यांतच ते असतें. मनाचे अस्वास्थ्य तीच विपत्ति; आणि मनाचे स्वास्थ्य तें सौख्य. अंगी धैर्य असल्यामुळें ज्याचें भय आणि चिंता यांपासून रक्षण होतें, आणि मनोनिग्रहाच्या योगाने ज्यास ग्राम्यसुखलालसा व तृष्णा यांचे दमन करितां येतें, त्याच्या सौख्यात कोणती न्यूनता असणार? जो दैवावर भरंवसा ठेवून न राहता, केवळ आत्मावलंबी असतो, त्यास पूर्ण सुखाचा अनुभव घडतो. सेनेका म्हणतो की, 'मनाच्या अस्वास्थापासून सर्वथा मृत होण्याची योग्यता ज्ञानी पुरुषाच्याच ठायी असते. ज्ञानाचा उपयोग मिळून इतकाच की, त्याच्या योगाने मनुष्याला या संसारात कसलीही भीति उरत नाही; व तो कोणत्याही प्रकारच्या संकटप्रसंगास जुमानीत नाही. एकंदरीत काय की, मनाचे अढळ स्वास्थ्य, पूर्ण निर्भयता व प्रबल मनोनिग्रह यांतच सदाचारी पुरुषास खरे सौख्य प्राप्त होते.'

परम कल्याण निसर्गनियमरूप आहे – कल्याण जे आहे ते विश्वाच्या व्यवस्थेवर एकंदर अवलंबून असून, व्यक्तिमात्र या व्यवस्थेच्या सर्वस्वी आधीन आहे. यास्तव ही विश्वाची व्यवस्था त्या नियमांच्या योगाने चालली आहे, तो कल्याणरूप होय असा नीतिशास्त्र प्रणेत्यांचा सिद्धांत आहे. स्टोइक लोकांना तर हा सिद्धांत पूर्णपणे संमत असून, ते त्याचें प्रतिपादन मोठ्या उत्साहाने करीत असत. ते आणखी असें म्हणत कीं, या सर्व विश्वाचे नियमन विवेकाच्या योगाने होत असून, तोच समग्र वस्तुजाताचा नियम आहे; आणि हा विश्वाचा विवेक तोच देव होय. असा त्यांचा सिद्धांत असल्या कारणानें साऱ्या निसर्गाचा नियम देवरूप समजावा असें ते म्हणत. याप्रमाणे निसर्गनियम देवरूप आहे, असें ज्याच्या ध्यानांत येतें, तो तदनुसार वर्तण्यांतच स्वकल्याण आहे असें मानितो. नीतीच्या एकंदर नियमांचा उद्भव या रीतीनें झाला आहे, अशी मनाची खात्री झाल्याने मनुष्य त्यापासून कदापि पराङ्मुख व्हावयाचा नाहीं. एकंदर विवेकसंपन्न प्राण्यास या नीतिनियमाप्रमाणे वागलेच पाहिजे. नीतिनियमाप्रमाणें वागणे हें आपलें परम कर्तव्य आहे असें जो समजत नाहीं, त्यास विवेकी म्हणणें योग्य नव्हे. दुसरें असें कीं, मनुष्य निसर्गतःच नीतिनियमानुसरण करण्यास बांधला गेला आहे. कारण मानवी निसर्ग एकंदर विश्वाच्या निसर्गाचा एक अंश आहे. यासाठी विश्वाच्या निसर्गास जें अनुसरून असतें, तें मानवी निसर्गासही अवश्य अनुसरून असलें पाहिजे. मनुष्याच्या मनांत कल्याणाविषयी इच्छा व अकल्याणाविषयी तिरस्कार उत्पन्न होणें स्वामाविक आहे. पण हें कल्याण निसर्गनियमास अनुसरल्यावाचून म्हणजे नीत्याचरण केल्यावाचून प्राप्त होणे नाहीं. यास्तव सदाचाराकडे विवेकी मनुष्याची प्रवृत्ति होणे केवळ स्वाभाविक आहे.

(सहासष्ट)

वृत्ति आणि सदाचार

वृत्तीचे स्वरूप– सदरीं सांगितलेली नैसर्गिक सदाचारप्रवृत्ति केवळ विवेकसंपन्न पुरुषाच्या ठायीं संभवते. परंतु सर्वच मनुष्य शुद्धविवेकयुक्त असतात असें म्हणवत नाहीं. त्यांच्या ठायी जशा विवेकास अनुसरून प्रेरणा होत असतात, तशाच विवेकास विरुद्धही प्रेरणा होत असतात. मनुष्य जात्या सदाचारी असत नाहीं. तर तो आपल्या वृत्तीचे दमन करून सदाचारी बनतो. विवेकाच्या किंवा निसर्गाच्या विरुद्ध जी मनाची धाव तिला वृत्ति किंवा वासना म्हणतात. सर्व वृत्ति विचारदोषांमुळें व कल्याणाकल्याणाविषयींच्या असत्कल्पनांमुळें उद्भवतात. यास्तव या वृत्तीस भासमय कल्पना म्हटल्यास चालेल. उदाहरणार्थ लोभ जो आहे तो द्रव्याच्या योग्यतेविषयी असत्कल्पनारूप होय; भय जें आहे तें भावी स्थितीविषयी असत्कस्पनारूप होय; खेद जो आहे तो वर्तमान कालच्या अनिष्टाविषयीं असत्कल्पनारूप होय. या वृत्तीचे दमन करण्याचें आपल्या हातीं आहे. तरी त्या नुसत्या ज्ञानानें निर्मूल होणाऱ्या नव्हत. मनोनिग्रहावाचून त्यांचें निवारण होणार नाहीं.

वृतींचे प्रकार– असत्कल्पनेमुळें वृत्तीचा संभव होत असल्या कारणानें जितक्या प्रकारची असत्कल्पना असते तितके वृर्तीचे प्रकार संभवतात. असत्कल्पनेचे व म्हणून अर्थात् वृत्तींचे चार प्रकार आहेत. (१) कल्याणाविषयीं विवेकविरुद्ध कल्पना असल्या कारणानें वर्तमान कालच्या गोष्टीविषयीं आनंदवृत्ति उद्भवने; (२) व भविष्य कालच्या गोष्टींविषयीं आशावृत्ति संभवने; (३) वर्तमान कालच्या अनिष्ट गोष्टींविषयी खोटी कल्पना मनांत आली म्हणजे चिंतावृत्ति उत्पन्न होते; (४) आणि भावी अनिष्ट गोष्टींविषयींच्या असत्कल्पनेमुळें भयवृत्ति निर्माण होते. या वृत्तिचतुष्ट्याचे स्टोइक लोकांनी आणखी पुष्कळ भागविभाग केले आहेत. परंतु त्यांचें येथें निरूपण करून, म्हा उपोद्घाताची मर्यादा वाढविणे युक्त दिसत नाहीं. एकंदरींत या वृत्तींच्या संबंधाने स्टोइक लोकांचें असें म्हणणें होतें कीं, त्यांच्या योगाने चित्ताची समता नष्ट होऊन आत्म्याच्या इतर सात्विक शक्तींस व्याघात होतो; मनुष्य विवेकभ्रष्ट होऊन नानाप्रकारची अनन्वित कर्मे करण्यास प्रवृत्त होतो; त्याच्यापायी मानसिक स्वास्थ्य नष्ट होऊन मनुष्य सन्मार्गच्युत होतो; आणि त्यांस वारंवार वश झाल्याने त्यांचा पगडा मनुष्याच्या चित्तावर बसून त्या दुर्जय होतात. यास्तव त्यांचें सर्वथा निर्दालन करणें इष्ट होय. ज्याच्या चित्तांतून वृत्तींचे पूर्णपणे निर्मूलन झालें आहे, त्याच्याच ठायीं सदाचारवृत्ति उत्पन्न होते. वस्तुमात्राचें वास्तविक स्वरूप व योग्यता काय आहे व निसर्गक्रम कसा सर्वथा अबाधित आहे, याचे ज्ञान मनुष्यास झाल्यानें ह्या वृत्तींस तो कदापि वश व्हावयाचा नाहीं. ज्ञानी पुरुष सर्वस्वीं वृत्तिहीन असावा. त्याला कोणत्याही कारणामुळें पीडा झाली तरी तीमुळें तो त्रस्त होणार नाहीं. कारण ती तो अनिष्ट मानीत नाहीं. त्याची कोणी निंदा किंवा उपहास केला असतां त्यापासून त्यास दुःख किंवा कमीपणा वाटणार नाहीं. त्याला मानापमानाची चाड नसल्यामुळें अभिमानवृत्तीचा गंधही त्याच्याठायीं नसतो. तो कदापि क्रोधवश होत नाहीं. याप्रमाणे एकंदर वृत्तीपासून ज्ञानी पुरुष मुक्त असतो.

नीतीचे स्वरूप– वरती वृत्तीचे निर्मूलन करावे असें जें सांगितलें, त्यावरून स्टोइक लोकांच्या मताप्रमाणें नीतीचे निषेधरूप लक्षण सिद्ध होते. आतां त्यांच्या समजुतीप्रमाणे नीतीचे विधिरूप लक्षण कोणतें तें पाहूं. तें अर्थात् असें की, मनुष्याने आपलें आचरण निसर्ग नियमास अनुसरून ठेवावे, आणि

विवेकबलेंकरून मनाचा सर्वदा निग्रह करावा. नीति म्हटली म्हणजे ती सर्वस्वी विवेकावर अवलंबून आहे; किंबहुना ती केवळ शुद्ध विवेकरूपच होय, नीतीची अंगें दोन: एक विचार आणि दुसरें आचार. सर्व विवेकशुद्ध आचरणाच्या मुळाशी सत्यज्ञान आहे. फार काय पण सत्यज्ञान तोच सदाचार आणि अज्ञान तोच दुराचार असून, सदाचार शिक्षणाने प्राप्त होणारा आहे, असें ते प्रतिपादन करीत. याप्रमाणे नीति केवळ ज्ञानरूप आहे असें जरी ते म्हणत, तरी ते ज्ञानाला प्राधान्य देत नसत. त्यांच्या मते ज्ञान जे आहे तें विवेकशुद्ध आचरणात साधनीभूत आहे. ज्ञानाच्या योगाने मनाला सुस्थिति प्राप्त होऊन त्याच्या ठायीं विवेकबल विकसित होतें; आणि तेणेंकरून मनुष्यास स्वनिसर्गास अनुसरून वर्तन करण्याचें सामर्थ्य येतें. याप्रमाणे त्याच्या ठायी सामर्थ्य प्रतीत झाल्यावर त्याने त्याचा विनियोग अहर्निश सत्कर्माकडे करावा. सदाचारावांचून नुसत्या ज्ञानाचा काहीएक उपयोग नाही. ज्ञान आणि सदाचार ही परस्परावलंबी असून आत्म्याचे प्रधान धर्म होत.

नीतीचे निरनिराळे प्रकार– स्टोइक लोक नीतीचे मुख्य चार प्रकार मानीत. ते हेः विवेक, धैर्य, न्याय आणि मनोनिग्रह. विवेकाच्या योगाने बरें कोणतें, वाईट कोणते, व कोणतें बरेही नव्हे व वाईटही नव्हे, ते कळते. धैर्याच्या योगाने कोणत्या गोष्टीस भ्यावे, कोणत्या गोष्टीस भिऊ नये, व कोणत्या गोष्टीविषयी बेपरवा असावे हे समजते. न्यायाच्या योगाने प्रत्येक जणाचें जें वाजवी देणे असेल, तें त्यास कसें द्यावे याचें ज्ञान होतें, आणि मनोनिग्रहाच्या योगाने कोणत्या गोष्टीचा अंगीकार करावा व कोणत्या गोष्टीचा अव्हेर करावा हें ध्यानात येतें. त्याचप्रमाणें मुख्य मुख्य दुराचारांचा उद्भव अज्ञानाच्या योगाने होतो असें ते प्रतिपादन करीत. हे असे नीतीचे प्रकार ते कल्पीत, तरी त्यांचा सिद्धांत असा होता कीं, नीति केवळ एकरूप आहे. तीत जें भिन्नत्व दिसून येतें, तें केवळ बाह्य विषयांच्या संबंधामुळे होय. वस्तुत: पाहता सर्व नीतिप्रकारांचा हेतु मिळून एकच आहे. आतां हा हेतु त्या त्या नीतिप्रकाराच्या योगानें निरनिराळ्या प्रकारें सिद्ध होतो इतकेंच काय तें. हे नीतिप्रकार परस्परावलंबी असून त्यांचा परस्परांशीं अतिनिकट संबंध आहे. जेथें एक सद्गुण असतो तेथे इतरही सद्गुण अवश्य आढळावयाचे. त्याचप्रमाणें जेथे एक दुर्गुण आढळतो तेथें इतरही सारे दुर्गुण असावयाचे. सर्व सदाचार किंवा दुराचार आपल्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. मनामध्ये सद्धेतु उत्पन्न झाल्यावर मग तो हातून सिद्ध झाला नाहीं, तर तो सदाचाररूप समजावा. त्याचप्रमाणे मनामध्ये दुष्ट वासना उत्पन्न झाल्यावर मग तीप्रमाणे हातून कुकर्म घडले नाहीं, तरी ती दोषरूप होय. मनुष्याच्या हातून घडणारें कर्म पाहूनच तें सत् किंवा असत् आहे असें म्हणतां कामा नये, तर तें कोणत्या बुद्धीने कर्त्याच्या हातून घडले आहे याचा विचार करून मग त्यास काय तें नांव ठेवावे. तेव्हां सारांश काय कीं, ज्याच्या ठायीं नीतिमत्ता पूर्णपणे बाणलेली असते, त्याच्याच हातून खरा सदाचार घडावयाचा. ही नीतिमत्ता त्यांच्या मते एकतर मनुष्याच्या ठायीं पूर्णपणे वसत असली पाहिजे, किंवा ती मुळीच नसली पाहिजे. कारण नीतिमत्ता अखंड असल्या कारणानें ती अंशतः अंगीं असणे संभवत नाहीं. ज्याच्या ठायीं सद्वासना व सुविचार ही वसत असतात, तोच सदाचारी असू शकतो; आणि ज्याच्या ठायीं ही नसतात, तो दुराचारी समजावा. सारांश सदाचार कांहीं न्यूनाधिक प्रमाणाने असणें संभवत नाहीं. कोणतेंही सत्कृत्य म्हटले कीं तें सर्वथा प्रशंसनीय असावयाचे; आणि कोणतेंही असत्कृत्य पाहिले तरी तें सर्वस्वी दूषणीय समजावयाचे. ज्याच्या ठायीं अत्यंत शुद्ध व पूर्ण नीतिमत्ता वसत असते, त्याच्याच हातून सत्कर्म घडते आणि ज्याच्या ठायीं नीतिमत्ता मुळींच नसते, त्याच्या हातून असत्कर्म घडावयाचें.

(अडुसष्ट)

ज्ञानी पुरुष

ज्ञान आणि मूढता– स्टोइक लोकांच्या मते सर्व मनुष्यजातीचे वर्ग दोन एक सदाचारी जनांचा आणि दुसरा दुराचारी जनांचा. ज्याच्या ठायीं सदाचार वसतो, त्याच्याठायीं तो पूर्णत्वानें वसावयाचा, आणि जो सदाचारी नसतो, त्याच्या ठाचीं सदाचार मुळीच नसावयाचा. कोणाच्या अंगीं थोडा किंवा अधिक सदाचार असला तरी त्यांत कांहींच अर्थ नाहीं असें ते म्हणत. या म्हणण्याच्या समर्थनार्थ ते असें उदाहरण देत कीं, कोणी मनुष्य पाण्याखालीं हातभर बुडाला काय आणि पाचशे हात बुडाला काय सारखाच; तो गुदमरून मेल्यावांचून रहावयाचा नाहीं. आतां जो सदाचारी असतो, तो अर्थात् ज्ञानी असलाच पाहिजे. या दृष्टीने पाहता समग्र मानवजातीचे दोन वर्ग होतात: एक ज्ञानी पुरुषांचा आणि दुसरा मूढ जनाचा. हे दोन्ही वर्ग अगदीं परस्परविसदृश आहेत, असें ते प्रतिपादन करीत. जे ज्ञानी पुरुष असतात, त्यांच्या ठायीं मूर्खत्व आढळावयाचें नाहीं, आणि जे जन मूढ असतात, त्याच्या ठायीं ज्ञानाचा लवलेशही नसावयाचा. ज्ञानी पुरुष निर्दोष असून, त्याच्या हातून कदापि प्रमाद घडावयाचे नाहींत. तो जें कांहीं करील तें यथायोग्य असून, त्याच्याठायीं सर्व सद्गुण आढळावयाचे. परंतु जो दुर्जन असतो, त्याच्याहातून कोणतीच चांगली गोष्ट व्हावयाची नाहीं. त्याच्या ठायीं सर्व प्रकारचे दुराचार आढळावयाचे. त्याला कोणत्याच गोष्टीचे यथार्थ ज्ञान नसावयाचें. तो उद्धत, आवेशी, निष्ठुर, व कृतघ्न असावयाचा. जो ज्ञानी पुरुष असतो, तो सर्वदा स्वतंत्र असून, त्याला उत्तम प्रकारचा मनोनिग्रह साधतो. खरें सौंदर्य असें त्याच्याच ठायीं वसत असतें. कारण सदाचाराहून सुंदर असें या दुनियेत दुसरें काहीएक नाहीं. खरी धनाढ्यता व सौख्य ही त्याच्याच ठायीं आढळतात. कारण आत्मशुद्धीसारखे अमोल धन दुसरें कोणतेंही नाही; आणि ऐहिक निवंतांपासून ज्ञानी पुरुष सर्वदा निर्मुत असतो. कृतज्ञता, प्रेम, मित्रत्व आदिकरून सद्गुण ज्ञान्याच्याच ठायीं आढळतात. तेव्हां एकंदरींत काय कीं, ज्ञानी पुरुष सर्वगुणसंपन्न असून सर्व वासना व निवंता यांपासून मुक्त असतो; म्हणून त्यास अखंड सौख्याचा अनुभव घडतो; आणि जो मूढ असतो, तो सर्वथा अज्ञानी व असुखी असतो.

सार्वत्रिक दुराचारमग्नता– स्टोइक लोकांच्या मते बहुतेक मनुष्यजाति मूढ आहे. यास्तव त्यांस या जगामध्ये सर्वत्र अनाचार व दुष्टपणा दिसत असे. बहुतेक मानवजाति दुराचारामध्ये मग्न आहे असे ते म्हणत. कोणी क्वचित् एकादा मनुष्य भ्रांतावस्थेमध्ये पुष्कळ काळ काढिल्यावर उत्तर वयामध्यें सदाचारी बनतो. सेनेकाने तर ह्या सार्वत्रिक दुराचारप्रवृत्तीसंबंधानें जागोजाग उद्गार काढिले आहेत. तो म्हणतो: 'आम्ही सर्व मानव आहो; आणि आम्ही असेच सर्वदा दुराचारी असूं. आमचे पूर्वजही आपल्या वेळच्या नीतिभ्रष्टतेविषयी हळहळत असत; आम्हीही आज तीविषयीं हळहळत आहो; व आमचे वंशजही पुढे याचप्रमाणे हळहळत रहातील. सर्वच मनुष्य दुराचारी आहेत. ज्यांच्या हातून अद्यापि दुष्कर्म घडले नसेल, त्यांच्या हातून पुढे अवश्य घडावयाचें. याप्रमाणें सर्वत्र दुराचार माजला असल्या कारणानें कोणी त्यापासून मुक्त होऊं म्हणतील तर तें त्याला साध्य नाहीं. कारण मूढ व अनाचारी जनांच्या संगतीमुळे त्यास स्वसुधारणा साध्य नसते.

दुराचारनिवृत्ति– सदरी सांगितल्याप्रमाणे दुराचार व सदाचार हे परस्परांहून अत्यंत विसदृश असल्या कारणानें एका स्थितीतून दसऱ्या स्थितींत क्रमाक्रमाने पालट होणें दुरापास्त आहे, असे त्यांचे म्हणणे असे. मूढता व दुराचार यांपासून ज्ञान व सदाचार यांप्रत मनुष्याची गति होणें शक्य आहे हे खरे. तथापि ती

एका निमिषांत होत असते. ज्या कोणांची सदाचाराप्रत गति होत असते, त्यांच्या ठायीं सदाचार पूर्णपणे बिंबण्यापूर्वी ते दुराचारी व मूढच समजावे. ज्यांच्या ठायीं ज्ञान व सदाचार यांचा अभिनिवेश होतो, त्यांस त्या आपल्या पालटलेल्या स्थितींचे आरंभी मुळीं भानही होत नसतें. इतका त्वरित हा पालट होत असतो, असें ते प्रतिपादन करीन.

स्टोइक लोकांच्या नीतिविचारात व्यवहारदृष्ट्या झालेले फेरफार

स्टोइक लोकाचे व्यवहाराकडे विशेष लक्ष असल्या कारणानें त्यांच्या तात्विक विचारांत त्यांस पुष्कळ फेरफार करावे लागत असत. हे फेरफार ते कसकसे करीत त्याचे थोडक्यात दिग्दर्शन करूं.

अपेक्षणीय व त्याज्य गोष्टी

स्टोइक लोकांचा सिद्धांत जो कीं, या जगांत सदाचारावाचून दुसरें काहीएक कल्याणप्रद नव्हे, आणि दुराचारावाचून दुसरें काहीएक अकल्याणकारक नव्हे, त्यास व्यवहार पुष्कळ प्रकारे विरुद्ध आहे. त्यांच्याच विचारपद्धतीप्रमाणे पाहता सदाचार कांहीं विवक्षित गोष्टींवर अवलंबून असून त्यापासून काहींतरी बाह्य परिणाम घडून येत असतात. या परिणामापासून सदाचार निराळा करणे अशक्य आहे. यास्तव ते या परिणामांचा अंतर्भाव कल्याणप्रद गोष्टींमध्ये करीत त्याचप्रमाणें त्यांचा दुसरा सिद्धांत असा होता कीं, जें निसर्गास अनुसरून असतें तेवढेच काय तें कल्याणप्रद होय; आणि विवेकशुद्ध आचरण म्हणजे अर्थात् नीत्याचरणच तेवढें निसर्गास अनुसरून असतें; वास्तव नित्याचरणावाचून दुसरें काहीएक कल्याणप्रद नव्हे. परंतु हाही त्यांचा सिद्धांत त्यांच्याच दुसऱ्या एका सिद्धांताविरुद्ध आहे. हा दुसरा सिद्धांत असा कीं, स्वसंरक्षणाची बुद्धि मनुष्याच्या ठायी अगदीं प्रारंभापासून असून तिच्या योगानें जीवितधारण होऊन मनुष्याची उत्तरोत्तर उन्नति होत जाते. यास्तव देहाच्या सुस्थितीस आवश्यक गोष्टी निसर्गास अनुसरून आहेत, असें त्यांस कबूल करावें लागत असे; इतकेंच मात्र कीं, ह्या गोष्टींमुळें परम कल्याणास प्रत्यवाय येऊ नये असें ते म्हणत. त्याचप्रमाणे ज्या गोष्टी देहाच्या सुस्थितीस प्रतिकूळ असतील, त्यापासून परम कल्याण साधण्यासारखे नसल्यास त्यांचा अव्हेर करणे इष्ट होय.

कोणत्या गोष्टीविषयी उदासीन रहावे– स्टोइक लोकांचा असा सिद्धांत होता कीं, एकंदर बाह्य गोष्टींविषयी मनुष्याने उदासीन रहावे. परंतु ह्या गोष्टींचे ते तीन वर्ग करीत. (१) नीतीच्या दृष्टीने ज्या गोष्टी इष्टही नव्हत व अनिष्टही नव्हत; परंतु ज्यांचा थोडा बहुत उपयोग असतो. मग हा उपयोग त्या मानवी निसर्गास अनुसरून आहेत म्हणून असो, किंवा त्या नैतिक वर्तनास साधनीभूत असल्या कारणानें त्या उपयुक्त वाटोत. त्यांचा अंतर्भाव ते पहिल्या वर्गांत करीत. (२) ज्या गोष्टी नीत्याचरणास व निसर्गास विरुद्ध असून अहितकर असतात, त्यांचा समावेश ते दुसऱ्या वर्गांत करीत; आणि (३) ज्या गोष्टी निमर्गास व नीत्याचरणास अनुकूळही नसतात व प्रतिकूळही नसतात, त्यांची गणना ते तिसऱ्या वर्गांत करीत. ज्या गोष्टींविषयी मनुष्यानें वास्तविकपणें उदासीन असावयाचे त्या अर्थात् या शेवटल्या वर्गातल्याच होत. पहिल्या वर्गातल्या गोष्टी म्हटल्या म्हणजे बुद्धि, चातुर्य, देहाची सुस्थिति, कीर्ती, कुलीनपणा इत्यादि होत. ह्या गोष्टी स्टोइक लोकांच्या मते अपेक्षणीय होतं. दुसऱ्या वर्गातल्या गोष्टी पहिल्या वर्गातल्या गोष्टींच्या उलट होत.

स्टोइक लोक ह्या गोष्टी त्याज्य समजत; आणि तिसऱ्या वर्गांत ते अशा गोष्टी घालीत कीं, त्याविषयीं मनुष्याच्या मनांत इच्छा किंवा तिरस्कार उत्पन्न होत नाहीं. उदाहरणार्थ मनुष्याच्या डोकीवर किती केश आहेत, व त्यांची संख्या सम आहे कीं विषम आहे, असा कोणी प्रश्न केल्यास त्यांत कांहींच अर्थ नाहीं. त्याचप्रमाणे कोणी एकादा टाकाऊ कागद उचलिला, किंवा तो तेथेंच राहू दिला, तर त्यांत काहीएक बिघडलें नाहीं.

आतां ज्या गोष्टी अपेक्षणीय आहेत म्हणून ते समजत, त्या नीतिदृष्ट्या केवळ गौण होत, असा त्यांचा अभिप्राय असे. ज्या गोष्टीं नीत्याचरणास आवश्यक असतात, त्याच फक्त कल्याणप्रद होत; कारण मनुष्यास त्यांचा सर्व स्थितींमध्यें उपयोग असतो. सदाचारास अनावश्यक अशा गोष्टी कितीही इष्ट किंवा अनिष्ट असल्या, तरी प्रसंगविशेषीं ज्या इष्ट असतात, त्या अनिष्ट होतात, आणि ज्या अनिष्ट असतात, त्या इष्ट होतात.

कर्तव्यविचार– स्टोइक लोकांचा असा सिद्धांत होता कीं, विवेकशुद्ध आचरण म्हणजे अर्थात सद्वर्तन हेंच मानवाचे परम कर्तव्य होय. परंतु परम कल्याणाव्यतिरिक्त इतर गौण प्रतीच्या कल्याणप्रद गोष्टी जर अपेक्षणीय आहेत, व अकल्याणाच्या गोष्टी त्याज्य आहेत, तर अपेक्षणीय गोष्टींचे संपादन व त्याज्य गोष्टींचे वर्जन करण्यासाठीं कांहीं गौण प्रतीची कर्तव्यें आहेत, असें त्यांस कबूल करावे लागे. याप्रमाणें त्यांच्या मतें कर्तव्याचे दोन वर्ग होतात. एका वर्गांत सदाचारास आवश्यक अशा परम कर्तव्यांचा अंतर्भाव होतो. हीं कर्तव्ये सर्व काळीं व सर्व स्थितीमध्ये मनुष्याने अवश्य बजाविली पाहिजेत. दुसऱ्या वर्गांत गौण प्रतीची कर्तव्ये येतात. हीं कर्तव्ये केवळ स्थलकालप्रसंगानुसार उद्भवत असून, त्यांचें महत्त्व अगदीं तात्पुरते असतें. विवक्षित स्थल, काल, किंवा प्रसंग नसेल तर या कर्तव्यांचे कर्तव्यत्व नष्ट होतें. मानवाचें परम कर्तव्य म्हटलें म्हणजे त्यानें सर्वदा नीत्याचरण करावे व परोपकारबुद्धि धरावी, हें होय.

विरक्तता– स्टोइक लोकांचा एक सिद्धांत असा होता कीं, मनुष्याच्या ठायींच्या एकंदर वृत्तींचे निःशेष निर्मूलन झालें तरच त्याच्याठायीं खरी नीतिमत्ता विकसित व्हावयाची. परंतु ह्या निःसीम वैराग्याच्या सिद्धांतांत त्यांस व्यवहारासाठी पुष्कळ पालट करावा लागे. ज्याप्रमाणें त्यांना गौण प्रतीच्या कल्याणप्रद गोष्टी कबूल कराव्या लागत, त्याचप्रमाणें त्यांस कित्येक निषिद्ध वृत्ति निराळ्या रूपानें क्षम्य म्हणाव्या लागत. उदाहरणार्थ ते म्हणत कीं, ज्ञानी पुरुष वृत्तिशून्य असला पाहिजे हें खरें आहे, तरी त्यांस दुःखाचे भान होणें साहजिक आहे; त्याचप्रमाणे कित्येक इष्टानिष्ट गोष्टी पाहून त्याच्याने सर्वथा उदास रहावयाचे नाहीं. खरें म्हटले असतां मनुष्याने सर्वथा वृत्तिशून्य असावें असें नाहीं; तर त्यानें कोणत्याही वृत्ति अनावर होऊं देऊं नये एवढेच काय तें.

ज्ञानी पुरुषाचा अभाव– मागें स्टोइक लोकांचे नीतीसंबंधी तात्विक विचार सांगतांना शेवटीं ज्ञानी पुरुषाची लक्षणें सांगितली आहेत. परंतु ह्या लक्षणांनी युक्त असा ज्ञानी पुरुष आजपर्यंत कधीं ही निर्माण झाला नाहीं, असें त्यांस कबूल करावे लागे. सॉक्रेटिस, डाओजेनिस व ॲन्टिस्थेनिस हे पुरुष महासाधु होते हें खरें, तथापि ते पूर्ण सदाचारी म्हणजे अर्थात् पूर्ण ज्ञानी नव्हते. तर केवळ सन्मार्गानुवर्ती होते

इतकेंच. याप्रमाणें जर ज्ञानी पुरुषांचा अभाव आहे, तर मानवजातीचे ज्ञानी व मूढ असे दोनवर्ग करण्यांत कोणतें स्वारस्य राहिलें? तेव्हां एकंदर मानव मूढ असून, त्यांची ज्ञानी पुरुषाची कल्पना केवळ भासमय होय असें म्हणावें लागतें. हा अपवाद लक्षांत आणून सदरील तात्विक सिद्धांतामध्ये त्यांनीं व्यवहारासाठी थोडासा फेरफार केला होता. तो असा सदाचारी व दुराचारी मनुष्यांचे कांहीं पर्याय ते कल्पीत. सदाचारी मनुष्याच्या ठायी सदाचाराचे व्रत चालविण्यास अनुकूळ असे गुण कितपत आहेत, याचे धोरण पाहून त्यास ते कमी जास्त चांगला म्हणत; आणि दुराचारी मनुष्याच्या ठायींचे दुर्गुण कितपत जाण्यासारखे आहेत, हे पाहून त्यास ते अधिकउणा वाईट म्हणत. त्याचप्रमाणें ते असें हाणत कीं, सत्यज्ञान व सदाचार यांकडे मनुष्याची प्रवृति हळूहळू होत असते. मनुष्य सर्व वृत्तींपासून मुक्त होऊन आपली सर्व कर्तव्ये यथायोग्यपणे बजावू लागला, आणि त्यास पूर्ण आत्मज्ञान झालें असून, तो पुनः बिघडण्याची भीति नाहीशी झाली म्हणजे त्याला खऱ्या ज्ञानी पुरुषाची अवस्था प्राप्त झाली म्हणून समजावे. परंतु ही पूर्णावस्था प्राप्त झाली नाहीं तरी तिच्या प्राप्तीसाठीं उद्योग करणारा पुरुष स्तुत्य होय; त्यास दुराचारी म्हणणे रास्त नव्हे असें त्यांस म्हणावें लागत असे.

व्यवहारनीति

येथवर स्टोईक लोकांच्या नीतीसंबंधी तात्विक विचार व त्यांत व्यवहारदृष्ट्या झालेले फेरफार यांचें निरूपण केलें. आतां या नीतीसबंधी सिद्धांतांचा संसारातील निरनिराळ्या प्रसंगीं कोणत्या प्रकारें उपयोग करावयाचा याचे कथन करणें अवश्य होय. कित्येक स्टोइक तत्वज्ञांचे असें म्हणणे होते कीं, व्यवहारांतील प्रत्येक कर्तव्याचा विचार करीत बसणे हे आपले काम नव्हे. जनानी आमचे तत्वविचार समजून घेऊन तदनुसार व्यवहारांत वागावे. पण दुसऱ्या कित्येकांचें असें म्हणणें होते कीं, तत्त्वविचारांचा उपयोग मनुष्याच्या व्यवहाराचें नियमन करण्याकडेच केला पाहिजे; एरवी ते केवळ व्यर्थ होत. यासाठी व्यवहारांत हरएक प्रसंगीं कसें वर्तन करावें, याविषयी जनांस स्वसंमत तात्विक विचारांच्या अनुरोधानें बोध करणें अवश्य होय. हा व्यवहारासंबंधी बोध करण्याचा कित्ता सेनेका, एपिक्टेटस, मार्कस ऑरेलिअस आणि सिसरो यांनी उत्तम प्रकारे घालून दिला आहे. स्टोइक लोकांच्या मतें मनुष्याच्या हातून घडणारे एकंदर व्यवहार नीतिनियमांस अनुसरून असावे असे होते. यास्तव त्यांच्या नीतिशास्त्राच्या या शाखेचा विस्तार मोठाच प्रचंड असला पाहिजे. परंतु या शाखेसंबंधानें त्यांचे व्यवस्थित विचार सांप्रत फारसे उपलब्ध नाहींत. तरी पण प्रस्तुत विभागाची झेलर यानें जी व्यवस्था लाविली आहे, तिच्याच अनुरोधाने आम्ही येथें विवेचन करूं. प्रथमतः व्यक्तिविषयक कर्तव्यांचें निरूपण करूं; तद्नंतर सामाजिक कर्तव्यांचे दिग्दर्शन करूं; आणि शेवटीं मनुष्याचा विश्वक्रमाशीं व भवितव्यतेशीं कसा काय संबंध आहे तें पाहू.

व्यक्तिविषयक कर्तव्ये

स्टोइक लोकांचे तत्वज्ञान ज्या काळी अस्तित्वांत आले, तो काळ ग्रीस देशाच्या ऱ्हासाचा व परतंत्रतेचा असल्या कारणानें सार्वजनिक कर्तव्यांपेक्षां व्यक्तिविषयक कर्तव्याकडेच तत्वज्ञांचे लक्ष अधिक जाणें साहजिक होतें. म्हणून व्यक्तिमात्राची सांसारिक कर्तव्ये कोणती आहेत याचा विचार करण्यांतच हित आहे असें त्यांस वाटू लागलें. ह्या गोष्टीचे प्रारंभी दिग्दर्शन केलेच आहे.

आतां मनुष्याचे खरें सौख्य त्याच्या अंतर्यामावर अवलबून असून, त्यास बाह्य उपाधीपासून काहीएक अंतराय घडणे नाहीं, असा त्यांचा सिद्धांत असल्या कारणानें ते अंतर्यामाच्या शुद्धीपुरतीच मनुष्याच्या कर्तव्याची मर्यादा आहे असें प्रतिपादन करीत. मनुष्याच्या एकंदर कर्तव्यांचे ते चार प्रधान वर्ग कल्पीत ते हे होत: बुद्धिविषयक कर्तव्ये, न्यायासंबंधाचीं कर्तव्यें, धेर्यासंबंधाची कर्तव्यें आणि विनयासंबंधाचीं कर्तव्ये. या कर्तव्यांचे त्यांनी आणखी पुष्कळ भागविभाग कल्पिले आहेत. त्या सर्वाचे निरूपण येथें करूं गेल्यास या उपोद्धाताची आधीच लांबलेली मर्यादा आणखी पुष्कळ वाढवावी लागेल. पण असें करणें आम्हास उचित वाटत नाहीं.

सामाजिक संबंधाची कर्तव्यें

मनुष्याने कोणत्याही बाह्य वस्तूंची मुळींच परवा न करिता केवळ स्वतांचें अंतर्याम शुद्ध व शांत राखण्यास झटावे असा स्टोइक लोकांचा सिद्धांत होता; तरी मनुष्याने इतर मानवाशी तुटून वागावे असें त्यांचें म्हणणें नसे. कारण त्यांचा असा अभिप्राय होता कीं, मनुष्य जितका अधिक नीतिमान बनत जातो, तितकी त्याच्या ठायीं समाजप्रीति अधिक उत्पन्न होते. त्यांचा जनांस असा बोध असे कीं, समाजाच्या सुस्थितीस ज्या गोष्टी आवश्यक असतात, त्यांच्या सिद्धीसाठीं मनुष्याला स्वतांचे इष्ट हेतू एकीकडे ठेवून खटपट करावी लागली तरी ती त्यानें स्वकर्तव्य समजून अवश्य करावी. मनुष्याचे वर्तन निसर्गनियमास अनुसरून असलें तरच तें विवेकशुद्ध समजावयाचे; आणि हा निसर्गनियम सर्व विवेकयुक्त प्राण्यांत समान असून त्यांनीं तदनुसार वर्तण्यास अहर्निश झटावे. याप्रमाणें सगळे मानव एकाच निसर्गनियमरूप सूत्राने बद्ध असून एकाच निसर्गाचे अंशरूप आहेत, असें ज्ञानी मनुष्याने ध्यानांत वागविले पाहिजे. या दृष्टीने पाहता मनुष्याने आपल्या पुरताच विचार करून राहू नये; तर एकंदर समाजासंबंधानेंही आपली पवित्र कर्तव्ये आहेत असें त्यानें लक्षांत आणिलें पाहिजे.

स्टोइक लोक म्हणत कीं, ज्याच्या ठायीं विवेक जागृत झाला, त्याच्या चित्तांत समाजप्रीति नियमानें उद्भूत व्हावयाची. विवेकबलेंकरून मनुष्यास कळतें कीं, आपण अखिल निसर्गाचे केवळ अंशरूप असल्या कारणानें समग्र निसर्गाच्या कल्याणाचा जेथें संबंध येईल, तेथें स्वतांचे अकल्याण झालें तरी कांहीं चिंता नाहीं. दुसरें असें कीं, समान गुणधर्मांच्या वस्तूंचा परस्परांकडे ओढा असतो, या सिद्धांताप्रमाणे पाहता जे विवेकसंपन्न प्राणी असतात, त्यांच्या त्या विवेकरूप समान धर्मास्तव त्यांचा परस्परार्शी स्नेह जमणें स्वाभाविक होय. म्हणून मनुष्याच्या ठायीं समाजप्रीति उत्पन्न होणे निसर्गक्रमसिद्ध आहे. याप्रमाणे सर्व मानव विवेकाचे अंकित असल्या कारणानें त्या सर्वांचा एकचविवेकशुद्ध आचरणमार्ग असून, त्यांचें नियमन एकाच नियमानें झालें पाहिजे; आणि या नियमाचे ते यथावत् अनुवर्तन करितील तर त्याच्या हातून सार्वत्रिक कल्याणास भर पडेल.

या प्रकरणी स्टोइक लोकांचें दुसरें असें म्हणणें असे कीं, या विश्वातील इतर सर्व वस्तु विवेकसंपन्न प्राण्यांसाठीं अस्तित्वांत आल्या आहेत; आणि विवेकसंपन्न प्राणी व्यक्तिशः पाहतां परस्परांसाठी अस्तित्वांत आले आहेत. या सिद्धांताप्रमाणे पाहता सामाजिक स्थितीमध्यें जी मनुष्यांची कर्तव्यें आहेत, तीं निसर्गक्रमसिद्ध,

अतएव परम पवित्र होत. आणखी असें कीं, न्यायानुरूप वर्तन जें करावयाचें तें मानवेतर प्राण्यांशी कदापि संभवत नाहीं; तर इतर मानवांशी जे व्यवहार करावयाचे त्यांसंबंधानेच तें संभवते. त्याचप्रमाणे या निसर्गातील जीवितास अनिष्ट अशा कित्येक गोष्टी टाळण्यांचे सामर्थ्य मनुष्यांत आलें आहे, तें केवळ त्यांनीं परस्पराशी सलोख्यानें वागून परस्परांस साहाय्य केल्यामुळें होय. जर कोणी मनुष्य म्हणेल कीं, मी या दुनियेंत अगदीं एकेकटा राहीन, दुसऱ्या कोणाचे कसल्याही बाबतींत जरासुद्धां साहाय्य घेणार नाहीं, तर त्याचें कदापि चालावयाचें नाहीं. तो सर्व प्रकारे अनाथ व निराश्रय होऊन त्याचें जीवित अत्यंत कष्टमय होईल. या सर्व गोष्टींवरून पाहता मनुष्यास समाज करून राहण्यांतच हित आहे व तें निसर्गक्रमसिद्धही आहे. यास्तव या समाजस्थितीस अनुरूप अशीं कर्तव्ये त्यानें कायावाचामनेंकरून बजाविली पाहिजेत. या प्रकरणी शेवटला स्टोइक मतवादी मार्कस ऑरेलिअस बादशहा यानें आपल्या ग्रंथांत जागोजाग मोठे उदात्त विचार प्रगट केले आहेत. ह्या बादशहाचे विचार गायकवाड महाराज सरकारांच्या कृपेनें मराठी वाचकांस उपलब्ध झाले आहेत. महाराष्ट्रग्रंथमालेतील चवथ्या ग्रंथांत या बादशहाची बोधवचने आली आहेत.

न्याय आणि दया– सदरी निर्दिष्ट कल्याप्रमाणें मनुष्याने आपल्या इतर मानवी बंधूंशी वर्तन करितांना मुख्य दोन कर्तव्यांकडे लक्ष पुरवावे असें त्यांचें म्हणणे होतें. तीं ही (१) त्याच्याशीं न्यायाने वर्तन करावे, आणि (२) त्यांच्यावर दया करावी. या दोन सद्गुणांच्या योगाने मानवी समाजस्थिति सुयंत्र रहाते, असें ते म्हणत. परंतु या सद्गुणांचें विवरण त्यांनीं आपल्या तात्विक विचारास अनुसरून केल्यामुळे त्यांस मोठे चमत्कारिक स्वरूप प्राप्त झालें होतें. एका पक्षी ते म्हणत कीं, ज्ञानी मनुष्याने अगदीं तंतोतंत न्यायाने वर्तावें. न्यायाच्या बाबतींत कोणाची दया किंवा गय लवमात्रही करूं नये. यामुळे त्यांच्या नीतिबोधास फारच कठोर व कडक स्वरूप प्राप्त झालें आहे. दुसऱ्या पक्षी सर्व मानव परस्पराशी नैसर्गिक स्नेहपाशांनीं बद्ध झाले असल्या कारणानें त्यांनीं दानधर्म, परोपकार, सभ्यता, सौम्यता, सद्बुद्धि, क्षमावृत्ति इत्यादि सद्गुणाचा आपल्या ठायीं अवश्य विकास होऊं द्यावा. या दुसऱ्या कर्तव्यपरंपरेचा बोध सेनेका, एपिक्टेटस्, मार्कस ऑरेलिअस व मुसोनिअस यांनी उत्तम प्रकारे केला आहे; किंबहुना याच एका कर्तव्यपरपरेस त्यांनीं पूर्वीच्या स्टोइक तत्वज्ञांहून अधिक प्राधान्य दिलें आहे. आता तंतोतंत न्याय आणि दया ही परस्पर विरुद्ध नाहीत काय? असा त्यांस कोणी प्रश्न केला असतां, ते त्याचें येणेंप्रमाणें समाधान करीत: सेनेका म्हणतो: ''तंतोतंत न्याय कांहीं दयेच्या विरुद्ध नाही. निष्ठुरपणा मात्र दयेविरुद्ध आहे. न्याय आणि दया हे सुद्गुण असल्या कारणानें ते परस्परविरुद्ध असणें संभवत नाहीं. कारण कोणताही सद्गुण दुसऱ्या कोणत्याही सद्गुणांशी विरुद्ध नसावयाचा. ज्ञानी पुरुषाने संकटांत आलेल्या मनुष्यास अवश्य साहाय्य करावे. परंतु त्यांच्यासारखी आपली वृत्ति मात्र होऊं देऊं नये; म्हणजे अर्थात् असे कीं, त्याच्याप्रमाणे त्यानें खिन्न होऊं नये, किंवा त्याची ती अवस्था पाहून हळहळू नये. त्यानें कोणाच्याही अपराधाकडे कान्हाडोळा करूं नये. पण त्याबद्दल त्यानें त्याच्याशीं कठोरपणाचे वर्तन करूं नये. तर त्याच्याशी बुद्धिवाद करून त्याला वाटेवर आणण्याचा प्रयत्न करावा. एकाद्याच्या हातून गुन्हा घडला असून, त्याला त्याबद्दल शासन करणें अगदीं योग्य असल्यास, मनुष्य मनाने जात्याच दुर्बल आहे ही गोष्ट ध्यानांत आणून, त्याला करावयाच्या शासनाचे स्वरूप होईल तितके सौम्य करावे.''

मित्रत्व– आतां हा सहवास एकंदर मानवांचा घडावा असें जरी आहे, तरी ज्यांच्या ठायींचा विवेक जागृत होऊन ज्यांना कैवल्यप्राप्ति कशांत आहे तें कळत असतें, त्यांचाच खरा सहवास संभवतो; म्हणजे अर्थात् असें कीं, जे ज्ञानी पुरुष असतात, तेच परस्परसहवासास योग्य असतात. जे खरे ज्ञानी व सदाचारी असतात, तेच परस्परांचे मित्र असतात; कारण त्यांचे या जीविताविषयीचे विचार सदृश असून त्यांची सदाचारप्रीति समान असते. याप्रमाणें जे खरे सदाचारी असतात त्यांच्या हातून घडणारे हरएक कर्म इतर ज्ञानी पुरुषांच्या कल्याणास कारणीभूत होतें. दुसरें असें कीं, दुसऱ्यावर कशी योग्य प्रकारे प्रीतिकरावी तें एका ज्ञानी पुरुषासच अवगत असतें. आणि प्रेमाच्या योगाने इतरांचे प्रेम संपादिलें जात असतें, या न्यायाने पाहता ज्ञानी पुरुषातच अन्य पुरुषांशी मित्रत्व करिता येतें. कारण प्रेम कसे करावें हें केवळ ज्ञानी पुरुषासच कळत असतें. याप्रमाणे ज्ञान व सदाचार यांच्या योगाने खरें मित्रत्व संभवत असल्या कारणानें तें स्टोइक लोकांच्या मतें कल्याणप्रद होय. या मित्रत्वाच्या महात्म्याचें वर्णन सेनेका पुढीलप्रमाणे करितो: ''मित्रत्वाचें महात्म्य पराकाष्ठेचे आहे. प्रत्येक ज्ञानी पुरुषानें स्वसमान धर्माचे जन निवडून काढावे हें स्वाभाविक आहे. कारण जे सदाचारी असतात त्यांच्याठायी अन्य सदाचारी जनांविषयी प्रेम वसणें साहजिक आहे. आतां ज्ञानी पुरुष जो हा मित्र निवडतो तो आपणास एकादा रोग झाला असता, आपली शुश्रूषा त्यानें करावी, किंवा आपल्यावर एकादा संकटप्रसंग गुदरला असतां आपणास यथोचित साहाय्य मिळावे म्हणून नव्हे; तर तो स्वत: निवडलेल्या मित्राचे संगोपन व साहाय्य करण्यास, त्याच्या प्रीत्यर्थ आपलें जीवित वेंचण्यास, किंबहुना त्याच्यासाठीं प्राणत्याग करण्यासही सर्वदा सिद्ध असतो.''

कुटुंब व राज्य– ज्ञानी पुरुषांनी परस्परांशीं संघटन ठेवून मित्रत्वाने वर्तावे एवढ्या पुरतीच समाजस्थिति स्टोइक लोकांस संमत नव्हती. ते म्हणत कीं, न्याय आणि नियम यांच्या योगानें सुयंत्रपणें नांदत असलेल्या समाजामध्यें जर मनुष्यास आपल्या इतर मानवी बंधूच्या सहवासानें रहावयाचे आहे, तर त्यास आपल्या समाजांतील राजकीय व्यवस्थेसबंधानें कसें उदासीन राहतां येईल बरें? केवळ कल्पनासृष्टीमध्यें मग्न होण्यांतच नीतीचें सर्वस्व आहे असें कोणी म्हणेल काय? अर्थात् नाही. तर मनुष्यानें स्वतांस प्राप्त झालेल्या ज्ञानानुरूप स्ववर्तन अवश्य ठेविले पाहिजे: आणि ज्या राष्ट्रामध्यें त्याची वसति असते, त्या राष्ट्रांतील कोणतें तरी सार्वजनिक हिताचें काम हातीं घेऊन त्यानें राष्ट्रहितास अपायकारक अशा गोष्टींचा प्रतिकार केला पाहिजे. उदाहरणार्थ स्वदेशाचे कायदे चांगले असल्यानें देशांतील रहिवाशांच्या वित्ताचे व जीविताचे उत्तम प्रकारे रक्षण होऊन त्यांचा उत्कर्ष होतो, व त्यांचा सदाचार व सौख्य ही वृद्धिंगत होतात. यास्तव ह्या कायद्यांचें स्वरूप पालटण्यास कोण ज्ञानी पुरुष स्वसामर्थ्यानुरूप झटणार नाहीं.

गृहस्थाश्रमाविषयींही त्यांचा असाच अनुकूळ अभिप्राय होता. स्त्रीपुरुषांचा वैवाहिक संबंध अत्यंत स्वाभाविक असून परम आदरणीय आहे. हें कौटुंबिक सुख मनुष्याने अगदीं बेताबातानें घ्यावे, व स्त्रीपुरुषांनीं परस्परांशी मोठ्या प्रेमानें व विश्वासानें वर्तावे; केवळ इंद्रियतृप्तीपुरताच हेतु मनांत धरून स्त्रीपुरुषांनी परस्परांशी विवाहपाशानें बद्ध होण्यांत काहीएक अर्थ नाहीं, असा त्यांचा अभिप्राय असे.

स्टोइक लोकांच्या मते अधिकारत्रयात्मक राज्यपद्धति असावी असें होतें. क्रिसिपस असें म्हणे कीं, ज्ञानी पुरुषास राजपद प्राप्त झालें असतां त्याचा तो अव्हेर करणार नाहीं; कारण तें कसें यथान्याय व

राष्ट्रहितास अनुकूल असें चालवावें हे त्याला अवगत असतें. त्याचप्रमाणें एकाद्या राजाच्या दरबारी राहुन स्वराज्य हांकण्याच्या कामी सल्लामसलत देण्याची संधि त्यास प्राप्त झाली असतां, ती तो व्यर्थ जाऊं देणार नाहीं. मात्र ज्या राजांच्या दरबारीं ज्ञानी पुरुषांनी रहावयाचें ते सदाचारी असावे. तरी पण स्टोइक लोकांच्या वेळची राजकीय अवस्था पाहता त्यांस हें लौकिक वर्तन फारसें संमत नव्हतें असें त्यांच्यापैकी पुष्कळांच्या लेखांवरून व उपदेशांवरून ध्यानांत येतें. उदाहरणार्थ क्रिसिपस म्हणतो कीं, 'खरा ज्ञानी मनुष्य असतो तो व्यवहारांतील सारी दगदग सोडून एकांतवास स्वीकारितो, आणि तेथें आपलें आयुष्य शांतीने घालीवतो. त्याला लौकिकांत वागून स्वकर्तव्य करावेंसें वाटतें खरें. परंतु ज्या बावतींमध्यें स्वतांच्या उद्योगाने सुधारणा होण्यासारखी असते, त्याच बाबतींत तो मन घालितो. यास्तव कांहीं स्टोइक लोक म्हणत कीं, राष्ट्रहितासाठी खटपट करणें हें ज्ञानी पुरुषाचे कर्तव्य आहे. मात्र ह्या त्याच्या खटपटीस कोणत्याही प्रकारचा अडथळा येतां कामा नये. परंतु असा अडथळा सांप्रतच्या स्थितीमध्यें नेहमी यावयाचा, यासाठीं अशा खटपटींत त्यानें मन घालू नये हाच उत्तम मार्ग. ज्ञानी पुरुष सेनापती, मुत्सद्दी, सुभेदार किंवा न्यायाधीश झाला असतां, त्याच्या हातून जें राष्ट्रहित व्हावयाचें, त्यापेक्षां मूढ जनांस बोध करण्याचा उद्योग त्यानें पतकरिल्यानें पुष्कळ जनहित करण्यास तो समर्थ होतो. सेनेका आणि एपिक्टेटस यांचें तर या प्रकरणी असें म्हणणें होतें कीं, ज्ञानी पुरुष स्वतांस या समग्र जगताचा जानपद समजत असल्या कारणानें, त्यानें एका विवक्षित राष्ट्राच्या हितासाठी झटणे म्हणजे आपल्या उपयुक्ततेचे मान मर्यादित करणें होय. वस्तुतः पाहता त्यानें एकंदर विश्वाच्या हितासाठी झटणे इष्ट होय. मनुष्याने उद्योग अवश्य करावा. पण अध्ययन व अध्यापन यांसारखा व्यवसाय इतर कोणताही नाही.

जगद्रूप राष्ट्राचे जानपदत्व– समग्र वसुधा आपलें कुटुंब आहे, हा अत्यंत उदात्त सिद्धांत स्टोइक तत्वज्ञांपूर्वीं कोणीही जनांस उपदेशिला नव्हता. ग्रीक लोकांच्या मनांत तर परराष्ट्रांविषयीं पराकाष्ठेचा द्वेष वसत असे. परंतु पुढें ही द्वेषबुद्धि कमी होण्यास कोणती राजकीय स्थिति कारणीभूत झाली त्याचें दिग्दर्शन या उपोद्धाताच्या आरंभी केलेंच आहे. तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति नको. या राजकीय कारणाशिवाय दुसरें आणखी एक असें कारण सांगण्यासारखे आहे कीं, स्टोइक तत्वज्ञानाचा मूळप्रवर्तक व त्याचे बहुतेक मुख्यमुख्य अनुयायी मूळचे ग्रीस देशांतले रहिवासी नसल्या कारणानें ग्रीक लोकांच्या ठायींचा कट्टा देशाभिमान त्यांच्या मनांत कधींही उत्पन्न झाला नाहीं परंतु या उभय कारणांहूनही विशेष बलवत्तर कारण त्यांच्या तात्विक विचारांतच आहे. मनुष्यमात्राच्या ठायींचा विवेक समान असल्या कारणानें ते जर परस्परांच्या सहवासास राहण्याला योग्य आहेत, तर त्यांचा हा सहवास एका राष्ट्रापुरता मानण्यास कोणता आधार आहे? अमुक एका जनवर्गाशीं इतर जनसमुदायाहून आपला विशेष निकट संबंध आहे, असें आपण कां म्हणून मानावे? खरें पाहता मानव बाह्य गोष्टींच्या सबंधाने परस्परांहून कितीही भिन्न असले, तरी त्या सर्वांच्या ठाई जे विवेकरूप तत्व आहे, तें अभिन्न असून, ते सर्व एकाच विश्वाचे अंशरूप आहेत. त्यांस एकाच निसर्गाने समान तत्वांचे बनविले असून सर्वांची एकच गति आहे. या दृष्टीने पाहता या जगांतील सर्व मानव परस्परांचे बंधु होत. म्हणून एपिक्टेटस म्हणतो कीं, 'मनुष्य कोणत्याही ठिकाणचा व कसाही असला तरी त्याच्या कल्याणाची चिंता वाहणे हें आपलें कर्तव्य होय. त्यानें आपणाशी कितीही विरोध केला किंवा कोणत्याही वाईट प्रकारे वर्तन केलें, तरी त्याच्या विषयीची पमेपकारबुद्धि आपल्या अंतर्यामातून

सहसा नष्ट होऊं देऊ नये.' 'एकाद्याची कितीही हीन स्थिति असली, व त्याचे आचरण कितीही नीच प्रकारचे असलें, तरी त्याच्यावर दया करावी, हें आपलें कर्तव्य होय', असें सेनेका म्हणतो. तो दुसरे ऐके ठिकाणी आणखी तो असें म्हणतो कीं, 'सर्व मानव विवेकशील प्राणी असल्या कारणानें ते सारख्याच योग्यतेचे असून परस्परांच्या सहवासाने राहण्यास योग्य आहेत; आणि त्यांच्या वर्तनाचें नियमन एकाच निसर्गनियमानुरूप होत असल्यामुळें ते सारे एकाच राष्ट्राचे जानपद होत. या जगद्रूप महानगरीच्या ठायीं जी निरनिराळी राष्ट्रे आहेत, तीं सामान्य नगरातील कुटुंबवत् समजावी. ज्ञानी पुरूष कोणत्याही स्थानी यादृच्छायोगेकरून निर्माण झाला असला तरी त्यानें त्या विवक्षित स्थानापुरता अभिमान व प्रेम बाळगणे योग्य नव्हे. तर त्यानें आपल्या वर्तनाने व बोधानें इतर जनांच्या मनावर असें ठसवावे कीं, ते सारे एकाच जगद्रूपराष्ट्राचे जानपद असून, त्यांनीं आपआपल्या संस्थानापुरते जे कायदेकानून करावयाचे, ते इतर संस्थानातील लोकांस कदापि अपायकारक नसावे. तर सर्वांनी विवेकशुद्ध अशा नियमास अनुसरून परस्परांशी बंधुत्वाच्या नात्याने गुण्यागोविंदानी वागण्यास झटावे.'

मानव आणि निसर्गक्रम

स्टोईक लोकांचा सिद्धांत जो कीं, 'मनुष्याच्या ठायीचा विवेक या समग्र विश्वाच्या विवेकांशी समान असून, त्याच्याच योगाने सर्व विश्वाचे नियमन होत आहे, आणि मानवानें या विवेकानुसार स्ववर्तन राखून इतर मानवांच्या ठायीं ही हा विवेक आहे असें मानावे,' तो लक्षांत आणितां असें उन्नीत होते कीं, विश्वाच्या विकेकास व त्या विवेकानुरूप चालू असलेल्या विश्वक्रमास अंकित व्हावें हें मानवाचे कर्तव्य आहे.

निसर्गक्रमाचे अंकित व्हावें– स्टोइक लोक जनांस असा बोध करीत कीं, मनुष्यानं विश्वक्रमास सर्वथा वश व्हावें. ह्याप्रमाणे भवितव्यतेवर सर्वस्वी अवलंबून असावें असें प्रतिपादन स्टोइक लोक कां करीत याचे मुख्य कारण पाहू जातां त्यांच्या वेळची ग्रीक राष्ट्रांची समाजस्थितिच होय. म्यासिडोनियाच्या व पुढें रोमच्या बादशहाचा जुलमी अंमल त्या राष्ट्रांवर बसल्यानंतर त्यांस असह्य अशी परवशता प्राप्त झाली असल्या कारणानें त्यांस ह्या संसारांत मुळीच सुख लाभणें नाहीं असें वाटून, ते दैवावर भरवसा ठेवून राहू लागले. आणि असा विवेक करू लागलें कीं, जी दैवगति मनुष्यप्रयत्नाने कदापि पालटणारी नव्हे, तीवर रुष्ट होण्यांत काय अर्थ आहे? तर ती मुकाट्याने किंबहुना आनंदाने सहन करावी, हेंच युक्त होय. शिवाय त्यांचे तात्विक सिद्धांतही या विचारांचे परिपोषक होते. या विश्वातील अखिल व्यापार एकाच निसर्गनियमानुसार चालत असल्या कारणानें प्रत्येक व्यक्तीस प्राप्त होणाऱ्या एकंदर गोष्टी याच निसर्गक्रमसिद्ध कार्यकारणसंबंधास्तव घडत असतात. यासाठीं त्यांस सर्वथा वश होणें हेच मानवाचे कर्तव्य आहे. यांत त्याचें कांहीं अकल्याण झालें असें त्यानें समजू नये. याप्रमाणे भवितव्यतेवर पूर्ण भार ठेवून जो आपलें चित्त सर्वदा शांत व स्वस्थ राखितो. त्यासच या जगांत खऱ्या सौख्याचा अनुभव घडतो.

आत्महत्या– सदरी निर्दिष्ट केल्याप्रमाणे मनुष्याने भवितव्यतेवर सर्वस्वी भरवसा ठेवून जें काय होईल तें सहन करण्यास सर्वदा तत्पर असावें, असें स्टोइक लोक म्हणत. तरी त्यांचा आणखी असा अभिप्राय असे कीं, कधीकधी ज्ञानी पुरुषालाही अशी स्थिति प्राप्त होते कीं, तीत त्यास जीवितधारण असह्य होऊन

तो ती पासून आत्महत्या करून मुक्त होतो. सेनेका या प्रकरणी असें म्हणतो कीं, ''जो ज्ञानी पुरुष मनास वाटेल तेव्हां स्वजीवितत्याग करण्यास समर्थ असतो, तो धन्य होय. असा पुरुष भवितव्यतेस बिलकुल मोजीत नाहीं. मनास वाटेल तेव्हां जीवितत्याग करण्याविषयींची ही सिद्धता मुख्य मुख्य स्टोईक तत्वज्ञांनीं नुसती बोलूनच दाखविली नाहीं, तर त्यांनीं स्वत: तीप्रमाणें वर्तन केलें. उदाहरणार्थ या मताचा मूळप्रर्वतक जो झिनो, त्यानें अगदीं उतार वयांत गळफास लावून घेऊन कशी आत्महत्या केली तें मागें सांगितलें आहे. त्याचप्रमाणे क्लिआन्थिस यानें अन्नपाण्याचा त्याग करून आपल्या जीविताचा अंत केला. ॲन्टिपेटर यानें ही असाच आत्मघात केला.

आतां मनुष्यानें स्वजीवितनाश कोणत्या कारणांवरून करावा याचा निर्णय निरनिराळ्या स्टोइक तत्ववेत्त्यांनीं निरनिराळ्या प्रकारे केला आहे. परंतु सर्वांची एका गोष्टीसंबंधाने एकवाक्यता आहे. ती गोष्ट हीच कीं, आपल्या स्वाधीनची नव्हे अशी एकादी स्थिति प्राप्त होऊन जीवित असह्य झालें असतां, मनुष्यानें त्याचा अवश्य त्याग करावा. या प्रकरणी सेनेकाचा असा अभिप्राय आहे कीं, एकाद्या परस्वाधीन गोष्टीमुळें मनुष्याच्या मनाची स्वस्थता सर्वस्वी नष्ट झाली असतां, त्यानें जीवितत्याग करावा. वृद्धत्वामुळे प्राप्त होणारी विकलता, असाह्य रोग, बुद्ध्यादि मानसिक शक्तींचा ऱ्हास, पराकाष्ठेचें दारिद्र्य, एकाद्या जुलमी राजाचा अतिशयित जुलूम इत्यादि अगदीं अपरिहार्य गोष्टी सोसणे प्राप्त झालें असतां, त्यांतून मुक्त होण्याच्या या आत्महत्यारूप उपायाचे अवश्य अवलंबन करावे.'

धर्मसंबंधी विचार

येथवर स्टोईक तत्वज्ञांच्या तात्विक व नैतिक विचारांचें निरूपण केलें. हे त्यांचे विचार वाचून त्यांची धर्मसंबंधी कशी काय मते होतीं हें जाणण्याची इच्छा वाचकांस होणे साहजिक आहे. यास्तव त्यांचें येथें थोडक्यांत दिग्दर्शन करितो.

त्यांच्या तत्वज्ञानपद्धतीचा धर्मविचारपद्धतीशी किती निकट संबंध आहे हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत येथवरच्या निरूपणावरून आलेंच असेल. त्यांचा असा सिद्धांत होता कीं, हे अखिल वस्तुजात एका दैवी शक्तीपासून उद्भवले असून तिच्याच अबाधित सत्तेने त्याचें नियमन व धारण होत आहे; आणि शेवटीं त्याचा प्रलय त्या शक्तीच्याच ठायीं व्हावयाचा. तेव्हां अर्थात् या विश्वाच्या प्रारंभीं व अंती एक देवच काय तो असतो असें सिद्ध होतें. या ईशशक्तीचा जो विवेकशुद्धनियम, तदनुसार मनुष्याचे आचरण होणें इष्ट असून, विश्वात्म्याच्या इच्छेप्रमाणे सर्व कांहीं घडणार असें समजून, त्याच्यावर सर्व भार टाकून मनुष्यानं स्वस्थ असावें. जो कोणी नीतीस अनुसरून वर्तन करितो, तो या विश्वात्म्याच्या इच्छेप्रमाणे वर्तन करितो असें समजावे. त्याचप्रमाणें सारे मानव त्या दैवाची लेकरे असल्या कारणानें त्यांनीं परस्परांस स्वबधुवत् लेखून, आपण एकाच राष्ट्रांतील रहिवासी, किंबहुना एकाच कुटुंबांतले इसम आहो असे मानून चालावे.

स्टोईक लोकांच्या वेळीं जी धर्ममतें प्रचलित होतीं, त्यांवर त्यांची मुळीच श्रद्धा नसे. ते म्हणत कीं, देवाची खरी उपासना म्हटली म्हणजे त्याच्या स्वरूपाचें यथावत् ज्ञान प्राप्त करून घेऊन नीतीनें वागावे ही होय. देवाची प्रार्थना करावयाची ती या जगांतील कोणतीही गोष्ट प्राप्त करून घेण्यासाठी करण्यांत काहीएक

अर्थ नाहीं; तर आपल्या ठायीं सदाचार व सद्भाव ही उत्पन्न व्हावी एतदर्थ देवाची आराधना करावी. याप्रमाणे त्यांचे धर्मसिद्धांत प्रचलित मताहून भिन्न होते, तरी त्यांनीं चालू धर्माशी उघडपणे असा विरोध कधीच केला नाहीं. कारण ते म्हणत की, रूढ धर्मसमजुतींच्या योगानें लोकांच्या अनाचारप्रवृत्तीस बराच प्रतिरोध होत असतो. यास्तव त्या मतांवरून त्यांची श्रदा उडू देणे इष्ट नव्हे. तरी ज्या कित्येक रूढ धर्मसमजुती त्यांस आपल्या तात्विक विचारांस सर्वथा विरुद्धशा वाटत, त्यांवर ते खरमरीत टीका करण्यास कधीं कोणाला भीत नसत. उदाहरणार्थ झिनो म्हणे कीं, 'लोक देवांच्या मूर्ति करितात व त्या ठेवण्यासाठीं मंदिरे बांधितात, त्यांत पवित्रतेचा लवलेशही असणें संभवत नाही. कारण ज्या मूर्ति मूर्तिकारांनी घडविल्या, व जी देवळे कारागिरांनीं बांधिलीं, त्यांत पवित्रता कोठून साठवली?' सेनेका तर असें उघडपणे प्रतिपादन करी कीं, 'देवाची प्रार्थना करण्याची मुळींच गरज नाहीं. कारण आपण विनविल्यावांचून सर्वज्ञ व दयामय देव आपलें कल्याण करणार नाही असें मानणें हा निवळ वेडेपणा होय. मनुष्यानें आपलें आचरण शुद्ध ठेविले म्हणजे त्यांतच देवाची उपासना केल्याचे त्यास श्रेय येतें. मोठमोठाले यज्ञ व विधि करण्यांत मुळीच हाशील नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्याने देवासाठी मोठमोठी मंदिरे बांधण्याचा हव्यास धरण्यांत कोणताच अर्थ नाहीं; तर त्यानें आपल्या अंतर्यामरूप मंदिरामध्यें देवाचा स्थापना करावी हें उत्तम होय.'

सेनेकाचीं बोधवचने

सौख्याचे जीवन

भाग पहिला

सौख्याचें जीवन आणि त्याचें स्वरूप

ऐहिक जीवन सौख्याचे व्हावें यासाठीं काय करावे या प्रश्नासंबंधाने या भूतलावर जितकी वाटाघाट होऊन राहिली आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीसंबंधानें झालेली नसेल. तरी या प्रकरणीं मनुष्याचे ज्ञान अगदीं बेताचेंच आहे. सौख्यप्राप्तीची इच्छा प्रत्येकास असून तें प्राप्त होण्याविषयी तो नानायुक्त्यांची योजना करीत असतो. तथापि हजारांमध्ये एकासही वास्तविक सौख्य कशात आहे तें कळत नसतें. आम्ही आपल्या आयुर्दायामध्यें सौख्यप्राप्तीसाठीं मोठ्या उत्कंठेनें केवळ आंधळ्याप्रमाणे प्रयत्न करीत असतो. तथापि सौख्यप्राप्तीविषयी आतुर होऊन अयोग्य मार्गाचा अवलंब केला असतां आपली इष्ट कार्यसिद्धि होणें दुरापास्त असतें. यास्तव सौख्याच्या प्राप्तीसाठी झटण्यापूर्वी त्याचें वास्तविक स्वरूप कसें काय आहे याचा विचार प्रथम करणें इष्ट होय. याप्रमाणें विवेक केल्यावर मग सौख्यप्राप्तीचा अतिसुगम मार्ग कोणता याचा विचार करूं. आपण योग्य मार्गाचा अवलंब करूं तर सौख्यप्राप्तीच्या सबंधाने प्रतिदिवशीं आपलें पाऊल किती पुढें पडत आहे ते आपणांस कळून येईल. परंतु जे लोक स्वतः आडमार्गांत शिरून दुसऱ्यांनी आपलें अनुकरण करावे म्हणून अट्टाहास करीत सुटतात, त्यांच्या भुलथापा खऱ्या मानून त्यांचें अनुसरण केलें असतां, आपण सन्मार्गापासून च्युत होऊन भ्रांतिष्टाप्रमाणे आडरानात भटकत राहू. यासाठीं एकाद्या कुशल मार्गदर्शकाचे साहाय्य घेणे आपल्या हिताचे आहें. नामदेव म्हणतो की, 'गुरुविण वर्म हाता नये.' त्याचप्रमाणे तुकारामाचीही या प्रकरणी अशी एक उक्ति आहे कीं, 'गुरुविण पार होणें । न घडेचि मूढजनें.' सौख्यप्राप्तीचा मार्ग इतर मार्गाप्रमाणे सोपा नाहीं. आपण एकाद्या गांवी जावयास निघालो असतां, नित्य रहदारीच्या धोपटमार्गाचा स्वीकार केल्याने इष्टस्थानी जाऊन पोहोचण्याचा संभव असतो. यदाकदाचित् मार्ग चुकलोच तर कोणातरी माहितगार माणसास पुसल्याने पुनरपि योग्य मार्ग तेव्हांच प्राप्त होतो. परंतु सौख्यप्राप्तीचा मार्ग असा सुगम नाहीं. या प्रकरणी नित्य रहदारीचा मार्ग अत्यंत धोक्याचा असतो; आणि यासंबंधाने सामान्य जनाचे साहाय्य घेऊ गेल्यास आपण खास आडमार्गात शिरू. यास्तव मेंढरे जशीं आपला म्होरक्या एडका जिकडे जाईल तिकडे एकामागून एक जात असतात, तसें आपणांस करितां कामा नये. दुसऱ्यांची चालचलणूक पाहून तदनुसार वागण्याचें सोडून द्यावे; आणि हरएक बाबतींत स्वतः विवेक करून वागण्यास झटावे. **'मनःपूत समाचारेत'*** या साधूक्तींतही हेंच सार आहे. सामान्य जनांची प्रवृत्ति पाहिली असतां

* मनाला शुद्ध वाटेल त्याप्रमाणें आचरण करावें.

ती सदरील दृष्टांतांतील मेंढरांप्रमाणे असते. त्यांचा एडका जातां जातां एकाद्या खड्यांत पडला असतां, त्याच्यामागून सगळा कळप त्यांत पडतो. दुसरा दृष्टांत असा कीं, दोन सैन्यांचे तुंबल युद्ध चालले आसतां, त्यांपैकीं एका सैन्याचा मोड झाला म्हणजे तें शत्रूस पाठ दाखवून पळत सुटते. अशा प्रसंगीं शिपायांस पळण्याची इतकी घाई होते कीं ते एकमेकास अडखळून एकमेकांवर पडतात. अशा रीतीनें सर्वच जमीनदोस्त होऊन जिकडे तिकडे हलकल्होळ उसळतो. अशा समयी मोठ्या शौर्याने लढणाऱ्या योद्धाच्या देखील हृदयांत भीती उत्पन्न होते. याचे कारण एवढेच कीं, आपल्या इतर सोबत्यास घाबरलेले पाहून सैनिकांचे धैर्य सुटते; आणि त्यांच्या प्रमाणेंच तेही समरभूमीवरून पलायन करण्यास प्रवृत्त होतात व सामान्य जनव्यवहारांतही असाच प्रकार दृष्टीस पडतो. आम्ही एकमेकांचे पाहून वागत असल्यामुळें आमचा नाश होत आहे. म्हटले आहे: **'गतानुगतिको लोका: नास्ति लोक:पारमार्थिक:'**** यास्तव सामान्य जनप्रवृत्तीचा अव्हेर करून आपण आपले आचरण दुरुस्त करू तर आपले कल्याण होण्यासारखे आहे. कारण असे पाहा की, खरे सौख्य कशांत आहे, या प्रश्नाचा निर्णय, सामान्य जनांचे या बाबतीत काय मत आहे ते पाहून, करणे उचित नव्हे. ह्या मानवी प्रपंचाची घटना अशी काही आहे की, ज्या गोष्टी वास्तविक पाहता उत्तम असतात, या बहुजन समाजास कदापि प्रिय होत नसतात. यावरून आपण सदोदित अशी खूणगांठ बांधवी की, जी गोष्ट सामान्य जनांस पसंत वाटते, ती बहुशः वाईट असावयाची. लोकांत प्रचलित असलेल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवून चालणें सामान्य जनांस सोपे वाटत असते. प्रत्येक गोष्टींत विवेक करण्याची दगदग त्यांस नको असते. चालू वहिवाटीप्रमाणे वागून स्वस्थ रहावे यांतच त्याला संतोष असतो. ही वहिवाट चांगली आहे किंवा वाईट आहे याचा तपास ते कधीं करीत नसतात. या सामान्य जनवर्गात अर्थात् सर्व दर्जाच्या लोकांचा अंतर्भाव होतो. चर्मचक्षूस जो भेदभाव गोचर होतो, तो केवळ बाह्य व कृत्रिम होय. यास्तव रावापासून रंकापर्यंत एकंदर जन जे साधारण रूढीत अनुसरून वर्तत असतात, त्यांची सामान्यजनवर्गात गणना करावयाची. मनुष्याच्या उच्चनीचत्वाची वास्तविक कसोटी पाहूं जातां ती त्याच्या मानसिक स्थितीवर अवलंबून असते. वस्तुतः पाहता आत्म्याच्या कल्याणाच्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा शोध आत्म्याच्याच साहाय्यानें होणें इष्ट होय. प्रपंचातील सुखाच्या अनुभवाने मनुष्य अगदीं बेहोष होतो. परंतु या आसक्तीपासून सुटून तो शुद्धीवर आला असतां, तो असें कबूल करील कीं, या सुखाच्या नादी लागून मीं पुष्कळ अनन्वित कर्मे केलीं असून, त्यांची निष्कृति व्हावी असें मी मनापासून इच्छितो. त्याचप्रमाणे ज्या गोष्टींची मला भीति वाटत होती, त्या, ज्या गोष्टींची मी हाव धरीत होतों, त्याहून पुष्कळ अंशी चांगल्या आहेत. श्रीमद्भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायांत निरनिराळ्या सुखांचे निरूपण करितांना सदरील आशय दोन श्लोकांत उत्तम प्रकारे सूचित केला आहे. ते श्लोक हे होत :-

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विक प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ।।*
विषयेंद्रिय संयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपम ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ।। **

** लोक गतानुगतिक असतात; त्याला परमार्थाची चाड नसते.

* आरंभी विष जें वाटे शेवटी अमृतोपम चित्तबुद्धिप्रसादे हें उपजे सुख सात्विक. वामन

** विषयेंद्रियसंयोगें आरंभी अमृतोपम शेवटीं जें विषातुल्य सुख तें जाण राजस. वामन.

खरें सौख्य

ज्या गोष्टीनी चित्तास उद्वेग प्राप्त होतो अशा गोष्टींपासून मुक्त असणें, इतर मानवांच्या संबंधाने आपलीं कोणकोणती कर्तव्यें आहेत त्यांचें ज्ञान असणें, वर्तमानकालीं जी स्थिति प्राप्त झाली असेल, तींत समाधान मानून रहाणे, पुढें आपलें कसें होईल या विषयींची चिंता न वाहणे, कोणत्याही गोष्टीविषयी आशा किंवा भीती मनांत न बाळगणे, प्राप्त स्थितीमध्यें निरंतर समाधान मानून रहाणे, यांतच खरें सौख्य आहे. जो निरपेक्ष असतो, त्याला कशाचीही निवंता नसते. म्हटले आहे: **'आशायां परम दुःखं नैराश्य परमं सुखम्'***** आम्हा मानवांच्या मोठ्या सुखाचे निधान आमच्या अंतर्यामी असून तें आमच्या आटोक्यांतलें आहे. यांप्रमाणें सौख्य आपल्या अगदी संनिध व स्वाधीन असता, केवळ डोळे झाकून अंधारांत चांचपडणाऱ्या माणसाप्रमाणें आपण त्याचा शोध करण्यास प्रवृत्त होतों. तें इतकें जवळ असताही आपणांस सांपडत नाहीं. 'तुझें आहे तुजपशी । परि तूं जागा विसरलाशी,' या सुप्रसिद्ध साधूक्तीतही हेंच इंगित आहे. चित्ताचे स्वास्थ्य हा मानसिक धर्म असा कांहीं विलक्षण आहे कीं, त्याचा उत्कर्ष किंवा ऱ्हास कोणत्याही अवस्थेंत होणें शक्य नाहीं. अधिकार किंवा संपत्ति यांच्या योगाने तें जसें वाढावयाचें नाहीं, तद्वत्च दास्य किंवा विपत्ति यांच्यामुळे तें कदापि उणें व्हावयाचें नाहीं. हें असें चित्तस्वास्थ्य मनुष्यास प्राप्त झालें म्हणजे तो पुर्णावस्थेस पोचला म्हणून समजावे. अशी अत्युच्च स्थिति ज्या मनुष्यास प्राप्त होते, तो कोणाच्याही साहाय्याची अपेक्षा करीत नाहीं. जो योग्य प्रकारे विवेक करून तद्नुसार वर्तन करितो, त्यास निरंतरची शांति प्राप्त होते. असा विवेकशील पुरुष वस्तुमात्राचे सत्य स्वरूप जाणून आपल्या सर्व आचरणामध्यें नियम आणि व्यवस्था राखितो. अशा पुरुषाचे वर्तन पुढील उक्तींतल्या प्रमाणें असतें:-

उचितमनुचित वा कुर्वता कार्यजातम् ।
परिणति स्वधार्या यत्नतः पंडितेन ।। ** सु. र.**

अशा पुरुषाचा स्वभाव कृपाळू असतो. तो आपल्या जीवितांचे नियमन विवेकानुरूप करितो. अशा रीतीनें तो वर्तत असल्यामुळें जन त्याची तारीफ करितात, आणि त्याच्यावर प्रीति करितात. निश्चयात्मक आणि स्थिर विवेकाव्यतिरिक्त इतर सर्व कांहीं चंचल आहे. ज्या गोष्टीनी आपणांस मोह किंवा दहशत पडते, त्यांविषयींच्या इच्छेचें दमन केल्यानें मनास स्वातंत्र्य व शांति ही प्राप्त होतात. सुखविषयांचें सेवन केलें असतां, त्यापासून जो आनंद उत्पन्न होतो, तो केवळ अल्पकालिक असून असार व अनर्थमूलक असतो. हाच बोध आत्मपुराणांतील पुढील वचनांत व्यक्त केला आहे:-

एवं शब्दादिलाभेऽपि सुखं नैव प्रजायते ।
किन्तु स्वात्मन औत्सुक्यनिवृत्तिः स्यात्क्षणं नृणाम् ।। *

*** आशेमध्यें परम दुःख आहे, नैराश्य हें परम सुख आहे.

**** शहाण्याने कोणत्या गोष्टी उचित, कोणत्या अनुचित, व कोणत्या गोष्टींचा काय परिणाम होईल, याचा यत्नेकरून विवेक करावा.

* याप्रमाणे इंद्रियाचे शब्दादि जे विषय ते प्राप्त झाले तरी सुख उत्पन्न होत नाहीं; मात्र इतकेंच कीं, मनुष्यांच्या चित्ताच्या उत्सुकतेची क्षणभर निवृत्ति होते.

यास्तव त्यांचा अव्हेर करणें उचित होय. असें केल्यानें आत्म्यास निरंतरची शांति व स्वास्थ्य ही प्राप्त होऊन परमानंदाचा अनुभव घडतो. सौख्यप्राप्तीस चित्ताची निर्दोषता आवश्यक होय. त्याचप्रमाणें कोणतीही स्थिति प्राप्त झाली तरी चित्ताची स्थिरता नष्ट होतां कामा नये. या जगांतील गोष्टींविषयी बेपरवाई तर नसावी, पण त्यांमुळें चित्तास संताप होऊं देऊं नये सुख संपदा प्राप्त झाली, अथवा तिला मुकावे लागलें, तरी तिजबद्दल उदासीन राहून प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानून रहावे. शोक, कलह, आलस्य व भीती यांपासून दूर रहावे. ज्याच्या चित्तांत भीतीचा प्रवेश होतो, त्याच्या आचरणांत चलबिचल होते. भयाकुल पुरुषाच्या चित्ताचे स्वातंत्र्य नष्ट होतें. यासाठी कोणत्याही गोष्टीस कदापि भिऊ नये. जो पुरुष ज्ञानी असतो, त्याचा आनंद अढळ असतो. त्याला कोणत्याही गोष्टीपासून प्रतिरोध होत नाहीं. सर्व स्थलीं, सर्व काली आणि सर्व स्थितींमध्ये त्याचे विचार व कल्पना आनंदजनक व शांतिप्रद असतात. जो सुखदुःखास सर्वस्वी वश होऊन जातो, त्यास अत्यंत भयंकर व विपत्तिकारक परवशता प्राप्त होते. यावरून योग्य सुखाचा यथोचित अनुभव कोणी घेऊं नये, किंवा यथार्थ आशेच्या सौम्य सुखाची गोडी चित्तास वाटूं देऊं नये, असें आमचे म्हणणें आहे असा कोणीं अर्थ काढू नये. उलट आमचे असें म्हणणें आहे कीं, मनुष्यांनी आपलें चित्त नेहमी आनंद युक्त ठेवावे. एवढे मात्र ध्यानांत असू द्यावे कीं, हा चित्ताचा आनंद मनुष्याच्या अंतर्यामापासूनच उद्भवलेला असावा; आणि त्याची प्रतीतिही नेहमीं केवळ हृदयासच व्हावी. इतर सर्व आनंद केवळ क्षुल्लक होत. त्यांपासून बाह्य सुखानुभव कितीही घडला तरी त्याचा अंतर्यामावर यत्किंचित्ही परिणाम घडत नाहीं. खरा आनंद म्हटला म्हणजे तो शांत व गंभीर असतो. केवळ खदखदा हांसण्यानें त्याची प्रचीति घडते असें जे समजत असतील ते हतभाग्य होत. खऱ्या आनंदाचें अधिष्ठान केवळ अंतर्यामी असतें. सुखसंपदा तृणवत् मानून, चित्ताचें धैर्य व औदार्य अढळ राखून, जो दृढ निश्चयानें वर्तत असतो, त्याला जो आनंदाचा अनुभव घडतो, तो केवळ अनुपम होय. साक्षात् मृत्यु प्राप्त झाला असताही जो तिळप्राय न डगमगता त्यास तयार होतो, विपन्नावस्था प्राप्त झाली असतां जो यत्किंचित्ही खेद पावत नाहीं, आणि जो आपल्या सर्व वासना व तृष्णा यांचें दमन करितो, अशा पुरुषास अढळ परमानंदाची प्राप्ति होते. योगवाशिष्ठातील पुढील वचनांत हाच भाव व्यक्त केला आहे :-

भोगौघवासनां त्यक्त्वा त्यज त्वं देहवासनाम् ।
भावाभावौ ततस्त्यक्त्वा निर्विकल्पः सुखी भव ।। *

सामान्य जनांची ग्राम्य सुखे केवळ निराधार, असार व बाह्य होत. परंतु वर निर्दिष्ट केलेले ज्ञानी पुरुषांचे सौख्य सारवत् असून शाश्वत असतें. आपल्या ह्या शरीराचे मोठेसें महत्त्व आहे असें नाहीं. तें आत्म्याचे केवळ निवासस्थान आहे. **अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।। **** या गीतावचनांतही हाच आशय व्यक्त केला आहे. यास्तव त्यास होणारी सुखे केवळ क्षणिक व विफल होत. परंतु चित्ताचें स्वास्थ सुविचार, सत्कर्मे आणि प्राप्त प्रसंगांविषयी औदासीन्य ही ज्यांच्या ठायीं असतात, त्यांस अपार, अपरिमित, परिपूर्ण सौख्याचा अनुभव घडतो.

---

* भोगाविषयीं एकसारखी होणारी वासना सोडून देऊन देहाची वासना सोड. त्याचप्रमाणें भाव व अभाव यांचा त्याग करून निर्विकल्प सुखी हो.

** देह तंव नाशवंत। आत्मा नाशरहित मुक्तेश्वर.

भाग दुसरा

मानवी सौख्याचा पाया ज्ञान आणि नीति यांवर आहे

मानवी सौख्याचा पाया ज्ञान आणि नीति यांवर आहे, असें गृहीत धरून या दोन्ही मुद्यांचें विवेचन क्रमशः करूं. प्रथमतः ज्ञान सदाचारास व मानवी सौख्यास कितपत साहाय्यभुत आहे तें पाहूं.

ज्ञान म्हणजे काय

ज्ञान म्हणजे योग्य समजूत होय. बऱ्यावाईटाची निवड करून कोणती गोष्ट इष्ट व कोणती त्याज्य याचा निर्णय ज्ञानाच्या योगाने करितां येतो. वस्तुमात्राची वास्तविक योग्यता लक्षांत आणून तदनुरूप विवेक करावयाचा; त्यांविषयीं सामान्य जनांमध्यें जो अभिप्राय असतो, त्यावर मुळींच विश्वास ठेवावयाचा नाहीं, यास ज्ञान म्हणतात. या ज्ञानाच्या योगाने आपण आपलें भाषण व आचरण जपून करितो. संपदा किंवा विपदा प्राप्त झाली असतां तीमुळे चित्ताची समता नष्ट होऊं देत नाहीं. गतकालीं ज्या गोष्टी घडल्या, व भविष्यकालीं ज्या गोष्टी घडावयाच्या, त्याचप्रमाणे ज्या गोष्टी अनित्य असतात, किंवा ज्या शाश्वत असतात, त्याविषयी या ज्ञानाच्या साहाय्यानें आपण विवेक करितो. या ज्ञानाच्या योगाने आपणांस कालानुरूप प्राप्त होणाऱ्या स्थितीचें व आपल्या मनाचे स्वरूप आणि व्यापार यांचें परीक्षण करितां येतें. लोभ्याला जशी द्रव्याची आवड असते, तद्वत ज्ञान्याला तत्वदर्शनाची आवड असते. नेत्रांचा उपयोग जसा पाहणे हा आहे, आणि जिव्हेचा उपयोग जसा बोलणे हा आहे, तद्वत् ज्ञानाचा उपयोग म्हटला म्हणजे त्यामुळें मनुष्यांच्या ठायीं समंजसपणा येतो हा होय. जो पूर्ण ज्ञाता असतो, तो पूर्ण सुखी असतो. म्हटले आहे : **'नास्ति ज्ञानात्परं सुखम्'*** फार काय पण ज्ञानप्राप्तीस नुसता आरंभ झाल्यानेच आपलें हे जीवित आपणांस सुखकर वाटू लागतें. एवढे समजल्याने आपण कृतकृत्य झालो असें कोणीही समजता कामा नये. नित्य मननाने हें रहस्य आपल्या मनांत पूर्णपणे बिंबविण्याविषयी आपण म्हटलं पाहिजे. असें केल्यावाचून कोणतीही चांगली सवय आपणांस लागून, तदनुसार वर्तन करण्याची इच्छा आपल्या ठायी उत्पन होण्याचा मुळींच संभव नाही. आपण ज्या गोष्टींचा दुसऱ्यांस बोध करितो, त्यांप्रमाणें स्वतांचे आचरण ठेविले पाहिजे. म्हटलें आहेः 'जनी बोलिल्या सारिखे चाल बापा.' ज्ञान ही काही लोकांत केवळ मिरविण्याची गोष्ट नव्हे; त्याचप्रमाणें त्यासंबंधाने नुसते शब्दपांडित्य केलें म्हणजे आटपले असें कदापि समजता कामा नये; तर तदनुरूप आपलें आचरण ठेवण्याविषयी झटले पाहिजे. म्हटले आहे, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.' मनास करमणूक व्हावी, किंवा फुरसतीचा वेळ चांगल्या प्रकारे जावा म्हणून ज्ञानाचा अभ्यास करावयाचा

---

* ज्ञानाहून दुसरे श्रेष्ठ सुख नाही.

नाही. तर त्याच्या योगेकरून आपले मन सुसंस्कृत व्हावे, आपल्या आचरणाचे नियमन व्हावे, आणि आपण करावे काय व करूं नये काय याविषयी बोध प्राप्त व्हावा, यासाठीं त्याचें संपादन करावयाचें. या संसाररूप सागरामध्ये आपली ही जी देहरूप नौका चालली आहे, तिचे सुकाणू ज्ञानाच्या स्वाधीन असल्यानें तें तिला मोठमोठ्या बिकट संकटांतून पार नेते. त्यावांचून हें मार्गक्रमण कधीही बिनधोकपणें व्हावयाचें नाहीं. प्रतिघडीस असे प्रसंग येत असतात की, त्यांत ज्ञानाचे अगत्य पडते. 'ज्ञानावीण जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा' या उक्तीतही हेंच सांगितलें आहे. जीवितांतील एकंदर कर्तव्यें कोणत्या प्रकारे बजवावी हें ज्ञानाच्या साहाय्याने आपणांस कळतें. आपल्या मातापितरांशीं कोणत्या प्रकारे पुत्रधर्मास अनुसरून आपण वर्तन करावे, आपल्या मित्राशी कशी निष्कपटपणाची वागणूक ठेवावी, विपन्न स्थितींतील मनुष्यास कोणत्या प्रकारे साहाय्य करावे, कोणी आपणांस सल्लामसलत विचारल्यास त्याला ती कशी विवकेशुद्धरीतीनें द्यावी, इत्यादि गोष्टींचा बोध ज्ञानापासून प्राप्त होतो. त्याच्या योगाने कोणत्याही गोष्टीविषयी भीति न वाटून चित्तास शांति प्राप्त होते; आणि कशाचाहि लोभ वाटेनासा होऊन सर्व निवंता दूर होतात.

ज्ञानी पुरुष सर्व स्थितीमध्ये स्वकर्तव्य करितो

या संसारामध्ये अशी कोणतीही अवस्था नाही कीं जीत ज्ञानी पुरुष स्वकर्तव्यापासून पराङ्मुख होईल. तो संपन्नावस्थेत असला तर तीपासून तो आपल्या चित्तास व्यामोह होऊं देत नाहीं. तो विपन्नावस्थेत असला तर तीपासून प्राप्त होणाऱ्या विपत्तीमुळे तो चित्तास खेद होऊं देत नाही. त्याला धनधान्याची विपुलता असली तरी तो आपल्या सदाचरणापासून च्युत होत नाहीं; आणि त्यास सर्व प्रकारची ददात असली तरी त्याची नीति अढळ राहते. 'निजनेमा रक्षिजे बुद्धिवती' या मुक्तेश्वराच्या उपदेशाप्रमाणे त्याचे वर्तन असतें. स्वदेशांत राहून जर त्यास नीत्याचरण करितां आलें नाहीं. तर परागंदा होऊन तेथें तो तें अप्रतिहतपणे करील. त्याला सेनापतित्व प्राप्त झाले नाहीं तरी त्याबद्दल विषाद न मानितां, तो सामान्य योद्ध्याचे काम मिळाले असतां तें मनापासून करील. ज्ञानी पुरुषाच्या या चित्ताच्या समतेचे वर्णन पुढील साधूक्तीत उत्तम प्रकारे केले आहेः–

क्वचित्कंथाधारी क्वचिदपि च दिव्यांबरधरः ।
क्वचिद्भूमीशय्यः क्वचिदपिच पर्यकशयनः ।।
क्वचिच्छिक्षावृतिः क्वचिदपिच मिष्टाशनरुचिः ।
महात्मा योगज्ञो न गणयति दुःख न च सुखम् ।।*

सारांश काय की, केवढेही बिकट प्रसंग प्राप्त झाले तरी त्यांत त्याची वागणूक सर्वदा निर्दोष व धैर्याची असेल. ज्ञानवृद्ध पुरुषाच्या या धैर्याचें वर्णन पुढील उक्तींत मोठ्या खुबीने केलें आहे.

* महापृष्ठी केव्हा अवचट पलंगी पहुडतो, क्षुधेते शाकान्ने अवचट सदन्नेहि निववितो, कधीं कंधाधारी अवचट सुवस्त्रीं मिरवतो मनस्वी कार्याधी किमपि सुखदुःखे न गणितो. वामन.

पतति व्यसने दैवाद्दारुणे दारुणात्मनि ।
संवर्धयति वज्रेण धैर्येण महतां मनः ।। * सु.

हे प्रसंग कितीही भयकर असले तरी ज्ञानी पुरुषास ते प्राप्त झाले असता त्यांचें भयंकरत्व तत्काळ नष्ट होतें. ज्ञान जें आहे तें कांहीं आपल्या देहाचे सामर्थ्य किंवा कौशल्य वाढवीत नसतें; तर त्याच्या योगाने आपलें मन सुसंस्कृत होतें. त्याच्या साहाय्याने आपणांस व्यवहारातली शस्त्रादि साधने कशी योजावी हें कळत नसतें: तर आपल्या जीविताचे कोणत्या प्रकारे नियमन करावे हे आपणास समजत असतें. त्यामुळें आपलें केवळ जीवितधारणच होऊन रहात नाही. तर त्यांत सौख्याचाही अनुभव घडतो. कोणत्या गोष्टी खरोखर बऱ्या आहेत किंवा वाईट आहेत, व कोणत्या तशा वरवरून दिसतात मात्र, हें ज्ञानाच्या साहाय्याने कळतें. खरा मोठेपणा कशात आहे आणि खोटा मोठेपणा कोणता, याविषयी विवेक करणें; जड विषयांकडून आपलें चित्त काढून आध्यात्मिक विषयांकडे लागसें करणें; निसर्गाचे सुक्ष्मरीत्या अवलोकन करून, या जीवितांत कोणत्या नियमांनी वर्तन केलें असतां वास्तविक सौख्य प्राप्त होईल तें ठरविणे, ह्या गोष्टी ज्ञानाच्या साहय्यानें मनुष्यास अवगत होतात. या संसारांत जे आकस्मित् प्रसंग प्राप्त होतात, ते सारे निसर्गसिद्ध होत, असें ज्ञानाच्या योगाने समजते. ज्या पुरुषास हे ज्ञान प्राप्त झाले असते, तो वस्तुमात्राची वास्तविक योग्यता जाणतो; असत्य मतांपासून तो मुक्त असतो; ज्या सुखविषयांचा अनुभव घेतला असतां परिणामी चित्तास अनुताप प्राप्त होतो, त्यांचा तो मनापासून अव्हेर करतो; आणि जी गोष्ट सर्वदा चांगली असण्याचा संभव नसतो, ती तो कदापि चांगली समजत नाहीं. ज्या मनुष्यास अंतर्यामींच्या सौख्यावाचून इतर कोणत्याही सुखाची अपेक्षा वाटत नसते, तोच खरा सौख्यवान् समजावा. त्याचप्रमाणे ज्यास आपल्या इंद्रियांचा व मनाचा उत्तम प्रकारे निग्रह करितां येतो, तोच खरा थोर किंवा समर्थ समजावा. मानवी जीवितामध्यें खरें सौख्य काय तें हेंच होय. हे सौख्य कशानेंही बिघडावयाचें किंवा नाश पावावयाचें नाहीं. मनाच्या निग्रहाचें महत्त्व पंचदशीतील पुढील वचनांत उत्तम प्रकारे निर्दिष्ट केले आहेः–

मन एव मनुष्याणा कारणं बन्धमोक्षयोः ।
वन्धाय विषयासक्त मुक्त्यै निर्विषय स्मृतम् ।।**

शुद्ध विवेकानें मानवी स्वभावाची पुर्णता सिद्ध होते

ज्ञाता पुरुष कोणत्याही स्थितीमध्यें असला तरी तो सदोदित सुखी असतो. कारण तो सर्व गोष्टी आपल्या कह्यांत ठेवितो; आणि नेहमी विवेकवश राहून आपली सर्व कृत्यें विचारपूर्वक करितो; केवळ रागद्वेषांस वश होऊन अविचार असा तो कदापि करीत नाहीं. कितीही घोर विपत्ति प्राप्त झाली तरी तो सहसा डगमगत नाहीं. युद्धसंग्राम, अग्निप्रलय आदिकरून महापत्ति प्राप्त झाल्या तरी त्याच्या चित्ताची स्थिरता नष्ट होत नाही. परंतु जो मूर्ख असतो, तो आपल्याच सावलीला घाबरतो. जी जी अनिष्ट गोष्ट घडते ती ती आपल्या नाशासाठी आहे, असें त्याच्या मनांत येऊन तो भयचकित होतो. ज्ञाता पुरुष कोणतीही गोष्ट करितांना असंतोष दर्शवीत नाही. कारण ज्या गोष्टी करणे अवश्य आहे असें त्याला दिसून येतें, त्याच

---

* दैवयोगाने केवढेही भयंकर संकट प्राप्त झाले असता महापुरुषांचे मन धैर्यरूपी वस्त्राच्या योगाने रक्षिलें जाते.

** मन हेच मनुष्यांच्या बंधनाचे व मोक्षाचे कारण आहे. मन विषयासक्त झाल्याने बन्ध प्राप्त होतो. आणि तें निर्विषय झालें असतां मोक्ष मिळते.

फक्त तो हातीं घेतो. मानवी जीविताचा उद्देश काय आहे व त्याचें सार्थक्य कशाने होईल याविषयीं तो स्वचित्ताच्या ठायीं विवेक करीत असतो, आणि या उद्देशास जें कांहीं अनुकूळ असतें तें तो करीत असतो, आणि जें त्यास प्रतिकूल असते त्याचा तो अव्हेर करीत असतो. आपली स्थिति कशीही असली तरी तीत तो समाधान मानून असतो. जें त्याला अनुकूल नसतें, त्याची तो अपेक्षा करीत नसतो. निसर्गातील एकंदर व्यापार जसे शांतपणे व व्यवस्थितपणे चालत असतात, तद्वत् त्याचे एकंदर व्यवहार चालत असतात. त्यांत गडबड किंवा घोटाळा कांहींच नसतो. संकटप्रसंग आले असतां तो घाबरून जात नाहीं; आणि कोणतेही बिकट प्रसंग तो आपल्यावर मुद्दाम ओढून घेत नाहीं. हे बिकट प्रसंग टाळण्यांत त्याचा भितरेपणा मुळींच दृष्टीस पडत नाहीं; तर तो सर्वदा सावध असतो म्हणून ते टळतात. प्रतिबंध, जखमा किंवा शृंखला यांची जी भीती वाटते, ती केवळ व्यर्थ होय असें तो मानतो. जें कांहीं तो हातीं घेतो, तें तो साधेल तेवढे उत्तम प्रकारें करण्याचा निर्धार करितो. कारण तो ज्ञानसंपन्न असल्या कारणानें सर्व व्यावहारिक कलांमध्यें निपुण असतो. ज्या गोष्टींच्या संबधाने त्याच्या मनांत संशय उत्पन्न होतो, त्यांविषयीं तो फारच सावध असतो. ऐश्वर्य प्राप्त झालें असतां तो उन्मत्त होत नाहीं आणि दारिद्र्य प्राप्त झालें असतां चित्ताची स्थिरता नष्ट होऊं देत नाहीं. जी जी अवस्था त्याला प्राप्त होते, तीमध्यें तो सुख मानून रहातो; आणि कसेही प्रसंग प्राप्त झाले तरी त्यापासून स्वहित साधण्याविषयी तो सर्वदा तत्पर असतो. कांहीं प्रसंग असे असतात कीं, त्यापासून त्याच्या चित्तास थोडासा उद्वेग प्राप्त होतो; तथापि त्यामुळे तो मुळींच घाबरत नाहीं. उदाहरणार्थ देहास एकादा दुःसाध्य व्याधि जडला असतां, प्रिय पुत्र किंवा मित्र मृत्यु पावला असतां, किंवा परचक्र येऊन स्वदेशाचा नाश झाला असतां, त्याला खेद होणें साहजिक आहे. ज्याला या दुःखद संकटप्रसंगांमुळें कांहींच खेद होत नाहीं, तो केवळ पाषाणहृदय असला पाहिजे. दुसरें असें कीं, ज्याच्या चित्तास अशा संकटप्रसंगांबद्दल मुळींच विषाद वाटत नाहीं, त्यानें ती सहन केली तर तो त्याचा सद्गुण म्हणतां येत नाहीं.

ज्ञानी पुरुषाच्या तीन अवस्था

ज्ञानी पुरुषाच्या तीन अवस्था आहेत. पहिल्या अवस्थेतील पुरुषास तत्वदर्शन घडले असतें; परंतु त्याची त्यास पूर्ण प्राप्ति झालेली नसते. त्यास स्वकतर्व्यज्ञान प्राप्त झालें असतें. तथापि त्या ज्ञानानुरूप आचरण करण्याचा त्यास अभ्यास घडलेला नसतो. त्यास पुनरपि दुःस्थिति प्राप्त होण्याची भीती नसते. तरी पण त्याच्यावर दुष्ट संवईंचा थोडाबहुत अंमल असतो. त्यामुळें ज्या गोष्टी सर्वथा इष्ट नसतात, किंवा ज्याविषयी फारशी अपेक्षा करण्यासारखी नसते, अशा गोष्टींविषयी त्याच्या ठायीं उत्कंठा उद्भवण्याचा दृढ संभव असतो. दुसऱ्या अवस्थेमधल्या ज्ञानी पुरुषानें विषयतृष्णा कांहीं काळ जिंकिलेली असते; तथापि पुनरपि तिचा पगडा त्याच्यावर बसण्याचा संभव असतो. तिसऱ्या अवस्थेमध्ये त्याच्या ठायींची बहुतेक दुर्व्यसने नष्ट झालेली असतात; तरी पण सर्वच व्यसनांपासून तो निवृत्त झालेला नसतो. उदाहरणार्थ तो लोभी नसला तरी त्याची वृत्ति कदाचित् तापट असेल; कांहीं गोष्टींच्या संबंधाने त्याचा निश्चय दृढ असला तरी दुसऱ्या कांहीं गोष्टींसंबंधाने त्याच्या चित्ताची दुर्बलता व्यक्त होईल. मृत्यूविषयी त्याच्या हृदयांत भीति वसत नसली तरी थोडीशी दुःस्थिति प्राप्त झाली असतां त्याचें मन अस्वस्थ होईल. याप्रमाणे ज्ञानी पुरुषाच्या ह्या निरनिराळ्या अवस्था आहेत. तरी पण त्यांत उच्चनीच असा कांहींच भेद करणें युक्त नव्हे. एक विशेष प्रेमळ असेल; दुसरा विशेष कुशाग्रबुद्धि असेल; तिसरा विशेष चांगला वक्ता असेल; तथापि परिणामी त्या सर्वास सौख्यप्राप्ति समानच व्हावयाची.

भाग तिसरा

सदाचरणावांचून सौख्य नाहीं

हे जीवित सौख्याचे व्हावयास जो परिपूर्ण चांगुलपणा लागतो, तो सदाचरणाने प्राप्त होत असतो. या मर्त्यलोकीं अमर असें एक सदाचरण मात्र आहे. सदाचरणाच्या योगानें चित्तास जी थोरवी प्राप्त होते ती कशानेंही नष्ट होत नाहीं. भाग्यशालीपणाने ती वृद्ध पावत नाहीं, किंवा विपत्तीने ती कमी होत नाहीं. सदाचरणी पुरुष सहवासप्रिय, सौम्य, स्थिर, धैर्यशाली, स्वतंत्र, तृप्त व सर्वदा आनंदी असून, सद्वर्तनाविषयी केवळ निरपेक्ष प्रेम त्याच्या ठायीं वसत असतें. एकादा माणूस चांगला कुशल वैद्य असेल, किंवा चांगला हुशार वैयाकरण असेल, किंवा चांगला दक्ष सेनापति असेल; तथापि त्याच्या ठायीं नीति नसेल तर त्यास सत्पुरुष म्हणतां येणार नाहीं. कोणतेंही कृत्य वाईट किंवा बरें म्हणावयाचें तें ज्या गोष्टीसंबंधानें असेल तिच्या अनुरोधानें नव्हे; तर तें नीतीस अनुसरून आहे किंवा कसें तें पाहून त्याच्या स्वरूपाचा निर्णय करावयाचा. विजयी सेनापति ज्या पराजित योद्ध्यास बंदिवान् करून घेऊन चाललेला असतो, त्यांपैकीं कित्येक असे असतील कीं, ते त्या सेनापतीहून सदाचरणानें थोर असतील. आपल्या ठायींच्या प्रामाणिकपणापेक्षां आपल्या या हाडामांसाच्या देहाची मातबरी जास्त मानू लागलो की आपला नाश झालाच म्हणून समजावे.

आपले इष्टमित्र किंवा इतर प्रिय वस्तु यांचा नाश झाला तरी चिंता नाहीं; परंतु आपली नीति कदापि नष्ट होऊं देऊं नये. एकाद्या मनुष्याचे पुष्कळ मित्र असले तर तो विशेष शहाणा होतो, किंवा त्याचे सर्व मित्र नाहींतसे झाले तर तो मूर्ख होतो, अशांतला कांहीं अर्थ नाहीं. तद्वत्च त्याचें सौख्य किंवा विपत्ति त्याच्या इष्टमित्रांवर कदापि अवलंबून नसते. त्याचप्रमाणे अकालिक मरण, शोक किंवा पीडा यांपासून सदाचरणात कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय घडत नसतो. सदाचरणी पुरुषाच्या देहांत कोणत्याही प्रकारचे व्यंग असलें, किंवा त्याची संसारिक स्थिति कितीही निकृष्ट प्रतीची असली तरी त्याचें तेज कदापि लोपत नाहीं. त्याची लोकांनी कितीही निंदा किंवा उपहास केला तरी त्याच्या ठायींच्या सदाचरणाचा महिमा जरा सुद्धा कमी होत नाहीं. त्याची ऐहिक स्थिति कितीही प्रतिकूल असली तरी त्याचें सद्वर्तन कदापि लपावयाचें नाही. परंतु दुष्ट मनुष्याचे वैभव केवढेही असलें, व त्याचा बडेजाव कितीही मोठा असला, तथापि त्याचें अंतर्याम किती दुष्ट आहे तें, जो त्याची एकंदर स्थिति सुक्ष्म दृष्टीने पाहील, त्याच्या लक्षांत आल्यावाचून रहाणार नाहीं.

सदाचरणाचें महात्म्य

सत्पुरुषाच्या मनाची स्थिति पाहिली असतां ती अतिशयित उत्तम व गंभीर असते. त्याचें तेज असें अलौकिक असतें की, त्याच्या दर्शनाने सामान्य मनुष्याच्या चित्तांत प्रेमभाव व पूज्यताबुद्धि ह्या वृत्ति उत्पन्न

होतात; आणि त्यास पाहणाऱ्याला वाटतें कीं, आपण त्याच्या दर्शनानें धन्य झालो. सदाचरणाची शोभा आणि प्रभाव इतका विलक्षण असतो की, अतिशयित दृष्ट मनुष्याला देखील तें प्रशंसनीय वाटतें; आणि आपणांस लोकांनीं सदाचारी म्हणावें एतदर्थ ते सदाचरणाचा आव घालितात. आपल्या दुष्ट कृत्यांच्या योगाने जी फलप्राप्ति व जे हित होईल, त्याचा तर त्यांस अभिलाष असतोच; तथापि त्यांस कोणीं दुराचारी म्हटल्यास ते लज्जित होतात आणि त्याचा तिटकारा करितात. सदाचरणाचे महात्म्य त्यांस अवगत असून त्याला तें परम मान्य व पूज्य वाटते. तथापि तदनुसार त्याचे वर्तन मुळीच नसते. त्यांच्या हातून जे माठे मोठे दुराचार घडत असतात, त्यांवर ते, न्यायीपणाचें सोंग करून, झांकण घालू पाहतात. वाटमारे लोक प्रवाशांस लुटून जे द्रव्य मिळवितात, तेंच इतर प्रकारें प्राप्त झालें असतां त्याला विशेष सुख वाटतें. लुटालूट, लुच्चेगिरी किंवा जुलूम करून पोट भरणाऱ्या मनुष्यास प्रामाणिकपणानें वित्त प्राप्त झालें असतां विशेष सुख व आनंद वाटणार नाहीं कीं काय, असें त्यास विचारून पाहा; म्हणजे तो लागलीच कबूल करील कीं, इतर योग्य मार्गानी धन प्राप्त होण्यासारखे असल्यास आपला अयोग्य मार्ग सोडण्यास आपली तयारी आहे. सदाचरणाचा प्रकाश प्रत्येकाच्या अंतर्यामीं असतो. ह्या प्रकाशाच्या साहाय्याने आपण वागलो असतां सदाचारी व सुखी होऊं हें आपणांस माहीत असते. तथापि तद्नुसार आपल्याकडून वर्तन मात्र होत नसतें. सत्ताधीश पुरुष आपल्या अधिकारबलाने एकाद्या सदाचारी पुरुषास प्रतिबंधांत ठेवून नाना प्रकारी पिडीत असला तरी त्या सत्ताधीशाहून तो सदाचारी बंदिवान् सुखी असतो. हा प्रभाव केवळ सदाचाराचाच होय. त्याचप्रमाणे रोगानें पिडलेला सदाचारी मनुष्य सदाचारहीन आरोग्यसंपन्न मनुष्याहून सुखी असतो. कारण सदाचारी मनुष्य आपल्या रोगापासून होणारी पीडा मोठ्या धैर्यानें सहन करीत असतो; त्याबद्दल तो खेद किंवा चिंता मुळींच करीत नसतो. मनुष्य सदाचारी असला म्हणजे त्याला विपत्तीची परवा वाटत नाहीं; तीमुळे तो खिन्न किंवा उदास होत नाहीं. त्याचप्रमाणे त्याला ऐश्वर्य प्राप्त झाले असतां, त्यांत तो बेताबातानें वागून अगदीं निर्दोष रहातो. कारण विपत्ति किंवा संपत्ति प्राप्त झाली असतां, त्याच्या मनाची समता अगदीं नष्ट होत नाहीं. भारतांतील पुढील विदुरोक्तीस अनुसरून त्याचें वर्तन असतें:-

सुखंच दुःखच भवाभवौच ।
लाभालाभौ मरणं जीवितंच ।
पर्यायशः सर्वमेते स्पृशन्ति ।
तस्माद्धीरो न च हृष्येन्न शोचेत् ।।*

त्याच्या वर्तनक्रमांत मुळीच फरक पडत नाहीं. ज्याप्रमाणें अग्नींत टाकलेली प्रत्येक वस्तु अग्निरूपच बनते, तद्वत् सदाचारी मनुष्यास कोणतीही स्थिति प्राप्त झाली तरी तिला सदाचाराचे वळण प्राप्त होतें. त्याचीं सर्व कृत्ये आणि स्नेहसंबंध नीतीस अनुसरून असतात; आणि ज्या ज्या मनुष्याशी त्याचा संबंध घडतो, त्याला तो अत्यंत प्रेमळ वाटतो. इहलोकीं ज्या वस्तु क्षणभंगुर व नाशवंत असतात, त्यांस उत्पत्ति, विनाश, वृद्धि, क्षय, व रूपांतर हे विकार असतात. परंतु ज्या वस्तु सर्वदा एकरूप असतात, त्या सर्वोत्कृष्ट समजावयाच्या. सदाचार हा अशा वस्तूंपैकी एक होय. एकादी गोष्ट करावयास अवघड असली म्हणजे

* सुख, दुःख, भव, अभव, लाभ, हानि, मरण, जीवित ह्या साऱ्यांचा अनुभव पर्यायाने प्राप्त होतो. तस्मात् धीर पुरुषाने हर्ष किंवा शोक मानूं नये.

सदारचरणास अडथळा येतो, किंवा एकादी गोष्ट करावयास सोपी असली म्हणजे तें आपल्या हातून सहज रीतीनें घडते, अशांतला कांहीं अर्थ नाहीं. सदाचारी पुरुष राव असो कीं रंक असो, आजारी असो कीं निरोगी असो, सशक्त असो कीं अशक्त असो, त्याच्या सदाचरणास कोणत्याही गोष्टीनें प्रत्यवाय येण्याजोगा नाहीं. हाच मतलब पुढील वचनांत ग्रथित केला आहे:-

स्वभाव न जहात्येव साधुरापद्गतोऽपिसन् ।
कर्पूरः पावकस्पृष्टः सौरभं लभतेतराम ।। सु० र० *

सद्धेतु सत्कृत्याप्रमाणेच मान्य समजावा

एकाद्या मनुष्यास सदाचरणाचे नियम पाळावेसे वाटत असून, तद्नुसार त्याच्याकडून वर्तन घडले नाहीं तरी त्याच्या मनांत सदाचाराच्या कल्पना निरंतर घोळू लागून, तद्नुसार स्ववर्तन ठेवण्याविषयीं तो संकल्प करीत असला तर तेवढ्यानेंच तो प्रशंसेस पात्र होतो. त्याच्या हातून त्याच्या संकल्पांप्रमाणे वर्तन घडले नाहीं तरी कांहीं चिंता नाहीं. सदाचारी व्हावयाची इच्छा धरून सत्कृत्ये करण्यांत आयुष्याचा व्यय करण्याविषयी केवळ संकल्प केल्यानेही मनुष्याचा थोरपणा व्यक्त होतो. हे मनातील संकल्प सिद्धीस नेणें सर्वांसच साधत नसतें. कारण तसें करण्यास पुष्कळ अडचणी येतात. अशा प्रकारे सत्संकल्प करणारा मनुष्य आपले हेतु सिद्धीस नेण्यासाठी कायावाचामनेकरून झटत असला तरी कधीं कधीं त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होतात. याप्रमाणे त्यास स्वकार्यांत सिद्धि प्राप्त झाली नाहीं तरी त्यानें प्रयत्न केला एवढ्याच कारणास्तव तो मान्य समजावयाचा.

इतर मनुष्यांच्या मृत्यूची वार्ता श्रवण करून जसे मला कांहींच वाटत नाही, तद्वतच मला स्वतःला मृत्यु प्राप्त झाला असतां मी जरासुद्धा खिन्न होणार नाहीं. या जगांत मला संपत्ति किंवा दरिद्र्य, लाभ किंवा हानि प्राप्त झाली असतां मी माझ्या चित्ताची समता कायम राखीन. **'संपत्तौ विपत्तौच महतामेकरूपता'**** या साधुवचनाप्रमाणें मी वागण्यास झटेन. मजपाशीं जें कांहीं असेल तें मी कृपणाप्रमाणे राखून ठेवणार नाहीं, किंवा उधळ्याप्रमाणें उधळून टाकणार नाहीं. माझ्या जेवढ्या वित्ताचा व्यय सत्पात्री होईल तेवढेच काय तें वित्त मी उत्तम लेखीन. मजकडून पुष्कळ दानधर्म घडल्यानेच केवळ मी आपणास कृतार्थ समजणार नाहीं. तर हा धर्म मी ज्यास करीन तो सत्पात्र असून त्याचें आचरण निर्दोष आहे असें पाहून मला अत्यंत समाधान वाटेल. अशा मनुष्यास जें धन मी देईन, तेवढे माझें कमी झालें असें मी कदापि मानणार नाहीं. मी जें अन्नोदकाचें सेवन करीन, तें केवळ निसर्गतृप्तीच्याच हेतूनें करीन, रसनातृप्तीसाठीं कदापि करणार नाहीं. माझ्या इष्टमित्रांशीं मी मोठ्या प्रेमाने वर्तेन, आणि शत्रूंशी सौम्य रीतीनें वागून त्यांशीं पुनरपि सख्य करण्यास सर्वदा तयार असेन. एकाद्या मनुष्यात ददात आहे असें माझ्या लक्षांत आलें असतां, मी त्याला लागलीच साहाय्य करीन, तो माझें साहाय्य मागेपर्यंत वाट पाहत रहाणार नाहीं. ही सारी पृथ्वी माझा देश आहे असें मी समजेन; मी या संसारामध्ये अशा रीतीनें वर्तेन कीं, मरणसमयीं माझ्या चित्ताने मला अशी ग्वाही द्यावी कीं, 'मला चांगल्या विषयांचें ज्ञान संपादन करण्याची आवड असून, जेणेकरून मनाला तळमळ

---

* साधु पुरुषाला आपत्ति प्राप्त झाली तरी तो आपला स्वभाव सोडीत नाही; कसा? तर कापुरास अग्नीचा स्पर्श झाला तरी त्यास अधिकच सुवास येतो.

** संपत्ति आणि विपत्ति यामध्ये थोर पुरुष सारखेच असतात.

किंवा अनुताप प्राप्त होईल, असें कर्म करण्यास मी कधीही प्रवृत्त झालो नाहीं; त्याचप्रमाणे मीं दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याविषयी कधीही प्रयत्न केला नाहीं; व स्वतांचें स्वातंत्र्य राखण्याविषयी सर्वदा दक्ष होतों.' सारे जग माझें आचरण पहात आहे, व माझ्या मनांतले विचार समजत आहे असें मानून, मी आपल्या जीवितक्रमाचें नियमन करीन, आणि माझे विचार व कल्पना नेहमी शुद्ध ठेवीन.

सदाचरणाची दोन अंगे – विचार आणि आचार

सदाचरणाची दोन अंगें आहेत– एक विचार आणि दुसरें आचार. पहिलें अंग ग्रंथादिकांच्या पठनाने प्राप्त होते; आणि दुसरे उपदेशाच्या योगानें साध्य होतें. पहिलें अंग प्राप्त झाल्यानें मनावर योग्य प्रकारचा संस्कार होतो; आणि दुसरें अंग प्राप्त झाल्याने संपादिलेल्या ज्ञानानुसारें वर्तन करण्याचा अभ्यास दृढ होतो. या उभय अंगाचे संपादन आपण जितके त्वरित करूं तितके आपलें हितच आहे. याप्रमाणे मनास सुसंस्कार व शुद्धता प्राप्त झाली म्हणजे आपणांस खऱ्या सौख्याचा अनुभव घडूं लागतो. फार काय पण हा संस्कार घडत असताच आपणास त्याच्या फलाचा अनुभव घडू लागतो. आपण व्यवहारांत पाहतों कीं, आपली बाल्यावस्थेतील परतंत्रता आपण वयांत आल्यावर नाहींशी होऊन, स्वातंत्र्य व स्वावलंबन यांचा अनुभव घडू लागला म्हणजे आपणांस मोठे सुख व समाधान वाटत असतें. हें जरे खरें आहे तर आपल्या मनाची बालिशता नष्ट होऊन आपणांस तत्वदर्शन घडले असतां, किती अधिक सुखसमाधान वाटलें पाहिजे? आपली बाल्यावस्था गेली आहे हें खरें; तथापि आपला असमंजसपणा अद्यापि गेलेला नाहीं. विशेष खेदाची गोष्ट ही कीं, आपणांस वयांत आलेल्या मनुष्यांचे सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत, तथापि बालकास अनुरूप अशी जी मनाची दुर्बलता ती आपली अद्यापि नाहींशी झाली नाहीं.

कित्येक गोष्टी दिसण्यांत मोठ्या भयंकर असतात. तथापि त्यांविषयीं लेशमात्रही भीती बाळगण्याचें कारण नसतें. जी गोष्ट प्रामाणिकपणानें प्राप्त झालेली नाहीं, ती चांगली म्हणणे युक्त नव्हे. चांगल्या लोकांस पुष्कळ अडचणी व गैरसोई सोसाव्या लागत असतात. तथापि त्यांचें सदाचरण अप्रतिहतपणे चालू असतें. सूर्य जसा कितीही अभ्राच्छादित असला तरी सर्वथा निर्लेप राहून आकाश आक्रमीत असतो, तद्वत् सदाचारी पुरुषाच्या मनाची स्थिति असते. त्याच्या तेजापुढे इतर सर्व अल्प तेजे व त्याचा प्रकाश अच्छादणारीं सर्व आवरणे क्रमाक्रमाने विनष्ट होतात. सदाचारी पुरुष संकटांस मुळींच मोजीत नाहीं. विस्तीर्ण महासागरांत वृष्टि झाली असतां, जसा त्यांत अल्पमात्रही फेरफार होत नाहीं, तद्वत् केवढाही मोठा घोर प्रसंग सदाचार पुरुषावर आला तरी त्यामुळे तो सहसा डगमगत नाही. ह्या अशा सत्पुरुषाचे वर्णन पुढील सुभाषितांत उत्तम प्रकारे केले आहेः–

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारुगन्धम् ।
छिन्न छिन्न पुनरपि पुनः स्वादुचैवेक्षुदण्डम् ।
दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांत वर्णम् ।
न प्राणान्से प्रकृतिविकृतिर्जायते चोत्तमानाम ।। सु. र. *

* चदंन पुनः पुनः धांसला तरी त्याचा सुगंध कायम असतो; ऊस तोडून त्याचे कितीही तुकडे केले तरी तो गोडच असतो; सोने कितीही वेळां विस्तवांत घालून तावलें तरी त्याचें तेज वाढत जातें; अशीच गोष्ट उत्तम पुरुषाची आहे. त्यांची प्रकृति प्राणांत ओढवला तरी पालटातयाची नाही.

जी गोष्ट योग्य असते, तिची किंमत करितांना ती केवढी मोठी आहे, किंवा ती किती काळ टिकणारी आहे, याचा विचार करूं नये. उदाहरणार्थ असें पाहा कीं, मनुष्याच्या आयुष्यांतला एक दिवस जर सदाचरणांत जाईल तर तो त्याच्या शंभर वर्षींच्या आयुर्दायाहूनही श्रेष्ठ होय. एकाद्या मनुष्यास अशी अनुकळ स्थिति प्राप्त झाली असेल कीं त्याला मोठमोठ्या राज्यांवर किंवा नगरांवर सत्ता चालविण्याचा अधिकार प्राप्त झाला असेल; लोककल्याणास अनुकूल असे कायदे करण्याची बुद्धिमत्ता व अधिकार ही त्यास प्राप्त झाली असतील; राष्ट्राराष्ट्रांमध्ये स्नेहभावाची वृद्धि करून मानवी जातीच्या हितासाठी अनेक संस्था उपस्थित करण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें असेल; परंतु दुसरा एकादा असा असेल कीं, त्यास नेहमी दारिद्र्यमूलक विपत्ति भोगावी लागत असेल: अथवा त्यास स्वदेश त्याग करून परागंदा व्हावें लागलें असेल; तथापि हा दुसरा विपन्न पुरुष पहिल्या अधिकारसंपन्न पुरुषाहून सदाचरणाच्या संबंधानें कोणत्याही प्रकारे कमी नसेल. या विसदृश स्थितीतीत उभय पुरुषांच्या ठायीं विचारशीलता, न्यायप्रीती, वस्तुज्ञान ही समान असून, त्यांच्या मनाची थोरवी सारखीच असेल. कारण सदाचरण करण्याची अनुकूलता सर्वांस सारखीच असते. मग ते राव असोत कीं रंक असोत; अधिकारसंपन्न असोत कीं अत्यंत दुःसह दास्याचा अनुभव घेत असोत. सदाचरणाच्या योगानें एकंदर जगाचे व सदाचरणी मनुष्याचे सर्व स्थितींमध्यें व सर्व ठिकाणी सारखेच कल्याण होत असतें. अमुक एक अडचण आली म्हणून मला सदाचरण करितां आलें नाहीं अशी सबब कोणालाही सांगतां येणार नाहीं. ज्ञात्या पुरुषाच्या ठायीं सदाचरण जसे पूर्णत्वानें आढळतें, तसें तें इतर सामान्य जनांच्या ठायीं आढळत नाहीं; आणि आढळलेच तरी तें केवळ भासमय असतें. सदाचरणाविषयीं नुसत्या गोष्टी सांगणारांच्या ठायीं तें आढळण्याचा संभव फारच कमी असतो. तर अंतःकरणाची शुद्धि होऊन त्यांत तें अंकुरित झालें पाहिजे. सदाचरणाव्यतिरिक्त इतर गोष्टी चांगल्या मानून त्यांविषयीं जो लालसा धरितो, त्याला हें जीवित व तत्संबंधी सर्व सुखे अत्यंत इष्ट वाटतात. यामुळे तो वासनावश होतो. ह्या वासना अनेकविध असून अमर्याद व दुर्जय अशा आहेत. या वासनाचे वर्णन रामदासानें दासबोधामध्ये येणेंप्रमाणें केलें आहे: –

वासना धामीण पडली गळां ।
घालोनी वेटाळें वमी गरळा ।
जिव्हा लळलळी वेळोवेळा । भयानक ।।
सदाचरण अखंड असावें.

एक तास किंवा एक दिवस मनुष्याच्या हातून सत्कृत्य घडून पुरत नाहीं. तर त्याच्या मनांत सदाचरणप्रीति पूर्णपणे बिंबली असून, त्याला सदाचरणाचा दृढ अभ्यास असावा. म्हणजे अर्थात् असें कीं, त्याच्या हातून जें जें कृत्य होईल तें तें नीतीस अनुसरून असावें. कित्येक जन असे असतात कीं, त्यांच्या हातून एकादे शौर्याचे कृत्य होत असतें, परंतु दुसऱ्या कृत्यांत ते पुरा भ्याडपणा प्रगट करितात. दुसरे कित्येक असे असतात कीं, ते दारिद्र्यमूलक विपत्ति धैर्याने सहन करितात, पण अपकीर्तीला मनापासून भीत असतात. अशा स्थितीमध्यें त्यांचें जे कृत्य नीतीस अनुसरून असतें, तें मी स्तुत्य समजतो; परंतु त्या

मनुष्यांस मी तुच्छ मानितों. या मानवी प्रपंचांत चिंता वाहण्यासारख्या ज्या गोष्टी असतात, त्यांपासून जेव्हां आत्मा अलिप्त होतों, तेव्हां त्यास सुस्थिति प्राप्त झाली म्हणून समजावे. अंगीं नीतिमत्ता पूर्णपणे बाणावी असे ज्यास वाटत असेल, त्यानें अहर्निश मनापासून उद्योग केला पाहिजे. जो लोभ जिंकितो आणि खरा सात्विक असतो, तो ऐहिक सुखतृष्णेस सहसा वश होत नाहीं. म्हटले आहे: **'निस्पृहस्य तृण जगत्'** * मरणसमय संनिध आला असता, त्याबद्दल तो यत्किंचित्ही विषाद मानीत नाही. हा निसर्गक्रमच आहे असें मानून तो त्यास सर्वदा तयार असतो. अकालिक मृत्यू प्राप्त झाला हें आपणास मोठे शासन झाले, असें तो कधींही मानीत नसतो. जो आपल्या विषयवासनेचें दमन करितो, त्याला इतर वासना सहज आवरिता येतात. त्याची विवेकशक्ति इतकी प्रबल असते कीं, त्याला कोणत्याच व्यसनापासून बाधा होत नसते. अशा विवेकशील व निर्दोष पुरुषास दुलौकिकाची मुळीच परवा नसते. लोक आपल्याविषयी काय म्हणतात हें समजून घेण्यापेक्षा आपलें स्वतांचे अंतर्याम आपणाविषयी काय सांगते याची त्याला परवा अधिक असते. सॉक्रेटिसावर खोटा दोषारोप होऊन, शेवटीं त्यास विषप्राशन करून मरणाची शिक्षा झाली तरी त्यानें जरा सुद्धा न घाबरतां, ती शिक्षा धेर्याने सोशिली. जो ज्ञाता असतो, त्याला कोणी खरा दोष दिला असतां त्याबद्दल त्यात आनंदच वाटतो. आपण केलेल्या सत्कृत्यांची प्रसिद्धि व्हावी असें ज्यास वाटत असतें. त्याला सदाचारी म्हणण्यापेक्षां डौली म्हणणे विशेष युक्त होय. जेथे मान्यता विशेष वाटण्यासारखी असते, तेथेंच फक्त न्यायाने वागले म्हणजे झालें, असें कोणीं समजता कामा नये; तर दुलौकिक किंवा मोठा धोका प्राप्त व्हावयाचा असला तरी देखील न्यायापासून सहसा च्युत व्हावयाचें नाहीं, असा निर्धार करणें इष्ट होय. हाच उपदेश भर्तृहरि पुढील वचनांत मोठ्या जोरदार शब्दानी करतो :-

निंदंतु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु ।
लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्ठम् ।
अद्यैव वा मरणमस्तु युगांतर वा ।
न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ।।**

सदाचरण कदापि लपत नाहीं

सदाचरण लपत नाहीं. तें कांहीं छुपले तरी योग्य समय आला म्हणजे पुनरपि त्याचा उदय होतो. सदाचारी पुरुषाचा त्याच्या वेळच्या लोकानी कितीही छळ केला असला, व त्याचा दुलौकिक कितीही पसरविला असला, तथापि कालेकरून त्याची योग्यता लोकांस कळून येते; आणि त्याच्याविषयी त्यांच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होते. भवभूतीने आपल्या कृतींच्या संबंधाने जी एक गंभीर उक्ति लिहून ठेविली आहे, ती येथें सदाचरणी पुरुषाच्या सत्कृतीस बहुतेक अशीं लागू आहे. ती उक्ति अशीः-

---

* जो निस्पृह असतो त्याला हें जगत् तृणासमान वाटते.

** वानोत निंदो त सुनीतिमंत । चलो असोवा कमला गृहांत ।
हो मृत्यु आजीच घडो युगांति । सन्मार्ग टाकूनि भले न जाती । वामन.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यते स्ति मम कोपि समानधर्मा ।
कालो ह्ययं हि निरवधिर्विषुला पृथ्वी ।।*

वस्तुतः पाहता सदाचारी पुरुषाची कीर्ति अक्षय्य रहावयाचीं. सामान्य लोकांना तो मान्य होवो किंवा न होवो. तरी खऱ्या ज्ञात्या पुरुषांत त्याची मान्यता सर्वदा व्हावयाची. ही मान्यता प्राप्त व्हावयास कधीकधी पुष्कळ अवधि लागतो. कारण वृथा निंदा व द्वेष करणारांचा जोपर्यंत सुकाळ असतो, व वास्तविक स्थिति काय आहे याचा शांतपणे व निःपक्षपात बुद्धीने शोध व विचार करणारांची संख्या जोपर्यंत बेताचीच असते, तोपर्यंत मनुष्याची खरी योग्यता प्रगट होत नसते. उदाहरणार्थ सॉक्रेटिसाची अवस्था काय झाली ती ध्यानांत आणा. त्याच्या शत्रूंनी त्याची नाना परी फजिती केली. त्याचा दुलौकिक चोहोकडे पसरविला. त्याच्या विषयी लोकांत भलभलत्या कंड्या पिकविल्या. शेवटीं त्यांनीं त्याचा प्राणही घेतला. परंतु नंतर लवकरच त्याच्या शत्रूची लबाडी उघडकीस आली; आणि त्याची खरी योग्यता लोकांच्या लक्षांत येऊन. ते त्याच्या नाशाबद्दल हळहळू लागले. आजपर्यंत ज्या सत्पुरुषास अज्ञान व दुष्ट लोकांकडून नाहक छळ व त्रास सोसावा लागला आहे, त्यांची बहुतकरून सॉक्रेटिसासारखीच अवस्था झाली आहे. कित्येक सदाचारी पुरुष तर जगामध्ये असे होऊन गेले आहेत कीं, ते जिवंत होते तोपर्यंत त्यांची कोणी परवा केली नाहीं. परंतु त्यांच्या मृत्युनंतर त्यांची वास्तविक योग्यता लोकांच्या ध्यानांत आली आहे. आमच्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध साधुवर्य तुकाराम याच्याविषयीं ज्यांस थोडीबहुत माहिती आहे, त्यांस ह्या विधानाची सत्यता सहज पटण्यासारखी आहे.

प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानून रहावे हा आपला धर्म आहे. रामदासाने दासबोधातही असाच निर्धार प्रकट केला आहे. तो म्हणतो:-

आतां कासया रडावे । प्राप्त होतें तें भोगावे ।
ऐसें बोलोनियां जीवे । धारिष्ट केलें ।।

तथापि ही स्थिति प्राप्त करून घेण्याचे माझ्या हाती असल्यास मी ती अत्यंत अनुकूल अशीच पसंत करीन. एकाद्या मनुष्यास वित्तप्राप्तीची इच्छा उत्पन्न झाली असतां, त्याचें चित्त नेहमी उत्कंठा, संदेह, भीती इत्यादिकांनीं व्याप्त असतें. प्रतिक्षणी काय होईल याची चिंता त्यास लागलेली असते. कसाही प्रसंग प्राप्त झाला असतां तो अगदीं घाबरून जातो. जो मनुष्य सुखदुःखाच्या प्रत्येक प्रसंगीं अशा प्रकारे अस्वस्थ होतो, तो देवावर भरिभार ठेवून प्राप्त स्थितीमध्ये संतोष मानून कसा राहू शकेल? आपण सदाचारी असू तर आपणांस आशा, भय, शोक व संकटे यांपासून काहीएक पीडा व्हावयाची नाहीं. ज्याच्या ठायीं सुखोपभोगाचा अभिलाष अनावर झालेला असतो, त्याला अडचणी संकटे, दुःखे किंवा मृत्यु प्राप्त होऊन त्या सुखोपभोगाचा

* जे कोणी आमची अवज्ञा करून ती लोकांमध्ये पसरवितात, त्यांनीं असें समजावें की हा माझा यत्न त्यांजकरितां मुळींच नव्हे. माझ्या सारख्याच निधर्माचा कोण तरी पुढे निपजेल. कारण काल हा अमर्याद आहे, आणि पृथ्वी विस्तीर्ण आहे.

विच्छेद झाला असतां, त्याच्या मनाची स्थिति अगदीं वाईट होणें साहजिक आहे. संपत्ति, प्रख्याति, व लोकप्रीति ह्या एकाद्या मनुष्यास प्रसंगवशात् प्राप्त होणाऱ्या असतात. कित्येकांस त्या फारशी खटपट केल्यावाचून प्राप्त होतात. परंतु सदाचरणाची गोष्ट तशी नाहीं. त्याच्या प्राप्तीसाठी बहुत कष्ट व उद्योग करावा लागतो; आणि सदाचरणाच्या योगाने ज्या अर्थी इतर सर्व चांगल्या गोष्टी प्राप्त होण्यासारख्या असतात, त्याअर्थी त्याच्या प्राप्तीसाठी केवढेही परिश्रम करावे लागले तरी ते करणे इष्ट होय. सदाचारी पुरुषास स्वतांच्या अंतर्यामीच सुखानुभव घडत असतो. बाह्य सुखाची त्यास मुळींच अपेक्षा असते. असा पुरुष आपल्या इष्टमित्रांशी नेहमी ममतेने वागत असतो; आपल्या शत्रूंशी तो कठोरपणाने वागत नाहीं. सर्वदा सर्वांशी तो खऱ्या न्यायानें वर्तन करितो. सदैव अविश्रांतपणे तो उद्योग करितो. आपली एकंदर कर्तव्यकर्मे तो नियमितपणे व व्यवस्थितपणे करितो. अशा साधुपुरुषाचे वर्णन पुढील पद्यद्वयांत केलें आहे:-

वदन प्रसादसदनं सदय हृदय सुधामुचो वाचः ।
करणं परोपकरणं येषा केषां न ते वंद्याः ।। चि. *
अपकारिषु यः साधु स साधुः सभ्दिरुच्यते ।
उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः ।।**

शार्गधरपद्धति

* ज्यांची मुखचर्या अत्यंत प्रसन्न असते, ज्यांचे हृदय दयायुक्त असतें ज्यांची वाणी अमृतरस स्रवणारी असते, ज्याचे शरीर परोपकारी झिजत असतें, असे पुरुष कोणास वंद्य होणार नाहीत?

** कोणी अपकार केला असतां त्याशी जो साधुत्वाने वर्ततो, तोच खरा साधू होय; व उपकार करणारांशी जो साधुत्वानें वागतो, त्याचा तो कसला गुण? असें सत्पुरुष म्हणतात.

भाग चवथा

ज्ञानाच्या योगानें जीवितक्रम कोणत्या प्रकारे ठेवावा हे समजतें

येथवर ज्ञान व सदाचार हीं जी शांतीला अत्यावश्यक आहेत, त्यांचें साधारणत: विवचेन झालें. आतां ही शांति कोणत्या उपायांनी साध्य होण्यासारखी आहे, व तिला प्रतिबंध करणाऱ्या गोष्टी कोणत्या याविषयीं विशेष बारकाईने विचार करूं. प्रथमारंभी ज्या तत्वज्ञानामध्ये आपल्या चालीरीतींचें विवेचन केलेले असतें, आणि सदाचारी व्हावयास आणि ही जीवितयात्रा शांतीनें पार पाडावयास कोणत्या साधनांचा अवलंब करावा याविषयी ज्यांत बोध केलेला असतो, त्या तत्वज्ञानाच्या निरूपणास लागू.

नीति, निसर्ग आणि तर्क असे तत्वज्ञानाचे तीन भेद आहेत

तत्वज्ञान तीन प्रकारचें आहे-नीतिविषयक, निसर्ग विषयक व तर्कसंबंधी. पहिल्या प्रकारामध्यें आपल्या चालीरीतीविषयी विवेचन केलेले असतें; दुसऱ्या प्रकारामध्यें निसर्गगत व्यापारांचे निरूपण असतें; आणि तिसऱ्या प्रकारामध्यें शब्द व युक्ति कोणत्या प्रकारे योजाव्या, आणि कोणी आपणांस फसवू नये, किंवा आपण खोटे तर्क बांधू नये, यासाठीं खऱ्याखोट्याची शहानिशा कशी करावी, या गोष्टी सांगितलेल्या असतात.

वस्तुमात्राची कारणमीमांसा निसर्गविषयक तत्वज्ञानामध्यें केलेली असते. सिद्धांत व युक्ति यांच्या सत्यासत्यत्वाचा निर्णय तर्कविषयक तत्वज्ञानामध्ये केलेला असतो; आणि आपल्या कृत्यांची युक्तायुक्तता नीतिविषयक तत्वज्ञानांत सांगितलेली असते. सॉक्रेटीस म्हणतो कीं, नीतिविषयक तेवढेच काय ते खरें तत्वदर्शन. आणि बरें काय व वाईट काय याचा निर्णय ज्या ज्ञानाच्या योगाने करितां येतो, तेंच काय तें खरें ज्ञान. या संसारांत आपण कोणत्या नियमानीं व कसें दक्षतेने वागावे, हें नीतिशास्त्राच्या योगानें कळतें. हरएक प्रसंगीं काय केलें असतां आपला इष्ट हेतु जो सौख्यप्राप्तीचा, तो सिद्ध होईल हें आपणांस या शास्त्राच्या साहाय्यानें समजते. नीतिशास्त्राचें बळ मोठे विलक्षण आहे. मनुष्य कितीही दुर्बल असला तरी नीतिच्या योगानें त्याच्यांत नवा दम व हुशारी येते. त्याला एकादा मोठा व्याधि जडून तो अगदीं जर्जर झाला असला तरी त्याच्या त्या पीडेचा उपशम नीतिच्या योगाने तत्काळ होतो. कारण असें आहे कीं, ज्यामुळे मनाचा उद्वेग नाहीसा होतो, त्याच्या योगाने देहाला होणाऱ्या पीडेचाही परिहार घडण्यासारखा असतो. वैद्याकडून फार तर इतकेंच घडण्यासारखे असतें कीं, तो रोगाची चांगली परीक्षा करून त्यावर योग्य प्रकारचा औषधोपचार करील, आणि आहारविहारांच्या संबंधानें बेतबात ठेवण्यास सांगेल. परंतु

नीतिज्ञानाच्या योगाने साक्षात मृत्यूची ही परवा वाटेनाशी होते. मग लहानसान रोगांची ती कथा काय? या वरून पाहता नीतिज्ञान सर्व प्रकारच्या आधींस व व्याधींस दिव्य औषध आहे. दारिद्र्य प्राप्त झालें तरी नीतिज्ञानाच्या योगानें आपण मोटे धनाढ्य आहे असें वाटतें; किंवा धनाची मुळी आवश्यकताच भासत नाहीं. नीतिज्ञान आपलें सर्व संकटांपासून रक्षण करिते. कोणाला मरणभीति असते. कोणाला दारिद्र्यमूलक विपत्ति असह्य होते. कोणाला मत्सराने ग्रासलेले असतें. कोणी मनुष्यजातीची एकंदर स्थिति पाहून फारच कष्टी होतात, आणि तीबद्दल देवाला किंवा दैवाला दोष देतात. परंतु नीतिज्ञानाच्या योगाने आपणांस कैद्यांना बंधमुक्त करावेंसें वाटतें; कोणी अपंग किंवा गरजू असल्यास त्याला साहाय्य करण्याची इच्छा होते; एकाद्यावर लोकांनी दोषारोप करून त्यास अव्यवहार्य ठरविलें असतां, त्याला लागेल ती मदत करावी असें मनांत येतें; अज्ञानी मनुष्यांच्या चुका दाखवून त्याला सन्मार्गवर्ती करण्याची बुद्धि होते. नीतिज्ञानाच्या योगाने आपल्या चालीरीतीचें परीक्षण करितां येऊन सन्मार्ग कोणता तें कळतें; ज्या महत्त्वाच्या गोष्टींच्या संबंधाने आपण उदास किंवा आळशी झालेले असतो, त्यांच्या संबंधाने आपल्या मनांत उत्साह उत्पन्न होऊन आपणांस तत्प्रीत्यर्थ उद्योग करावासा वाटतो; ज्या गोष्टींच्या संबंधाने आपला ढिलेपणा असतो, त्यांविषयीं खरी आस्था आपल्या मनांत उत्पन्न होते; आपल्या ठायींचा उद्धटपणा नष्ट होऊन सौम्यपणा उत्पन्न होतो; देहाच्या बंधनांतून मन मुक्त हेऊन त्याचें उच्चतर विचारांकडे लक्ष लागतें.

एक ज्ञाता पुरुष दुसऱ्या ज्ञात्या पुरुषास साहाय्य करितो

जो ज्ञाता पुरुष सदाचारी असतो, तो दुसऱ्या ज्ञात्या पुरुषास आपल्या सत्कृत्यांच्या योगानें साहाय्य करितो. अशा ज्ञात्या पुरुषांचा परस्परसंवाद व सल्लामसलत होणें उचित होय. कारण त्यांचें अशा प्रकारे संघटन झाल्यांने ते एकमेकांचे पाहून एकमेकांच्या चढाओढीने सत्कृत्ये करितात. मनुष्यास अजून पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. यास्तव ज्ञात्या पुरुषांनीं आपआपले शोध व तर्क एकमेकांस कळविणे इष्ट होय. दुष्ट मनुष्याच्या संगतीनें जसा दुसरा दुष्ट मनुष्य विशेषच बिघडून अनेक प्रकारचा अनाचार करण्यास प्रवृत्त होतो, तद्वत्च एक ज्ञाता पुरुष दुसऱ्या ज्ञात्या पुरुषाच्या संघटनानें विशेष सदाचारी होऊन, त्याच्या हातून अधिकाधिक सत्कृत्ये होतात. ज्ञाते पुरुष जो अत्यंत उपयुक्त व उत्तम मित्र असतात, तद्वतच ते उत्तम जानपद असतात. कारण त्याला चांगल्या सुव्यवस्थित राज्यपद्धतीच्या योगानें कोणतें हित होण्यासारखे असतें तें पूर्णपणें कळत असतें. त्याचप्रमाणे जो राज्याधिकार चालवीत असतो, त्याच्या साहाय्याने शत्रूंपासून आपलें रक्षण होऊन, आपलें स्वातंत्र्य कसें कायम रहाते, हें त्यास चांगलें ठाऊक असतें. असा ज्ञाता पुरुष मोठा विद्वान असून सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर असतो. त्याला अभिमान किंवा ताठा कसला तो मुळीच नसतो; तो वृथा डौल कधींच मिरवीत नाहीं. कोणाच्या ठायीं त्यास एकादे दुर्व्यसन दिसून आल्यास, तो त्या व्यसनाचाच तेवढा निषेध करितो. त्या मनुष्यास तो सहसा दोष लावीत नाहीं. कोणाचा मत्सर करावा, किंवा तिरस्कार करावा असें तो काहींच जाणत नाहीं. अशा ज्ञात्या पुरुषास पर्वताची उपमा साजण्यासारखी आहे. पर्वताच्या जवळ गेलें म्हणजे तो मोठा उंच आहेसा भासतो; पण तो दुरून पाहता तितका उंच मुळीच दिसत नाहीं. इतर सामान्य जनांहून ज्ञाता पुरुष श्रेष्ठ असतो. पण त्याचा हा श्रेष्ठपणा उगीच वरकरणी नसतो. मी मोठा थोर आहे असें दाखविण्याचा प्रयत्न त्याच्याकडून मुद्दाम कधींच होत

नसतो. त्याच्या ठायींची योग्यता ज्यांच्या दृष्टोत्पत्तीस येईल, त्यांनीं त्याच्याविषयीं पाहिजे तसे तर्क केले तरी त्यांत त्यास समाधानच असतें. त्याला सुस्थितिप्राप्त झाली नाहीं तरी त्याचें त्यास कांहींच वाटत नसतें. आपली वास्तविक योग्यता त्यास अवगत असते. त्याचे वागणुकीचे नियम अगदीं संक्षिप्त असूनही ते बरेच व्यापक असतात. ज्ञानी पुरुषाची दहा लक्षणें आपल्या संस्कृत सुभाषित ग्रंथांतून सांगितली आहेत, त्या पैकी बरीच सदरील लक्षणांशीं मिळतात. ही लक्षणें येणेप्रमाणे होत:-

अक्रोधवैराग्यजितेन्द्रियत्वं
क्षमादयाशान्तिजनप्रियत्वम् ।
निर्लोभदाताभयशोकहीनं
ज्ञानस्य चिन्हं दशलक्षणानि ।। सु.र. *

निरनिराळ्या विद्या ह्या जिज्ञासातृप्तीची साधने होत त्यांपासून नीतीचा उत्कर्ष होत नाही

निरनिराळ्या विद्यांविषयीं माझे मत पुसाल तर तें असें आहे कीं, ज्या विद्यांच्या योगानें आपणांस प्रपंचांत मोठे साहाय्य होतें, किंवा धनलाभ होतो, त्याविषयी मला फारसें कांहीं वाटत नाही. तथापि अशा विद्यांच्या परिशीलनानें समजूत वाढते. यास्तव तेवढ्यापुरती त्यांची उपयुक्तता मला कबूल आहे. अशा विद्यांच्या अभ्यासाने ज्ञानशक्तीचा विकास होऊं लागतो. मनाच्या आद्य स्थितीमध्ये अशा विद्यांचे परिशीलन करणें उचित होय; आणि त्यांचें ज्ञान असल्यानें कांहीं नुकसान तर होत नाहीच. ह्या ज्ञानाच्या योगाने आपण नीतिमान् होत नाही; तरी नीतिमत्ता आपल्या ठायीं उत्पन्न होऊन वृद्धिंगत होण्यास मात्र त्यापासून अवश्य साहाय्य होतें. आपली साहित्यशास्त्रांत उत्तम गति झाली असली तरी त्या शास्त्रापासून आपल्या वासना व दुर्वृत्ति यांचे दमन करण्यास कांहींतरी साहाय्य होईल काय? ललितकला किंवा गणितशास्त्र यामध्ये आपण मोठे प्रावीण्य संपादन केलें असलें तरी जेणेकरून आपल्या चित्ताच्या ठायीं उद्भवणाऱ्या आशा किंवा भीती यांचें दमन करितां येत नसल्यास त्यांचा काय उपयोग बरें? निरनिराळ्या ऐतिहासिक किंवा पौराणिक वृत्तांतांची किंवा पुरुषांची माहिती करून घेतल्यानें, आपल्या चित्तास वेळोवेळा भ्रांति होऊन जी अनन्वित कृत्ये आपल्या हातून घडतात, तीं घडण्याची राहतील काय? आपल्या वृत्तीचा क्षोभ होऊन किंवा अनावर मोहप्रसंग प्राप्त होऊन, आपण जे दुर्वर्तन करण्यास प्रवृत्त होतो, त्या आपणांस त्यापासून निवृत्त करण्याचें सामर्थ्य ह्या असल्या विद्यांच्या ठायीं आहे काय? खरोखर पाहता आपणांस स्वकर्तव्यविषयक ज्ञान प्राप्त होणे अत्यंत अगत्याचे आहे. आपला देश, आपली मातापितरे, आपले स्त्रीपुत्र आणि आपली एकंदर मनुष्यजाती यांच्या संबंधाने आपलें कर्तव्य कोणतें आहे, हें आपणांला अवश्य कळले पाहिजे. अमका मनुष्य प्रामाणिक होता कीं अप्रामाणिक होता, हें समजून घेऊन आपणांला काय करावयाचें आहे? मी स्वत: कसा प्रामाणिक होईन तें मला समजून त्याप्रमाणें मजकडून प्रयत्न घडल्यानें माझें खरें हित होणार आहे. गायनवादनादि कलांचे ज्ञान मला असण्यापेक्षा स्ववृत्तीचें योग्य प्रकारें नियमन करितां आल्याने किती बरें कल्याण होण्यासारखे आहे? गणित शास्त्राच्या योगाने मला वस्तुमात्राचें माप घेता येतें. परंतु माझ्या

* अक्रोध, वैराग्य, जितेद्रियत्व क्षमा, दया, शांति, जनप्रियता, निर्लोभता, दानशूरता, भयशोकहीनता, ही ज्ञानाची दहा लक्षणें होत.

वासनांचे माप घेऊन त्यांचा जय करण्याचें सामर्थ्य मला प्राप्त झाल्यानें मला खरें सौख्य प्राप्त होईल. माझ्या बंधूचा जो योग्य हिस्सा असेल, तो त्याचा त्यास देण्यास मीं नेहमी तयार असावें; आणि माझ्या शेजाऱ्याचा उत्कर्ष झाला असतां मला त्याबद्दल आनंद वाटावा. ही अशी माझ्या मनाची तयारी होणें इष्ट होय. माझ्या जीविताचें व वित्ताचे रक्षण कसें करावे हें व्यावहारिक विद्यांच्या योगाने मला कळेल; परंतु ह्या दोहोंसही मला मुकावे लागलें तरी माझ्या चित्ताची स्वस्थता यत्किंचित्ही कमी होऊं नये, असा संस्कार माझ्या चित्तावर जेणेकरून होईल, तें मला विशेष इष्ट वाटतें. या चित्तसंस्काराचें महात्म्य योगवासिष्ठांत येणेंप्रमाणें केलें आहे:-

न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले ।
मोक्षोहि चेतो विमलं सम्यग्ज्ञानविबोधितम् ।। *

गौडपादाचार्य या प्रकरणी येणेप्रमाणे लिहितात:-

मनसो निग्रहायत्तमभयं सर्वयोगिनाम् ।
दुःखक्षयः प्रबोधश्चष्यक्षया शान्तिरेवच ।। **

एकाद्यास आपल्या वडिलोपार्जित स्थावर मिळकतीला मुकावें लागलें असतां, त्याजवर मोठेच संकट आल्यासारखे होते, असें तुम्ही म्हणाल. परंतु आपल्या पूर्वजांनी हें वित्तार्जन कसे केलें, याचा अंमळ शोध करून पाहाल तर तुम्हांस असें दिसून येईल कीं, एका काळी तें दुसऱ्या कोणाच्या तरी स्वाधीन होते. आपलें स्थावर वित्त तर कोणा तरी अन्य राष्ट्राचे होतें. त्याच्यापासून हें वित्त केवळ जुलूमजबरीनें किंवा इतर अनन्वित उपायांनी आपल्या पूर्वजांनी प्राप्त करून घेतलें होतें. तेव्हां अशा वित्ताविषयीं आपण एवढी दृढ ममता कां दर्शवावी बरें?

फलज्योतिषवेत्ते आपणांस अमुक ग्रह अनुकूल किंवा प्रतिकूल आहेत असें सांगतात; परंतु अशा लोकांचे सांगणें मुळींच मनास आणू नये. कारण असें पाहा कीं, त्यांची आकाशांतील स्थिति आणि गति त्यांस कधींही न बदलणाऱ्या अशा नैसर्गिक नियमानुसार प्राप्त झालेली आहे. या ग्रहगोलांच्या योगानें एक तर एकंदर वस्तुजाताचे परिणाम उद्भवतात, किंवा ते दर्शविले जातात. आतां त्यांच्या योगाने एकंदर परिणाम उत्पन्न होतात असें मानिलें तर जें नियमानें घडावयाचें, कांही केल्या टळावयाचें नाहीं, त्याचें ज्ञान झाल्याने काय हित व्हावयाचें आहे? बरें या ग्रहगोलांच्या गतिस्थिति पाहून पुढें काय होणार याचें भविष्य करितां येतें असें मानिलें, तरी हें भविष्य कळून आपलें काय नफानुकसान होणार? कारण पुढें होणाऱ्या गोष्टी टाळण्याचे सामर्थ्य आपल्या ठायीं मुळींच असत नाही. तेव्हां तात्पर्य काय कीं, फलज्योतिषांत सांगितलेल्या गोष्टी आपणांस कळल्या किंवा कळल्या नाहींत तरी 'होणार कधी चुकेना' हें ध्यानांत वागविले पाहिजे. एका संस्कृत पंडिताची या प्रकरणी मोठी सुंदर उक्ति आहे. ती अशी :-

---

* मोक्ष जो आहे तो काही आकाशांत नाहीं, पाताळांत नाहीं, व भूतलावरही नाहीं; तर यथार्थ ज्ञानाचा बोध होऊन चित्त विमल होणें हाच मोक्ष होय.

** सर्व योग्यांचे अभय, दुःखक्षय, प्रबोध, अक्षय शान्ति ही मनोनिहायवर अवलंबून आहेत.

यदभावि न तभ्दवि भाविचेन्न तदन्यथा ।
इति चिन्ताविषध्नोऽयमगदः किं न पीयते ।। * सु. र.

शुष्क शब्दवादात शिरणें ज्ञात्यास शोभत नाहीं

मानवी जीवितक्रम कसा असावा याविषयी विवेकशुद्ध विचार करून वास्तविक कल्याणाचे असे ज्यांस नीतिनियम प्रणीत करावयाचे असतात, त्यांनीं नुसता शब्दवाद करीत बसणे उचित नव्हे. शब्दयोजनेविषयी बारीकबारीक कोट्या काढून कवा वाक्छल करून, जिज्ञासु मनुष्यांचें चित्त भ्रमांत पाडणे मुळीच इष्ट नाहीं. ज्ञात्या पुरुषाच्या ठायीं स्वाभाविक वक्तृत्वशक्ति असल्यास फारच चांगलें. परंतु ती वाढविण्यासाठी प्रयत्न करणें हें त्याचें काम नव्हे. त्यानें बारीक कोट्या काढून वादविवाद करीत बसू नये. जो वेडा असेल त्यानें पाहिजे असल्यास वाग्युद्ध करण्यांत, किंवा लोकांनी केलेल्या कूटप्रश्नांची उत्तरे देत बसण्यांत आपल्या काळाचा अपव्यय करावा. मजविषयी पुसाल तर मीं असल्या वाक्कुशल योद्ध्यांशी समर करण्याचें सोडून देऊन, माझ्या अंतर्यामींच्या शत्रूंनी मजवर चढाई करून माझा चित्तरूप गड सर करण्याचा घाट घातला आहे, त्यांच्याशी सामना करून विजयी होण्याची हाव धरावी हें मला उचित होय. नैसर्गिक क्रमाप्रमाणें ज्या गोष्टी मला निश्चयानें प्राप्त व्हावयाच्या, आणि शेवटी जो मृत्यू मला प्राप्त व्हावयाचा, त्या संबंधाच्या तयारींत सर्वदा रहाण्यासाठीं म्या झटावें हें योग्य होय. म्हटले आहे: **'गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्'।**** या संसारामध्यें आपला आयुर्दाय फार मोठा असल्यानें आपण मोठे भाग्यशाली आहो असें कोणीही समजू नये; तर त्या आयुर्दायाचा उपयोग जो योग्य प्रकारे करितो, तोच धन्य समजावयाचा. मग तो अगदीं अल्प कां असेना. या प्रकरणी संस्कृत सुभाषितग्रंथांत एक उत्कृष्ट वचन आहे. तें असें:-

यज्जिवति क्षणमपि प्रथित मनुष्यैः
विज्ञानविक्रमयशोभिरभज्यमानम् ।
तन्नाम जीवितमिह प्रवदंति तज्ज्ञाः
काकोऽपि जीवति चिराय बलिच भुक्ते ।।***

आपण एक वेळ निजलो म्हणजे पुनरपि जागृत होऊं किंवा जागृत झाल्यावर पुनरपि निद्रासुख अनुभवू याचा भरवसा कोण सांगू शकेल? त्याचप्रमाणे आपण घरांतून बाहेर गेल्यावर पुनः सुखरूप घरीं येऊ किंवा बाहेरून घरीं परत आल्यावर पुनः बाहेर जाऊं याविषयी कोणास खात्रीपूर्वक सांगतां येईल? जे नौकेंत बसून जलप्रवास करितात, त्यांच्याच जिवाला तेवढा प्रतिघडीस धोका असतो असें कोणी समजू नये; तर मनुष्य कोठेही असला तरी त्याच्या जिवाला प्रतिपदी धोका असतो. भेद इतकाच कीं, त्याविषयी आपण अंमळ

---

* जे अभावी ते कधीही घडावयाचे नाहीं; व जें घडावयाजोगे असतें ते कदापि घडल्यावांचून रहावयाचें नाहीं; असा विचार मनांत वागविणे हें चिंतारूप विषाचा नाश करणारे औषध आहे, तें कां पिऊं नये?

** मृत्यूने आपल्या केशांला धरिलें आहे असें मनांत वागवून धर्माचरण करावे.

*** विज्ञान, पराक्रम आणि कीर्ती यांच्या योगानें प्रख्यातीस आलें तरच ते मनुष्याचे जीवित होय. मग तें एक क्षणाचेही असले तरी कांहीं चिंता नाहीं. नाहीं तर कावळा देखील पुष्कळ वर्षे जगून बलीचे भक्षण करतो, असें अभिज्ञ जन म्हणतात.

बेफिकीर असतो. म्हटलें आहे. **'नलिनीदलगतजलवत्तरलं किं यौवनं धनं चायुः'*** या प्रमाणें आपलें हें जीवित क्षणभंगुर आहे, त्यापेक्षां लोकांनी उपस्थित केलेला शुष्क वादविवाद किंवा विचारलेले बारीकसारीक प्रश्न यांची दरकार म्या कां म्हणून करावी? शोक, चिंता आणि भय यांपासून आपण कसे मुक्त होऊं; आणि आपल्या अंतर्यामी ज्या दुष्ट वासना वसत आहेत, त्यांचें निर्मूलन आपणांस कसें करितां येईल, याचें ज्ञान आपण संपादन करण्यास झटणे अत्यंत हिताचे आहे. आपण ज्या क्षुल्लक ढंगांमध्ये गढलेले असतों, त्यांपासून साधेल तेवढें त्वरित मुक्त होऊन सदाचारी व्हावे याचा प्रयत्न करूं; कारण आपण जितके लवकर सदाचारी होऊं, तितकें इष्टच आहे. ही गोष्ट दिरंगाईवर टाकणे मुळींच हितांचे नाहीं. उदाहरणार्थ असें पाहा कीं, तुमची प्रिय पत्नी प्रसववेदनांनीं पीडित झालेली पाहून, तुम्ही सुईण आणण्याकरितां लगबगीनें चालला असतां, वाटतें एकादा गमतीचा खेळ पाहण्याकरिता थांबण्याचें तुमच्या मनांत तरी येईल काय? किंवा तुमच्या घराला आग लागली असतां, लोकांस मदतीला बोलवावयास धांवण्याच्या वेळीं आपला पोषाख ठाकठिकीचा आहे किंवा कसें हे पाहावेसे तुम्हांला वाटेल काय? अशीच गोष्ट आपल्या जीविताची आहे. तें केव्हा नष्ट होईल याचा नेम नसल्या कारणानें आपण आपला वेळ शुष्क वादविवाद करण्यामध्यें किंवा प्रश्नोत्तरांच्या खटपटीमध्ये घालविणे मुळींच युक्त नव्हे. आपलें या प्रपंचांतले अत्यंत महत्त्वाचे कर्तव्यकर्म हें आहे की, आपल्या मनास जडलेल्या आधि व दुर्वृत्ति यांचा निरास करण्यास आपण अहर्निश झटावे. परंतु कित्येक ज्ञाते म्हणविणारे पुरुष केवळ ज्ञानप्राप्तीनेंच आपणांला कृतकृत्य समजतात. प्राप्त झालेल्या ज्ञानानुसार वर्तन करण्याचें त्यांस सामर्थ्य नसतें, किंवा बुद्धि होत नाही. अशा मनुष्यांचा निषेध पुढील वचनांत केला आहे:-

शास्त्राण्यधीत्यापि भवन्ति मूर्खाः
यस्तु क्रियावान् पुरुषः स एव ।
सुचिन्तितं चौषधमातुराणां
न नाममात्रेण करोत्यरोगम् ।। ** सु.र.

अशा मनुष्यांस तत्वज्ञान हा केवळ एक करमणुकीचा प्रकार आहे असें वाटतें. वस्तुतः पाहता तत्वज्ञानाच्या अभ्यासाने मनुष्यास आपल्या दुःस्थितीचें यथार्थ ज्ञान होऊन तन्निवारणार्थ कोणते यथायोग्य उपाय योजावे याचें ज्ञान व्हावें असें आहे. जो मनुष्य आपल्या वर्तनाकडे दुर्लक्ष करून आपली भाषापद्धति ठाकठिकीची आहे किंवा कसें याचीच फक्त काळजी वाहतो, तो उपहासास सर्वथा पात्र होय. मजविषयीं पुसाल तर मी ह्या भाषापद्धतीच्या किंवा शब्दयोजनेच्या भानगडींत मुळींच पडणार नाही. भाषादोषांपेक्षां सहस्रपट अधिक भयंकर असे जे माझ्या अंतःकरणाच्या ठायीं दोष आहेत, जे केवळ अत्यंत प्रखर व कष्टसाध्य मानसिक रोग होत, त्यांवर मोठे जालीम उपचार करून त्यांचा परिहार करण्यास मला मनापासून झटले पाहिजे. वैद्य जसा देहास होणाऱ्या व्याधींवर नाना परीची चिकित्सा करून त्याचा बीमोड करितो, तद्वत्च आपल्या अंतर्यामींच्या व्याधींवर आपण योग्य चिकित्सेचा प्रयोग करणे अत्यंत अगत्याचे आहे. आपणांस प्राप्त होणारे संकटप्रसंग टाळण्याचे आपल्या हाती नाहीं, तरी त्यांची दुःखावहता अगदी नाहीशी करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी असते. हे सामर्थ्य ज्ञानाच्या योगानें आपणांस प्राप्त होतें. सारांश काय की, ज्ञानाच्या साहाय्याने आपले जीवित सौख्याचे होण्यासारखे आहे.

---

* कमलिनीच्या पानावर पडलेल्या उदकाप्रमाणें यौवन, धन व आयुष्य ही चंचल आहेत. त्यांत काय अर्थ आहे?

** शास्त्रांच्या अध्ययनाने ही मनुष्य मूर्ख होतात. जो मनुष्य प्राप्त झालेल्या ज्ञानानुसार वर्तन करितो, तोच खरा मनुष्य होय. औषधाची अगदीं चांगली योजना केली असली तरी त्या औषधाचं नुसते नांव घेत राहिल्याने पीडित मनुष्य निरोगी होत नाहींत.

भाग पांचवा

बोधवचनांचें सामर्थ्य

ज्या ज्ञानी पुरुषाला तत्त्वज्ञानप्राप्ति होते, त्यानें स्वसंपादिन ज्ञानाचा बोध इतरांस करणे इष्ट होय. असें तो करील तर त्यांत इतर जनांचे व स्वतांचेंही कल्याण होण्यासारखे आहे. त्याच्या योगाने त्याच्या वेळच्या लोकांना सद्बोध प्राप्त होऊन, पुढील पिढ्यांसही तो प्राप्त होण्याचा संभव असतो. प्राचीन काळच्या लोकांमध्यें कांहीं बोधवचनें प्रचलित असत. त्यांच्या अनुरोधाने सामान्य जन प्रपंचांत वागून सुखी होत. ही बोधवचने केवळ विधिनिषेधात्मक असत. तरी त्या काळचे लोक केवळ साध्या वृत्तीचे असल्या कारणानें त्याला तीं परम मान्य वाटून, ते तद्नुसार स्ववर्तन ठेवण्यास मनापासून झटत. यामुळें त्यांच्या हातून बहुत सत्कृत्ये होत. तथापि पुढें मनुष्याचे व्यावहारिक ज्ञान जसजसें वाढत चालले, तसतसा तो सदाचाराविषयीं अधिकाधिक बेपरवा झाला. मनुष्याच्या ठायींची साधी वृत्ति व सदाचारप्रीति कमी होऊन, त्याची प्रवृत्ति पांडित्य व वाक्छल करण्याकडे अधिक झाली. त्याला वावदुक होऊन सभाजय करण्यामध्येच जीवितसार्थक्य आहे असें वाटूं लागलें. परंतु आपला आचार कसा काय आहे याची त्यास परवा वाटेनाशी झाली. प्राचीन काळी मनुष्याच्या ठायीं दुराचारप्रवृत्ति होती खरी; तरी ती अगदीं साध्या प्रकारची असल्या कारणाने तिचा प्रतिकारही अगदीं साध्याच उपायाने होत असे. परंतु हल्ली पाहावे तो ज्या त्या मनुष्याची दुराचाराकडे प्रवृत्ति झालेली असून, ती पुष्कळांच्या ठायीं फारच दृढ झाली आहे. यास्तव तिचे निर्मूलन करावयाचे म्हणजे चांगल्या सक्त उपायांचीच योजना होणें इष्ट होय.

आपण कितीही उत्तम असलो तरी आपणांस जितका अधिक सद्बोध होईल तितके आपलें हितच होणार आहे.

कित्येक जनांची वृत्ति अशी असते कीं, त्यांनीं चांगल्या गोष्टी एकदा ऐकिल्या म्हणजे त्यांविषयीं त्यांच्या मनांत आवड उत्पन्न होऊन, त्याचा अंगीकार ते तत्काळ करितात. परंतु ही उत्पन्न झालेली आवड दृढ होऊन तद्नुसार वर्तन करण्यास ते सर्वदा तयार होण्याकरिता त्यांस त्या गोष्टीसंबंधानें बोध व सूचना होणें अगत्याचें असतें. कित्येक गोष्टी अशा असतात कीं, त्यांविषयीं आपणांस उत्कंठा लागून, आपल्या हातून अविचार होण्याचा संभव असतो. परंतु कित्येक गोष्टी अशा असतात कीं, त्यासंबंधानें आपण फारच ढिलेपणा किंवा बेपरवाई दर्शवितो. या दोन्ही वृत्ति सदोष होत. यांचें दमन करावयाचें म्हटलें म्हणजे त्या ज्या कारणांनी उद्भवतात, त्यांचा प्रतिकार केला पाहिजे; आणि तीं कारणें एवढीच कीं, आपणांस निरनिराळ्या गोष्टींविषयी खोटी प्रीति किंवा खोटी भीति उत्पन्न होत असते. उदाहरणार्थ असें पाहा कीं,

प्रत्येक मनुष्याला आपला देश, आपले इष्टमित्र व आपल्या घरीं आलेले पाहुणे यांच्यासंबंधाने आपलें काय कर्तव्य आहे तें कळत असतें. परंतु स्वदेशाच्या रक्षणासाठी तरवार घेऊन शत्रूंशी सामना करण्याचा समय आला असतां, स्वजीवितनाशाच्या भीतीस्तव किंवा संसार सुखविषयक प्रीतीस्तव तो आपलें कर्तव्यकर्म करण्याची टाळाटाळ करितो. त्याचप्रमाणे आपल्या बांधवांच्या हितासाठी मेहनत करण्याचा प्रसंग आला असतां, तो स्वतांस होणाऱ्या कष्टाबद्दल खिन्न होतो, किंवा दुसऱ्यावर परोपकार करण्यांत जो काळाचा व शक्तीचा व्यय होणार, तेवढ्याचा विनियोग स्वसुखवृद्धीकडे करणें त्यास विशेष आवडते. यामुळे तो स्वबांधवविषयक कर्तव्यापासून पराङ्मुख होतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, मनुष्यास त्याच्या कर्तव्याबद्दल बोध केला म्हणजे आटोपले असें कोणी समजू नये; तर त्या बोधाप्रमाणें वागण्यास त्याला कोणत्या गोष्टींमुळें प्रत्यवाय घडण्यासारखा आहे, याचा नीट विचार करून, त्या गोष्टींचा परिहार करण्यासही अवश्य झटले पाहिजे. मनुष्याच्या हातून एकादे सत्कृत्य प्रसंगविशेषीं घडले तर त्यांत कांहीं अर्थ नाहीं. असें सत्कृत्य त्याच्या हातून नेहमी घडले पाहिजे. तें त्याच्या हातून सतत घडेल असें करण्याचा उपाय एवढाच कीं, तें कां करावे याचें ज्ञान त्यास प्राप्त झालें पाहिजे. आतां जर करितां एकादे सत्कृत्य तो केवळ यदृच्छेने किंवा पूर्वापार चालत आलेल्या चालीस्तव करीत असला तर त्याच्या हातून दुसरें एकादे वाईट कृत्यही घडण्याचा संभव असतो. तेव्हां सदाचारास असला दुर्बळ व बेभरवशाचा आधार असणे मुळींच इष्ट नव्हे. दुसरें असें कीं, बोधाच्या योगाने आपण कोणती गोष्ट करावी हें फार तर कळेल; पण ती करावी कशी हे त्या बोधांत कदाचित् सांगितलेले नसेल. असला बोध अर्थात् अपुरा होय. विपत्ति, संपत्ति, दुलौकिक, व्याधि इत्यादिकांविषयी आपल्या मनाची वृत्ति कोणत्या प्रकारची असावयास पाहिजे, याविषयी ज्या बोधांत काहीएक सांगितलेले नसतें, तो बोध काय कामाचा? यास्तव या गोष्टींचा प्रथमारंभीं क्रमशः विचार करणे इष्ट होय. त्याचप्रमाणे दूरदर्शिता, धैर्य, संयम व न्याय या सद्गुणांची महती केवढी आहे तें नुसतें कळल्यानें पुरत नाही. तर प्रथम सद्गुण म्हणजे काय, सद्गुण एकच आहे कीं अनेक आहेत, ज्यांच्या ठायीं एक सद्गुण असतो त्याच्या ठायीं सर्व सद्गुण आहेत म्हणावयाचें कीं कसें, बरें सद्गुण अनेक असल्यास ते कोणकोणत्या बाबतीत परस्परांहून भिन्न असतात, इत्यादि गोष्टींचा निर्णय होणे अवश्य होय.

बोधवचनांचा प्रभाव

बोधवचनांचा प्रभाव फार मोठा आहे. कांहीं उपयुक्त बोधवचने आपणांस अवगत असल्यानें आपलें जीवित जितके सौख्याचे होण्याचा संभव असतो, तितकें बोधाची मोठमोठी पुस्तके जवळ असल्यानें ही होत नसतें. कारण त्यांत अवांतर पुष्कळ सटरफटर गोष्टी सांगितल्या असल्या कारणानें बोध कोणता तें समजण्याची सामान्य जनांस मोठीच पंचाईत असते. यास्तव कांहीं उपयुक्त बोधवचनांची निवड करून त्यांचें सदैव मनन करावे; म्हणजे त्यांमध्यें दर्शित केलेले सदाचरणाचे नियम मनावर ठसून, तद्नुसार आपलें वर्तन होणें शक्य असतें. बोधाचे संकलन एका वाक्यांत करून त्याचें उच्चारण केलें असतां, श्रोतृवृंदाच्या अंतःकरणावर जसा ठसा उमटण्याचा संभव असतो, तसा ठसा कितीही प्रकारे उपदेश करीत राहिल्यानें कधीकधी उमटत नसतो. यथार्थ बोधाचे लहानसे वाक्य जसे मनुष्यांच्या जिव्हारी जाऊन लागतें, आणि तद्नुसार वागण्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत जशी प्रवृत्ति उप्तन्न होत असते तशी दुसऱ्या कशानेही होत

नसते. बोधवचनांच्या योगाने मनुष्याच्या बुद्धीचें पोषण होऊन तिचा विकास होतो. दूरदर्शिता व न्याय यांच्या अनुरोधानें वागतांना जी कृत्ये करावयाची असतात, त्यांमध्यें साररूप बोधवचनांचें फारच साहाय्य होतें. ही बोधवचनें पद्यमय असली तर त्यांचा प्रभाव विशेषच असतो. एकादा लोभी मनुष्य कितीही अतृप्त असला तरी त्याच्या कानी जर लोभाविरुद्ध एकादे सुंदर बोधवचन पडेल तर तो लागलीच आनंद पावून मान डोलवू लागेल; आणि द्रव्यलोभ खरोखरीच फार वाईट आहे असें म्हणू लागेल. या प्रकारे एकाद्याच्या वृत्तींत फरक पडलेला अवलोकनांत येतांच त्याच्या अंतःकरणांत विवेक जागृत करण्यास झटावे. उगीच शुष्क कोट्या व युक्ति काढून, किंवा विनोद करून, त्याचा विरस करूं नये. तर साधी सरळ व खात्री पटण्यासारखी कारणें दाखवून त्याची वृत्ति दृढ करण्याचा, प्रयत्न करावा; आणि अशा रीतीचा जो बोध करावयाचा, तो केवळ प्रेमळ बुद्धीने करावा. ज्याला हा बोध करावयाचा त्याचा धिक्कार किंवा अवहेलना मुळींच करूं नये. तर त्याचे अपण खरे हितचिंतक असून, त्याच्याविषयी आपल्या मनांत पूर्ण कळवळा आहे असें आपल्या चालचर्येवरून व बोलण्याचालण्यावरून त्याच्या मनांत बिबलें पाहिजे. अशा रीतीनें श्रोत्याच्या हिताविषयी खरा कळवळा बाळगून केलेल्या बोधाचा प्रभाव फारच विलक्षण असतो. तेणेंकरून श्रोत्याचे अनेक प्रकारीं कल्याण होतें. अशा खऱ्या कळवळ्याने जे जनांस बोध करितात त्यांना विवेकबलेंकरून श्रोत्यांची खात्री करून देता आल्याने फारच हित होतें. कारण एका गोष्टीची इष्टता किंवा अनिष्टता नुसती कळून उपयोग नाहीं. तर ती कां इष्ट किंवा अनिष्ट आहे त्याविषयीं सकारण प्रतिपादन होणें उचित होय. एरवी ती गोष्ट श्रोत्याच्या विवेकास पटावयाची नाहीं. दुसरें असें कीं, सर्वांचीच बुद्धि कांहीं सारखी नसते. कित्येकास बरें काय व वाईट काय तें चांगले समजण्यासाठी एकाद्या हुशार उपदेशकाची गरज लागते. दुसऱ्यास जो सद्बोध करावयाचा, तद्नुसार स्ववर्तन ठेवण्यास झटणे हा उपदेशकाच्या अंगचा एक मोठा गुण आहे. म्हटलें आहेः-

न स्वल्पमप्यध्यवसायभीरोः
करोति विज्ञाननिधिर्गुणंहि ।
अंधस्य किं हस्ततलस्थितोऽपि
प्रकाशयत्यर्थमिह प्रदीपः ✻ चि.

जो मनुष्य या प्रकरणी फारच संभाळून वागेल, तो जात्या प्रामाणिक नसला तरी त्या सद्गुणाकडे त्याची हळूहळू प्रवृत्ति होत जाईल. ज्ञात्या पुरुषाने आणखी हे ध्यानांत ठेवावे कीं, त्यानें बोधवचनांचा साधेल तेवढा मोठा संग्रह करून तीं लोकांच्या मनांवर ठसविण्यासाठी दृष्टांतादिकांची विपुल सामग्री जवळ करावी. त्याचप्रमाणे एकाद्या सत्पुरुषाचा बोध ऐकिला असतां, त्यांत नवीन तें काय आहे? हा आपणांस पूर्वी अवगत होता, असें म्हणून नाक मुरडू नये. कारण आपणास पुष्कळ गोष्टी ठाऊक असतात, तथापि त्यांचा विचार सुद्धा आपल्या मनांत कधीं येत नसतो. मग तदनुसार वागण्याचें तर दूरच राहिलें. अशा स्थितीमध्ये त्या गोष्टींची पुनरावृत्ति होऊन त्या आपल्या मनावर विशेष ठसल्या तर त्यांत कांहीं अहित नाहीं. उपदेशकांनीं

✻ ज्याला कृती करून दाखविण्याचा दम नाहीं, त्याच्यापाशी केवळ ज्ञानाचे कोठारही असले तरी त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. पाहा कीं, आंधळ्याने आपल्या हातांत दिवा धरिला तरी त्यापासून त्यास पदार्थदर्शन होणार आहे काय?

मात्र नेहमी हें ध्यानांत वागवावें कीं, जनांस नुसता कोरडा उपदेश करून स्वस्थ बसू नये. तर त्या बोधाप्रमाणे ते वागतात किंवा नाहीं तें पाहावे; त्याप्रमाणें ते वागत नसल्यास त्यांला कोणत्या अडचणी असतात म्हणून त्यांच्या मनाच्या समजुतीप्रमाणें त्यांस वागता येत नाहीं, तें अवश्य शोधून पाहावे. कित्येक जण असे असतात कीं, त्यांला एकादी गोष्ट चांगली पसंत असून तद्नुसार वागावेंसें वाटतें. परंतु ती त्याच्याकडून सहसा घडत नसते. उदाहरणार्थ असें पाहा कीं, मैत्री ही फारच कल्याणप्रद गोष्ट आहे असें वाटतें. परंतु या मैत्रीचा भंग करण्यास ते समयविशेषीं मागेपुढे पाहत नाहींत. त्याचप्रमाणें बदफैल मनुष्य स्वत: कितीही अनाचार करीत असला तरी आपल्या स्त्रीने पतिव्रत्य अढळ राखावें असें त्याला मनापासून वाटत असते.

मनुष्यजातीची उत्तम सेवा म्हटली म्हणजे तिला सद्बोध करणें ही होय

मनुष्यजातीचें ज्याला कल्याण करावयाचें आहे, त्यानें तिला सद्बोध करण्याचा प्रयत्न करावा. सद्बोधाची मनुष्यास जितकी आवश्यकता आहे तितकी दुसऱ्या कशाचीही नाहीं. सद्बोध पुष्कळ लोकांच्या कानी पडला तर त्यांतून कांहींकांचेंतरी हित होण्याचा संभव असतो. पुष्कळ लोकांच्या मनांत सदाचरणप्रीति उत्पन्न झाली असता, त्यांतून कांहीं जण तरी तद्नुसार वागण्याचा प्रयत्न करितील. अशा रीतीनें मनापासून प्रयत्न करणाऱ्यांपैकी थोड्याबहुतांस यश येण्याचा संभव असतो. जो मनुष्य आपलें स्वताचे आचरण शुद्ध राखून त्याचा कित्ता इतरांस घालून देतो, तो मनुष्य खरोखरीच महत्कार्य करितो असें म्हणावयाचे. कारण जो खरा ज्ञाता असतो, तो जनांस नुसता उपदेश करून रहात नाहीं, तर आपलें आचरण आपल्या उपदेशाप्रमाणे राखितो. तो आपल्या मनाचा निश्चय अढळ राखून आपल्या वासना जिंकितो. '**बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउलें**' या साधु तुकारामाच्या उक्तीस तो सर्व प्रकारे पात्र होतो. आपण लाविलेल्या वृक्षाचे फळ आपणांस विशेष रुचकर लागतें, हें जर खरें आहे, तर स्वतांच्या ठायीं चांगल्या गुणांची वृद्धि व विकास करण्याविषयी प्रयत्न केल्याने आपणांस किती अधिक आनंद वाटण्यासारखा आहें बरें? प्रत्येकानें आपली वास्तविक स्थिति काय आहे तें ध्यानांत वागवून तद्नुसार प्रपंचांत वागणूक ठेवावी. कित्येक लोक असे असतात कीं, ते खाण्यापिण्यास लागणारा खर्च फारच काटकसरीने करितात. परंतु त्यांला मोठमोठ्या हवेला बांधण्याचा नाद बेसुमार असतो. कित्येक असे स्वार्थी असतात कीं, दुसऱ्यासाठी पैका खर्चण्याचें यांच्या जिवावर येतें; परंतु स्वतांची मात्र ते सर्व प्रकारे चंगळ राखितात. दुसरे कित्येक जण असे चमत्कारिक असतात कीं, ते घरी अगदी कृपणासारखे वागतात, परंतु तेच बाहेर लोकांत मोठा डौल व उदारपणा दाखवितात. अशा प्रकारचा विरोध पुष्कळ लोकांमध्यें दिसून येतो. पण हा सर्वथा सदोष आहे. हा उत्पन्न होण्याचे कारण बहुधा असें असतें कीं, त्यांची मानसिक वृत्ति असावी तशी शांत व स्थिर नसते. जो खरा ज्ञाता पुरुष आहे, त्याच्या आचरणांत असला काहीएक विरोध असत नाहीं. तो सर्वदा नियमानें व व्यवस्थितपणे वर्तत असतो. वर जो विरोध दर्शविला आहे, त्याचें आणखी एक असें कारण आहे कीं, आपण कोणत्या प्रकारे जगांत वागणूक ठेविली असतां आपलें हित होण्यासारखे आहे, याचा लोक फारकरून विचार करीत नसतात; आणि जे कित्येक जण हा विचार करितात, ते आपल्या बुद्धीचा जो निर्णय ठरतो, तद्नुसार निश्चयानें वागत नाहींत. आज एक गोष्ट बरीशी वाटली कीं ती करूं लागावे, आणि उद्या दुसरी बरी वाटली कीं, पहिली सोडून त्या दुसरीच्या नादी लागावे. पुनः वृत्ति फिरून तिसऱ्याच एकाद्या

गोष्टीचा स्वीकार करावा, किंवा कदाचित् पहिलीच गोष्ट पुनरपि करूं लागावे, असा चंचळपणा त्यांच्या ठायीं आढळतो. या वृत्तीचा निषेध रामदासाने दासबोधामध्ये येणेंप्रमाणें केला आहे:-

क्षणी बरा क्षणी पालटे । तो एक मूर्ख.

कोणतेही कृत्य करूं लागण्यापूर्वी तीन गोष्टींचा विचार करावा

आपण कोणतेंही कृत्य हातीं घेतांना प्रथमतः आपल्या अंगीं सामर्थ्य कितपत आहे तें पाहावे; नंतर तें कृत्य करितांना जोखीम कोठवर आहे तें लक्षांत आणावे; आणि मग ते कृत्य करितांना ज्या मनुष्यांशी आपला संबंध यावयाचा, त्यांचा स्वभाव वगैरे कसा काय आहे त्याची चौकशी करावी. या तीन गोष्टींपैकीं पहिली गोष्ट फारच महत्त्वाची आहे. आपल्या ठायीं वास्तविक जी योग्यता असते, तीपेक्षां अधिक योग्यता आहे, असें आपणांस भ्रमास्तव वाटण्याचा संभव असतो. या भ्रांतीमुळें आपणांस जेवढें काम करण्याची वास्तविक शक्ति असते, त्यापेक्षा पुष्कळ जास्त काम आपल्या हातून होईल असें वाटतें. एकाद्या मनुष्याला असें वाटतें कीं, मी सभाग्रस्थानीं उभा राहून चांगले सुरस भाषण करीन. परंतु तो उभा रहाताच घाबरून जाऊन त्याची बोबडी वळते, आणि त्यास लोकांनी केलेली फजिती सोसून खालीं मान घालून निमुटपणे बसावे लागतें. दुसरा एकादा मनुष्य आपली वतनवाडी वास्तविक ज्या किमतीची असते, तीहून तिची पुष्कळ जास्त किंमत आहे असें मानितो, आणि शेवटी व्यवहारांत नाना परी फसतो. दुसरा एकादा असा असतो कीं, त्याला आपल्या शरीरबलाची मोठीच घमेंडी असते, वास्तविक जेवढे बल त्याच्या अंगीं असतें, त्याहून अधिक बल असल्याचा तो आव घालितो; आणि एकादे वेळीं नाहक फसतो. जो मनुष्य भिडस्त असतो, त्याच्या हातून कोणताच धंदा चांगला चालावयाचा नाही. कित्येक लोकांचा स्वभाव असा असतो की, ते एवढ्या तेवढ्या कारणावरून लागलीच रागावतात. ते एकमेकांशी विनोदाने बोलतां बोलतां कधी कधी चिडतात. कित्येकांची अशी रंगेल वृत्ति असते की, थट्टेवाचून त्याला चैनच पडत नाही. एकाद्याची थट्टा केली असता त्याला राग येऊन तो आपले नुकसान करील, असे त्याला खात्रीने ठाऊक असले तरी ते त्याची थट्टा करण्यास चुकणार नाहीत. अशा वृत्तीच्या माणसांनी या प्रपंचामध्ये कोणताच धंदारोजगार न करिता मुकाट्याने बसून रहावे. जो मनुष्य जात्याच रागीट व उतावळ्या स्वभावाचा असतो, त्यानें राग आणणाऱ्या सर्व गोष्टी वर्जाव्या. ज्या उद्योगांत रागावण्याचे व संतापण्याचे प्रसंग वेळोवेळा येण्याचा संभव असतो, ते धंदे त्यानें पत्करू नयेत. त्याचप्रमाणे ज्या व्यवसायांत एकदां शिरले म्हणजे त्यातून सुटण्याची आशा नसते, त्यांत कदापि पडूं नये. ज्या व्यवसायांतून वाटेल तेव्हां अंग काढलें असतां चालेल, व ज्या व्यवसायास कांहीं तरी मर्यादा म्हणून असते, ते व्यवसाय सोईचे होत. ज्या गोष्टी आपल्या सामर्थ्या बाहेरच्या असतील, त्यांचा लोभ करूं नये. ज्या गोष्टी आपल्या हातच्या असून साध्य होण्याची आशा असते, त्यांमध्येंच आपण समाधान मानून रहावे. दुसऱ्याची स्थिति आपल्याहून बरी असली तरी तीबद्दल त्याचा हेवा करूं नये. थोर पदवीपासून पतन पावण्याचे भय फार असतें. परंतु ज्याची स्थिति अगदीं बेताचीच असते, त्याला हें भय नसतें. कित्येक थोर पदवीच्या लोकांस अशी स्थिति प्राप्त होते कीं, त्याला आपली पदवी कशीबशी राखून रहाणे भाग पडते. कारण त्याला असें वाटत असतें कीं, आपल्या उच्च पदवीपासून च्युत व्हावयाचे म्हणजे मोठेच धोक्याचे काम आहे. अशा लोकांनी आपल्या अंगीं सदाचार

व विवेक यांचा विकास करण्यास झटावे. म्हणजे कसेही अनिष्ट प्रसंग आले तरी त्यांबदल त्यांस कांहींएक वाटणार नाहीं; आणि पुढे आपलें काय होईल अशी चिंता त्यांस वाहावी लागणार नाहीं. अशा स्थितीमध्यें अगदीं खात्रीचा उपाय म्हटला म्हणजे असा कीं, आपल्या वासनांचे मनुष्याने दमन करावे, आणि ज्या गोष्टीवाचून आपलें चालण्यासारखे असते त्याविषयी उगाच आशा करीत बसू नये. इतकी आपल्या मनाची तयारी झाल्यानें म्हणजे आपणांस पूर्ण शांति प्राप्त होईल असें कोणी समजू नये. तथापि त्यामुळें आपल्या बहुतेक पीडा टळतील.

जें आशा करण्याजोगे असून न्याय्य असेल, तेंच प्राप्त करून घेण्याविषयीं जनांस बोध करावा

ज्याची आशा केली असतां वावगें होणार नाहीं, आणि जें प्राप्त होण्यासारखे असून न्याय्य असेल, तेंच मिळविण्याविषयीं जनांस बोध केला पाहिजे. कारण ज्याची आशा धरून उद्योग करावयाचा, तें प्राप्त झालें नाहीं तर आपणांस खेद होतो; आणि जें प्राप्त झाल्याने चित्तास समाधान वाटण्या ऐवजी लज्जा वाटण्यासारखी असते, त्यापासून आपल्या चित्तास उद्वेग प्राप्त होतो. यास्तव आपल्या अंतःकरणात दुष्ट हेतु न येऊ देण्याविषयीं खबरदारी घ्यावी. जी गोष्ट आपणांस प्राप्त झाली असतां दुसऱ्याचे नुकसान होण्यासारखे असतें, अशा गोष्टीची आपण कदापि अपेक्षा करूं नये. तर आपलें चित्त निर्मळ राखण्याविषयी आपण सदैव प्रयत्न करावा. हा प्रयत्न आपण एकसारखा करीत राहिल्याने इतर मनुष्यांचे त्यापासून यत्किंचित्ही नुकसान व्हावयाचें नाहीं. मी मानवी जातीचा प्राणी आहें हें नेहमी ध्यानांत वागवून असा विचार करीन कीं, मी सांप्रत सुखी असलो तरी हें माझें सौख्य चिरकाल रहाणारें नव्हे; आणि मी दुखी असल्यास मला ही स्थिति सहज पालटतां येईल. मी सर्वदा मरणास तयार असेन; आणि अंतसमय प्राप्त झाला असतां चित्तास यत्किचित्ही उद्वेग होऊं देणार नाही. माझ्या ठायींच्या वासनांचा दास न होण्याविषयी मी यत्न करीन. कारण हें दास्य अत्यंत निंद्य व दुःखजनक आहे. यासाठीं वासनांचे दमन करण्यास मी सर्वदा तत्पर असेन. वासनांचें दमन कसें करावें तें पुढील सुभाषितांत उत्तम प्रकारे सांगितलें आहे:-

प्रचण्डवासनावातैरुद्धता नौर्मनोमयी ।
वैराग्यकर्णधारेण विनारोध्दुं न शक्यते ।। *

मी आपल्या मनाशीं असा विवेक करीन कीं, मला अगदी थोड्या वस्तूंची निवंता असून तीही केवळ अल्प काळपर्यंत असावयाची. तेव्हां मी वित्तार्जनासाठीं अहर्निश एवढा खटाटोप, दगदग आणि चिंता कां करावी? ज्याला चित्ताची स्थिरता कायम करावयाची असेल, त्यानें सदाचाराच्या अभ्यासासाठी कांहीं विवक्षित काळ मुकरर करावा. उपवासादिकांच्या योगाने देहदंडन करून अशी सवय लावून घ्यावी कीं, अन्न, वस्त्र व रहावयास जागा ही कोणत्याही प्रकारची मिळाली तरी त्यांमुळे काहीएक वाटूं नये. सुस्थिति असतां मनुष्याने पुढें प्राप्त होणाऱ्या संकटास तोंड देण्याची तयारी करावी; आणि खाण्यापिण्याची ददात नसते तेव्हां देहाला अशी सवय लावून ठेवावी की, पुढे विपत्ति प्राप्त झाली असतां तिचें त्यांस कांहींच वाटूं नये. कोणत्याही प्रसंगीं मनुष्याने निश्चयानें व नेटाने वागावें असें असल्यास त्याला त्या गोष्टीचा पुर्वी बराच अभ्यास झाला पाहिजे, समरांगणामध्यें मागें पाय न घेता शत्रूंशी निकराने लढण्याचे धैर्य अंगीं यावें म्हणुन योद्धा शांततेच्या वेळीं सतत अभ्यासाने आपल्या ठायींची युद्धकला जागृत ठेवितो. तेव्हां सारांश

* ही मनोरूप नौका वासनारूप प्रचंड वायुच्या झपाट्यांत सापडली आहे. ती वैरग्यरूप कर्णधरावाचून आवरितां येणारी नव्हे.

काय की, ज्यास या संसारामध्यें सुखाने रहावे असें वाटत असेल, त्यानें आपल्या ऐश्वर्यावर भरवसा ठेवू नये; किंवा त्यास विपत्ति प्राप्त झाली असतां तीमुळें उद्विग्न होऊं नये. तर एकंदर प्रसंगास सर्वदा तयार असावें. आणि 'आपुलियाबळे बांधावी ती कास । धरू नये आस कोणाचीही' या साधुवचनाप्रमाणें अहर्निश वर्तन ठेवावे.

बोध करण्याची रीति

'**लोका सांगे ब्रम्हज्ञान । आपण कोरडे पाषाण**' या उक्तीप्रमाणे बहुतेकांचे आचरण असतें. दुसऱ्याला बोध करण्यास जसे आपण तत्पर असतो, तद्वत्च त्या बोधाप्रमाणे स्वत: वागण्यास झटणे उचित होय. आतां दुसऱ्यास जो बोध करावयाचा तो खऱ्या कळवळ्यानें करावा. परंतु त्यामुळें दुसऱ्यास वाईट वाटेल, किंवा कंटाळा येईल असें मात्र न करण्याविषयी सावधगीरी राखावी. या प्रकरणी रामदासाचा बोध फारच नामी आहे. तो म्हणतो:-

जें जें कांहीं आपणांस ठावें । तें तें हळुहळु शिकवावे ।
शाहाणे करून सोडावे । सकळ जनां.

थोड्याच शब्दांनीं, अगदीं सौम्यपणे, लोकांच्या जिव्हारी लागेल असा बोध करण्यास झटले असतां पुष्कळ हित होतें. जगाची रीत अशी आहे कीं, जे ज्ञाते असतात, त्यांला उपदेशाची मुळी आवश्यकताच नसते; आणि जे मूर्ख असतात, त्याला त्याची परवा वाटत नाहीं. जो चांगला मनुष्य असतो, त्याला उपदेशश्रवणीने आल्हाद वाटतो. परंतु कित्येक असे मूर्ख व वाईट स्वभावाचे असतात कीं, त्यांला कोणी दोष देऊन थोडासा उपदेश करण्याचा प्रयत्न केला असतां ते त्या उपदेशकांचा द्वेष करितात. म्हटले आहे; '**अप्रियस्यच पथ्यस्य श्रोता वक्ताच दुर्लभः**'* मनविषयीं म्हणाल तर मी माझ्या मित्रांस जें कांहीं सांगावयाचें तें मोकळ्या मनाने व स्पष्टपणे सांगेन. असें करण्यांत मला यश न आलें तरी पुरवले परंतु माझ्या मित्राचा दोष मला धडधडीत दिसत असतां, त्यासंबंधानें डोळेझाक करण्याचें पातक मजकडून सहसा व्हावयाचें नाहीं. अशानें आपल्या मित्रांचा निवळ विश्वासघात केल्यासारखे होतें. भर्तृहरीने आपल्या नीतिशतकामध्यें मित्राची जी लक्षणे सांगितली आहेत, त्यांमध्यें जें पहिलें लक्षण सांगितले आहे तें येथें पूर्णपणें लागू पडते. तें लक्षण येणेप्रमाणे होय: '**पापान्निवारयति योजयते हिताय.**'** कांहीं बोधवचनें अशी असतात कीं, त्यांपासून श्रीमंतांस व गरिबास सारखाच बोध प्राप्त होतो. परंतु ही वचनें फारच व्यापक व मोघम असतात. आतां ज्यांना बोध करावयाचा, तीं माणसे कशी काय आहेत, याचा पूर्वीं नीट तपास व विचार करावा जर तीं आपल्या उपदेशाला लायक नसली, तर त्यांच्या वाटेस न जाणें बरें. तुकारामाचा या प्रकरणी असा उपदेश आहे:-

अधिकार तैसा करूं उपदेश ।
साहे ओहें त्यास तेचि द्यावे ।।
मुंगीवरी भार गजाचें पाळण ।
घालितां ते कोण कार्यसिद्धि ।।

---

* हिताचे पण अप्रिय असे बोलणारा व ऐकणारा हे विरळा आहेत.

** पापापासून निवारितो आणि हिताची गोष्ट करावयास लावितो.

एकाद्या थट्टेबाज मनुष्याला आपण मनापासून व अगदीं गंभीरपणानें उपदेश केला असतां, तो त्याचा विचका करून आपला उपहास करण्यास मागेपुढे पाहत नाहीं. म्हटले आहे: **'उपदेशोहि मूर्खांणा प्रकोपाय न शान्तये.'*** तेव्हां अशा मनुष्याशी फारच सांभाळून बोलले पाहिजे. कित्येक तर असे उद्धट असतात कीं, त्यांना कोणी उपदेश करण्याचा प्रयत्न केला असतां, ते त्याला असें म्हणतात की, मोठे ज्ञाते म्हणविणारे पुरुषही इतर सामान्य लोकांप्रमाणेच जगांत वर्तत असतात. तेव्हां हा तुमचा बोध केवळ शुष्क असून त्याप्रमाणें कोणी कधीं वागत नाहींत. अशा लोकांशी बुद्धिवाद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकाद्या वेड लागेलल्या मनुष्यास नीट रीतीनें चालण्याबोलण्यास वगैरे शिकविण्याचा प्रयत्न कोणी करूं लागल्यास लोक त्याला वेड लागलेल्या माणसाहूनही वेडा नाहीं का म्हणणार? उपदेशकाने जो उपदेश लोकांस करावयाचा, तो त्यांस कितपत व कसा अमलांत आणितां येण्यासारखा आहे त्याचें धोरण चांगलें ठेविले पाहिजे. आरोग्य असतां किंवा गरिबी असतां कसें वर्तन ठेवावें हें लोकांस सांगण्यापेक्षा आरोग्य व धन हीं कशी संपादन करावी या विषयीं त्यांस बोध करणें विशेष चांगले. लोकांनीं आपली दुर्व्यसनें कशीं सोडावी याविषयी त्यांस बोध करावा. अंगीं कोणतेंच व्यसन नसता कसें वागावे हें त्यांस सांगत बसण्यांत कांहींच अर्थ नाहीं. जर आपल्या लोभाला किंचित् आळा पडेल, आपली ऐषआरामाविषयींची प्रीति अंमळ कमी होईल, आपल्या मनाची अस्वस्थता थोडीशी उपशम पावेल, आणि आपला उदासपणा जरासा कमी होईल, तर बोधवचनांचा परिणाम आपल्या मनावर व्हावयास लागून, आपण हरएक प्रसंगीं कसें वागावे तें आपणांस समजू लागेल.

एकंदरींत काय कीं, ज्याला सौख्याची चाड असेल, त्यानें सदाचारी व्हावयाची प्रतिज्ञा करावी; आणि या प्रतिज्ञे प्रमाणें आजन्म वर्तन ठेवावयाचे, प्राणांत ओढवला तरी सत्पथापासून च्युत व्हावयाचें नाहीं, असा त्यानें निर्धार करावा. या भूतलावरील संपत्तीच्या प्राप्तीसाठी आपण किताही उद्योग केला तरी त्यामुळें आपल्या चित्तास लवमात्रही शांति किंवा समाधान वाटावयाचें नाहीं. खरी शांति अंतःकरण शुद्ध व निर्दोष झाल्याने प्राप्त व्हावयाची. ज्यास खरें सौख्य हवें असेल, त्यानें आपल्या प्राप्त स्थितीमध्यें पूर्ण समाधान मानून रहावे. म्हटलें आहेः **'न शान्तेः परमं सुखम्'** तुकारामानें या शांतीचे महात्म्य फारच उत्तम प्रकारें वर्णिले आहे. तें असेः-

शांति जया अंगीं बाणली तयासी।
देहभाव त्यासी नाहीं जाण।।
शत्रु मित्र बंधू ब्रम्हांड सोयरे।
नाहीं मानीत रे भेदबुद्धि।।
कामक्रोधलोभ नये दंभ चित्ता ।
न धरी सर्वथा आशापाश ।।
जयासी सकळ दया सर्वा भूती ।
तुका म्हणे चित्तीं तोचि देव ।। **

---

* मूर्खाला उपदेश केला असतां त्यापासून त्याला शांति वाटण्याऐवजी कोप येतो.

** शांतीसारखे श्रेष्ठ सुख नाहीं.

भाग सहावा

मनाच्या शांतीसारखें दुसरें सौख्य नाहीं

ज्याच्या मनाला कृतकर्माची तळमळ नसते, त्यानें आपलें आयुष्य सत्कर्मांत घालविले आहे म्हणून समजावे; आणि ही मनाची शांति त्याच्या त्या सत्कर्माचे योग्य पारितोषिक होय. ज्या मनुष्याने आपल्या वासनांचा जय केला आहे, ज्याची सर्व संपदा केवळ आध्यात्मिक असून ज्याचे अंतर्याम सर्व प्रकारच्या भीतीपासून मुक्त आहे, जो प्राप्त स्थितीमध्ये समाधानाने रहाण्यास राजी असतो, आणि ज्यास मृत्यु प्राप्त होणें ही कांहीं मोठी अनिष्ट गोष्ट नसून केवळ मनुष्याच्या ऐहिक जीवीताचा अंतरूप आहे असें वाटतें, त्याच्या मनाची शांति सर्व प्रसंगीं अढळ रहाते. प्रत्येक मनुष्याच्या हातून जे कांहीं बरेवाईट घडत असतें, तें पाहणारी व त्याविषयी योग्य निर्णय देणारी अशी एक शक्ति त्याच्या अंतर्यामी अधिष्ठित असते. या शक्तीच्या योगानें आपल्या अंतःकरणांत उदात्त विचारांची स्फूर्ति होते, आणि आपणांस वेळोवेळा सद्बोध प्राप्त होतो. जो मनुष्य कशीही संकटे आली तरी घाबरून जात नाहीं, ग्राम्य विषयवासनांचा मळ ज्याच्या ठायीं लवमात्रही नाहीं, विपत्ति प्राप्त झाली असताही जो सुखाने नांदत असतो, ज्या गोष्टींविषयी सामान्य जनांस लोभ किंवा भीति वाटते, त्यांविषयी जो बेफिकीर असतो, त्या मनुष्याच्या मर्त्य देहामध्ये हा विवेकरूप दैवी अंश आहे असें सर्वांस कबूल करावे लागेल. अशा विवेकशील पुरुषाच्या अवस्थेचे वर्णन पुढील पद्यांत केलें आहे:-

दधति तावदमी विषयाः सुखम्
स्फुरति यावदियं हृदि मूढता ।
मनसि तत्त्वविदां तु विवेचके
क्व विषयाः क्व सुखं क्व परिग्रहः ।। * सु. र.

मनुष्याचे मन त्याच्या कर्माचे परीक्षक आहे

माझें मन मला काय सांगते तेवढेच मी पाहीन. दुसरे माझ्याविषयी काय बोलतात याची मी मुळींच परवा करणार नाहीं. लोकांनी माझी कितीही अपकीर्ति केली तरी मी आपलें वर्तन सर्वदा निर्दोष राखीन. जे दिसण्यांत भव्य दिसतात, त्यांला सामान्य जन मोठे थोर पुरुष म्हणतात; आणि जे स्वभावाने उद्धट

---

* हृदयाच्या ठायी मूढता वसत असते तोपर्यंत विषयांपासून सुखाचा अनुभव घडतो; व तत्ववेत्त्यांच्या विवेकसंपन्न चित्ताच्या ठायीं विषय, व त्या संबंधाचे सुख आणि ते प्राप्त करून घेण्याचा उद्योग ही कोठून यावयाला?

असतात त्याला ते मोठे सन्माननीय वाटतात. एकादा मनुष्य स्वभावाने अंमळ सौम्य व विनीत असला तर त्याला ते मानभावी किंवा भ्याड समजतात. भर्तृहरणीनें अशा निंदक जनांच्या क्रमाचे येणेप्रमाणे वर्णन केलें आहे:-

जाड्यं हीमति गण्यते व्रतरुचौ दंभः शुचौ कैतवं
शूरे निर्घृणता मुनौ विमतिता दैन्य प्रियालापिनि । **
तेजस्विन्यवलिप्तता मुखरता वक्तर्यशक्तिः स्थिरे
तत्को नाम गुणो भवेत्सगुणिना यो दुर्जनैर्नाङ्कितः।।***

परंतु अशा पुरुषाच्या मनाचा वास्तविक थोरपणा त्यांच्या लक्षांत येतो. एकंदर व्यवहारांत त्याचें समदृष्टित्व व स्थिरता ही जेव्हां त्यांच्या प्रत्ययास येतात, आणि त्याचा बाहेरून दिसणारा सौम्यपणा त्याच्या अंतर्यामी वसत असलेल्या शांतीचाच केवळ परिणाम आहे असें जेव्हा त्याला कळून येतें, तेव्हां तेच लोक त्याची प्रशंसा करितात आणि त्याला मोठा मान देतात. कारण सद्वर्तन करणारे लोक जरी फारच थोडे असतात, तरी सद्वर्तन ज्यांस पसंत वाटत नाही असे लोक या जगांत मुळींच नाहींत. नीतिमत्ता कोणाच्या ठायीं आहे तें लोकांस कळत असतें. परंतु स्वतः नीतीनें वागावयाचे म्हटलें म्हणजे कांहीं प्रिय विषयांचा त्याग करावा लागतो. परंतु त्या विषयांचा त्याग करण्यास ते तयार नसतात. कारण त्यांचें मोल त्यांला वाजवीपेक्षा अधिक वाटत असतें. ज्याचें मन साफ असतें, त्याला आपणास कोणी पाहत आहेत काय अशी भीती मुळींच नसते. ज्याच्या हातून दुष्कर्मे घडलेली असतात, तो अगदीं एकांती असला तरी त्याला त्याचें मन खात असतें. जी गोष्ट रास्त असते तीच करावयाची असा आपण नियम केला म्हणजे मग सगळ्या जगाला आपलें वर्तन कळले तरी कांहीं हरकत नसते. परंतु हातून घडणारे कर्म वाईट असलें तर मात्र तें कोणाला अगदीं कळू दिलें नाहीं तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण त्या कर्माचा साक्षी आपल्या अंतर्यामी असतो. हातून दुष्कर्म घडले म्हणजे या साक्षीची टोचणी सुरू होते. अशा या अंतर्यामींच्या साक्षीची जे परवा करीत नाहींत, त्यांचें जिणे खरोखरीच मोठे कष्टमय होतें. दुष्ट मनुष्य कदाचित् कायद्याला फसवू शकेल. परतु त्याला आपल्या मनास कदापि फसवितां येणार नाही. गुन्हेगारांला पहिली मोठी जबर शिक्षा म्हटली म्हणजे कृतकर्माबद्दल त्यांचें मन त्याला खात असतें, ही होय. यावरून हें उघड आहे कीं, पापी मनुष्य आपली आपण शिक्षा भोगीत असतो. त्यानें केलेल्या पापाबद्दल इतरांकडून होणारे शासन त्यानें अगदीं चुकविलें तरी त्याचें मन त्याला सर्वदा शासन करीत असतें. ज्याच्या हातून दुष्कर्म घडलेली असतात, त्याच्या मनांत सदोदित धास्ती असते. या कर्माबद्दल आपणांस शासन होईल असें त्याला नेहमी वाटत असतें. याप्रमाणे त्यांच्या मनांत शासनभीती घोळू लागली म्हणजे तो स्वतांला शासन करीत आहे म्हणून समजावे. आणि जो शासनास पात्र असतो, त्यासच शासनमय असतें. तेव्हां अशा सर्व काळ भीती

** इज्जेने जड दांभिक व्रतिपणे कापट्य शौचे गणी
शौर्य निर्दय आर्जवे लडबढ्या कीं दीन सद्भाषणी

*** मानेच्छा तरि मूर्ख कीं बडबड्या वक्ता निकामी भला
ऐसा तो गुण कोणता खलजनी नाहींच जो निंदिला. वामन.

बाळगणाऱ्या दुराचारी मनुष्यास कोणी दुष्कर्म करितांना पकडले नाही म्हणून काय झालें? आपणास लोक पकडतील ही भीती त्याच्या मनांतून कधीं तरी नाहीशी होते काय? त्याला सुखनिद्रेचा अनुभव कदापि प्राप्त व्हावयाचा नाहीं. दुसऱ्यांची कुकर्मे पाहून त्याला आपल्या कुकर्मांची नेहमी आठवण होईल. परंतु ज्यांच्या मनांत अशी कोणतीच भीती नसते, त्याला वास्तविक सुखाचा चिरकाल अनुभव घडत असतो. तुकारामाची या प्रकरणी अशी उक्ति आहे:-

चित्त समाधाने । तरी विष वाटे सोने
बहु खोटा अतिशय । जाणा भले सांगो काय
मनाच्या तळमळें । चंदनानेंही अंग पोळे
तुका म्हणे दुजा । उपचार पीडा पूजा

ज्यानें आपलें आयुष्य सदाचरणांत घालविले असतें, त्याचें मन शुद्ध व शांत असून, त्याला खरा व अढळ आनंद प्राप्त होतो. आपल्या अंतःकरणांत शांति असली म्हणजे बाह्य जगामध्ये कितीही घोटाळा व गडबड होत असली तरी तिची आपणांस मुळींच परवा नसते परंतु आपल्या ठायीं दुर्वृत्ति प्रबल होऊन त्या विवेकास जुमानीनातशा झाल्या म्हणजे आपलें चित्त अस्वस्थ होतें. ही चित्ताची अस्वस्थता कशानेही दूर होत नाहीं. देहाला बाहेरून कितीही सुखदायक उपचार केले तरी चित्ताला शांति प्राप्त होत नाहीं.

कित्येक मनुष्ये स्वभावतः उदास असतात. अशांचा उदासपणा सदुद्योगप्रीतीने गेला पाहिजे. ते जात्याच मोठे आळशी असल्यामुळें त्यांस वाईट सवई जडलेल्या असतात. त्यांचा वेळ कांहीं तरी उद्योगधंद्यामध्ये गढून जाईल असें केलें पाहिजे. म्हणजे मग त्यांच्या त्या वाईट सवई हळूहळू कमी होतील. भर्तृहरीने उद्योगाची प्रशंसा जी पुढील वचनांत केली आहे, तिचे इंगित सदरील प्रमाणेंच आहे:-

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः ।
नास्त्युद्यमसमो बन्धुः कुर्वाणो नावसीदति ।। भ*

यथेच्छ आहारविहार केल्यांनं किंवा मनास वाटेल त्या ऐषआरामांमध्यें धन वेचल्यानें खरें सौख्य प्राप्त होत नाहीं. ज्यास ऐश्वर्याची अनुकूलता असते, त्याला हवे ते सुखसोईचे पदार्थ प्राप्त होण्यासारखे असतात. परंतु हें ऐश्वर्य नष्ट झालें म्हणने हे पदार्थ मिळण्याची पंचाईत पडते. अशा समयी खिन्न होणें हें विवेकी मनुष्यास उचित नव्हे. कारण ह्या बाह्य सुखविषयांला मी अंतरलो तरी माझ्या खऱ्या सौख्यास यापासून लवमात्रही धक्का पोचणार नाहीं. त्याचें निधान केवळ अंतर्यामीं आहे; आणि ऐश्वर्य व त्यापासून प्राप्त होणारे सुखविषय हे केवळ बाह्य होत. तेव्हां अशा बाह्य विषयांशीं माझा वियोग झाल्याने मीं कां म्हणून कष्टी व्हावें बरें? ज्यास आपली खरी योग्यता जाणून घ्यावयाची असेल, त्यानें आपलें ऐश्वर्य, आपली दौलत, आपला अधिकार ही एकीकडे ठेवून स्वतांचें परीक्षण करावें.

प्रत्येकानें आत्मपरीक्षण करावे

आपल्या सामर्थ्याविषयी किंवा योग्यतेविषयीं पुराविचार केल्यावाचून, खात्री बाळगणे हें मोठेच धोक्याचे आहे; यास्तव आपण आपली अंतःकरणे कशी काय आहेत तें बारकाईनें पाहू. त्यांत कोणकोणत्या

* आलस्य जें कार्यविघातकारी । असो नये तो रिपु या शरीरी.
उद्योग संब्दधु तया न टाकीं । त्या सेविता पावसि सौख्य लोकीं. वामन

वाय ५३८-८

वृत्ति उप्तन्न होतात याचे अवलोकन करूं. आपली वास्तविक योग्यता असते तीपेक्षां अधिक योग्यता आपल्या ठायीं आहे असें अपणांस भ्रमानें वाटत असतें. हा भ्रम नाहींसा झाला पाहिजे. प्रतिदिवशीं रात्रीं आपल्या हातून घडलेल्या एकंदर कृत्यांचा व आपल्या अंतःकरणांत उद्भवलेल्या एकंदर वृत्तींचा तपास करावा. आपण आज कोणत्या दुर्वत्तीचे दमन केलें? कोणत्या वासनेचा जय केला? कोणत्या मोहप्रसंगाचा प्रतिकार केला? कोणता सद्गुण प्राप्त करून घेतला. असा विचार सदोदित करावा. ह्याच बोधाचे सार पुढील वचनात आहे:-

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत नरश्चरितमात्मनः ।
किं नु मे पशुभिस्तुल्य किं नु सत्पुरुषैरिति ।।*

याप्रमाणे जर आपण आपल्याठायींच्या दोषांचें परीक्षण करून त्यांचा निषेध करूं, तर ते आपल्या अंगांतून हळुहळु कमी होतील. प्रतिदिवशीं रात्रीं आत्मपरीक्षण केल्यानंतर व आपल्या आचरणाचा अक्कलआढावा रोजनिशीमध्ये लिहिल्यावर ज्याला सुखनिद्रा लागत असेल, तो धन्य होय. आपलें मन आपल्या सर्व कृत्यांचे साक्षी असून स्वतांच्या ठायीं उद्भवणाऱ्या बऱ्यावाईट वृत्तींचा निवाडा करणारें आहे. तेव्हां अशा ह्या मनाची शांति व थोरवी कायम राखून तें मोहवश होऊं न देणे हें फार कठीण काम आहे. रात्रीं दिवा विझवून बिछान्यावर पडलो म्हणजे मीं सगळ्या दिवसांत जी कृत्ये केली असतील व जे शब्द बोललो असेन, त्या सर्वांचें मी स्मरण करितों. कोणतीही गोष्ट मी आठविल्यावांचून ठेवीत नाहीं. कारण ज्या माझ्या चुकासंबंधानें मी स्वताशी बुद्धिवाद करून स्वतांला क्षमा करण्याचें मला सामर्थ्य असतें, त्यांकडे मीं कां म्हणून दुर्लक्ष करावें बरें? मी एकाद्या वादामध्ये विनाकारण संतापास चढलो असेन; अमुक एका प्रकरणी मीं माझें मत नसतें दिलें तर बरें झालें असतें; कारण त्यामुळें अमुक एका गृहस्थास राग आला, आणि त्याचा परिणाम पुढें वाईट झाला; मीं जी गोष्ट सांगितली असेल, ती खरी असेल; परंतु सर्वच खऱ्या गोष्टीं सर्व प्रसंगीं बोलण्यासारख्या नसतात; प्रसंग पाहून जें कांहीं बोलावयाचें तें बोलले पाहिजे. अमुक एका प्रसंगी मीं एकाद्या मूर्ख मनुष्याशी किंवा मजहून श्रेष्ठ अशा एकाद्या गृहस्थाशी जो वाद केला, तो केवळ व्यर्थ होता; मीं त्या प्रसंगीं आपलें तोंड आटोपले पाहिजे होतें; अमुक एका प्रसंगीं मी वाईट रीतीनें वागलो; मला पुनः तसें वागता कामा नये; याप्रमाणे प्रत्येक जण आपलें परीक्षण करण्याचा परिपाठ ठेवील तर त्याचें व एकंदर मानवजातीचे पुष्कळ कल्याण होईल. आपल्या जीविताचा मुळीच भरवसा नाहीं. तेव्हां अशी आत्मपरीक्षणाची सवय नेहमी ठेवणे अत्यंत अगत्याचे होय. जो प्रत्येक श्वास आपण सोडीत असतो, तेवढा आपल्या आयुष्याचा क्षय होत चालला आहे; आणि दुसरा श्वास घेण्यास आपण जिवंत राहू याची सुद्धा शाश्वती नाहीं. आपल्या या ऐहिक जीवनामध्ये कितीही वैचित्र्य दृष्टोत्पत्तीस आलें, तरी सर्वाचा शेवट सारखाच आहे. नाश व मृत्यु, आशा व भय ही आमच्या जन्मासच लागून राहिलीं आहेत. जीवमान आहे तोपर्यंत आपण नाना प्रकारी दुःख पावणार व इतरांच्या दुःखास कारण होणार. अशा या सर्वसाधारण कष्टमय अवस्थेच्या परिहारास एकच उपाय आहे. तो अर्थात् हाच कीं, सर्वदा नीतीन वागावे.

---

* मनुष्यनें प्रतिदिवशीं आपलें चरित्र तपासावे आणि पहावे कीं, पशूंस योग्य असें मजमध्यें काय आहे, आणि सत्पुरुषांय योग्य असें काय आहे.

भाग सातवा

सदाचारी पुरुष कदापि दुःखी असावयाचा नाहीं; आणि दुराचारी पुरुष कदापि सुखी असावयाचा नाहीं

निसर्गामध्यें सदाचार आणि सौख्य यांचा कार्यकारणसंबंध जितका अबाधित व निरंतरचा असतो, तितका दुसऱ्या कशाचाही नसतो. जेथे सदाचार दृष्टीस पडतो, तेथें सौख्याचा अनुभव अवश्य घडावयाचा; आणि जेथे सौख्य दिसून येतें, तेथें सदाचार खात्रीने घडत आहे म्हणून समजावे. जो मनुष्य प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानून रहातो, त्याला सुखलाभ अवश्य व्हावयाचा. आपण हरएक कृत्य करितांना बऱ्यावाईटाचा चांगला विचार केला पाहिजे; आणि हा विचार विवेकशक्तीच्या योगाने आपणांस करिता येतो. ह्या विवेकाचे अधिष्ठान मनाच्याठायीं असतें. सूर्य जसा वस्तुमात्रावर आपले किरण पाडून त्यांस प्रकाशित करितो, तरी त्यापासून निराळा रहातो, तद्वत् आपलें मन विवेकरूप प्रकाशकिरणांच्या योगाने आपल्या सर्व कृत्यांचें स्वरूप आपणांस स्पष्टपणे दिसेल असें करिते; तथापि तें त्या कृत्यांपासून सर्वथा अलिप्त असते. एकाद्या अश्वावर बहुमोल सरंजाम घातलेला पाहून जर आपण त्याबद्दल त्या अश्वाची वाखाणणी करीत नाहीं, तर मनुष्यास बाह्य सुखसंपदा दैवयोगाने उमाप प्राप्त झाल्याबद्दल आपण त्यानी तारीफ करणें योग्य होईल काय? दुराचारी मनुष्य मोठा बलाढ्य असला, किंवा तो मोठ्या कुळांत उत्पन्न झालेला असला, किंवा तो मोठा धनाढ्य असला, तरी त्याचें दुराचरण कदापि क्षम्य नव्हे. त्याचप्रमाणें हें सारे बाह्य वैभव ज्या सदाचारी पुरुषास अनुकूल नसतें, त्याचा सदाचार त्या वैभवाच्या अभावामुळे लवमात्रही कमी होत नाहीं. ज्या मनुष्याच्या ठायीं सदाचार असतो, त्यास दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसली तरी तो परम मान्य होय; आणि ज्याच्या ठायीं सदाचाराचा अभाव असतो, त्यास इतर गोष्टींची कितीही अनुकूलता असली तरी तो तुच्छ समजावा. ही अशी सदाचाराची महती आहे. तेव्हां तो ज्याच्या ठायीं असतो तो परम धन्य होय. उदाहरणार्थ असें पाहा कीं, एकाद्या नौकेला बाहेरून चांगली नकशी कोरून उत्कृष्ट रंग दिला असला तरी तिची कोणी मोठी किंमत समजत नाहींत. तर ती चालावयास कशी आहे, व समुद्रांत होणाऱ्या तुफानाच्या वगैरे प्रसंगीं ती मजबूत व नीट राहील किंवा कसें, याचा तपास करून तिची किंमत ठरवीत असतात. तलवारीचा उत्तमपणा ती ज्या म्यानात ठेवलेली असते, त्याच्या लकाकीवरून मानीत नसतात; तर तिचे पाणी कसें काय आहे व तिला धार वगैरे कितपत आहे याचा तपास केल्यावर तिचा उत्तमपणा व्यक्त होतो. अशीच गोष्ट मनुष्याची आहे. त्याची जी मान्यता होते ती त्याच्याजवळ पैका

किंवा ऐश्वर्य किती आहे हें पाहून होत नसते, तर त्याच्या अंगीं सदाचार कितपत आहे याचे अवलोकन करून होत असते, तुकाराम म्हणतो: **'शुद्ध कसुनि पाहावे । वरि रंगा न भुलावे.'**

सदाचारी पुरुषाच्या हातून मानवी जातीचे कल्याण होतें

मनुष्यजातीच्या हितासाठी झटणे हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. त्याला सामर्थ्य असल्यास त्यानें बहुतांचे कल्याण करण्याचा प्रयत्न करावा. परंतु त्याचें सामर्थ्य अल्प असल्यास त्यानें थोड्यांचे तरी हित करण्याचा निर्धार करावा. एवढेही सामर्थ्य त्याच्या ठायीं नसल्यास त्यानें निदान आपल्या शेजाऱ्याच्या तरी उपयोगी पडण्याचा प्रयत्न करावा. इतकेंही त्याच्याकडून होण्यासारखे नसल्यास निदान आपलें तरी कल्याण त्यानें अवश्य करून घ्यावे. या संसारामध्यें मनुष्याची मुख्य दोन कर्तव्यें आहेत. तो ज्या देशांत जन्म पावला असेल, त्या देशासंबंधाचे एक कर्तव्य, आणि त्याच्या स्वभावासंबंधाचें दुसरे कर्तव्य. हें दुसरे कर्तव्य पहिल्या कर्तव्याहून विशेष महत्त्वाचें होय. कित्येक लोक असे असतात की, ते ही दोन्ही कर्तव्ये उत्तम प्रकारें बजावितात. परंतु कित्येक जण पहिल्या कर्तव्यासच सर्वस्वी वाहिलेले असतात; आणि कित्येकांचें लक्ष दुसऱ्या कर्तव्याकडेच सर्व प्रकारे लागले असतें. हें दुसरे कर्तव्य एकांतांत गुप्तपणें चिंतनादिकांच्या योगेकरून होत असतें; आणि हेंच कर्तव्य विशेष श्रेयस्कर होय. तरी पण मनुष्याचा सामान्यतः कल पाहिला असतां तो असा दिसून येतो कीं, त्याला ही दोन्ही कर्तव्ये करण्याची हाव असते. सदाचारी मनुष्य आपल्या देशबांधवांचे, आपल्या इष्ट मित्रांचे व आपलें स्वताचे कल्याण करण्यास झटत असला तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. आपल्या देशाच्या रक्षणासाठी तरवार घेऊन युद्ध करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नसेल तर देशांतील कायद्यांचा अभ्यास करून वकील किंवा न्यायाधीश बनून, लोकांचें अन्याय व नुकसान यांपासून त्यानें रक्षण करावे. हाही व्यवसाय त्याच्यानें होत नसल्यास जनांस धर्म व नीति यांचा उपदेश करण्याचें काम त्यानें पत्करावे. हा त्याचा उपदेश इतर लोक ऐकण्यास तयार नसतील, तर त्यानें आपलें घर सुधारण्याचा प्रयत्न करावा. आपलीं बायकामुले व इष्टमित्र यांस आपल्या ज्ञानाचा व अकलेचा फायदा करून द्यावा; आणि त्यांच्याशीं ममतेनें, विश्वासाने आणि बेताबातानें वर्तन करण्यास झटावे. त्यानें असें ध्यानात वागवावें कीं, तो अमुक एका देशाचा जानपद नसला तरी मनुष्यजातीचा प्राणी असून सर्व जग त्याचा देश आहे. मला प्रधानकी मिळेल तरच मी देशाच्या कारभारांत मन घालीन, किंवा मला सेनापतीचा अधिकार मिळेल तरच मी स्वदेशरक्षणार्थ होणाऱ्या युद्धांत तरवार घेऊन लढेन, असा हेका तो धरून बसेल तर ती त्याची मोठीच चुकी समजावी. आपण कोणत्याही स्थितींत असलो व आपणांस कसलाही अधिकार असला तरी स्वदेशाच्या व स्वजनांच्या उपयोगी पडण्यास आपण सर्वदा उद्युक्त असावें. जो खरा स्वदेशभक्त असतो, तो सामान्य योद्ध्याप्रमाणे रणामध्यें लढत असता, त्याचे हात तुटल्यामुळे त्याला शत्रूंवर शस्त्रप्रहार करण्याचें सामर्थ्य नसलें तरी तो आपल्या तर्फे लढणाऱ्या इतर योद्ध्यांना अनेक प्रकारीं उत्तेजन देत समरांगणांत उभा राहील, पण आपल्या देशाची बाजू सहसा जाऊं देणार नाहीं. एकाद्या मनुष्याने सर्व कामधंदा सोडून घरीं स्वस्थ बसून रहाण्याचा बेत केला, तरी तेथे देखील त्याला आपला काळ अशा रीतीनें घालविता येईल कीं, त्याचें पासून जे लोक वागतील, त्यांचें कल्याणच होईल. तेव्हां तात्पर्य काय कीं, स्थल, काल व सामर्थ्य यांच्या अनुरोधानें आपले व्यवहार कमीजास्त करण्यास आपणांस काहीएक हरकत

किंवा अडचण नाहीं. परंतु आपण कोणत्याही स्थितींत व कोठेही असलो तरी आपण एक क्षणभरही रिकामे बसूं नये, कांहीं तरी सत्कर्म करीत असावें. कारण ज्याच्या देहांत प्राण आहे, तो काहीएक न करितां स्वस्थ बसून आयुष्यनाश करील तर तो जिवंत असूनही मेलाच म्हणून समजावे. म्हटलें आहे: **'धिग्जीवित चोद्य मवर्जितस्य'***

दैव प्रतिकूल असलें तरी त्यापासून मनास कांहींएक अपाय होणे नाहीं

आपली दैवगति कशीही असली तरी तीबद्दल अस्वस्थ होणें शहाण्यात उचित नव्हे. तिची त्यानें यत्किंचित्ही परवा करूं नये. कारण त्यास हें पक्के ठाऊक असतें कीं, तिच्यामुळे आपलें लवमात्रही अहित होणें नाहीं. प्रतिकूल दैवगतीमुळे त्याचें सारे ऐश्वर्य व अधिकार ही नष्ट झालीं, किंवा त्याच्या शरीरास नानाविध दुःसह पीडा जडल्या, किंबहुना तो एकंदर बाह्य सुखसोईस मुकला, तरी त्याबद्दल तो सहसा कष्ट पावत नाहीं. कारण हे सारे विषय ज्याच्याकडून आपणांस प्राप्त झालेले असतात, त्यानें ते परत मागितले म्हणजे त्यास ते मुकाट्यानें दिले पाहिजेत. ते आपल्यापाशीं केवळ अल्प काळ रहाणारे असतात. तेव्हां त्यांविषयीं विनाकारण कष्ट पावण्यांत काय अर्थ आहे? एका कवीनें जें म्हटले आहे कीं, **'धन हें जायाचे जायाचे । कदापि न राह्याचे'** तें यथार्थ होय. ज्ञाता पुरुष स्वताचे जीवित सर्वतोपरी परतंत्र समजतो. हें जीवित आपणांस केवळ अल्प काळ प्राप्त झालें आहे असें त्याच्या मनांत अहर्निश वागत असतें. तरी पण या जीविताचें मोल तो सहसा कमी मानीत नाही तो त्याची अवश्य तेवढी काळजी केवळ मनापासून घेतो. एकाद्या सज्जन मनुष्याच्या हवाली कोणी एकादी वस्तु केली असतां, तिची जशी तो मोठ्या प्रामाणिकपणानें काळजी वाहतो, तद्वत ज्ञाता पुरुष आपल्या अल्पकालिक जीविताची काळजी वाहतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, ज्याच्या कृपेने हें जीवित आपणांस प्राप्त झालेलें असतें, त्यानें तें परत घेण्याचें मनांत आणिले असतां, त्याला मुकण्यास आपण सर्वदा तत्पर असावें. अशा रीतीनें जीवितास मुकावे लागल्यानें आपलें कांहीं नुकसान होतें असें कोणीही समजू नये. तर तें 'ज्याचे होतें त्यानें नेले । तेथें तुझें काय गेलें' हें साधुवचन ध्यानांत वागवून चित्ताची स्वस्थता नष्ट होऊं देऊं नये. ज्या वस्तूस आपण अगदीं पात्र नव्हतो ती आपण परत देण्यास सर्वदा तत्पर असावें; आणि जें मन आपणांस प्राप्त झालें असतें, त्यांत कांहीं तरी सुधारणा करून तें परत करावे हें आपणांला उचित होय.

---

* उद्योगावाचून जो रहातो, त्याच्या जीविताला धिक्कार असे.

भाग आठवा

सर्व कांहीं निसर्गक्रमाप्रमाणे घडत आहे असें मनांत आणिल्यानें संकटांपासून उद्भवणाऱ्या साऱ्या पीडेचा परिहार होईल

या विश्वाचें जो सूक्ष्म दृष्टीने अवलोकन करील, त्यास असें आढळून येईल कीं, एकंदर नैसर्गिक व्यापारांच्या योगानें वस्तुमात्राचें एकसारखे रूपांतर होत आहे. विश्वांतील कोणतीही वस्तु कदापि नष्ट होत नाहीं. ज्या वस्तूचा नाश झाला असें आपणांस वाटतें, ती वस्तुतः पाहता केवळ रूपांतर पावलेली असते. दिवसामागून रात्र येत आहे; एका ऋतूमागून दुसरा ऋतु नियमानें येत आहे; आकाशांतील ग्रहगोल आपआपल्या कक्षांत नियमानें परिभ्रमण करीत आहेत. हे व असेच दुसरे एकंदर व्यापार निसर्गामध्ये अप्रतिहतपणें व कधीं न बदलणाऱ्या व्यवस्थेने व नियमानें होत आहेत. तेव्हां अशा नैसर्गिक नियमाप्रमाणें जी अवस्था आपणांस प्राप्त होईल, ती आपण निमूटपणे मान्य केली पाहिजे. कारण तीमध्यें बदल करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसतें; आणि जी गोष्ट केवळ निरुपाय असते, तीविषयीं वृथा खेद करीत बसण्यांत काय अर्थ आहे? निसर्गक्रमास विनाकारण दोष देत बसणे हें क्षुद्रबुद्धि पुरुषाचे काम आहे. अशा मनुष्याने निसर्गक्रमांत फेरफार सुचविण्याचे सोडून देऊन स्वतांची सुधारणा करण्यास प्रवृत्त व्हावें हें उचित दिसते. ज्या गोष्टी आपणांस मोठ्या वैभवाच्या वाटून आपलें मन त्यांस लुब्ध होऊन जातें, त्यांची ती सारी लकाकी भासमय असून, त्यांचा मोह केवळ व्यर्थ होय. त्यापासून प्राप्त होणारे सुख स्वप्नवत् असून केवळ असार असतें. दुरून त्या आपणांस कितीही मोहकशा दिसल्या तरी त्यांच्या संनिध आपण जाऊन, त्यांचा प्रत्यक्ष परिचय आपणांस घडला म्हणजे त्या अत्यंत अनिष्ट व भ्रामक आहेत अशी आपली खात्री होते. '**दुरून डोंगर साजरे जवळ जातां काजरे**' या म्हणींत हाच बोध सुचित केला आहे. लोक ज्यास मोठे सुखी समजतात, ते कधीकधी अत्यंत मोठे दुःखी असतात. वस्तुतः पाहता जी सुखाची साधनें कोणत्याही स्थितीमध्यें लवमात्रही न बिघडता जशीची तशींच रहातात, तींच खरी सुखावह होत. अशा निर्दोष साधनांचें जितके आपण परीक्षण करावे, तितकी तीं अधिकच मोलवान् वाटण्यासारखी आहेत. परंतु सर्वांत विशेष सौख्याची स्थिति म्हटली म्हणजे तींत कोणत्याही सुखसाधनांची आपणांस आवश्यकता वाटूं नये. लोकांस दारिद्र मोठे क्लेशप्रद वाटतें. परंतु मनुष्य जन्मतो तेव्हां जितका कंगाल असतो, तितका तो साऱ्या जन्मांत कधींही असत नाहीं. मग त्याविषयीं वृथा खेद कां करावा बरें? त्याचप्रमाणे आपल्या जीवितामध्यें आपणांस नाना प्रकारची पीडा सोसावी लागते. तीविषयी लोकांस मागे भीती वाटते. परंतु ही पीडा एक तर अल्पकाळ अनुभवावी लागते, किंवा तिजमुळें आपल्या जीविताचा एकदाचा अंत होतो. याहून अधिक तें तिजपासून

काय होणार आहे? तेव्हां तात्पर्य काय कीं, आपणांस या संसारामध्ये कशीही स्थिति प्राप्त झाली असली तरी तिजपासून आपल्या चित्तास क्लेश होण्याचे काहीएक कारण नसतें. ज्या गोष्टी सामान्य जनांस मोठ्या भयावह वाटतात, त्यांची जो यत्किंचितही परवा करीत नाहीं, आणि ज्या गोष्टींचा ते मनापासून लोभ करितात, त्या जो तुच्छ मानितो, त्यासच खरी सौख्यप्राप्ति होते.

अनिष्ट प्रसंगांपासून आपलें हितच होते

आपणांस या प्रपंचामध्यें जितकी अधिक संकटे प्राप्त होतील, तितकी आपली सहनशक्ति वृद्धिंगत होऊन, त्यापासून चित्ताची शांति नष्ट होण्याचा संभव कमी असतो. संकटे सोसण्याचा एकदा सराव झाला म्हणजे त्यांची आपणांस बिलकुल परवा वाटत नाहीं; उलट त्यामुळें देहाचे निरनिराळे अवयव व मनाच्या निरनिराळ्या शक्ति यांस संकटमूलक क्लेश सहन करण्याचा अभ्यास घडून बळकटी येते; आणि मग क्लेशांचें त्यांस मुळी भानच होत नाहीं. उदाहरणार्थ नावाड्याचे हात वल्हवून वल्हवून निगरगट्ट झालेले असतात. योद्ध्याचे बाहू शस्त्रांचीं कारवी करून करून बळकट झालेले असतात. त्याचप्रमाणें जे वृक्ष सदोदित मोठ्या जोराच्या वाऱ्यांत वाढत असतात, त्यांची मुळें जमिनींत फार खोल गेलेली असतात. या भूतलावर कित्येक लोक असे आहेत कीं, त्यांस सर्वदा अत्यंत थंड हवेमध्ये रहाणे भाग पडते. कित्येंकास तर निर्वाहाच्या पंचायतींत सारा जन्म कंठावा लागतो. कित्येकांना रानावनात एकाद्या गुहेत किंवा पर्ण कुटिकेत राहून व कंदमुळांवर वगैरे निर्वाह करून वनचरांच्या संगतीनें आयुष्याचे सारे दिवस काढावे लागतात. ह्या साऱ्या अवस्था मनुष्यात सवईनें सह्य होतात; इतकेंच नव्हे, तर त्या आपणांस कदापि चुकविता येणे नाहीं असें झालें म्हणजे त्या हळूहळू आंगवळणी पडूं लागून, दृढाभ्यासानें त्या सुखावहही वाटूं लागतात. ज्ञानदेव म्हणतोः **'म्हणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाही.'** तेव्हां वर निर्दिष्ट केल्यासारख्या विपन्नावस्थेमध्यें राष्ट्रांची राष्ट्रे आज रखडत असतां, तशी स्थिति आपणांस प्रसंगविशेषीं प्राप्त झाली तर आपणांवर तें मोठे संकट आलें असें आपण कां म्हणून मानावें बरें? वस्तुतः पाहता या जगांतील कोणतीही अवस्था सर्वथा क्लेशप्रद आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक अवस्थेमध्यें कांहीं गोष्टी इष्ट व अनुकूल असून सुखावहही असतात. कित्येक गोष्टी तर अशा असतात कीं, त्या आपणांस केवळ भ्रमास्तव मोठ्या अनिष्टशा वाटतात. तरी पण त्या बारकाईनें पाहिल्या असतां त्यांत क्लेशकारक असें काहीएक नसतें. त्याबद्दल आपण जी कुरकुर करितो, ती केवळ व्यर्थ असून त्यांच्या वास्तविक स्वरूपाविषयी आपले अज्ञान असतें. एक तर हें लक्षांत ठेविले पाहिजे कीं, त्या साऱ्या निसर्गक्रमानुसार घडत असतात; म्हणून त्यांविषयीं कुरकुर करणें आपणांस मुळींच शोभत नाहीं. दुसरें, त्यामुळें आपण कितीही क्लेश पावलो. किंवा त्यांविषयीं कितीही नाखुशी दर्शविली तरी त्या घडावयाच्या कधींही चुकणार नाहींत. ज्या भयप्रद गोष्टींनी आपण क्लेश पावतो, व शोकाकुल होतों, त्या आपल्या या जीवितास निसर्गतः चिकटलेल्या आहेत. तेव्हां त्यापासून मुक्त होण्याविषयी कोणाची प्रार्थना करणें, किंवा इच्छा अथवा आशा करणें आपणांस सहसा उचित नव्हे. समजा कीं, एकादा मनुष्य चांगला वृद्ध होईपर्यंत जगून त्याला वृद्धापकाळास अनुरूप असे कांहीं रोग किंवा व्यंगे प्राप्त झाली, तर त्यानें त्याबद्दल आपलें चित्त अस्वस्थ होऊं देणें रास्त होईल काय? कदापि होणार नाहीं. कारण आपण दीर्घायु व्हावें अशी जी त्याची यावज्जन्म

इच्छा होती, तद्नुसार त्याला दीर्घ आयुष्य प्राप्त होऊन, तो निसर्गक्रमाप्रमाणें वृद्ध झालेला असतो. तेव्हां ज्या गोष्टीची तो मनापासून इच्छा करीत होता, ती त्याला प्राप्त झाली असतां, तिच्या अनुषंगाने स्वभावत: असणाऱ्या इतर गोष्टींविषयी त्यानें कां म्हणून विषाद मानावा? ज्यास सदाचारसंपन्न व्हावयाचें आहे, त्याचीही अवस्था अशीच आहे. नीतिनियमांचे अनुसरण करितांना त्याला अनेक मोहप्रसंग येऊन, त्याची वृत्ति द्विधा होण्याचा संभव असतो; त्याचप्रमाणे त्यास हरएक प्रसंगीं थोडेबहुत क्लेश सोसावे लागतात. तथापि त्यापासून त्यानें आपल्या चित्तास कदापि व्यामोह होऊं देता कामा नये. सदाचारासाठी प्राप्त होणारे क्लेश कितीही मोठे असले तरी ते केवळ अल्पकालिक असून त्यांची पीडा केवळ बाह्य असते. यास्तव ज्ञात्या पुरुषाने त्यांची मुळींच परवा करूं नये पुनः सदाचारासाठी जितके अधिक क्लेश सहन करावे, तितकी आपली वाहवा अधिक होण्यासारखी असते.

आपणांस प्राप्त होणारे प्रसंग इष्टही नसतात किंवा अनिष्टही नसतात

पुष्कळ अडचणी व संकटे अशीं असतात की, त्यामुळे आपण अगदीं घाबरून जात व आपणांस तीं अत्यंत असह्य वाटतात. तथापि त्यांचा विशेष बारकाईने विचार केला असतां, ती आपल्या हिताची आहेत असें आपल्या लक्षांत येतें. त्याच प्रमाणें ज्या कित्येक गोष्टी व्हाव्या अशी आपणांस परम उत्कंठा असते, व ज्यांच्या प्राप्तींसाठी आपण अहर्निश खटपट करीत असतो, त्या अत्यंत घातक असून आपला सर्व प्रकारे नाश करणाऱ्या असतात. जे ऐषआरामीचे पदार्थ आपणांस इतके सुखदायक वाटतात, त्यांमुळे आपणांस नाना विकृति जडून आपलें जीवित अत्यंत कष्टमय होतें. विषयसुखाचा निषेध पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकारें केला आहे:-

यावन्तः कुरुते जन्तुः स्वसुखार्थपरिग्रहान ।
तावन्तोऽस्य निखन्यन्ते हृदये शोकशङ्कवः ।। * सु. र.

आपलें प्रिय बालक गमावलें, किंवा आपला हात तुटला, तर त्याबद्दल खेद वाटण्याची गरज नाहीं. कारण जें निसर्गाकडून आपणांस प्राप्त झालेलें असतें, तें त्यानें परत नेले तर त्यांत विलक्षण तें काय झालें? आपलें हे जीवितच मुळीं क्षणभंगुर असून, आपणांस प्राप्त झालेल्या वस्तु आपणांपाशीं अल्पकाळ रहाणाऱ्या असतात. आपल्या ठायींच्या सदाचाराची पारख अशा संकटप्रसंगींच होत असते. सोन्याची परीक्षा जशी अग्नीत घातल्याने होते; इतकेंच नव्हे, तर तें तावून सुलाखून, पाहता पाहता जसे अधिकच तेजःपुंज होतें, तद्वत्च नीतिमान् पुरुषाची खरी योग्यता संकटांच्या योगानें लोकांच्या नजरेस अधिकच आली पाहिजे. ज्यास आज सुखसमाधान आहे, त्याला म्हणजे यापुढें कधीं संकट प्राप्त होणार नाहीं, असें कोणी समजतां कामा नये. तेव्हां आपणास आज एकादा पीडाकारक रोग होऊन आपण तळमळत असलो तरी त्याबद्दल आपण कुर कुर करूं नये, किंवा कष्टी होऊं नये; तर ती पीडा आपण धैर्याने सहन करावी. भर्तृहरीने या धैर्यगुणाची पुढील पद्यांत प्रशंसा केली आहे:-

---

* जोपर्यंत प्राणी स्वमुखविषयांच्या प्राप्तीसाठीं झटत असतो, तोपर्यंत त्याचें हृदय शोकरूप शंकु विदारीत असतात.

कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्तेर्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम् ।
अधोमुखस्यापि कृतस्य वन्हेर्नाधः शिखा याति कदाचिदेव ।।*

संकटांनी नीतिमत्तेची पारख होते.

कित्येक संकटप्रसंग असे असतात कीं, ते आले असतां, मनुष्याच्या नीतिमत्तेची चांगलीच पारख होते. एकाद्या बिकट प्रसंगीं नीतिनियमांचा भंग केला असतां ऐहिक सुखलाभ होण्याचा संभव असतो; व तद्नुसार वागण्याचा निर्धार केला असतां, अनेक प्रकारीं पीडा सोसावी लागते, किंवा कधींकधी प्राणांतही ओढवतो. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं नीतिमान् पुरुषाच्या अंगीं विलक्षण धैर्य व निर्धार ही असावी लागतात. नाहीं तर तात्कालिक लाभाकडे दृष्टि देऊन तो प्राप्त होणारी पीडा टाळण्यास सहज तयार होण्यासारखा असतो. हा त्याच्या खऱ्या पारखीचा समय होय. मनुष्याच्या अंगांत सदाचारप्रीति कोठवर आहे, व त्याच्या ठायीं धैर्य व निर्धार ही कितपत आहेत, हें या वेळीं अवश्य दिसून येतें. अशा धैर्यशाली पुरुषाचे वर्णन पुढील पद्यांत केलें आहे:-

चलन्ति गिरयः कामं युगान्तपवनाहताः ।
कृच्छ्रे ऽपि न चलत्येव धीराणां निश्चलं मनः ।। ** सु.

प्रसंग आल्यावांचून मनुष्याच्या ठायींचे गुण कसोटीस लागत नाहींत; आणि त्याला स्वतांलाही आपल्या ठायीं किती सामर्थ्य आहे तें कळत नाहीं. समुद्रावर मोठे तुफान व्हावें तेव्हां नाविकाची करामत कसास लागते. योद्ध्याच्या ठायींचें शौर्य व युद्धकौशल्य ही समरप्रसंगीं प्रत्ययास येतात. मनुष्य धनसंपन्न असतो तोंवर त्याला दारिद्र्यावस्थेंत कसें वर्तन करावे तें कळत नसतें. ज्याला लोक सदोदित चहात असतात व त्याचा मानसन्मान ठेवीत असतात, त्याची लोकांनी फजिती व छीथू केली असतां कसें काय वाटेल याचा त्यास अनुभव नसतो. ज्याला मूलबाळ कांहीं झालेलें नसतें, त्याला अपत्यवियोगापासून होणारे दुःख कसें असतें तें काहीच कळावयाचें नाहीं. नित्याचरणाची आवश्यकता संकटप्रसंगीच विशेष असते. अशा समयी मनाचा थोरपणा व्यक्त होतो; इतकेंच नव्हे, तर हा थोरपणा वृद्धिंगत होतो. मनुष्य शस्त्रधारण करून पहिल्यानेच युद्धभूमीवर गेला असतां, आपल्या देहावर शस्त्रप्रहार होऊन जखमा पडतील हा विचार मनांत येऊन त्याच्या उरात धडकी बसते. परंतु ज्याने अनेक समरप्रसंगांत तरवार गाजविलेली असते, त्याला जखमा होण्याचीही भीती बिलकुल नसते. कारण तो जाणत असतो कीं, मनुष्याला जखमा होऊन त्याच्या अंगांतून कितीही रक्त वाहलें, तरी त्याला कदाचित् विजयप्राप्ति होऊन स्वदेशाचे किंवा स्वपक्षाचें रक्षण केल्याचें महत्पुण्य प्राप्त होईल.

---

* आली जरी कष्टदशा अपार । न टाकिती धैर्य तथापि थोर. केली जरी जोत बळेच खाले । ज्वाळा तरी ते वरती उफाळे. वामन.

** पर्वत जे आहेत तै युगाच्या शेवटीं वाहणाऱ्ची कृच्छ्रच्या योगाने पाहिजे तिकडे जातात; पण धीर पुरुषांचे निश्चल मन मोठ्या संकटप्रसंगीही चलन पावत नाही.

कोणताही प्रसंग बरावाईट म्हणणें युक्त नव्हे

आपणांस ज्या नाना विपत्ति व संकटे प्राप्त होतात, किंवा ज्या सुखदायक स्थिति व प्रसंग यांचा अनुभव घडतो, त्यांस वाईट किंवा चांगली म्हणणें रास्त नव्हे. कारण तो सदाचारी व दुराचारी यांस सारखीच प्राप्त होतात. कित्येक वेळां तर असें आढळून येतें कीं, सदाचारसंपन्न पुरुषांस सर्व प्रकारची विपत्ति सोसावी लागते, आणि दुराचारी मनुष्यास कोणतीही विपत्ति प्राप्त होत नाहीं; इतकेंच नव्हे तर ते सर्वदा सुखानुभव घेत असतात. ही खरोखरीच मोठी वाईट गोष्ट आहे, असें सामान्य जनांस वाटण्यासारखे आहे. परंतु हा सारा प्रकार नैसर्गिक नियमांप्रमाणें घडत असतो. त्याला कोणाचा इलाज नसतो. दुर्जनास दुःख द्यावे आणि सज्जनास सुख द्यावे, असें निसर्ग कांहींच जाणत नाहीं. प्रत्येकास सुखदुःखाचा अनुभव अबाधित नियमांप्रमाणे काय प्राप्त होईल तो खरा. त्या विषयी उल्हास किंवा संताप पावणे शहाण्यास उचित नव्हे.

परंतु आपण हें सर्वदा ध्यानांत वागवावे कीं, मेहनत, कष्ट व संकटे ही आपणांस जितकी अधिक प्राप्त होतील, तितकी आपणांस तीं सोसण्याची सवय अधिकाधिक होऊन, त्यांपासून होणाऱ्या पीडेचे भान आपणांस हळूहळू कमी कमी होत जाईल. ज्यास असे प्रसंग कधीही प्राप्त होत नसून सुखसोईचा अनुभव बराच घडत असतो, त्यांच्या ठायीं सहनशक्तीचा विकास होत नसतो. यास्तव त्यांस एकादा बिकट प्रसंग प्राप्त झाला असता ते घाबरून जातात. जो सज्जन पुरुष आपलें धैर्य अढळ राखून स्वतांस प्राप्त झालेल्या दुःस्थितीची बिलकूल परवा करीत नाहीं, व सर्व प्रकारच्या संकटास मोठ्या शौर्याने तोंड देण्यास सर्वदा तत्पर असतो, तो मनुष्य धन्य होय. अशा पुरुषाचे वर्णन पुढील श्लोकांत चांगले केलें आहेः-

पतति व्यसने दैवाद्दारुणे दारुणात्मनि ।
संवर्धयति वज्रेण धैर्येण महतां मनः ।। सु. र.

कसाही प्रसंग प्राप्त झाला तरी जो आपल्या चित्ताची शांति अढळ राखितो, व प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानून रहाण्यास तयार असतो, तो खरा सुखी होय. आपणांस या संसारामध्यें ज्या अडचणी येतात, त्यांसंबंधानें आपण जितकी धडपड अधिक करावी, तितकी आपली विपत्ति अधिकच वाढते. जसा जाळ्यांत सांपडलेला पक्षी सुटून जाण्याकरितां नाना प्रकारीं धडपड करितो, तरी तो त्यांतून सुटून तर जात नाहींच, पण उलट त्याचे पाश अधिकच दृढ होतात; तद्वतच विपन्न मनुष्याची अवस्था या प्रपंचांत आहे. तेव्हां अशा स्थितीमध्ये योग्य उपाय म्हटला म्हणजे एवढाच कीं, प्राप्त अवस्थेमध्ये समाधान मानून स्वस्थ रहावे; आणि अहर्निश हें ध्यानांत वागवावे की, ही अवस्था मला निसर्गगत नियमानुसारें प्राप्त झाली असून, तीमध्यें पालट करण्याचें मला मुळींच सामर्थ्य नाहीं.

भाग नववा

मनाची क्षुद्रता आणि इतर सौख्यविघातक गोष्टी

येथवर जें प्रतिपादन केंले आहे, त्यांत पुढील गोष्टी साररूपानें कथन केल्या आहेत: प्रथमतः सौख्याचे स्वरूप सांगून, मग तें कशात आहे तें सांगतांना त्याचा आधार सर्वस्वी ज्ञान आणि सदाचार यांवर आहे असें प्रतिपादन केलें. कारण प्रथमतः आपण काय करावे याचें ज्ञान आपणांस प्राप्त होणें अगत्याचे आहे; आणि मग या ज्ञानानुसारें आपले वर्तन झालें पाहिजे. इतकें निरूपण केल्यावर मग तत्वज्ञानाचा उपयोग काय आहे त्याचें विवेचन केलें. त्याचप्रमाणे मनास कोणत्याही प्रकारची टोचणी नसणें हें मोठेच भाग्य समजावें; सदाचारी पुरुष कदापि दुःखी नसावयाचा, व दुराचारी पुरुष कदापि सुखी नसावयाचा; व जो प्राप्त स्थितीमध्ये आनंदानें रहातो, तो कदापि अभागी समजू नये; इत्यादि गोष्टीचे निरूपण केलें. आतां प्रकृत प्रकरणामध्ये सौख्याचा मार्ग इतका खात्रीचा व सुलभ असता, लोक त्यापासून पराङ्मुख होऊन सर्वतोपरी नाशाप्रत नेणाऱ्या आडमार्गी शिरतात याचे कारण काय? या गोष्टीचा विचार करणें आहे.

सौख्यविघातक गोष्टी

या संसारामध्ये कित्येक लोक असे असतात कीं, ते आपल्या आयुष्याचे दिवस कोणताही उद्देश मनांत न धरितां घालवितात. नदीप्रवाहावरून वाहत जाणाऱ्या गवताच्या काडीप्रमाणे त्यांची अवस्था असते. त्यांस स्वतांची अशी कांहींच गति नसते. ते जनप्रवाहाबरोबर लोटत चाललेले असतात. दुसरे कित्येक असे असतात कीं, या जीवितासंबंधी कांहीं गोष्टींपुरता ते विचार करितात; एकंदर जीविताविषयींचा विचार त्यांच्या मनात येत नसतो. परंतु ही त्यांची मोठीच चुकी होय. या जीविताचा मुख्य हेतु काय आहे याचा पूर्ण विचार करून योग्य निर्णय करण्यापूर्वी त्याच्या संबंधाच्या कोणत्याही गोष्टीकडे दुर्लक्ष करणे सर्वथा इष्ट नव्हे. बाण कशावर सोडावयाचा याविषयीं पहिल्याने निश्चय केल्यावांचून आपणास कसा बरें नेम धरिता येईल? किंवा नावाड्याने कोणत्या बंदरास तारू न्यावयाचे याचा बेत आधी ठरविल्यावांचून त्यास निरनिराळ्या दिशाकडून वाहणाऱ्या वाऱ्यांचा कसा उपयोग करून घेता येईल? आपली सांप्रत अशी स्थिति आहे की, आपण यदृच्छायोगेकरून कसे तरी वागत असतो. कांहीं जण असे असतात की, ते गत गोष्टींचें पुनःपुनः स्मरण करून खेद पावत असतात. दुसरे कित्येक जण पुढें येणाऱ्या अनिष्ट प्रसंगांविषयी आजच विचार करीत बसून विनाकारण विषाद पावत असतात. परंतु हे उभय प्रकारचे जन केवळ उपहासास पात्र होत. कारण गत कालाविषयीं आज विचार करण्यांत मुळीच अर्थ नाही. म्हटले आहेः **'गत न शोचे कृतं न मन्ये.'*** पुनः भविष्यकालाविषयी आज काळजी करीत बसण्यांत बिलकुल पुरुषार्थ नाहीं. जो काळ

* गेल्याचा शोक करूं नये, व एक वेळ हातून घडलेली गोष्ट मनास आणू नये.

अद्यापि यावयाचा आहे, त्याबद्दल शहाण्याने आज उद्विग्न होणे शोभत नाहीं. दुसरें असें कीं, भविष्यकालीं ज्या गोष्टी घडतील अशी आपणांस दहशत असते, त्यांच्या प्रतिकारार्थ कांहीं तरी उपाय सुचतील, नाहीं कशावरून? कारण त्या अनिष्ट गोष्टीचे पूर्वचिन्ह आपल्या लक्षांत येऊन, त्यांविषयीं आपण वेळींच सावध होऊन, त्यांच्या प्रतिकारार्थ कांहीं तरी उपाय योजण्याची आपणांस आपोआप बुद्धि होईल.

ज्यास या संसारांत स्वस्थपणे आयुष्यक्रमण करावयाचें असेल, त्यानें सत्ताधीश पुरुषांस कदापि दुखवूं नये; त्याला कोणत्याही प्रकारे त्रास न देता, किंवा त्यांची बेअदबी न करितां कालक्रमणा करावी. आतां सर्वच सत्ताधीश व बड्या पुरुषांचा लोभ संपादितां न आला तरी त्यांची आपणांवर इतराजी न होईल असें तरी निदान आपणांस करितां येईल. नाविक जसा वादळांतून सुटून जाण्याचा प्रयत्न करितो, तद्वत् सत्ताधीशांची इतराजी आपण टाळण्याविषयीं जपले पाहिजे. एकादा नाविक अविचारी असला तर तो वारा कोणत्या दिशेकडून वाहत आहे, किंवा आपलें तारू कोणीकडे चालले आहे याचा विचार करीत नसतो; यामुळें त्याचें तारू एकाद्या खडकावर जाऊन आपटते, किंवा भोवऱ्यात सापडन समुद्राच्या तळी जातें परंतु जो नावाडी विचारी व दक्ष असतो, तो आपल्या नौकेला कोठे धक्का आहे, व वारा कसा काय अनुकूल किंवा प्रतिकूल आहे याविषयी पाहिल्याने पुरी माहिती मिळवतो. तो आपलें होकायंत्र नेहमी नजरेसमोर ठेवून, ज्या ठिकाणी तारवे नेहमी फुटत असतात किंवा बुडत असतात, त्या ठिकाणांपासून तो आपलें जहाज दूर राखितो. प्रपंचांतील सामान्य व्यवहारांत ज्ञात्या पुरुषाचे असेंच वर्तन असतें. ज्यापासून त्याचें नुकसान होण्याचा संभव असतो, त्यांच्या वाऱ्यास तो मुळींच जात नसतो. परंतु अशा रीतीनें त्यांचा संसर्ग तो आपणास जरी होऊं देत नसतो, तरी ती गोष्ट त्यांच्या लक्षांत न येईल अशी सावधगिरी तो ठेवितो. कारण एकाद्या मनुष्याचा संसर्ग टाळण्याचा प्रयत्न केल्याने आपण त्याचा तिरस्कार केल्यासारखे होतें; आणि ही गोष्ट त्या मनुष्याच्या लक्षांत येऊन तो आपला द्वेष करूं लागतो. कित्येक लोक असे असतात कीं, त्याला दुसऱ्याच्या बऱ्यावाईट गोष्टी ऐकण्याचा किंवा त्या संबंधाने विनाकारण ढवळाढवळ करण्याचा मोठा नाद असतो. कोणा माणसासंबंधाची एकादी वाईट गोष्ट त्यांनीं ऐकिली कीं पिसाचा कावळा करून तिचा लोकांत पुकारा करण्याची त्यांला दुष्ट सवय असते. या दुष्ट सवयीचे वर्णन पुढील पद्यांत उत्तम प्रकारे केलें आहे:-

दोषालोकननिपुणा पुरुषगिरो दुर्जनाश्च घूकाश्च ।
दर्शनमपि भयजननं येषाम् निमित्त पिशुनानाम् ।।
पिशुनत्वमेव विद्या परदूषणमेव दूषणं येषाम् ।
परदुःखमेव सौख्य शिवशिव ते केन वेधसा सुष्टाः ।। * सु. र.

अशा दुर्जनांच्या संसर्गास शहाण्यानें कदापि जाऊं नये. कारण त्यांच्या भाषणांचे विषय नेहमी असे क्लिष्ट असतात कीं, ते ऐकिल्याने काहीएक फायदा होण्यासारखा नसतो; आणि त्या गोष्टींची कोणापाशी पुनरुक्ति केल्यास मोठे नुकसान होण्याचा संभव असतो.

---

* दुसऱ्याचे दोष पाहण्यांत निपुण व सदा दुर्भाषण करणारे दुर्जन हें केवळ घुबडासारखे होत. विनाकारण दुष्ट बुद्धि वागविणाऱ्या या लोकाचे दर्शन सुद्धा भयंकर आहे. दुष्टपणा हीच ज्याची विद्या व दुसऱ्यास दोष लावणे हेंच ज्याचे भूषण व दुसऱ्यांस दुःख झाले असता ज्यास सौख्य वाटतें, ते ब्रम्हदेवाने कशासाठी निर्माण केले न कळे.

मनाच्या क्षुद्रत्वाने आपल्या स्वास्थ्यास प्रत्यवाय घडतो

मनाचें क्षुद्रत्व हें मोठेच स्वास्थ्यविघातक आहे. एकादा मनुष्य जात्याच दुरात्मा असतो. त्यानें आपल्या स्वभावांत बदल झाला असें दाखविण्याचा वरकरणी प्रयत्न केला तरी त्यांत कांहीं अर्थ नाही. उलट त्यामुळें त्याचें दुष्टत्व अधिकच वृद्धि पावते. कारण तो मुळचाच दुराचारी असतां आणखी आपल्या धरसोडीच्या वर्तनाने आपला दुराचारीपणा विशेष रीतीनें लोकाच्या दृष्टींत आणतो. कांहीं लोक कधींच स्वस्थ बसणारे नसतात. दुसरे कित्येक असतात ते नेहमी स्वस्थ आहे तसे दिसतात. परंतु या उभय वृत्तींचे लोक दोषास पात्र होतात. कारण जे नेहमी चळवळे असतात, ते हुशार व उद्योगी आहे असे दिसतात, याचें कारण त्यांचें मन अस्वस्थ व क्षुब्ध झालेलें असते; आतां जे सौम्य व शांत असे दिसतात, त्यांच्या अंगांत आळस व सुस्ती फारच असते. तेव्हां हे दोन्ही प्रकारचे लोक चांगले नव्हेत. निसर्गक्रमाप्रमाणे उद्योग करण्याचा किंवा विश्रांती घेण्याचा जसा प्रसंग येईल, तद्नुसार आपलें वर्तन ठेवण्यास मनुष्याने सदैव तत्पर असावें. कित्येक असें चंचलबुद्धि असतात कीं, ते कोणतीच गोष्ट एकसारखी नेटाने करीत नसतात. आज एक गोष्ट हातीं घ्यावयाची, उद्या दुसरी बरीशी दिसली तर पहिली सोडून देऊन त्या दुसरीच्या नादी लागावयाचें, आणि परवा पहिल्या दोन्ही सोडून तिसऱ्याच एकाद्या गोष्टींत पडावयाचें. असा त्यांचा क्रम असतो. दुसरे कित्येक लोक असतात ते कांहींएक करीत नसतात. तरी त्यांच्या मनास कधींही स्वस्थता नसल्यामुळें त्यांस सुखनिद्रा येत नसते. कित्येक जणांच्या चित्तास अस्वस्थता प्राप्त होऊन, ते कांहीं वेळपर्यंत तळमळ करितात, परंतु शेवटीं त्यांस ग्लानि येऊन ते घोरत पडतात. कित्येक तर निवळ आळशी बनलेले असतात. दुराचार अनेक प्रकारचा आहे. परंतु त्याचा एक परिणाम सर्वसाधारण आहें. तो हाच कीं, त्याच्या योगानें मनुष्य नेहमी असंतुष्ट असतो. सर्वच माणसांच्या ठायीं वासना अनावार होण्याचा संभव नसतो. आपण स्वभावत: भितरे असल्यामुळें आपणांस एकाद्या गोष्टीविषयी खटपट करण्याचें धैर्य होत नाही; आणि यदाकदाचित् धैर्य झालेंच तरी त्या गोष्टीमध्यें यश येण्याची सर्वदा शक्यता नसते. कधीकधी आपण भलत्याच आशा करून सर्वदा चिंतातुर व संशययुक्त असतो. अशा प्रकारे चित्तास व्यामोह झाला असतां, आपण अयोग्य किंवा दुष्प्राप्य गोष्टींची अपेक्षा करितो; आणि त्यांच्या प्राप्तीसाठी जिवापाड केलेले श्रम विफल होतात तेव्हां आपणांस त्या गोष्टींविषयी खटपट करण्याची बुद्धि कोठून सुचली, असा अनुताप होतो. याप्रमाणे केलेल्या उद्योगास यश आलें नाही म्हणजे पुढें आणखी खटपट करण्याचा आपणांस हिय्या तर होत नाहींच, तथापि उद्भवलेल्या तृणांचे दमन करण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं असत नाही, आणि त्यांच्या तृप्तीचा मार्ग तर काहीएक सुचत नसतो. यामुळे आपलें चित्त अस्वस्थ व अस्थिर होतें; आणि लोकांत वागण्याचा पुरा कंटाळा येऊन एकांतवास स्वीकारावा असें आपल्या मनांत येते. परंतु एकांतवासांतही आपल्या चित्तास शांति प्राप्त होत नाहीं; तर उलट अस्वस्थता व उदासीनता अधिकच वाढून, चित्त तळमळू लागतें. आपली स्थिति परम असह्य वाटून लज्जेने आपण काळवंडून जातो. आपल्या चित्तास होणारा उद्वेग आपण छपविण्याचा प्रयत्न करितो. तरी तो दु:सह होऊन आपलें हृदय दुभंग होतें. आपल्या मनाची अशी अनिष्ट स्थिति झाली म्हणजे आपण खिन्न व उदास होऊन दुसऱ्यांचा हेवा करूं लागतो. आपली स्थिति आपणांस मुळींच आवडेनाशी होते. याप्रमाणें दुसऱ्यांचा उत्कर्ष पाहून आपण नेहमी दु:खित झाल्याने, आणि स्वतांची स्थिति सुधरण्याचीं आशा समूळ खुंटल्याने आपण दैवास दोष लावून आपला काळ फिरला आहे असे मानितो; आणि मग आपण एकांत बसतो, व आपली दु:स्थिति पुन:पुन: मनांत आणून खेद व चिंता करितो.

स्थलाचा पालट केल्याने चित्ताचा पालट होत नाहीं

कित्येक लोकांस एका स्थलीं राहून चैन पडत नसतें. यास्तव ते गांवोगांवीं व देशोदेशी भ्रमण करीत असतात. आज नगरांत राहून त्यांस सुख होत असतें, तर उदयीक खेड्या पाड्यांत संचार करावा असें त्यांच्या मनांत येतें. राजदरबारातील ऐषआरामीचा उपभोग घेऊन त्याला कंटाळा आला म्हणजे ते हिंस्त्रपशूंनी व्यापलेल्या घोर अरण्यांत मृगयादिकांच्या निमित्ताने संचार करितात. एवढी सारी खटपट ते चित्तास शांति व समाधान यांचा अनुभव घडावा म्हणून करितात. परंतु तीं त्यांस कोठेही प्राप्त होत नाहीत. कारण त्यांच्या अस्वस्थतेचे व चिंतेचें कारण त्यांच्या अंतर्यामीच असतें. तें अमुक एका स्थलास लागून मुळींच नसतें. स्थलांतराने मनाच्या स्थितींत मुळीच पालट होत नसतो. आणि जेथे मनाचा पालट झाला नाहीं, तेथें त्याच्या ठायीं असलेली अस्वस्थता व चिंता कशी दूर व्हावी? आपण कोठेही गेलों तरी आपल्या दुर्वृत्ति आपल्या बरोबरच असतात. ह्या दुर्वृत्ति आपल्या अस्वस्थतेचीं खरी कारणें होत. आपल्या शिरी हा दुर्वृत्तीचा मोठाच बोजा असतो; आणि त्याच्या संबंधाने नुसती तडफड करण्यांत कांहींच अर्थ नसतो; तर उलट अशा तडफडीमुळे आपली विपत्ति अधिकच वाढते. अशा स्थितींतून मुक्त होण्यासाठी जे स्थलांतर करितात, त्यांस केवळ इकडेतिकडे भटकण्यापलीकडे काहीएक साध्य होत नाहीं. ज्याला एका स्थलीं सौख्याचा अनुभव घडत नाहीं, त्याला कोठेही सौख्यप्राप्ति व्हावयाची नाहीं. तेव्हां नुसता प्रवास करीत राहण्यांत काय अर्थ आहे बरें? त्याच्या मनास जी चिंता लागलेली असते, ती त्याला अमुक एका स्थळी मात्र त्रास द्यावयाची, इतर स्थळी तीपासून त्यास भीती नाहीं, असें कोणाच्यानें तरी म्हणवेल काय? उदाहरणार्थ मरणभिती किंवा इतर विपत्ति प्राप्त होतील याविषयींची चिंता, किंवा प्रायः सर्वत्र प्राप्त होण्यासारख्या अडचणी, यांपासून कोणी कोठेही गेला तरी कधीं मुक्त होईल काय? जो मनुष्य वेळोवेळा स्थलांतर करितो, त्याचें चित्त चंचल आहे म्हणून समजावे. मुले जशी कांहीं तरी मौजेचे पदार्थ दृष्टीस पडले म्हणजे खालवर होतात, तशीच स्थिति या स्थलांतर करणाऱ्या मनुष्याची असते. त्यांत वास्तविक फायद्यापेक्षां मौजच अधिक असते. आपण केवढाही लांबचा प्रवास करून आलों तरी आपल्या वास्तविक स्थितीत कांहीं फरक पडला, किंवा आपल्या मनाचे सामर्थ्य वाढलें, असा कांहींच प्रकार घडत नाहीं. तर उलट आपलें मन मात्र विशेष अस्वस्थ होऊन पुष्कळ हानि होते. याप्रमाणे देशोदेशी हिंडून तेथील नामांकित नगरे व इतर प्रेक्षणीय स्थलें पाहून कौतुक करण्यांत, व पुनरपि स्वस्थानी येऊन त्यांचें सुरस वर्णन स्वजनांस करण्यांत जो काळ घालवावयाचा, तो ज्ञानप्राप्तीकडे व सदाचारवृद्धीकडे वेंचिला असतां किती हित होईल बरें? एकाद्या मनुष्याचा पाय मोडला असतां किंवा त्याचा घोटा लचकला असतां, तो वैद्यास बोलावून आणून लागलीच औषधोपचार करितो, दुखापत बरी होण्यासाठीं घोड्यावर बसून किंवा जहाजावर चढून प्रवासास निघत नाहीं. स्थलांतर केल्याने देहास झालेली इजा बरी होण्याची जशी शक्यता नाही, तद्वत्च मनास जडलेला विकारही स्थलांतराने बरा होण्याचा संभव नाहीं. एकाद्याच्या मनांतून वक्तृत्वकला किंवा वैद्यकी संपादन करावयाची असल्यास त्यानें नुसते देशांतर केल्यानें त्याचा इष्ट हेतु सिद्ध होत नाहीं. अशीच गोष्ट सदाचाराची आहे. दूरदर्शिता, न्यायीपणा, धैर्य व आत्मसंयमन यांस जावयाचा मार्ग कोणता असें कोणी कधीं विचारले आहे काय? कोठे गेलें तरी तीं प्राप्त व्हावयाचीं नाहींत. कारण

मनुष्य जिकडेजिकडे जातो तिकडेतिकडे त्याच्या वृत्ति त्याच्या बरोबर जातात. या वृत्तीचे योग्य नियमन व दमन झालें नाहीं तोपर्यंत त्याच्या हातून सदाचरण व्हावयाचें नाहीं. निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या चालीरीति नुसत्या पाहिल्याने आपल्या वर्तणुकीत कांहीं फेरफार होण्याचा संभव मुळींच नसतो. मनाची चंचलता हा जसा मोठा दोष आहे, तद्वत्च मनाचा दुराग्रह हाही एक मोठाच दोष आहे. हा अंगीं असला म्हणजे आपले दुर्गुण सुटण्यास बराच प्रत्यवाय घडतो; आणि चंचलता अंगी असली म्हणजे कोणत्याच चांगल्या गोष्टीकडे एकसारखे लक्ष लागेनासें होते.

मनाची स्थिरता सर्व कठिण प्रसंगीं उपयोगी पडते

मनाची स्थिरता ही सर्व प्रकारच्या विपत्तींस उत्तम उपाय आहे. आज या पक्षास सामील व्हावयाचें; उद्या त्या पक्षाची कड घेऊन भांडावयाचे: आज ही गोष्ट किंवा हा मनुष्य बरासा वाटून त्याच्या नादीं लागावयाचें; उद्या त्याचा वीट येऊन दुसऱ्याच माणसाची कास धरावयाची; त्याचप्रमाणे कोणी स्तुति केल्यास हर्ष पावावयाचें व निंदा केल्यास विषाद पावावयाचे; अशी चंचलता सामान्य मनुष्याच्या ठायीं दृष्टीस पडते. परंतु जे ज्ञाते असतात, त्यांच्या मनाची स्थिरता कशानेही नष्ट होत नाही. त्यांच्यावर कसेही प्रसंग आले किंवा त्यांची कोणी कितीही निंदा किंवा उपहास केला, तरी ते मुळींच डगमगत नाहींत, किंवा खेद पावत नाहींत. सर्व प्रकारच्या कठिण प्रसंगास ते सर्वदा तयार असतात. माझ्या मनाची आज अशी स्थिति आहे कीं, मला तुम्ही राजांच्या सन्निध नेऊन ठेविले तरी मुळींच अभिमान वाटावयाचा नाही; किंवा अगदीं कंगाल मनुष्यांत नेऊन ठेविले तरी लज्जा वाटावयाची नाहीं. मला एकाद्या राजमंदिरात नरम बिछान्यावर जशी गाढ झोप लागेल, तशीच ती एकाद्या लहानशा झोपडीत फाटक्यातुटक्या चटईवरही लागेल. प्रत्येक दिवशीं माझ्या इच्छेप्रमाणे सर्व कांहीं गोष्टी घडल्या तर मला हर्ष होणार नाही किंवा प्रत्येक घटकेस दुःखकारक गोष्टींचा मला अनुभव घडला, तरी त्याबद्दल मी उद्वेग पावणार नाही. सुखदुःखाच्या प्रसंगांनी मी चित्तास व्यामोह होऊ देणार नाहीं. हें जरी खरें आहे तरी मजवर शोकप्रसंग आले असतां ते न जुमानण्याचें सामर्थ्य असें मला प्रगट करावें लागतें, तसें आनंदप्रसंग आले असतां त्यांपासून मोह न पावण्याविषयीं मला प्रयत्न करण्याची पाळी येईल तर मी आपणास विशेष सुखी समजेन. मी मोठा राजा झालो तर शत्रूने माझा पराभव करून मला बंदींत घालण्यापेक्षा त्या शत्रूवर विजय पावणे मला अर्थात् इष्टतर वाटेल; परंतु शत्रूच्या कैदेत सापडून तो नेईल तिकडे जाणें मला प्राप्त झालें तरी मी माझ्या चित्ताची समता तिलप्रायही नष्ट होऊं देणार नाहीं. विजय संपादन करून स्वनगरीस मिरवत जातांना माझ्या चित्ताची जी स्थिरता असती, तीच शत्रूच्या तावडीत सांपडल्यावरही कायम राखण्याविषयीं मी प्रयत्न करीन. सामान्य जनांस ज्या गोष्टींचे भय किंवा लोभ वाटतो, त्याविषयी बेपरवाई दाखविण्यांत कांहीं पुरुषार्थ आहे असें मी समजत नाहीं. सामान्य जन देखील प्रेम, क्रोध, लोभ किंवा द्वेष याला वश होऊन कधीकधी मरण्यास उद्युक्त होतात. तर मग ज्यांच्या ठायीं नीतिमत्ता पूर्णपणें बाणली आहे, त्यांची गोष्ट काय विचारावी? त्यांची सदाचार प्रवृत्ति अढळ असून कशानेही नष्ट होण्यासारखी नसते. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें जर मनुष्य मनाच्या अल्पमात्र दृढतेने मृत्यूमुखी पडण्यासही तयार होतो, तर मग ज्यांच्या अंगीं सुविचाराच्या योगानें नीतिमत्ता दृढ झालेली असते, आणि तीही पुनः आज थोडी आणि उद्या अधिक अशी नव्हे, तर तिचा प्रभाव ज्यांच्या ठायीं सर्वदा सारखा असून, ती कधींही विनाश पावणारी नसते, त्या पुरुषाचे धैर्य व निश्चय ही केवळ अप्रतिम असली पाहिजेत.

जगाशी आपण होईल तेवढा कमी संबंध ठेवणे इष्ट होय

या जगांत आपणांस सुखरूपपणें रहावयाचें असेल तर सामान्य जन ज्या गोष्टींच्या प्राप्तीसाठीं परस्परांशी कलह करीत असतात, त्या मिळविण्याचा उद्देश मनांत आणू नये. त्याचप्रमाणें ज्या वस्तूंचा अपहार करावा असें चोरास वाटण्याचा संभव आहे, अशा कोणत्याच वस्तूंचा लोभ धरू नये. जगांत लोक एकमेकांस लुटण्यालुबाडण्यांत पाहिजे तसे गुंतलेले असले तरी जो कंगाल व नंगा असतो, त्याच्या वाटेस कोणी कधीं जात नाहीं. आपली चालचलणूक साधी ठेवून आपण सरळ रीतीनें जगांत वर्तत असलो, तर आपलें जीवीत सौख्याचे होतें. मग लोक आपला कितीही तिरस्कार किंवा द्वेष करीत असले तरी त्याची कांहींच परवा नाहीं. सज्जनाचा तिरस्कार व द्वेष दुर्जनांनी करावा अशी या जगाची रीतच आहे. आपल्या सरळपणाबद्दल व साधेपणाबद्दल लोकांनीं आपला तिटकारा केला तरी पुरवला; पण प्रसंग येईल तसें सोंगढोंग करून वेळ मारून नेण्याचा क्रम ठेविल्यानें मनास जी सदोदित टोचणी लागून रहाते, तिच्या वेदना केवळ दुःसह होत. साधेपणा अंगीं आणण्याचा प्रयत्न करणाराने निष्काळजीपणाचा आपल्या चित्तास स्पर्श होऊं देता कामा नये. जो मनुष्य नेहमी ढोंग करितो, तो आत एक व बाहेर एक असा लपंडाव करितो. आपल्या तोंडून एकादा शब्द अवचित निघून, किंवा हातून कांहीं भलतेंच काम होऊन, आपलें खरें स्वरूप जनांत प्रगट होईल काय, अशी त्याला सदोदित भीती असते. यास्तव त्याला फारच जपून वागावे लागतें. लोक आपले ढोंग ओळखतील अशी भीती त्याला अहर्निश असते. जो जो मनुष्य त्याला भेटतो, तो हेर असून आपलें हरएक वर्तन डोळ्यांत तेल घालून पाहत आहे, असा त्याला भास होतो. यामुळे त्याचें चित्त नेहमी अस्वस्थ असतें. आधीं घेतलेल्या सोंगाची बतावणी करतां करतां त्याला पुरेवाट होते. त्यांत आणखी कोणी आपली लबाडी ओळखील ही भीती त्याच्या जिवास नेहमी खाते. मग काय विचारितां? कित्येक लोक आपल्या जिवाचे समाधान व्हावें म्हणून एकाद्या लौकिक किंवा राजकीय प्रकरणांत गुंतून रहातात. परंतु यांतही अधिकारतृष्णा व लोकमतभीति यांच्या योगानें सर्वदा प्रामाणिकपणानें व सरळपणाने वागणे दुरापास्त होतें. कित्येक प्रसंग तर असे येतात की, तेथें शहाण्या पुरुषास हारच खावी लागते. तथापि अशा प्रसंगीं साधेल तितका नेट धरणे उचित होय. त्याला समरभूमीवरून मागें पाय घ्यावा लागला तरी त्याने शत्रूस सहसा पाठ न दाखविता शेवटपर्यंत लढत लढत मागें हटावे. आपण भ्याड आहो असा दुलौकिक करून घेऊं नये. शेवटीं ही एक गोष्ट नेहमी ध्यानांत वागवावी कीं, मनुष्याने कांहीं तरी योग्य व्यासंगांत आपला काळ सदैव घालविल्यानें त्याला या जीविताचा कंटाळा फार करून येणार नाहीं. त्याचप्रमाणे त्यांत आपला व दुसऱ्याचा अनेक प्रकारीं फायदा असून इतर लोक आपले मित्र होतात, आणि आपला लौकिकही वाढतो.

भाग दहावा

प्रसंगानुरूप घडणाऱ्या गोष्टींवर भरंवसा ठेवणाऱ्या मनुष्याच्या चित्तास शांति प्राप्त होत नाहीं

जो मनुष्य आपल्या दैवगतीवर अवलंबून रहातो, त्याला कदापि सुख लाभावयाचें नाहीं. मनुष्य जो विवेकसंपन्न प्राणी त्यानें विवेकहीन वस्तूंवर स्वसुखार्थ भरंवसा ठेवून रहाणे हें केवळ अप्रयोजक होय. मी जर कोणत्याही वस्तूला मुकलो, तर ती केवळ बाह्य असून क्षुल्लक होती असा म्या विवेक करणें उचित होय. जितकी आपली दैवगति आपणांस कमी अनुकूल असते, तेवढा आपला हेवा लोक कमी करितात. जितकी आपली दौलत कमी असते, तितकी आपणांला कमी दगदग सोसावी लागते. जी वस्तु आपल्याकडून जाते तिच्यामुळें आपणांस दुःख होत नसतें, तर तिच्या नाशाची कल्पना मनांत येऊन आपल्या चित्तास व्यामोह होतो. वस्तुतः पाहता ज्या गोष्टींची आपणांस फारशी जरुरी नसते, त्या आपणांस हव्याशा वाटाव्या, आणि कदाचित् दैवयोगानें आपण पुढें सुखी होऊं असें मानावे हा मोठाच भ्रम आहे. खरें सुख केवळ सदाचरणानेच प्राप्त व्हावयाचें. दैवावर भरंवसा ठेवणे मुळींच युक्त नव्हे. तें केव्हा फिरेल याचा नेम नसतो. समुद्र जसा एकाएकीं वाढून खवळतो; आणि जें तारू सकाळी पाण्यावर मोठ्या मौजेने डुलत चालले होतें, तें रात्रीं बुडून रसातळास जातें. अशीच गोष्ट दैवाची आहें. मोठमोठी बलाढ्य राष्ट्रे आणि नगरें यांचा त्याच्या प्रभावानें क्षणांत चुराडा होऊन जातो. मनुष्यावरही त्याचा प्रभाव असाच विलक्षण चालतो. मग त्याच्या लहानसान वतनवाड्यांची ती कथा काय? त्यांना तो क्षणांत मुकून भुकेकंगाल होऊन अन्नासाठीं दारोदार भिक्षा मागत फिरण्याची त्याला पाळी येण्याचा संभव असतो. मनुष्याने आपल्या वैभवाचा कितीही दिमाख मिरविला, तरी दैव प्रतिकूल झालें असतां, त्याचें तें सारे वैभव मावळून त्याला अगदीं कंगाल व्हावें लागतें. असा कोणता भूपति आहे कीं ज्याला आपल्या राजपदाची शाश्वति वाटत आहे? दैवानें एक झोला दिला कीं त्याच्या राज्याची राखरांगोळी व्हावयास उशीर लागणार नाहीं. दैवाचा प्रभाव एका संस्कृत कवीने येणेप्रमाणे वर्णिला आहेः-

पुरुषः पौरुष तावद्यावद्दैवं तु सन्मुखम् ।
विपरीतगते दैवे पुरुषो न च पौरुषम् ।।
अवश्य भाविभावानां प्रतीकारो भवद्यदि ।
तदा दुःखैर्न लिप्येरन्नलरामयुधिष्ठिराः ।।*

---

* दैव अनुकूल आहे तोपर्यंत पुरुषाचे पौरुष कामास येते. तेंच प्रतिकूल झालें असतां तोच पुरुष आणि त्याचे पौरुष ही व्यर्थ होतात. ज्यागोष्टी अवश्य घडावयाच्या, त्यांचा प्रतीकार घडणे शक्य असते तर नल, राम व युधिष्ठिर यांना दुःख प्राप्त झाले नसते.

तेव्हां तात्पर्य काय कीं, दैवाचा हात कोणाच्यानेही घरवणार नाहीं. म्हटलें आहे **'विधिरपि बलीयान्न तु नरः'**** आणि त्यावर विश्वास ठेवून तर मुळींच चालावयाचें नाहीं. ज्या ऐहिक वस्तु आपणांस सुखावह किंवा दुःखावह वाटत असतात, त्या साऱ्यांचा आणि आपला संसर्ग केवळ मर्यादित आहे. त्यांचा आपला वियोग कालेंकरून झालाच पाहिजे. मग तो कदाचित् याच क्षणी होवो, अगर कालांतरानें होवो. पुढें आपलें काय होईल याविषयी आपणास आज जरी काहीच खात्रीने सांगतां येणार नाहीं, तरी मनुष्यानं अमुक एक स्थिति मला प्राप्त होईल अशी अटकळ व अपेक्षा करण्यांत काहीएक वावगें नाहीं. केवळ निराश होऊन हातपाय गाळून बसण्यांत पुरुषार्थ नाही. वर अत्यंत वाईट स्थिति प्राप्त झाली असताही ती धैर्याने सोसण्यास सर्वदा तयार असावें. अशा प्रसंगीं दैवाच्या चंचल गतीस दोष देणे युक्त नव्हे. कारण आपल्या या जीवितांतही असाच एकसारखा पालट होत चालला आहे. बाह्य जगांतील पालट पाहून आपणांस अचंबा वाटतो, याचे कारण असें कीं, तो आपल्या दृष्टोत्पत्तीस सहज रीतीनें येतो; आणि आपल्या ठायींचा पालट अगदीं न समजता होत असल्यामुळें तो नजरेस येत नाहीं, इतकेंच काय तें.

मानवी प्रपंचाची शाश्वति नाहीं

या बाह्य जगांतल्या सर्व गोष्टी दैवाधीन आहेत. कित्येक वेळां आपणांवर अगदीं अघटित प्रसंग येऊन आपला सर्वस्वी नाश होतो. पण हा असा घोर प्रसंग आपणांवर कां व कोठून आला याचा कांहींच थांग लागत नाहीं. कधीकधी इतर मनुष्ये केवळ निमित्तास कारण होतात. पण त्या बापड्यांच्या हातीं दुसऱ्यांचा नाश करण्यापुरते सामर्थ्य नसतें. हा सारा प्रभाव केवळ दैवाचा असतो. हें दैव असें निर्घृण असतें कीं त्याला काळ, स्थळ किंवा स्थितिविशेष यांची मुळींच कांहीं परवा नसते. आपणांस ज्या गोष्टी मोठ्या सुखाच्याशा भासत असतात, त्याच दैवाच्या प्रभावाने दुःख देणाऱ्या होतात. चोहींकडे स्थिर स्थावर आहे असा आपल्या मनाचा ग्रह होऊन आपण स्वस्थ झालो असतां, कधीकधीं या दैवाच्या योगाने आपल्यावर पराकाष्ठेचा कहर गुदरतो; आणि ज्या गोष्टींच्या योगानें आपला बचाव होईल अशी आपणांस खात्री वाटत असते, त्यापासूनच आपणांस धोका प्राप्त होतो. या दैवाच्या प्रभावाने मित्र असतात ते शत्रु होतात, आणि ज्यांच्याबरोबर आपण पुष्कळ दिवस सुखसमाधानांत काढलेले असतात, तेच आपल्या जिवावर उठतात. दैवाचा प्रभाव कदाचित् आपल्या स्मरणांतून जाईल, किंवा तो आपण तुच्छ मानूं, म्हणूनच जणू काय प्रतिदिवशीं कांहीं तरी अघटित अपूर्व असें घडत असतें. जो आपले आहारविहार सर्वदा नियमित राखितो, त्याला एकादा जबर आजार जडतो. जो चांगला सशक्त व जोमदार असतो, त्यालाच आपला हटकून एकादा रोग होतो. जो मनुष्य अगदीं निरपराध असतो, त्याच्यावरच एकादा गुन्हा केल्याबद्दलचा खोटा आरोप येऊन, त्याला नाहक शासन होतें. जो मनुष्य कोणाच्या आगीदुगीत नसतो, त्याच्यावरच विनाकारण मोठमोठे कहर गुदरून दे माय धरणी ठाय, अशी त्याची अवस्था होऊन जाते. तेव्हां तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या सार्वजनिक किंवा घरगुती व्यवहारांत त्याला सुख कसलें तें मुळींच प्राप्त होत नाहीं. कोणतीही मनुष्यें, राष्ट्रें किंवा नगरे ही दैवाच्या सपाट्यांतून कदापि सुटावयाची नाहींत आज एकाची पाळी आली आहे, तर उद्या दुसऱ्याची येणार आहे. असें रहाटगाडगे सदैव चालावयाचें. त्यास खळ असा कदापि पडावयाचा

** दैव केवळ बलवान् आहे, त्यापुढे मनुष्याची काय प्राज्ञा?

नाहीं. आपण आज कितीही मौजा मारिल्या तरी त्यांच्या पोटीं भय हें आपलें ठेवलेलेच आहे. जेथून आपणांस कोणत्याही प्रकारचा धोका प्राप्त होईल जो आपल्या ध्यानींमनींही नसतें, तेथूनच अवचित आपल्यावर मोठ संकटप्रसंग गुदरून आपण अगदीं जमीनदोस्त होतों. जगाच्या इतिहासामध्ये आपण असें वाचतो कीं, जी राज्ये परचक्राच्या सपाट्यांतून सुटून व देशांतल्या देशांत झालेल्या दंग्याफिसादीपासून मुक्त होऊन सुखाने नांदत होतीं, तींच दैव प्रतिकूल होतांच, त्यांच्याविरुद्ध कोणी शत्रु उठला नसताही, आपोआप रसातळास गेली. खरें पाहता आपणांस शांतिसुखाचा अनुभव घडत असतो तेव्हां आपण फारच खबरदारीनें राहिले पाहिजे अशा स्वस्थतेच्या काळी आपण गैरसावध रहाण्याचा संभव फार असतो. चोहोकडून संकटे येत असली म्हणजे आपण सर्वदा हुशार राहून फार जपून वागावयास लागतो. परंतु खरें म्हटलें असतां शांततेच्या वेळीं आपण पुढील संकटांच्या संबंधाने तरतूद करून ठेवणे अगत्याचें आहे. आज माझ्या ठायी देशभक्ति वास करीत असून, माझ्या जन्मभूमीमध्ये मी सुखरूप वास करीत आहें; उद्या मजवर राज्याधिकाऱ्यांचा कोप होऊन ते मला माझ्या प्रिय देशांतून हाकून देतील. आज मला सुख, शांति व आरोग्य यांचा अनुभव घडत असेल: परंतु उद्या मला बंदींत पडावे लागून सक्त मजुरी करावी लागेल, किंवा मला शत्रु बांधून नेऊन माझे हालहाल करितील, किंवा मला जबर रोग लागून असह्य वेदना होऊं लागतील. सारांश काय कीं, माझी केव्हा काय अवस्था होईल याचा नेम नाही. तेव्हां या अवचित येणाऱ्या संकटप्रसंगांस आपण तोंड देण्यास नेहमी तयार असावें, हें उचित होय. या दैवगतीच्या संबंधानें एका कवीने असें समाधान केलें आहे:-

विपत्तौ किं विषादेन संपतौ हर्षणेन किम् ।
भवितव्यं भवत्येव कर्मणामीदृशी गतिः ।। * सु. र.

नावाडी आपल्या सफरीमध्यें कदाचित् आपलें तारू फुटेल असें मानून बंदरांतून तें हांकारण्यापूर्वी या भावी संकटासंबंधाने सर्व कांहीं तयारी मोठ्या दक्षतेने करितो: व दर्यांतून चालला असतां वारा पडून जिकडे तिकडे निर्वात झालें तर पुढें मोठे थोरले तुफान होईल असें अनुमान करून, त्या घोर प्रसंगास तोंड देण्यासाठी तारवावरील सर्व कांहीं व्यवस्था तो उत्तम प्रकारे ठेवितो. असेंच आपणांस आपल्या प्रपंचामध्यें करणें सर्वथा इष्ट होय. एक संकटप्रसंग असा येतो कीं, मनुष्याला आपला देश सोडून परागंदा व्हावें लागतें. दुसरा घोर प्रसंग असा येतो कीं, त्याचा प्रिय देश परकीयांच्या हातीं जाऊन त्याला व त्याच्या देशबांधवांना अत्यंत दुःसह अशी परतंत्रता प्राप्त होते. त्याचप्रमाणें आज ज्या नगरातील रस्त्यांवर इतकी दाट रहदारी आहे कीं, तीतून जाण्याचीसुद्धां पंचाईत पडते, तेंच नगर उद्या उद्वस्त होऊन निर्जन अरण्य बनते. यास्तव मानवी प्रपंचाची सर्व स्थिति आपण आपल्या नजरेसमोर ठेवून, व जगांत साधारणतः काय घडत असतें तें सुक्ष्म दृष्टीने पाहून, पुढे काय घडण्यासारखें आहे याचा अंदाज करावा. भावी संकटप्रसंग सहज रीतीनें सोसता येण्याचा सोपा उपाय म्हटला म्हणजे त्यांच्या विषयींचा विचार मनामध्यें सदोदित वागवीत असावे हा होय.

---

* विपत्ति प्राप्त झाली असतां खेद करून काय उपयोग? आणि संपत्ति मिळाली असतां हर्ष कां करावा? जें घडावयाचे तें घडणार. कर्माची गतिच अशी आहे.

जें आपलें आहेसे वाटतें, तें वास्तविक पाहता आपणांस कांहीं वेळ प्राप्त झालें आहे

या संसारांत जें कांहीं आपलें असें आपण म्हणतों. तें आपणांस केवळ अल्प काळ प्राप्त झालेले असतें. दैवयोगाने जें आतां मिळाले आहे, तें अंमळशानें दैव प्रतिकूळ होऊन आपल्याकडून जाईल. जो दैवावर भरवसा ठेवून रहातो, त्याला तें कधीं ना कधीं तरी फसविते; आणि त्यानें आज नाहीं फसविले तरी तें केव्हा तरी फसवील असा धाक जिवाला नेहमी वाटत असतो. मोठमोठाल्या हवेल्या बांधून किंवा मोठी जगडव्याळ तटबंदी करून, किंवा यंत्रसाहित्याचा उपयोग करून, सुरक्षितपणा राखण्याचा तुम्ही कितीही प्रयत्न केला, तरी दैवाच्या प्रभावापुढे त्याचें काहींएक चालत नाही. या दैवाच्या पराक्रमाचे एका कवीनें येणेप्रमाणे वर्णन केलें आहे:-

अघटितघटितं घटपति
सुघटितघटितानि टुर्घटीकुरुते ।
विधिरेव तानि घटयति
यानि पुमान्नैव चिन्तयति ।। * सु.

यास्तव ज्यास या दैवाच्या तडाक्यांतून सुटावयाचें असेल, त्यानें आपलें अंतर्याम सुधरण्याचा निर्धार करावा. अंतर्यामाची शुद्धता राखिल्यानें दैवाच्या प्रतिकूलपणापासून आपणांस कांहींएक तोशीस पोचण्यासारखी नसते. मग प्रतिकूल प्रसंगांनीं आपणांवर कितीही गिल्ला केला तरी त्यापासून आपणांस यत्किंचित्ही धक्का पोचत नाहीं; व त्यास आपण सहसा हार जात नाहीं. दैवयोगानें ज्या सुखावह वस्तु आपणांस प्राप्त होण्यासारख्या असतात, त्यासाठी आपण केवढा अट्टाहास व कलह करितो! आपणांस त्या वस्तु प्राप्त झाल्याने आपले वास्तविक कल्याण कितपत होण्यासारखे असतें, याचा आपण कांहींच विचार करीत नाहीं. ज्या वस्तूंच्या प्राप्तीसाठी कष्ट करावयाचे, त्या प्राप्त झाल्यानें आपणांस मोठा आनंद वाटून, आपण त्यांत मग्न होऊन जातो. परंतु त्याच आपणांस प्राप्त झाल्या नाहींत तर आपण परम दुःख पावतो. कित्येक वेळां तर असें होतें कीं, त्या वस्तूंच्या प्राप्तीसाठीं खटपट करण्यांत आपणांस एकादी मोठी इजा होऊन, तिच्या वेदना आजन्म सोसाव्या लागतात. पुनः संपत्ति, अधिकार, कीर्ति इत्यादि स्पृहणीय गोष्टी आपणांस दैवयोगानें प्राप्त झाल्या तरी कधीना कधीं त्यांस मुकण्याची पाळी येते; आणि केव्हांकेव्हां तर असें होतें कीं, ह्या गोष्टी ज्यास प्राप्त झालेल्या असतात, त्यांच्यापासून त्या गेल्या म्हणजे त्यांचें फारच नुकसान होतें. आपण जशीं पशुपक्ष्यांना पकडण्याकरितां जाळी पसरितो, तद्वत्च दैव आपणांस नाना प्रकारीं आमिष दाखवून फसवितें. ते आज आपणांस अनुकूल आहे म्हणून शेफारून जातां कामा नये. कारण तें केव्हा दगा करील, व आपण कसे पेंचांत येऊ याचा कांहीं नेम नसतो. या संसारातील सुखविषयांचे संपादन आपण

* जें अघटित असतें तें दैव घडवून आणिते, आणि जें सहज घडण्यासारखे असतें, तें त्याच्या प्रभावाने दुर्घट होतें. ज्या गोष्टी मनुष्याच्या कधीं ध्यानीं मनीही नसतात, त्या दैव घडवून आणितें.

करितो असें वाटतें खरें. तथापि त्यांमुळे आपली विपत्ति वृद्धि पावण्याचा दृढ संभव असतो. या विषयांच्या अनर्थावहतेचे वर्णन गीतेमध्यें येणेंप्रमाणें केलें आहे:-

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते।।
क्रोधाद् भवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।*

हे सुखविषय केवळ असार आहेत. त्यांत वास्तविक सुखलाभ असा क्वचित्च घडतो. त्यामुळे आपली तृष्णा मात्र क्षोभ पावते; आणि तिची शांति करण्यास या सुखविषयांचा मुळीच उपयोग होत नाहीं. तेव्हां अशा स्थितीमध्ये उत्तम मार्ग म्हटला म्हणजे मनुष्याला दैव अनुकूल करून घेता येत नसलें तरी त्याला आपली वर्तणूक सुधरितां येण्यास मुळींच अडचण नसते; तेव्हां ती सुधरण्याचा अहर्निश प्रयत्न करून, दैवाच्या आधीन न होण्याची खबरदारी त्यानें ठेवावी. तें प्रतिकूल होवो अगर अनुकूल होवो, त्याची मुळीच परवा करूं नये; व आपल्या चित्ताची समता अढळ राखावी दैवाच्या अनुकूलतेनें आपल्या ठायीं कांहीं खरी थोरवी येत नसते, किंवा त्याच्या प्रतिकूलतेने आपणांस कमीपणा येत नसतो. आपण अमुक एक खोली अंधकारयुक्त किंवा प्रकाशयुक्त म्हणतो, ती त्या खोलीच्या मुळच्या गुणदोषांवरून म्हणत नसतो, परंतु दिवस व रात्र यांच्या योगाने हा त्या खोलींत फेरफार होतो. दौलत, अंगसामर्थ्य, सौंदर्ये, अधिकार व मान्यता यांचीही गोष्ट अशीच आहे. त्यापासून म्हणजे मनुष्याच्या वास्तविक योग्यतेंत कांहीं नवी भर पडते असें समजता कामा नये. दुःख, आजार, मृत्यु वगैरे अनिष्ट गोष्टींपासूनही मनुष्यास काहीएक त्रास होण्याजोगा नाहीं. त्याचें इष्टानिष्टत्व सर्वथा मनुष्याच्या ठायींच्या नीतिमत्तेवर अवलंबून असतें. अशा कठीण प्रसंगीं कष्टी होऊन शोक किंवा विलाप करणें सहसा युक्त नव्हे. चित्तास असा व्यामोह होऊं दिल्यानें आपण स्वकर्तव्यापासून च्युत होतों. त्याप्रमाणेंच आनंदजनक प्रसंगीं हर्ष व उल्हास पावून त्यांत अगदीं मग्न होऊन गेल्यानें स्वकर्तव्यापासून पराङ्मुख होण्याचें भय मोठें असतें. दैवी असेल तें मला प्राप्त होईल असा विचार करून मी कदापि स्वस्थ बसणार नाहीं. तर माझी स्थिति सुधरण्यास मी सर्वदा झटेन. आणि असें करीत असतां मला दैव प्रतिकूल होऊन दुःख भोगावें लागले तरी विषाद मानणार नाहीं, किंवा तें अनुकूल होऊन सुखलाभ झाला तरी मी उल्हास पावणार नाहीं. दैवप्राप्त सुखदुःखांपासून ज्याच्या चित्तास यत्किंचित्ही व्यामोह होत नाहीं, त्याच्या चित्ताची उन्नति झाली म्हणून समजावे. याप्रमाणें जो दैवाची मुळींच परवा करीत नाहीं, त्यास कशाचीही भीति नाही. गीतेमध्येही हाच उपदेश येणेप्रमाणे केला आहे:-

---

* चिंती विषय जो त्यातें उपजे भोगवासना ते कामातें उपजवी काम क्रोधासि निर्मितो.
क्रोधे देहात्मतामोह मोहे आत्मस्मृतिभ्रम स्मृतिभ्रंशे बुद्धिनाश मग तो मूळ पूर्ववत वामन.

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। *

लहान थोरांस दैवगति चुकत नाहीं

ज्याला दैव प्रतिकूल झालें आहे, त्याला एक गोष्ट अशी समाधान मानण्यासारखी आहे की, मोठे दैवशाली लोकही दैवाच्या सपाट्यातून सुटत नाहीत. उदाहरणार्थ असे पाहा कीं, मृत्यू गरीब लोकांच्या झोंपड्यांमध्येंच तेवढा येतो, राजांच्या मंदिरांमध्यें त्याचा प्रवेश होत नाहीं, असें कदापि म्हणतां येत नाहीं. त्याचा फेरा सर्वांवर सारखाच यावयाचा. तो कोणालाच सुटावयाचा नाही. आपण नित्यशः मृत मनुष्यांचे अंत्यविधि पाहत असतो. सुखांत कालक्रमणा करणाऱ्या राजांवर शत्रु अकस्मात् घाला घालून त्याचें राजपद हिरावून घेतो. देशांचे देश विलंब न लागतां बेचिराख होतात. मोठमोठी धनाढ्य नगरें लुटली जातात. या सर्व गोष्टी जशा केवळ अवचित घडतात, तशीच आपली, केव्हा काय स्थिति होईल याचा नेम नसतो. यास्तव आपण अगोदरपासूनच भावी संकटास तयार असून दैव कितीही प्रतिकूल झालें तरी कदापि डगमगावयाचें नाहीं असा पक्का निर्धार केलेला असला म्हणजे कठिण प्रसंग कितीही अवचित आले तरी त्यापासून आपलें चित्त गलबलून जाणार नाहीं. एकाद्याजवळ असेल नसेल तें सारे हिरावून घेऊन त्याला अगदीं कंगाल करून देशपार केलें, किंवा त्याचे हाल केले असें आपल्या दुष्टीस पडलें असतां, आपण हें मनांत आणिलें पाहिजे की, ही सारी अनिष्ट स्थिति आपणांसच प्राप्त व्हावयाची होती. आज ती दुसऱ्या मनुष्यास प्राप्त झाली आहे, उद्या कदाचित् ती आपणासही भोगावी लागेल, नाहीं कोणी म्हणावें? वस्तुतः पाहता आपणास सदोदित हजारों संकटांचें भय असतें. त्यांपैकीं एकादे दुसरे साक्षात् प्राप्त झाले असतां त्यांत नवल तें कोणतें? जें संकट आज एका मनुष्यास प्राप्त झालें आहे, तेंच उद्या दुसऱ्यावर येण्याचा संभव असतो. आपल्या वांट्यास जें कांहीं येईल, तें आपण निमूटपणे सोशिलें पाहिजे. लोकांनी आपली निंदा केली; ते आपल्याशी निष्ठुरपणे वागले; आपलें घरदार आग लागून जळून खाक झालें; कोणी आपणांवर तलवार चालवून असह्य जखमा केल्या; दुःसह रोगांनी आपणांस पछाडले; किंवा हिंसक पशूंनी आपणांस फाडून खाल्लेः तर अशा कठिण समयी उगाच तळमळ करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या गोष्टी धैर्यानें सोसून मनाची स्थिरता नष्ट होऊं न देणे हाच यांना उपाय आहे. इतर सारे उपाय केवळ लटके होत. अशा उपायाचे जो अवलंबन करितो, त्याची वाखाणणी पुढील पद्यांत केली आहे:-

संपदि यस्य न हर्षो विपदि विषादो रणेच भीरुत्वम् ।
तं भुवनत्रयतिलकं जनयति जननी सुतं विरलम् ।। ** सु०

आपलें हें सारें जीवितच मुळीं दुःखमय असून, जीवमान आहे तोपर्यंत एकामागून एक संकटे आपलीं येत रहावयाचीं. तेव्हां अमुक एका काळी आपणांस विपत्ति प्राप्त झाली असतां तीबद्दल शोक करण्यांत

---

* बरवे वाईट न म्हणे वाईट बरवे समस्त भोगूनी सर्वत्र स्नेह नसे ज्याला त्याची प्रतिष्ठिता प्रज्ञा. मोरोपंत

** संपत्ति प्राप्त झाली असता ज्यास हर्ष होत नाहीं, आणि विपत्ति आली असतां जो विषाद पावत नाहीं; त्याच प्रमाणें युद्धप्रसंग आला असता जो घाबरून जात नाहीं, असा त्रिभुवनास तिलकभूत पुत्र क्वचित् एकादी जननी प्रसवते.

काहीएक अर्थ नाहीं. हिवाळ्यामध्ये आपणांस थंडी लागू लागली, किंवा जहाजांत बसून चाललो असतां जहाज लागलें, तर त्यांत असें चमत्कार मानण्यासारखें काहीएक नाहीं, तद्वत्च या जीवितयात्रेमध्यें मार्गात संकटे व दुःखे प्राप्त झाली असतां भांबावून जाण्यांत काहीएक अर्थ नाहीं. पुनः दैवाच्या सपाट्यांतून पळून जाणें मुळींच शक्य नाहीं. कारण या विश्वामध्यें असें कोणतेंही स्थळ नाही कीं जेथे या दैवाचा प्रवेश नाहीं. या भवितव्यतेचें निरूपण भर्तृहरीने पुढील वचनांत चांगले केलें आहे:-

परिभ्रमसि किं वृथा क्वच न चित्त विश्राम्यताम्
स्वयं भवति यद्यथा भवति तत्तथा नान्यथा ।
अतीतमपि न स्मरन्नपि न भाविसंकल्पयन्
न तर्कितगमागमाननुभवस्व भोगानिह ।। ✻

त्याचप्रमाणे दैवाच्या योगाने आपणांस शांति प्राप्त होईल अशीही अपेक्षा कोणी करूं नये. कारण दैवाचा प्रभावच मुळी असा आहे कीं, त्याच्यामुळे सर्वदा जीवनार्थ कलह चाललेला असतो. हा कलह कदापि विराम पावत नाहीं, किंवा तो कोणत्याही प्रकारे मिटवितां येण्यासारखा नव्हे. परंतु एवढा मात्र आपण निर्धार करावा कीं, दैवाचें साम्राज्य केवळ मानवी व काल्पनिक आहे. जो त्याच्या सेवेस लागेल, तो त्याचा पुरा दास बनेल. आनंद आणि दुःख, उत्कर्ष आणि अपकर्ष ही द्वंद्वे वस्तुतः पाहता इष्टही नव्हत व अनिष्टही नव्हत. कित्येक हूड व अविचारी जन यांची कधीकधी बिलकुल परवा करीत नाहीत; आणि शहाण्या लोकांस तर त्यांची कधींच मातबरी वाटत नाही. ह्या द्वंद्वाचा परिणाम आपल्या केवळ बाह्य स्थितीवर होत असतो. त्याचा मनावर कोणताच म्हणण्यासारखा परिणाम होत नाही.

✻ परिभ्रमण कां वृथा करिसि तूं मना स्थिर हो स्वयें घडत जें जसे घडू न अन्यथाकाम हो अतीतही नको स्मरूं न भवितव्यचिंता करी सुखे अनुभवीचि भोग जइं येत तुझ्या घरीं. वामन.

भाग अकरावा

ग्राम्य सुखोपभोगांत घालविलेले जीवित दुःखमय होतें

या भागांत ग्राम्य सुखाविषयीची जी आसक्ति सांगावयाची, तिचा अंतर्भाव अर्थात् ऐषआरामांमध्यें करावयाचा. हे ऐषआराम म्हटले म्हणजे मुख्यतः येणेप्रमाणे होत. आकंठ तृप्ति होईपर्यंत खावयाचे व प्यावयाचे; विषयवासनातृप्ति मनमुराद करून घ्यावयाची; छानछोकी, डामडौल यांमध्ये सारा वेळ दंग असावयाचे; सारांश या आपल्या जड देहाची निगा जितकी जास्त करवेल तितकी करण्याविषयी सर्वदा तत्पर असावयाचे.

ऐषआरामीच्या पदार्थांचे सेवन अतिरिक्तपणे केल्याने दुःख व विपत्ति ही प्राप्त होतात

प्रथमतः रसनातृप्तीच्या विषयांचें विवेचन करूं. लुटारू लोक ज्या मनुष्यास लुटतात, त्याला ते जसे फासा घालून ठार मारितात, तद्वत् या विषयांमुळे आपली स्थिति होते. म्हणजे अर्थात् असें कीं, त्यांच्या प्रातीसाठी वित्तनाश करावा लागून, आणखी देहास नानाविध विकृति जडतात. या भूतलावर जेथेजेथे मनुष्याची वसती आहे, तेथेतेथे त्याच्या निर्वाहाकरिता हवी तितकी अन्नसामग्री असते. परंतु आपण तेवढीने तृप्त होत नाहीं. तर पुष्कळ द्रव्य खर्चून उत्तम उत्तम खाद्य व पेय पदार्थ आपण कृतीने निर्माण करितो. साध्या, सवंग अन्नाने आपली क्षुधा चांगल्या प्रकारे शांत होण्यासारखी असतां, आपण या बहुमोलाच्या मिष्टान्नाची रुचि आपल्या जिव्हेला लावून घेतो. खाद्यसामग्री तयार करण्यासाठीं आपण केवढा खटाटोप करितो? किती चाकर व स्वयंपाकी ठेवून नाना प्रकारची पक्वान्ने तयार करण्यासाठीं लागेल तो पैसा खर्च करण्यास मागेपुढे पाहत नाहीं. आपल्या ज्या पराक्रमी पूर्वजांच्या उद्योगाने आपणांत आज ही संपन्नावस्था प्राप्त झाली आहे, त्यांचें या संबंधाने कसें काय वर्तन होतें, तें आपण मनांत आणावे. ते आपलें अन्न आपल्याच हातांनी तयार करीत असत. ते जमिनीवर निजत असत. त्याला सोन्या-रत्नांची भूषणे अंगावर मिरविण्याची त्या वेळीं सवय झाली नव्हती.

इंद्रियतृप्तीच्या विषयांनीं जर सौख्य प्राप्त होण्यासारखे असेल, तर मनुष्यांपेक्षा पशु अधिक सुखी समजावयाचे

पश्वादि प्राण्यांमध्ये ज्या वासना व सुखतृष्णा बलवत्तर असतात, त्यांच्या यथेच्छ तुप्तीने आपणास सुखलाभ होईल असें मनुष्याने समजणे ही मोठीच शरमेची गोष्ट आहे. पशूंची क्षुधा मोठी जाज्वल असून, ते आपलें खुराक मोठ्या आवडीने पोटभर खातात. त्याचप्रमाणे ते आपली कामवासनाही मनमुदार तृप्त

करितात. एकंदर आहारविहारांपासून त्यांस सुख प्राप्त होतें. इतकेंच नव्हे, तर ते आहारविहार करीत असतां, त्याला जनांची किंवा मनाची कांहींच लाज वाटत नसते. तेव्हां या इंद्रियतृप्तीच्या विषयांत जर खरें सौख्य आहे म्हणावे, तर पशु मनुष्यांपेक्षां सुखी आहेत असें म्हणावें लागेल. परंतु मानवी सौख्य आध्यात्मिक आहे. त्याचा जड देहाशी किमपि संबंध नाहीं. हाच आशय पुढील वचनांत अंमळ निराळ्या रीतीनें सूचित केला आहेः-

आहारनिद्राभयमैथुनानि
सामान्यमेतत्पशुभिर्नराणा ।
ज्ञानं हि तेषामधिको विशेषो
ज्ञान हीनाः पशुभिः समानाः ।। * सु.

जे ऐषआरामीच्या विषयांमध्यें मग्न होतात, त्याला त्या विषयांची यथेच्छ प्राप्ति झाली नाही तर दुःख होतें: किंवा ते हवे तितके प्राप्त झाल्यानेही दुःख होतें. कारण त्यांच्या सेवनामध्यें दंग होणाऱ्या मनुष्यांकडून आत्मसंयमन होत नसल्यामुळे परिणामीं त्यांची अनेक प्रकारे हानि होते. ही विपत्ति त्यास प्राप्त होते याचे कारण असें कीं, त्याला बरें काय व वाईट काय याची निवड करण्याचें ज्ञान नसतें. जो वेड्या हौसेच्या नादी लागून मोठ्या श्रमानें व संकटाने एकादे हिंसक जनावर जिवंत पकडून बाळगितो, त्याला त्यापासून पुढें कधीं तरी मोठा धोका असतो. कारण असलें जनावर संधि सापडल्यास पालकाची नरडी फोडून प्राण घ्यावयासही कमी करणार नाहीं. अशीच गोष्ट ग्राम्य विषयसुखांची आहे. जेवढी त्यांची संख्या मोठी, आणि जेवढें त्यांचें प्रमाण मोठे, तेवढा मनुष्य त्यांचा विशेष दास बनतो. आणि हें दास्य फारच कठीण असतें. सामान्य जन त्यास हवा तितका सुखी म्हणोत, परंतु तो सुखविषयांच्या प्राप्तीसाठी आपलें स्वातंत्र्य गमावितो, आणि त्या विषयांचा केवळ बंदा गुलाम बनतो.

मिष्टान्नाचे सेवन जितके अधिक करावे, तितके अधिक रोग आपणांस जडावयाचे

एकाद्या श्रीमान् गृहस्थाच्या मुदपाकखान्याकडे अंमळ दृष्टि फेकिली असतां, असें दिसून येईल कीं, त्यांत पुष्कळ स्वयंपाक्यांची योजना केली असून, ते नाना परीचीं पक्कान्ने तयार करीत असतात. ही सारी कोणासाठी म्हणाल, तर त्या एका धनाढ्य मनुष्यासाठी. तेव्हां एका मनुष्याच्या क्षुधातृप्तीसाठीं एवढ्या असामीनी रात्रंदिवस खटाटोप करावा हें विलक्षण नाही काय? पण अशा गोडघाशा मनुष्याने हें नेहमी ध्यानांत ठेवावें कीं, तो जितक्या तऱ्हाची पक्कान्ने तयार करावयास लावितो, तितके त्याला रोग होण्याचा संभव असतो. क्षुधातृप्तीसाठी निरनिराळे सेवनीय पदार्थ कसे तयार करावे ही एक सांप्रत कलाच बनली असून, तिच्या अध्ययनाकडे लोकांचे लक्ष विशेष लागत चालले आहे. अशा प्रकारे रसनालौल्य यथेच्छ तृप्त करून घेण्याची सवय लागल्याने आहारविहारांमध्ये अतिरेक होऊन, परिणामी मोठा वीट व त्रास येतो. अलीकडे पाहावे तर साध्या अन्नाने कोणाचीच तृप्ति होतनाशी झाली आहे. आणि स्वयंपाकी नाना पदार्थाचे

* आहार, निद्रा, भय आणि मैथून ही पशूला व मनुष्यांला सारखीच आहेत. ज्ञान काय तें मनुष्यांला विशेष आहे. जे ज्ञानहीन असतात ते पशूसारखे होत.

मिश्रण करून मोठमोठी पक्वान्ने करण्याच्या कलेत इतके कांहीं प्रवीण झालेले असतात की, ते आपल्या पक्वाशयाचें व दांतांचे बहुतेक काम आधीच करून ठेवितात असें म्हटल्यास चालेल. एका पक्वान्नांत सगळ्या रसाचा अंतर्भाव करण्याचा ते प्रयत्न करितात. ह्या अशा अनेक पदार्थ घालून केलेल्या पक्वान्नांच्या सेवनाने मनुष्यास रोगही तसेच बिकट जडतात: आणि मग त्यांचा परिहारही अनेक औषधांच्या मिश्रणाने करणे प्राप्त होतें. आपल्या मनाचीही अवस्था अशीच होते. जी साधी व्यसने जडलेली असतात ती साध्या उपदेशाने टाकावयास लावितां येतात. परंतु जो सर्वतोपरी विषयासक्त झालेला असतो, त्याची ती बदफैली कांहीं केलें तरी कमी होत नाहीं. लौकिकांत किंवा घरांत तो इतकी व्यसनासक्ति दर्शवितो कीं, त्यास केवळ उन्माद झाला आहे असें दिसते. प्राचीन वैद्यास एकादी जखम पडली असतां ती बरी करण्याचें किंवा रक्त वहात असल्यास तें बंद करण्याचेंच काय तें औषध ठाऊक होते. त्या काळच्या लोकचे आहारविहार अगदीं साधे व आवश्यक तेवढेच असल्या कारणानें त्यांची प्रकृति चांगली निकोप व सदृढ असे. त्याला रोग कसला तो ठाऊक नसे. परंतु त्यांचे वंशज जे आम्ही, त्या आम्हांला विषयसुखाची व ऐषआरामाची चट मनस्वी लागून, आमची प्रकृति अगदी बिघडून गेली आहे. आम्हास आतां नाना प्रकारचे रोग जडून, आम्ही अगदीं बेजार होत असतो. आम्हांस निरनिराळ्या पक्वान्नांची चटक लागून व ती यथेष्ट पुरवून आमची क्षुधा अतिशयित मंद झाली आहे. तिचे उद्दीपन करण्यासाठीं अलीकडच्या वैद्यांत अनेक कृत्रिम उपाय योजावे लागतात. तरी क्षुधामांद्य वाढतच जाऊन कोणत्याच प्रकारचे अन्न पचेनासें होतें. यामुळे अंगातील रक्त आटत जाऊन फिक्कटपणा उत्पन्न होतो. शक्ति ऱ्हासामुळे अंगांत जोम नाहीसा होऊन, सर्व अंगास कंप सुटतो. अंगाचे सांधे ढिले पडतात. मज्जातंतूंचे व्यापार मंदावतात. हृत्कंप सुरू होतो. सारांश काय कीं, दुष्काळपीडित जनांस पोटभर अन्न मिळाले नाहीं म्हणजे जशी त्यांची अवस्था होते, त्याहूनही वाईट अवस्था मिष्टान्नप्रिय जनांस प्रास होते. पूर्वकाळच्या लोकांस स्वचरितार्थासाठीं जिवापाड श्रम करावे लागत असत; किंवा नाना प्रकारचे अंगमेहनतीचे व्यायाम करण्याची त्यांची चाल असे; यामुळे त्यांचे देह चांगले मजबूत रहात; व त्यांस साधे अन्न खावयास मिळत असे. परतु आतां पाहावे तर अंगमेहनतीची कामे अगदीं कमी होऊन, शरीरास नबळाई आली असून, पुन: गोडगोड अन्नांची समृद्धि उमाप झाली आहे. त्यामुळें आपल्या अंगांत रोगही तसेच वाढले आहेत.

दारूबाजी मुद्दाम पतकरलेलें वेड होय

मनुष्यास आपल्या पोटाचा सुमार नसावा ही मोठीच वाईट गोष्ट आहे. त्याचप्रमाणे मद्याच्या नशेमध्यें मनुष्याच्या हातून अशा कांहीं अनन्वित गोष्टी घडतात कीं ज्या त्याच्या हातून साधेपणी घडल्या असतां त्याला मोठी लज्जा वाटते. याचा विचार मद्यपीस होऊं नये हें फारच वाईट आहे. दारूबाजी ही एकंदरींत पाहता मनुष्याने आपण होऊन मुद्दाम पतकरलेले वेड होय. मद्याच्या अंमलांत पाहिजे तीं दुष्ट कर्मे करण्याचें धैर्य मद्यपीस होतें. एकाद्याच्या अंगांत मूळचाच दुष्टपणा असल्यास त्याचें उत्तेजन मद्याच्या योगाने होत असतें आणि ज्याच्या ठायींचा दुष्टपणा पुर्वी कधींही दृग्गोचर झालेला नसेल, तो मद्याच्या नशेत चांगला उघडकीस येतो. मद्यपीच्या ठायीं पापवासना कशी उत्पन्न होते, याचे निरूपण पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकारे केलें आहे:-

चित्ते भ्रान्तिर्जायते मद्यपानाद्भ्रांन्ते चित्ते पापचर्यामुपैति ।
पापं कृत्वा दुर्गतिं यान्ति मुढास्तस्मान्मद्यंनैव पेयं न पेयम ।। *

मद्याच्या योगाने मनुष्य दुराचारी झाला नाहीं तरी तो तसा आहे हें चांगले दृष्टोत्पत्तीस येतें. जो मूळचाच उद्दाम किंवा क्रूर असतो, त्याचा उद्दामपणा किंवा क्रूरपणा मद्याच्या नशेत विशेष वृद्धि पावतो. त्याला जनांची किंवा मनाची लज्जा वाटेनाशी होते. जो स्वभावाचा पिरपिऱ्या असतो, तो मद्याच्या कैफामुळे फारच चिडीस जातो, आणि शिव्यागाळी व मारामारी करावयास लागतो. मद्याचें कैफ अंगांत आलें म्हणजे बोलतांना जीभ अडखळू लागते, डोके फिरते, चालतांना झोकांड्या जातात. या मद्यपीच्या अवस्थेचें वर्णन पुढील पद्यांत उत्कृष्ट रीतीनें केलें आहे:-

अयुक्त बहु भाषन्ते यत्र कुत्रापि शेरते ।
नग्नो विक्षिप्य गात्राणि स जाल्म इव मद्यपः ।। **

या व्यसनामुळे अनेक प्रकारचे रोग अंगीं जडतात. या व्यसनामुळे राष्ट्रांची राष्ट्रे रसातळास गेली आहे. मोठमोठीं शूर युद्धकुशल राष्ट्रे व मोठीं बळकट नगरे, जी एक वेळ परचक्रास मोजी नव्हती, तीं या व्यसनाच्या योगानें हतवीर्य होऊन त्यांस शत्रूंनी पादाक्रांत केले आहे. या व्यसनाचे भक्त केवळ रात्रिंचर बनतात. सारी रात्र फिरफिरून किंवा जागून यथेष्ट मद्यपान करावयाचे आणि सगळा दिवस निजून काढावयाचा, असा त्यांचा क्रम असतो. दारूबाज मंडळीच्या भोजनाच्या वेळाही ठरलेल्या नसतात. लहर लागेल तेव्हां वाटेल तेवढे खावे, नाहीतर काहीएक न खाता, कैफाच्या धुंदींत कोठे तरी तळमळत पडावे, अशी त्यांची अवस्था होते. उद्योगी व निर्व्यसनी मनुष्ये सारा दिवस कामधंदा करून रात्रीस झोपी जातात; पण हे सुराभक्त लोकांच्या निजावयाच्या वेळीं जागे होऊन, सारी रात्र नाना प्रकारची बदफैली करितात, आणि सारा दिवस लोळत पडतात. हें व्यसन प्रथमतः दुसऱ्याच्या संगतीने लागतें.

लोक वागतात तसें आपण वागावे असा सामान्य लोकांचा कल असतो. यामुळे आपणांस नसते ऐषआराम हवेसे वाटतात. ही ऐषआरामांची प्रीति हळूहळू लागत जाते. प्रथमतः आपल्या देहाची वाजवीपेक्षां अधिक काळजी घ्यावीशी वाटते; होतां होतां घरांत चांगले थाटमाटाचें सामानसुमान भरावेसें वाटते. मग मौजेचे व कलाकुसरीचे जिन्नस संग्रही ठेवावे, अशी बुद्धि होऊन, ते मिळविण्यात लागेल तो पैसा खर्चण्याची तयारी होते. त्याप्रमाणेंच भोजनाचा थाटमाट आणि गोडगोड व नवींनवीं पक्कान्ने यांत पैका खर्चावा असें वाटतें. मोठे कुशल आचारी ठेवून त्यांच्याकडून दररोज नवी मिष्टान्नें तयार करवून तीं भक्षण करावयाची इच्छा उत्पन्न होते. याप्रमाणे एका मागून एक ऐषआरामीचे पदार्थ सेवन करण्याची चटक लागून, कित्येक भयंकर व्यसनें जन्माची जडून रहातात; आणि त्यामुळें मनुष्य खऱ्या सुखास आंचवतात. जे मनुष्य

---

* मद्यपान केल्यामुळें चित्ताला भ्रांति उत्पन्न होते; चित्तभ्रांतीमुळे पापकर्म हातून होतें. पाप करून मूड जन दुर्गतीप्रत जातात. तस्मात् मद्य कदापि प्राशन करूं नये.

**मद्यपी अयुक्त असं पुष्कळ बरळतो, हातपाय अस्ताव्यस्त टाकून नागडाउघडा कोठे तरी लोळत असतो, आणि केवळ मोठा दुरात्मा दिसतो.

खाणेंपिणें व इतर ग्राम्य विषय यांची लालसा धरितात, ते अत्यंत हतभाग्य होत. या विषयांपासून प्राप्त होणारा आनंद अल्पकालिक असून, त्यांचा तत्काळ वीट येतो; आणि त्यापासून परिणामीं लज्जा किंवा पश्चात्ताप वाटत असतो. तेव्हां अशा या इंद्रियविषयांच्या वासना तृप्त केल्यानें सुखलाभ होतो असें जे जन मानीत असतील, त्यांनीं हें ध्यानांत आणावे कीं, इंद्रियभोगतृप्ति ही केवळ पशूंस अनुरूप असून, मनुष्यानें तीविषयीं इच्छा धरणे मुळींच शोभत नाहीं. क्रोध, कलहप्रीति, महत्त्वाकांक्षा इत्यादि ज्या मनोवृत्ति आहेत, त्या जरी अतिशयित वाईट आहेत, तरी त्या एके परी मनुष्यास स्वाभाविक आहेत. परंतु इंद्रियतृप्तीच्या विषयांची लालसा ही मनुष्यास कदापि शोभणारी नव्हे. या विषयलालसेमुळें कामक्रोधादि वृत्ति प्रबल होऊन मनुष्यास त्रास व दुःख देत असतात.

ऐषआराम हे केवळ व्यर्थ असून त्यांत मग्न होणें हा मूर्खपणा होय

सांप्रत पाहावे तर आपलीं घरेदारें व खाणेंपिणे यामध्ये आपण पुष्कळ पैका खर्चितो; व तीं चांगल्या प्रकारचीं प्राप्त व्हावी म्हणून आपण किती तरी खटाटोप करितो. परंतु पूर्वकालच्या लोकांमध्ये यांसंबंधानें अगदीं साधेपणा होता. आम्हास ऐषआरामीची गोडी लागून, आपल्या दुर्व्यसनाच्या तृप्तीचे विषय मिळविण्यामध्ये आम्ही आपली सर्व बुद्धि वेचू लागलो आहो. पहिल्याने आपणांस ज्या त्या सुखविषयाची चंगळ असावीसें वाटू लागतें; आणि मग होतां होतां आपलें दुर्मार्गात पाऊल पडतें; आणि अंती आपलें मन आपल्या शरीराच्या अगदीं स्वाधीन होऊन जातें. ज्या वासना प्रारंभी आपल्या कह्यांत असतात, त्यांचा अंमल आमच्यावर बसून आमचे मन त्यांचे केवळ दास बनून जातें. या वासनामूलक अनर्थांचे रामदास येणेप्रमाणें वर्णन करितोः–

जेणे वासना झोंबोनि पडे । तेणेंचि अपाये दुःख जडे ।
म्हणोनि विषयवासना मोडे । तो एक सुखी ।।

नाना प्रकारचे नकशी काम, सुगंधी सामान, व पोषाकाच्या भिन्नभिन्न तऱ्हा यांमध्ये पैशाची उधळपट्टी करण्याची बुद्धि आम्हांस कां सुचते बरें? स्वाभाविकपणे ज्या पदार्थांची आम्हांस गरज आहे, त्याहून अधिक पदार्थ आम्हांस हवेसे वाटून नाना प्रकारचे ढंग व ऐषआराम यांमध्ये आम्हीं मग्न झालो आहो. केवळ योगक्षेम चालण्या पुरत्या वस्तु प्राप्त झाल्या म्हणजे पुरे आहे, असें समाधान जो मानूं जाईल, त्याला लोक गांवढळ व दरिद्री म्हणतात. ऐषआरामीमध्ये दंग झालेले लोक मोठे उन्मत्त व उद्धट असतात. आपण कोणी मोठे राजेच आहो, असें त्यांना वाटत असतें. त्यांना राग येण्यास यत्किंचित्ही कारण पुरतें. त्यांच्या मर्जीविरुद्ध थोडीशी गोष्ट घडली कीं आपला मोठा घात झाला असें त्यांना वाटत असतें. खाण्यापिण्यांत किंवा घरांतील सामानासुमानांत आपलें वित्त उधळून टाकणे हा केवढा वेडेपणा? आपल्या वडिलांनी जिवापाड श्रम करून संपादिलेली दौलत छानछुकीचे किंवा मौजेचे पदार्थ विकत घेण्यांत खर्चूने टाकणे हा केवढा अविचार? धनसंपादनाचा हव्यास लागून लोक आपली ऐपत वाढेल तितकी वाढविण्याची खटपट करितात. या धनलोभास वश होऊन ते इतर जनांस अनेक प्रकारीं त्रास देतात व फसवितात; आणि कितीही अर्थप्राप्ति झाली तरी त्यांना ती पुरेशी होत नाहीं. ज्या वतनावर पूर्वी मोठा जनवर्ग उदरनिर्वाह करीत असे,

तें वतन आतां एका मनुष्याच्या साऱ्या गरजा भागविण्यास पुरेसे वाटत नाहीं. त्याला आणखी वतन वाढविण्याची हाव असते. अशा लोकांची धनतृष्णा कदापि तृप्त होणारी नव्हे. या धनतृष्णेविषयी पुढील वचनांत चांगले निरूपण केलें आहे:-

न च तुष्याति लब्धेन भूय एवच मार्गति ।
धननाशेऽधिक दुःखं मन्ये सर्वमहत्तमम् ।। * सु.

दुसरें असें कीं, त्याला ऐषआरामीची चटक लागून कितीही ग्राम्य विषयसुख त्यांनीं अनुभविलें तरी त्यांची वासना कदापि तृप्त होत नाहीं. मनुष्याने जिव्हालौल्यास्तव या भूतलावरील एकंदर सरोवरे, समुद्र, अरण्ये, पर्वत, नद्या व देश ही धुंडाळिली आहेत; आणि सुखानें व सुरक्षितपणे रहाता यावें म्हणून त्यांनीं मोठ मोठीं भव्य मंदिरे बांधिलीं आहेत. सारांश काय कीं, या आपल्या साडेतीन हातांच्या लहानशा देहामध्ये अनिवार वासना असाव्या ही मोठीच शोचनीय गोष्ट होय. सांप्रत ज्या मोठमोठ्या हवेल्या दिसत आहेत, त्यांपैकीं अगदीं थोड्या हवेल्या आपणांस रहावयास पुरणार नाहींत काय? आपण कितीही हवेल्या उठविल्या तरी त्यांपैकीं एका कोणत्या तरी हवेलीत आपण रहाणार. तेथें असेतोंपर्यंत बाकीच्या हवेल्या आपल्या नव्हत असें म्हणावें लागतें. आपल्या उदरपूर्तीसाठी, किंवा इतर सुखविषय प्राप्त व्हावे म्हणून आपण नेहमी आंकडे, फांसे, जाळी व कुत्रे जवळ बाळगून सर्व प्राण्यांशीं उघडउघड युद्ध करितो. जें अगदीं स्वस्त असून साधारणत: सर्वांस अनायासें प्राप्त होण्यासारखे असतें, असें कांहींच आपणांस रुचत नसतें; आणि हा सारा खटाटोप आपल्या जिव्हेस ज्या भलभलत्या चटी लागलेल्या असतात, त्यांची तृप्ति करण्याकरिता आपण करितों. आमचा लोभ, आमची महत्त्वाकांक्षा, आमची ग्राम्यविषयलालसा ही कदापि तृप्त होणारी नव्हत. आम्ही आपली दौलत वाढवितो; आम्ही आपलें कुटुंब वाढवितो; भपका व ऐषआराम यासाठी आम्ही सारे देश व सारे सागर धुंडाळितों. परंतु आमची तृप्ति अशी कदापि होत नाहीं. बैलास नित्यशः चरण्यास एकच कुरण पुरतें. हजार हत्तीस एकच अरण्य बस होतें. परंतु मनुष्याचा हा लहानसा देह इतर सर्व प्राण्यांहून अधिक खाऊन फडशा उडवितो. आम्ही जें खातो व पितो, तें केवळ आपली क्षुधा व तृषा शांत करण्याकरितांच नव्हे, तर आपली अनिवार वासना तृप्त करण्याकरितां होय. या वासनातृप्तीच्या ढंगांमध्ये आम्ही इतके गळून जातों कीं, आपण जिवंत असून केवळ मेल्यासारखेच होतों.

बदफैल मनुष्य सदाचारी असणें संभवत नाहीं

बदफैल मनुष्य सुशील नसतो. त्याला स्वदेशाची मुळींच परवा नसते. तो आपल्या मित्रांशी चांगल्या रीतीने वागत नाहीं. कारण त्याच्या वासना अनावार होऊन त्याच्या मनाला नीचता व क्षीणता प्राप्त झालेली असते. जो मनुष्य सदाचारी असतो, तो चांगल्या योद्ध्याप्रमाणे सर्व स्थितींमध्यें स्थिर राहील, यत्किंचित्ही डगमगणार नाहीं. त्याला घोर संकटप्रसंग प्राप्त होऊन पीडा ते सोसावी लागली तरी ती तो मोठ्या धैर्याने सोशील. आणि साक्षात मृत्यु प्राप्त झाला तरी सदाचारापासून लवमात्रही च्युत व्हावयाचे नाहीं असा त्याचा

* मनुष्याला प्रात झालेल्या द्रव्यानें संतोष होत नाहीं; आणखी द्रव्य मिळविण्याचा तो हव्यास धरितो. त्याच्या द्रव्याचा नाश झाला असता त्याला महत दुःख होते.

दृढ निर्धार असेल. सदाचारावांचून त्यास कांहीएक प्रिय वाटावयाचें नाहीं. अशा धीर पुरुषाचे वर्णन पुढील पद्यांत केलें आहे:-

अर्थ: सुखं कीर्तिरपीह मा भूदनर्थ एवास्तु तथापि धीरा: ।
निजप्रतिज्ञामधिरूढमाना महोद्यमा: कर्म समारभान्ते । * सु. र.

जो आपल्या स्थितीस कंटाळून जेव्हां तेव्हां कुरकुर, शोक किंवा चिंता करितो, त्यालाही निसर्गक्रमास अनुसरून स्वकर्तव्य केल्यावाचून गति नसते. त्याला आपल्या इच्छेविरुद्ध पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात. असें आहे त्यापेक्षा ह्या गोष्टी, आपण मुकाट्याने करीत असावें हें चांगले. या संसारांत जी संकटे वेळोवेळा येत असतात, त्यांच्या निवारणार्थ व्यर्थ धडपड करण्यांत काहीएक हित नाहीं. ज्या गोष्टी निसर्गक्रमानुसार आपणांस सर्वदा घडावयाच्या, त्या आपणांस कितीही प्रतिकूलशा वाटल्या तरी त्या थोर मन करून निमूटपणे सहन कराव्या हेंच चांगले. कारण ज्या गोष्टी कांहीं केलें तरी कदापि टळणें नाहीं, त्यांच्या परिहारार्थ व्यर्थ खटपट करणें हा निवळ वेडेपणा होय. आमचे हें जीवित निसर्गनियमांनी पूर्णपणें बद्ध आहे. या नियमांचे उल्लंघन कोणास कदापि करितां येणार नाहीं. तेंव्हा या नियमांप्रमाणें जो वागण्यास तत्पर होईल तोच खरा स्वतंत्र, निर्भय आणि शांत. मनुष्याने कोणत्याही बाह्य विषयाची लालसा न धरितां, केवळ अंतर्यामास ज्या गोष्टींपासून सुखानुभव घडण्याचा संभव असतो, तैवढ्यांचीच इच्छा केल्यास त्याला अनुताप असा कदापि प्राप्त व्हावयाचा नाही. अशा मनुष्याचे सर्व वांच्छित मनोरथ परिपूर्ण होतील. ग्राम्यसुखविषयांची लालसा धरिल्यानें मनास क्षीणता प्राप्त होते; आणि त्यांच्या प्राप्तीसाठी दैवावर अवलंबून रहावे लागतें. अशा रीतीने आपण परतंत्र होऊन धनप्राप्तीच्या खपपटीत मग्न झालो म्हणजे आपणांस पुष्कळ गोष्टीकडे डोळेझाक करावी लागते. सुनीतीचा कितीही उपदेश आपल्या कानी पडला तरी त्या प्रमाणें वर्तन करण्यास आपणांला मुळीच बुद्धि होत नाहीं. अशा सुखाभिलाषी मनुष्यास या प्रपंचांत अनेकविध संकटें प्राप्त होतात. तेव्हां अशी ही संकटप्रचुर व व्यर्थ सुखे प्राप्त करून घेण्याची इच्छा माझ्या मनांतून सर्वथा नष्ट व्हावी हे चांगलें.

---

* धन कीर्ति व सुख ही येथें प्राप्त झाली नाहींत, व मोठा अनर्थ गुदरला तरी उद्योगशाली धीर पुरुष ज्या कोणत्या गोष्टीविषयी प्रतिज्ञा करितात. तिला आरंभ केल्यावाचून कदापि रहावयाचे नाहींत.

भाग बारावा

लोभी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्य सर्वदा अतृप्त आणि अस्वस्थ असतो

ज्या मनुष्यास वास्तविक धनवान् व्हावयाचें असेल, त्यानें आपली दौलत वाढविण्याच्या खटपटीस लागू नये; तर त्यानें आपल्या वासना कमी कराव्या. कारण नुसते विपुल धन असण्यांत काहीएक अर्थ नसतो. त्यापासून मनास मात्र नीचता प्राप्त होते. एकाद्यापाशीं असलेली पुष्कळ दौलत अन्य जनांनीं पाहून त्यांस जो फायदा होत असेल, त्याहून अधिक फायदा, ती ज्यापाशीं असते, त्याला कदापि होत नसतो. जें आपण भ्रमामुळें आपलें असें म्हणतों. त्याचे आपण केवळ रक्षक असतो. ज्या गोष्टी प्राप्त होण्याकरिता आम्ही एवढे भगीरथप्रयत्न करितो, किंबहुना आपला जीवही धोक्यांत घालावयास सिद्ध होतों, त्याचप्रमाणें विश्वासघात, मित्रद्रोह इत्यादि कुकर्म करण्यासही प्रवृत्त होतों, त्या आपल्या अशा कदापि म्हणतां येत नाहींत. त्या दैवगतीनें आपणांस कांहीं वेळ प्राप्त झाल्या असतात. त्या आज आपणांपाशीं आहेत खऱ्या, पण उद्या त्या आपणांकडून दुसऱ्याच्या हातीं जावयाच्या. तर जी गोष्ट आपणांपाशीं शाश्वत रहाणारी नव्हे, ती आपली अशी कसें म्हणतां येईल बरें? लक्ष्मीचा तिच्या चंचलतेस्तव धिक्कार पुढील वचनांत उत्तम प्रकारें केला आहे:-

दायादाः स्पृहयन्ति तस्करगणा मुष्णन्ति भूमिभुजा
दुरेण छलमाकलय्य हुतभुग्भस्मीकरोति क्षणात् ।
अंभः प्लावयते क्षितौ विनिहितं यक्षा हरन्ति' ध्रुवं
दुर्वृत्तास्तनया नयन्ति निधनं धिग्धिग्धनं तद्बहु ।।*

लोभी मनुष्याची अर्थकृष्णा इतकी अनिवार असते कीं, त्याला कितीही धनलाभ झाला तरी त्याची तृप्ति कदापि होत नाहीं. त्याच्या वासना इतक्या अमर्याद असतात कीं त्याला जितकें अधिक वित्त प्राप्त होतें, तितकी त्याची हाव अधिकच वृद्धिंगत होते; आणि ही त्याची हाव म्हणजे कधीं आटपते अशातला कांहीं अर्थ नाहीं. याप्रमाणे त्याला स्ववित्तवृद्धीची जोपर्यंत हांव लागलेली असते, तोपर्यंत वित्ताचा वास्तविक उपयोग काय तें त्याच्या मुळीच लक्षांत येत नाहीं. देवीघेवीच्या कामामध्यें व हिशोब ठेवण्याच्या

---

* दायाद ज्याची इच्छा करितात, चोर आणि राजे ज्याचे कपटाने हरण करितात, अग्नि ज्याचे क्षणांत भस्म करितो, पाणी जें बुडवून टाकितें, जमिनीत पुरले असता जें यक्ष अक्षयी हरण करितात, दुर्वृत्त मुलगे ज्याचा नाश करून टाकितात, असें जें विपुल धन, त्याला धिक्कार असो.

दगदगीमध्यें तो आपला सर्व काळ दवडितो. पण त्यापासून त्याचें किंवा इतर लोकांचे वास्तविक हित असें कांहींच होत नसतें. या संबंधाने बालकांमध्यें व वृद्धांमध्यें म्हणण्यासारखे कांहींच अंतर नसतें. बालके असतात तीं मेवामिठाईसाठी मातापितरांपाशीं टाहो करितात; आणि वृद्ध माणसे असतात तीं सोन्यारुप्यासाठीं हाकाहाक करितात. कुत्र्यापुढे भाकरीचा तुकडा टाकिला असतां, तो तो पटकन् तोंडांत घेऊन सगळाचा सगळा गिळून टाकितो; आणि लागलीच दुसऱ्या तुकड्यासाठी टपत बसतो. दैवगतीने प्राप्त होणाऱ्या सुखविषयांच्या संबंधानेही आपण असेंच करीत असतो. एक विषय प्राप्त झाला असतां त्याचें असोशीनें सेवन करून पुनरपि दुसऱ्या विषयाची अपेक्षा आपण करितो. सोन्यारुप्याचे तुकडे घेऊन लोभ्याला काय करावयाचें असतें बरें? हे धातू जमिनीच्या खालीं फार खोल पुरलेले असून, त्याविषयी मनुष्याला अतिशयित लोभ असतो. यास्तव त्यांचें मोल मोठे असतें. तेव्हां अर्थात् त्यांच्या प्राप्तीसाठीं मोठे कष्ट सोसावे लागतात. या पाषाणांच्या लोभानें मनुष्य फारच अनन्वित कर्मे करितो. लढाया, खून, खोटे करार, दगाबाजी वगैरे अनर्थकारक अनाचार तो करण्यास प्रवृत्त होतो. द्रव्यलोभास वश होऊन मनुष्य कसा दुराचारी बनतो याचें वर्णन भर्तृहरीनें येणेप्रमाणे केलें आहे:-

जातिर्यातु रसातलं गुणगणस्तस्याप्यधोगच्छताम्
शील शैलतटात्पतत्वीभेजनः संदह्यतांवन्हिना ।
शौर्य वैरिणि वज्रमाशुनि पतत्वर्थो उस्तु नःकेवलम्
येनैकेन विना गुणास्तृणलवप्रायाः समस्ता इमे ।।*

खरें पाहता निसर्गामध्ये जे पदार्थ केवळ अनायासे प्राप्त होतात, त्यांचाच मनुष्याने स्वचरितार्थाकडे विनियोग करावा असा निसर्गाचा उद्देश दिसतो. सोनें, रुपे रत्नें वगैरे मनुष्याने अमोल मानलेल्या वस्तु खरोखरीच जनहिताच्या असत्या तर त्या पथ्वीच्या पोटांत इतक्या खोल पुरलेल्या नसत्या.

लोभामुळे मनुष्यास दुःख प्राप्त होतें

लोभी मनुष्यास ज्या वस्तूचा लोभ असतो, ती प्राप्त करून घेण्यास जी दगदग सोसावी लागते, तीहूनही अधिक शिक्षा त्यास या लोभामुळे सोसावी लागते. लोभी मनुष्य सर्वदा अस्वस्थ असतो. बरें, ज्या वस्तूचा तो लोभ करितो, ती त्याला प्राप्त झाल्यावर तरी तो सुखी होतो काय? नाहीं. वस्तु प्राप्त झाल्यावर ती कशी राखून ठेवावी याची चिंता त्याला अहोरात्र लागून रहाते. उदाहरणार्थ धन घ्या. हें संपादन करण्यासाठीं जी दगदग करावी लागते, तीपेक्षां अधिक दगदग तें प्राप्त झाल्यावर राखून ठेवण्यासाठी करावी लागते. कारण संपादित धन नष्ट होण्याची भीति मनांत येऊन मोठे दुःख होतें; आणि तें खरोखरीच नष्ट झालें म्हणजे तर अधिकच दुःख होतें. हाच आशय पुढील वचनांत सूचित केला आहे:-

---

* राहो जाति रसातळी सुगुण हे राहोत ही खालते शैलाग्राहनि शील सत्वर पडो सौजन्य अग्नींत तें शूरत्वावरि आदळो अशनिका हें सर्वही नावडे अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें बापुडे. वामन

धन तावदसुलभं लब्ध कृच्छ्रेण रक्ष्यते।
लब्धनाशो यथा मृत्युस्तस्मादेतन्नचिन्तयेत् ।।*

आपण एक वेळ मोठे संपन्न होतों, व आतां विपन्न झालो हें लोकांच्या लक्षांत आलें म्हणजे ते आपली अवहेलना करितील, असा विचार मनांत येऊन आपण फारच कष्टी होतों. आणखी असे कीं, लोभी मनुष्यास प्राप्त झालेले धनादि विषय त्याच्यापासून गेले म्हणजेच केवळ तो दुःखी होतो असें नाहीं; तर जे वांच्छित विषय त्याला प्राप्त होत नाहींत, त्यांस आपण मुकलो असें वाटून त्याला दुःख होत असतें. धनसंपन्न मनुष्यास लोक सुखी समजतात, आणि आपणांस त्याची अवस्था प्राप्त व्हावी अशी इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न होते, हें खरें आहे. तरी धनवंताच्या पाठीशी दगदग व पीडा फार असून, त्याचा जो तो हेवादावा करतो. यामुळे त्याची अवस्था फारच कष्टमय होते. ती इतकी कीं तीहून दुसरी कोणतीही अवस्था अधिक कष्टमय नसेल. तेव्हां कोणाही मनुष्याने आपल्या भाग्यशालीपणाचा गर्व वाहू नये. आपल्यापाशी इतके हत्तीघोडे आहेत, एवढे चाकरप्यादे आहेत, एवढी वतनें व महाल आहेत अशी फुशारकी मिरविण्यांत काहींएक अर्थ नाहीं. कारण त्याच्यापाशी असलेल्या धनाची तुलना, ज्या अधिक धनाची वांच्छा तो करीत असतो, त्याशीं केली असतां, तो अगदीं दरिद्री आहे असेंच म्हणावें लागतें. एका मनुष्यास सर्व वस्तु प्राप्त होण्याचा संभव मुळींच नसतो. परंतु कोणी सर्वच वस्तु तुच्छ मानीन म्हणेल तर तें शक्य आहे. जो धन तुच्छ लेखितो, त्यालाच तें प्राप्त होण्याचा मार्ग विशेष सुगम होतो.

सर्व कांहीं पैशासाठी होतें

लोकांचे तंटे निवडणारे कित्येक लोक केवळ द्रव्यप्राप्तीकडे लक्ष देत असतात. अशाला थोडासा लांच दिला कीं ते पक्षकारास हवा तसा न्याय देतात. या संसारामध्यें सारे जन केवळ उदम्यासारखे वर्तत असतात. उदमी आपल्या जवळ विक्रीस असलेल्या मालाची किंमत किती येईल याकडेच केवळ पाहत असतात. तो चांगला आहे किंवा वाईट आहे याविषयी ते फारसा विचार करीत नाहींत. अमुक एका प्रकारचा माल खरेदी केला असतां, तो नफा ठेवून विकता येईल किंवा नाहीं याविषयीच त्याला विचारपूस करावीशी वाटत असते. आमचेही व्यवहारांत असेंच वर्तन असतें. कांहीं तरी लाभ होईलसें वाटलें तर आपण मोठा धार्मिकपणाचा डौल घालितों. परंतु अधार्मिकपणा दाखविल्यानें आपली तुंबडी यथेष्ट भरेल असें वाटल्यास आपण लागलीच धार्मिकपणाचें पांघरूण एकीकडे झुगारून देतो. त्याचप्रमाणें जोपर्यंत आपणांस काहीतरी धनलाभ होण्यासारखा असतो, तोपर्यंत आपण प्रामाणिकपणाचें मोठे कोंग करितो. परंतु लबाडी व दगाबाजी करून आपली पिशवी भरण्याची संधि आल्यास आपण आपला प्रामाणिकपणा विसरतो. आमच्या मातापितरांनीं आम्हांस धन ही मोठी स्पृहणीय वस्तु आहे असें लहानपणापासून शिकविले असतें; आणि त्या मानानें त्याचा लोभ आमच्याठायीं वाढला असतो. म्हणून दारिद्र्य हें मोठे विपत्तिकारक आहे असा समज होऊन, दरिद्री मनुष्यास लोकांत वागावयास मोठी लाज वाटते. सोने, रत्नें, हत्ती, घोडे ज्यांच्यापाशीं असतात, ते मोठे धन्य होत, असें लोक समजतात. अशा प्रकारे जो धनलोभ करितो, त्याच्या मनाची अवस्था कशी होते याचें वर्णन पुढील श्लोकांत उत्कृष्ट प्रकारे केलें आहे :-

---

* धन पाहू जातां प्राप्त होणें कठीण. प्राप्त झाल्यावर त्याचें रक्षण करणें मोठे प्रयासाचे काम. आणि प्राप्त झालेल्या धनाचा नाश झाला असतां मरणप्राय दुःख होते. म्हणून या धनाची चिंता करीत बसू नये.

वाय ५३८-१०

लज्जे त्वं मज्ज सिंधौ गिरिवरशिखरे त्वं च तिष्ठ प्रतिष्ठे
शांत प्रांत दिशांते कुरु वसतिमहो गर्व खर्बो भवाशु।
तेजः पातालमूलं भज भुवि भगवन् मान मा नाम तेऽस्तु
प्रेम्णैः कामाश्रयंतीं सततमहमिमा तूर्णमाशां श्रपिष्ये।। *

लोभामुळे आपला स्वभाव बिघडून आपण दुःखित होतों

लोभामुळे आपण स्वतःच दुःखी होतों असें नाही, तर एकंदर मनुष्यजातीस आपल्या या दुर्गुणामुळे अपाय घडतो. जो योद्धा असतो. त्याला समरप्रसंग उपस्थित व्हावा असें वाटत असते. शेकऱ्याला धान्य महाग व्हावें अशी इच्छा असते. वकील मनांत म्हणत असतो कीं, लोकांनी पुष्कळ तंटेबखेडे करावे. वैद्य हवापाणी बिघडून रोगराई केव्हा वाढेल याची वाट पाहत असतो. छानछुकीचे व मौजेचे पदार्थ विकणारा लोकांनी विलासी व विषयासक्त व्हावें असें इच्छीत असतो. कारण त्याची प्राप्ति लोकांच्या अनाचारावर अवलंबून असते. मोठमोठी वादळे सुटून किंवा आग लागून घरांदारांचें नुकसान झालें म्हणजे सुतारांस, गवंड्यास वगैरे धंदा मिळत असतो. याप्रमाणे एकाचें नुकसान तो दुसऱ्याचा फायदा असें रहाटगाडगे या प्रपंचांत दिसून येतें. अशा प्रकार आपल्या लाभासाठी दुसऱ्याच्या नुकसानाची मुळीच परवा न करणारे लोक फारच आढळतात. तरी अशा सर्वच लोकांचा दुष्टपणा उघडकीस येत नसतो. ज्या गोष्टीनी आमच्या तृष्णांचे उत्तेजन होतें, त्यांच्या योगाने मनास दुर्बलता व मोह ही प्राप्त होतात. नसते विचार व कल्पना मनांत घोळू लागून तें व्यग्र होते. लोभामुळे कोण कोणते अनर्थ उद्भवतात तें पुढील वचनांत सांगितलें आहे:-

लोभात्कोधः प्रभवति लोभात्कामः प्रजायते ।
लोभान्मोहश्व नाशश्च लोभः पापस्य कारणम् ।। ** सु.

महत्त्वाकांक्षेमुळे उत्पन्न होणारे अपराध व चिंता

येथवर विषयासक्ति व लोभ या अत्यंत हीनता आणणाऱ्या दोषांचें निरूपण केलें. आतां वैभवतृष्णा व अधिकारतृष्णा याविषयी विवेचन करूं. वैभव व मान्यता याविषयी जे अतुर झाले असतात, ते, ज्यांस या गोष्टी प्राप्त झाल्या असतात, त्यांच्या मनाची अवस्था कशी असते, तें पाहतील तर त्यांस असें आढळून येईल कीं, ह्या स्पृहणीय वाटणाऱ्या बाह्य थोरपणामुळे त्यांच्या पाठीशी अनेक प्रकारचा जंजाळ लागून, त्यांच्या हातून अनेक अनन्वित कर्मे घडतात. ज्या गोष्टींच्या संपादनाने सामान्य जनांचे नेत्र दिपून जातात, त्या केवळ भासमय सुख देणाऱ्या असून अत्यंत अनिश्चित व क्षणभंगुर असतात. त्यांची प्राप्ति मोठ्या कष्टानें होतें; आणि त्या एक वेळ प्राप्त झाल्यावर त्यांच्या रक्षणार्थ पुष्कळ त्रास सोसावा लागतो. मोठेपणा

---

* हे लज्जे. तूं समुद्रांत बुडी मार. के प्रतिष्ठे, तूं अत्यंत उंच पर्वताच्या शिखरावर जाऊन रहा. हे शांति दिशांच्या अगदीं शेवटल्या प्रांतांत वसत कर. हे गर्वा, तूं ठेंगणा हो. हे तेजा, तूं पातालतलाप्रत जा. हे भगवान् माना, तुझे या भूमीवर नांव ही नको. कारण मला सतत धरून रहाणारी जी धनतृष्णा तिचाच मी इतःपर अंगीकार करणार.

** लोभामुळे क्रोध उत्पन्न होतो. लोभामुळे काम उत्पन्न होतो. लोभामुळे मोह व नाश हे प्राप्त होतात. लोभ पापाचे कारण आहे.

प्राप्त व्हावा अशी इच्छा आपल्या ठायीं वसत असली म्हणजे आपण अगदीं फुगून जातो; आणि आपल्या अंगांत तोरा उत्पन्न होतो. अशी आपली वृत्ति झाली म्हणजे आपल्या पेक्षां एकाद्याची स्थिति चांगली आहे असें पाहून आपणांस खेद होतो; त्याचप्रमाणें आपल्यापेक्षां हीन स्थितींचा मनुष्य आपल्या सभोवती कोणीच दिसला नाहीं तर आपणांस वाईट वाटते. याप्रमाणे आपणांस उभय प्रकारच्या मत्सराने ग्रासले असतें. मनुष्याने या महत्त्वाकांक्षेस वश होऊन मोठमोठे पराक्रम करून, विस्तीर्ण राज्य, किंवा विशाल वैभव, किंवा अद्वितीय अधिकार प्राप्त करून घेतला असला तरी जोपर्यंत तो संपादित राज्यादिकेंकरून तृप्त होत नाहीं, तोपर्यंत त्याच्या त्या पराक्रमांत कांहींच अर्थ नाहीं. लोभी मनुष्याचा लोभ अमर्याद असतो. जेवढ्याचा तो लोभ करितो, तेवढें त्याला प्राप्त व्हावें असें वाटत असतें. ज्यांनीं मोठमोठ्या राजांस जिंकिलें असतें, व बलाढ्य राष्ट्रें पादाक्रांत केली असतात, ते स्वतः आपल्या वासनांचे दास झाले असतात. वामनावश झालेल्या मनुष्याची अवस्था कशी होते याचे वर्णन पुढील पद्यांत कलें आहे:-

आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ।
आशा येषां दासी तेषा दासायते लोकः ।। * सु.

महत्त्वाकांक्षेने ज्यास पछाडले असतें, त्याचे इच्छित मनोरथ कितीही तृप्त झाले तरी त्याच्या हृदयात आणखी इच्छा उत्पन्न होतात. पूर्व स्थितीहून चांगली स्थिति त्यास प्राप्त झाली असता तीहून उच्चतर स्थिति आपणास प्राप्त व्हावी अशी इच्छा त्याच्या ठायीं उद्भवते; आणि कधीकधी अनपेक्षित अशा गोष्टींची प्राप्ति झाली असतां वासना अधिकच अनावर होऊन, केवळ असाध्य असंभाव्य अशा गोष्टींची अपेक्षा तो करूं लागतो. महत्त्वाकांक्षा ही जलोदरासारखी आहे. या रोगामध्ये मनष्याने जितके अधिक उदक प्यावे, तितकी उदकपानाची इच्छा अधिकच बलवत्तर होते. या धनतृष्णावृद्धीचे वर्णन भर्तृहरीने येणे प्रमाणें केलें आहे:-

वलिभिर्मुखमाक्रांत पलितैरंकित शिरः ।
गात्राणि शिथिलायंते तृष्णैका तरुणायते ।।**

सदाचाराचा मार्ग चांगला साफ व सोपा आहे. परंतु ऐहिक उच्चपद प्रात करून घेण्याचा मार्ग फारच बिकट आहे. पुनः ह्या उच्चपदापासून च्युत होण्याचा संभव फारच मोठा असतो. परंतु ही पतनभीति आहे अशी खात्री उच्चपदास चढलेल्या मनुष्याची होतां होत नाहीं. त्याचप्रमाणे या थोरपणावर भरवसा ठेवून कदापि चालावयाचें नाहीं असें कितीही सांगितलें तरी तें त्याला सहसा पटावयाचें नाहीं. साधारणतः पाहता कोणत्याही गोष्टीचा अतिरिक्तपणे हव्यास धरिल्याने कांहीं ना कांहीं अपाय घडण्याचा दृढ संभव असतो. म्हणूनच म्हटले आहे कीं, 'अति सर्वत्र वर्जयेत्.' आपणांस मोठे वैभव प्राप्त झालें असतें, व तें कायम रहावे अशी आपली उत्कट इच्छा असून, आपण तें राखण्याविषयीं मोठ्या दक्षतेने उपाययोजना करीत असतो; तथापि तें केव्हा नष्ट होईल याचा नेम नाहीं. अशीच गोष्ट एकंदर ऐहिक सुखविषयांची आहे.

---

* आशेचे जे दास बनले, ते सर्व लोकांचे दास होत. आशा ज्यांची दासी, त्यांचे सर्व लोक दास होतात.

** वदना रदनावलीनें त्याजिलें । शिर सर्व हि शुभ्रपणे पिकले
उठता बसता अणुशक्ति नसे । परि आस निरंतर माजतते. वामन.

लौकिक किंवा वैभव ही ज्या मार्गाने साध्य करून घेण्याचा आपण उद्योग आरंभितो, तो मार्ग एक तर कष्टप्रद असतो; व दुसरें असें कीं, ज्या मुखविषयांची आपण स्पृहा करितो, ते परिणामी आपल्या दुःखास व विपत्तिस कारण होतात. महत्त्वकांक्षेस कोणी महागर्तेची उपमा देतात. तीत जें जें टाकावें त्याचा स्वाहाकार होऊन तें कोठल्या कोठे नाहीसें होतें. पुनः या मनोवृत्तीचे परिणामही महाभयंकर असतात. कारण या मनोवृत्तीस वश होऊन जो मनुष्य अन्य जनांकडून स्पृहणीय वस्तूंचा अपहार करितो, त्या मनुष्याकडून ते जन त्या वस्तु पुनरपि हिसकावून घेण्यास सर्वदा टपतील, आणि अनुकूल प्रसंग प्राप्त झाला म्हणजे ते आपला मनोरथ साध्य करून घेऊन, त्या महत्त्वकांक्षी मनुष्यास चांगले शासन करतील.

मनुष्यात मोठ्या मानाच्या पदव्या प्रात झाल्याने आपली योग्यता वाढली असें वाटत असतें. परंतु अशा मनुष्याचा विवेक सुटला म्हणून समजावे. कारण वस्तुतः पाहता मोठमोठ्या पदव्या हे केवळ मोठे भपकेदार पोकळ शब्द होत. यापलीकडे त्यात कांहींच तथ्य नसतें. अशीच गोष्ट बहुमोल दागिन्यांची व मुलामा, नकशी वगैरे शोभादायक वस्तूंची आहे. त्यांच्या तेजाने मनुष्याचे नेत्र कितीही दिपले तरी विवेक करून पाहता, त्या केवळ वरवरून तशा दिसतात; परंतु त्यांच्या आंत पाहिले असता. त्या केवळ यःकश्चित् असून त्यांत बिलकुल मनोहरता नसते.

ज्यास लोक थोर आणि सुखी समजतात, ते दुःखी होत

ज्यास लोक थोर आणि सुखी समजतात, त्यांच्या त्या स्थितीचा मी कदापि हेवा करणार नाहीं. लोकांच्या निरर्थक वाखाणणीच्या योगाने विवेकी मनुष्य कदापि मोहित होणार नाहीं. ज्या गोष्टीच्या प्राप्तीस्तव सामान्य जनांस मोठा अभिमान वाटतो, त्यांच्या योगानें माझ्या सुखानुभवांत यत्किंचित्ही फरक पडणार नाही. जो गाडीतून किंवा घोड्यावर बसून इकडून तिकडे फिरत असतो, जो लोकांच्या माना मुरगाळून किंवा त्यांस इतर अनेक प्रकारीं त्रास देऊन आपलें वैभव वाढवितो आणि जो सामान्य लोकांस तुच्छ लेखून त्यांच्यांशीं सर्वदा तुटून वागतो, तो मोठा लौकिकवान् व थोर होय अशी लोकांची समजूत आहे. परंतु वस्तुतः पाहता असा हा बडा माणूस ज्याचा तिटकारा करितो, तो त्याच्याहून सुखी असण्याचा संभव असतो. ज्यास स्वतांला हितकर व अन्य कोणांस अपायकारक नव्हे अशी सत्ता चालविणे असेल, त्यानें ती आपल्या स्वतांच्या वासनांवर चालवावी. ज्यांनीं अजिंक्य अशीं नगरें जाळून पोळून उद्धवस्त केली, शत्रूच्या प्रचंड सेनांची स्वपराक्रमाच्या योगाने दाणादाण केली, आणि शत्रूच्या रक्ताने आपलें सर्वांग न्हाणिलें, असे शूरवीर आपल्या बाह्य शत्रूंशी समरप्रसंग करून विजयी झाले तरी त्यांच्या अंतर्यामीच्या दुर्वृत्ति व दुर्वासना एतद्रूप महाशत्रूंनी त्यांला सर्वतोपरी हतवीर्य केलेले असतें. ग्राम्य सुखलालसा, दुष्टत्व इत्यादि दुर्वृत्तीचे ते अगदीं दास बनलेले असतात. तेव्हां अशा परतंत्र मनुष्यास कोण विवेकी पुरुष सुखी म्हणेल बरें? तात्पर्य काय कीं, ऐहिक बाह्य सुखाची लालसा धरिल्याने चित्त अस्वस्थ होतें. सर्वदा कांहीं ना कांहीं कारणानें हृद्रोग लागलेला असतो; आणि विवेकशक्ति कमी होऊन मनास भ्रांति जडते. या सुखाच्या पाठीस लागणारे कित्येक जन मोठे महत्त्वाकांक्षी असतात; आणि कित्येक तर ऐषआरामीत अगदीं गुंग होऊन जातात. त्यांच्या योगानें कित्येक फारच चढून जातात; आणि कित्येक तर अगदीं लाचार होतात.

मद्य जसे प्राशन करणाराच्या मगदुराप्रमाणें त्यास कमीजास्त प्रमत्त करिते, तद्वत् या ग्राम्यसुखानुभवाची गोष्ट आहे. कित्येक जण त्याच्या धुंदीने पुरे भ्रांत होतात; व कित्येकांवर त्याचा फारसा अनिष्ट परिणाम होत नाहीं. परंतु त्याची लालसा धरणारे एकंदर जन नाश पावावयाचे यांत तिलप्राय संदेह नाहीं. उच्चपद प्राप्त झालें असतां त्यापासून च्युत होण्याचा संभव फारच असतो. वैभवप्रातीच्या योगाने त्याची वृत्ति बेहोष हेऊन, त्याला आपल्या उच्चस्थितीचें भान नाहीसे झालें म्हणजे त्या पदापासून पतन पावून सर्वस्वी नाश होण्यास उशीर लागत नाहीं. वैभवमूलक सुखाचा अनुभव बेताबातानें घेऊन त्यांत आसक्त न होण्याचे सामर्थ्य फारच थोड्यांमध्ये असतें. अशा वैभवशाली मनुष्यास सर्व प्रकारची सुखे अनुकूल असल्या कारणानें त्याला तीं हळूहळ अगदीं गुंग करून सोडितात.

भाग तेरावा

आशा आणि भय ही मानवी जीवितास मोठीं अपायकारक होत

जो मनुष्य एकाद्या गोष्टीची आशा करितो किंवा भीति बाळगितो, त्याची निराशा होण्याचा संभव फार असतो. तेव्हां अशी वारंवार निराशा पावणारा मनुष्य पूर्ण सुखी आहे असें सहसा म्हणवत नाहीं. आशा आणि भीति ह्या परस्परांहून कितीही विसदृश दिसल्या तरी त्या सर्वदा परस्परांच्या अनुषंगाने असतात. एकीच्या मागून दुसरीचा अनुभव सर्वदा घडत असतो. यांचा एवढा निकट संबंध असण्याचें कारण उघडच आहे कीं, या वृत्तींच्या योगाने मनुष्यास आपलें पुढें कसें होईल याची चिंता फारच असते. भीतीपेक्षा आशा मात्र अंमळ कमी दोषास्पद असते इतकेंच काय ते. आपण कोणत्याही गोष्टीसंबंधानें कलह करीत असतां, कलहमूलक गोष्टीपासून वर्तमान काळी किंवा भविष्यकाळी कोणतें सुख किंवा दुःख प्राप्त होणार याचा विचार केल्याने आपला कलह योग्य आहे कीं अयोग्य आहे याविषयी निर्णय करितां येतो. वर्तमान काळी कोणत्याही गोष्टीपासून सुखाचा किंवा दुःखाचा अनुभव घडण्यासारखा असल्यास त्याविषयी निर्णय करणें फार सोपे आहे. परंतु हा अनुभव भविष्यकाळीं घडण्यासारखा असल्यास त्याविषयी आज निश्चयानें कांहींच सांगतां येण्यासारखे नसते. भविष्यकाळी एकादी विपत्ति प्राप्त होणार म्हणून तीविषयी आज चिंता व दुःख करीत बसण्यात अर्थ नाहीं. आशा काळजीमुळे मनुष्य वर्तमानकाळच्या सुखास मात्र विनाकारण मुकतो. कारण कोणत्याही गोष्टीस आपण मुकणार अशी भीति मनांत नेहमी वागत राहिल्यानें जें दुःख होते, तें ती गोष्ट साक्षात् हरपल्याने होणाऱ्या दुःखा एवढेच बहुतेक आहे. मनुष्याने दीर्घदर्शी अवश्य असावे. परंतु पुढील काळाविषयी नेहमी चिंतातुर किंवा बेदील बिलकुल असतां कामा नये. पुढें आपणांस कोणत्या अडचणी प्राप्त होतील याविषयी आजच विचार करून ठेवणे कांहीं वाईट नाहीं. अशा प्रकारे त्यास भय वाटलें तरी त्यास भयाकुल म्हणतां येत नाहीं. तरी अशी चिंता वारंवार वाहिल्याने मनुष्यास जेव्हांतेव्हां भयभीत होण्याची सवय लागून रहाते. कोणत्याही गोष्टीविषयी मनांत संशय, भीति किंवा अनिश्चय असणे हें फार वाईट आहे. एकादी गोष्ट करितांना मागेपुढे करणे, किंवा मनाची अधीरता प्रगट करणें हें मोठेच लाजीरवाणे आहे. मनुष्याने नेहमी संशयांत राहून चित्त पुनःपुनः अस्वस्थ होऊं द्यावें त्यापेक्षा एकदाची संशयनिवृत्ति करून घ्यावी यासारखे सुख नाहीं.

पुढें होतीलशा वाटणाऱ्या गोष्टीविषयी मनांत भीति बाळगणाऱ्या मनुष्याच्या विपत्तीस पारावार नाहीं

पुढें काय होईल कोण जाणें अशी विवंचना करीत राहिल्याने आपणांस अमर्याद विपत्ति भोगावी लागते. याला उपाय मिळून इतकाच कीं, भीति आशेच्या योगाने जितकी कमी करवेल तितकी करण्याविषयीं

अगोदर झटावे. असें नेहमी करीत राहिल्याने भावी संकटप्रसंगापासुन आज उद्भवणारी विपत्ति बरीच उपशम पावते. तरी अशानें त्या संकटप्रसंगाचा सर्वस्वी परिहार होतो असें समजू नये. ज्या गोष्टी पुढें होतील असें आपणांस आज वाटून त्यांविषयीं आपण चिंता करीत असतों, त्या सर्वच यथाकालीं घडून येतात असें सहसा म्हणवत नाहीं. पुष्कळ गोष्टी तर कधींही घडत नाहीत. परंतु त्यांविवर्यी आपण आज विनाकारण कष्टी होत असतो. असा अनुभव आपणांस स्वतांच्या व इतरांच्या संबंधानें नित्यशः येत असतो. तथापि या संबंधानें आपली योग्य समजूत कधीही होत नसते. परंतु असें समजा कीं, ज्या गोष्टीविषयी आपण भीति बाळगीत असतो, ती खरोखरीच घडून आली, तरी तीविषयी एवढे हवालदील होण्याची काय जरूर आहे बरे? अशा प्रतिकूल गोष्टीमुळें कधीकधी आपलें हितही होण्यासारखे असते. यदाकदाचित् आपणांस मृत्यु प्राप्त झाला तरी त्या मृत्यूच्या योगाने आपल्या जीविताचे सार्थक्य होऊन आपली उज्ज्वल कीर्ति जगांत पसरेल. उदाहरणार्थ, सॉक्रेटिसास विषप्राशन करून देहत्याग करावा लागला, तरी त्या विषपानमूलक मृत्यूमुळे त्याची आज अजरामर कीर्ति होऊन राहिली आहे. कधीकधी तर असें होतें कीं, एकादा संकटप्रसंग प्राप्त होईल अशी आपण भीति बाळगीत असतो. तथापि तो केव्हा प्राप्त होईल याचा आपणांस कांहीं नेम सांगतां येत नसतो; आणि कित्येक वेळां तर असें घडतें कीं, प्राप्त होणाऱ्या संकटाचा परिहार केवळ अनपेक्षित असा योग घडून येऊन होत असतो. त्याचप्रमाणे जे कित्येक संकट प्रसंग पुढें प्राप्त होतील अशी आपणांस सांप्रत अहर्निश चिंता लागलेली असते, ते कधीच येत नाहींत. तर असे प्रसंग साक्षात् प्राप्त होत तोपर्यंत निरर्थक खेद करण्याचें मनुष्याने सोडून द्यावे; आणि ते पुढे कधीं प्राप्त होणार असतील तर होवोत असे मानून, आज आपलें त्यानें चित्त स्वस्थ राखावे. कोण जाणे कदाचित् असे प्रसंग कोणत्या ना कोणत्या कारणानें लांबणीवर पडतील, किंवा मुळीच टळतील. कित्येक आगीमध्ये सापडले असतां तींतून सलामत सुटतात. कित्येक घर कोसळून त्याखाली सापडले तरी त्यांतून कांहींएक इजा न होतां बाहेर पडतात. कित्येकांच्या कंठनाळावर शत्रूची तरवार आली असूनही त्याच्या तावडीतून ते सुटतात. कित्येकांवर गुन्ह्याची शाबिदी होऊन त्यांस देहांत शासनाची शिक्षा झाली असून, शिक्षा सांगणाराचा किंवा ती अंमलांत आणणारांचा नाश होऊन, ते जिवंत सुटले आहेत. तेव्हां तात्पर्य काय कीं, बरेवाईट प्रसंग जे प्राप्त होण्याची भीति मनुष्यास सर्वदा वाटत असते, ते म्हणजे नेहमी घडून येतातच असा कांहीं नियम नाही. त्यांच्याविषयी खात्रीने कांहींच सांगतां येत नसतें. ते साक्षात् प्राप्त होईपर्यंत त्याविषयी कोणतेच विधान किंवा अनुमान करूं नये हें बरें. शब्दांचा जसा आपण कधींकधी भलताच अर्थ करून संताप पावतो, तद्वत् भावी गोष्टींच्या संबंधाने खोट्या कल्पना करून आपण खेद पावत असतो. यासाठीं भावी गोष्टींविषयी आज चिंता करीत बसू नये. त्या साक्षात प्राप्त झाल्या म्हणजे सहन करण्यास सर्वदा तयार असावें. एवढेच आपलें काम आहे.

अतिघोर संकट प्राप्त झालें तरी तें सोसण्याची, सर्वदा तयारी असावी

पुढें आपलें काय होईल याविषयीच्या सर्व चिंतेपासून मुक्त व्हावें अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें प्रथमतः असें मानून चालावे कीं, आपल्यावर सर्व प्रकारचे भयंकर प्रसंग गुदरण्याचा संभव आहे. असा त्याच्या मनाचा एक वेळ समज झाला म्हणजे त्यास कोणत्याही एका संकटापासून किती अनिष्ट प्राप्त होईल याची तुलना एकंदर अनिष्टांशीं सहन करितां येईल. असें त्यानें केलें म्हणजे त्याला हें लागलीच दिसून

येईल कीं, विवक्षित संकटापासून उद्‌भवणाऱ्या ज्या अनर्थाचे भय त्याच्या चित्तांत उत्पन्न झालें असतें, तो अगदी अल्प असून क्षणिक असतो. दुसरें असें की, जी संकटे आपणावर कदाचित् येतील असें भय मनुष्यास वाटत असतें, तीं साक्षात् प्राप्त झाल्याप्रमाणें त्याला दुःख होत असतें. एकादा रोग प्राप्त व्हावयाचा सुमार असतां, ज्याप्रमाणें त्याची कांहीं चिन्हे प्रथमतः दृग्गोचर होऊन तो अस्वस्थ व बेदील होतो, त्याची गात्रें शिथिल होऊन त्यांस थकवा येतो. तो जांभया देऊ लागतो, आणि त्याचें सर्व अंग कंपायमान होतें. तद्वत्‌च दुर्बल मनाच्या मनुष्याची स्थिति होते. भावी संकटाच्या कल्पना करण्यांत त्याचे मन निमग्न होऊन, ते संकटप्रसंग साक्षात् प्राप्त होण्यापूर्वीच तो कष्टी होतो. जी गोष्ट पुढें कधीं काळी घडली तर घडावयाची, तिच्याबद्दल आज आपलें चित्त आपण कां उद्विग्न होऊं द्यावें बरें? मनाची अशी वृत्ति होणे हा आपण होऊन लावून घेतलेला रोग होय. ज्या दुःखाचा अनुभव आपणांस आज घडत नाहीं, त्याविषयी आजच चिंता करीत बसल्याने आपणांस विनाकारण विपत्ति प्राप्त होते; आणि ही हृद्रोगरूप विपत्ति आपण मुद्दाम ओढून घेतल्यासारखे होतें. मुले जशी कधीकधी आपल्याच सावलीला भिऊन दचकतात, त्याप्रमाणें कित्येक लोक दुःखाचा नुसता विचार मनांत आल्यानेच कष्टी होतात. या मनाच्या वृत्तीचा निषेध वामनपंडित येणेंप्रमाणें करितो:-

मना घोर वाहे सदा सर्व काळी
मिळाला स्वये कल्पनेचेनि मेळी ।
बळे गुंतला मोहपाशी अभागी
म्हणे वामना तो जिता नर्क भोगी ।।

ज्या एकाद्या बलाढ्य शत्रूपासून आपणांस मोठा धोका प्राप्त होण्यासारखा असतो, त्याला स्वतांलाही भीतीनें सोडलेले नाही, ही गोष्ट ध्यानांत वागविली पाहिजे. ज्या सिंहाची गर्जना ऐकून मोठे क्रूर पशुही घाबरून जातात, तो थोडीशी गडबड कानी पडताच एकदम दचकून उठतो. हिंस्त्र पशूंना ज्या गोष्टींमुळें क्रोध येतो, तीच गोष्ट त्यांस कंपायमान व्हावयास पुरते. कसली तरी चाऊल, ध्वनि किंवा अपरिचित गंध यामुळे ते गलबलून उठतात.

दारिद्र्य, रोगराई व सत्ताधीशांचा जुलूम यांस मनुष्याने अतिशयित भ्यावें

ज्या गोष्टींविषयी आपण अतिशयित भीति बाळगिली पाहिजे, त्यांचे माझ्या मते तीन प्रकार आहेत. एक दारिद्र्य, दुसरा रोगराई आणि तिसरा बलिष्ठ लोकांकडून होणारा अनेक प्रकारचा जुलूम. यांपैकी शेवटला प्रकार जोरदार असतो. कारण त्यामुळें जिकडेतिकडे पुष्कळ गवगवा व धांदल होते. परंतु दारिद्र्य व रोगराई यांपासून उद्भवणारी विपत्ती केवळ स्वभावसिद्ध असून, ती आम्हांस होत होत प्राप्त होते; आणि तीपासून मनुष्य कांहीं एकाएकीं गांगरून जात नाही. बलिष्ठाकडून होणारी पीडा मात्र मोठीच भयंकर असते. त्याच्या हातीं हतवीर्य मनुष्य सापडला असतां त्याची अगदीं दुर्दशा होते. तो त्याला जाळितो, तलवारीने कापून टाकतो, सुळावर चढवितो, फाशी देतो, त्याच्या शरीरास नाना प्रकारी असह्य वेदना होतील अशा योजना करितो, त्याला हिंस्त्र पशूंकडून फाडवितो, शस्त्रादिकांनी छाटून त्याच्या देहाचे तुकडेतुकडे करितो;

या व अशाच दुसऱ्या पुष्कळ रीतीने तो त्याचे हाल करितो. याप्रमाणे जें अनिष्ट अनेक भयानक रूपांनी मानवास प्राप्त होऊन त्यास अगदीं घाबरवून टाकिते, त्याविषयी त्याच्या मनांत धास्ती वागणे स्वाभाविक आहे. एकाद्या चांगल्या रीतीनें मरण प्राप्त झालें असतां, त्यास कांहीं माणसे मोठ्या धैर्यानें व निश्चयाने सहज तयार होतात. परंतु हेंच मरण वाईट रीतीनें प्राप्त व्हावयाचें असल्यास त्याला त्याविषयी फारच भीती वाटते. क्षुधा, तृषा, ज्वर, वायुविकार इत्यादि विपत्ती अन्य विपत्तीप्रमाणेच क्लेशप्रद आहेत असें मी समजतो. या विपत्तीमध्ये व इतर विपत्तींमध्यें भेद एवढाच कीं, त्यांची भीती सर्वदा दृष्टीसमोर नसते. संकट प्रसंग साक्षात् प्राप्त झाला नसतो तोपर्यंत कित्येक मनुष्य त्याविषयी व्यर्थ वल्गना करितात. परंतु तो एक वेळ येऊन मरणभीती दृष्टीपुढे आली कीं ते घाबरून जातात; त्यांचें धैर्य सर्वस्वी सुटते. रोगराई, अग्निप्रलय, बंदिवास हे घोर प्रसंग कांहीं आम्हां मानवांस अपूर्व नव्हत. आमच्या डोळ्यांदेखत नेहमी घरे पडून त्यांखालीं मनुष्ये सांपडून प्राणांस मुकत आहेत. अग्निप्रलय होऊन त्यांत शेकडा मनुष्यांच्या आहुती पडत आहेत. त्याचप्रमाणे मृत जनांचे प्रेतदहनादि अंत्यविधि सर्वत्र होत आहेत. ज्या मनुष्यासमवेत मीं गत रात्रीं भोजन केलें, तो दुसरा दिवस उजाडण्यापूर्वी मरण पावतो. अशा प्रकारे सर्वत्र मनुष्यघात होत असता, मजवर मरण प्रसंग आला तर त्याबद्दल म्या कां म्हणून कष्टी व्हावें बरें? हा प्रसंग मजवर अवचित आला आहे; माझ्या हा ध्यानींमनीही नव्हता असें कोणी म्हटले असतां शोभेल काय? असें जो म्हणेल तो शुद्ध वेडा समजावयाचा. या संसारांत वित्ताची शाश्वती मुळींच नाहीं. तें केव्हा नाश पावून विपन्नावस्था प्राप्त होईल याचा बिलकूल नेम नाहीं. आज आपण राजकृपेनें थोर पदास चढलो असलो तरी उदयीक त्याच राजाची अवकृपा होऊन सर्व प्रकारें अपकीर्ति व तिरस्कार यांस आपणांला पात्र व्हावें लागेल; व प्रसंगवशात् स्वदेशत्यागही करावा लागेल. एकादे मोठे बलाढ्य राष्ट्र असलें तरी तें परकीयांच्या हाती जाऊन, त्याचा समूळ नायनाट होईल. जो राजा आपल्या अधिकाराच्या व ऐश्वर्याच्या मदाने आज गुंग झालेला असतो, तो कालचक्र फिरले असतां पदच्युत होऊन सामान्य मनुष्याप्रमाणे देहांत शासनास पात्र होईल. आज जें वैभव एकास प्राप्त झालें आहे. तें उद्या दुसऱ्याच्या हातीं जाऊन, पहिला अगदीं कंगाल स्थितीस जाऊन पोचेल. यासाठीं सुज्ञ जनांनीं या संसारांत पदोपदी संकटे प्राप्त होतील हें ध्यानांत वागवून स्ववर्तनक्रम ठेवावा. असें केल्याने त्या संकटाचे घोर स्वरूप पुष्कळ कमी होऊन ती प्राप्त झाली असतां, मनुष्य घाबरून जाणार नाहीं.

भाग चौदावा

आमचें सौख्य किंवा विपत्ती सत्य किंवा असत्य वस्तुज्ञानावर अवलंबून असते

पुष्कळ गोष्टी अशा असतात कीं, त्यांच्या असत्य कल्पना अज्ञानदशेमध्यें आपल्या ठायीं उद्‌भवल्या असतां आपणांस त्या भयंकरशा भासतात. परंतु त्याच, सत्यज्ञानरूप सूर्याच्या उदयाने अज्ञानतमाचा निरास झाला असतां, केवळ यःकश्चित् आहेत असें प्रत्ययास येऊन, आपल्या वृथा भीतीचे आपणांस हसू येतें. एकाद्या गोष्टीबद्दल शीण प्राप्त झाला असता, किंवा साक्षात मरण आलें असतां, त्यांत भीती बाळगण्यासारखे काहीएक नसतें. त्यांची कल्पना जितकी भयावह असते, तितकी तीं साक्षात् प्राप्त झाली असतां भयंकर नसतात. तेव्हां अर्थात् असें कीं, हे प्रसंग खरोखरीच मोठे कठीण असतात. म्हणून आपणांस त्यांची भीती वाटत असते असें कोणी समजू नये. तर प्रथमतः आपल्या चित्तांत त्याविषयीचे भय उद्‌भवतें म्हणून ते आपणांस इतके कठीण आहेतसे भासतात. सर्व प्रकारचे क्लेशा व इतर प्रतिकूल दैवयोग यांसंबंधानें आपल्या चित्तांत जें भय उत्पन्न होत असतें, तें मुलांस वाटणाऱ्या बागुलबावाच्या भीतीसारखे आहे. त्यांमुळे आपली व्यर्थ गाळण मात्र होते. परंतु त्यांपासून साक्षात् पीडा अशा अगदीं बेताचीच होते. हरएक बाबतींत आपलीं मी मतें होतात, तीं आपणांस इतर जनांकडून प्राप्त झालीं असून, तीं केवळ सत्य आहेत असें गृहीत धरून आपण वर्तत असतो. याप्रमाणे केवळ संगतिदोषास्तव आपण भ्रमांत पडतो. आपणांस असें वाटत असतें कीं, जी गोष्ट पुष्कळांस मान्य असते, ती उत्तम असावयाची. यामुळे आपण हरएक गोष्टीचें भलतेंच स्वरूप चित्तांत वागवीत असतो. तिचे वास्तविक स्वरूप काय आहे तें स्वत: शोधून पाहण्याची बुद्धी आपणांस होत नसते. तर लोकांत प्रचलित असलेल्या मतांवर आपण निर्वाह करीत असतों. म्हणूनच आपणांस धन, लौकिक व अधिकार ही मोठीं स्पृहणीय आहेत असें वाटतें. वस्तुतः पाहता त्यांत कांहींच अर्थ नसतो. ही ज्यास प्राप्त झाली असतात, त्यांचा मान व प्रशंसा करण्याकडे आपली प्रवृती असते; आणि हा आपला भ्रामक अभिप्राय आपण प्रसिद्धपणें बोलून दाखविण्यासही उद्युक्त होतों. अशामुळे तो सर्वत्र प्रसृत होतो. खरें म्हटले असतां, अत्यंत मोठ्या व अत्यंत लहान गोष्टींचे यथावत् आकलन होणे मोठे कठीण असतें. पुष्कळ गोष्टींचे आपणांस यथार्थ ज्ञान नसल्यामुळें त्या आपण फार मोठ्या आहेत असें मानितों. त्याचप्रमाणें दुसऱ्या कित्येक गोष्टी खरोखरीच मोठ्या महत्त्वाच्या असतात. परंतु त्या आपण भ्रमाने अगदीं क्षुल्लक आहेत असें समजतो. या क्षुद्र गोष्टींची परवा फक्त क्षुद्र वृत्तीच्या जनांस वाटत असते. ज्या संकटप्रसंगाचें आपणांस इतकें भय वाटत असते, ते वस्तुतः पाहता भयंकर नसतात. परंतु आपल्या चित्ताच्या दुर्बलतेमुळें आपणांस ते तसे भासतात. ज्या गोष्टी आपण ऐकत आलों असतो, त्यांचाच फक्त विचार आपल्या मनांत घोळत असतो. त्यांची प्रत्यक्ष अशी प्रतीती आपणास मुळीच आलेली नसते.

त्याचप्रमाणे त्यांचें वास्तविक स्वरूप काय आहे तें स्वत: शोधून तपासून पाहण्याची, किंवा त्यांविषयीं वादप्रतिवाद करून त्यांची शहानिशा करण्याची खटपट आपण करीत नसतो. यामुळे एक तर असें होतें कीं, आपण भयचकित होऊन हातपाय गाळून बसतो; किंवा नुसत्या भीतीमुळेच कधीकधी नसतें संकट ओढवून घेतो. मनुष्याचें मन व शरीरही बिघडल्यामुळे त्यास सर्वच गोष्टी असह्य वाटूं लागल्या तर त्यांत कांहीं नवल नाही. याप्रमाणे कोणतीही गोष्ट असह्य वाटली तरी ती वास्तविक तशीच आहे असें म्हणणें रास्त होणार नाहीं. तर आपण बदफैल किंवा मूढ असतो, म्हणून आपणांस अशीं सदोष दर्शनें होतात. या भ्रांतीस आपण इतके वश होतों कीं, तेणेंकरून विकारमूलक भ्रमिष्टपणात व या भ्रमिष्टपणांत फारसें कांहीं अंतर आहेसे दिसत नाही. या दोहोंमध्ये भेद इतकाच असतो की, एक भ्रमिष्टपणा रोगामुळे उद्‌भवतो, आणि दुसरा सामान्य जनांत प्रचलित असलेल्या भ्रामक मतांमुळे उद्‌भवतो.

प्रत्येक मनुष्याने प्राप्त स्थितींत उत्तम प्रकारें वर्तन करावे

स्टोइक लोकांचे असें मत आहे कीं, ज्या पीडांच्या योगाने आम्ही मानव खेद व आक्रोश करितो, त्या वस्तुतः पाहता क्षुल्लक व तुच्छ असतात. हा त्यांचा सिद्धांत अत्यंत उदात्त आहे. परंतु तो लक्षांत न आणितां सामान्य जनरीतीस अनुसरून या मुद्याचा आपण विचार करू. कोणतीही दुर्वह स्थिती प्रत्यक्ष अनुभवास येण्यापूर्वी तीविषयी खिन्न होऊन बसणें इष्ट नव्हे. कारण ज्या गोष्टी आपणांस लवकरच प्राप्त होण्याचा संभव असतो, त्या प्रसंगविशेषी कदाचित् मुळीच घडून येत नसातात. कांहीं गोष्टींपासून आपणास वाजवीपेक्षा अधिक त्रास होतो. कांहीं गोष्टींपासून तर वास्तविक जेव्हां त्रास व्हावयाचा त्यापूर्वीच तो भासू लागतो. दुसऱ्या कित्येक तर अशा गोष्टी असतात कीं, त्यापासून वस्तुतः पाहता मुळींच त्रास होऊं नये. पण त्या मोठ्या त्रासास कारण होतात. तेव्हां तात्पर्य काय कीं, ज्या अनिष्ट गोष्टीनी आपलें चित्त अस्वस्थ होतें, त्या एक तर वास्तविक असतात त्यापेक्षा फार मोठ्या आहेत असें आपण मानितों, किंवा त्या नसत्याच कल्पून कष्टी होतों, किंवा त्या पुढे कधीं काळी घडल्या तर घडावयाच्या असें असून, आजच त्यांमुळे चित्त शोकाकूल होऊं देतो. याला उपाय मिळून इतकाच कीं, कोणत्याही गोष्टीविषयी आपण ठाम मत करून बसू नये. आपण जी गोष्ट अगदीं क्षुल्लकशी मानितों, तीच दुसऱ्या मनुष्यास केवळ असह्य वाटण्याचा संभव आहे. एकादा मनुष्य असा असतो कीं, त्याला फटके मारिले तरी तो खदखदा हसत असतो. दुसरा एकादा असा असतो कीं, त्याला थोडसा देखील वाक्‌प्रहार सोसत नाहीं; कठोर भाषणामुळे तो अगदीं कष्टी होतो. एका मनुष्यास दारिद्र्य हें मोठे असह्य संकट वाटतें; तेंच दुसऱ्या मनुष्यास इष्ट वाटतें. त्याचें त्यास कांहींच वाटत नाहीं. कारण तो असें मानितो कीं, जो मनुष्य गरीब असतो, त्याला नुकसानाची भीती मुळीच नसते; आणि ज्याला अंतर्यामींच्या सुखाचा अनुभव घ्यावयाचा असतो, तो लोकदृष्टीनें सर्वदा दरिद्रीच असावा लागतो. कांहीं लोकांना आजार व दुःखही प्राप्त झाली असतां पराकाष्ठेचा खेद वाटतो. त्याचप्रमाणें एकाद्यास स्वदेशत्यागाची शिक्षा झाली असतां परम दुःख वाटतें. परंतु दुसऱ्यास तीविषयीं कांहींच वाटत नाही. आरोग्यासाठी किंवा मौजेसाठी किंवा धंद्यासाठीं स्थलांतर करणें व देशत्याग करणें यांत त्याला फारसा भेद वाटत नाहीं. एका मनुष्यास मृत्यू अतिशयित भयावह वाटतो; तोच दुसऱ्याला महाहितकर निसर्गसिद्ध नियम वाटतो. मग तो मृत्यू कोणत्याही वयांत किंवा कोणत्याही स्थितींत आला

तरी त्यामुळे तो यत्किंचित्ही कष्ट पावत नाहीं. मृत्यू प्राप्त व्हावा अशी तर कित्येक इच्छासुद्धां करितात. दुसऱ्या कित्येकांना तो प्राप्त झाला असतां, ते पुष्कळ असह्य विपत्तीपासून मुक्त होतात. आणि तो सर्वास निश्चयानें प्राप्त व्हावयाचा. त्यापासून कोणीही कदापि सुटणें नाही. दुर्वह दास्यामध्यें रखडत असणारा मनुष्य मृत्यूच्या योगाने बंधमुक्त होतो: आणि ज्याला स्वदेशत्याग करावा लागतो, त्याला तर निजधाम प्राप्त झाल्यासारखे होतें. त्याचप्रमाणें एकंदर मर्त्यजन ऐहिक संबंधाने कितीएक उच्चनीच व सुखदुःखयुक्त असले तरी मृत्यूच्या संबंधाने त्यांची स्थिती समानच असते. तो त्याला खात्रीने प्राप्त व्हावयाचा. या जीविताचा केव्हातरी अंत व्हावा यांतच सौख्य आहे. कारण हें जीवित नियमाबाहेर दीर्घ झालें असता, त्यापासून मनुष्यास विपत्तीचाच अनुभव घडतो. या मानवी संसारामध्ये दुसऱ्यावर नाहक जुलूम करणारे पाषाणहृदय प्रमत्तजन, नाना प्रकारचे असह्य छल, दुर्वह विपत्ती, महाघोर संकटे ही जेव्हां माझ्या दृष्टीस पडतात तेव्हां मी आपल्या चित्ताचें असें समाधान करीत असतो कीं, मला मृत्यू प्राप्त होऊन या सर्व अनिष्टांपासून मी मुक्त होईन. सारांश काय कीं, या संसारातील सर्व अनिष्टांस मृत्यू हाच एक उपाय आहे.

आपण वृथाभिमानी व दुष्ट असतो. तथापि आपण तसे खरोखरीच आहो असें आपणांस वाटत नसतें

आपण मोठे लोभी व महत्त्वाकांक्षी असतो. तथापि या दुर्गुणांविषयीं आपली कांहीं केल्या खात्री होत नसते. आपल्या ठायींच्या दोषांसंबंधाने आपण नेहमी अंध असतो. या दोषांतून मुक्त होण्याचा आपणांस कोणी मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केल्यास त्याची आपण परवा करीत नाहीं. यामुळे आपण केवळ भ्रांतिष्टाप्रमाणे इतस्ततः भ्रमण करीत असतो. ज्याला आपण आजारी आहो असें कधीं वाटतच नाहीं, त्याला बरा करणें मोठे कठीण काम आहे. या संसारामध्यें कोणीतरी मार्गदर्शक अवश्य लागतो. पण अशा गुरूचा आश्रय करण्यास आपणाला लज्जा वाटत असते. आणि आपला समज असा झालेला असतो कीं, आपलें शिकण्याचे वय गेलें. परंतु अशा लोकांनी नित्य ध्यानांत वागवावें कीं, सदाचारापेक्षां दुराचाराकडेच मनुष्याची प्रवृत्ती फार. या करितां दुराचाराचा त्याग करून सदाचार शिकण्याविषयीं सर्वदा तत्पर असावें. एका अनिष्ट गोष्टीचा आपण आश्रय केल्यानें तिच्यामागून दुसरी आपल्याकडून घडण्याचा संभव असतो; आणि ज्या गोष्टींच्या योगानें आपणास पीडा होते, त्या मात्र टाळण्याविषयीं आपण प्रयत्न करितो. एकादी गोष्ट आपण प्रारंभी मोठी महत्त्वाची आहे असें मानून, ती प्राप्त करून घेण्याच्या खटपटीस लागतो. पण ती प्राप्त झाली असतां, तिचें महत्त्व पूर्वी वाटलें तितके मुळींच नसून, ती केवळ क्षुल्लक आहे असें आपणांला वाटतें. कोणत्याही सुखावह गोष्टीचा आपणास कितीही अनुभव घडला तरी तीविषयीं आपण अतृप्त असतो, अशी जी सामान्य जनांची समजूत आहे ती व्यर्थ होय. या अतृप्तीची वास्तविक मीमांसा अशी आहे कीं, ती सुखावह गोष्ट आपणांस अगदीं क्षुल्लक व लहान वाटते, म्हणून तिच्या प्राप्तीनें आपलें समाधान होत नाहीं. जी गोष्ट आपणांस दुरून मोठी प्रचंड वाटते, तीच संनिध आली असतां अतिक्षुद्र वाटते. तेव्हां तात्पर्य काय की, आपणांस खऱ्या वस्तुस्थितीचे ज्ञान नसतें, म्हणून केवळ लोकप्रवादामुळें आपण भ्रांत होतों. एकादी गोष्ट साक्षात् प्राप्त झाली असतां, ती आपणांस एक तर अनिष्ट किंवा व्यर्थ वाटते, अथवा कदाचित् आपल्या अपेक्षेहून कमी किंवा जास्त योग्यतेची असते: अथवा ती फार मोठी असली तरी तितकी चांगली नसते.

भाग पंधरावा

मित आहारविहारांपासून उद्भवणारें सौख्य

आम्हांस ज्या वस्तूंची गरज असते, त्या स्वस्त किंवा फुकट मिळाव्या अशी व्यवस्था सृष्टीमध्यें दिसून येते. पोट आपल्या पाठीस लागलें आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि त्याची तृप्ती थोडक्यांत होण्यासारखी असते. थोडीशी भाकर व पाणी ही मिळाली म्हणजे त्याची गरज भागते. याहून अधिक जे उपभोगाचे पदार्थ ते केवळ व्यर्थ होत. जो विवेकशुद्ध रीतीनें वर्तत असतो, त्याला दारिद्र्य असें कदापि प्राप्त व्हावयाचें नाहीं; आणि जो कल्पनावश होऊन या संसारामध्ये आयुष्यक्रमण करण्यास प्रवृत्त होतो, त्याला सुबत्ता कधींच प्राप्त होणार नाहीं. कारण हा निसर्ग मर्यादित असून, आपल्या मनाची धाव अमर्याद असते. अन्न, वस्त्र व राहण्यास लागणारी जागा ही बेताची असली म्हणजे आपल्या देहाच्या गरजा भागतात. यासाठीं मनुष्यांनीं याहून जास्त मिळविण्याची व्यर्थ हाव न धरितां नैसर्गिक गरजांपुरतीच खटपट केली तर त्यांचा चरितार्थ चालण्यास मुळीच अडचण पडणार नाहीं. ऐषआरामाच्या व इतर निरर्थक पदार्थांच्या संपादनासाठी फारच दगदग करावी लागते. नुसती नैसर्गिक गरजापुरतीच आपण खटपट करावयाची असा निर्धार केल्यावर आपणांस नाना कलाकुसरी शोधून काढण्याकडे बुद्धीचा उपयोग करण्याची मुळीच गरज पडणार नाही. वस्तुतः पाहता आपल्याठायीं अभिमान व नवीन गोष्टींविषयीची आवड या दोन वृत्ती असल्याकारणानें आपणांस नाना संकटे सोसावी लागतात. बहुमोल वस्त्रें व नाना प्रकारचे उंची सामानसुमान व भाडेंकुडें, पुष्कळ चाकरमाणसें, निरनिराळ्या राष्ट्रांतून सांपडणारे उत्तमउत्तम सुखोपभोगाचे पदार्थ यांशिवाय मनुष्यास सौख्याचा अनुभव घडेनासा झाला असतां, त्याची यांसंबंधानें इच्छातृप्ती झाली नाहीं तर त्यांत दैवाला दोष देत बसणे योग्य नव्हे. यांत त्याचाच अपराध आहे, असें समजावे. कारण अशा वृत्तीच्या मनुष्याचे मनोरथ कदापि पूर्ण होणारे नसतात. हे अनावर मनोरथ केवळ रोगरूप होत. यांच्या पायीं सर्व जग प्राप्त झालें तरी तो कंगालचा कंगाल राहतो. मनुष्याचे मनच मनुष्यास संपन्न व सुखी करते; मग आपण कोणत्याही स्थितीमध्ये असलो किंवा आपली कशीही ऐपत असली तरी तीबद्दल आपणांस कांहींएक वाटावयाचें नाहीं. हाच भाव भर्तृहरीच्या पुढील वचनांत मोठ्या सुंदर रीतीनें व्यक्त केला आहे:-

वयमिह परितुष्टा वल्कलैस्त्वं दुकूलैः
सम इह परितोषो निर्विशेषोऽवशेषः ।
स तु भवति दरिद्रो यस्य कृष्णा विशाला
मनसिच परितुष्टो कोऽर्थवान्को दरिद्रः ।।*

---

* लक्ष्मीने जरि तुष्ट तूं बहु सुखी मी वल्कलाने असें दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे आशा ज्यास दरिद्र तोचि समजे नैराश्य पै बाणता भाग्याचा नर कोणता मग बरें निर्भाग्य तो कोणता. वामन.

आपण सुनीतिमंडित असलो म्हणजे पुरे. बहुमोल अलंकार किंवा वस्त्रे यांची मातबरी सद्‌गुणापुढे मुळींच नाहीं. विषयोपभोगाची इच्छा आणि लोभ यांच्या पायी दारिद्र्य कष्टप्रद वाटतें. वस्तुतः पाहता क्षुधा, तृषा आणि शीत यांचें निवारण करण्याची साधने आपणांस उपलब्ध असली म्हणजे आपण अधिकांची इच्छा धरू नये. ही इच्छा केवळ व्यर्थ व अप्रयोजक आहे. देशोदेशी उत्पन्न होणारे ऐषआरामीचे पदार्थ, किंवा सूपशास्त्रप्रवीण स्वयंपाकी यांची काहीएक गरज नाहीं. जो अशा निरर्थक वस्तूंचा अव्हेर करितो, किंवा जो त्यांच्या प्राप्तीविषयीं मुळीच उद्योग करीत नाहीं, त्याला कोण दरिद्री म्हणेल बरें? उलट असे मात्र म्हणतां येण्यासारखे आहे कीं, अशा रीतीनें जे दगदग करीत नसतात, ते सुखी व निरोगी राहतात; आणि त्यांचें मन स्थिर व शांत असतें.

पूर्वकाळच्या लोकांचे आहारविहार मित असत

पूर्वकाळचे लोक मोठे ऐपतदार होते. तरी त्यांच्यापाशी चाकरमाणसांचा परिवार फारच बेताचा असे. त्यांना डामडौलाचा पुरा वीट असे. उगीच भपका व थाटमाट करण्याचें त्यांच्या मनांत कधींही येत नसे. त्यांचे आहारविहार बेताचे असून, त्यांची राहण्याची पद्धती फारच साधी असे; आणि त्यांचें आचरण अतिशयित शुद्ध व साधे असे. जाडीभरडी भाकर आणि स्वच्छ पाणी एवढीच पूर्वकाळच्या मिताहारी मनुष्यांस प्राप्त झाल्याने त्यांस मोठी मेजवानी मिळाल्यासारखे वाटे. शेतांतून व परसातून उगवणारा झाडपाला त्याला मोठा पौष्टिक वाटे. चांगलींचांगलीं मिष्टान्नें आणि सुगंधी द्रव्यें यांची इच्छा आमच्या प्राचीन पूवर्जास मुळींच नसे. तर आपलें आचरण शुद्ध असावे; आपले सर्व व्यवहार प्रामाणिकपणाचे असावे; आणि आपल्या हातून मोठमोठी शौर्याची व मर्दुमकीची कामे व्हावी, याविषयी ते सर्वदा दक्ष असत.

शांतीचा काळ

जेव्हां निसर्ग सर्वांस सारखा अनुकूल असून त्यापासून उत्पन्न होणाऱ्या फलांचा अनुभव सर्वांस समान होत असे, तेव्हां कोणी कोणाचा हेवा करीत नसे, किंवा कोणाच्या ठायीं लोभ वसत नसे. या निसर्गस्थितीमध्ये कोणीही श्रीमंत किंवा गरीब नसे. सर्वांचीच स्थिती सारखी असे. परंतु पुढें ही निसर्ग सिद्ध निःपक्षपाताची आबादानी लोभी मनुष्यांच्या खटपटीने नाहींशी होऊन, ज्या गोष्टी सर्वास सारख्याच प्राप्त होत असत, त्या कांहीं मनुष्यांनीं बळकावून आपल्याशा करून टाकिल्या, तेव्हां या जगामध्यें दारिद्र्याचा प्रादुर्भाव झाला. आपणांस इतराहून अधिक अर्थप्राप्ती व्हावी असा मनुष्यास लोभ सुटला तेव्हां ही दरिद्रावस्था जगांत प्रकट झाली. याप्रमाणे पूर्वींच्या साध्या व समतेच्या स्थितीचा लोप झाला हें मनुष्यजातीचें मोठेच नुकसान झालें आहे. हें नुकसान कदापि भरून यावयाचे नाहीं. कारण सांप्रत आपणांस केवढीही संपदा अनुकूल असली तरी पूर्वी सर्व कांहीं निसर्गसिद्ध वस्तूंवर आपला हक्क असे; तेव्हां त्यापुढे ती कांहींच नाहीं. पूर्वकाळीं या पृथ्वीवर उत्पन्न होणारे सर्व पदार्थ एकंदर भूलोकवासी जनांस अशा रीतीनें वाटले जात असत कीं, त्यांस कशाचीही ददात नसे, किंवा त्यांस कोणतीही वस्तू अधिक प्राप्त होत नसे. जोपर्यंत मनुष्य या स्थितीमध्यें समाधान मानून होता, तोपर्यंत त्यास कोणापासून त्रास किंवा जुलूम सोसावा लागत नसे कोणी कोणाच्या सुखास व्यत्यय करीत नसे. तर सर्व जण परस्परांच्या सुखसमाधानास मनापासून झटत.

यामुळे त्यांस एकमेकांशी भांडण्याची किंवा रक्तस्त्राव करण्याची मुळीच गरज पडत नसे. ते एकाद्या वनाच्या किंवा गुहेच्या आश्रयाने राहून निश्चिंतपणे व सुखाने आपले आयुष्य क्रमीत असत. ते कोणाचा घातपात करीत नसत. म्हणून त्यांस कोणाची भीती वाटत नसे. ते आपआपल्या ठिकाणी सुरक्षित असत. त्या काळी परांच्या गाद्या, सुवर्णेरत्नादिकांचे अलंकार किंवा इंद्रियतृप्तीचे विषय उपलब्ध नव्हते; आणि या सुखविषयांपासून उद्भवणारे अनर्थ व संताप ही त्या वेळीं अनुभवास येत नसत. सृष्टिगत सौंदर्याचे अवलोकन करून, व सृष्टीत आयत्याच प्राप्त होणाऱ्या सुखावह वस्तूंचा अनुभव घेऊनच त्यांस सुख व समाधान वाटत असे. आकाशांतील तारे व नक्षत्रे आणि सृष्टींतील इतर व्यापार यांचें अवलोकन करून त्यांविषयीं ते पुनःपुनः मनन करीत. त्यांला रहावयास मोठमोठ्या हवेल्या नसत. ते शुद्ध उघड्या हवेमध्ये रहात असत. ते निर्मल निर्झरांचे उदक प्राशन करीत. वृक्षांच्या शीतल छायेखाली बसून ते सूर्यतापाचे निवारण करीत. सभोवतालच्या हिरव्यागार कुरणांची व घनदाट अरण्यांची शोभा ते नित्यशः पाहून सुख पावत. अगदीं साध्या झोपड्यांत किंवा पर्णकुटिकांत ते सुखाने रहात. त्याला कोणापासून उपद्रव किंवा कांहीं नुकसान होईल याची भीती मुळीच नसे. त्याला कशाचीही निवंता नसे, आणि त्यांस कोणाला फसविण्याची इच्छा होत नसे. सोने, रुपे, किंवा रत्ने यांच्या लोभाने ते त्या काळी पृथ्वीच्या पोटांत खोलवर खणू लागले नव्हते. एकमेकांचा प्राण घेण्याची बुद्धि त्यांस कोणत्याही कारणानें होत नसे. कारण त्यांस कोणाचा त्रास किंवा भीती मुळीच वाटत नसे.

सृष्टीमध्ये ज्या वस्तू सहज रीतीने प्राप्त होण्याजोग्या असतात, त्यांपासून आपले हित होण्यासारखे असते. परंतु ज्या वस्तू कष्टाने प्राप्त होण्यासारख्या असतात, त्यांमुळे आपले नुकसान होते. सोने, रुपे, रत्ने आदिकरून वस्तू जे जन बहुमोल मानून, त्यांविषयी मोठा हव्यास धरितात, त्याला परस्परांशी कलह व युद्धे करावी लागतात. तेव्हां तात्पर्य काय की, आम्ही मनुष्यांनीच आमच्या संकटांची व दुःखाची ही कारणे आणि साधने जमिनीतून मुद्दाम खणून काढली आहेत. ज्या वस्तू निसर्गतः अगदी हलक्या प्रतीच्या आहेत, त्यांस आम्ही अतिशयित उच्च प्रतीच्या समजतो, हा आपला मोठाच भ्रम समजावयाचा. या सुवर्णादि वस्तू खाणीतून खणून काढिल्या असता अशोधित स्थितीमध्ये त्या अत्यंत ओबडधोबड दिसतात, त्यांची तर अगदीच हीन व घाणेरडी स्थिती असते. दुसरे असे की, या वस्तूंच्या योगाने देहापेक्षा मनाचाच बिघाड अधिक होतो.

मित आहारविहार करणारा मनुष्य सुखी असतो

जो मनुष्य केवळ क्षुधाशमनापुरतेच अन्न भक्षण करितो. आणि तृषाशांतीपुरते उदकादि प्राशन करतो, जो अन्य लोक कसे वर्तन करितात ते न पाहता, केवळ विवेकाने वर्तत असतो, आणि जो उपयोगाच्या व जरुरीच्या तेवढ्याच वस्तू मिळविण्याविषयी प्रयत्न करीत असून, डामडौल व थाटमाट यांचा विचार ज्याच्या मनात येत नसतो, तो मनुष्य धन्य होय. आपण आपल्या वासनांचे दमन करून आपल्या ठायी व इतरांच्या ठायी सद्गुणवृद्धि होईल असे वागले पाहिले. द्रव्यप्राप्तीसाठी दैवावर हवाला ठेवणे मुळींच रास्त नव्हे. आपल्या स्वतःच्या उद्योगानें जें कांहीं प्राप्त होईल तेवढ्यापुरत्याच आपल्या गरजा मर्यादित केल्यानें आपलें हित आहे. माझें अन्न, वस्त्र, बिछायत वगैरे साधी व स्वच्छ असावी. तीं पैदा करण्यास फारच

थोड्या जनांचे साहाय्य लागावे, आणि त्यामुळें मला फारशी दगदग होऊं नये किंवा मला फारसा खर्च येऊ नये. ज्या वस्तूंच्या योगानें विषयोपभोगतृष्णा शांत होण्यासारखी नसते, त्या वस्तुतः पाहता मनुष्याच्या नैसर्गिक गरजा पुरविण्यास अगदीं बस असतात. खाणे व पिणें यांचा हेतू मिळून इतकाच आहे कीं, त्यांच्या योगाने आपल्या क्षुधा व तृषा तृप्त व्हाव्या.

ज्ञानीजन इतरांस उपदेश करितात त्याप्रमाणें त्यांनी सर्वदा वर्तन करावे

सामान्य जनांचा साधारणतः असा एक मोठा अपवाद असतो की, तत्वज्ञजन इतरांस उपदेश करितात त्याप्रमाणें ते स्वतःचें वर्तन ठेवीत नसतात. कारण व्यवहारात असें आढळून येतें कीं, ते आपल्याहून अधिकारादिकांनी श्रेष्ठ अशा जनांची हांजीहांजी करितात. ते धनार्जनाचा हव्यास धरितात. वित्तनाश किंवा मित्रवियोग झाला असतां त्यांच्या मनांत इतर जनांप्रमाणें दुःख व चिंताही उत्पन्न होतात. त्यांची कोणीं निंदा केली असतां, त्यांला फार वाईट वाटतें. त्यांचें खाणेंपिणें, वस्त्रप्रावरण, घरदार, बागबगीचे, चाकरप्यादे इत्यादि मोठी थाटमाटाची असतात. हें कांहीं चांगले नव्हे. अशा जनांनीं आत्मपरीक्षण करून स्वतःस पदोपदी दोष देऊन सन्मार्गापासून च्युत न होण्याविषयी जपावें हें चांगलें. म्हटले आहे:-

न स्वल्पमप्यध्यवसाय भीरोः
करोति विज्ञाननिधिर्गुण हि ।
अंधस्य कि हस्ततलस्थितोऽपि
प्रकाशयत्यर्थमिह प्रदीपः ।। * सु. र.

स्वतःचे आचरण अगदीं शुद्ध राखितां आलें नाही तरी तें होईल तेवढे चांगलें करण्याविषयी अहर्निश झटावें हें योग्य होय. त्याला आपल्या वासनांचे सर्वस्वीं दमन करितां आलें नाहीं तरी त्यांस होईल तेवढा प्रतिरोध करून, त्यांचा अंमल साधेल तेवढा कमीकमी करीत जावे. आतां सामान्य जनांनी हें लक्षांत वागविले पाहिजे कीं, ज्ञानी पुरुष स्वतःच्या उपदेशाप्रमाणे वर्तत नसला तरी तो सदाचारासंबंधांचा बोध करीत असतो. त्याचप्रमाणें इतरांच्या अंगचे दुर्गुण पाहून असें त्याला वाईट वाटतें, तसेंच ते दुर्गुण स्वतःच्याठायी पाहून त्याला वाईट वाटत असतें. आजपर्यंत जे मोठेमोठे ज्ञानी पुरुष होऊन गेले, त्यांच्या संबंधाने त्यांच्या वेळच्या जनांनी असाच अपवाद घेतला होता. जगाची साधारणतः अशी रीत आढळते कीं, कोणी कितीही सद्गुणी असला तरी त्याच्यावर इतर जन कांहीं ना कांहीं दोषारोप करून त्याची निंदा करितात. परंतु अशा निंदकाच्या संबंधाने तुकाराम पुढील उद्गार प्रगट करितो:-

निंदक तो परउपकारी । काय वर्णू त्याची थोरी
जो रजकाहूनि भला परी । सर्व गुणें आगळा
नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरी देखा
करीतसे साधका । शुद्ध सरते तिही लोकां

---

* भ्याड मनुष्यापाशीं ज्ञानाचा केवढाही साठा असला तरी त्याचा कांहींच उपयोग नाहीं. आंधळ्याच्या हाती दिवा दिला तरी त्याचा प्रकाश त्याला काय होय?

डेमिट्रियसनामेंकरून एक तत्वज्ञ होता. तो मोठा वैराग्यसंपन्न असून, त्यानें आपल्या देहाचे दंडन अनेक प्रकारीं केलें होतें. तो आपल्यापाशीं कोणत्याही प्रकारचे वित्त बाळगीत नसे, किंवा कोणापाशीं कोणत्याही वस्तूसाठी याचना करीत नसे. असें असतां त्याच्या वेळचे लोक म्हणत कीं, हा आपला दारिद्र्याचें प्रदर्शन करण्यांतच मोठे भूषण मानितो. याला सदाचरणाची चाड मुळींच नाहीं. एवढा मोठा तत्वज्ञ प्लेटो, पण तो लोकांकडे पैसे मागत असे, असा त्याच्यावर आरोप असे. आणि आरिस्टॉटल तर लोकांकडून पैसे घेत असे असा जनप्रवाद होता. डिमॉक्रिटस पैशाची मुळीं परवा करीत नसे असा त्याच्यावर जनापवाद असे. एपिक्युरस तर सांपडलेला पैसा खाऊन फन्ना करी, असें लोक म्हणत. परंतु ह्या महापुरुषांच्या ठायीं जे महागुण होते, त्यांचें अनुकरण आम्हास कदापि होणें नाहीं. अशा महाजनांचे दोष काढीत बसण्यापेक्षां स्वतःची स्थिति कशी काय आहे, तें ध्यानांत आणून ती सुधारण्याविषयी प्रयत्न केल्यास पुष्कळ हित होण्यासारखे असतें. परंतु ज्याप्रमाणें कोणी आपल्या घरास आग लागली असतां मद्याच्या दुकानांत किंवा तमाशा पाहत बसून मौज मारितो, व आपले नुकसान किती झालें तें त्याच्या मुळीं गांवींही नसतें, तद्वत् आमची अवस्था असते. आमचे वर्तन किती दुष्ट असतें व त्यामुळे आमचे किती अहित होत असतें, याचा आम्हांस मुळींच सुमार नसतो. महाजनांचा दुर्लौकिक पसरविण्यांत आम्हांस मुळीं क्षिति वाटत नसते. अशा वृत्तीच्या जनांस पुढील सुभाषितांत उत्कृष्ट बोध केला आहे:-

यदि परगुणा न क्षम्यन्ते यतस्व गुणार्जने
न हि परयशो निन्दाव्याजैरलं परिमार्जितुम ।
विरमसि न चेदिच्छाद्वेषप्रसक्तमनोरथः
दिनकरकरान्पाणिच्छत्रैर्नुदञ् श्रममेष्यसि ।।*

जे आपलें वर्तन सुधारून नीतिमान् होण्याविषयी अहर्निश प्रयत्न करितात, ते जर लोभी, महत्त्वाकांक्षी किंवा बदफैल आहेत असें जन म्हणतात, तर सदाचाराचे नुसतें नांव काढलें तर ज्यांना तिटकारा वाटतो, त्यांची स्थिति कशी काय असावी बरे? आपल्याहून जे जन विशेष प्रामाणिक असतात, त्यांची निंदा करण्यास मत्सरी लोक सर्वदा तरबेज असतात. लहान कुत्रे जसे वाटसरांवर मनमुराद भुंकत असतात, तद्वत् सामान्य जन थोर पुरुषांवर तोंड टाकीत असतात. हा त्यांचा नेहमीचा परिपाठच आहे. कारण दुसऱ्यांच्या ठायीं सद्गुण दिसल्यानें त्याला आपल्या दुष्टत्वाबद्दल आपली फजिती झाल्यासारखें वाटत असतें. जे खरोखरीच चांगले आहेत, त्यांची वाखाणणी करणें हें आम्हा पामरजनांस उचित होय. अशांची स्तुति करण्यांत आपणांस कांहीं अर्थ वाटला नाहीं तर त्यांविषयीं कांहींच बोलूं नये हें बरें. सदाचारी पुरुषाची निंदा करून पापसंग्रह करण्यांत काय अर्थ आहे?

मोठी संपन्नता असली तरी काटकसर करणें इष्ट होय

दुसऱ्यांच्या आहारविहारांवर टीका करून, त्यांस ते नियमित करण्याविषयी उपदेश करण्यास आपण सर्वदा तत्पर असतों, परंतु आपले स्वतःचे आहारविहारादि मित राखून, आपल्या वासनांचे दमन करण्यास

* परगुण तुझ्याने पाहवत नसले तर स्वतः गुण संपादण्याचा प्रयत्न कर. निंदा व व्याजस्तुति यांच्या योगाने परक्यांची कीर्ति नष्ट होणारी नव्हे. ती करण्याचें तूं सोडणार नाहीस तर इच्छा व द्वेष यांहींकरून उद्भवणाऱ्या मनोरथांनी युक्त होत्साता सूर्याचे किरण हस्तरूप छत्रांनी वारण्याप्रमाणे तुला निरर्थक कष्ट होतील.

आपण सहसा तयार नसतो. आपणांस हें चांगले ठाऊक असतें कीं, थोडीशी नड सोसल्यानें फार मोठी पीडा दूर होते. आपण अगदी साधें, गरिबीचे अन्न सेवन करण्याची थोडीथोडी सवय लावून घेतली पाहिजे; सेवकांकडून सेवा करून घेण्याचें जितके टाळवेल तितके टाळले पाहिजे; आणि संसाराचा व्याप होईल तितका कमी करण्यास झटले पाहिजे. आपली वास्तविक स्थिति लक्षांत आणून तदनुसार आपलें वर्तन ठेवावे. आपल्या ठायीं दृढ निश्चय व नीतिमत्ता किती आहे याची कसोटी पाहावयाची असल्यास आपल्या आहारविहाराचे आपल्याकडून कितपत नियमन होतें तें पाहावें. ज्याला वासनांचा जय घडतो, त्याला स्वातंत्र्याचा अनुभव घडतो. मनुष्यास ज्या गोष्टी हव्याशा वाटतात, त्या सर्व त्यास प्राप्त होण्याचा मुळींच संभव नसतो. यासाठीं ज्या गोष्टी आपणापाशी नाहींत, त्यांची इच्छा न धरणे यांतच सुख आहे. आमच्या विषयतृष्णांचें दमन नियमितपणाच्या योगाने केले पाहिजे. कांहीं सुखविषयांचा मुळींच अव्हेर केला पाहिजे. दुसऱ्या कित्येक सुखविषयांचें नियमन करून त्यांचें स्वरूप होईल तितकें निर्दोष केलें पाहिजे. जो मनुष्य सदुद्योग करून श्रांत होतो, त्याला विश्रांतीच्या सुखाचा अनुभव घडतो. त्याचप्रमाणें ज्याला चांगली क्षुधा लागते, त्याला भोजनास उत्तम रुचि लागते. एके समयींच्या माझ्या प्रवासांत मला असें दिसून आलें कीं, ज्यांची आपणांस वास्तविक गरज नसते, अशा पुष्कळ गोष्टींची प्राप्ती आपण करून घेण्यास झटत असतो; परंतु त्या गोष्टींवाचून आपलें चांगले चालण्यासारखे असतें. कारण जेव्हां आपणास त्यावाचून दिवस काढणे प्राप्त होतें, तेव्हां त्यांची गरज आपणांस फारशी वाटतही नाहीं. त्या प्रवासाच्या वेळीं मी आणि माझा मित्र असे दोघे मिळून देशांतरास गेलों होतों. आम्ही आणि आमचे नोकर एकाच गाडीतून चाललो होतों. रात्रीस निजण्याच्या वेळीं आमच्या बिछायती जमिनीवर घालून त्यांवर आम्ही सुखानें निजत असू. आमचे त्या वेळचें भोजनही अगदीं साधे व बेताचे असे. आमची प्रवासाची साधने अगदीं साधी व गरिबीची असल्याकारणानें मला वारंवार लाज वाटत असे. परंतु मी पुन: आपल्या मनापाशीं असा विचार करीं कीं, ज्या गोष्टी मी पसंत व हितकर मानितों, त्यांप्रमाणें वागण्याविषयीं माझ्या ठायीं दृढ निश्चय विकास पावला नाही हें कांहीं चांगले नव्हे. मीं काटकसरीने वर्तण्याचा निर्धार केला असून, त्याप्रमाणें वागण्याची माझी तयारी अद्यापि झाली नाहीं. आज मला या हीन स्थितीची लज्जा वाटत आहे, त्यापेक्षा पुढें चांगली स्थिति प्राप्त झाली असतां माझ्या अंगात कदाचित् ताठाही उत्पन्न होईल. इतर प्रवासी मला पाहून काय म्हणतील या विषयीच्या कल्पना मनांत आणून मी आपली योग्यता ताडीत आहें पण असें केल्यामुळें मला संमत असे जे नीतिसिद्धांत, त्यांचा मी अव्हेर केला असें होतें. याप्रमाणे संकोच न धरितां मी मोठ्या धैर्याने सर्व मनुष्यास उच्च स्वरानें असें सांगेन कीं, तुम्ही सर्व वेडे आहां. तुमचे चित्त अनावश्यक अशा गोष्टींवर गुंतले आहे. तुम्ही कोणाही मनुष्याची त्याच्या वर्तनावरून किंमत करीत नाही.

आहारविहार मित ठेवणे हें सर्वदा शहाणपणाचे काम आहे. अगदीं थोड्या सुखसोईंनी तृप्त होण्याचा सर्वदा सराव ठेवावा हें युक्त होय. कारण कोणत्या काळी व कोणत्या स्थळी कशी संकटे आपणांस प्राप्त होऊन आपली काय अवस्था होईल याचा नेम नसतो. एकाद्या मनुष्याला कांहीं पैसा कर्जाऊ देण्याचा असला म्हणजे त्याची मालमत्ता किती व कशी काय आहे याची व्यवहारज्ञ चांगली बारीक चौकशी करितात. कोणाची स्थावर मिळकत फार मोठी असली तरी ती सारी कर्जदाराच्या तावडीत सांपडलेली

असते; त्याचें घर मोठे भव्य असतें. पण तें कर्जाऊ पैशांनी बांधलेले असतें. त्याचें कुटुंब फार मोठे असतें. पण तें सारे त्याच्या दुर्वर्तनामुळे बेदील झालेलें असतें. तो ज्यांच्याकडून ऋण काढतो, त्यांला थापा देऊन वेळोवेळा फसवितो. त्याचें सर्व देणे फेडण्याची त्याला ऐपत असली तरी तें फेडल्यावर त्याच्या हातीं एक कपर्दिकाही रहात नाहीं, अशी त्याची अवस्था असते. अशाच रीतीनें आपण त्याच्या मनाचीही स्थिति तपासून पाहणे उचित होय. चाकर माणसांचा मोठा परिवार पदरी असल्यानें, किंवा मोठी धनसंपदा जवळ असल्यानें, किंवा सोन्यारत्नांचा मोठा खजिना जवळ असल्यानें कोणाही मनुष्याची खरी योग्यता दिसून येतें असें मानणें योग्य नव्हे. मनुष्य यांसंबंधानें अगदीं गरीब असेल. परंतु त्याची योग्यता मोठ्या धनाढ्य मनुष्याहून फार मोठी असेल. धनसंपन्नतेपेक्षां सदाचारसंपन्नता सर्व प्रकारे श्रेष्ठ होय.

भाग सोळावा

मनाची स्थिरता असल्यानें मनुष्याचा लौकिक होतो; आणि त्याच्यावर कितीही संकटे आली तरी त्याचें सौख्य कायम रहातें

मनुष्याच्या एकंदर कर्तव्यांचे निरूपण दोन शब्दांनी करितां येतें. एक इंद्रियनिग्रह दुसरे धैर्य उत्कर्षकाळी आहार विहारांची मितता ठेवावी आणि संकटसमयी धैर्य असावें. यापैकीं इंद्रियनिग्रहाच्या संबंधाने येथवर विवेचन केलें. आतां यापुढें धैर्याविषयी लिहू.

ज्ञाता पुरूष दुसऱ्याकडून घडणाऱ्या नुकसानास मोजत नाही

आपलें नुकसान कोणी केल्यावाचून घडणे नाहीं. त्याचप्रमाणें तें कोणी केलें तरी तें मानले नाहीं तर त्यापासून अहित होणें नाहीं. आपणांवर कोणी वार करण्यासाठीं तलवार उगारिली असता, कदाचित ती उगारणाराचा वार चुकेल, किंवा दुसरा कांहीं तरी प्रत्यवाय येऊन त्याचा दुष्ट हेतू सिद्धीस जावयाचा नाहीं. सॉक्रेटिसाला दोषी ठरवून देहांतशासन केलें खरें. परंतु वास्तविक पाहता त्याचें नुकसान असें कांहींच झालें नाहीं. त्या वेळच्या अन्यायी क्रूर व जुलमी अधिकाऱ्यांनी त्याचा घात केला. यामुळे त्यांचा मात्र दुर्लौकिक जगांत कायम राहिला. कोणा माणसाने माझी एकादी वस्तू चोरून ती माझ्याच घरांत कोठेतरी लपवून ठेविली असली तरी त्यानें ती चोरिली असेंच होतें. माझी ती वस्तू हरवली नाहीं तरी चोराचें तें कर्म निंद्यच समजावयाचे. अशी कल्पना करा कीं, कोणी मनुष्य मला विषाचा पेला प्यावयास देतो. पण त्या विषाचा परिणाम माझ्या देहावर होऊन मला मरण प्राप्त होत नाहीं. तरी एवढ्यानेच त्याचा अपराध कमी होत नाहीं. कोणी माझ्या उरात खंजीर खुपसण्यास उगारिला असतां, तो मीं चुकविला तरी त्याला खुनी मनुष्य म्हटलेंच पाहिजे. कोणाही मनुष्याचा दुष्टपणा जो सिद्ध होतो, तो त्याच्या कृत्याच्या परिणामावरून नव्हे, तर त्याच्या हेतूवरून होय. जो मनुष्य दुसऱ्यास ठार मारण्याची इच्छा धरितो, त्याच्या हातून तें दुष्ट कृत्य प्रत्यक्ष घडले नाहीं तरी तो दुष्टच समजावा. एकाद्या तत्ववेत्त्याचा कोणी नाहक छळ करून त्याच्या देहास जखमा केल्या व त्याच्या मस्तकावर घाव घालण्यास कोणी परशु उगारिला असतां, तो दुःखाक्रोश करूं लागला तर त्यास दोष देता येत नाहीं. कारण मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, त्याच्या जिवावर बेतली असतां त्यानें दुःखविव्हल व्हावें. कारण तो कितीही सदाचारसंपन्न असला तरी त्याला आपला निसर्गसिद्ध स्वभाव जिंकितां येणे शक्य नव्हे. परंतु अशा समयी तो आपल्या चित्ताची स्थिरता अढळ राखील तर त्यानें आपलें कर्तव्य केलें म्हणून समजावे. ज्याचे मन थोर असतें, तो आपल्या प्राप्त स्थितीमध्यें मोठ्या अब्रूने व नेकीने राहतो. यात्रेकरू मार्गांत जशी स्थिति प्राप्त होईल तसा वर्तण्यास सर्वदा तत्पर असतो;

आणि आपली यात्रा केव्हा समाप्त होईल याविषयी त्यास नेहमी उत्कंठा लागलेली असते. अशीच स्थिति मनुष्याची या संसारांत असली पाहिजे.

थोर मनाचा पुरुष कोणत्या वस्तूची अपेक्षा करीत नाहीं, किंवा कशाची आशा धरीत नाहीं

कोणत्याही गोष्टीची अपेक्षा न करणें किंवा तिची गरज न ठेवणें हा थोर मनाच्या मनुष्याचा चांगुलपणा होय. ज्या दौलतीच्या पायी सत्पुरुषाची अवहेलना होते, व दुष्ट पुरुषाची वाहवा होते, त्या दौलतीची मला काहीएक गरज नाहीं. जो आपल्या हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागतो, प्रामाणिकपणानें प्राप्त होण्यासारखे जें नसतें, तें जो स्पृहणीय मानितो, आणि व्यर्थ व पोकळ गोष्टींचा हव्यास धरून, जो त्या प्राप्त करून घेण्याविषयीं तडफड करितो, तो मनुष्य आपलें आयुष्य, व्यर्थ आशापाशात गुंतून, चिंतेमध्यें कंठितो. अशी ज्या मनुष्याची अवस्था असते, तो मनुष्य हतभाग्य होय. कोणी म्हणेल कीं, या उपदेशाच्या गोष्टी सांगावयास बऱ्या असतात. पण साक्षात् प्रसंग प्राप्त झाला असतां, त्यांप्रमाणें वर्तन फारच थोड्यांचें होतें. एकाद्या मनुष्यास हद्दपार करण्याची किंवा बंदिवासाची शिक्षा झाली असतां, किंवा जिवंत जळून मरण्याची किंवा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें नाश पावण्याची वेळ आली असतां, त्याची खचीत त्रेधा उडून जाईल असें कित्येकांचे म्हणणें पडेल. परंतु मागील काळीं असे संकटप्रसंग प्रत्येक महापुरुषाच्या संसारयात्रेमध्यें कमीजास्त मानानें आलेले आहेत. परंतु त्या सर्वांतून ते मोठ्या धैर्याने पार पडले. मागील काळचा इतिहास शोधून पाहता, असें आढळून येईल कीं, अगदीं नीच स्थितीप्रत पावलेल्या राष्ट्रामध्ये जेव्हां सर्वत्र बदफैली पसरलेली होती, त्या वेळीं सर्व दरजांच्या सर्व वयांच्या व सर्व स्थितीतल्या लोकांमध्ये धैर्यशाली स्त्रीपुरुष निपजले असून मरणास भ्याले नाहींत. खरें पाहता मरणास कोणी कधीही भिऊ नये. कारण त्याच्यासारखं हितकर दुसरें काहीही या सृष्टीमध्ये नाहीं, 'आपल्यावरून जग पारखावें' अशी जनांची रीत असल्यामुळें त्यांची अशी कल्पना असते कीं, आपल्यासारखेच सर्व धैर्यहीन असून त्याला जळून किंवा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें मरणे, किंवा एकादी मोठी जखम होणे, किंवा शृंखलाबद्ध होऊन बंदींत पडणें मुळींच आवडणार नाहीं. ही मनुष्याच्या शक्तीची पारख केवळ सामान्य मनुष्याच्या स्वभावानुरूप होत असते. परंतु जे खरोखरीच धैर्यशाली असतात, त्यांच्या धैर्याची पारख थोर मनाचे पुरुषच करण्यास समर्थ असतात. जे क्षुद्रबुद्धि असतात, त्याला सर्वच कांहीं आपल्यासारखे क्षुद्र वाटतें. उदाहरणार्थ, काठी कितीही सरळ असली तरी ती पाण्यांत पडली असतां थोडीशी वाकडी दिसावी हा पाण्याचा धर्म आहे. दैव प्रतिकूल झालें असतां, जो हवालदील होऊन अस्वस्थ होतो, तो आपला नाश आपल्या हातून करून घेतो. दैवाशी आपण झगडलो तर आपणांस त्याला जिंकण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. दांडपट्टा खेळणारे व कुस्तेगीर लोक आपआपल्या कलांचा अभ्यास करीत असतां मोठमोठाले आघात व दुखापती सहन करितात. आपण संकटास भिऊन एकदा पाठ दिली कीं, आपला तें पिच्छा पुरविते. आणि मग आपला नाश होतो. जो मनुष्य वाईट प्रसंगांतून चांगले तेवढेच काढून घेतो, जो आपला विवेक सहसा सोडीत नाही, आणि जो बाह्य जुलमामुळे किंवा त्रासामुळे यत्किंचित्ही डगमगत नाही, तो मनुष्य धन्य होय. दैव कितीही प्रतिकूल झाले असले व त्याच्यामुळें कितीही पीडा सहन करावी लागली, तरी धैर्यशाली पुरुष तीस मुळीच जुमानीत नाहीं. अशा धीर पुरुषाचें वर्णन भारतांत येणेप्रमाणे केलें आहे :-

प्राप्यापद न व्यथते कदाचित्
उद्योगमन्विच्छति चाप्रमत्तः ।
दुःखंच काले सहते महात्मा
धुरंधरस्तस्य जिताः सपत्नाः ।। *

दुःस्थितीपासून अतिशयित मोठा अनर्थ म्हटला म्हणजे तिच्यामुळे घाबरून जाणे हा होय

जो मनुष्य मोठ्या मनाचा असून शहाणा असतो, तो दुर्दैव ओढवले असता मोठेच सुख समजतो. सुस्थितीमध्ये निर्भयपणें वर्तणे यांत कांहींच नाहीं. परंतु सर्व लोक घाबरून पळून जातात, तेव्हां जो यक्तिंचित्ही न डगमगता आपलें ठाणें धरून राहतो, इतर लोक भीतीनें जमीनदोस्त झाले असतां जो धैर्याने नीट उभा राहतो, तो पुरुष प्रशंसनीय खरा. आपणांस ज्या पीडा सहन कराव्या लागतात, किंवा जे शोककारक प्रसंग आपणावर गुदरतात, त्यांत अनिष्ट ते काय आहे बरें? अशा प्रसंगीं घाबरून जाणें हेंच मोठे वाईट आहे. धैर्याच्या अभावासारखे दुसरें काहीएक अनिष्ट नाहीं. हा धैर्याचा अभाव ज्ञानी पुरुषाच्या ठायीं कदापि आढळावयाचा नाही. कारण त्याच्यावर केवढाही भारी प्रसंग आला तरी त्याचें धैर्य अढळ असतें. जेवढे म्हणून मनुष्याला सहन करितां येण्यासारखे असतें, तेवढ्याने त्याला काडीइतकेंही दुःख वाटत नाहीं. त्याला आपल्या सामर्थ्याचा अदमास असतो. दुसऱ्यास कितीही सुस्थिति प्राप्त झाली असली तरी तो त्याचा हेवा करीत नाहीं. आणि त्याला कशीही दुःस्थिति प्राप्त झाली तरी तीबद्दल तो मुळींच खेद करीत नाहीं. तो आपल्या मनाशीं असा विचार करितो की, निसर्ग कोणाचेही वंचन करीत नाहीं. आमची संतति सुगुणी किंवा दुर्गुणी, शहाणी किंवा मूर्ख निपजेल याविषयी निसर्ग आपणांस कांहींच सांगत नसतो. त्याचप्रमाणें आम्हांस सुदैव किंवा दुर्दैव प्राप्त होईल याविषयीं तो कांहींच अगाऊ सूचना देत नसतो.

कोणाही मनुष्याची जी पारख करावयाची, ती त्याच्या अंगावरील अलंकाररत्नें, वस्त्रप्रावरणे किंवा बाह्यरूप पाहून करावयाची नाही. तर त्याचें मन कसें काय आहे तें पाहिले पाहिजे. जो मनुष्य तरवारीचा वार आपणावर होतांना पाहून जरा सुद्धा डगमगत नाहीं, आपल्या प्राणांचा कोणत्याही प्रकारे अंत झाला तरी ज्यास मुळींच परवा वाटत नाहीं, स्वदेश सोडून जाण्याची किंवा कांहीं असह्य वेदना सोसण्याची शिक्षा झाली असता, जो तिळप्रायही न घाबरता आपणाशीं असें म्हणतो कीं, मनुष्यजन्मास लागून राहिलेले जें हें मरण, तें मलाही नेमले आहेच, तो मनुष्य धन्य होय. **'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्'**** हा सिद्धांत त्याच्या चित्तांत सर्वदा वागत असतो. असें धैर्य त्याच्या ठायीं वसत नाहीं, त्याला कितीही बाह्य सुखसमृद्धि अनुकूल असली तरी ती केवळ व्यर्थ होय. एकादा सामान्य मनुष्य जसा राजाचे सोंग घेऊन रंगभूमीवर अभिनय करितो आणि क्षणभर मोठ्या सार्वभौम राजाचें ऐश्वर्य भोगल्याचा आव घालितो, तद्वत् त्याची अवस्था समजावयाची. सोंगाडी रंगभूमीवरून पडद्यामागे गेला म्हणजे जसा पुनः कंगाल तो कंगाल, तसाच मोठे

* आपदा प्राप्त झाली असता ज्याला दुःख होत नाहीं, तर जो अपमत्त होत्साता कोठे तरी उद्योग शोधितो, आणि कालवशात दुःख प्राप्त झाले असतां. तें जो सहन करितो, अशा महात्म्या धुरंधराचे शत्रू हतवीर्य होतात.

** जेवढ्यांला देह आहेत, तेवढ्यांची मरण ही केवळ प्रकृति आहे.

ऐश्वर्य भोगणाऱ्या मनुष्याच्या ठायीं धैर्यादि सद्गुण नसले तर तो कंगालच समजावा. हा देह केवळ आपला जडांश होय. हा जळून, पोळून, तुटून, सडून नाश पावणारा आहे. परंतु याहून श्रेष्ठ असा आपला दुसरा चिदंश आहे. हा अंश निर्भय, अढळ व अविनाशी असा आहे. हा चिदंश पूर्णत्व पावावा यांतच मनुष्याचे शाश्वत व परम कल्याण आहे. जोपर्यंत हा अंश पूर्णत्व पावलेला नसतो. तोपर्यंत त्यांत चलबिचल होत असते, व तो अस्थिर असतो. परंतु हें पूर्णत्व त्यास एक वेळ प्राप्त झालें म्हणजे तो अगदीं अढळ व स्थिर होतो. दैवाशी झगडत असतां, त्यापासून विराम पावण्याची मुळींच सोय नाहीं. दैवाशी भांडता भांडता आपण मरणाधीन झालेंच पाहिजे. तें कदापि चुकणें नाहीं. तेव्हा जें कांहीं प्राप्त झाल्यावाचून कधीही चुकावयाचें नाहीं, तें आपण धैर्याने सहनच केलें पाहिजे. मरण, शोक व आनंद ही या जगांत कांहीं नवी नाहींत. ही मनुष्यजातीस नेहमी प्राप्त होणारी आहेत. मला दारिद्र्य प्राप्त झालें असतां, त्याबद्दल मी काय म्हणून खेद करावा? कारण माझ्यासारखे दुसरे पुष्कळ लोक आहेत. मला हद्दपार केलें असतां ज्या देशांत मी जाईन, त्याच देशांत मी जन्मलो असें मानीन. मला मृत्यू प्राप्त झाला असतां, पुनः कधीही आजार, अपघात आदिकरून गोष्टींनीं मला पीडां व्हावयाची नाहीं; आणि हा मृत्यू मला एक वेळच प्राप्त व्हावयाचा, तो पुनः प्राप्त होणें नाहीं; असें मानून मी आपलें समाधान करीन.

जी गोष्ट मनुष्याच्या जन्मासच लागून राहिली आहे, तीविषयी मनुष्याने मुळीच घाबरू नये

जी गोष्ट आपल्या जन्मास लागलेली असते, तीविषयीं आश्चर्य पावणे कदापि युक्त नव्हे. कारण जी गोष्ट सर्वांच्याच वाट्यास यावयाची, तीविषयी कुरकुर करण्याचें मुळीच प्रयोजन नाहीं. जो मरणसंकट आज टाळू पाहत असतो, तो मृत्युमुखी कधीं ना कधीं खास पडावयाचा. उपजला तो मृत्यू पावावा हा सृष्टिनियमच आहे. म्हटले आहेः 'उपजणे मरणे न लुके नरा.' हिवाळ्यांतील थंडी, उन्हाळ्यातील उष्णता, हवेतील निरनिराळे प्रतिकूल फेरफार, व देहास होणारे नाना व्याधि ही आपण सहन केलीच पाहिजेत. एकादे ठिकाणी आपणांस हिंस्त्र पशू भेटतील; दुसरे ठिकाणी आपली एकाद्या पशूहूनही क्रूर मनुष्याशी गांठ पडेल. एकादे प्रसंगीं आपण अग्निप्रलयांत सापडू; किंवा आपण पाण्याच्या पुरांतून वाहत जाऊं. या व अशाच दुसऱ्या संकटास आपण तयार असलें पाहिजे. थोर मनाचे जे पुरुष असतात, ते उत्कर्षीच्या वेळीं सृजनतेने वागून आपले आहारविहार मित ठेवितात, आणि अपकर्षाच्या वेळीं धैर्य अढळ राखितात. अशा महापुरुषांचे वर्णन भर्तृहरीने पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकार केलें आहेः-

संपत्सु महता चित्त भवत्युत्पलकोमलम् ।
आपत्सुच महाशौलशिलासंघातकर्कशम् ।।*

ज्या गोष्टी सामान्य जनांस मोठ्या तारीफ करण्यासारख्या वाटतात, त्यांचा ते तिटकारा करितात. आणि कोणत्याही गोष्टीचा ते अतिरेक होऊं देत नाहीत. सॉक्रेटिसासारख्या सत्पुरुषास दारिद्र्याने घेरले नव्हतें काय?

* संपति प्राप्त झाली असता, महापुरुषाचे चित्त कमलाप्रमाणे कोमल असते, आणि विंपत्ति प्राप्त झाली असता, ते मोठ्या पर्वतावरील शिलेसारखे कठीण होते.

त्याला नेहमीं जिवापाड श्रम करावे लागते. त्याला गृहसौख्य कसलें तें मुळीच नसे. त्याची बायको मोठी कर्कशा असून त्याच्याशी नेहमीं कलह करीत असे. तिच्या पोटीं निर्माण झालेलीं मुलेही तिच्या सारखीच अमर्याद व दांडगी होतीं. त्यानें सत्तावीस वर्षे लष्करांत घालविल्यावर त्याला तीस जुलमी पुरुषांच्या तावडीत सांपडावें लागलें. हे बहुतेक सारे त्याचे हाडवैरी होते. शेवटीं त्याला धर्मनियमाचा भंग केल्याबद्दल, तरुण जनांची मने बिघडविल्याबद्दल व देव व मानव यांशी वैर केल्याबद्दल दोषी ठरविलें; आणि मग त्यास कारागृहांत घालून विष पाजून मारण्याची शिक्षा झाली. परंतु या सर्व दुर्धर प्रसंगांमुळें त्याच्या मनास यत्किंचित्ही वाईट वाटलें नाहीं. प्रतिकूल प्रसंग, प्रखर ऋतू, हवापाण्याचे पीडाकारक फेरफार, नाना प्रकारचे आधि व व्याधि हे हे जसे आपणांस सहन केलेच पाहिजेत, तद्वत्च दुष्ट मनुष्यांची कृत्येंही आपण मानिली पाहिजेत. जे दुरात्मे असतात, त्यांच्या शब्दावर मुळीच विश्वास ठेवू नये. ते मोठे ठक असून जेव्हां तेव्हां आपणांस गोत्यांत आणण्यास व फशी पाडण्यास टपलेले असतात. ते कांही ना कांहीं बहाणा करून दुसऱ्यांचे नुकसान करण्यास तयार असतात. केव्हा कोठे कसें लोकांना फसवितां येईल याची ते वाट पाहत असतात. ते जिकडेतिकडे हेर ठेवून नेहमी बारीक बातमी काढीत असतात. एकाद्यास फसवावयाचे असले म्हणजे त्याला हजार युक्ति सूचतात, एकादा मनुष्य अंमळ जोरदार असला म्हणजे त्याच्या तंत्रानें ते वागतात; आणि त्याला चढवून ठेवून केव्हा ना केव्हा तोंडघशी पाडतात. आपला डाव त्याच्यावर केव्हा साधेल याची ते वाट पाहत बसतात. त्यांचें चित्त नेहमी आशा व भय यांच्या योगानें अस्वस्थ झाले असतें. जो खरा शांत असतो, तो आपल्या चित्ताची स्थिरता कदापि नष्ट होऊं देत नाहीं. कोणीं त्यास भय घातले, वाखाणिलें, किंवा त्रास दिला, तरी तो आपल्या मनाची चलबिचल होऊं देत नाहीं. लोकांच्या तोंडून ज्या गोष्टी आपण ऐकितों, त्यांविषयीं आपल्या मनांत जिज्ञासा किंवा कुतुहल उत्पन्न होते याचे कारण त्यांविषयीं आपणांस आशा किंवा भय वाटत असते हें होय.

दैवयोगानें ज्या गोष्टी घडत असतात, त्या इष्ट किंवा अनिष्ट म्हणणे रास्त नव्हे

दैव अनुकूल किंवा प्रतिकूल म्हणणें ही मोठीच भ्रांति होय, परंतु दैवयोगाने जी प्रत्येक गोष्ट घडत असते, तिला पाहिजे तर आपण इष्ट किंवा अनिष्ट झटले असतां चालेल. आणि ह्याबद्दल आपण स्वतांसच जबाबदार धरिलें पाहिजे. कारण आपणच आपल्या सुखदुःखास कारण होत असतो. खरें पाहता दैव कितीही अनुकूल किंवा प्रतिकूल झालें तरी मनाची शांति नष्ट होत नाहीं. आपलें मन वाईट असलें तर मात्र आपणांस सवे कांहीं वाईट वाटत असतें. तें सरळ व शुद्ध असले तर जें अनिष्ट असें भासतें, ते त्याच्या योगानें अपकारक वाटत नाहीं. जें असह्यसें भासतें तें धैर्य व विनय यांच्या योगाने सुसह्य होतें. ज्याला जन मोठे शहाणे समजतात, ते सर्वच सारखे असतात असा कांहीं नेम नाहीं. दैवयोग कसाही आला तरी त्यास जुमानावयाचें नाहीं असा कित्येक जण आपल्या मनाशीं निर्धार करितात. परंतु हा त्यांचा निर्धार सर्वदा चालत नाही. कारण ते एक तर इतरांचे वैभव पाहून दिपून जातात, किंवा संकटाच्या भीतीनें घाबरून जातात. परंतु दुसरे कित्येक असे असतात कीं ते दैवाशी नेटाने झगटतात, आणि शेवटीं त्यावर विजय पावतात. परंतु दुसऱ्या कित्येकांच्या मनाची वृत्ति इतकी कोमळ असते कीं, त्यांची कोणी निंदा केली

असतां, त्याला ती सहन होत नाहीं. परंतु वास्तविक पाहता, ज्याप्रमाणें गर्दींत सापडून आपलें अंग चेंगरतें, किंवा रस्त्याने चाललो असतां, आपणांस दुसऱ्याचा सहजी धक्का लागतो, तरी आपण कोणाशी भांडत सुटत नाहीं, किंवा आपणांला फारसे वाईटही वाटत नाहीं तशीच इतरानी केलेली निंदा सोशिली पाहिजे. ज्याला पुष्कळ लांबचा मार्ग चालावयाचा असतो, त्याला कोठे तरी पाय घसरण्याचा, किंवा ठोकर लागण्याचा, किंवा तो थकून जाण्याचा संभव पुष्कळ असतो. जो मनुष्य ऐषआरामीत गुंग असतो, त्याला काटकसरीनें वागणे ही शिक्षा आहे. जो आळशी असतो, त्याला, उद्योग व मेहनत करावयास लावणे हीच शिक्षा समजावयाची. पुष्कळांस तर विद्याभ्यास करावयास लावणे म्हणजे मोठीच यातना वाटते. ह्या गोष्टी आपणांस निसर्गतः कष्टप्रद असतात अशांतला काही अर्थ नाहीं. परंतु आपलें चित्तच अस्थिर व दंभयुक्त असतें. कित्येकांस मद्यादिकांचें व्यसन इतके जबर लागलें असतें कीं, त्यांतून मुक्त होणें त्यांस मुळीच शक्य नाहीं असें वाटतें.

आणीबाणीच्या प्रसंगीं नीतीचे तेज अप्रतिम प्रगट होतें

जो धैर्यशाली असतो, त्यानें आपणावर नेहमी संकटे येतील हें लक्षांत वागवावें. दैवयोगास न जुमानितां व कोणत्याही कठीण प्रसंगाची परवा न करितां त्याला आपली जीवितयात्रा चालवावयाची असते. दुःखद प्रसंग प्राप्त झाला असतां, तो सहन करण्यास अनेक सद्गुणांची आवश्यकता लागते. या सर्वात मुख्य गुण म्हटला म्हणजे सहनशीलता हा होय. हा गुण धैर्याचे एक अंग होय. जी गोष्ट आपल्या स्वाधीनची नाही, ती मुकाट्याने सहन करण्याची तयारी असणें यांत मोठा शहाणपणा आहे. प्राप्त झालेला प्रसंग निश्चयानें शेवटपर्यंत सहन करण्यास मनाची स्थिरताही लागत असते. इतर थोर कृत्यांमध्येही अनेक सद्गुणांची आवश्यकता लागत असते. लिओनिडाज हा आपल्या तिनशे योद्ध्यांस थर्मापिलीच्या खिंडीमध्यें घेऊन चालला असतां त्यांस म्हणालाः 'योद्धे हो, चला, आपण येथें मुक्काम करून भोजन आटपून घेऊं; आणि यानंतरचे आपलें संध्याकाळचे भोजन दुसऱ्या लोकी करावयाचें असा संकल्प मनाशीं करूं' हा त्याचा निश्चय त्याच्या बरोबरच्या सर्व योद्ध्यांना तत्काळ मान्य झाला. क्रिडिशस याने आपल्या योद्ध्यांस एका बिकट समरप्रसंगीं म्हटले कीं, 'वीर हो आपणांस आतां शत्रूंवर चालून गेलें पाहिजे; आणि समरभूमीवरून शत्रूस पाठ दाखवून परत येतां कामा नये.' हें त्या शूर व शहाण्या पुरुषाचें अतिसंक्षिप्त भाषण मोठ्या विद्वत्तेच्या दहा हजार भाषणांहून श्रेष्ठ समजावयाचें. आपणांस विद्वान् समजणाऱ्या जनांच्या वाक्चातुर्याने श्रोत्यांचें मन उत्साहयुक्त होऊन, त्यांत निश्चयाचें बळ उत्पन्न होण्याऐवजी त्यामध्यें व्यग्रता उत्पन्न होते. अशीं बोधप्रचुर हजारों भाषणे ऐकिली असली तरी संकटप्रसंग किंवा कांहीं मोहप्रसंग येऊन मन गोंधळून गेलें असतां, त्या बोधाचा काहीएक उपयोग होत नसतो. आमच्या वासना अनेकविध असून प्रबल असतात. त्यांचे दमन सहज रीतीनें होण्यासारखे नसतें.

सदाचार अजिंक्य आहे

ज्ञाता पुरुष मरण व दुःख यांस सहसा मोजीत नाही. आपणांस एकदाचे मरण येऊन आपल्या साऱ्या पीडेचा अंत होणार या अपेक्षेने तो दुःख सोसण्यास तयार होतो; किंवा संसारांतील दुःखास त्रासून मरणसमय

प्राप्त झाला असतां, त्यास तो आनंदानें तयार होतो, असें कोणी समजू नये. तर तो प्रसंगवशात् प्राप्त होणारे दुःख धैर्याने सहन करितो, आणि मरणास सर्वदा तयार असतो. संसारांत कसेही कठीण प्रसंग आले तरी त्यामुळें तो आपलें चित्त अस्वस्थ होऊं देत नाही. विश्वासूकपणा आणि प्रामाणिकपणा हे गुण मनुष्याचें परम कल्याण करणारे आहेत असें तो मानितो. कसाही दुर्धर प्रसंग ओढवला तरी तो या गुणांपासून च्युत होत नाहीं, किंवा केवढाही मोठा लाभ होण्यासारखा असला तरी तो सहसा सोडीत नाहीं. त्याला तुम्ही ठार मारा, जाळा किंवा कापा; तरी तो आपली सचोटी कदापि सोडणार नाहीं. एकादी गुप्त गोष्ट त्याला कोणीं सांगितली असली तर तो ती कांहीं केल्या कोणाकडे फोडणार नाही. अशा धीर पुरूषाचें वर्णन पुढील पद्यांत केलें आहे:-

स एव धन्यो विपदि स्वरूप न विमुचति ।
त्यजत्पर्ककरैस्तप्त हिम देहं न शीतताम् ।। *

मनुष्य हा जात्याच दुर्बल आहे. तथापि निश्चयाच्या बलेकरून त्यास पाहिजे तो प्रसंग सोसण्याचे सामर्थ्य येते. होरेशियस कॉक्लिस याने एकट्याने आपल्या मागचा पूल तोडून नदीत पाडीपर्यंत समोरून येणाऱ्या मोठ्या सैन्यास टक्कर दिली; आणि मग हातांतील तरवारीनिशीं नदीत उडी टाकून आपल्या पक्षाकडील लोकांस सुरक्षितपणे जाऊन मिळाला. जो मनुष्य मनोनिग्रह करितो, आणि जग जिंकणाऱ्या महायोद्ध्यास ही घाबरवून टाकणाऱ्या मरणभीतीसही जो जुमानीत नाहीं, तो धन्य होय.

* विपत्ति प्राप्त झाली असता जो स्वभाव सोडीत नाहीं; कसा, तर जसें बर्फ सूर्यकिरणांनी तप्त झालें असता आपल्या देहाचा त्याग करिते, पण त्याच्या ठायींची शीतता कांहीं नष्ट होत नाहीं.

भाग सतरावा

ज्या प्रकारची संगति आपण धरुं, तसें आपणांस सौख्य प्राप्त व्हावयाचें

संसारांतले बरेंच सुख संभाषणावर अवलंबून असतें. परस्परांच्या उपयोगी पडणे, एकमेकांच्या सलोख्यानें रहाणे आणि परस्परांच्या संगतीने संसारयात्रा चालविणे ही मनुष्याच्या सौख्यास फारच उपयोगाची आहेत. आपण कोणत्याही स्थितींत असलो तरी सर्वदा सर्वलोकांशीं ममतेनें वागावे. एकमेकांस त्रास किंवा दुःख कदापि देऊं नये. एवढेच नव्हे तर परस्परांच्या उपयोगी पडण्यास सर्वदा झटावे. जो विपत्तीत असेल, त्याला तीतून मुक्त करावे. जो मार्ग चुकून आडरानात भटकत असेल, त्याला वाट दाखवावी. आपल्या शेजारी कोणी भुकेने व्याकुळ झाला असता त्याला आपल्याकडची थोडीशी भाकर अवश्य द्यावी. असें एकमेकांच्या उपयोगीं पडणे म्हणजे स्वकल्याणच करणें होय. कारण आपण सर्व या महानिसर्गाचे निरनिराळे अवयवच आहो. आम्ही एकाच हाडामांसाचे असून आमची घटना समान पदार्थाच्या एकीकरणाने झाली आहे, व आमची सर्वांची गतिही समानच व्हावयाची. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, आपण परस्परांवर दया करावी व एकमेकांशी स्नेहभावाने, न्यायाने, व समतेने वागावें हें योग्य होय. परस्परांच्या सहवासाने रहाण्याची प्रवृत्ति मानवी स्वभावांत मूळचीच आहे. परंतु आपण कोणाची संगति धरावी हें समजण्यास शहाणापणा व सदाचारप्रीति लागत असते. आपण सत्पुरुषांची संगती केली तर त्यांच्या सद्वर्तनाचे अनुकरण करण्याची आम्हांस स्फूर्ति होते. म्हणूनच म्हटलें आहे कीं:-

सद्भिरेव सहासीत सद्भिः कुर्वीत संगतिम् ।
सद्भिर्विवादं मैत्री च नासद्भिः किंचिदाचरेत् ।। * सु.

थोर व लौकिकवान् पुरुषांच्या चरित्रांपासून आपल्या मनामध्ये सद्विचार उत्पन्न होऊन सदाचाराकडे आपली प्रवृत्त होते. महापुरुषांचा चरित्रमहिमा कळला असतां, त्यांच्याप्रमाणे स्ववर्तन ठेवण्यास बुद्धि आपणांस होते; आणि तेणेंकरून जगाची कांहींना कांहीं सुधारणा होईल असें करण्याचा उत्साह आपल्या ठायीं उत्पन्न होतो. म्हटले आहे: **'महानुभावससंर्गः कस्य नोन्नतिकारकः'**** दुर्बलाचे रक्षण करणें, संकटांत सांपडलेल्याची त्यापासून मुक्तता करणे, उद्दाम मनुष्यास शासन करणें इत्यादि सत्कृत्ये करण्याची स्फूर्ति व उमेद सत्संगतीच्या योगानें आपल्या ठायीं उत्पन्न होते. याप्रमाणें अन्य जनांस सदुदाहरण घालून देण्याची

---

* साधुजनांच्या सहवासाने असावें; साधुजनांची संगति धरावी; मैत्री किंवा वादविवाद करणें तो साधुजनांशी करावा; जे दुर्जन असतील, त्यांच्याशी कोणताही व्यवहार करूं नये.

** महापुरुषांचा संसर्ग कोणाला उन्नति कारक होणारे नाहीं?

ज्याला बुद्धि होते, तो पुरुष धन्य होय. ज्या पिढींत तो जन्मास येतो, त्या पिढीवर त्याचे मोठेच उपकार झाले समजावयाचे. जो गर्विष्ठ मनुष्याशी संघटन ठेवितो, तो खात्रीने फुगून जावयाचा. ज्याची विषयलंपट मनुष्याशी मैत्री जमते, त्याच्या ठायीं विषय प्रीति उत्पन्न झाल्या वाचून रहावयाची नाहीं. एकाद्या मनुष्याच्या ठायींचा दुष्टपणा नाहीसा करावयाचा असल्यास त्याला कुसंगतीपासून अलग करावे. म्हणजे अर्थात् त्याच्या नजरेस दुराचार पडूं देऊं नये. दुराचारी मनुष्य जवळ असणें फारच वाईट. परंतु दुराचारप्रवृत्ति स्वतांच्या अंतर्यामीं असणें तर त्याहूनही वाईट. कुसंगति, सुखविषयांची अनुकूलता आणि स्वास्थ्य यामुळे मनुष्य फारच बिघडण्यासारखा असतो. कुसंगापासून उद्भवणाऱ्या अनर्थाचे वर्णन पुढील पद्यांत फारच नामी केलें आहे:-

आनन्दमृगदावाग्निः शीलशाखिमदद्विपः ।
ज्ञानदीपमहावायुरयं खलसमागम ।। * सु. र.

उदाहरणार्थ असें पाहा की, जमीन खडकाळ असली म्हणजे घोड्याचे खूर बळकट होतात. जो मनुष्य डोंगराळ मुलखात रहातो, तो चांगला योद्धा निपजतो. शिक्षण जितके कडक असतें, तितके मन विशेष समर्थ होतें. दैव अनुकूल किंवा प्रतिकूल होऊन जें सुख किंवा दुःख प्राप्त होतें, त्यापासून मनाची स्थिरता नष्ट होऊं नये, असें ज्यास वाटत असेल त्यानें महापुरुषांची चरित्रे डोळ्यांपुढे सर्वदा ठेवावी. जे पुरुष आपल्या चरित्रांच्या योगानें जनांस उपदेश करितात, आणि बोलल्याप्रमाणे वागण्यास सर्वदा तत्पर असतात, ते सर्वांत उत्तम उपदेशकर्ते होत.

अनाचाराची स्थलें आणि बदफैल सोबती यांचा अव्हेर करावा

ज्याप्रमाणें दूषित हवेच्या योगाने चांगल्या सुदृढ प्रकृति कांहीं ठिकाणे तर अशीं असतात कीं तेथें बदफैली अगदीं नेहमी चालू असते. तेथें ऐषआराम सदोदित चालू असून, तेथले लोक मनास वाटेल तसे वागत असतात. कारण तेथल्या लोकांपुढे नेहमी दुराचारी माणसांची उदाहरणें असतात. अशा ठिकाणी जाण्याचें आपण सर्वदा वर्जिलें पाहिजे. कारण तेथें जात राहिल्याने आपली चालचलणूक बिघडण्याचा संभव असतो. हानिबालासारखा शूर योद्धा कंपानिआ येथें गेला तेव्हां तो तेथल्या दुराचारी लोकांच्या सहवासाने अगदी बेवकूफ होऊन गेला. तो युद्धकलेमध्यें निष्णात असल्या कारणानें त्यानें शत्रूवर अनेक वेळां तलवार गाजविली खरी, परंतु तो विषयसुखाला मोहून जाऊन त्याच्या अगदीं ताबीन झाला मित आहारविहार करण्याची ज्याला सवय लागलेली अंसते, तो कोठेही गेला तरी आपला नियमितपणा सोडणार नाही, हें जरी खरें आहें, तरी दारूबाज लोक दारू पिऊन जिकडेतिकडे झोकांड्या खात फिरतांना पाहून, किंवा विषयासक्त लोक ग्राम्यविषयसुखाचा अतिरिक्तपणें उपभोग घेतांना व मनास वाटतील ते ढंग करतांना पाहून,

* खलांचा संग आनंदरूप मृगांला दावाग्रीसारखा घातक आहे; शीलरूप वृक्षाला मोठ्या मदोन्मत्त हत्तीसारखा आहे; ज्ञानरूप दीपाला महावायूसारखा आहे.

चित्तांत उत्पन्न होणारा मोह टाळणे मोठे कठीण आहे. म्हणूनच म्हटले आहे कीं: **'न स्थातव्य न ग न्तव्य क्षणमप्यधमै: सह.'*** तेव्हां अशा लोकांचा संसर्ग निखालस टाळावा. कुंसगाच्या या प्रचंड प्रभावास अनुलक्षून तुकारामानें पुढील उद्गार काढिले आहेत: **'ढेंकणाच्या संगे हिरा जो भंगला । कुसंगें नाडला साधु तैसा.'** हानिबालासारखा विजयी, शूर व निश्चयी मनुष्य जर या मोहास वश होऊन बदफैल लोकांच्या संगतीस लागला, तर आपण जे आधींच थोडेबहुत सुखाभिलाषास वश झालेले असतो; त्यांचा काय पाड? हानिबालाने कापुआ येथील लोकांला रणामध्यें जिंकून त्याच्याच शहरांत तो हिंवाळ्यामुळे मुक्काम करून राहिला. परंतु तेथल्या ऐषआरामी व बदफैल लोकांच्या संगतीनें त्याच्या सैन्यातले लोक बिघडून गेले. त्यामुळें पुढल्या समरप्रसंगीं त्यांचा पराभव झाला. ज्याला हे मोहप्रसंग टाळावयाचे असतील, त्यानें आपला नीत्याचरणाविषयीचा निश्चय तिळमात्रही ढळू देता कामा नये. कोणत्या स्थळी व कोणत्या काळी काय प्रसंग येतील याचा नेम नसतो. यासाठीं सर्वदा जागरूक रहावे हें आपलें कर्तव्य आहे. मी सुखाभिलाषास वश होऊन नाना फंदांत निमग्न झालो तर मला पुढें दुःख प्राप्त होऊन दारिद्र्याची पीडा सहन करावी लागेल. मला नेहमीची दगदग पडून माझी महत्त्वाकांक्षा अनावर होईल, व माझे मनोरथ सिद्ध झाले नाहींत तर मी जेव्हातेव्हां संतप्त होईन; आणि सकटे व विषयवासना यांच्या योगानें माझें सर्वस्वी नुकसान होईल. जनांस उपदेश करण्याचा आव घालून, जे बोलल्याप्रमाणें वागत नाहींत, तर जे केवळ उदरपूर्तीसाठी जनांस बोध करीत फिरत असतात, त्यांच्यामुळें मनुष्यजातीचे जितके नुकसान होतें, तितके दुसऱ्या कशानेही होत नाहीं. जे बोलल्याप्रमाणें चालत नाहींत, ते सदाचारप्रवृत्तीस प्रत्यवाय करितात. उदाहरणार्थ असें पाहा की, तारवावरचा सुकाणू धरणारा तांडेलच जर तारूलागून ओकूं लागला, आणि इतका बेजार झाला कीं आपल्या ओकींत तो लोळू लागला, तर तें तारू योग्य मार्गानें कसें आपोआप जावे बरें? जो मनुष्य स्वत: दुराचारी असतो, तो इतरास दुराचाराकडे वळविण्यास कारण होत असतो.

जे बोलल्याप्रमाणे वर्ततात त्या ज्ञानी पुरुषांची संगति उत्तम होय

जे खरे ज्ञानी पुरुष असतात, त्यांच्याशी संघटन ठेवावयास सांपडलें तर फारच उत्तम समजावयाचे. आतां खरे ज्ञानीपुरुष कोण म्हणाल तर जे केवळ शब्दज्ञान करून न देता खरें रहस्य समजून देतात, आणि जे अवश्य तेवढा बोध करून तदनुसार कसें वर्तन ठेवावे तें स्वतांच्या उदाहरणाने शिकवितात, ते होत. अशा साधुपुरुषांचे वर्णन पुढील सुभाषितांत केलें आहे:

यथा चित्त तथा वाचो यथा वाचस्तथा क्रिया: ।
चित्ते वाचि क्रियांया च साधूनामेकरूपता ।। ** सु.

कसाही प्रसंग प्राप्त झाला तरी त्यास जुमानावयाचे नाहीं, असा मनुष्याचा निर्धार होतो, तेव्हांच त्याला या संसारामध्ये शांति प्राप्त होते. साधुसंगतीच्या योगानें मनुष्याच्या हृदयांत चांगले विचार उत्पन्न होतात;

---

* अधम पुरुषाबरोबर एक क्षणभर सुद्धा उभे राहू नये, किंवा जाऊं नये.

** साधुजनांचा असा क्रम असतो कीं, मनांत आहे त्याप्रमाणें बोलावयाचे जसे बोलावयाचें त्याप्रमाणें आचरण करावयाचें; चित्त, वाचा आणि क्रिया ही त्यांची एकरूप असतात.

आणि ज्याचे पाऊल आडमार्गात पडलें असतें, तो सन्मार्गवती होतो. आपल्या दृष्टीसमोर चांगले उदाहरण असलें म्हणजे त्याचा परिणाम आपल्या मनावर जसा होतो, तसा निवळ शाब्दिक बोधाचा होत नसतो. सदाचारदर्शनानें सदाचाराकडे मनाची प्रवृत्ति त्वरित होत असते. ज्ञात्या सदाचारी पुरुषाचे दर्शन झालें असतां, किंवा त्याचें भाषण श्रवण केलें असतां, मनास परम आल्हाद होतो. हें तर आहेच, परंतु त्याला नुसते पाहिल्यानेंही मनामध्ये पवित्र व कल्याणप्रद असे विचार उत्पन्न होतात. मी कोणत्या मनुष्याच्या पंक्तीस बसून भोजन करीत आहे, किंवा कोणा मनुष्यांशी सहवास करीत आहें, याचा विचार अवश्य करावा. बोधप्रचुर ग्रंथांच्या वाचनानें हित होतें खरें; पण ज्ञात्या सदाचारी पुरुषाशीं संभाषण करण्यांत फारच हित आहे. कारण मनुष्यांची सामान्य प्रवृत्ति अशी असते कीं, ज्या गोष्टी ते कानांनी ऐकितात, त्यावर त्यांचा विश्वास अधिक लवकर बसतो; आणि ज्या गोष्टी ते इतरांच्या आचरणांत पाहतात, त्या त्यांच्या मनावर बोधवचनांपेक्षां विशेष चांगल्या ठसतात.

जेवढ्या अधिक लोकांची संगति धरावी, तितका आपणास धोका अधिक

आपली नैसर्गिक प्रवृत्ति पाहिली असतां, आपणांस परस्परांच्या सहवासाची गरज वाटते. तरी पण हें नित्य ध्यानांत वागविले पाहिजे की, जितकी आपली ओळख वाढते, तितका आपणांस धोका अधिक असतो. शंभरांमध्ये असा एकही नसतो कीं ज्यावर आपणांस पूर्ण विश्वास ठेवून चालता येईल. संगतीच्या योगानें आपल्या ठायीं पालट झाला नाहीं तरी तीमुळें आपणांस बरें दिसते तसें वागण्यास पुष्कळ प्रत्यवाय येण्यासारखा असतो. अशा प्रकारे ज्याच्या सदाचरणास जेव्हांतेव्हां अंतराय घडतो, त्याच्या आधींच अल्प असलेल्या आयुष्याचा व्यर्थ क्षय होतो. ज्यांचे स्वभाव कोमल व लवकर पालटणारे असतात, त्यांनीं कुसंगतीस फारच जपावे. कारण पुष्कळ जनसमुदाय ज्या प्रकारचा असतो त्या प्रकारची त्यांची वृत्ति होण्याचा संभव असतो. बहुजनसमुदायांत जे दुर्गुण प्रचलित असतात, त्यांचा आपल्या मनावर फारच लवकर परिणाम होतो; तो इतका कीं, आपला संकल्प कितीही दृढ असला तरी आपलें मन पालटण्याचा संभव असतो. लोभी आणि विषयासक्त अशा एका जरी मनुष्याशी आपला संसर्ग घडला तरी त्यापासून फार मोठे नुकसान होतें. एक मनुष्य बदफैल असला तर त्याच्या संगतीनें पुष्कळ जण त्याच्या सारखे होतात. आपल्या शेजारी एकादा धनाढ्य मनुष्य रहात असला तर त्याच्या दौलतीचा आपणास हेवा उत्पन्न होऊन, आपल्या मनांत संपत्ति मिळविण्याचा हव्यास उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे ज्याचा स्वभाव कुढा असतो, तो जेथें जातो तेथें तो इतर जनांस आपल्यासारखे करून सोडतो. मोरोपंत म्हणतो:-

दुर्जनसहवास सदा तापद हा काय नरक सामान्य ।
होईल यासि दाटुनि मानधन प्राज्ञ नर कसा मान्य ।।

अशी स्थिति जर साधारणत: सर्वत्र आढळते, तर मग जेथे पुष्कळ लोक दुराचारी असतात, तेथें त्यांच्या संसर्गाने आपली दशा काय होईल बरें? अशा स्थितींत आपलें दोन प्रकारे नुकसान होत असतें. एक प्रकार असा कीं, आपण बहुजनसमाजाप्रमाणें वर्तू लागून दुराचारांत निमग्न होतों; किंवा आपल्या

समजुती व प्रवृत्ति अगदीं निराळ्या असल्या कारणानें त्यांच्याशी आपणांस कलह करणें प्राप्त होतें. यास्तव ज्यांच्या संगतीने आपली सुधारणा होण्याचा संभव असतो, आणि ज्याचें आपल्या संगतीने हित होण्यासारखे असतें, त्यांचा आपण सहवास करावा; इतरांच्या संगतीचा आपण अव्हेर करणें इष्ट होय. असें केल्याने आपणांस आपल्या मित्रांच्या संगतीने बोध प्राप्त होतो, आणि आपल्या संगतीनें त्यांचा फायदा होतो. अशा प्रकारे परस्परांचें कल्याण होतें. आपले सोबती पुष्कळ असले म्हणजे आपल्या मनास वाटेल तसें स्वतंत्रपणे वागता व बोलतां येणे मोठे कठीण असतें. यामुळे आपल्या स्वातंत्र्यास पुष्कळ हरकत येते. आपण आपल्या घराबाहेर पडून पुनः परत घरीं येईपर्यंत आपल्या ठायीं कांहींना कांहीं पालट झाल्यावांचून रहात नाहीं. जो एकादा संकल्प आपल्या मनाशीं आपण केला असतो, तो बिघडण्याचा संभव असतो. ज्या एकाद्या मनोवृत्तीचे आपण दमन केलें असतें, ती पुनः उद्दाम होण्यासारखी असते. आपल्या शरीरप्रकृतींत व मनाच्या अवस्थेंत पुष्कळ साम्य आहे. एकादा आजार येऊन गेल्यावर प्रकृति अगदीं कोमल व नाजूक झाली असतां, थोडासा वारा किंवा थंडी लागली तर पुनः तो आजार उलटण्याचा संभव असतो; अशीच स्थिति आपल्या मनाची आहे. त्यांतल्या कुवृत्ति काढून टाकण्याचा आपण प्रयत्न चालवित असतां, त्या कुवृत्ति उत्तेजित करणाऱ्या गोष्टींपासून सर्वदा दूर असावें. यासाठीं आपली ओळख पुष्कळ असली म्हणजे निरनिराळ्या वृत्तींच्या माणसांशी संसर्ग घडून त्याची भाषणे ऐकण्याचा व वागणुकी पाहण्याचा प्रसंग येतो. त्यामुळें त्यांच्या अंगचे कांहींना कांहीं दुर्गुण आपणांस न समजता लागण्यासारखे असतात; आणि आपल्या सोबत्याचे मंडळ जितके मोठें असेल, तितका या संबंधाचा धोका अधिक असतो. या प्रकरणी आणखी एक गोष्ट अशी सुचविण्यासारखी आहे कीं, नाटके, तमाशे वगैरे जी सार्वजनिक करमणुकीची साधनें असतात, त्यांस जाणारानी फारच जपले पाहिजे. कारण अशा प्रसंगी दुराचाराचीं उदाहरणे पाहावयास सापडून, त्यांत आणखी करमणुकीचा अंश असल्या कारणानें तीं मनावर विशेष लवकर ठसण्याचा संभव असतो. ज्या तमाशात प्राण्यांचा वगैरे घातपात होण्याचा संभव असतो, असले तमाशे तर आपण कधींही पाहावयास जाऊं नये. त्याचप्रमाणें जे सदोदित भांडत किंवा कुटाळक्या करीत असतात, त्यांच्या संसर्गास आपण कदापि जाऊं नये. असे लोक आपणांवर पुष्कळ ममता करीत असले, किंवा ते मोठे विश्वासू असले, तरी त्यांच्या सहवासांत शांतीचा लाभ मुळीच व्हावयाचा नाहीं. ज्यांच्या चित्तास भ्रम झालेला असतो, त्यांस एकटे ठेविल्याने ते अधिक बिघडण्याचा संभव असतो. यासाठी त्यांच्या जवळ कोणाला तरी सर्व काळ ठेवावे लागतें. कित्येक तर असे अविचारी असतात कीं, ते नेहमी कोणाचा तरी घातपात करण्याचे बेत करीत असतात, किंवा आपलें नुकसान होईल अशा कोणत्या तरी फंदात पडण्यास पाहत असतात, किंवा आपल्या ग्राम्यविषयतृष्णा तृप्त करण्यास पाहत असतात. अशावर नेहमी नजर ठेवून त्यांच्याकडून असत्कर्मे होऊं देता कामा नये.

येथवर आपण संगति कोणत्या प्रकारची धरावी याविषयी विवेचन केलें. आतां पुढल्या भागांत मित्र कसा निवडावा याविषयीं लिहू.

भाग अठरावा

मित्रत्वाचें सौख्य

अढळ मित्रत्वापासून उद्भवणारे सुख सर्व सुखांमध्ये परम मनोहर आहे. त्याच्या योगानें आपला चिंताज्वर उपशम पावतो. आपला खेद नाहीसा होतो, आणि सर्व संकटांच्या वेळीं आपणांस योग्य मसलत मिळते. फार काय, पण केवळ मित्रत्वाचा सद्गुणच पाहिला असतां, तो इतका आनंदप्रद आहे कीं, त्यापासून इतर कोणतेही फायदे झाले नाहींत तरी एवढाच एक आनंद तें संपादण्यास पुरे आहे. मित्रत्वापासून प्राप्त होणारे सुख ज्याच्या अनुभवास येतें, तो तें संपादिल्यावाचून कदापि रहाणार नाहीं. सर्व संकटांच्या प्रसंगीं याच्यासारखे उद्वेग हरण करणारे दुसरें काहीही नाही. मित्रत्वाच्या योगाने साक्षात मरणाची भीतिही मनुष्य जुमानीत नाहीं. इतका या मित्रत्वाचा प्रभाव आहे. मित्रत्वाच्या योगाने मनुष्यास कसें सुख होतें यांचे वर्णन हितोपदेशांत येणेप्रमाणें केलें आहे:-

मित्र प्रीतिरसायनं नयनयोरानंदनं चेतसः ।
पात्रं यत्सुखदुःखयोः सहभवेन्मित्रेण तद्दुर्लभम् ।। *

परंतु आपणास जे निरनिराळे गृहस्थ मित्र म्हणून येऊन भेटत असतात, ते सारे आपले मित्र होत असें मात्र आपण सहसा मानिता उपयोगी नाही. जे केवळ उपचारार्थ आपल्याशी मोठ्या अदबीने किंवा रहसाळीनें वागत असतात, ते म्हणजे आपले खरे मित्र असतात असें कोणी समजता कामा नये. खऱ्या मैत्रीस परस्परांशी निष्कपट स्नेह लागत असतो. अशा सन्मित्राचे लक्षण हितोपदेशांत येणेप्रमाणे केलें आहेः-

स्वाभाविकं तु यन्मित्रं भाग्येनैवाभिजायते ।
तदकृत्रिमसौहार्दमापत्स्वपि न मुंचति ।। **

मित्राची निवड

मित्र निवडण्याचे काम मोठे कठीण आहे. एक तर तो मोठा सदाचारी असला पाहिजे. कारण त्याच्या अंगीं एकादा दुर्गुण असला तरी तो त्याच्या संसर्गाने आपणास लागण्यासारखा असतो. ज्याला एकादा स्पर्शसंचारी रोग लागलेला असतो, त्याच्या संसर्गास निरोगी मनुष्य असल्यास त्याला तो रोग लागण्याचा

---

* जो नेत्रांत केवळ प्रीतिरूपरसायन आहे, जो चित्तास आनंद देणारा आहे, जो सुखदुःखाच्या प्रसंगीं आपल्याबरोबर रहातो, असा मित्र दुर्लभ.

** अकृत्रिम असा मित्र भाग्याने प्राप्त होतो; अकृत्रिम जें सुत्दृदत्व तें आपत्काळी नाहीसे होत नाही.

संभव असतो. अशीच गोष्ट मानसिक दोषांची आहे. यास्तव मित्र निवडावयाचा तो जितका शुद्ध आचरणाचा असेल तितके चांगले. त्याचप्रमाणे तो ज्ञानी असावा. परंतु असा पुरुष सर्वांसच प्राप्त होण्यासारखा नसतो. ज्यांची मैत्री जमावयाची असते, त्यांच्या ठायीं सदाचाराविषयीं सारखीच प्रीति असल्यामुळें त्यांच स्नेहपाश दृढ झालेले असल्यास त्यांची ती मैत्री उत्तम होय. अशी मैत्री आशा, भय किंवा दुसरा खासगी संबंध यांच्या योगाने कदापि नाहीशी व्हावयाची नाहीं. ती आमरण कायम रहाण्यासारखी असून, तिच्या प्रीत्यर्थ आपले प्राणही देण्यास आपण तयार असतो. कोणी असा प्रश्न करितात कीं, जुन्या मैत्रीमध्यें अधिक सुख आहे कीं नवी संपादण्यांत अधिक आहे. या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचे म्हटले म्हणजे शेतकऱ्यास बी पेरताना विशेष आनंद वाटतो, कीं शेतकापतांना विशेष वाटतो असा उलट प्रश्न केला म्हणजे पुरे. शेतकऱ्यास बीं पेरतांना आपल्या श्रमाचे फळ पुढे प्राप्त होणार आणून आधींच आनंद वाटत असतो; आणि शेत कापतांना आपल्या श्रमाचें फळ प्राप्त झालें म्हणून समाधान वाटत असतें. अशीच स्थिति नव्या संपादावयाच्या मैत्रीसंबंधानें व जुन्या मैत्रीसंबंधानें असते. माझ्याविषयी म्हणाल तर मला ग्रंथावलोकन करण्यांतच समाधान वाटत असतें. तरी माझ्या एकाद्या मित्राने मला पत्र पाठविलें असतां, तें वाचताना तो माझ्याजवळ आहे असें मला भासते. त्याचप्रमाणे त्याच्या पत्रांची उत्तरे लिहितांना त्यांच्याशीं मी जसा काय बोलत आहें असें मला वाटते. आपला मित्र कितीही दूर देशी असला तरी तो आपल्या जिव्हाळ्याचा असतो. त्याच्याकडून आलेली पत्रे वाचिलीं असतां, जसा काय तो आपल्याशी बोलत आहे, आपल्याकडे पाहत आहे, आपणांस दृढालिंगन देत आहे असें वाटतें. मित्रांची परस्परांशी मुलाखत झाली असतां, ते एकमेकांस ज्याप्रमाणें मानितात, त्याचप्रमाणे ते परस्परांपासून दुरावले असताही मानितात. जितके ते एकेमकांपासून दूर असंतात, तितका त्यांचा परस्परांकडे ओढा अधिकच असतो म्हणावयाचें. हाच भाव पुढील पद्यात सुचित केला आहेः-

दूरस्थोऽपि समीपस्थो यो यस्य हृदि वर्तते ।
यो यस्प हृदये नास्ति समीपस्थोपिऽदूरतः ।। ** सु. र.

मित्रांचा जो वेळ खासगी अभ्यासांत किंवा उद्योगधंद्यांत किंवा रात्रीं निजण्यांत एकमेकांस सोडून जातो, त्या खेरीज बाकीच्या वेळीं ते एकमेकांपासून कदापि दूर रहात नाहींत. ते एकमेकास जीव कीं प्राण करीत असतात. त्याला परस्परांहून या दुनियेत काहीएक थोर वाटत नाही. आपल्या सुखदुःखाचा कोणी तरी भागीदार असणे इष्ट होय. मी माझा नित्याचा अभ्यास करीत असताही ज्या गोष्टी इतरांस समजून देण्यासारख्या मला कळतात, त्यामुळें मला फारच आनंद वाटतो. कारण कोणतीही इष्ट गोष्ट असली तरी तिचा उपभोग घेण्यास दुसरा कोणी जिवाचा भागीदार असल्यावाचून तीत गोडी वाटत नाही. मला कोणी जर असें सांगितलें कीं, तुला मी ज्ञान प्राप्त करून देतो, पण तें तूं दुसऱ्यास सांगू नये, तर तें मी निःसंशय नको म्हणून सांगेन.

** जो मनुष्याच्या हृदयांत वसत असतो, तो दूर असला तरी जवळच आहे म्हणून समजावे. परंतु जो मनुष्याच्या हृदयांत वसत नसतो. तो अगदीं जवळ असला तरी दूर आहे म्हणून समजावे.

वाय ५३८-१२

मित्रत्वाच्या ठिकाणी संकोच धरू नये.

जे आपले मित्र आहेत त्यांच्याशी कोणत्याही गोष्टीचा संकोच धरू नये. मैत्री करीपर्यंत जो कांहीं विचार व तपास करावयाचा, तो अवश्य करावा. पण एकदा एकाद्यास मित्र म्हटलें की मग त्याच्या संबंधाने संशय किंवा मत्सर मनांत वागवितां कामा नये. एकाद्या मनुष्याच्या स्वभावाचे वगैरे पूर्ण ज्ञान झाल्यावांचून त्याच्याशी मैत्री करणे हें अगदीं कोत्या बुद्धीचें काम आहे. कोणाशी मैत्री करताना मुळींच घाई करूं नये. चांगला विचार करून व पुढचा मागचा पोच पाहून, एकाद्या मनुष्याशी एकदा मैत्री केली कीं मग त्याच्या संबंधानें दुजाभाव मनांत बिलकुल राहू देऊं नये. माझ्या मनात जे विचार व ज्या कल्पना घोळत असतील, त्या माझ्या मित्राला मी मोठ्या विश्वासानें सांगेन. माझ्या अत्यंत गुह्य गोष्टी व मसलती मी त्याला बिनदिक्कत कळवीन. मनुष्याचा आपल्या मित्रावर किती विश्वास असतो याचे वर्णन हितोपदेशांत येणेंप्रमाणें केलें आहे:-

न मातरि न दारेषु न सौदर्ये न चात्मनि ।
विश्वासस्तादृशः पुमा यावन्मित्रे स्वभावजे ।। *

एकाद्या मनुष्यास विश्वासू बनविण्याचा मोठा उपाय म्हटला म्हणजे तो विश्वासू आहे असें आपण मानितों, असें त्याच्या ध्यानांत आणून देणे हा होय. जो मनुष्य माझ्याविषयी असा संशय धरितो कीं, मी त्याला केव्हा तरी फसवीन, तो मला त्यास फसविण्यास जसें काय प्रोत्साहनच देतो असें म्हटले असतां चालेल. माझ्या मित्राच्या संगतीने असतां मी जसा काय एक, टाच आहे असें मानून आपलें मन मोकळे करून बोलेन. ज्या अर्थी त्याचें माझें दील एक असतें, त्या अर्थी आमच्या उभयतांच्या सुखसोई एकच आहेत असें मी मानीन. कारण मित्रत्वास्तव एकमेकांचे हितसंबंध समान असल्यामुळें जी गोष्ट एकास अनिष्ट असते, ती दुसऱ्यास इष्ट व्हावयाची नाहीं. अशा निष्कपट मित्राचे लक्षण पुढील पद्यांत मोठ्या खुबीने केलें आहेः-

तदेवास्य परं मित्र यत्र संक्रामति द्वयम् ।
दृष्टे सुखं च दुःखं च प्रतिच्छायेव दर्पणे ।। ** सु. र.

तरी पण ज्या सहवासांत प्रत्येक व्यक्तीचे निरनिराळे हक्क नष्ट होण्यासारखे असतात, असा सहवास मला संमत नाहीं. तर मातापितरांचें लक्ष जसे आपल्या लेकरावर सारखेच असतें, तसें मित्रांचे परस्परांवर प्रेम असावें.

मित्रत्व औदार्ययुक्त असावे

मित्रावर जें प्रेम करावयाचें तें योग्य प्रकारचे असावें. कोणताही हेतु मनांत धरून अन्य मनुष्याशी स्नेह करणें म्हणजे मित्रत्वाचा क्रयविक्रय करण्यासारखे होय. काही तरी लाभ होईल अशा उद्देशाने मैत्री करू पाहिल्यानें मैत्रीस लांच्छन लावल्यासारखे होतें. मी आजारी पडलो असतां, किंवा मला दारिद्र्य आले

---

* समान स्वभावास्तव झालेल्या मित्रावर मनुष्याना जसा विश्वास असतो, तसा आईवर, बायकोवर, बंधूवर, किंबहुना आपणा स्वतांवरही नसतो.

** आरशामध्यें ज्याप्रमाणे वस्तुमात्राचे प्रतीबिंब पडते. त्याप्रमाणे ज्याच्या हृदयांत आपल्या मित्राचे सुख पाहून सुख उत्पन्न होते, व दुःख पाहून दुःख उत्पन्न होते, तो त्याचा परम मित्र होय.

असतां, अमुक असामी माझ्या उपयोगी पडेल असें मनांत आणून जो त्याची मैत्री करितो, त्याची बुद्धि अतिनीच होय. खरा मर्द आहे तो नेहमी असें मनांत आणील कीं, मी प्रसंगविशेषी केवळ निरपेक्ष बुद्धीने माझ्या मित्राच्या उपयोगी पडेन. जो आपल्या पुरता विचार करून एकाद्या मनुष्यावर प्रेम करितो, तो मोठी चुकी करितो असें समजावे. काही हेतु मनांत धरून एकाद्यावर मैत्री करू गेल्याने तो हेतू सिद्ध होईपर्यंत मैत्री टिकावयाची. हाच भाव पुढील पद्यांत सूचित केला आहेः-

याचते कार्यकाले यः स किं भृत्यः स किं सुहृत्।
अकार्यकार्यकर्ता यस्त्वनादिष्टो प्यसौ सुत्हृत् ।। *

असे मतलबी मनुष्य जगांत पुष्कळ असल्याकारणाने संपन्न मनुष्या सभोवती त्यांचें मोठे मंडळ जमलेले असतें. तोच मनुष्य विपन्न स्थितीस पोचला असतां, त्याच्या वाऱ्यासही कोणी जात नाहीं. जे कामापुरते मित्र होतात, ते, प्रसंग आला असतां, आपल्या मित्रास सोडून जाण्यास चुकत नाहींत. अशा मतलबी मित्रांस जेव्हां दुसऱ्या कोठे तरी विशेष हित होईल असें दिसून येतें, किंवा अमुक एकाशी आपली मैत्री आहे असें दुसऱ्या कोणास कळले असतां, आपलें नुकसान होईल अशी भीति वाटते, तेव्हां ते त्याची मैत्री तोडतात. कित्येक तर असे नराधम असतात कीं, कांहीं तरी आत्मलाभ दिसला तर आपल्या मित्राशी दगाबाजी करण्यासही चुकत नाहींत. केवळ कांहीं तरी फायद्यासाठी जो एकाद्याशी स्नेह करावयाचा, त्यास मैत्री म्हणण्यापेक्षां करार म्हणणे योग्य होय. पूर्वी जसे लोक परस्परांचे मोठे जिवाचे मित्र होत, तसा कांहींच प्रकार आतां दिसून येत नाहीं. जो तो आपआपला मतलब साधण्यास नेहमी तत्पर असतो. त्याचे सारे बेत व मसलती स्वहित साधण्यापुरत्या असतात तुमची स्थिति अंमळ पालटून तुमच्यावर दुर्धर प्रसंग कोसळला असतां, तुमचे मित्र तुम्हास तत्काळ सोडून जातील. परंतु मी जो मित्र करीन, त्यावर मी माझ्या प्राणाहूनही अधिक प्रीति करीन. त्याचा प्राण वाचतो आहे तर माझा प्राणही देण्यास मी मोठ्या आनंदाने सिद्ध होईन; माझा तर असा समज आहे कीं, जे स्तविक ज्ञानी आहेत, तेच मात्र परस्परांचे खरे मित्र होऊं शकतात. इतर केवळ परस्परांचे सोबती होत. नुसती प्रीति आणि मैत्री यांमध्येंही महदंतर आहे असें मी समजतो. प्रीतीच्यापायीं आपणांस कधीनाकधी काही तरी नुकसान होण्याचा संभव असतो. परंतु मैत्रीच्या योगाने सर्वदा कल्याणच होत असतें. कारण जे खरे मित्र असतात ते सुखदुःखाच्या सर्व प्रसंगीं परस्परांस जीवेंभावें साहाय्य करीत असतात. म्हटले आहेः-

उत्सवे व्यमने चैव दुर्भिक्षे राष्ट्रविप्लवे ।
राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।। **

ज्यांवर आपण प्रीति करितो, ते कितीही दूर असले तरी त्यांपासून आपणांस सुख प्राप्त होतें. परंतु तें केवळ अल्प होय. ते आपल्या संनिध असून आपल्याशी वारंवार संभाषण करीत असले म्हणजे आपलें मन फारच प्रसन्न होतें. इतकेंच मात्र कीं, ते आपल्या मनाजोगे असले पाहिजेत.

---

* स्वतांचा मतलब साधण्याचा वेळ आला म्हणजे जो आपली मर्जी संपादवयास पाहतो, तो कसला सुहृद्? काहीएक कार्य साधावयाचे नसता, जो आपण होऊन उपयोगी पडतो, तोच खरा सुहृद.

** उत्सवाच्या प्रसंगीं संकट प्राप्त झाले असता, दुर्भिक्ष आलें तर, राष्ट्रावरील मोठ्या संकटाच्या प्रसंगीं, राजदरबारी जावे लागल्यास, कोणी जवळचा संबंधी गत होऊन स्मशानांत जातांना, जो आपल्या बरोबर असतो, तोच खरा मित्र.

भाग एकोणिसावा

ज्याला सुखी व्हावयाचें असेल त्यानें आपली वेळ व्यर्थ दवडूं नये

आपल्या आयुष्याचा बराच अंश वाईट काम करण्यांत जातो, याहूनही पुष्कळ अंश काहीएक न करण्यांत जातो; आणि एकंदरींत गोळाबेरीज पाहता आपली सारी उमर आपल्या वास्तविक कर्तव्याशिवाय इतर वायफळ गोष्टी करण्यांतच जाते. प्रत्येक दिवशीं आपले कांहीं तास निरर्थक चालीरीतींच्या अवडंबरांत मोडतात; कांहीं तास बडेजाव मिरवणाऱ्या धनाढ्य व अधिकारसंपन्न पुरुषापुढें वीतभर पोटासाठी हांजीहांजी करण्यांत व गुलामासारखे खपण्यांत जातात; कांहीं तास चैनबाजींत खर्चतात; आणि बाकीचे व्यर्थ आळसांत जातात. आशा, भय, प्रीति, द्वेष, नाच, तमाशे, मेजवान्या, वित्तार्जन, अधिकारप्राप्ति, सरकारदिवाण, इत्यादिकांमध्यें आपला किती काळ व्यर्थ जातो बरें! आपलें आयुष्य अत्यल्प आहे अशी अगदीं मूढापासून तो तत्त्वज्ञापर्यंत सर्वांची सारखीच कुरकुर असते. यावरून त्यांचा असा अभिप्राय झाला असावासे दिसते कीं, हे आपलें आयुष्य या संसारातील कर्तव्ये करण्यास पुरेसे नाहीं. परंतु ही त्यांची भ्रांति आहे. आपलें आयुष्य आणि आपली मालमिळकत यांचें या संबंधाने पुष्कळ साम्य आहे. जो चांगला हात राखून खर्च करणारा असतो, तो आपला संसार थोडक्या ऐपतींत चांगल्या प्रकारे चालवितो. परंतु एकाद्या उधळ्या मनुष्याच्या हाती मोठ्या राजाचीही संपत्ति दिली तरी तो ती वेळ न लागता उधळून पार करितो. अशीच गोष्ट आपल्या वाट्यास आलेल्या उमरीची आहे. तिचा सद्व्यय केला तर या संसारामध्यें आम्हा मानवास जी कर्तव्ये करावयाची आहेत, तीं सारी आम्हांस उत्तम प्रकारे बजावितां येतात. परंतु आपण असे मूढ असतों कीं, ही बहुमोल उमर आपण लोभ, मद्यपान, निद्रा, ऐषआराम, महत्त्वाकांक्षा, हांजीहांजी, मत्सर, अहेतुक प्रवास, अप्रयोजक विषयांचा अभ्यास वगैरे गोष्टीमध्ये व्यर्थ दवडितों. याप्रमाणे आपल्या उमरीचा अपव्यय केल्यावर मग तिची न्यूनता आपणांस वाटू लागते. आम्ही आपला काळ मनास वाटेल त्या ढगांमध्ये निरर्थक घालवीत असतो. त्याच्या अपव्ययाचा विचार आपल्या कधीं मनातही येत नाहीं. परंतु अशा अविचारांने आपण आपलें आयुष्य कमी करीत असतो. तें तसें मूळचेंच आहे असें म्हणणें हा भ्रम होय. कित्येक लोक असे असतात कीं, ते आपला सगळा वेळ आपल्याशींच गुंगण्यात किंवा आपल्या मनाशीं मोठे मोठे हिशोब करून मनोराज्यांत गढण्यांत घालवितात. दुसरे कित्येक असतात ते गाणीं गाण्यांत, ऐकण्यांत किंवा नवी बनविण्यांत आपला काळ दवडितात. नट्टापट्टा करण्यासाठीं व चांगला नाकझोक साधण्यासाठीं दररोज सकाळचा किती वेळ आपण हजाम, शिंपी वगैरे लोकांच्या सहवासांत घालवितो बरें? आपला केशकलाप सुबक व्हावा व आपली झुलपें, कल्ले, वगैरेचा एक केसही इकडचा इकडे होऊं नये म्हणून आपण किती बारीक नजर पुरवितों? जसे काय केसांच्या सुबकपणावर आपलें सारे जीवित अवलंबून

असतें! याप्रमाणें आपला नोकझोंक व पेहराव या विषयीं आपण इतके जपत असतो; पण आपले आचारविचार कसे आहेत याविषयीं आपल्या मनांत कधीं कांहीं येत नाहीं. तेव्हां तात्पर्य काय कीं, आपल्या शंभर वर्षांच्या उमरींतून जो काळ प्रपंचाच्या खटपटी, सुलक अशा इषकबाजी, गृहकलह, इकडेतिकडे व्यर्थ भटकणे, दुराचारामुळे ओढवलेल्या रोगराई इत्यादिकांमध्यें आटतो, तो आपण वजा केला असतां कितीशी उमर शेष रहाते बरें? याप्रमाणें आपण आपल्या आयुष्याचा जो क्षय करीत असतों, त्याचें आपणांस कांहींच वाटत नसतें. याचें एक कारण असें आहे कीं, आपणांस मरण कदापि प्राप्त होणार नाहीं असें वाटत असतें. त्याचप्रमाणें आपलें आयुष्य केव्हां खुंटून आपणांस मृत्यु येईल याचा नेम नसतो, ही गोष्ट आपल्या ध्यानात वागावी तशी वागत नाहीं. हेंही एक या अविचारास सबळ कारण आहे. वास्तविक स्थिति पाहतां आपण जो प्रत्येक क्षण व्यर्थ घालवीत असतों, तो आपला कदाचित् शेवटलाच असण्याचा संभव असतो. आयुष्याच्या क्षणभंगुरतेचे वर्णन पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकारे केलें आहे :-

नलिनीदलगतजलमतितरलं
तद्वज्जीवितमतिशयचपलम्।
विद्धि व्याधिव्यालग्रस्तम्
लोकं शोकहतं च समस्तम्।। सु. र.*

आपला जो काळ स्वकर्तव्य लांबणीवर टाकण्यांत किंवा पुढील काळावर दृष्टि ठेवून व्यर्थ आशा करण्यांत निघून जातो, तो अगदींच व्यर्थ गेला म्हणून समजावें. हा आयुष्यनाश अत्यंत वाईट होय. वर्तमानकाळ जो आपल्या स्वाधीनचा आहे, तो आपण निरर्थक हातचा दवडितों; आणि जो पुढला काळ आपल्या दैवगतीवर अवलंबून असतो, त्यावर आपण भरंवसा ठेवून रहातों, आणि याप्रमाणें हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यासारखा वेडेपणा करितों. पावसाची मोठी सर लागून नदीला आलेला पूर क्षणांत ओसरण्यासारखा असतो. यास्तव त्याचा जो कांहीं उपयोग करून घ्यावयाचा, तो त्वरित घेणे उचित होय; तद्वत्च आपल्या काळाचें आहे. तो केव्हां आटपेल याचा नेम नाहीं, असा विचार मनांत आणून जें कांहीं सत्कर्म करावयाचें तें करण्यास आपण सर्वदा तत्पर असावें. शुक्रनीतीमध्यें हाच बोध केला आहे:-

स्थितो मृत्युमुखे चाहं क्षणङ्कायुर्ममस्ति न।
इति मत्वा दानधर्मौ यथेष्टौ तु समाचरेत् ।। **

आपल्या आयुष्यापेक्षां आपण आपल्या दैवगतीचीच परवा अधिक करितों

आपला दैवयोग, आपली वरे, आपली दौलत वगैरेची मनुष्य जितकी परवा करितात, तितकी ते आपल्या आयुष्याची करीत नाहींत, हा त्यांचा मोठाच मूर्खपणा आहे. या मूर्खपणाचे वर्णन जितके करावें तितकें थोडेंच आहे. आपल्या दौलतीवर कोणी हल्ला केला असतां, त्याच्याशीं प्रसंग पडल्यास प्राणांतकलह

* हें जीवित कमलिनीच्या पानावरील पाण्याप्रमाणे अतिशयित चंचल आहे; त्याचप्रमाणें व्याधिरूप सर्पानें ग्रासलेला असा हा समस्त लोक केवळ शोकाकुल आहे.

** मी मृत्यूमुखी उभा आहें; माझें आयुष्य केवळ क्षणाचें आहे; असें मनांत आणून दानधर्मांचे येथेष्ट आचरण करावें.

करण्यासही आपण मागेंपुढें पाहत नाही. परंतु आपला काळ कोणीं व्यर्थ घालविला असतां, त्याचें आपणांस कांहींच वाटत नसतें. आपल्या वडिलार्जित दौलतीचा कोणी हिस्सा मागूं लागला तर तो आपण कदापि देणार नाहीं. परंतु आपला वेळ दुसऱ्याने केवळ चैनीखातर कितीही व्यर्थ घालविला तरी त्याचें आपणांस कांहीं वाटत नाहीं. जसा काय आपणांपाशीं वेळ हवा तितका आहे. तेव्हां त्यांतला थोडासा दुसऱ्यानं घेतला म्हणून काय झालें? असें आपणांस वाटत असतें. वस्तुत: पाहता आपणांपाशीं फारच थोडा वेळ असून, त्याचें रक्षण व विनियोग आपण अत्यंत मोठ्या कृपणाप्रमाणें करणें उचित होय. म्हणूनच म्हटलें आहे कीं: **'अल्पच कालो बहवश्च विघ्ना:'**** आपला एकादा मित्र येऊन आपणांस म्हणत असतों कीं, माझें अमुक एक काम आहे; त्याप्रीत्यर्थ तुझे एक दोन तास मोडतील. तर तेवढे माझ्यासाठी मोड. ही त्याची विनंती आपण तत्काळ मान्य करून त्याला मदत करावयास जातों. असें करितांना आपला किती बहुमोलाचा काळ गेला त्याचा विचार आपण मनांत आणीत नाहीं. तर त्या आपल्या मित्राच्या प्रसंगावरच केवळ दृष्टि ठेवितों. वस्तुतः पाहतां आपल्या वेळेइतकें दुसरें कांहीही मोलवान् नाहीं. तरी त्याचा आपण मुळींच हिशोब ठेवीत नाही. आपणांस त्याचें कांहींच वाटत नसतें. आपला वेळ अगदीं बेताचा आहे. हरघडीस तो कमीकमी होत चालला आहे. त्याचा क्षय कदापि विराम पावणे नाहीं. म्हटले आहे: **'निमेषमात्रमपि ते वयो गच्छन्न तिष्ठति.'***** हा वेळ अधिक करण्याचें सामर्थ्य कोणाच्या हाती नाहीं. प्रत्येक मनुष्याची इच्छा अशी असते कीं, आपण दीर्घायु व्हावें. जें आयुष्य आपणांस प्राप्त झालें आहे, त्यामध्यें नीतीने वागण्यास झटावें, असा विचार फारच थोड्यांच्या मनांत येतो. परंतु खरें पाहतां जर कोणी म्हणेल कीं, मी माझें आयुष्य आहे तोपर्यंत सद्वर्तन करीन, तर हा त्याचा संकल्प सिद्धीस जाण्यासारखा आहे. परंतु तो जर म्हणेल कीं, मी आपलें आयुष्य दीर्घ करण्यास झटेन, तर तें त्याला कदापि साधण्या सारखें नाहीं. आम्ही आपल्या जीवितरक्षणाच्या उपायामध्येच बहुतेक आयुष्य वेंचीत असतों; आणि पुढें आपली स्थिति कशी होईल हा विचार मनांत वागवून व्यवहारांत वर्तत असतों. असा पुढला विचार करण्यांत गुंग झाल्यामुळें वर्तमानकाळीं आपल्या हातून योग्य वर्तन होण्याचा संभव कमी असतो.

वर्तमान, भूत आणि भविष्य

आपल्या आयुष्याचे विभाग तीन होतात ते वर्तमान, भूत आणि भविष्य हे होत. आम्ही जें कांहीं वर्तमान काळी करीत असतो, तें आपल्या हातून फार वेळ घडेल याचा नियम नसतो. जें आपण पुढें करणार म्हणतों, तें आपल्याहातून होईल याविषयी संशय असतो. परंतु जें आपण करून चुकलों आहों त्याबद्दल मात्र मुळींच शंका नसते. त्याची निष्कृति आतां कशानेंही व्हावयाची नाहीं. काळ हा अतिशयित चपल आहे. तो केव्हां निघून जात असतो तें समजत सुद्धा नसतें. यासाठीं आपण गत कालावर दृष्टि ठेवून वर्तमान काळीं वागत असावें. असें जो सिंहावलोकन करील, त्याच्या दृष्टीपुढे मागच्या कैक पिढ्यांचा अनुभव उभा राहील. वर्तमान काळ मात्र आपणांस केव्हां कसा फसवून चालला आहे तें कळत नाहीं. आपले आयुष्य केवळ जलबुद्बुदवत् आहे. तें केव्हां खुंटेल याचा नेम नाहीं. या अत्यल्प आयुष्याचे पुन: बाल्य,

** काळ अल्प आहे आणि विघ्ने पुष्कळ आहेत.

*** तुझें वय क्षीण होत चालले आहे, तें निमेषमात्रही थांबणारें नव्हे.

तारुण्य, प्रौढता, व वार्धक्य असे आणखी विभाग होत असतात. यासाठीं आपण प्रत्येक घडी व्यर्थ न घालविण्याविषयीं जपलें पाहिजे. स्वकर्तव्य करण्याचा जो प्रसंग येईल, तो निरर्थक जाऊं देऊं नये. आपण सुस्तपणें पडून राहून काळ दवडिला तर आपण मागें पडूं. आपला उत्तम काळ आपण व्यर्थ घालवूं नये. आपणांस पुढें कसा काळ येईल याचा कांहीं नेम नसतों. कदाचित् विपरीत काळ येऊन आपणांस गत काळ व्यर्थ खर्चिल्याबद्दल आमरण पश्चात्ताप करीत रहावें लागेल. आपलें पूर्व वय फारच चांगले असतें. तें आपण निरर्थक वेंचीत असतो; आणि उत्तर वय जें अगदीं निकृष्ट असतें, तें आपण सदाचाराकडे लावण्याचा प्रयत्न करितो. परंतु हा समय अगदीं निरुपयोगी असतो. या वयांत नीतीनें चालण्याचे कितीही प्रयत्न केले तरी ते व्यर्थ जावयाचें. आधीं वार्धक्यावस्था सर्वांसच प्राप्त होण्याचा संभव नसतो तेव्हां अशा वयांत नीतीनें वागण्याचा बेत करून पूर्ववय दुराचारांत घालविणे हा मोठाच मूर्खपणा होय. जो आपलें पूर्ववय व्यर्थ घालवितो, आणि अनिश्चित अशा भविष्य काळावर भरंवसा ठेवून रहातो, त्याचें या संसारांत अत्यंत मोठे नुकसान होतें; आणि त्याच्यासारखा मूर्ख या दुनियेत दुसरा कोणीही नाही. एका कवीचा या प्रकरणीं असा बोध आहे कीं, **'पूर्वे वयसि यत्कुर्यादेन वृद्धः सुखं वसते.'***

आपल्या वेळेव्यतिरिक्त आपलें असें दुसरें कांहींएक नाहीं

या संसारांत आपणांस आपली अशी म्हणतां येण्याजोगी आपल्या वेळेवाचून दुसरी कोणतीही वस्तु नाही. परंतु या आपल्या कालरूप वित्ताचा अपहार जो तो विनाकारण करीत असतो. एकाद्या मनुष्याने आपल्याकडून थोडेसे पैसे उसने घेतले असतां, आपण त्याबद्दल त्याच्याकडून रोखा लिहून घेतो, आणि ती आपली रक्कम बुडू नये म्हणून जामीन किंवा दुसरा कांहीं तरी ऐवज गुंतवून ठेवण्याची खबरदारी घेतों. अशा व्यवहारांत आपण कोणाची भीडमुरवत काहींएक धरीत नाहीं. परंतु कोणी आपला वेळ व्यर्थ दवडिला असतां, त्याबद्दल आपणांस कांहींच वाटत नाहीं. वास्तविक पाहता हें कालरूप ऋण इतकें जबर असतें कीं, तें मनुष्याने कितीही कृतज्ञता दर्शविली तरी सहसा फिटणारे नव्हे. ज्याचा अगदीं थोडा वेळ उरला आहे, त्याला हतभाग्य म्हणतां येत नाहीं, हें खरें आहे. पण ज्याच्यापाशी अजून पुष्कळ काळ आहे, त्याला मात्र अशी सूचना आहे की, त्यानें आपल्या काळाची काटकसर करण्यास कदापि चुकूं नये. कारण एकदा आयुष्याचा क्षय झाला म्हणजे तें पुनरपि प्राप्त होणारे नव्हे. जो माझा एक दिवस व्यर्थ घालवितो, त्याला तो पुनः कदापि मला मिळवून देता येणार नाहीं. आमचा वेळ एक तर कोणी तरी आमच्याकडून जुलूमजबरीनें हिरावून घेतो, किंवा

आपणांस न कळत तो त्याचा अपहार करितो, किंवा आपण होऊन तो व्यर्थ दवडितो. यापैकी आपल्या स्वतांच्या मूर्खपणामुळें जो कालनाश होतो, त्या सारखा दुसरा कोणताही नाश खेदप्रद नाहीं. या व्यर्थ कालक्षेपाबद्दल भतृहरि पुढील श्लोकांत येणेंप्रमाणें अनुताप प्रगट करितो:-

* पूर्ववयांत मनुष्यानें असें आचरण करावें कीं, जेणेंकरून त्याला वृद्धापकाळीं सुखानें रहातां येईल.

अनावर्ती कालो व्रजति स वृथा तन गणितं
दशास्तास्ताः सोढा व्यसनशतसंपातविधुराः।
कियद्वा वक्ष्यामः किमिव बत नात्मन्यपकृतं
किमस्माभिर्यावत्पुनरपि तदेव व्यवसितम्।। *

एकंदरींत काय कीं, आपण आपला काळ आपली सुधारणा करण्याकडे लाविला पाहिजे. असें असतां तो आपण व्यर्थ वेंचीत असतो. जे नाना व्यसनांमध्ये अगदीं गढून जाऊन व्यर्थ कालक्षेप करितात, त्यांवरच माझा कटाक्ष आहे असें कोणी समजू नये. तर ज्यास लोक मोठे सुखी समजतात, आणि जे ऐषआरामीमध्यें अगदीं गुंग झाले असतात, अशांलाही माझे सदरील विवेचन लागू आहे. एकादा मनुष्य मोठा गर्विष्ठ असून, आपल्या मोठेपणाचा त्याला ताठा असला म्हणजे आपण म्हणत असतों कीं, हा मनुष्य मोठा उद्दाम आहे; याला माणूस मुळीं दिसतच नाहीं. परंतु या अशा मनुष्याहूनही आपलें स्वतांचें आचरण वाईट असतें. आपल्या हातून घडणारा अविचार आपणांस कोणी कितीही वेळां दाखवून दिला किंवा सांगितला, तरी त्याकडे आपण डोळेझाक करून त्याचा बोध कानामागें टाकतों. तेव्हां हा आपला केवढा उद्दामपणा आहे बरें?

मंडळींत जाऊन बसणेंउठणें व उद्योगधंदा यांमध्ये पुष्कळ काळ जातो

आपल्या दुर्व्यसनामध्ये आणि दुसऱ्या अनेक प्रसंगांमुळे जसा आपला आयुष्यनाश होत असतो, तसाच तो मित्रमंडळींत जाऊन बसण्याउठण्यांत आणि उद्योगधंद्यांत होत असतो. वर्तमान काळ हा केवळ क्षणांत नष्ट होणारा आहे. तो जलप्रवाहाप्रमाणें एकसारखा लोटत चाला आहे. भूतकाल मात्र आपल्या स्मरणांत हवा तेव्हां येणारा असतो. तेव्हां अर्थात् तो काळ आपण कसा दवडिला याचें परीक्षण व तपास करण्याचें आपणांस अनुकूल असतें. परंतु जो मनुष्य उद्योगधंद्यांत अगदीं गुंतून गेला असतो, त्याला हें भूतकालपरीक्षण करण्यास मुळींच फुरसद सापडत नसतें. यदाकदाचित् अशा मनुष्यास आपल्या पूर्वचरित्राचें परीक्षण करण्यास अवधि सांपडलाच तर त्याला असें करणे मुळींच आवडत नसते. कारण त्याला असा अनुभव असतो कीं, त्यानें जें भूतकालीं आचरण केलें असतें, त्याची आठवण झाली असतां, त्याबद्दल त्यास पश्चात्ताप वाटतो. जो गत काली नीतीने वागला असतो, त्याला त्या आपल्या सदाचाराचें स्मरण झालें म्हणजे समाधान वाटतें. हें त्याचें समाधान कशानेही नष्ट होण्यासारखे नसतें; परंतु ज्यानें गतकालीं दुर्वर्तन केलें असतें त्याला त्या दुर्वर्तनाची आठवण भयावह असते. कारण त्याला आत्मपरीक्षण केल्यानें असें आढळतें कीं, आपण आपलें आयुष्य सदाचारांत घालविण्याऐवजीं दुर्वासना, लोभ, महत्त्वाकांक्षा इत्यादि दुर्वृत्तींस वश होऊन कुकर्म करण्यांत वेंचिलें अशा दुराचारी मनुष्यानें हें ध्यानांत वागविलें पाहिजे कीं, त्याला

* मनी नाणी केव्हां परतुनि नये काळ सरतां दशा भोगीं दुःखे बहुतचि जयांतें विकळता अहो केला नाहीं कवण अपकार स्वविषयीं जरी त्या त्या कृत्यीं फिरुनि मजला तीच सवयी. वामन.

असें जीवित पुनःपुनः प्राप्त होणारें नसून, जें प्राप्त झालें आहे. तें वेळ आली म्हणजे आटपून त्यास मृत्युवश व्हावें लागेल. आपल्या या क्षणभंगुर मानवी जीविताची अनंत कालाशी तुलना केली असतां, तें किती बरें अल्प आहे? असें असूनही या अत्यल्प जीविताचा पुष्कळसा अंश बाल्य, भय, शोक व चिंता यां मध्ये व्यर्थ जात असतो. आपलें अर्धें आयुष्य तर नुसतें निद्रेमध्ये क्षय पावतें. या आयुष्यक्षयाविषयी पुढील वचनांत उत्तम प्रकारें निरूपण केलें आहे :-

आयुर्वर्षशतं नृणां परिमित रात्रौ तदर्धं गतम्
तस्यार्धस्य परस्य चार्धमपरं बालत्ववृद्धत्वयोः।।
शेषं व्याधिवियोगदुःखसहितं सेवाभिर्नीयते
जीवे वारितरंगबुद्बुदसमे सौख्य कुतः प्राणिनाम् ।। सु. र. *

शिवाय ऐषआराम, व्यसनासक्ति, पाहुणचार, आदरोपचार, मेजवान्या, सेवकपरिवार यामध्ये आपण पुष्कळ काळ व्यर्थ दवडितों. भोजनादि जीं क्षुधातृषादि तृप्तीची साधनें, तीं आपण फुगवून त्यांचें अवडंबर इतकें माजवितों कीं, नैसर्गिक गरजांच्या तृप्तीपेक्षां केवळ डामडौलाकडे व थाटमाटाकडेच आपलें लक्ष अधिक लागतें. परंतु अशा उपद्व्यापांमध्यें आपला पुष्कळ काळ व्यर्थ जातो. दिवसभर उद्योगधंदा करून मिळविलेली जी रात्रीची विश्रांति, ती मद्यपानांत किंवा इतर ढंगांत वेंचिली असतां, रात्रीचा समय व्यर्थ दवडिल्यासारखें होतें. अशा जनांचा सर्व दिवस रात्रीचा समय येतो केव्हां याची वाट पाहण्यांत जातो; आणि सकाळी उठलें म्हणजे आपली दशा काय होईल या विवंचनेंत रात्र जाते. आपल्या विषयवासना तृप्त करण्यांत मोठाच धोका असतो. तरी याहूनही वाईट काय म्हणाल तर त्यांच्या तृप्तीपासून होणारें सुख अगदीं अल्प काळ टिकणारें असतें. जे मोठे धनवान् व भाग्यवान् असतात, त्यांनासुद्धां जें सुख अनुकूल असतें तें फार वेळ रहाणारें नसतें. तेव्हां असा हा क्षणभंगुर सुखानुभव व्हावा म्हणून खटपट करण्यामध्यें आपल्या जीविताचा क्षय करण्यांत काय अर्थ आहे बरें? एका संस्कृत कवीने आत्मपरीक्षण करण्याविषयीं एका वचनांत बोध केला आहे. त्याचें अवतरण या भागाच्या शेवटीं केलें असतां शोभणारे आहे. तो कवि म्हणतो :-

नक्त दिनानि मे यान्ति कथं भूतस्य संप्रति ।
दुःखभाङ् न भवत्येवं नित्यं सन्निहितस्मृतिः ।। सु. र.**

---

* मनुष्याचें आयुष्य केवळ शंभर वर्षें आहे. त्यांतले अर्धे रात्रींत गेलें; बाकी अर्धें राहिले त्यांतला अर्धा हिस्सा बाळपण व वृद्धपण यामध्ये गेला. बाकी उरलेले आयुष्य व्याधि सुत्दृद्वियोग व दुःख यांनी युक्त असें सेवादिकांमध्यें जावयाचें तेव्हां अशा ह्या पाण्यावरील बुडबुड्या सारख्या क्षणभंगुर जीवितामध्यें प्राण्यांस कोठून सुख व्हावयाला?

** सांप्रत कोणत्या प्रकारे माझे दिवस व रात्री जात आहेत, अशी जो नित्य आठवण करीत असतो, त्याला दुःखाचा अनुभव कदापि घडावयाचा नाही.

भाग विसावा

ज्यास आपल्या धंद्याची निवड करण्याचें अनुकूल असतें, तो पुरुष सुखी समजावा

ज्याला आपलें आयुष्य एकांतवासांत घालविता येऊन ज्याला पुष्कळ फुरसद मिळते, तो मोठाच सुखी समजावा. मोठमोठे अधिकारसंपन्न व प्रख्यात पुरुष या दोन्ही स्पृहणीय गोष्टी प्राप्त व्हाव्या म्हणून इच्छित असतात. परंतु अशा पुरुषाच्या कपाळीं या गोष्टी नसतात. जे गरीब असून ज्यांच्या पाठीशीं फारसा उपद्व्याप नसतो, त्यांस मात्र एकांतांत रहाण्याचें अनुकूल असतें. जे पुरुष मोठ्या पदास चढले असतात, त्यांचा बहुतेक काळ घालमेलींत आणि संकटांत जात असला, तरी जर त्याला शेवटीं एकांतवास प्राप्त होऊन सर्व दगदगीपासून मुक्त होण्याची आशा असली, तर त्यांना तेवढ्यापुरतें समाधान वाटत असतें. ऑगस्टस् बादशहा देवापाशी सदोदित अशी प्रार्थना करीत असे कीं, ह्या सार्वजनिक व्यापापासून आपली मुक्तता होऊन आयुष्याचे शेवटले दिवस आपणास एकांतांत घालविता यावे. या आशयाची त्याचीं कांहीं भाषणेंही उपलब्ध आहेत. या महापराक्रमी पुरुषाचा अभिप्राय असा होता कीं, राजपद हें कितीही वैभवाचें व भव्य असलें, तरी त्याच्या मुळाशी चिंता आणि विवंचना ह्या आहेत. यास्तव या पदापासून माझी मुक्तता झाल्यास मला मोठेच सुख प्राप्त झालें असें मी समजेन. परंतु येथें हें लक्षांत वागविलें पाहिजे कीं, केवळ निश्चितपणे सुखानुभव घेतां यावा म्हणून सर्व दगदग सोडून एकांतांत रहाणें, व आपली नीतिमत्ता वाढावी म्हणून लौकिक व्यवहाराचा त्याग करणें या दोहोंत महदंतर आहे. ज्याला आपलें आचरण व वृत्तिहीं सुधरावयाची असतील, त्यानें स्वतांस प्राप्त झालेल्या नीतिबोधाप्रमाणे वागण्याविषयीं अहर्निश प्रयत्न केला पाहिजे. संसाराचा सर्व व्याप त्यानें सोडला तरी त्याला स्वस्थ बसता येणार नाहीं. कारण जो मनुष्य सदाचारी व ज्ञाता असतो, तो, आपल्या संततीचे कल्याण ज्या गोष्टींनीं होण्यासारखे असतें, त्या मनापासून करण्यास प्रवृत्त होतो. तत्ववेत्त्यांनीं एकांतांत बसून आपल्या ग्रंथांची पुनःपुनः पारायणें करून जेवढें लोककल्याण केले आहे, त्यांनीं मोठमोठ्या सेना वागवून, शत्रूंशी सामना करून, किंवा मोठमोठे हुद्दे चालवूनही त्यांच्याहातून झालें नसतें. त्यांनीं एका विवक्षित राष्ट्रासाठी कायदे केले नसले तरी त्यांनीं सर्व मानवजातीच्या आचरणाचें नियम घालून ठेविले आहेत. त्यांनीं एकांतांत बसून मानवजातीचें जेवढें कल्याण केलें आहे, तेवढे इतर सहस्रावधि मनुष्यांच्या श्रमानेंही झालें नाहीं. मनुष्याच्या हातून एकांतवासांत उद्योगधंद्याहून विशेष चांगले व परोपकाराचें कृत्य घडले नाही तर तो एकांतवास काहीएक उपयोगाचा नाही. ज्याला एकांतवास साधला, त्याला मोठमोठ्या हुद्देदारांची थुंकी झेलण्याची गरज नाहीं. मोठ्या किफायतीच्या जागा मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांची पायधरणी करण्याचा प्रसंग त्यास येत नाही. फळ्या करून आपल्या विरुद्ध पक्षाचे बेत हाणून

पाडण्याचा प्रयत्न करण्याची त्याला आवश्यकता उरत नाहीं. एकादा हुद्दा किंवा अंमलदारी मिळावयाची असून ती प्राप्त न झाल्यामुळें होणाऱ्या निराशेचें दुःख त्यास सहन करावें लागत नाहीं. तर निसर्गसिद्ध जीं शांत सुखें, जी सर्वांस सारखीं प्राप्त होण्यासारखीं असतात, त्यांचा अनुभव तो निश्चिंतपणें घेत असतो; आणि त्याचें मन शांत व निष्पाप असतें. या निसर्गाचें वैभव स्वस्थपणें पाहून त्यावर पुनःपुनः मनन करण्यांत त्याचा सगळा वेळ जात असल्यास त्याच्यासारखा उद्योगी कोणींच नाही म्हणून समजावें. तो आपल्या उरलेल्या आयुष्याचा व्यय पुढील पिढ्यांच्या कल्याणाप्रीत्यर्थ करितो. जो बोध त्याला स्वानुभवावरून मनुष्यजातीच्या कल्याणाचासा वाटतो, तो तो लिहून ठेवितो. असा मनुष्य विद्याभ्यासांत जो काळ घालवितो, तो तो व्यर्थ घालवितो असे सामान्य जनांस वाटत असलें तरी तो इतर जनांहून पुष्कळ चांगलें असें मनुष्य जातीचें कल्याण करितो, असें समजलें पाहिजें. एकाद्या मनुष्यास द्रव्यसहाय्य करणें किंवा त्यास एकादा हुद्दा मिळावा म्हणून आपला शब्द खर्चिणे, हे फक्त एक एका व्यक्तीपुरते उपकार केल्यासारखे होतात. परंतु आपण या संसारामध्यें कसें वर्तन करावें, आणि आपल्या वासनांचे कसें दमन करावें, याविषयीं जो आपणांस नियम घालून देतो, तो केवळ आपल्या वेळच्या पिढीचेंच कल्याण करितो असें समजूं नये, तर पुढील सर्व पिढ्यांचेही तो कल्याण करितो असें मानिलें पाहिजे.

कांहीं झालें तरी मनुष्यानें स्वातंत्र्य मिळवलें पाहिजे

मला स्वतंत्रता कशी प्राप्त होईल याविषयीं माझ्या मनांत सर्वदा विचार घोळत असतात. द्रव्यप्राप्तीसाठीं आम्ही नाना संकटे सोसण्यास तयार असतो; आणि मान्यता मिळविण्याकरितां हवे ते श्रम करण्यास राजी असतों. परंतु आपण रिकामपण किंवा स्वतंत्रता मिळावी म्हणून कांहींच खटपट करीत नाहीं हें कांहीं चांगले नव्हे. आपण स्वतंत्रता व स्वस्थता प्राप्त करून घेण्याविषयी उद्योग केला नाहीं तर आपणांस सर्वदा घालमेलींत व दगदगींत राहून मरावे लागेल. कारण जोपर्यंत आपण लौकिकांत वागत असतो, तोपर्यंत उद्योग धंद्याचा व्याप आपल्या पाठीशीं नित्य लागलेला असतो. समुद्राच्या लाटा जशा एकीवर एक उसळत असतात, तशी आपली व्यवहारांत स्थिति होत असते. आपण कितीही शांत व संकोचशील होण्याचा प्रयत्न केला, तरी आपणांस व्यवहारांत कांहींना कांहीं तरी दगदग करावी लागते. जसा एकादा मनुष्य पाण्याच्या भोंवऱ्यांत ओढला जाऊन, त्याला त्यांतून सुटून जाणें मुष्किलीचें असतें तद्वत् आपली व्यवहारांत स्थिति होते. जो मनुष्य उद्योगधंद्यात निमग्न असतो, तो या संसारांत योग्य रीतीनें वर्तत असतो असें म्हणतां येत नाहीं. संसारांत कसें वर्तन करावें हें हजारामध्ये एकाला देखील चांगलेंसे कळत नसतें. ज्याचें आयुष्य सर्वदा चिंतेत जातें, त्याला या संसारांत विपत्ति भोगावी लागते. ज्याला दुसऱ्याची सेवा सर्वकाळ करावी लागते, त्याच्या सारखी विपत्ति तर दुसऱ्या कोणाचीही नाहीं. मोरोपंताचें पुढील वचन प्रसिद्धच आहे : 'फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच. ज्यांची सेवा करावयाची ते मोकळीक देतील तेव्हां खावें,' प्यावे व निजावे; ते जातील तिकडे त्यांच्या मागून जावे; ते ज्यांचा द्वेष किंवा प्रीति करितील त्यांवर द्वेष किंवा प्रीति करावी, असा ज्यांचा क्रम असतो त्यांच्या सारखें दुःसह दास्य दुसरें कोणतेंही नाहीं. आतां

व्यवहारांतील काम धंदा साधेल त्यानें सोडावा असें जरी आहे, तरी तो भलत्याच वेळीं सोडू नये. तो सोडला असतां उदरनिर्वाहाची वगैरे अडचण पडणार नाहीं असें दिसून आलें म्हणजे मात्र तो सोडण्यास विलंब लावूं नये. या प्रकरणी जितकी आपण दिरंगाई करूं, तितका आपल्या स्वातंत्र्यास धोका येण्याचा संभव अधिक असतो. परंतु उद्योगधंदा सोडण्याचा योग्य वेळ घेण्यापूर्वी विनाकारण घाई करून मग पश्चात्ताप करीत बसूं नये. त्याचप्रमाणें हा योग्य वेळ आल्यावर एका क्षणाचाही विलंब लावू नये. आतां हें खरें आहे कीं, कित्येक लोकांला कांहीं तरी उद्योग असल्यावाचून मुळीच चैन पडत नाहीं. म्हणून ते कांहींना कांहीं धंदा काढून त्यांत आपला वेळ घालवीत असतात. अशी त्यांची अवस्था असण्याचें कारण उघडच आहे कीं, त्याला विचार करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळे मानसिक सुखाचा त्यांस अनुभव घडत नाहीं. ते एकटे असले म्हणजे त्यांचा वेळ जातां जात नाहीं. त्यांना प्रत्येक तास अगदी कंटाळवाणा वाटतो. त्यांनीं दुसऱ्यांचा कामधंदा सोडला तरी ते आपलेंच कांहीं तरी काम काढून त्यांत गढून जातात; आणि जगास असें भासवितात कीं, आपण मोठे उद्योगी आहो. अशा मनुष्यांना स्वतंत्रता नकोशी वाटत नाहीं. तिची ते नेहमीं इच्छा करितात. परंतु त्याला ती कशी प्राप्त करून घ्यावी तें कळत नसतें. ही वस्तु अशी आहे कीं, तिचा क्रयविक्रय करितां येत नाहीं. ती ज्याची त्यानें प्राप्त करून घेतली पाहिजे. जो लौकिकांत सदाचारानें वागतो अशी प्रख्याति असते, त्यानें आपणास एकांतातही नीतीनें वागता येते किंवा कसें तें पाहावे. असें करावयाचें म्हणजे त्यानें लौकिकाचा त्याग करून व सर्व संसाराचा व्याप सोडून स्वस्थपणें एकांतांत कालक्रमणा करण्याचा निर्धार केला पाहिजे. अशा मनुष्याने पुढील लोकांतला बोध ध्यानीं धरावा :-

नित्यानित्यविचारणप्रणयिनी वैराग्यमेक सुहृद्
मित्राण्येव यमादयः शमदमप्राया सखायो मताः ।
मैत्र्याद्याः परिचारिकाः सहचरी नित्यं मुमुक्षा बलाद्
उच्छेद्या रिपवश्च मोहममतासंकल्पवैरादयः ।। सु. र. ✻

निरनिराळे लोक निरनिराळ्या उद्देशानें उद्योगधंद्यापासून निवृत्त होतात

ज्याचें बरेंच आयुष्य मोठ्या दगदगींत व संकटप्रसंगांशीं टक्कर देण्यांत गेलें असतें, त्यानें सारा उपद्व्याप सोडून एकांतांत राहून स्वास्थ्याचा अनुभव घेऊन आपले शेवटले दिवस घालवावे हें युक्त होय. परंतु ह्या निवृत्तीचा त्यानें डौल मिरवू नये; आणि अशा स्थितीमध्यें त्यानें आपलें मन शांत व स्थिर राखावे. पूर्व कर्माची त्यास टोंचणी नसावी. त्यानें कोणत्याही ऐहिक गोष्टीची आशा, भीति, द्वेष किंवा प्रीति धरू नये. हाच बोध भतृहरिकृत पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकारे केला आहे:-

---

✻ नित्य काय व अनित्य काय या संबंधाची विचारणा हीच आपल्या परम प्राप्तीची स्त्री; वैराग्य हेंच आपले सत्दृढ होय. यमानियमादि जे योगाचे अनेकविध प्रकार तेच आपले मित्र होत. शमदमादि जे सहा प्रकार ते आपले सखे होत. मैत्री आदिकरून आपल्या परिचारिका होत. मुमुक्षा आपली नेहमींची सहचारिणी होय. आणि मोह, ममता, संकल्प, वैर वगैरे आपले शत्रु असून, त्यांचा यत्नेंकरून उच्छेद करणें इष्ट होय.

आशा नाम नदी मनोरथजला तृष्णा तरङ्गाकुला
रागग्राहवती वितर्कविहगा धैर्यद्रुमध्वंसिनी ।
मोहावर्तसुदुस्तरातिगहना प्रोचुंगचिन्तातटी
तस्याः परागता विशुद्धमनसो नंदन्ति योगीश्वराः ।। ✻

एकांतवास करणें तो मनुष्यजातीचा कंटाळा किंवा द्वेष मनात वागवून करूं नये. तर आपल्या चित्तास शांति व समाधान ही प्राप्त व्हावीं म्हणून ही निवृत्ति त्यानें साधावी. केवळ मत्सरबुद्धीने किंवा जगास कंटाळून जो उद्योगधंद्याचा व लौकिकाचा त्याग करितो, त्याची ती कृति अतिनीच समजावी. असा मनुष्य आपली सुधारणा करण्यास तर मुळींच झटत नसतो. तर आहारविहार यथेच्छ करण्यांत व निःसंगपणें विषयासक्त होण्यांत त्याच्या आयुष्याचा अपव्यय होतो. कित्येक तर असें असतात कीं, त्याला लौकिक कामांच्या दगदगीमुळे त्रास आलेला असतो; आणि मोठमोठे हुद्दे किंवा विपुल संपत्ति मिळविण्याची त्यांची हांव व्यर्थ जाऊन, त्यांची प्रतिपदीं निराशा झालेली असतें. यास्तव त्याला संसारातील सर्व सुखांस लात मारून एकांतवास स्वीकारावासें वाटतें. परंतु अशा मनुष्याची महत्त्वाकांक्षा पुनरपि एकांतवास सोडून लौकिकांत वागूं लागतात. ऐषआराम भोगण्याची इच्छा अनावर होऊन, ते पुनरपि एकांतवास सोडून लौकिकांत वागू लागतात. त्याचप्रमाणे अशा मनुष्याच्या अभिमानादि वृत्ति जागृत होऊन त्यांस वाटूं लागतें कीं, आपणे इतके दिवस डामडौलांत व इभ्रतीनें घालविले असून आतां असे स्वस्थ बसतो हें योग्य नव्हे. तर आपण पुनरपि व्यवहारांत मन घालून संसारसुखाचा पूर्ण अनुभव घ्यावा. कित्येक तर असे असतात कीं, ते बाहेरून मोठ्या निवृत्तिपरतेचें मीष करितात. परंतु संधि येईल तेव्हां आपल्या वासना यथेच्छ पुरविण्यास चुकत नाहींत. उद्योगधंदा सोडून स्वस्थ घरीं बसणारे कित्येक लोक आपल्या स्वस्थतेचा फारच दुरुपयोग करितात. नेहमी आळशी बसावें लागल्यामुळे त्याला नाना ढंग सुचतात. कांहींना कांहीं कुरापती काढून, ते शेजाऱ्यांशी किंवा ओळखीच्यांशी भांडत सुटतील. ते इतकें कीं, मोठ्या घनघोर संग्रामामध्ये मनुष्याची जी तारंबळ उडते, तीहून अधिक तारंबळ त्यांची अशा प्रसंगीं उडते. कधींकधीं तर ते ग्राम्यविषयसुखात किंवा एखाद्या निंद्य व्यसनांत अगदीं मग्न होऊन पक्के दुराचारी बनतात. अशा मनुष्यांनीं निवृत्ति साधून स्वास्थ्य मिळविले असें म्हणतां येत नाहीं. ते विषयसुखेच्छेनें ग्रासिलेले असतात. वास्तविक पाहता असें आहे कीं, केवळ सुस्तपणांत, आळसांत किंवा निंद्य कर्मांत आयुष्य घालविण्यापेक्षा तें उद्योगधंद्याच्या घालमेलींत गेलेले पुरवलें. जो मनुष्य एकांतांत राहून ज्ञान संपादन करीत नाहीं व स्वतांचें आचरण सुधरींत नाहीं, त्यानें आपणास जिवंतपणीच पुरून घेतलें आहे असें समजावे.

कित्येक लोक लौकिक व्हावा म्हणून उद्योगधंद्यापासून निवृत्त होतात

कित्येक लोक उद्योग सोडून घरीं बसल्याचा मोठा डौल मिरवित असतात. परंतु ही वृत्ति मूर्खपणाची समजावयाची. लोकांनीं आपली वाखाणणी करावी म्हणून जो निवृत्तीचा अवलंब करितो, त्याला एकांतवासाचा

✻ आशा थोर नदी मनोरथ तिचें पानीय वीची तृषा स्त्रीपुत्राद्यनुराग हे जलचरें जे पूर्ण कूलंकषा ? संसारभ्रम भोंवरा गरगरी चिंताच जीचीं तटें तीतें जे तरले मनीश न कधीं ते पावती संकटे. वामन.

खरा उद्देश समजत नसतो. एकांतवासामध्ये मी स्वतांच्या आचरणाचे अहर्निश परीक्षण करीन. मी आपणांस कृतकर्माबद्दल सर्वदा दोष देत राहीन. आणि माझ्या दोषाबद्दल मी आपणांस शासन करीन. मानवी संसारातील व्यर्थ अभिमान उत्पन्न करणाऱ्या व वेडगळपणाच्या गोष्टींचा तिरस्कार केल्याबद्दल माझी थोरवी लोकांनी वाखाणावी असा माझा उद्देश मुळींच नाहीं. मी फक्त माझे दोष काढीन; दुसऱ्यांचे दोष काढीत मी बसणार नाहीं. जो कांहीं बोध करावयाचा, तो मी माझा मला करून घेईन. अशा एकांत स्थितीमध्ये मजकडून कांहीं तरी साहाय्य मिळेल म्हणून कोणी मजपाशीं येईल तर हा त्याचा भ्रम आहे मी कांहीं वैद्य नव्हे, तर केवळ एक साधारण प्रतीचा रोगी आहें मजपाशीं कोणी आला आणि तो परत जाते वेळीं त्यानें जर मजविषयी असा अभिप्राय प्रकट केला कीं, हा मनुष्य सुखी व विद्वान असेल असें मला वाटत होतें, परंतु हा असा मुळींच नाहीं तर त्याबद्दल मला समाधानच वाटेल. एकंदरीत काय कीं माझ्या संसारनिवृत्तीचा कोणीं हेवा करूं नये. तर असें करण्याबद्दल मला त्यानें क्षमा करावी. कित्येक वनपशु असे असतात कीं ते ज्या विवरांत रहातात, त्या विवराकडला मार्ग कोणास सापडूं नये अशी योजना ते करितात. अशा प्राण्याचें अनुकरण करून जो कोणी ज्ञाता एकांतवासाचा अवलंब करितो, त्याचें हें करणें उचित होय. आपल्या घराचा दरवाजा साफ उघडा ठेविला म्हणजे चोराला वाटतें कीं, यांत कांहीं चोरण्यासारखे नसावें म्हणून घराच्या मालकानें तो बिनदिक्कत् उघडा ठेविला आहे, असें मनांत आणून तो आंत न शिरतां तेथून पुढें चालता होतो. परंतु तोच जर चांगला बंद करून घेऊन त्याला अडसर व कुलपें घातलेली असलीं, तर पाहणाऱ्या लोकांस वाटतें कीं, येथें कांहीं तरी गौप्य आहे. म्हणून त्यांना आत डोकावण्याचा मोह होतो. अमूक एक मनुष्य सर्वदा ज्ञानसंपादनांत गढलेला असतो, तो कधीं आपल्या घराबोहर जात नाहीं, आणि कोणाला भेटत नाहीं, असें कळले म्हणजे त्याच्याविषयीं लोकांत चर्चा होऊं लागते. अशा रीतीनें जो आपलें एकांतवासाचे व्रत मोठ्या उग्रतनें चालवितो, त्याच्याकडे सर्वांची नजर जाते; आणि त्यामुळें व्यर्थ बभ्रा होतो.

तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास एकांतवास व स्वातंत्र्य हीं हवींत

प्रत्येक मनुष्यास स्वतांची प्रकृति कशी काय आहे तें कळत असतें. कित्येकांना अगदीं थोडा आहार करावा लागतो; आणि कित्येकांना चांगले पौष्टिक अन्न पोटभर सेवन करावें लागतें. ज्याला एकादा रोग झाला असतो, तो त्या रोगाचा परिहार करण्याकरितां औषधोपचार करितो, आणि रोग चांगला बरा होईपर्यंत घरामध्यें पडून रहातो. असे जर आपण आपल्या देहातील दोष काढून टाकण्यासाठी जपत असतों तर आपल्या मनातील दोष काढून टाकावयासाठीं असाच कांहीं तरी उपाय करणें युक्त नव्हे काय? आपली मानसिक उन्नति व्हावयास ज्या गोष्टींनीं प्रत्यवाय येतो, त्यांचा सर्वथा अव्हेर करणें योग्य होय. तत्वज्ञानाचा अभ्यास हा मानसिक उन्नतीचा उत्तम उपाय होय. परंतु या उपायाचा जो अवलंब करूं जाईल, त्याला व्यवहारांतील उद्योगधंद्याचा व्याप सर्वस्वी सोडिला पाहिजे. व्यवहारांत एकादी विवक्षित गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची असली म्हणजे इतर कित्येक गोष्टींचा अवश्य त्याग करावा लागतो. उदाहरणार्थ, आपण आजारी असतो, तेव्हा लोकांच्या भेटी घेण्याचे वर्जितों. आपण घरांत अगदीं एकीकडे जाऊन निजतों. आणि उद्योगधंद्यासंबंधी सर्व चिंता मनांत कदापि येऊ देत नाहीं. असेंच वर्तन तत्व विचार करितांना मनुष्याने

केलें पाहिजे. या संसारातील उद्योगधंद्याचा उपद्व्याप मोठा कठीण आहे. ज्यांना या संसाराचे केवळ दास होऊन जावयाचें असेल, त्यानें त्यांत सर्वदा मग्न असावें. परंतु ज्यास इहलोकीं आपलें कर्तव्य कोणतें याचा विचार करावयाचा असेल, त्यानें हा सर्व व्याप सोडून एकांत बसून मनन करावे. परंतु हा एकांतवास एक सारखा सतत साधण्यांत कांहीं अर्थ नाही. तर कांही वेळ एकांतांत व कांहीं वेळ लोकात वागण्याचा क्रम ठेवावा. एकांतांत राहिल्यानें मनुष्याच्याठायीं आत्मप्रीति उत्पन्न होते; आणि लोकांत वागल्याने मानवजातीविषयींची प्रीति वृद्धि पावते. लोकांत वागण्याचा वीट आला म्हणजे आपण एकांताचा अवलंब करितों; आणि एकांतांत बसून रहाण्याचा कंटाळा आला म्हणजे आपण मंडळींत जाऊन संभाषण करितों. याप्रमाणें हे दोन्ही क्रम परस्परांतले दोष नाहींतसे करणारे आहेत. ज्या मनुष्याला आपला वेळ कसा घालवावा याची पंचाईत पडते त्याच्या सारखा दुःखी मनुष्य या जगांत दुसरा कोणी नाहीं. अशा मनुष्याच्या मनांत नाना विचार येऊन, त्याला सारखी तळमळ लागलेली असते; त्यांचें मन सर्वदा चंचल असतें. आज एक मसलत त्याला गोड वाटली, तर उद्या दुसरीविषयी त्याचें मन भाळून जातें. आपल्या वर्तमान स्थितींत तर त्याला बिलकुल समाधान वाटत नाहीं; आणि पुढें आपणांस कशी स्थिति प्राप्त होईल याविषयीं त्याचें मन चिंतातुर झालें असतें. परंतु जो आपल्या काळाचा व्यय शहाणपणानें व दूरदृष्टीने करितो, आणि आपला उद्योग दक्षतेनें करितो, त्याला या संसारांत जे कठीण प्रसंग नेहमी प्राप्त होतात, त्यांस तो मुळींच मोजीत नाही. इतकेंच नव्हे, तर कशीही दुर्धर स्थिति त्यास प्राप्त झाली, तरी त्याच्या चित्ताचे समाधान ढळत नाहीं. आणि ज्या गोष्टींनीं मनुष्याच्या मनाची दुर्बलता व्यक्त होते, त्यांचा अनुभव त्यास घडला तरी त्याचें चित्त स्वस्थ रहातें.

भाग एकविसावा

मरणाची परवा न केल्यानें संसारांतील सर्व विपत्ति सह्य होतात

ज्ञानाच्या योगाने मरणाची परवा न करून संसाराविषयींची स्वाभाविक प्रीति चित्तांतून काढून टाकणें मोठें कठीण आहे. मरण प्राप्त झालें असतां त्यांत काहीएक अनिष्ट नाहीं अशी जनांची खातरी होतां होत नाही कारण जी मतें लहानपणापासून आपल्या हाडीमासी खिळलेलीं असतात, तीं काढून टाकण्यास मोठा प्रयास पडतो. यासाठीं मरणाचे जे युद्ध, अग्निप्रलय आदिकरून नानाविध प्रसंग ते प्राप्त झाले असतां त्यांमध्यें धैर्यानें व निर्भयपणें वर्तणें हें सर्वच मनुष्यांस साधत नसतें. कारण मनुष्याचें मन साधारणत: पाहतां फार दुर्बळ असतें. एकाद्या उपदेशकाने आपल्या वक्तृत्वाचा कितीही उत्तम उपयोग करून मृत्यूविषयींचें सार्वत्रिक मत निषिद्ध व भ्रामक आहे असें सिद्ध केलें, तरी त्याचा काहीएक उपयोग होत नसतो. तर्कशास्त्र व युक्तिवाद यांच्या साहाय्यानें एतत्संबंधानें कितीही ऊहापोह केला तरी तो सर्व व्यर्थ होय. या मृत्यूच्या संबंधानें जे विचार मीं येथवर प्रगट केले आहेत व यापुढें करणार आहें, त्यांवरून कोणी असें समजू नये कीं, मी मरण ही वस्तु अगदीं क्षुल्लक समजतो. स्वरक्षण करावे ही वासना व्यक्तिमात्राच्याठायीं अगदीं निसर्गसिद्ध आहे. शिवाय देह व आत्मा यांचा परस्परसंबंध फारच दृढ व पुरातन असतो. यास्तव मरण हें अनिष्ट आहेसें भासतें. परंतु वस्तुत: पाहतां तें तसें नाहीं. पुनः असें कीं, मरण प्राप्त झाल्यावर आपण अज्ञात अशा तमोरूप अवस्थेप्रत जाणार असून, आपलें पुढें काय होईल याविषयीं निश्चयात्मक असें कांहींच माहीत नसतें. यासाठीं जनांला मरण प्राप्त झाले असतां मोठेच भय वाटतें. कारण पुढें कोठे जावयाचें तें त्याला कळत नसतें; आणि पुनः भावी स्थिति कशी काय आहे हें त्यांस मुळींच माहीत नसतां, तीविषयीं ते भलभलत्या घोर कल्पना मनांत आणीत असतात.

मृत्यूस भिणें हा मूर्खपणा आहे

परंतु आपण एवढे मरणास घाबरतों, तें आहे तरी काय? याचा विचार केला पाहिजे. मरण हें केव्हा तरी प्राप्त तर व्हावयाचेंच. तेव्हां त्या विषयीं चित्तामध्यें सदोदित भय बाळगण्यापेक्षां तें एकदांचें प्राप्त झालें तर बरें. ज्या ह्या पृथ्वीवर आपण निर्माण झालो आहो, ती पृथ्वीसुद्धां या नाशास सर्वदा पात्र आहे. तिचा आज अज्ञात काळापासून एकसारखा नाश होत चालला आहे. समुद्रामध्ये कैक बेटें बुडून गेली आहेत. किती नगरें ओस पडलीं आहेत. किती मोठमोठीं राष्ट्रे जलप्रलयाच्या किंवा भूकंपाच्या योगानें विलयास गेलीं आहेत. असा नाश ज्यापेक्षा मोठमोठ्या जनसमूहांचा होत आहे, त्यापेक्षां माझ्या ह्या क्षुद्र देहाचीच तेवढी मला कां म्हणून भीति वाटावी बरें? रामदास या मृत्युकृत नाशाचे येणेप्रमाणे वर्णन करितो–

मृत्युकाळ कठिण कीं । जैसे बळियाचे मस्तकीं
महाराजे बळिये लोकीं । राहों न शकती
मृत्यु न म्हणे हा विख्यात । मृत्यु न म्हणे हा श्रीमंत
मृत्यू न हाणे हा अद्भुत । पराक्रमी
मृत्यू न म्हणे हा भूपति । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती
मृत्यु न म्हणे हा करामती। कैवाड जाणे

मला मृत्यू निःसंशय प्राप्त होणारा आहे, आणि एकंदर वस्तुजात नश्वर आहे; असें असतां माझा अंतसमय समीप आल्याबद्दल मीं कां म्हणून भयभीत व्हावें? आपण केव्हांही मरणार हें जर खास आहे, तर तें आजच प्राप्त झालें तरी त्यामुळें आपलें काय बिघडण्यासारखें आहे बरें? म्हटले आहे–

मृत्युर्विमेषि किं बाल न स भीतं विमुंचति ।
अद्य वाब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।।* सु.

उत्पन्न झालेली वस्तु निश्चयानें विनाश पावावी हा निसर्गाचा नियमच आहे; शिवाय या संसारातील सर्व अनिष्टांला हाच एक उत्तम उपाय आहे. मुलांना जसे वेषधारी बागुलबावाचें भय वाटते तद्वत् आम्हांस या मरणाचे वाटत असतें. याचे खरें स्वरूप मनुष्यास ज्ञात होत नाहीं. त्याच्यासंबंधानें जें अनेक विधीचे अवडंबर मनुष्यानें माजवून ठेवले आहे, त्यामुळें तर त्याची भीति जनचित्तात अधिकच वृद्धि पावते. हें सारे अवडंबर नाहीसे केलें तर मनुष्यास त्याचें इतकें भय वाटणार नाहीं. वस्तुतः पाहतां निसर्गामध्ये ज्या गोष्टी अशङ्क्ष्यमेव घडावयाच्या, त्यांमध्यें मरणासारखी सोपी गोष्ट दुसरी क्वचित् असेल. मातेच्या उदरी गर्भधारणा होऊन जन्मास येण्यास जितका अवधि लागतो, त्याहून मरणास फारच थोडा लागतो. आत्म्याचा देहापासून वियोग एका पळांत होत असतो. तेव्हां ह्या अशा क्षणाचा विलंब न लागतां घडणाऱ्या गोष्टीबद्दल दीर्घकाल चित्तांत भीति बाळगीत रहाणे हें किती लाजीरवाणे आहे बरें?

मरणभीति सहज दूर करितां येते

मरणुभय नाहींसे करणें मोठे कठीण आहे असें कोणी समजतां कामा नये. कारण अत्यंत उच्च स्थितीतल्या मनुष्यांप्रमाणेंच अत्यंत नीच स्थितीतल्या मनुष्यांनी मरणभयास न जुमानिल्याचीं उदाहरणे इतिहासांतरीं शेंकडो आहेत. एके प्रसंग एका मनुष्यास सिंहाने फाडून खावे म्हणून रोमनगरींतील मल्लभूमीवर ठेविलें असतां, त्यानें आपल्या हातातली काठी आपल्या घशांत सारून गुदमरून प्राण सोडिला. दुसऱ्या एकाची गोष्ट अशी सांगतात कीं, त्याला रथावर घालून देहांतशासन देण्यासाठी नेत असतां, त्यानें डुलकी आल्याचे मीष करून आपलें डोके रथचक्राच्या आरींमध्यें खुपसले, आणि मान मोडून प्राण जाईपर्यंत तो बसल्याजागी स्थिर राहिला. अत्यंत भितरे प्राणी देखील जेव्हां पाहतात कीं, आपली सुटका होण्यासारखी नाहीं, तेव्हां ते पाहिजे त्या घोर संकटास तोंड देण्यास तयार होतात. अशा रीतीनें ते निराश झाले म्हणजे

---

* हे बाला, मृत्यूला किमर्ध भितोस! भिणारास तो सोडीत नाही. आज किंवा शंभर वर्षांनी प्राण्यांला मृत्यु निश्चयाने प्राप्त व्हावयाचा.

वाय ५३८–१३

त्यांची भीति सर्व नाहीशी होऊन त्यांस धैर्य प्राप्त होतें, आणि ते अवश्य प्राप्त होणाऱ्या मरणास तयार होतात. दैवगति अनुकूल होऊन आपल्या आयुष्यांतला एकादा दिवस वाढला तर त्याबद्दल आपण दैवाचे आभार मानावे. हाच भाव पुढील पद्यांत सुचित केला आहे–

मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।
क्षणमप्यवतिष्ठते श्वसन्यदि जन्तुर्ननु लाभवानसौ ।। सु.*

परंतु उद्या आपली अवस्था काय होईल याविषयीची चिंता मनांत कदापि उत्पन्न होऊं देऊं नये. असे विचार मनांत आणून आपण निश्चिंतपणें प्रतिदिवशीं रात्रीं निजावयास जाऊं तर आपणास शांति व सुख यांचा अनुभव घडेल.

जो मरणास तुच्छ मानितो, तो कशासही भीत नाहीं

एकादा जुलमी राजा किंवा त्याचा जुलमी कायदा याच्या योगानें जें अत्यंत भयंकर शासन आपणांस होण्यासारखे असतें, तें मरणाहून कांहीं अधिक वाईट नसतें. त्याचप्रमाणें दैव कितीही प्रतिकूल झालें तरी त्याची मजल याच्यापुढें कदापि जावयाची नाहीं. यास्तव ज्याची मरणभीति नाहींशी झाली असते, त्याला दुसऱ्या कोणत्याही संकटाची परवा नसते. कारण इतर सर्व संकटे पाहिली असतां, त्यांचा परिणाम मरणाहून कांहीं अधिक नसतो. कित्येक प्रसंग तर मनुष्यास असे प्राप्त होतात कीं, त्यांमध्यें मरण्यापेक्षां जिवंत रहाण्यासच अधिक धैर्याची आवश्यकता असते. जो मरणास तयार नसतो, त्याचें चित्त सर्वदा अस्वस्थ राहील. त्याला खऱ्या खोट्या संकटांची नित्य भीति वाटेल. अशा प्रकारें ज्याचें चित्त सर्व काळ चिंतातुर असतें, त्याला संसारातील कोणत्याही स्थितींत सुख लाभावयाचें नाहीं. एकादें संकट मुळी, येऊं न देण्याचा प्रयत्न करण्याची बुद्धि आपणांस फार करून होत नसते; तर तें प्राप्त झालें असतां त्यांतून सुटून पळून जाण्याविषयीं आपण यत्न करितों असें करितांना अर्थात् आपणांस मोठेंच दुःख प्राप्त होतें. शत्रूशीं शेवटपर्यंत निकराचा सामना करण्याचें सोडून, जें सैन्य आपला पराभव होईल या भीतीनें मागें पाय काढून शत्रुस पाठ दाखवून पलायन करूं लागतें, त्याची दुर्दशा फारच होते. शत्रु त्याचा पाठलाग करून बेसुमार कत्तल उडवितो; ती इतकी कीं, तें सैन्य धैर्याने शत्रूस तोंड देऊन शेवटपर्यंत लढले असतें तर तेवढा मनुष्यनाश होताना. भावी संकटांविषयींचा हृद्रोग लागून प्रतिक्षणीं तीळतीळ मांस तुटून किंवा थेंबथेंब रक्त आटून झुरून जाण्याऐवजी एकदाचा पटकन् प्राण जाईल तर बरा. परंतु अशा या क्षुद्र देहाच्या बचावासाठीं आपल्या देशाशीं किंवा आपल्या मित्रांशी दगाबाजी करणारे, किंवा आपल्या बायकामुलांचा विक्रय करणारे लोक या पृथ्वीतलावर पुष्कळ निर्माण होतात. ज्याप्रमाणें वेडी माणसे आणि मुले यांना मरणाचे भय नसतें, तद्वत् केवळ विवेकबलेंकरून ही मरणभीति आपणांस जिंकितां आली नाहीं तर ती मोठीच लाजीरवाणी गोष्ट होय. मरण प्राप्त झालें असतां आनंदाने आणि विचारानें त्याला तयार असावें; आणि अंतकाळपर्यंत नीति अढळ ठेवावी सदाचारावांचून जें जिणे तें केवळ कंटाळवाणे होय.

---

* मरण ही शरीरवान् प्राण्यांची प्रकृतिच आहे, आणि जीवित हें केवळ विकृति आहे, असें ज्ञाते पुरुष म्हणतात. तस्मात् जो प्राणी केवळ एक क्षणभर जिवंत रहातो, तो मोठा लाभवान् समजावा.

मरण सर्वांस आहे

या संसारामध्ये पदोपदी संकटे प्राप्त होत असल्यामुळें व सर्वदा मरणभीति चित्तांत वागत असल्यामुळें पुष्कळ मनुष्यांस पुढे काय करावे तें सुचत नसतें. यास्तव ज्या संकटप्रसगातून रावापासून रंकापर्यंत कोणीही सुटलेला नाहीं, त्यामुळें आपणांस कदापि पीडा प्राप्त होणार नाहीं अशी तजवीज करणे युक्त होय. मनुष्य कितीही मोठा असला तरी त्यास पीडा होण्याचा संभव असतो. आपल्या अंतकाळाच्या भीतीनें आपले सारे जीवित अस्वस्थतेंत जातें. परंतु सुष्टीचा न्यायच असा आहे कीं, सर्व मानवजातीस मरणाची शिक्षा व्हावयाची. म्हटलें आहे:-

बलिनां दुर्बलानांच ऱ्हस्वानां महतामपि।
न कश्चिज्जात्वतिक्रामेज्जरामृत्यु हि मानव:।। सु *

असें असतां जो मनुष्य आपणाला सर्वांच्या मागून हे देहांतशासन व्हावें अशी इच्छा करितो, त्याच्या सारखा तुच्छ मनुष्य दुसरा कोणीही नाहीं हें जीवित केवळ क्षुद्र होय. परंतु त्याची क्षुद्रता मनुष्याच्या मनांत बिंबणे मोठे महत्त्वाचें असतें. ज्या निसर्गाने आपणांस या भूतलावर जन्म दिलें, तोच आपणांस येथून काढुन नेऊन विशेष चांगल्या व सुरक्षित स्थानीं ठेवीत असतो. मरण म्हणजे केवळ पूर्वी ज्या अवस्थेंत आपण होतों, ती अवस्था संपणें होय. आमची प्राणज्योति एकदा पेटून आयुष्यरूप स्नेहाचा क्षय होतांच ती मालवते. आपल्या जीवितास आरंभ न होणें आणि त्याचा अंत होणें या दोन्ही गोष्टी सारख्याच समजावयाच्या. खरें पाहता आपण नित्यशः मरण पावत आहों. आपल्या देहाचे जितके वर्धन होत असतें, त्या मानानें आपलें आयुष्य खुंटत असतें. म्हटले आहे. 'निमेषमात्रमपि तव वयो गच्छन्न तिष्ठति.' प्रतिक्षणी तें क्षीण होत चालले आहे. जवढे आयुष्य लोटलें तेवढ्यास आपण अक्षयीं मुकलो. वाळूच्या घड्याळांतला वाळूचा जो शेवटला कण पडतो, त्याच्या योगाने तासाची गणना होत नाहीं, तर तो तास समाप्त झाला असें दर्शवितो. त्याचप्रमाणें जो आपला शेवटला क्षण जातो तेवढाच मरणाचा अवधि आहे असें कोणी समजू नये, तर तो मरणाचा शेवटला क्षण होय. कित्येक लोक असें असतात कीं, ते आपणांस मरण यावें म्हणून अगदीं मनापासून प्रार्थना करितात. तेवढी ते आपलें आयुष्य वाढावे म्हणूनहीं करीत नाहींत. तरीपण मरण योग्य काळापूर्वीं येण्याविषयीं खटपट करण्यापेक्षा तें प्राप्त होईल तेव्हां त्यास आनंदाने तयार होणें विशेष चांगले.

या जीविताचा लोभ आपण कां खणून धरावा?

परंतु आपण पुष्कळ काळपर्यंत जिवंत तरी कां रहावें बरें? केवळ सुखोपभोगासाठी आपणांस जगावेसे वाटतें म्हणावे, तर प्रत्येक सुखविषयाचा आम्ही पुनःपुनः आस्वाद घेऊन अगदीं तृप्ति झालों असतों. यामुळे त्यांत नवे असें काहींच नसतें. मनुष्यास आपला देह व आपले मित्र अक्षयींचे सोडून जाणें अगदीं जिवावर येतें. म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं, त्याच्या मित्रांनीं त्याच्या पूर्वी जावें? परंतु ही कल्पना तर त्यास मुळीच मान्य होणार नाहीं. मजविषयीं म्हणाल तर मला जगावेंसें वाटतें याचे कारण एवढेंच की, माझ्या

* प्रबल, दुर्बल, लहान, थोर या सर्वांस जरा व मृत्यू ही चुकवायची नाहींत. तीं टाळण्याचें कोणाही मानवास सामर्थ्य नाहीं.

हातून आणखी बरें व्हावें, आणि या संसारांतील कर्तव्ये मला विशेष चांगली करितां यावी. कारण मी असें समजतो कीं, जो जन्मास आला तो एकदां केव्हां तरी मरणारच. तेव्हां तें प्राप्त होईपर्यंत आपल्या हातून कांहीं तरी सत्कार्य घडावे. म्हटले आहे:-

मुहूर्तमपि जीवेत नरः शुक्लेन कर्मणा ।
न कल्पमपि कृष्णेन लोकद्वयविरोधिना ।। सु. ✻

आपल्या मागें आपली संपत्ति ठेवून जाणें कित्येकांस कठीण वाटतें. परंतु ऐहिक संपत्ति कोणास आपल्या बरोबर घेऊन जातां येणार नाहीं. यास्तव सदाचाररूप संपत्ति मला जितकी या जीवितांत मिळविता येईल, तितकी मिळवावी असा माझा मानस आहे. मरणाची आपणांस भीति बाळगावयाची तर ती आपण सर्वदा बाळगिली पाहिजे. परंतु त्याची भीति कदापि वाटूं नये असें ज्याला कर्तव्य आहे, त्याला मार्ग एवढाच की, त्यानें त्या विषयींचा विचार वारंवार मनांत आणावा. जें आपणांस कधींही टाळता येणे नाहीं, तें आजचे उद्यांवर घालविण्यासाठीं तळमळ करण्यांत काय अर्थ आहे? एकामागून एकाने मरण पावावे हा सृष्टिक्रमच आहे. तर जें आपल्यापैकीं कोणासना कोणास नित्य येत असतें, त्याबद्दल भीति ती कसली बाळगावयाची? जे जन मरणाच्या घोर भीतीनें सर्व आयुष्यभर पीडित असतात, ते मोठेच दुःखी होत. कारण त्याला प्रतिक्षणीं असें भय वाटत असतें की, आपणांवर मृत्यूची झडप केव्हां येईल याचा नेम नाहीं. आपण सर्वदा शत्रूच्या मुलखात आहों असें समजून फार जपून वागले पाहिजे; आणि आपला अंतकाळ आला असतां, ती आपणांस शिक्षा झाली असें न समजता, तो निसर्गक्रमच आहे असें मानावें. मरणाच्या भीतीमुळें जो हृद्रोग लागलेला असतो, त्याचा परिहार जो विवेकबलेंकरून करितो, त्याला दुसऱ्या कशाचीही भीति नाहीं. या संसारसागरामध्यें आपली जीवितनौका भ्रमण करीत असतां, ती लाटांच्या व वादळांच्या तडाक्यांत सांपडून कोठेंतरी लोटत जाण्याचा किंवा दुसऱ्या नौकेवर आपटण्याचा किंवा कोठेंतरी खडकास आपटून फुटण्याचा दृढ संभव असतो. ती केव्हां फुटून तुटून पाण्याखाली गडप होईल याचा नेम नाहीं. परंतु असें करितां करितां ती इष्ट मुक्कामास येऊन पोचली असतां, किंवा तिचा प्रवास संपला असतां. त्यांत विलक्षण तें काय झालें बरें? आपणांस वृद्धत्व प्राप्त होईल म्हणून कोणी भिऊ लागला तर जसा तो मूर्ख समजला जाईल, तद्वतच् मरणाचें भय बाळगणारा समजावा. ज्याला मरण नको, त्यानें मुळीं या जन्मासच येऊं नये. कारण ज्याला जीवित प्राप्त झालें, त्याला मरण कदापि चुकावयाचे नाहीं. पुनः जी गोष्ट निश्चयानें घडावयाची, तीविषयीं भीति बाळगणें हा वेडेपणा आहे. कारण जेथे मुळीं शंकाच नाहीं, तेथें भीतीला अवकाश कोठून?

मरणे म्हणजे निसर्गनियमास अनुसरणे होय

कांहीं अनिष्ट घडले असतां आपण आपल्या दैवास नेहमीं दोष देत असतों. मनुष्यांच्या परस्परव्यवहारांत योग्य न्याय व्हावा अशी ज्यांची इच्छा असते, असे जन सुद्धां निसर्गनियमांच्या संबंधाने आपली अनुदारता

✻ सत्कर्म करणारा मनुष्य एक मुहूर्तपर्यंत जगला तरी पुरे आहे. परंतु या लोकास व परलोकास विरुद्ध असे कृष्णकर्म करणारा एक कल्पपर्यंत जगला तरी केवळ व्यर्थ होय.

प्रगट करितात. एकादा मनुष्य भरज्वानीमध्यें मरण पावला असतां, त्याच्याविषयीं लोकं दुःख प्रदर्शित करितात. अमुक वयामध्ये मृत्यु आला असतां तो सह्य होतो, अशी त्यांची समजूत झालेली असते. परंतु वास्तविक पाहतां मरण सह्य किंवा असह्य वाटणें हे मनुष्याच्या मनोवृत्तीवर अवलंबून असतें. जो मनुष्य, 'मी आणखी थोडा वेळ जगेन. तर बरा,' असें आज इच्छीत असतो, तो आणखी शंभर वर्षांनीही मरण्यास तयार नसावयाचा. परंतु निसर्गक्रमास अनुसरून जी स्थिति प्राप्त होईल, तीस तयार असणें हें विवेकास अनुसरून आहे? कीं निसर्गानें आपला क्रम आमच्या इच्छेप्रमाणे पालटावा असें मनांत आणणें हे विवेकानुरूप आहे? आपणांस केव्हा तरी एक वेळ जावयाचेंच आहे, त्यापेक्षां तसें करणें केव्हांही प्राप्त झालें म्हणून त्यांत काय बिघडलें? आपणांस दीर्घायु करणें हें निसर्गाच्या स्वाधीन आहे. परंतु आपणांस कितीही अल्प जीवित प्राप्त झालें तरी तें सदाचरणाच्या योगाने पुरेसे करणें हें आपल्या हातीं आहे. आयुष्य जें मापावयाचें, तें त्याच्या दीर्घत्वावरून नव्हे, तर मनुष्याच्या हातून घडणाऱ्या कर्मावरून होय. या दृष्टीनें पाहतां तीस वर्षांच्या उमरींत ज्याचें देहावसान होतें, त्यानें नीतीने वर्तन केलें असलें तर तो वृद्ध होऊन निवर्तला म्हणून समजावे, व एकादा ऐशीं वर्षांचा थेरडा होऊन मेला तरी त्यानें नीत्याचरण केलें नसल्यास, तो अगदीं तरुण वयांतच आटपला समजावयाचा. जो नीतीनें वर्ततो, तो देहावसान झालें तरीही जिवंत रहातो; आणि जो दुराचारी असतो, तो जिवंत असूनही मेलाच म्हणून समजावें. वृद्धपण प्राप्त व्हावें हें दैवाधीन आहे. मी किती वर्षे जिवंत रहाणार तें माझ्या स्वाधीन नाहीं. परंतु नीतीने वर्तन करणें माझ्या हातचें आहे. मनुष्य फार फार तर ज्ञान प्राप्त होईपर्यंत जगावा हें युक्त होय. जो वृद्धापकाळ येऊन मरणवश होतो, तो केवळ थकून भागून निजावयास गेल्याप्रमाणे समजावा. मरणसंकटाच्या योगानें मनुष्याच्या आयुष्यक्रमाची पारख होते. आपली वृत्ति कोणत्या प्रकारची आहे, आपण खरोखरीच नीतिमान् आहो किंवा तसें केवळ वरवरून ढोंग करीत आहों, याची परीक्षा मृत्यूच्या योगानें होते. मनुष्य मोठा वावदूक असेल; मोठमोठ्या ग्रंथांचे आधार सांगण्यांत मोठा पटाईत असेल: त्याचें भाषण मोठे विद्वत्तेचे असेल; तरीपण त्याचें हृदय अगदीं खराब असेल. आपण आपल्या कामधंद्यांत अगदीं बेताबातानें व विवेकानें वागावे. आपणांस कोणत्या स्थळी केव्हां मृत्यू प्राप्त होईल याचा नेम नसतो. मरण प्राप्त होण्यापूर्वी आपल्या मागचा संसाराचा सारा व्याप जो नाहींसा करितो, आणि शांतिसुखाचा अनुभव घेत असतां मृत्यूची अपेक्षा करीत रहातो, तो धन्य समजावा. हाच बोध पुढील श्लोकांत उत्कृष्ट प्रकारें केला आहे:

अवश्यं यातरश्चिरतरप्रषित्वापि विषयाः
वियोगे को भेदस्त्यजति नजनो यत्स्वयममून् ।
त्रजन्त्यः स्वातंत्र्यादतुलपरितापाय मनसः
स्वयंत्यक्तास्त्वेते शमसुखमनन्तं विदधति । * सु.

आपलें जीवित सचोटीनें व नीतीनें घालवावे हें जसें चांगलें आहे, तसेंच योग्य प्रसंग आला असतां मरण्यास तयार होणें हेंही चांगले आहे. आजपर्यंत असे शूर तरुण पुरुष पुष्कळ निपजले आहेत कीं, ते मोठमोठ्या जिवावरच्या संकटांसही न जुमानतां सत्कार्य करण्यास केवळ नैसर्गिक प्रवृत्तीस्तव उद्युक्त झाले आहेत.

---

* विषय कितीही वेळ राहिले तरी ते अखेरीस अवश्य जावयाचे. तेव्हां मनुष्यानें आपण होऊन त्यांचा त्याग केला नाहीं तरी त्यांच्या संबंधाच्या वियोगांत तो कोणता भेद? हे विषय आपल्या इच्छेविरुद्ध नष्ट झाले असतां, त्यापासून चित्त अतिशयित संतप्त होतें. तेच आपण होऊन सोडले असतां, त्यापासून अनंत शांतिसुख प्राप्त होतें.

मरणसमयीं शोकाकुल होणे हें बालिशपणाचें कर्म आहे

आपण जसे मातेच्या उदरांतून ओरडत आणि रडत बाहेर आलों, तसेच मरणसमयींही रडलो ओरडलो तर तो आपला केवळ बालिशपणा समजावयाचा. आपला देह आपल्या आत्म्याचीं केवळ बाह्य आवरणें असल्या कारणानें त्यांचा नाश अवश्य झाला पाहिजे. ज्या मरणाविषयीं आपण इतके घाबरतों, आणि जें आजचे उद्यांवर ढकलण्याची इच्छा करितों, तें कांहीं अंतरूप नव्हे. तर मरणाच्या योगानें हें जीवित काहीं काळ विराम पावून तें पुनरपि उद्भवणारें असतें. हाच बोध गीतेंत कृष्णानें अर्जुनास येणेप्रमाणे केला आहे:-

जातस्यहि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्यच ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।। *

ज्या गोष्टींच्या योगानें जीवित उद्भवते, त्यांच्याच योगाने पुढे मरण प्राप्त होतें. आपण जसे दुर्लौकिकास भितो, तद्वत् मरणाची आपणांस भीति वाटते. परंतु दुर्लौकिकापासून उद्भवणाऱ्या अनिष्टाचा अनुभव आपणांस या जीवितांत होत असतो. मरणाची गोष्ट तशी नाहीं. तें एकदा प्राप्त झालें म्हणजे त्याचा अनुभवच मुळीं उरत नाहीं. यावरून असें होतें कीं, आपण नुसत्या शब्दांला भीत असतों. कित्येकांना या जीविताचा इतका कंटाळा आला असतो कीं, ते सर्वदा मृत्यूची अपेक्षा करितात. तरीपण अशी अपेक्षा करणारांस तें मनापासून आवडते असें मात्र म्हणतां येत नाहीं. जीवितप्रीति जर एवढी प्रबळ आहे, तर नुसती मरणाची इच्छा करून काय उपयोग? आपणांस मरण हवें असलें तर आपण त्याविषयीं बभ्रा न करितां, तें प्राप्त झालें असतां मुकाट्याने सोसण्यास तयार असावें. साक्षात् मरणप्राप्तीस मनुष्य मोठ्या धैर्यानें तयार होतो. परंतु मरणाच्या अनुषंगाने ज्या कित्येक गोष्टी असतात त्यांची त्यास भीति वाटते. कारण मरण अवश्य प्राप्त व्हावयाचें अशी आपली खात्री झाली म्हणजे आपणांस तें सोसण्याचें धैर्य प्राप्त होतें. परंतु मरण घेण्यापूर्वी जी आपली अवस्था होते, ती मोठी पीडादायक असते. कित्येक तर असे असतात कीं, त्याला जगणेंही नको असतें आणि मरणेंही नको असतें. ही शोचनीय अवस्था समजावयाची. परंतु एवढी गोष्ट प्रत्येकानें निश्चयानें लक्षांत वागवावी कीं, जो मरणाची भीति बाळगितो, तो बंधमुक्त झाला नाहीं, आणि जो तें तुच्छ मानितो, तो निःसंशय जीवन्मुक्त होय.

उपजलियास मृत्यु । मेलियास जन्म सत्यू हा ऐसा अपरिहार्यू । शोक न करीं मानसी. मुक्तेश्वर

भाग बाविसावा

मरणप्राप्तीच्या संबंधाने समाधान

हें जीवित केवळ अनंतकालिक जीवनाचा आरंभ आहे. येथील देहाचे अवसान झालें म्हणजे आपणांस नूतन जीवित प्राप्त होऊन भिन्न स्थिति प्राप्त होणार आहे. यास्तव आपल्या अंतकाळाची अपेक्षा आपण धैर्यानें करीत रहावें. हा अंत आपल्या देहाचा व्हावयाचा आहे, मनाचा नव्हे. जसे आपण या देहात नंगे आलों, तसेंच आपणांस हा देहरूप बोजा येथेंच ठेवून पुनः गेलें पाहिजे. जी आपली अंतींची घटकाशी वाटते, ती वस्तुतः पाहता अनंतकालिक जीवनाची प्रारंभरूप होय; आणि या अनंतकालिक जीवनाचा हा मृत्युरूप एकच मार्ग आहे. यावरून पाहतां आपल्या जीवितरूप नौकेस हा मरणरूप जो मोठा खडकसा भासतो, हो तसा नसून तें केवळ बंदर होय. ह्या बंदरास लागल्यावांचून गति नाहीं; आणि पुष्कळ अवस्थांमध्ये तर तें जेवढे लवकर प्राप्त होईल, तेवढें इष्टच असतें. जो कोणी तरुण वयांत मरण पावतो, त्यानें या बंदराचा प्रवास लवकर आटपला असें होतें. ह्या मरणाच्या योगानें पुष्कळ अनिष्टांपासून व संकटांपासून आपली मुक्तता होते. मरण हा एक निसर्गाचा नियमच आहे; आणि हें मनुष्यास एक वेळच प्राप्त व्हावयाचें ही एक मोठी समाधानाची गोष्ट आहे. अंतसमयींच्या दुःसह वेदना होत असताही जिवास एवढे समाधान वाटत असतें कीं, आपल्या या दुःखाचा शेवट आतां समीप आला आहे; आणि एकदां मरण प्राप्त झालें कीं सर्व दुःखापासून आपली मुक्तता व्हावयाची आहे. मरणोत्तर आपली स्थिति काय होणार तें आपणांस ठाऊक नसतें; आणि जें आपणांस कळत नाहीं, तें वाईट म्हणणें हा अविचार आहे. परंतु एवढा मात्र आपणांस तर्क करितां येतो कीं, हें जीवित सोडून आपण गेलों म्हणजे आपणांस पुढें विशेष चांगले जीवित प्राप्त होऊन आपण शांतिसुखाचा अनुभव घेऊं; किंवा पंचत्वास मिळून जाऊन जननमरणसंबधी सर्व पीडेपासून मुक्त होऊं. लोकांकडून उसने घेतले द्रव्य जसे फेडलेंच पाहिजे, तद्वत् मरणरूप ऋण आपणांस दिलेंच पाहिजे. हें जीवित केवळ यात्रारूप आहे. ही यात्रा कोणी लवकर संपवितात, आणि कोणी उशिरां संपवितात. परंतु आपणा सर्वांस एकाच मुक्कामास जावयाचें आहे. ज्याचा आत्मा उन्नत झालेला असतो, त्याला या देहरूप बंधनांत रहाण्यांत सुख वाटत नाहीं. त्याला आपण कोठून आलों व कोठें जाणार ते कळत असतें. हा देह व आत्मा यांचा संयोग नष्ट होऊन उभयांचा वियोग होण्याचा समय येईल. माझा हा देह मला जेथून प्राप्त झाला आहे, तेथेंच तो मी ठेवून स्वर्गाप्रत जाईन. आत्मा सर्वदा स्वर्गातच असावयाचा. परंतु त्यास हें देहरूप बंधन प्राप्त झाल्यामुळें त्याला या मृत्युलोकी कांहीं काळ रहाणें प्राप्त झालें आहे कित्येक लोक लवकर मरण पावतील तर त्यांची मागें कीर्ति उरण्यासारखी असते. परंतु तेच पुष्कळ वर्षें जगल्यास त्यांच्या हातून दुष्कर्म होऊन त्यांचा दुर्लौकिक होण्याचा संभव असतो.

पुष्कळ आशाबद्ध तरुण पुरुषांची अनेक प्रकारीं निराशा झाल्याकारणानें ते पुढें अगदी बदल निपजतात. शिवाय जितकें मनुष्याचें आयुष्य दीर्घ असतें, तेवढ्या मानानें त्यावर या संसारांत नाना दुःखदप्रसंग येऊन त्याच्या चित्तास अनेक प्रकारीं उद्वेग प्राप्त होण्यासारखा असतो. ही दीर्घायुष्यास लागून असणारी विपत्ति इतकी उघड आहे कीं, ती ज्यास सदसद्विचार करण्याची शक्ति आहे, त्याच्या लक्षांत तेव्हांच येण्याजोगी आहे; आणि ती त्याच्या लक्षांत एक वेळ आली म्हणजे मग अशा दीर्घायुष्याची तो मुळींच अपेक्षा करणार नाही.

जें निसर्गक्रमाप्रमाणे आवश्यक असतें, त्यास मनुष्याने आनंदाने कबूल असावें

जें निसर्गक्रमास अनुसरून आवश्यक असतें, तें शहाण्या मनुष्याने आनंदानें मान्य करावें. मरण हें जन्मलेल्यास आवश्यक असून तें सर्वांस सारखेच आहे. तें कोणाला कधींही चुकावयाचं नाहीं. हाच बोध पुढील पद्यांत केला आहे:-

मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ।
अद्यवाब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।। * सु.

तेव्हां जें आपल्याप्रमाणे इतर सर्व मनुष्यांस निश्चयानें प्राप्त व्हावयाचें, त्याबद्दल कुरकूर करण्याचें आपणांस काहींएक कारण नाही. आपल्या मनास येईल तेव्हां मरण्याचें आपल्या स्वाधीन नाही. त्याचप्रमाणे मरू नये असें आपल्या मनांतून कितीही असलें तरी तें कांहीं केल्या चुकावयाचें नाहीं. असें आहे त्यापेक्षां अंतसमय आला असतां, आपण भयाने कंपायमान होण्यांत काय अर्थ आहे? आपलें हें जीवित नष्ट होणार म्हणून जर आपण शोक करावा, तर सहस्र वर्षांपूर्वी आपण जन्म पावलों नाहीं, किंवा आणखी सहस्त्र वर्षांनीं जन्म पावणार नाहीं म्हणून कां बरें शोक करूं नये? हें जीवित म्हणजे केवळ एक मोठें मार्गक्रमण आहे. या मार्गाने चालून आपण सर्व एकाच स्थानी पोंचणार आहो. मरणें म्हणजे निसर्ग नियमास अनुसरणें होय. हें आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या एकंदर मनुष्यास प्राप्त झालें असून पुढील सर्व मनुष्यांस प्राप्त व्हावयाचें आहे. आपला अंतसमय समीप आला म्हणजे त्या वेळी आपल्या बरोबर आणखी हजारो माणसें मरणोन्मुख होऊन मरण पावतील. जो कोणी म्हणेल कीं, मी आज मरावयाचा नाहीं, त्याला तें कदापि चुकावयाचें नाहीं. समय आला कीं त्यास गेलेंच पाहिजे. तेव्हां जें आपली इच्छा नसताही प्राप्त व्हावयाचें, त्यास आपण राजीखुषीनें तयार असणे हें चांगलें नव्हे काय? जन्मल्यापासून मरेपर्यंत आपली कशी काय अवस्था होईल याचा कांहींएक नेम नसतो. या जोवितामध्यें दुःख फार आणि सुख अगदीं कमी. म्हटले आहे. **'सुख पाहूं जातां जवापाडें । दुःख तो पर्वताएवढें'** या संसारांत सर्व कांहीं अनिश्चयात्मक व क्षणभंगुर आहे. एक मरण काय तें निश्चयानें प्राप्त होणारे आहे. असें असतां जो मोठमोठ्या आशा करीत बसतो, आणि पुढे आपलें काय होईल याची परवा करीत नाहीं, तो मोठाच मूर्ख होय. हा आपला वर्तमानकाळ सुद्धा आपणांस केव्हांच फसवून चालला आहे. तेव्हां अमुक एक क्षण माझा असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. म्हटले आहे: 'अस्थिरं जीवितं लोके.' असा आपणांस क्षणाचाही भरवसा नसतो; त्यापेक्षा मोठमोठे बेत करण्यांत

* जे जन्म पावले, त्यांच्या देहाबरोबरच त्यांला मृत्युही उत्पन्न झाला आहे, मग तो आज होवो किंवा शंभर वर्षांनीं होवो, तो प्राणीमात्राला कदापि चुकणें नाहीं.

काय अर्थ आहे? अमुक एक वतन मी विकत घेईन अमुक ठिकाणी मी मोठी इमारत बांधीन, अमुक काम मी तडीस नेईन, आणि मग सगळा संसाराचा व्याप सोडून स्वस्थ बसेन, असें म्हणणें केवळ व्यर्थ होय. आपण सर्व सारख्याच संकटांस पात्र होणारे असून, आपलें जीवितही सारखेच क्षणभंगुर आहे तेव्हां उद्यांचा भरवसा कोणास सांगतां येईल बरे? ज्यास आपण मरण ही संज्ञा देतो, तो ऐहिक जीवनव्यापारांचा केवळ विराम होय; आणि तेथून पुढें नूतन जीवनास आरंभ व्हावयाचा असतो. तरी आपले विचार नेहमी या नश्वर देहापुरतेच असतात. भावी जीवनाविषयीं आपण मुळींच कधीं मनांत आणीत नाहीं. सर्व वस्तुमात्रांस उत्पत्ति, बुद्धि आणि विनाश हीं आहेत. ही पृथ्वी व आकाशस्थ सारे गोल यांसही वृद्धिक्षय असून, यांचाही नाशकाळ नेमलेला आहे. हाच भाव पुढील श्लोकांत सूचित केला आहे:-

पृथिवी दहते यत्र मेरुश्चापि विशीर्यते ।
सुशोषेत्सागरजलं शरीरे तत्र का कथा ।। सु. ✻

इहलोकचें सर्व वस्तुजात मरणाधीन आहे. मोठमोठ्या नगरांस व राष्ट्रांसही नाशकाळ आहे. पुढें असा समय येईल कीं, आजचीं नगरें आणि राज्ये कोठें नांदत होतीं हें कळण्याची सुद्धा पंचाईत पडेल. फार काय, पण तीं कधीं अस्तित्वांत होतीं किंवा कसें याविषयी सुद्धा कदाचित् शंका उत्पन्न होईल. कांहीं राष्ट्रांचा युद्धांमुळे नाश होईल. कांहीं ऐषआराम, अग्निप्रलय, जलप्रलय, भूमिकंप इत्यादिकांमुळें नाश पावतील. याप्रमाणे जेथे सर्व विश्वच विलय पावणार आहे, तेथें मींच एकट्याने मरणासंबंधानें खेद करावा यांत काय अर्थ आहे? जो थोर मनाचा मनुष्य असतो, तो निसर्गक्रमास अनुसरून घडणाऱ्या एकंदर गोष्टी सहन करण्यास सर्वदा तयार असतो. या देहरूप गृहामध्यें आपण आजची रात्र वसतीस असून उदयिक आपणांस तें सोडून जावयाचें आहे, अशा समजूतीने आपण यांत वास केला पाहिजे. मरणाविषयी ज्याला बेफिकीर व्हावयाचें असेल, त्यानें त्याविषयीं वारंवार विवेक करावा. दारिद्र्य प्राप्त झालें असतां तें सहन करण्याची जो सवय करितो, तो कदाचित् संपन्न होण्याचा संभव असतो. कोणतीही, पीडा प्राप्त झाली असतां ती जो सहन करण्यास तयार असतो, त्याला कदाचित् ती कधीही प्राप्त होणारी नसते. मित्रवियोग सहन करण्यास जो तयार असतो, त्याला कदाचित् मित्राचा वियोग कधींही घडण्यासारखा नसतो. परंतु जो मरणभीति चित्तास शिवूं देत नाहीं, त्याचा तो गुण मात्र निश्चयानें एक वेळ उपयोगीं पडावयाचा. ज्ञात्या व नीतिमान् मनुष्याने आपण किती वर्षें जगू या विषयीं चिंता करण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. तर त्यानें आपलें आचरण कसें काय आहे; आपल्या हातून कोणती कर्मे होत असतात; आणि आपणांस कोणते पापमळ लागतात, या गोष्टीस अवश्य जपावे. मरण उशिरा किंवा लवकर प्राप्त झालें तर त्याबद्दल आपण परवा करूं नये. तर आपलें आचरण आमरण चांगले राखण्याविषयी काळजी वाहावी. कारण मरण प्राप्त झाल्यावर आपणांस अनंतकालिक जीवन प्राप्त व्हावयाचें असतें.

✻ जेथे पृथ्वी दहन पावावयाची, आणि जेथें मेरुपर्वत भंग पावावयाचा, आणि जेथे सारा सागर वाळून जावयाचा, तेथें देहाची ती कथा काय?

भाग तेविसावा

मित्राच्या मरणाबद्दल अमर्याद शोक करुं नये

मरण प्राप्त होऊन आपलें देहावसान होणे हें जसे आपण मोठें संकट मानितों, त्याच्याच तोडीचें दुसरें संकट म्हटलें म्हणजे मित्रनाश होय. इतिहासांतरीं असे जन होऊन गेलेले आढळतात कीं, ते आपल्या मित्रांचा जीव बचावण्यासाठी आपला स्वतांचाही प्राण बळी देण्यास तयार झाले होते. हें त्यांचें आचरण मोठे औदार्याचे होय. मित्रनाशाचें दुःख मोठे क्लेशकारक आहे खरें; तथापि त्यास आपला इलाज नाहीं असें समजून तें सहन करण्यास आपण तयार असावें.

मित्रवियोगाबद्दल परिमित शोक केला असतां चालेल

मित्रनाशाबद्दल शोक करणें स्वाभाविक व योग्य आहे. त्याला मरण प्राप्त झालेलें पाहून थोडेसे अश्रु गाळले, किंवा त्याची आठवण झाली तर खेद प्रदर्शित केला असतां चालेल. परंतु त्याच्यासाठीं अगदीं शोकाकुल होऊन जाऊन एकसारखे अश्रु ढाळणें योग्य नव्हे. मोठमोठ्यानें ओकसाबोकशीं रडणे व सर्व लोकांस विदित होईल अशा रीतीनें खेद प्रदर्शित करणें यांत कांहीं खऱ्या दुःखाचे निदर्शन होतेंच असें कोणीं समजू नये. तर यांत आपणांस पुष्कळ खेद झाला आहे असें लोकांला दाखविण्याचाच हेतु विशेष असतो. जो इतर लोकांदेखत मोठा खेद झाला आहे असें दाखवितो, आणि एकांतवासांत आपल्या मित्राची आठवण करून कष्टी होत नाहीं, त्याचा तो खेद केवळ वरकरणी आहे म्हणून समजावें. खऱ्या दिलापासून त्यास वाईट वाटत असतें असें म्हणतां येत नाहीं. आपला मित्र नाहीसा झाल्यानें होणारें दुःख कालेंकरून उपशम पावून त्याची आठवण बहुतेक बुजून जाते. असें आहे त्यापेक्षा शहाण्याने मित्रासाठी शोक करावयाचा तो बेताचा करावा. खरा शोक जो होत असतो, तो मनातला मनांतच रहातो. वरकरणी शोकाचे मात्र मोठे अवडंबर माजविण्याची जनांची चाल आहे. पण ती केवळ वेडगळपणाची आहे. दुसरा कोणी ऐकावयास असला म्हणजे मोठ्यानें शोक व आक्रोश करावयाचा. पण जवळ कोणी नसून मनुष्य एकांतांत असला म्हणजे त्याच्या डोळ्यांतून पाण्याचा थेंबही निघत नाहीं; किंवा त्याला जरासुद्धा वाईट वाटत नाहीं. मित्राच्या मरणाबद्दल स्वाभाविकपणे जो शोक व्हावयाचा तो एकीकडेच राहून लौकिक आचारास अनुसरून आपण वागण्यास झटतों, हें कांहीं चांगले नव्हे. आपण अश्रु ढाळल्याने जर दैवगति किंवा निसर्गक्रम बदलण्यासारखा असता, तर आपण सर्वदा एकसारखे शोक करीत राहिलों असतो. परंतु दैवगति कदापि बदलणारी नसून, मृत्यूनें ज्यावर झडप घातली असते, त्यास तो बिलकुल सोडून द्यावयाचा नाहीं. तर त्याबद्दल शोक करण्यांत काय अर्थ आहे? म्हटले आहे:-

नष्टं मृतमतिक्रान्तं नानु शोचन्ति पंडिताः ।
पण्डितानांच मूर्खाणां विशेषोऽयं यतः स्मृतः ।। सु.*

असें आहे तरी आपल्या मित्रांच्या संबंधानें आपलें हृदय कठोर असावें व त्यांस मृत्युसारखे संकट प्राप्त झाले तरी त्यांविषयीं आपल्या मनांत कळवळा उत्पन्न होऊं देऊं नये असा माझा अभिप्राय आहे, असें कोणीं समजूं नये. आपल्या मित्रांविषयीं अशी वृत्ति असणें हा मोठाच अमानुषपणा आहे असें मी समजतों. यांत वाखाणण्यासारखे कांहींच नाहीं. आपल्या प्रिय इष्ट मित्रांच्या वियोगानें मन उद्विग्न व्हावें हें साहजिक आहे.

कांहीं बाबतींत शोक केला असतां चालेल, व कांहीं प्रसंगीं तर तो अनावर होतो

शहाणा मनुष्य कांहीं प्रसंगीं थोडासा शोक करितों; आणि कांहीं प्रसंगीं तर त्याला तो मुळींच आवरितां येत नाहीं. मित्राच्या मरणाची किंवा दुसऱ्या कशाची खेदकारक वार्ता अकस्मात् कानीं पडली असतां, मनुष्याचें मन शोकयुक्त होऊन, त्याच्या डोळ्यांतून अश्रु येणें साहजिक आहे. त्याचप्रमाणे आपल्या गत मित्राचें भाषण किंवा दुसरें एकादे ममतेचें वर्तन आठवले म्हणजे आपल्या मनास उद्वेग प्राप्त होतो. अशा प्रसंगीं मनुष्याच्या डोळ्यांतून प्रेमाचे व मायेचे अश्रु पडतात. अशा रीतीनें शोकाकुल होणें हें स्वाभाविक आहे. परंतु मुद्दाम शोकाचा आविर्भाव आणणें कांहीं चांगले नव्हे. इष्टमित्रांचें स्मरण होऊन त्यांच्यासाठीं स्वाभाविकपणें अश्रुपात झाला तर त्यांत ज्ञात्या मनुष्यास कांहीं एक उणेपणा येत नाहीं. जो खरा ज्ञाता असतो तो आपला गंभीरपणा सोडीत नाहीं व नैसर्गिक प्रवृत्तिही दाबीत नाहीं. परंतु ह्या शोक करण्याच्या पद्धतीकडे अवश्य लक्ष पुरविले पाहिजे. अतिशोक अतिहर्षाप्रमाणेच मूर्खत्वाचा द्योतक आहे. अनिष्ट गोष्टी घडून आल्याबद्दल रीत आपण दैवाला कितीही दोष देत राहिलों तरी तें कदापि पालटणें नाहीं. कारण त्याच्यासारखें कठोर व निष्ठुर कांहीं नाहीं. अशा रीतीनें उर बडवून घेऊन आपण फार तर मृताच्या गनीला जाऊं पण मृत मनुष्य आपणाकडे पुनरपि परत यावयाचें नाहीं. आपल्या प्रिय जनांसाठी अमर्याद शोक करणे हा मूर्खपणा आहे; आणि मुळीच शोक न करणें हा कठोरपणा आहे. प्रिय जनांच्या वियोगाने कष्टी होणें हें योग्य होय. पण त्यांबद्दल अगदीं शोकविव्हल होऊन अत्यंत उद्विग्न होणें इष्ट नव्हे. जो आपला हर्ष किंवा शोक मनास वाटेल तेव्हां दाबण्यास समर्थ असतो, तो सुखी समजावा. आपली वृत्ति पराकाष्ठेची कोमल किंवा अतिशयित कठोर असणें हें सारखेंच अनिष्ट होय. वृत्ति फारच कोमल असली तर आपण तीमुळें अगदीं बेदील होऊन जातो; आणि ती कठोर असली तर तिची कठोरता कमी करण्याचा प्रयत्न करणें आपणांस भाग पडतें. पुत्राचा किंवा मित्राचा वियोग घडला असतां हृदय शोकाने विदारित होणे साहजिक आहे; आणि हा दुःखाचा पहिला झटका केवळ अनावर असतो. परंतु अशा समयी जों अगदीं शोकाकुल होऊन जातो आणि बेसुमार दुःख करितो, त्यानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्या प्रिय जनांच्या वियोगास्तव थोडासा शोक केला असतां कांहीं हरकत नाहीं; पण तो अपरिमित होऊं देणें चांगले नाहीं. अशानें जनांत आपला उपहास मात्र होतो. मनुष्याचें दुःख ताजें असत तोवर इतर जन त्याच्यासाठीं हळहळतात, आणि त्याचें समाधान करण्याचा प्रयत्न करितात. परंतु तेंच तो नित्य करीत राहिल्यास त्याचें

* जें नष्ट झालें, मृत झालें किंवा मागें पडलें, त्याचा पंडित शोक करीत नाहींत. पंडित आणि मूर्ख यामध्ये भेद काय तो येथेंच आहे.

जनांत हसें होतें. कारण एक तर तें वरकरणी असतें किंवा मूर्खपणाचे असतें. दुसरें असें कीं मृताविषयीं अपरिमित खेद केल्याने जे कोणी जिवंत असतात त्यांची अवज्ञा केल्यासारखें होतें. चांगल्या सदाचारी मनुष्यांचा अंत वाईट झाला असतां, किंवा त्यांस दैव प्रतिकूल होऊन त्यांच्यावर घोर प्रसंग ओढवले असतां, त्यांच्यासाठी शोक करणें अत्यंत योग्य होय. परंतु सदाचारी मनुष्य अशा समयीं मोठ्या निश्चयानें व धैर्यानें प्राप्त दुःख सहन करीत असतात. हें त्यांचें धैर्याचे वर्तन पाहून आपणांस मोठा आल्हाद होतो. परंतु कित्येक असे असतात कीं, ते अशा अनिष्ट प्रसंगीं आपल्या मनाची दुर्बलता व नीचता प्रकट करितात. यामुळे आपणांस त्यांच्याविषयीं हळहळही बेताचीच वाटते. जो मनुष्य आनंदाने मरतो, त्याची ती शेवटली कृति पाहून माझे दुःखाश्रु आटून जातात; आणि जो मरण समयी चित्ताची मोठीच तळमळ दर्शवितो, त्याच्या मरणाबद्दल शोक करण्यांत मला कांहींच अर्थ वाटत नाहीं. मला स्वताला मरण प्राप्त झालें असतां, तें सोसण्यास जसा मी तयार असणार, तद्वत्च माझ्या मित्रांच्या किंवा मुलांच्या मरणाचे दुःख सोसण्यास मी तयार असेन. आजपर्यंत आपले किती इष्टमित्र गत झाले त्याचा जो मनाशीं विचार करील, तो मृतांच्या शोकांत फार काळ व्यर्थ घालविणार नाहीं. हाच बोध अंमळ निराळ्या रीतीनें पुढील वचनांत केला आहे:-

वयं येभ्यो जाताश्चिरपरिगता ऐव खलु ते
समं यैः संवृद्धाः स्मरणपदवी तेऽपि गमिताः
इदानीमेते स्म प्रतिदिवसमासन्नपतनात्
गतास्तुल्यावस्था सिकतिलनदीतीरतरुभिः ।। * भर्तृ.

आपले मित्र जिवंत असतां ज्यांनीं त्यांची फारशी परवा केली नसते, ते त्या मित्रांच्या मरणाबद्दल अमर्याद शोक प्रदर्शित करीत असतात. आपले मित्र जिवंत असतां त्यांच्यावर उपकार करण्याचे अनेक प्रसंग आले असून, जे मित्रधर्मास जागून त्याच्या उपयोगी पडले नाहींत, त्यांचा हिशोब असा असतो कीं, त्या मित्रांच्या मरणाबद्दल पुष्कळ शोक केल्याने आपण त्यांच्या ऋणांतून मुक्त होऊं. कित्येक तर असे असतीत कीं, शोक व हर्ष ही आलटून पालटून करीत रहाण्यांत त्यांच्या चंचल मनास आराम वाटतो. कित्येकांस तर शौक करण्यांतच मोठे समाधान वाटत असतें. परंतु पुत्राचा देह चितेवर जळत असतां, किंवा मित्र प्राण सोडीत असतां, त्याच्यासाठी शौक करण्यांत एक प्रकारचे सुख मानणारे जे कोणी जन असतील, ते नराधम समजावे. आपल्या प्रियजनांच्या मरणाने चित्त शोकाकुल न होणें यांत खरोखरीच मोठा कठोरपणा आहे. आपल्या गत मित्रास विसरून जाणें, त्याची स्मृति त्याच्या कलेवराबरोबरच बुजून जाऊं देणें, आणि लोकाचारासाठी उगीच पुष्कळ रडलेंसें दाखविणे हा मोठा अमानुषपणा होय. आपला जो मित्र मरण पावतो, त्याच्या मनांतून एक तर स्वतांबद्दल दुसऱ्यास दुःख व्हावें असें मुळींच नसतें; किंवा त्याच्या मृत्यूबद्दल इतरांस शोक झाला आहे हें त्याला कळत नसतें. आपणांस झालेल्या दुःखाचे मृतमनुष्यास भान होत नाहीं

* झालो जर्यांपासुनि ते निमाळे ते आमुचे तुल्यवयस्क गेले आम्ही असों सांप्रत जाण तैसे नदीतटीं जर्जर वृक्ष जैसे. वामन

हें जर खरें आहे, तर आपलें दुःख निरर्थक होय. परंतु जर त्याला तें कळून येतें म्हणावे, तर ते त्याला मुळींच इष्ट नसतें. विवेकबलानें शोक आवरितां आला नाहीं तर निदान त्यामुळें आपला लौकिक कमी होतो याकडे दृष्टि देऊन तरी आपण तो आवरावा. कारण जो बेसुमार शोक विव्हल होतो, त्याला जन कमी लेखितात. शोकाकुल होऊन चित्ताचा उद्वेग दूर करूं पाहणे हें ज्ञात्याला मोठेच लाजीरवाणें आहे. आपणांस कितीही जबर दुःख झालें असलें तरी तें विवेकाने न घालविल्यास कालांतरानें आपोआप समूळ नष्ट व्हावयाचें.

आपण जो शोक करितों, तो आपल्या मित्रांपेक्षा आपणा स्वतांसाठींच विशेष करितो

आपण जो शोक करितों, तो आपल्या मित्रासाठीं करितों कीं आपणा स्वतांसाठीं करितों बरें? आपला एकादा चांगला मित्र गेला म्हणजे आपण जसे म्हणतों कीं, त्याची पुनः भेट होऊन त्याच्याशीं भाषणसुख अनुभवण्यास सांपडेल तर मी पाहिजे तें देण्यास तयार होईन. त्याच्या संगतीने मला कधींही खेद झाला नव्हता. त्याचें दर्शन मला घडले म्हणजे माझें हृदय आनंदानें उचंबळत असे. जिकडेजिकडे मी जाईं तिकडेतिकडे तो माझ्याबरोबर असावा असें मला वाटे. हे सर्व उद्गार मनांत आणिले म्हणजे असें म्हणावें लागतें कीं, जितका आपला मित्र चांगला असतो, तितके त्याच्या संबंधाचा शोक आवरणे कठीण असतें. परंतु आपण असा विवेक केला पाहिजे कीं, शोक करून कांहीं फायदा होण्यासारखा नसला तर तो करणें केवळ व्यर्थ होय; आणि जी अवस्था आपल्या प्रिय मित्राची झाली तीच जर आपली व इतर सर्व मनुष्यांची व्हावयाची आहे, तर आपल्या मित्राच्या मरणाबद्दल खेद करणें योग्य नव्हे. सर्व जगाची रहाटीच अशी आहे. जो आपल्या पूर्वी गत झाला त्याच्यासाठीं जसा शोक करावयाचा, तद्वतच् आपण त्याच्यामागून जाणार आहों म्हणून आपल्या बद्दलही आजच शोक करीत बसावें, असें नाही काय होत? कारण आपलाही असाच एक वेळ अंत होणार हें आपणांस निश्चयात्मकपणें ठाऊक असतें. जो आपल्यापूर्वी गेला, त्यास आपल्यापुढें पाठविलें असून, आपण त्याच्यामागून खात्रीनें जाणार आहों. जो गेला तो पुष्कळ गोष्टींस मुकला हें खरें. परंतु त्याला पुष्कळ गोष्टींची भीतिही नाहीशी झाली. उदाहरणार्थ त्याचा आतां कोणी द्वेष, मत्सर किंवा हेवा करणार नाहीं, किंवा त्याच्यावर कोणी रागावणार नाहीं. त्याला आतां या संसारातील कोणत्याही गोष्टीची अपेक्षा उरली नाहीं. एवढ्यापुरता विचार केला असतां, तो सुखीच झाला म्हणावयाचा. तो ज्या चांगल्या गोष्टींला मुकला असें आपणांस वाटतें, त्या ह्या सुखापुढे कांहींच नव्हत. आपला एकादा मित्र आपल्याकडून कोठें दूरदेशी गेला असतां, त्याबद्दल आपण इतका शोक करीत नाहीं; आणि तो मृत झाला म्हणजेच त्याच्यासाठीं शोक कां करितों बरें? वस्तुतः पाहता ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच नव्हत काय? पुनः आपल्या मित्राच्या समागमाच्या सुखास आपण अंतरलों तरी दुसरीं आणखी सुखे नाहींत काय? या सर्व गोष्टींचा विचार करून मनुष्यानें हा मित्रवियोगजन्य शोक आवरावा.

आपला मित्र गत झाला तरी मित्रत्वाच्या सुखास आपण अंतरणार नाहीं

मित्राच्या सहवासाने जें सुख आपणांस झालें असतें, त्यास आपण अंतरलों तरी आपला एक वेळ एक चांगला मित्र होता अशी आठवण होऊन जें समाधान वाटण्यासारखे आहे, तें आपलें कदापि नष्ट

होत नाहीं. सन्मित्राची आठवण झाली असतां, त्याच्याठायींचे सद्गुण मनांत येऊन मन प्रसन्न होतें. अपला जिवाचा मित्र गेला तरी त्याची अल्हादजनक स्मृति मी कदापि नष्ट होऊं देणार नाही. दुसरें असें कीं, मित्रवियोगाबद्दल तेवढा खेद मात्र करावयाचा, पण तो जिवंत असतां त्याच्यामुळे आपणांस किती सुख प्राप्त झालें, याचा कांहींच विचार करावयाचा नाहीं हें कांहीं योग्य नव्हे. तेव्हां तात्पर्य काय कीं, आपले मित्र हयात आहेत तों पर्यंत त्यांच्या संगमसुखाचा जेवढा लाभ आपणांस घेतां येईल, तेवढा घेण्यास सर्वदा जपावें. कारण त्यांचा केव्हा वियोग होईल याचा कांहीं नेम नाहीं. माझा एक होतकरू मुलगा मरण पावला. परंतु मीं असा विचार केला पाहिजे कीं, आजपर्यंत पुष्कळ मातापितरांनी आपल्या लेकरांकडून आपणांस पुढें सुख लाभण्याची आशा केली असून त्यांची ती सर्व आशा व्यर्थ गेली आहे. मुलगे बदफैल व विलासी निघाल्यामुळे आजपर्यंत किती कुटुंबांचा नाश झाला आहे बरें? परंतु मित्रवियोगाची गोष्ट अशी नाहीं मित्र जिवंत असतां, त्याच्या सहवासानें पुष्कळ सुखानुभव घडलेला असतो. यास्तव त्याची स्मृति कायम राहून जेव्हांजेव्हां त्याची आठवण होते, तेव्हांतेव्हां मनास जें वियोगजन्य दुःख होतें, त्यापेक्षां तो आपला एक वेळ मित्र होता हा विचार मनांत येऊन मनास आल्हाद अधिक वाटतो. जो आपला मित्र गत झाला त्याची मैत्री आपण त्याच्या पश्चात् विसरावीं हें योग्य नव्हे. आपली अशी वृत्ति असतें कीं, पुढील सुखाची आशा अनावर असल्याकारणानें जो सुखानुभव आपणांस गत काळीं घडलेला असतो, त्याबद्दल आपण अगदीं कृतघ्न होतों. परंतु ही वृत्ति सर्वथा दूष्य होय. यावरून आपली अशी समजूत झाली आहेसें वाटतें कीं, पुढें जें सुख आपणांस लाभावयाचें आहे, तें मात्र लवकर नष्ट व्हावयाचें नाहीं. परंतु ही केवळ भ्रांति होय. आपण नेहमी हें लक्षांत वागवावें कीं, गत काळीं जो कांहीं सुखानुभव घडलेला असतो, त्याविषयीं मात्र आपणांस खात्री असते. गत काळची आठवण होऊन, किंवा भावी सुखाची कल्पना मनांत येऊन, आपणांस समाधान वाटतें हें खरें आहे. तथापि भावी सुख लाभेलच असें आपणांस खात्रीने सांगतां यावयाचे नाहीं. परंतु गत काळीं जो सुखानुभव घडला, तो घडला नाहीं असें कालत्रयींही होणे नाही.

दुःखाच्या प्रथम झटक्याच्या वेळीं समाधान होणें नाहीं

दुःख ताजे असलें म्हणजे त्याचें समाधान एकाएकीं होणे नाहीं. अशा दुखाने विव्हळ झालेल्या मनुष्याशी नुसता बोलण्याचा प्रयत्न केला तर त्याला दुःखाचे अधिकच हुंदके येऊं लागतात. एकादा रोग झाला असतां, त्यास अमुक एका काळीं औषधोपचार करावा असें. ज्याप्रमाणें आहे, तशीच गोष्ट दुःखाच्या पहिल्या वेगाची आहे. रोगाचा पहिला जोर निघून गेल्यावर जसा औषधाचा उपयोग होतो, तसाच दुःखाचा पहिला झटका निघून गेल्यावर दुःखित मनुष्याचें समाधान करावे. ज्यांचे पुष्कळ दिवस सुखांत गेले असतात, त्याला कांहीं वेळ दुःखाक्रोश करूं द्यावा. परंतु ज्याचा बराच काळ दुःखांत आणि संकटांत गेला आहे, त्याची गोष्ट अशी नाहीं. त्याच्यावर पुष्कळ आपत्ति आल्यामुळें त्याच्याठायीं बरीच सहनशक्ति विकसित झालेली असते. उदाहरणार्थ असें पाहा कीं, जो नवशिक्या शिपाई असतो, त्याला समरभूमीवर एकादी जखम झाली असतां, तो तेवढ्यानेंच घायाळ होतो; किंवा शस्त्रवैद्य त्याच्यावर शस्त्रप्रयोग करूं लागला असतां, तो चळचळा कापूं लागतो. परंतु ज्या योद्ध्यानें पुष्कळ रणसंग्राम पाहिलेले असतात, व ज्यास अनेक वेळां जखमा लागलेल्या असतात, त्याला शत्रूनें किंवा शस्त्रवैद्यानें उभा कापला तरी तो

तिळप्रायही डगमगत नाहीं. अशाच निश्चयानें आपण सर्व संकटप्रसंगीं वर्तन केलें पाहिजे. आपणांस आजपर्यंत या संसारामध्यें जो अनुभव प्राप्त झाला आहे, त्यावरून आपणांस विपत्ति सहन करण्याची सवय लागली नाहीं तर तो अनुभव केवळ व्यर्थ होय. कोणी म्हणेल कीं, एकादा वाईट प्रसंग येऊन मन व्यग्र झालें असतां, कांहीं तरी करमणूक काढून मनाचे रंजन करावे, म्हणजे दुःखाचा परिहार होईल. परंतु हा दुःखपरिहाराचा उपाय चांगला नव्हे. कारण चित्तरंजनाचे साधन उपस्थित नसलें म्हणजे आपण पुनः शोकनिमग्न होण्याचा दृढ संभव असतो. यास्तव शोकनिवारणार्थ असा अप्रयोजक उपाय करण्याच्या भरीस न पडतां, त्याचें निवारण केवळ विवेकानेच करण्यास झटावें, हें चांगलें.

भाग चोविसावा

ज्ञात्या मनुष्यास दारिद्र्य दुःखदायक वाटणार नाहीं

जो मनुष्य आपल्या देहाच्या गरजांची परवा न करितां केवळ अंतर्यामाच्या सुस्थितीकडे लक्ष देतो, तो कदापि दरिद्री नसतो. असा मनुष्य लवकरच मोठा संपन्न व्हावयाचा. मात्र ही त्याची संपन्नता जडपदार्थाधीन नसून केवळ आध्यात्मिक असते. आतां एवढी मात्र गोष्ट खरी आहे कीं, निसर्गसिद्ध ज्या गरजा, त्या भागविल्यावांचून चालावयाचें नाहीं. परंतु ह्या गरजा भागविण्यापलीकडे जी अर्थलालसा ती केवळ व्यर्थ व अनावश्यक होय. क्षुधा लागली म्हणजे तिची कृति करण्यापुरते अन्न सेवन करावें. यापलीकडे जिव्हालौल्य पुरविण्यासाठीं स्वादु अन्नाचे भक्षण करावें, असें निसर्ग सांगत नाहीं. मनुष्याची क्षुधा जाढ्याभरड्या भाकरीनेंही तृप्त होते. त्याचप्रमाणे त्यास तृषा लागली असतां, ती शुद्ध पाण्यानें भागविता येते. सुधा किंवा तृषा यांच्या कृतीसाठीं जें अन्न किंवा उदक सेवन करावयाचे तें सुवर्णाच्या, रुप्याच्या किंवा निव्वळ मातीच्या पात्रांतून केले तरी सारखेच. जो मनुष्यच आपल्या वासनांचे दमन करून कोणत्याही जडविषयाधीन सुखाची लालसा करीत नाहीं, तो मनुष्य कंगाल म्हणणे वाजवी नव्हे. अशा मनुष्यास जड संपत्ति अनुकूल नसली तरी नैतिक संपत्ति त्याच्यापाशीं असते ह्या संपत्तीचा अपहार इतर जनांस कदापि करितां येणारा नव्हे, म्हणून त्यास संपन्न म्हणतां येत नाहीं असें कोण म्हणेल? जो आपल्या जवळच्या संपत्तीने तृप्त असतो, तो सुखी समजावा. अतृप्त मनुष्यापाशी विपुल संपत्ति असली तरी त्याला सुखी म्हणतां येत नाहीं. कारण ज्याच्यापाशीं पुष्कळ संपत्ति असते, त्याला आणखी संपत्ति मिळावी अशी इच्छा असते. यावरून असें स्पष्ट होतें कीं, त्याच्यापाशी कितीही संपत्ति असली तरी त्याला ती पुरेशी वाटत नाहीं. परंतु जो आपल्या जवळील वित्तानें तृप्त असतो, त्याचें चित्त स्वस्थ असतें. ज्या दौलतीस्तव मनुष्यास स्वदेशत्याग करावा लागतो, किंवा त्याची बायकामुलें त्यास विष घालण्यासही चुकत नाहींत, अशी दौलत ज्याच्यापाशी नसते, परंतु ज्याच्यापाशीं असें वित्त असतें कीं, ज्याच्या योगानें त्याला मोठ्या घनघोर संग्रामांतही निर्भयता वाटते, ज्यामुळे शांततेच्या वेळीं मनाचे स्वास्थ्य प्राप्त होतें, आणि जें त्याच्याकडून कोणी कदापि हिरावून घेण्याचे भय नसतें, अशा मनुष्यास कोण विपन्न म्हणेल? जो मनुष्य आपल्या जवळील वित्ताने तृप्त असतो, त्यास दरिद्री म्हणतां येत नाहीं; आणि जवळ पुष्कळ दौलत असूनही जो आणखी दौलतीचा लोभ करितो, त्याला धनवान् म्हणतां येत नाहीं. हाच आशय पुढील वचनांत सुचित केला आहे:-

स हि भवति दरिद्री यस्य तृष्णा विशाला ।
मनास च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्रः ।। * सु.

शिकंदर बादशहाने त्याकाळीं ज्ञात असले एकंदर मुलूख जिंकिल्यावर त्यानें आणखी मुलूख जिंकावयास नाहींत म्हणून दुःख प्रदर्शित केलें. त्याला सार्वभौम राज्य प्रात झालें असताही त्याची राज्यतृष्णा शांत झाली नाहीं. एकाद्या मनुष्यापाशीं कितीही पैका असला तरी त्याला धनवान् म्हणतां येत नाहीं. कारण त्याला जितका अधिक पैका मिळत जातो, तितका त्याला त्याचा अधिक लोभ सुटतो. माझ्या मते जो अगदीं कंगाल असतो, तोच मोठा धनाढ्य होय. कारण तो निवळ नैसर्गिक गरजा भागविण्यापुरतें ऐहिक वस्तूंचें संपादन करितो. अशा मनुष्यास दारिद्र्याचें कांहींएक वाटत नाहीं. ज्याला सामान्य लोक सुखी म्हणतात, त्यांचें तें सुख बाहेरील खोट्या भपक्यावरून व थाटमाटावरून आहेसें भासतें. परंतु नैतिकसंपदायुक्त मनुष्याचें अंतर्याम वैभवयुक्त असून सुखान्वित असतें. त्याच्या खाण्यापिण्यांत थाटमाट असा मुळींच नसतो. क्षुधाशमनार्थ अन्न मिळाले म्हणजे त्यास पुरते. त्याला ताटे, वाड्या किंवा नोकर-चाकर यांची मुळींच आवश्यकता नसते. त्याच्या क्षुधातृप्तीस अमुकच प्रकारचे अन्न पाहिजें असा आग्रह नसतो. ऐषआरामांत मग्न झालेलें धनवान् लोक क्षुधाशमनास अनावश्यक अशा मिष्टान्नांच्या सेवनानें आपली पोटें नेहमी गच्च भरून देहाला नानाविध पीडा लावून घेतात. ते अशा प्रकारची स्वादिष्ठ अन्नें भक्षण करितात कीं, त्यांच्या योगाने क्षुधातृप्ति न होतां उलट क्षुधेचें कृत्रिम उत्तेजन होतें. हें पक्वान्न चांगले झालें नाहीं, हें अगदीं साधारण प्रतीचे झालें. ह्या पक्वान्नाकडे तर माझ्यानें पाहवत देखील नाहीं. असे नापसंतीचे उद्गार त्यांचे सर्वदा निघत असतात. नैसर्गिक दृष्ट्या आरोग्य व शरीरशक्ति कायम रहाण्यापुरतें अन्नसेवन करावे. तें मिष्ट किंवा मसालेदार असण्याची मुळींच गरज नाहीं.

रणवाद्ये वाजून घनघोर संग्राम माजला तरी जडसंपत्तिहीन मनुष्य स्वस्थ असतो. कारण शत्रु विजयी होऊन लुटालूट करूं लागला तर त्याचें कांहींएक लुटले जाणार नाहीं. त्याचप्रमाणे आसपास मोठी आग लागली असतां, त्याला आपल्या देहाव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीही पंचाईत करावयास नको. तो प्रवासास निघाला असता, त्याला पोंचवावयास किंवा त्याचा शेवटला निरोप घ्यावयास लोकांची गर्दी जमत नाहीं. त्याचें उदरपोषण आणि मनाची शांति थोड्याने होते. उद्या आपलें कसें होईल याची काळजी त्याला कधींही नसते. अशा मनुष्याचें वर्तन पुढील वचनांतल्या बोधाअन्वयें असतें.

गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिन्तयेत् ।
वर्तमानेन कालेन वर्तयन्ति विचक्षणाः ।। * सु. र.

त्याची कोणतीच वासना प्रबल नसून त्याची बुद्धि कुशाग्र असते. धनाढ्य मनुष्यानें मिताहारविहाराचा कितीही नियम केला तरी जडसंपत्तिहीन मनुष्याप्रमाणे वासनांचे दमन त्यास करितां यावयाचें नाहीं; आणि त्याच्या इतकी मानसिक उन्नति त्यास साधावयाची नाहीं.

---

* जें गत झालें त्याबद्दल शोक करू नयें. पुढे काय घडणार त्याविषयीं चिंता वाहूं नये. वर्तमान कालापुरता विचार करून शहाण्यानें वागलें पाहिजे.

वाय ५३८-१४

दारिद्र्य आपणांस अनिष्ट वाटतें एवढेच काय तें

जो मनुष्य दारिद्र्य अनिष्ट मानीत नाहीं, त्यास तें पीडादायक वाटत नाहीं. दारिद्र्याचें अनिष्टत्व आपल्या समजुतीवर अवलंबून आहे. एकादा श्रीमंत गृहस्थ प्रवासास निघाला असतां त्यास आपल्या बरोबर सामानसुमान अगदीं कमी घेऊन व चाकरमाणसेंही बरोबर बेताचींच घेऊन विशेष सुखानें प्रवास करितां येत नाही काय? त्याचप्रमाणे तो एकाद्या गरीब मनुष्यासारखें जाड्याभरड्या व अगदीं माफक अन्नाचें सेवन करून रहात नाही काय? कधींकधीं निवळ वैचित्र्यासाठीं वनोपवनांत जाऊन अगदीं जमिनीवर केवळ मातीच्या पात्रांतून भोजन करीत नाहीं काय? तेव्हां जो मनुष्य एकाद्या गोष्टीची जेव्हांतेव्हां इच्छा करितो, आणि तिचें अनुकरण करण्यांत त्याला आनंद वाटतो, तिची तो भीति बाळगूं लागला तर त्यास वेडा नाहीं काय म्हणावयाचें? श्रीमंत व दरिद्री मनुष्यांच्या मुखचर्या ताडून पाहिल्या असतां दरिद्री मनुष्यांच्या कपाळाला फार थोड्या आठ्या पडलेल्या असतात; आणि त्याचे हृदय विशेष उल्हासयुक्त असतें. त्याच्यावर एकादें दुःख कोसळलें असतां, त्यांतून तो लवकर मोकळा होतो. तीच श्रीमंताची सुखचर्या पाहिली असतां, तीवरील आनंदाची छटा केवळ वरकरणी असते. त्याचे अंतर्याम फार उदास व चिंतातुर असतें. तरीपण त्याला आपलें संकट बोलून दाखवितां येत नसतें. यामुळें त्याच्या मनाचा उद्वेग आंतल्या आत धुमसून त्यास चैन पडत नसतें. याप्रमाणे त्याच्या चित्तांत काहूर माजलें असलें तरी त्यास आपण सुखी आहों असे वरवरून दाखवावें लागतें. याप्रमाणें त्यांचे सौख्य केवळ भासमय असतें. त्यांत कांहींएक तथ्य नसतें. त्याच्या बाहेरील डामडौलाकडे लक्ष्य न पुरवितां, त्यांचे अंतर्याम शोधून पाहिलें तर त्याच्या स्थितीचा हेवा कोणीही करणार नाहीं. एकादा घोडा आपणांस विकत घ्यावयाचा असला म्हणजे आपण फसूं नये म्हणून त्याच्या अंगावरचा सर्व सरंजाम काढून त्याचा आकार व अंग ही तपासून पाहतों; तद्वत्च अमुक मनुष्य खरा सुखी आहे किंवा कसें हें पाहतांना त्याचा वरकरणी डौल व थाटमाट पाहण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. त्यानें आपला देह अलंकारादिकांनीं मढविला असल्यास आपण असें खास समजावे कीं, असा बाहेरून भपका करून आपली व्यंगे छपविण्याचा त्याचा मानस आहे. ज्याला दारिद्र्यावस्थेत समाधान मानून रहातां येत नाहीं, त्याला मोठी संपत्ति प्राप्त झाली तरी संतोष वाटावयाचा नाहीं. कारण सुख किंवा असुख मानणें हा मनाचा धर्म आहे. त्यांत जडवस्तूचा कांहींएक संबंध नाहीं. समजा कीं, एकादा मनुष्य आजारी आहे, म्हणून त्याला झोपडीतून काढून राजमंदिरांत नेऊन ठेविलें, तरी त्याचा आजार कांहीं उपशम पावावयाचा नाहीं. कारण तो झोपडीतून गेला तरी तो आपला आजार आपल्या बरोबर नेतो. तेव्हां मनुष्याची बाह्य व मानसिक स्थिति अशी असावी कीं, तीपासून त्याला कदापि च्युत होण्याचे भय नसावें. आपल्या आसपासचे लोक लोभी आणि कावेबाज असतां, त्यांच्यामध्यें सुरक्षित रहाणे हें मोठेच सुख होय. कारण अशा लोकामध्ये चहाडखोर व चोरटी माणसे पुष्कळ असतात. ज्याला कोणाच्या देवीघेवीची दगदग नसते, आणि जो पाहिजे ती वस्तु हातची सोडण्यास किंवा नको म्हणण्यास तयार असतो, तो मनुष्य मोठाच सुखी होय. ज्याची ऐपत अगदीं थोडी आहे, त्याला मी दरिद्री म्हणत नाहीं. परंतु जो जवळ पुष्कळ असतां अधिकाचा लोभ करितो, तो दरिद्री होय. जेवढ्या पदार्थांची चरितार्थास आवश्यकता असते, तेवढे ज्याच्यापाशी असतात, तो मनुष्य संपन्न समजावा. मनुष्य दरिद्री असूनही जर तृप्त आहे, तर त्याला मोठ्या

धनाढ्य पण अतृप्त अशा मनुष्यापेक्षां सुखी म्हणावें. आपले वित्त वाढल्यानें आपण संपन्न होत नाही, तर आपल्या वासना जिकिल्यानें आपण तसे होतों. दुसऱ्याच्या तिजोरीतील पैक्याचा आपण हेवा करीत नाहीं, तर आपल्या स्वतांच्या तिजोरीतल्या पैक्याचा हेवा तरी आपण कां करावा? परंतु जवळ पुष्कळ पैका असूनही ज्याचे मन बिघडत नाहीं, तो मनुष्य स्तुतीस पात्र होय. धनाची विपुलता असताही जो अगदीं गरिबीने वर्ततो, तो थोर मनाचा मनुष्य समजावा. परंतु ज्याच्या मनास संपत्तिमूलक मोह शिवत नाहीं, आणि जो दुसऱ्याचे मन आपल्याविषयीं कलुषित होऊं देत नाहीं, तो मनुष्य सर्वांत सुखी होय. वित्ताचा तिरस्कार करावा असा बोध दरिद्री मनुष्यास करणें फार सोपे आहे. त्याचप्रमाणं श्रीमंतास दारिद्र्यापासून होणाऱ्या फायद्यांचें वर्णन करणें सोपे आहे. परंतु दारिद्र्यास संपत्ति प्राप्त झाली असतां, किंवा श्रीमंतास दारिद्र्य प्राप्त झालें असतां, ते कसे वागतील याविषयी कांहीं सांगता येत नाहीं. एकादी गोष्ट आपणांस निसर्गतःच करणें भाग पडलें तर त्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं, तर ती मुद्दाम करण्याविषयीं झटणे यांत मात्र मनुष्याची खरी पारख होते. संपत्ति अनुकूल असतां मुद्दाम दारिद्र्यासारखें वागण्याचा अभ्यास केल्यानें प्रत्यक्ष दरिद्रावस्था प्राप्त झाली असतां, ती सहन करावयास सोपे जातें. अतिशयित मोठें संकट प्राप्त झालें असतां, तें सहन करण्याची तयारी पूर्वीपासून करून ठेवणे हें थोर मनाच्या मनुष्याचे लक्षण होय. अशीं संकटे प्राप्त होण्यापूर्वीच त्यांच्याविषयी मनांत वारंवार विचार आणिल्यानें त्यांचा आपल्या मनास परिचय होऊन, तीं प्रत्यक्ष प्राप्त झालीं असतां सह्य होतात; इतकेंच नव्हे तर त्यांपासून आपण सुरक्षित आहों असा विचार आपल्या मनांत येऊन आपणांस आनंद वाटतो. दारिद्र्य साक्षात् प्राप्त झालें असतां, आपल्या खऱ्या मित्रांची पारख व निवड होते. हा एकच आपला फायदा झाला तरी तो पुरे आहे. कारण आपल्या विपन्न स्थिती मध्यें आपणांस जो तो सोडून गेला तरी ज्याचे आपल्यावर खरें प्रेम असतें, तो आपणांस सोडून जात नाहीं. हें पाहून आपणांस मोठेच सुख वाटतें. हें जीवित सुखाचे व्हावयास सोन्यारुप्याची आवश्यकता आहे असें जो मानितो, तो मोठाच निंद्य समजावा. कारण जीवित कायम रहाण्यास अन्न आणि पाणी हीं पुरतात.

मध्यम स्थिति सर्वांत उत्तम होय

माझी इच्छा एवढीच आहे कीं, माझी गरिबी मला कष्टप्रद न व्हावी, किंवा तिच्यामुळें इतरांस तोशीस पोंचावी. ज्या स्थितीमध्यें चरितार्थ चालण्यास अडचण तर पडत नसते, पण फारशी संपन्नताही नसते, ती स्थिति उत्तम होय. मध्यम स्थिति आणि मनाची सौम्यता असली म्हणजे आपलें भीतीपासून आणि मत्सरापासून रक्षण होतें. कशाचाही लोभ न करणें आणि आपल्या मानसिक उन्नतींतच समाधान मानणें यासारखें सुख दुसरें क्वचितच असेल. हाच बोध पुढील वचनांत उत्कृष्ट प्रकारें केला आहेः-

संतोषामृतप्तानां यत्सुखं शांतचेतसाम् ।
कुतस्तद्धनलुब्धानामितश्चेतश्च धावताम् ।। सु. *

जें थोडे आपल्यापाशीं असतें तेवढेच हात राखून खर्चिल्याने आपणांस पुरे होतें; आणि हात राखून खर्च केला नाहीं तर आपल्यापाशीं कितीही असलें तरी तें पुरे पडत नाहीं. मनुष्य गरीब असला तरी तो

* संतोषरूप अमृतानें जे तृप्त असतात, अशा शांतचित्त पुरुषांस जे सुख प्राप्त होतें, तें जे धनलुब्ध जन सैरावैरा धांवत सुटतात, त्यांला कोठून प्राप्त व्हावयाला.

काटकसर करील तर श्रीमंतच समजावयाचा. आपली वतनवाडी गमावण्याचा प्रसंग आला तर, ती मुळींच नसती तर बरें झालें असतें, असें आपणांस वाटण्याचा संभव आहे. ज्याच्यापाशीं गमावण्यासारखें अगदीं थोडे असतें, त्याला भीतिहीं फारच कमी असते. जे कधीही संपन्न नसतात, ते, जे एकवेळ संपन्न असून पुढें विपन्न होतात, त्यांच्यापेक्षा सुखी होत. दारिद्र्य आणि श्रीमंती यांच्या मधली स्थिति फारच सोईची असते. जी अवस्था सुरक्षित असून सुखावह असते, ती उत्तम सोईची समजावी. म्हंटले आहे: **'मध्या स्थिरतरा स्थिति:'** आपल्या देहाचे आरोग्य कायम रहाण्यापुरतें आपण त्यास जपावें; अधिक जपण्याचे प्रयोजन नाहीं. देह मनाच्या स्वाधीन रहाणार नाहीं तर त्याचें व्रतोपवासादिकांनी दंडन करणें युक्त होय. शीत, उष्ण, क्षुधा आणि तृषा यांपासून देहाचे रक्षण करणें उचित होय; त्याचप्रमाणे लज्जारक्षण करण्यापुरतें व इतर गैरसोई टाळण्यापुरतें आच्छादन व निवाऱ्याची जागा ही असली म्हणजे पुरे. मनुष्य केंबळाच्या झोपडीत निजला काय, आणि मोठ्या सुंदर नकशीच्या छपराखालीं निजला काय, सारखेच. त्याचें शीतोष्णापासून निवारण व्हावयास कोठेंही अडचण पडावयाची नाहीं. त्यानें आपलें मन मात्र थोर व पवित्र राखावे; म्हणजे इतर सर्व पदार्थ केवळ कस्पटासमान होत. पुढें आपली अवस्था काय होईल याचा नेम नाहीं. आपणांस संपदा प्राप्त व्हावी हाणून देवाची किंवा दैवाची करुणा भाकण्याऐवजी आपण कशाचीही इच्छा करूं नये हा उत्तम मार्ग होय.

पत्रे व इतर स्फूट विचार

प्रकरण पहिलें

खरें सौख्य सद्वर्तनानें प्राप्त होतें

तुझे पत्र वाचून मला आनंद झाला. तुझ्या मजकुरानें माझ्या शांत चित्तास उत्साह प्राप्त झाला. माझी स्मृति, जी सांप्रत मंद आणि जड झाली आहे, तिला थोडेंसें उत्तेजन प्राप्त झालें. हे लुसिलिअसा, सौख्याचे जीवन ज्यास प्राप्त व्हावें. अशी इच्छा आहे, त्याला उत्कृष्ट साधन म्हटले म्हणजे सदाचाराव्यतिरिक्त अन्य काहींही चांगले नाहीं अशी मनाची खात्री होणें हें होय. अशी तुझी खात्री व्हावयास कोणत्या गोष्टीचा प्रत्यवाय घडत आहे बरें? ज्याला सदाचारावांचून इतर कोणतीही गोष्ट प्रिय व इष्ट वाटत नाहीं, तो स्वतांच्या अंतर्यामी सौख्याचा अनुभव घेत असतो. परंतु ज्याच्या बुद्धीचा असा निश्चय होतो कीं, सदाचाराखेरीज दुसऱ्या गोष्टही इष्ट आहेत, तो परस्वाधीन होतो. असा मनुष्य आपली बालकें गत झालीं असतां त्याबद्दल शोक करितो. तीं आजारी झाली असतां घाबरून जातो, आणि त्यांला औषधोपचार करण्याची खटपट करितो. कोणीं त्याच्याशीं ठकबाजीचे वर्तन केलें, किंवा त्याचें कांहीं नुकसान केलें तर त्याला वाईट वाटतें. त्याचप्रमाणे स्त्रीजनांविषयी त्याच्या चित्तांत अनुराग असल्याकारणानें त्यांच्या वियोगाने तो खेद पावतो. इतरांकडून प्राप्त होणाऱ्या मानापमानामुळे त्याच्या चित्तात हर्षशोकादि होतात. परंतु ज्यास मरणभीतीमुळें सर्वदा एकसारखा त्रास होत असतो, अशा दुःखी जनांची संख्या फारच मोठी असते. कारण मरण केव्हां कसे प्राप्त होईल याचा नेम नसतो. ह्यास्तव ते सर्वदा चिंतातुर असतात. जिकडेजिकडे ते जातात, तिकडेतिकडे ते आपल्या जिवाला भीत असतात. ते जसे काय शत्रूच्या प्रदेशातून चालले आहेत असें त्यांचें वर्तन असतें. एकादा भयप्रद ध्वनि कानीं पडला असतां, किंवा एकादी अनिष्ट गोष्ट घडली असतां, ते अगदीं घाबरून जातात, आणि इकडेतिकडे कावरेबावरे होऊन पाहत सुटतात. तेव्हां ही मरणभीति त्यांच्या हृदयांतून निघाल्यावाचून त्यांचा हा हृद्रोग व चित्ताची अस्वस्थता हीं नाहींतशी व्हावयाचीं नाहींत. कोणी मनुष्य आपल्या सर्व वित्तास मुकून अगदीं विपन्न होतो. कोणी श्रीमंत असूनही त्याच्यावर मोठमोठ्या आपत्ति येऊन, त्याचें जीवित कष्टमय झालेलें असतें. कोणी राजशासनामुळें आपल्या देशास व प्रियजनांस अक्षयीं मुकून परदेशांत विपत्ति भोगीत असतो. कोणी वादळाच्या तडाक्यांत सांपडून तारूं फुटून बुडून मरतो, किंवा भलत्याच ठिकाणीं लागून अन्नपाण्यावांचून प्राण सोडितो कोणी परकीयांच्या द्वेषमत्सरादिकेंकरून महासंकटांमध्यें सांपडून खेद पावतो. असे हे कठीण प्रसंग इतरांवर आलेले पाहून जनांस मोठी दहशत वाटते. ज्याला या प्रसंगांमुळे प्रत्यक्ष पीडा सोसावी लागते, त्यांच्यापेक्षाही अधिक पीडा अन्य पाहणाऱ्या जनांस वाटण्याचा

संभव असतो. परंतु ही त्यांची पीडा केवळ काल्पनिक होय. अशा प्रकारची संकटे आपणांवर येतील एवढ्याच भीतीनें ते आज त्रस्त होत असतात. याप्रमाणे दुसऱ्यावर आलेले कठीण प्रसंग ज्यांच्या दृष्टीस पडतात त्यांच्या चित्तांत भीति उत्पन्न होऊन ते कंपायमान होतात. अशी मानसिक अवस्था ज्या मनुष्याची असते, त्यास कदापि सौख्य प्राप्त होणें नाहीं; कारण भीतीचा समूळ नाश झाल्यावांचून सौख्याचा अनुभव घडावयाचा नाहीं. ज्याच्या चित्तांत भयशंका वसत असते, त्याचें जीवित कष्टमय समजावयाचें. जी संकटे कधी काळी प्राप्त होण्याचा संभव असतो, अशा संकटांच्या धास्तीने जो आपलें चित्त अस्वस्थ होऊं देतो. त्याला ही तळमळ निरंतरची लागलेली असते. अशा भयत्रस्त जनांस या संसारांत निर्भय होण्याचा एकच मार्ग आहे. तो असा कीं, त्यानें ऐहिक सुखसंपदा तुच्छ मानावी; आणि जें सदाचारयुक्त असेल तेवढेंच इष्ट व प्रिय समजून त्यांत समाधान मानावें. नीतीवाचून इतर गोष्टी चांगल्या आहेत असें जो मानितो, तो दैवाच्या आधीन होऊन ज्या गोष्टी त्यास यदृच्छेने प्राप्त होण्यासारख्या असतात, त्यांची अपेक्षा करीत बसून तो विनाकारण कष्ट पावतो. याप्रमाणे दैवावर भरवसा ठेवून जे जन या संसारांतील प्रिय गोष्टींची अपेक्षा करीत बसतात, त्यांनीं अशी कल्पना मनांत आणावी कीं, दैव ही कोणीएक देवता असून, ती या संसारी जनांस प्रिय वाटणाऱ्या अशा पुष्कळ वस्तु आपल्या हातांत घेऊन त्या त्यांच्याकडे केवळ यदृच्छेनें फेंकीत आहे. धन, मान व इतर सुखविषय, जे ती भूलोकच्या जनसमाजाकडे फेकीत आहे, ते आपणांस मिळावे म्हणून सर्व मोठ्या आतुरतेनें एकमेकांस ढकलीतबुकलीत आहेत. अशा त्यांच्या गर्दीमुळें व धांदलीमुळे त्यांच्याकडे फेकलेल्या वस्तूंपैकी पुष्कळ फुटून तुटून नाश पावतात. बरें ज्या वस्तु जनसमाजाच्या हातीं येतात, त्यांची वाटणी सर्वांस सारखी होत नसते. कित्येक वस्तु तर अशा असतात कीं, त्या ज्या मनुष्यांच्या हातीं लागतात, त्यांचा त्या सर्वस्वीं नाश करितात. आतां या नाशमूलक वस्तूंपैकीं कित्येक ज्या मनुष्यांस प्राप्त होतात, त्यांच्या त्या कधीं ध्यानी मनींही नसतात, पुनः, जे कित्येक जन अशा वस्तूंच्या आशेनें मोठे जिवापाड कष्ट करितात, त्यांला त्यांची कदापि प्राप्ति होत नाही. कधींकधीं त्यांचा पराकाष्ठेचा हव्यास धरिल्यामुळेंच त्यांस ते अक्षयीं मुकतात; किंवा त्या वस्तु त्यांच्या हातीं आल्या तरी त्यांच्या अतिलोभामुळें त्या त्यांच्याकडून कोणी तरी हिसकावून घेतों. लोभी मनुष्यांस आपल्या लोभीपणाच्या वृत्तीबद्दल कितीही आनंद होत असला तरी हा त्यांचा आनंद फार वेळ टिकणारा नव्हे. ज्या वस्तूंच्या लोभानें ते पराकाष्ठेचे श्रम करितात, त्या त्याला प्राप्त झाल्या असतां त्यांच्या ध्यानांत असें येतें कीं, ज्या ह्या वस्तूंसाठी आपण एवढे भगीरथप्रयत्न केले, त्या एकंदरींत पाहतां अगदीं क्षुल्लक असून, त्यांत सौख्याचे नांवही नाही. हाच भाव पुढील वचनांत उत्कृष्ट प्रकारें व्यक्त कला आहेः-

श्रीयो दोलालोला विषयजरसाः प्राजतविरसाः
विपद्गेहं देह महदपि धन भूरि निधनम् ।
बृहच्छोको लोकः सततमबलादुःखबहलाः
तथाप्यस्मिन्घोरे पथि बत रता हन्त कुधियः ।। सु. *

* लक्ष्मी चंचल आहे; विषय परिणामी विरस होतात; हा देह विपत्तीचें घर आहे; केवढीही मोठी संपत्ति असली तरी नष्ट व्हावयाची; हे लोक मोठ्या दुःखास कारण होतात; स्त्रियांपासून तर मोठीच पीडा उत्पन्न होते. असें आहे तरी या भयंकर संसारमार्गामध्यें अज्ञ जन रमतात हें मोठेच वाईट होय.

परंतु ही दृष्टि कोणाला? जो अंमळ विचार करील त्याला. इतर साधारण जनांची रीत पाहिली असता अशी दिसते कीं, ऐहिक सुख विषयांची वासना होऊन ते त्यांच्या प्राप्तीसाठीं हवे ते कष्ट सोसण्यास तयार होतात. त्यांची हाव इतकी अमर्याद असते कीं, आपणांस हजारो हात असतें तर बरें झालें असतें असें त्यांस वाटूं लागतें. ज्या वस्तूंची ते अहर्निश अपेक्षा करीत असतात, त्या लवकर प्राप्त होत नाहींत म्हणून त्यांस मोठी तळमळ लागलेली असते. परंतु वस्तुत: पाहता अशा स्पृहणीय वस्तु अगदीं परिमित असल्या कारणानें त्यांची प्राप्ति सर्वांस होण्याची सोय मुळींच नसते. तरीपण त्यांची इच्छा सर्वांसच होत असते. दैवाकडून त्या यदृच्छायोगेंकरून खालीं पडत असतां, त्या आपणच बळकावू असा त्यांचा मनोदय असतो. अशा प्रकारें अपेक्षा करीत असतां, एकादी इष्ट वस्तु हातीं आल्यानें आपण तेवढ्याच पुरते आनंदित होतों; आणि ज्यांची तत्प्राप्तीची आशा व्यर्थ झाली, ते मात्र आपला हेवा करूं लागतात. म्हटलें आहे.

लोभ: प्रतिष्ठा पापस्य प्रसूतिर्लोभ एवच ।
द्वेषक्रोधादिजनको लोभ: पापस्य कारणम् ।। * सु.

कधीकधी तर एकाद्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं आपण ज्या मानानें परिश्रम करितों, व द्रव्यादिकांचा खर्च करितों, त्या मानानें तिची प्राप्ति आपणांस होत नसते. इतकेंच नव्हे, तर पुष्कळ प्रसंगीं आपला सर्व उद्योग व खर्च व्यर्थ जाऊन, आपण फजीत होतों. तर अशा ह्या वस्तूंच्या प्राप्तीची हाव आपण सोडून देऊं, आणि जे कोणी त्यांच्या प्राप्तीसाठीं धडपड करीत असतील, त्यांना ती सुखे करूं देऊं. अशा यदृच्छायोगेकरून प्राप्त होणाऱ्या वस्तूं विषयींची इच्छा त्यांस हवी तशी करूं द्या; आणि त्यांला याप्रमाणें सर्वदा संदेहांत व व्यर्थ आशा करण्यांत यथेच्छ निमग्न होऊं द्या. ज्या कोणास वास्तविक सौख्याची अपेक्षा असेल, त्यानें आपल्या बुद्धीचा असा निश्चय करावा कीं, सदाचाराव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तु कल्याणप्रद नाही. सदाचारी पुरुषांस लौकिक दृष्ट्या जे कठीण प्रसंग अनुभवावे लागतात, ते वस्तुतः पाहता केवळ तसे नव्हत. पुनः, या संसारामध्ये आपणांस जो आयुर्दाय नेमलेला आहे, तो जगाच्या एकंदर जीविताशी ताडून पाहतां अत्यल्प आहे. आपण या संसारांत अतृप्त व नाखुष होतों याचें कारण एवढेच कीं, सुखदायक गोष्टी आपणांस नेहमी प्राप्त होत नाहींत; आणि ज्या प्राप्त होतात, त्या देखील अत्यल्प असून अनिश्चयात्मक असतात. त्याला आपण केव्हां मुकू याचा नेम नसतो. यामुळे आपणांस या जीविताचा कंटाळा आला असतो, तरीपण आपणांस मरावेंसें मुळींच वाटत नसतें. आपले सर्व बेत व मनोरथ शेवटास जातील याचा कांहीं नेम नसतो; आणि जे सुखविषय आपणांस प्राप्त होतात, त्यांनीं आमची तृप्ति होत नसते. यांचें कारण एवढेंच कीं परम कल्याणाच्या अशा गोष्टींची प्राप्ति आपण करून घेतलेली नसते. ही गोष्ट अर्थात् सदाचरण होय. सदाचरणाच्या योगानें जें सौख्य आपणांस प्राप्त होण्यासारखे आहे, त्याहून चांगले असें कांहींएक नाहीं. शिवाय या सौख्यास कोणत्याही अन्य गोष्टीनें प्रत्यवाय घडण्यासारखा नाहीं. तेव्हां या परम कैवल्याच्या प्राप्तीची आपण उत्कंठा धरावी हें योग्य होय? आतां एक सदाचरण असल्यास दुसऱ्या कशाचीही जरुरी नाहीं असा माझा अभिप्राय कां आहे म्हणशील तर सांगतों ऐक जो सदाचरण संपन्न असतो तो वर्तमानकाळी प्राप्त होणाऱ्या गोष्टींत समाधान मानून रहातो. त्याला पुढें प्राप्त होणाऱ्या गोष्टींची अपेक्षा नसते. म्हटले आहे:-

---

* लोभानें पापाकडे प्रवृत्ति होते. लोभानें लोभ वाढतो. लोभापासून द्वेष, क्रोध आदिकरून दुर्वृत्ति उत्पन्न होतात. सारांश काय कीं, सर्व पापाला लोभ कारण होतो.

प्रत्युपस्थितकालस्य सुखस्य परिवर्जनम् ।
अनागतसुखाशा च नैव बुद्धिमतां नयः ।। * सु.

अशा मनुष्यास सदाचाराव्यतिरिक्त इतर कोणतीही गोष्ट श्रेष्ठ वाटत नाहीं. हा माझा अभिप्राय मनांत वागवून तूं तदनुसार स्ववर्तन ठेविलें नाहीं, तर तुझ्याठायी सद्भाव व पवित्रता हीं वसणार नाहींत. ज्यास पवित्रतेची चाड असेल, त्याला लौकिक दृष्ट्या अनिष्ट अशा पुष्कळ गोष्टी अनुभविणें प्राप्त होईल. त्याचप्रमाणे लौकिकात ज्या गोष्टी इष्ट मानिल्या जातात, अशा पुष्कळ गोष्टींत मुकावें लागेल. अशा समयी आपला सद्वर्तनाचा संकल्प नष्ट होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणे मानसिक औदार्याचाही नाश होण्याची भीति असते. कारण ज्या गोष्टीची सामान्य जन स्पृहा करितात, त्या क्षुल्लक समजून त्यांचा तिटकारा करण्यास आपण सर्वदा तयार असल्यावांचून मानसिक औदार्याची उन्नति होत नसते. अशीच गोष्ट दयालुत्वाचीही आहे. आपल्याठायीं सद्भाव व सदाचारप्रीति ही उत्पन्न झाल्यावांचून इतर ऐहिक वस्तूंची आवड आपल्या मनांतून नाहींशी होण्याचा संभव कमी; आणि ही आवड जर आपल्या मनांतून गेली नाहीं, तर इतरावर दया करण्याची किंवा इतरांनी केलेल्या उपकाराची फेड करण्याची बुद्धि आपल्याठायी वृद्धिंगत व्हावयाची नाही. अमर्याद ग्राम्यसुखेच्छा, भोजनादिकांमध्यें अपरिमित द्रव्यव्यय, निःसंग ऐश्वर्योपभोग, अनर्थावह व्यसनांविषयींची आसक्ति इत्यादिकांचे आपणांस मुळींच वारें ही लागूं देऊं नये. मनुष्यास अशा कित्येक गोष्टी आवडत असतात कीं, त्या पशूंलाच योग्य असतात. ते अधाशाप्रमाणे खा खा खातात. त्यांचे प्रीतीचे विषय मोठे भयंकर असतात. त्यांनीं कोणाशी द्वेष किंवा कलह आरंभिला तर तो त्वरित मिटत नाहीं. त्यांच्या तामसी वृत्ति एक वेळ क्षुब्ध झाल्या म्हणजे त्या लवकर शांत होत नाहींत. असे जन आपल्या आवडीच्या विषयांमध्यें अगदीं रममाण होऊन जातात. कारण त्यांचा उपभोग घेतांना त्याला लोकलज्जा किंवा मनाचे भय कांहींच वाटत नाही. परंतु ही मानसिक अवस्था सर्वथा दूषणीय होय. आपल्या खऱ्या सौख्याचें अधिष्ठान केवळ आपल्या अंतर्यामी असावें. तेथून तें काढून इंद्रियवश केल्याने त्याचे उत्तमत्व व महत्त्व नष्ट होतें इंद्रियांपासून उद्भवणारा सुखानुभव केवळ नीच प्रतीचा व क्षणभंगुर होय. शिवाय इंद्रियसुख तेंच मनुष्याचे खरें सुख असें मानिल्यानें पशु आणि मनुष्य यांमध्यें कांहींएक अंतर नाहीं असें होतें. खरें पाहता आपल्या परम सुखाचे निधान देहांत आहे असें मानणें सर्वथा युक्त नव्हे. तर ते सुख विवेकाच्या योगाने प्राप्त होते, तेंच खरें सुख होय. हें मनोमय सुख सारवत् असून शाश्वत असतें. तें कधी कमी होत नाहीं. किंवा त्यास कधीं अंतराय घडत नाहीं. इतर जें सुख तो सारा कल्पनेचा बाजार आहे. खऱ्या सुखाचें व या भासमय सुखाचें सादृश्य काय तें नांवापुरतें असतें. परंतु त्याचे धर्म आणि परिणाम हीं परस्परविसदृश आहेत. बाह्येंद्रियजन्य ग्राम्यसुखाची खऱ्या सदाचारजन्य सुखाशीं क्षणभरही तुलना करितां यावयाची नाहीं. अशा शारीरिक सुखांस केवळ या जीवितांतील सोईच्या गोष्टी म्हटल्यास मात्र साजेल. ज्या गोष्टी मनुष्यास केवळ यदृच्छेने प्रात होत असतात, त्या मी हटकून प्राप्त करून घेईन असें कोणी म्हणेल तर तें त्यास कदापि साध्य नव्हे. अशा गोष्टींचे आपण कदापि अंकित होतां कामा नये. त्या केवळ बाह्य असून त्यांशी

---

* जी संधि व जें सुख प्राप्त झालें आहे, ती वर्जावयाचीं, आणि जें सुख अजून प्राप्त झालें नाहीं, त्याची आशा करावयाची, यांत बुद्धिमान् लोकांस काहींएक अर्थ आहे असें वाटत नाहीं.

आपला जो योग घडतो, तो केवळ यदृच्छेनें घडतो. त्यांची आपण मुळीच परवा करितां कामा नये; किंवा त्या प्राप्त झाल्या असतां आपण गर्वाने ताठून जातां कामा नये. कारण ज्या गोष्टी मनुष्याला स्वपराक्रमाच्या योगाने कदापि प्राप्त होणाऱ्या नव्हत, त्यांच्या प्राप्तीनें उल्हास पावून फुगून जाणें हा मोठाच मूर्खपणा होय. या गोष्टींचा आपणांशी बाह्यतः संबंध घडला तर घडूं द्या. पण त्यांस आपण सहसा लुब्ध होतां कामा नये. त्यांस मुकण्याची आपणांस पाळी आल्याने त्याबद्दल आपणांस यत्किंचित्ही खेद वाटूं देऊं नये. त्या प्राप्त झाल्या असतां, त्यांचा आपण खुशाल यथोचित उपयोग करून घ्यावा पण त्याबद्दल वृथा गर्व वाहण्यांत अर्थ नाहीं. पुनः त्या मुबलक प्राप्त झाल्या तरी त्यांचा उपयोग अगदीं बेताबातानें कामा पुरता करावा. त्या आपल्यापासून केव्हां जातील याचा कांहीं नेम नाहीं. ह्या गोष्टींचा उपयोग जो विवेकशुद्ध रीतीनें करीत नाहीं, त्याला त्यांचा अनुभव फार वेळ होत नाहीं. कारण अशा गोष्टींचा उपयोग बेताबातानें व जपून घेतला नाहीं तर त्यांपासून मिळणारें सुख अनर्थास कारण होतें. केवळ क्षणभंगुर अशा विषयांपासून उद्भवणारें सुख अर्थात्च त्वरित नाश पावणारें असते; आणि या त्याच्या अस्थायित्वास्तव सुखेच्छु मनुष्यास त्याच्या नाशाबद्दल निरंतरची अमर्याद काळजी लागलेली असते. पुनः, अशा सुखविषयांची एक वार गोडी लागली कीं, त्यांच्या उपभोगाने तृप्ति पावून त्यांचा त्याग करण्याची बुद्धि फारच थोड्यांना होत असते. दुसरे कित्येक लोक असें म्हणतात कीं, त्याला या सुखविषयांच्या प्राप्तीनें लोकांत मान्यता आलेली असते, किंवा लोकदृष्टीनें श्रेष्ठत्व आलेले असतें, त्याच परिणामीं त्यांस नीचत्वाप्रत नेणाऱ्या झाल्यामुळें त्यांस मरणप्राय दुःख होत असतें. तेव्हां अशा विषयांच्या संबंधाने आपण फार शहाणपणानें व हुशारीनें वागलें पाहिजे. त्यांचा उपभोग फारच बेताबातानें व काटकसरीनें करणें उचित होय. कारण मोठी धनसंपन्नता अनुकूल असली तरी तिचा निःसंगपणें बेसुमार उपभोग घेतल्यानें ती लवकर नष्ट होणारी आहे. यास्तव तिचा उपभोग घेणें तो विवेकानें व परिमितपणें घ्यावा हें योग्य होय. धनाचा उधळेपणानें अमर्याद व्यय केल्यामुळें मोठमोठाली नगरें धुळीस मिळाल्याचा इतिहास तुला अवगत आहेच. तीं संपत्तीच्या जोरावर मोठी बलिष्ठ व भव्य राष्ट्रें झालीं असून त्यांच्या नियामकांच्या अमर्याद वित्तव्ययामुळें तीं रसातळास गेलीं आहेत. या राष्ट्रांचा पुरातन नीतिमान् महापुरुषांनी पाया घालून तीं एवढ्या वैभवास चढविलीं असतां, त्यांच्या वंशजांच्या उद्दामपणास्तव व उधळेपणास्तव त्यांचा सर्वस्वी चुराडा झाला. यावरून तुला या प्रकरणी उत्तम बोध घेण्यासारखा आहे. असे घोर प्रसंग राष्ट्रांवर किंवा व्यक्तींवर पुनः न येऊ देण्याविषयीं खबरदारी घेणे उचित होय. या संबंधानें मुख्य गोष्ट अशी ध्यानांत वागविली पाहिजे कीं, दैव प्रतिकूल होऊन त्याचे आघात होऊं लागले म्हणजे त्यांचें निवारण करण्याचें सामर्थ्य अल्पशक्ति मानवास बिलकुल नाहीं. मोठे भक्कम कोट व दुर्गम किल्ले यांचें दैवापुढे काहीएक चालावयाचें नाहीं. यास्तव दैवप्राप्त वस्तूंच्या रक्षणासाठी अटाट करण्याचें सोडून देऊन आपलें अंतर्याम सुधरण्याचा निर्धार करावा. मानसिक स्वास्थ्याचे रक्षण करण्यांतच खरें सुख आहे. ह्या मनोरूप गडावर कोणी कसाही हल्ला केला तरी तो कदापि सर व्हावयाचा नाही. आतां हे मानसिक स्वास्थ्य शहाणा पुरुष कोणत्या प्रकारें संपादन करितो तें मी तुला सांगतो. कोणता कसाही प्रसंग प्राप्त झाला तरी तो आपल्या चित्ताची शांति नष्ट होऊं देत नाहीं. ज्या गोष्टींनीं त्यास त्रास होतोसा भासतो, त्या सृष्टिक्रमानुसार प्राप्त झाल्या आहेत असें मानून तो चित्त उद्विग्न होऊं देत नाहीं. तर उलट आपल्या मनाचे तो असें समाधान करीत असतो कीं, निसर्गांत ज्या गोष्टी अवश्य घडल्या पाहिजेत,

त्याबद्दल आपण कष्टी होतां कामा नये. आपल्या विवेकबलेंकरून तो अरिष्टांस जुमानीत नाहीं; प्रतिकूल दैवाची परवा करीत नाहीं; दुःख व शोक ही, चित्तास होऊं देत नाहीं यास्तव त्वां विवेकाची आवड धरावी. विवेकाच्या साहाय्याने तुला अत्यंत मोठ्या संकटांसही न जुमानण्याचें सामर्थ्य येईल. हिंस्त्र पशु जात्या क्रूर व आवेशी असल्याकारणानें त्यांस धरणें मोठें कठीण असतें. तथापि त्यांची आपल्या लहान पिलांवर पराकाष्ठेची ममता असल्या कारणानें ते पारध्यांच्या जाळ्यांत सांपडतात. अशीच गोष्ट तरुण व मोठ्या मनाच्या पुरुषांची आहे. ते वैभव किंवा कीर्ति यांच्या लोभाने साक्षात् मरणास ही सिद्ध होतात. त्याचप्रमाणे लोकाचारापासून भ्रष्ट होण्यापेक्षां मरण पुरवले असें मानणारे पुरुषही पुष्कळ आढळतात. तर विवेकाचें बल याहून किती मोठें असावें, व तो किती अढळ असावा बरें? कसेही भयंकर संकटांचे प्रसंग गुदरले असतां त्यांमधून न डगमगतां पार पडण्याचें धैर्य विवेकाच्या साहाय्याने मनुष्यास उत्तम प्रकारे प्राप्त होण्यासारखे असतें. कोणी असें म्हणेल कीं, ''सदाचरणाहून चांगलें असें ह्या दुनियेत कांहींएक नाहीं असें तुम्ही प्रतिपादन केल्यानें कांहीं एक निष्पन्न होण्यासारखें नाहीं. अशानें दैवाशीं झगटण्याचें सामर्थ्य तुम्हांला प्राप्त व्हावयाचें नाहीं. त्यापुढे तुम्हांला हातच टेकावे लागतील. कारण तुमच्या म्हणण्याप्रमाणें ऐहिक सुखविषयांत आपली आज्ञाधारक मुले, सुस्थितींत असलेलीं नगरें सदाचारी मातापितरें इत्यादिकांचा अंतर्भाव होतो. अशांवर एकादा संकटप्रसंग आला असतां तुम्हांला वाईट वाटल्यावांचून रहाणार नाही. परचक्र येऊन आपण रहातो तें नगर शत्रूच्या हातीं गेलें असतां, किंवा आपलीं बालकें मरण पावलीं असतां, किंवा आपल्या मातापितरांस दास्य प्राप्त झालें असतां, तुम्हांस दुःख वाटल्यावाचून रहाणार नाहीं.'' या शंकेचें समाधान आमच्या मताप्रमाणें जें सामान्यतः केलें जातें त्याचें प्रथमतः मी निरूपण करितों; आणि मग माझ्या समजुतीप्रमाणें या शंकेचे आणखी कोणत्या प्रकारे निवारण करितां येण्यासारखे आहें तें सांगतों. ज्या गोष्टीस आपण मुकलो असतां, त्यांच्याऐवजी दुसऱ्या अनिष्ट गोष्टी उद्भवतात, त्यांची गोष्ट अगदीं निराळी आहे. उदाहरणार्थ असें पाहा कीं, आरोग्य बिघडलें असतां, अनिष्ट जो आजारीपणा तो उत्पन्न होतो. आपली दृष्टि बंद झाली असतां, अपणांस गैरसोईचा असा आंधळेपणा प्राप्त होतो. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या वस्तूंची गोष्ट तशी नाहीं. कां म्हणाल तर असें पाहा कीं, माझा एकादा चांगला मित्र गमावला असतां, त्याच्यामागें माझ्याठायीं मित्रद्रोह उत्पन्न होतो अशातला कांहीं अर्थ नाहीं. त्याचप्रमाणें माझी प्रिय लेकरें मृत झाली असतां, त्यांच्या पश्चात् माझ्या मनांतले पितृप्रेम नष्ट होण्याचा मुळींच संभव नाहीं. आणखी असें कीं, माझे मित्र किंवा बालकें जी मरणवश झाली, तीं त्याची शरीरे नष्ट झाली असे समजावयाचें. त्यांचे जे चिदंश त्यांस कदापि नाश नाहीं. सदाचारमूलक कल्याण कदापि नष्ट होणारें नव्हें. त्याचीं सर्व कार्यें चिरकाल रहातात. त्याचा नाश होण्याचा मार्ग म्हटला म्हणजे एकच होय. तो असा कीं, त्याचें कल्याणत्व नष्ट होऊन तें अनिष्ट व्हावें. परंतु त्याचें स्वरूप सर्वदा शाश्वत असतें. तें कदापि बिघडणारें नसतें. प्रिय मित्र किंवा सद्गुणी बालकें मृत झाली तरी त्यांच्या पश्चात् दुसऱ्या एका गोष्टीमुळें मनाचें समाधान होत असतें. ती गोष्ट कोणती म्हणशील तर सांगतों ऐक. तीं जी आपणांस प्रिय होतात, तीं एका सदाचाराच्या योगाने होतात. हा सदाचार आपल्या अंतर्यामी पूर्णपणे बाणलेला असला म्हणजे त्यावांचून रिता ठाव मुळींच उरत नाहीं. सदाचाराच्या योगानें सर्व शोकाचें परिमार्जन होतें. एक सदाचार असला म्हणजे इतर कशाचीही अपेक्षा उरत नाहीं. इहलोकच्या सर्व चांगल्या वस्तूंचे बीज व उगम सदाचारामध्यें आहे. उदाहरणार्थ असें

पाहा कीं, झऱ्यातून सर्वदा वाहत असलेलें उदक कोणी काढून नेले, किंवा तें झराझर वाहत गेलें, तर त्यांत काय नुकसान झालें बरें? कारण मूळ उगमापासून सतत पाझरणारे उदक कदापि बंद होत नसलें तर जेथून पूर्वी वाहून आलेलें उदक गेलें, तेथें पुनः दुसरें येऊन, नाला किंवा विहीर एकसारखी भरलेली असते. अशीच गोष्ट सदाचाराची आहे. एकाद्या नीतिमान् पुरुषाचीं बालकें जिवंत असली तर तो विशेष न्यायी असतो, व तीं गत झाली असतां, त्याची न्यायवृत्ति कमी होते असें म्हणतां येत नाही. त्यांची प्रिय बालकें मृत्युवश झाली असतां, त्यांच्या ठायींचा निग्रह, प्रामाणिकपणा, शहाणपणा किंवा चांगुलपणा ह्या वृत्ति विशेष वृद्धिंगत होतात असें सहसा म्हणवत नाहीं. त्याचप्रमाणें एकाद्याचे पुष्कळ मित्र असले म्हणजे तो विशेष शहाणा होतो, किंवा ते कमी झाले असतां, तो विशेष मूर्ख होतो असें म्हणतां येत नाहीं. आपल्या ठायींचा सदाचार अढळ असतो तोपर्यंत आपलें कितीही नुकसान झालें तरी त्याबद्दल आपणांस यत्किंचित्ही वाईट वाटण्याचें कारण नसतें. यावर कोणी अशी शंका घेईल कीं, एकाद्याचा बराच मित्रसमुदाय व पुष्कळ चांगली संतति असली तर तो सुखी व्हावयाचा नाहीं काय? अशा साधनानें त्यास सुखी व्हावयास काय बरें प्रत्यवाय असावा? यास उत्तर एवढेंच कीं, ज्यास परम कल्याण म्हणावयाचें तें न्यूनाधिक व्हावयाची मुळींच शक्यता नाहीं. त्याच्या चित्ताची समता बिलकुल नष्ट होत नाहीं. दैवयोगाने त्याला कशीही अवस्था प्राप्त झाली, तो अगदीं वयोवृद्ध होऊन मरण पावला, किंवा अल्पायु होऊन अकाळीं मरणाधीन झाला, तरी त्यामुळें त्याच्या परम कल्याणांत यत्किंचित्ही फरक पडत नाहीं. या कल्याणाचें वर्तुळ कितीही लहान किंवा मोठें असलें तरी तो केवळ आकृतिभेद होय. त्याच्या परिमाणांत तिळप्राय अंतर पडावयाचे नाहीं. त्याचप्रमाणे हें काढिलेलें वर्तुळ कितीही काळ राहिलें, किंवा तें काढताच पुसून नाहीसें झालें तरी वर्तुलाकृतीच्या दृष्टीनें पाहता, त्या उभय आकृतींमध्यें मुळींच भेद नाहीं. जें रास्त किंवा न्याय्य असतें, तें काल, स्थल किंवा परिमाण यांच्या भिन्नत्वाने भेद पावत नाहीं. त्याची वृद्धि किंवा विकास होणें नाहीं. सदाचारयुक्त जें जीवित तें शत वर्षे टिकलें काय, आणि एक दिवस राहूनच नष्ट झालें काय, सारखेच एकादे समयीं नीतिमान् पुरुषाचा अधिकार राष्ट्र, नगर व प्रांत यांवर चालतो. तो लोकशासनासाठीं नियम करितो. तो स्वमित्रजनांचा यथोचित आदरमान करितो. तो स्वकीय जनांस निरनिराळे हुद्दे देऊन सुखी करितो; आणि त्यांच्या संबंधाची एकंदर कर्तव्ये मनापासून करितो. हाच नीतिमान् पुरुष काळ फिरला असतां, अगदीं दरिद्रावस्थेंतही रहावयास तयार असतो. विपत्ति, देशत्याग किंवा संततिनाश यामुळे त्याचें चित्त किमपि व्यग्र होत नाहीं. एक वेळ मोठ्या उच्च सिंहासनावर आरूढ होऊन, सहस्रावधि लोकांवर तो अधिकार चालवीत असून, कालचक्र फिरतांच तो स्वपदच्युत होऊन अगदीं हीन स्थितीस पोंचला, तरी त्याची नीतिमत्ता अढळ रहाते. राजमंदिरांत त्याची नीतिमत्ता अधिक असते आणि अगदीं लहानशा झोपडीत ती कमी होतें, अशांतला कांहीं अर्थ नाहीं. ती सर्वदा समान असते. नीतिमान् मनुष्यास या संसारामध्ये कोठेच थारा मिळाला नाहीं तरी त्याचें अंतर्याम स्वच्छ व निर्घोर असल्यामुळें त्याच्या सौख्यानुभवांत यत्किंचित्ही अंतर पडत नाही. नीतिमान् पुरुषास कशीही सांसारिक अवस्था प्राप्त झाली तरी त्यांचें धैर्य अत्युत्कट असून, तें सर्वदा अढळ रहाते. त्यांच्या ठायींची दूरदृष्टि सर्वदा परिपूर्ण असते. त्यांची न्यायानुवृत्ति किमपि चळत नाहीं. या कारणास्तव त्यांस सर्व काळ सौख्याचा अनुभव घडतो. कारण त्यांच्या सौख्याचें अधिष्ठान चित्ताच्याठायीं असतें. बाह्य स्थितिभेदानें त्यांत अंतराय येण्याचें मुळींच प्रयोजन

नसतें. हें सौख्य शाश्वत असून पूर्ण शांतिप्रद आहे. येथवर पूर्वोक्त शंकेचे समाधान आमच्या तत्त्वज्ञानपद्धतीप्रमाणें जें सामान्यतः करण्यांत येतें, त्याचें निरूपण झालें. आतां मला स्वतांला या संबंधाने काय सांगावयाचे आहे तें सांगतो. ज्ञाता पुरुष आपल्या बालकांच्या किंवा मित्रांच्या नाशानें खेद पावत नाहीं. प्रत्यक्ष त्याच्यावरच मरणसंकट आलें असतां, ज्या धैर्याने तो तें सहन करण्यास तयार असतो, तेंच धैर्य तो स्वकीय जनांच्या मरणसमयीं प्रकट करितो. ज्याप्रमाणें त्यास स्वमरणाची भीति नसतें, त्याचप्रमाणें त्याला आपल्या प्रिय जनांच्या मृत्यूबद्दल शोक नसतो. कारण नीतिमान् ह्यटला म्हणजे त्याच्याठायीं परस्परविरुद्ध गुण नसावयाचे. त्याची सारी कृत्ये सुसंगत व परस्परसदृश असावयाचीं. अशा पुरुषाचें चित्त परम उन्नत असतें. तें शोक व उद्वेग यांच्या योगानें अवनति पावत नाहीं. आशा, भीति, आलस्य, शिथिलता इत्यादिकांच्या योगाने चित्ताच्याठायीं उत्पन्न होणाऱ्या अस्वस्थतेच्या पायी नीतीचा भंग होतो. नीतिमत्ता जी आहे ती सर्वदा निर्भय असते. तिला कशाचाही धोका किंवा प्रत्यवाय येत नसतो. नातिमान् मनुष्य कसाही प्रसंग आला तरी विस्मय पावत नाहीं. तो सर्व अवस्थांस सर्व काळ सिद्ध असतो. यावर कोणी असें विचारील कीं, अशा मनुष्यास कोणत्याच गोष्टीचा खेद वाटणार नाहीं काय? अनिष्ट प्रसंगांच्या योगानें त्याच्या चर्येंत फरक पडणार नाहीं काय? त्याच्या देहास कंपस्वेदादि विकार व्हावयाचे नाहींत काय? आणि इतर मानव जसे स्वभाववृत्ति सुक्षोभ झाली असता, अविचारास वश होऊन कांहीं तरी कर्मे करितात, तशी कर्मे नीतिमान् मनुष्य करण्यास प्रवृत्त होणार नाहीं काय? होय, अशी त्याची अवस्था होण्याचा संभव आहे हें खरें. परंतु त्याच्या बुद्धीचा असा निश्चय झाला असतो कीं, अशा गोष्टी विवेकास अनुसरून नसतात, म्हणून त्या चांगल्या नव्हत. जें कांहीं कर्तव्य त्यास करावयाचें असतें, तें तो धैर्याने व उत्साहानें करितो. जें तो करितो, त्यांत त्यानें भितरेपणा, नाखुषी, चित्ताची अस्थिरता किंवा धरसोड दाखविली तर त्याला लोक मूर्ख म्हणणार नाहींत काय? नीतिमान् पुरूष आपल्या कोणत्याही कृत्याबद्दल स्वतांची तारीफ करूं लागला असतां, किंवा त्याबद्दल अभिमान बाळगू लागला असतां, त्यास हीनत्व प्राप्त होतें. शिवाय जी गोष्ट तो स्वकीर्तिवैभव वृद्धिंगत व्हावें म्हणून करितो, ती तो सद्भावपूर्वक करीत नाहीं असें होतें. आपल्यावर एकादे संकट येईल अशी भीति त्यास वाटूं लागली तर त्याच्या चित्तास भ्रांति होऊन, त्याच्या हातून सद्वर्तन घडणे नाहीं. संकटभीतीमुळें त्याच्या चित्तास उद्वेग प्राप्त होतो. तें संकट जसें काय आजच प्राप्त झाले आहे असा त्याला भास होऊन, जें दुःख त्यास भविष्यकाळीं प्राप्त व्हावयाचें असतें, त्याचा अनुभव त्यास आजच घडूं लागतो. देहास एकादा विकार जडावयाचा असला म्हणजे ज्याप्रमाणें त्याच्याठायीं कांहीं विवक्षित चिन्हें दिसून येतात, तद्वत् मनावर एकादा अनिष्ट परिणाम व्हावयाचा असला म्हणजे त्याच्या दुर्बलत्वाचीं प्रथम चिन्हें दृग्गोचर होतात. भावी दुःखमूलक संकटामुळें तो भयत्रस्त होतो, आणि ती संकटे साक्षात् प्राप्त होण्यापूर्वीच त्याचें धैर्य खचून जातें. परंतु जी संकटे पुढे कधीं तरी यावयाची, त्याबद्दल आज कष्टी होऊन घाबरून जाणें हा मोठाच मूर्खपणा होय. तीं संकटे साक्षात् प्राप्त झाली असतां, त्यांपासून उद्भवणारी पीडा सोसण्यास तयार होण्याचे एकीकडेच राहून तन्मूलक विपत्ति दूर असतां ती मुद्दाम बोलावून आणावयाची, व तीमुळें आजच घाबरून जावयाचें यासारखा अविचार तो आणखी कोणता? भविष्यकाळीं येणारी संकटे केवळ अनिवार्य असली तर त्याबद्दल आजच कां म्हणून उद्वेग पावावे? उदाहरणार्थ, समजा कीं, एकाद्या मनुष्यास कोणी असें सांगितले कीं, आणखी पन्नास वर्षांनीं तुझा शिरच्छेद होणार आहे, तर त्यानें त्या भावी

मरणभीतीनें आजपासूनच चिंतातुर होऊन मनाचे स्वास्थ्य कां बरें नष्ट होऊं द्यावें? जे गत गोष्टींची आठवण करकरून पुनःपुनः शोक करितात, त्यांचीही अवस्था अशीच आहे. सारांश काय कीं, भूत व भविष्य ह्या उभय काळांचा प्रत्यय मनुष्यास प्रत्यक्ष होत नसतो. तेव्हां त्या काळच्या गोष्टींबद्दल शोक करण्याची काय गरज आहे बरें? जें वर्तमानकाळी आपल्या अनुभवास येतें, तेवढ्याचपुरता जो काय शोक करावयाचा तो करावा.

◆◆◆

प्रकरण दुसरें

खरी दौलत

एकदम धनवान् होण्याची युक्ति कोणती आहे हें तूं जाणू इच्छितोस. ही तुझी इच्छा योग्य होय. ही युक्ति मी तुला कथन करितों. मी जी युक्ति सुचविणार ती अगदीं सोपी आहे. ती कोणती म्हणशील तर तूं कशाचीही अपेक्षा करूं नये. पुष्कळ वित्त जवळ असणें आणि कशाचीही अपेक्षा नसणे ही दोन्हीं सारखींच. किंबहुना कशाचीही गरज न ठेविल्यानें वित्तप्राप्तीनें होणारा त्रास व दगदग हीं अगदीं चुकतात. परंतु यावरून तूं असें समजू नये कीं, मी तुला आपल्या नैसर्गिक गरजाही पुरवूं नये असें सांगत आहें. नैसर्गिक गरजा न भागवून कदापि चालावयाचें नाहीं. त्या अवश्य पुरविल्या पाहिजेत. परंतु या गरजांपलीकडे जी अधिक अर्थप्राप्ति ती केवळ व्यर्थ होय. मला क्षुधा लागली असतां, म्यां तिच्या शमनार्थ अन्न भक्षण केलें पाहिजे. हें अन्न मोठे मिष्टच असलें पाहिजे, जाडेभरडे कामाचें नाहीं. असा कांहींच भेद निसर्ग पाहत नाहीं. कोठून तरी पोट भरल्याशीं कारण. मोठी रुचि लागून रसनातृप्ति व्हावी अशी अपेक्षा त्यास मुळींच नसते. त्याचप्रमाणें मी तृषाक्रांत झालों असतां, मला तिच्या निवारणार्थ शुद्ध उदक प्राशन केलें पाहिजे. मग तें जवळच्या तळ्यांतून आणले असा, किंवा बर्फ घालून थंड केलले असो; कोठून तरी तहान भागली म्हणजे निसर्गाची गरज संपली. मग ज्या पात्रांतून तें उदक प्राशन करावयाचे, तें सुवर्णरौप्यादि मोलवान् धातूंचे असो, किंवा मोठे नक्षीदार चिनी भांडें असो, किंवा शुद्ध मातीचे साधे भांडे असो. त्याची निसर्गास मुळीच परवा नाहीं. सर्व उपयुक्त वस्तूंचा वास्तविक उद्देश काय आहे याकडे सदैव दृष्टि ठेव, म्हणजे कोणत्याही अनावश्यक वस्तूंची तूं अपेक्षा करणार नाहीस. चांगली भूक लागली म्हणजे जी कांहीं जाडीभरडी भाकर सांपडेल, ती भक्षण केली असतां रुचकर लागून, तीपासून क्षुधातृप्ति होण्यासारखी असते. 'भुकेला कोंडा आणि निजेला धोंडा' अशी जी म्हण आहे ती सर्वथा सत्य होय. मला कोणत्या गोष्टीपासून आनंद होतो असें तूं पुसतोस. याचे उत्तर असें कीं, ज्ञात्या पुरुषाने नैसर्गिक वित्तांचे अर्जन मोठ्या उत्साहानें करावें. तूं म्हणतोस कीं, ''तुमचा हा उपदेश केवळ कोरडा आहे मीं कोणकोणत्या बंदरांतून कोणता माल स्वदेशी मागवावा, व कोणता जमीनजुमला घ्यावा याविषयीं अगोदरच बेत करून ठेविले आहेत आतां हा सर्व व्यवसाय चालवावयास भांडवल पाहिजे. तें कोठून मिळवावें असा माझा प्रश्न आहे, तुम्ही मला धनवान् होण्याचा उपाय सांगण्याचें अभिवचन देऊन, मला दरिद्री होण्याचा बोध करितां.'' यावर माझें तुला असें विचारणें आहे ज्याला कशाचीही गरज नसते. त्याला तूं गरीब म्हणणार काय? अशा मनुष्याची दौलत कधींच नाहींशी होत नाहीं. म्हणून तूं त्याला धनवान् म्हणणार नाहीस काय? तुला दौलत पुष्कळ असण्यांत संतोष वाटतो कीं, ती पुरेशी असण्यांत वाटतो बरें? ज्याच्यापाशीं पुष्कळ दौलत असते, त्याला आणखी

दौलतीचा इच्छा होते. यावरून असें म्हणावें लागतें कीं, अशा मनुष्याची निवंता कांहीं अद्यापि दूर झाली नाही. परंतु ज्याच्यापाशीं पुरेशी दौलत असते, त्याची स्थिति मोठ्या धनाढ्य मनुष्याहूनही श्रेष्ठ होय. अशा मनुष्यास जें सौख्य प्राप्त होतें, तें मोठ्या धनिकासही प्राप्त होत नाहीं. ज्या धनाच्यापायीं मनुष्यावर राजकोप होऊन, त्यास स्वदेशत्याग करावा लागतो, किंवा पित्यास पुत्र विषप्रयोग करितो किंवा स्त्री पतीचा प्राण घेते, अशी दौलत एकाद्या तृप्त मनुष्यापाशीं नसली म्हणून त्यास तूं धनवान् म्हणणार नाहीस काय? अशा थोडक्यांत तृप्त असणाऱ्या मनुष्यास, परचक्र येऊन देशांत युद्धसंग्राम माजला असतां, स्ववित्तनाशाची मुळीच भीति नसते; आणि शांतीच्या काळी तर त्याच्या चित्तास सर्वदा पूर्ण स्वास्थ्याचा अनुभव घडत असतो. कारण त्याला स्ववित्ताचा उपभोग घेण्यांत मुळींच धोका नसतो, किंवा त्याचा त्याग करण्याचा प्रसंग आला असतां, त्यास मुळींच खेद वाटत नाहीं. क्षुधा, तृषा, शीत व उष्ण यांचें निवारण करण्यापुरती सामग्री ज्यापाशीं आहे त्याला दरिद्री कोण म्हणेल? माझा असा सिद्धांत आहे कीं, ह्या गरजा भागविण्यास पुरे इतकी सामग्री जवळ असली म्हणजे ज्याची तृप्ति होते, तो दरिद्री नव्हे; आणि जवळ पुष्कळ असूनही ज्याची तृप्ति होत नाहीं, त्याला धनवान् म्हणता येत नाही. म्यासिडोनियाचा राजा शिकंदर याने सर्व ज्ञात एशिया व हिंदुस्थान जिंकूनही तो दरिद्रीच समजावयाचा. त्यानें देश काबीज करण्याचा हव्यास धरून, मोठें लष्कर व आरमार तयार केलें आणि निरनिराळ्या देशांचे मार्ग शोधून काढून ते पादाक्रांत केले. परंतु त्याची तृप्ति झाली नाहीं. नैसर्गिक गरजा जेवढ्यानें भागण्यासारख्या असतात, तेवढ्यांत मनुष्य तृप्त होत नाहीं. त्याला सर्व गोष्टींची अनुकूलता असली तरी त्याचा लोभ कमी होत नाहीं. लोभी मनुष्यास धनप्राप्ति झाली असतां, तो आपली पूर्व स्थिति विसरून जातो. शिकंदर बादशहाचीच गोष्ट पाहा. तो प्रारंभी ग्रीसदेशातील एका लहानशा प्रांताचा अधिपति असून, त्याचें राज्य बहुतेक निष्कंटक होतें. त्यानें पुढे अनेक मोठमोठी राष्ट्रे पादाक्रांत केली असतां, जेव्हां त्यास कोणीं सांगितलें कीं, आतां आपणांस स्वदेशीं परत जावें लागेल, तेव्हां त्याला फार वाईट वाटलें. मनुष्याजवळ पुष्कळ पैका असला तरी तो धनवान् होत नाहीं. ज्याने पुष्कळ पैका मिळविला असतो, त्याचा आणखी मिळविण्याचा लोभ नाहीसा होत नाहीं. याचे कारण एवढेच कीं, ज्याच्यापाशी पुष्कळ पैका असतो त्याला आणखी पैक्याची इच्छा होते. कोणत्याही मोठ्या धनाढ्य मनुष्याची स्थिति अंमळ बारकाईनें पाहा. म्हणजे तुला आढळून येईल कीं, त्याचें वार्षिक उत्पन्न कितीही असलें तरी ते आणखी वाढविण्याची हाव त्याच्याठायीं कायम असते. या कारणास्तव त्याला मी दरिद्रीच समजतो. परंतु नैसर्गिक गरजा भागल्या म्हणजे ज्याला समाधान वाटतें, त्याला आपण दरिद्री आहो असें कदापि वाटत नाहीं. त्याला दारिद्र्याची मुळीं भीतिच नसते. परंतु केवळ नैसर्गिक गरजा पुरविण्यापुरतें द्रव्यार्जन करा, असा जर जनांस उपदेश केला तर त्याबरहुकूम वर्तन करण्यापुरता मनोनिग्रह फारच थोड्यांच्या अंगीं आढळतो. सामान्य जनांच्या दृष्टीस मोठी संपत्ति पडली असतां, त्यांला तिची आशा सुटते. परंतु वास्तविक पाहता श्रीमंत लोकांचा सारा भपका व डामडौल हीं वरकरणी असतात. त्यांत कांहींच सार नसतें त्यांपासून त्यांस खरा सुखलाभ होतो असें मुळींच म्हणता येत नाहीं. परंतु ज्याच्यापाशीं लोकांचे डोळे दिपविण्यासारखी संपत्ति नसते, व जो सर्वदा केवळ तृप्त असतो, त्याचें सारे सौख्य अंतर्यामींचे असते. यास्तव तूं नेहमी ही गोष्ट ध्यानात वागीव कीं, धनसंपन्नतेचें परिगणन जें करावयाचें तें नैसर्गिक गरजांच्या मानानें करावे. वस्तुतः पाहता ह्या गरजा अगदीं थोड्यानें भागण्यासारख्या असतात. नैसर्गिक गरजांत

दुर्व्यसनांचा मात्र अंतर्भाव करूं नको. आता नैसर्गिक गरजा भागवावयाच्या त्या कोणत्या प्रकारच्या साधनांनी भागवाव्या? असें पुसशील तर त्यासंबंधानें माझा असा अभिप्राय आहे कीं, सोन्यारुप्याच्या ताटवाट्या असल्या तरच क्षुधेचें शमन होईल, आणि मोठीं मोलवान् वस्त्रें असलीं तरच थंडीचे निवारण होईल, एरवीं व्हावयाचें नाहीं, असें म्हणतां येत नाहीं. क्षुधा तृप्त झाली म्हणजे झालें. मग ती कसल्या का पात्रांत अन्न भक्षण करून होईना. त्याची मुळींच परवा नाहीं. ऐषआरामींत अगदीं गुंग होऊन प्रत्येक ग्राम्यसुखाचा ज्यांनीं अतिरिक्तपणे उपभोग घेतलेला असतो, अशांना ह्या सोन्यारुप्याच्या पात्रांचा, गोडगोड पक्वान्नाचा व मोठ्या उंची पोषाखांचा आषक असतो. कारण त्यांची एक वेळ आकंठ तृप्ति झाली असतां, पुनः क्षुधा कशी लागेल याची त्याला पंचाईत असतें नुसती क्षुधातृप्ति झाल्याने त्यांचें समाधान होत नसतें. त्याला आपल्या पोटांत आणखी दोन घास कसे जातील याची काळजी असते. त्याला प्यावयाचें पाणी उत्कृष्ट पात्रांतून मिळाले पाहिजे. एरवी त्यांस पाणी प्यालेंसेंच वाटावयाचें नाहीं. वस्तुतः पाहतां नैसर्गिक गरजा उत्पन्न झाल्या म्हणजे त्या भागविण्यास कसलीही साधनें प्राप्त झाली तरी चालतात. त्यांमध्यें सरसनीरस पाहण्याची बुद्धि गरजू मनुष्यास मुळींच होत नाहीं. कडकडून भूक लागली म्हणजे मनुष्य जें कांहीं सापडेल, तें कसल्याही पात्रांतून तत्काळ भक्षण करितो. परंतु जे ऐषआरामींत निमग्न झालेले असतात, त्याला नाना प्रकारचीं स्वादिष्ट पक्वान्नें हवीशी वाटतात. ते जेवावयास बसले असतां, ज्या त्या पक्वान्नास नावें ठेवितात. परंतु निसर्गाचा क्रम असा दिसतो कीं, अन्नोदक जें सेवन करावयाचें, तें आपलें जीवित व आरोग्य कायम रहावे म्हणून होय. आपणांस त्यांपासून आनंद वाटावा म्हणून नव्हे. आरोग्य राखण्यास ज्या वस्तूंची आपणांस आवश्यकता असते, त्या सर्वदा सिद्ध असून, त्या मिळविण्यास आपणांस फारसे श्रम करावे लागत नाहीत. परंतु केवळ चैनीखातर कोणत्याही पदार्थांचे संपादन व सेवन करावयाचें म्हटले म्हणजे त्यापासून पुष्कळ विपत्ति व गैरसोय सोसावी लागते. निसर्गसिद्ध ज्या गरजा आहेत, त्यांची गोष्ट अशी नाहीं. त्या पुरविल्यानें कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा दुःख सोसावें लागत नाहीं, ही मोठीच सोय आहे.

◆◆◆

प्रकरण तिसरें

क्रोधाविषयीं

कोणाकडून चुक्या झाल्या असतां शहाण्या पुरुषानें त्याच्यावर रागावूं नये. एकादा मनुष्य अंधारांत ठेंच लागून पडला, किंवा तो बहिरा असल्यामुळें त्याला सांगितलेली गोष्ट कळली नाही तर त्याबद्दल त्याच्यावर कोणीं रागावणें योग्य होईल काय? किंवा लहान मुलें आपलीं कर्तव्यें काय आहेत त्याचा विचार न ठेवून समवयस्कांशीं खेळण्यांत गुंतली असतां, त्यांच्यावर दांतओंठ खाणे रास्त होईल काय? किंवा कोणी आजारी असलां, किंवा वृद्ध अथवा थकलेला असलां तर त्यावर क्रोधाविष्ट होणे शोभेल काय? संसारांत ह्या जशा आपत्ति आहेत तशीच एक मानसिक आपत्ति आहे. ती कोणती म्हणशील तर अज्ञान होय. यामुळे मनुष्याच्या हातून अवश्य चुक्या व्हावयाच्या. इतकेच नव्हे, तर चुक्या करण्याची जशी काय त्यास आवडच असते. या कारणास्तव कोणावर संताप करणें तुला योग्य नव्हे. तर तूं सर्वांस त्यांच्या अपराधांबद्दल क्षमा करावी. त्यांच्या अंगच्या व्यंगांबद्दल त्यांच्यावर नाखुष होऊं नये. म्हटले आहे:-

क्षन्तव्यो मन्दबुद्धीनामपराधो मनीषिणा ।
नहि सर्वत्र पाण्डित्य सुंलभं पुरुषे क्वचित् ।। * सु.

सेनापति कडक लष्करी कायदा अंमलांत आणून, आपल्या हाताखालच्या लोकांस लहानसान अपराधांबद्दल शिक्षा करावयाची ती केवळ एकदोन किंवा दहापांच गुन्हेगार सापडले असतां करितो. परंतु जेथे सगळेंचें सगळें सैन्य त्याचा हुकूम न मानितां त्यास सोडून चालतें होतें, तेथें त्याचें कांहींएक चालत नाहीं. त्याला त्या सर्वांस क्षमा करावी लागतें. कारण इतक्या सर्वांची इतराजी करून घेण्यांत मोठाच धोका असतो. यावरून शहाण्यानें असा बोध घेतला पाहिजे कीं, जेथे मोठाच जनसमाज दोषी असतो, तेथें त्याच्यावर जर जाजावून जाण्यांत अर्थ नाही. तो असें करूं लागला तर त्याच्याच जिवास धोका यावयाचा. हिराक्लिटसाविषयी असें सांगतात कीं, तो जेव्हांजेव्हां बाहेर फिरावयास जाई, तेव्हांतेव्हां आपल्या सभोवती एवढा दुराचारी जनांचा समुदाय पाहून त्याला परम खेद वाटे. अशा दुराचारांत मरण पावणाऱ्या जनांस आनंदित व बेफिकीर पाहून त्यांची त्याला पराकाष्ठेची दया येई. त्याचप्रमाणें डिमॉक्रिटसाविषयीं असें सांगतात कीं, सामान्य जन क्षुल्लक व अप्रयोजक वस्तूंच्या संपादनासाठी इतके जिवापाड श्रम करितांना पाहून त्याला त्यांचें हसूं येई. या जगामध्ये क्रोधास मुळी अवकाशच नाहीं. ज्या अप्रयोजक गोष्टी आपण पाहतों,

---

* जे मन्दबुद्धि असतात त्याला त्यांच्या अपराधांबद्दल विचारशील पुरुषांनी क्षमा करावी. सर्वच मनुष्यें मोठी शहाणी असणें संभवत नाही.

त्याबद्दल हसावें एक किंवा रडावे एक. तिसरा मार्ग नाहीं. ज्यांच्या हातून एकादा अपराध घडतो, त्यांवर ज्ञाता पुरुष कदापि रागावणार नाहीं. कारण त्याला कळत असतें कीं, कोणीही मनुष्य उपजत शहाणा नसतो; तर तो पुढें संस्काराच्या योगानें शहाणा होतो. पुनः, त्यास हेंही ठाऊक असतें कीं, प्रत्येक पिढीत फारच थोडे लोक शहाणे होतात. कारण सर्व मनुष्यांस शहाणे होण्याची सोय नसते. ज्याला शहाणे होण्याची निसर्गतःच सोय नसते, त्याला दोष देणें म्हणजे निसर्गास दोष देणें होय, उदाहरणार्थ, काटेरी झाडाला अंजीर लागत नाहींत हा निसर्गाचा मोठा अन्याय आहे, असें कोणी ह्यटलें तर तो त्याचा मूर्खपणा होय. परंतु याबद्दल कोणी निसर्गावर कधीं रागावत नाहीं. असा विवेक करून शहाणा मनुष्य अन्य जनांचे दोष दिसले तरी शांत चित्ताने त्याला त्याबद्दल क्षमा करितो. त्यांच्यांशीं वैर करीत नाहीं; तर अशा भ्रांतिष्ठ मनुष्यांस तो मोठ्या कळवळ्याचा बोध करून सन्मार्गी लावण्यास झटतो. अशी वृत्ति तो सर्व स्थलीं व सर्व काळीं राखितो. पुष्कळ जन दारुबाज, कृतघ्न, लोभी व महत्त्वाकांक्षी असे त्याच्या दृष्टीस पडतात. त्या सर्वांशी तो मोठ्या सौजन्यानें वागतो. कसा तर ज्याप्रमाणें एकादा वैद्य आपल्या रोग्यांशी वर्तन करितो तसा. समजा की, एकाद्याच्या तारवाचीं लांकडें ढिलीं झाल्यामुळें त्याला गाबडी पडून आत भराभर पाणी येऊ लागलें, तर त्याबद्दल त्यानें आपल्या खलाशांवर किंवा तारवावर रागावून चालेल काय? तो असें कांहीं न करतां पाणी बाहेर उपसून टाकण्यास, तारूं तडीस नेण्यास व जेथे गाबडी पडली असेल, तेथलीं भोंकें बंद करण्यास आपल्या नोकरांस साहाय्य करितो; शिवाय आणखी कोठें भेगा पडल्या असतील तर त्या नीट बारकाईनें पाहून दुरुस्त करण्यास झटतो. कांहीं वेळ पाण्यांतून चालत असलेल्या तारवाची जर अशी खबरदारी घ्यावी लागते, तर या देहरूप नौकेस या संसाररूप सागरांत कैक वर्षेपर्यंत डुंबावें लागत असतें, तेव्हां तिच्या ठायींचे जे कांहीं दोष असतील व जे नवे उत्पन्न होण्यासारखे असतील, ते नाहीं तसे करण्यासाठी आपणांला सतत परिश्रम करावयास नकोत काय? ते दोष आहेत म्हणून त्याबद्दल हातपाय आपटीत रहाण्यांत काय पुरुषार्थ आहे? आतां येथें ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हे मानवी दोष सर्वच नाहींतसे होतील असें म्हणतां येत नाहीं. तर त्यांमुळे गुणांचाही ऱ्हास होऊन सर्वत्र अनीतीचे राज्य होण्याचा संभव असतो. हा अनर्थ टाळण्यासाठी ज्ञात्याने उद्योग करणें योग्य होय.

आतां ही क्रोधवृत्ति आपल्या चितांतून निर्मूळ करण्याचे उपाय कोणते आहेत तें पाहू

दुसरे मनुष्य आपल्याकडे पाहून हांसले, किंवा त्यांनी डोळ्यांच्या वगैरे खुणा केल्या तर आपण त्याचा अगदीं वाईट अर्थ करून संशयग्रस्त होतो, आणि विनाकारण अस्वस्थ होऊन उद्वेग पावतो. कोणी आपणांस पाहून प्रणाम केला नाहीं, किंवा कोणी आपणांला भोजनास बोलाविले नाहीं, किंवा कोणी आपणांकडे पाहून तोंडबीड वाईट केलें तर तेवढ्याने आपल्या मनांत त्याच्याविषयीं विरोध उत्पन्न होतो. असा कोणाविषयीं संशय घेण्यास मनुष्याला फारसें सबळ कारण लागत नाहीं. आपली वृत्ति साधी असून, सर्व गोष्टींचा चांगला असेल तोच अर्थ काढण्याची आपणांस संवय असली तर असा इतरांविषयी संशय घेण्याची आपणांस बुद्धि व्हावयाची नाहीं. जें धडधडीत डोळ्यांनी दिसेल, किंवा जें अगदीं स्पष्ट असेल तेवढेंच आपण खरें मानून चाललें पाहिजे. एकाद्याविषयीं आपल्या मनांत संशय उत्पन्न झाला असून, पुढें तो संशय निरर्थक व निराधार आहे असें आढळून आल्यास आपण स्वतांला दोष देऊन, तसा एकाद्याविषयी पुनः

संशय घ्यावयाचा नाहीं असा निर्धार करावा. अशा रीतीनें स्वमानसपरीक्षण करण्याची आपणांस सवय लागली म्हणजे आपण कोणतीच गोष्ट एकदम सत्य मानण्यास प्रवृत्त होणार नाहीं.

निसर्गाकडून ज्या गोष्टी घडतात, त्याबद्दल आपण रुष्ट होणें योग्य नव्हे. कारण निसर्ग सर्वदा शांत व उदासीन असतो. आम्हांस इजा द्यावी असा त्याचा मनोदय मुळींच नसतो. समुद्रास तुफान होऊन तारवें फुटली असतां, किंवा अतिवृष्टि होऊन जनांचे अनेक प्रकारीं नुकसान झालें असतां, किंवा हिंवाळ्यांत मोठ्या कडाक्याची थंडी पडली असतां, ती निसर्गाने आम्हांस त्रास देण्याकरितां मुद्दाम पाडली असें जो समजत असेल, तो केवळ वेडा होय. त्याला वस्तुज्ञान नाही ह्या अरिष्टापासून आपणांस त्रास होतो, तो केवळ यदृच्छेने होय. या जगांत जो ऋतूंचा पालट होतो व जे इतर व्यापार घडतात, ते सारे आमच्यासाठी घडतात असें कोण म्हणेल? ते आपले सृष्टिक्रमाप्रमाणें सर्वदा अप्रतिहतपणे घडावयाचेच. हे असे भव्य विश्वव्यापार आमच्यामुळे घडतात म्हणणे म्हटले म्हणजे आपणांकडे नसतें महत्त्व घेणें होय. पण खरें पाहता या विश्वांत आपण केवळ अत्यंत क्षुद्र जंतु आहों. दुसरें असें कीं ज्यात आपलें वास्तविक अकल्याण आहे. असें या विश्वांत घडत नसतें. तेव्हां कोणत्याच गोष्टीबद्दल संतप्त होणें युक्त नव्हे.

आणखी अशी एक गोष्ट आपण ध्यानांत ठेवावी कीं, आपण स्वत: अगदीं यथान्याय वर्तन करण्यास समर्थ झालों नसतों. आमच्या हातून पुष्कळ अनुचित कर्मे घडलेलीं असून, आणखी अशींच करण्याचा आपला मानस असतो. कित्येक वाईट कर्मे आपणांकडून घडलेलीं नसतात; याचें कारण आपल्या अंगीं तीं करण्याचें सामर्थ्य नसतें. ही गोष्ट नित्य ध्यानांत वागवून आपण अन्य जन अपराध करतांना पाहून संतापूं नये: आणि जे आपले दोष काढीत असतील, त्यांचें काय म्हणणे आहे तें शांतपणे चित्त देऊन ऐकावें. कोणीं येऊन तुम्हांस असें सांगितलें कीं, तुमची अमक्या अमक्याने निंदा किंवा अवहेलना केली, तर तुम्ही आपल्या मनाशीं असा विचार करावा कीं, आपणही अशीच दुसऱ्या कोणाची यापूर्वी कधीं निंदा केली होती किंवा नाहीं. असें आत्मपरीक्षण आपलें आपण केलें असतां, आपण आजपर्यंत पुष्कळांची निंदा व उपहास केल्याचें आपणांस आठवेल. यावरून आपण आपल्याने मनाशीं असा विवेक करावा कीं, जो कोणी आपली आज निंदा करीत आहे, तो केवळ आपलें उसने फेडीत आहे. कित्येक केवळ आपल्या द्वेषानें तसें करीत असतात. कित्येकांना तसें करणें कांहीं कारणामुळे भाग पडतें. कित्येक तर केवळ अज्ञानास्तव तसें करीत असतात. लोकांच्या मनांत आपल्याविषयीं कसकसा वाईट ग्रह उत्पन्न होतो; आपण कोणाचे चांगले केलें असतां त्याचा भलताच अर्थ करून, तेवढे आपलें नुकसानच झालें असें किती लोक समजत असतात; पूर्वी ज्यांचा आपण द्वेष करीत होतो, त्यांपैकीं किती आसामींवर आपण सांप्रत प्रीति करीत आहों, या गोष्टींचा जो नीट विचार करील, तो दुसऱ्याकडून घडणाऱ्या प्रत्येक नुकसानाबद्दल खेद पावणार नाहीं. तो अशा प्रसंगीं स्वतांशी असा विचार करील कीं, आपणही असे अपराध वेळोवेळां केले आहेत. पण आपली साधारण प्रवृत्ति अशी असते कीं, दुसऱ्यांचे दोष तेवढे आपल्या डोळ्यापुढें असतात. आपले दोष आपण कानामागे टाकितो. पुष्कळ लोकांचा तर असा क्रम असतो कीं, ते पापाचा द्वेष करण्याऐवजी पापी जनांवर राग करितात. आत्मपरीक्षण करून जेव्हां आपणांस असा विवेक होतो कीं, आपणांकडूनही इतरांप्रमाणेच पापकर्मे घडली आहेत, त्यांच्याप्रमाणे आपल्या कडूनही चुक्या झाल्या आहेत, तेव्हां आपण

दुसऱ्यांवर संतापण्याचें सोडून देतों. जी गोष्ट स्वतांकडून व्हावयास चुकत नाहीं, तीबद्दल दुसऱ्यास दोष लावणे योग्य आहे काय? क्रोध आवरण्याचा उत्तम उपाय म्हटला म्हणजे एकादी अनिष्ट गोष्ट घडली असतां तत्काळ क्रोधाविष्ट होऊन जाऊं नये. तर अंमळ मनाशीं विवेक करावा. याप्रमाणें कोणावर रागावण्याचें अंमळ लांबणीवर टाकले असतां, कदाचित् ज्या गोष्टीबद्दल आपणांस रोष आलेला असतो, तिचे वास्तविक स्वरूप आपल्या ध्यानांत येऊन, आपल्या संतापाचा उपशम होण्याचा संभव असतो. क्रोधाच्या आवेशासरशीं कोणतीच गोष्ट करूं नये. कारण अशा आवेशांत एकादे वेळीं मोठाच अनर्थ होण्याचा संभव असतो. परंतु तो थोडथोडा आवरिला असतां सर्वथा निर्मूळ होण्यासासारखा आहे. क्रोधावश झालेल्या मनुष्याच्या हातून कसकसे अनर्थ घडतात याचं निरूपण पुढील पद्यांत उत्तम प्रकारें केलें आहे–

क्रुद्धः पापं न कुर्यात्किं क्रुद्धो हन्यादुरूनपि ।
क्रुद्धः परुषया वाचा नरः साधूनधिक्षिपेत् ।।
वाच्यावाच्यं प्रकुपितो न विजानाति कर्हिचित् ।
नाकार्यमस्ति क्रुद्धस्य नावाच्यं विद्यते क्वचित् ।। * सु.

जो अपराध करितो तो कसा काय आहे याचा विचार करणें इष्ट होय. तो बालक असल्यास त्याच्या वयाकडे लक्ष पुरवून आपण त्याला गय करितों. कारण तो काय करितो तें त्याला कळत नसतें. तो आपला पिता असल्यास त्यानें आपणावर यापूर्वी अनेक प्रकारे उपकार केलेले असतात; तेव्हा ते ध्यानांत आणून आपण त्यास क्षमा करणें योग्य होय; किंवा कदाचित् असेही होण्याचा संभव असतो कीं, आपल्या पित्याच्या मनांतून आपलें नुकसान करण्याचें मुळींच नसून, आपण त्याबद्दल विनाकारण संतापतों; आणि या आपल्या संतापाबद्दल आपल्या पित्यास वाईट वाटण्याचा संभव असतो. अपराधी स्त्री असल्यास तिला कोणी तरी फसविले असावें. राजाज्ञेवरून कोणी आपलें नुकसान केलें असल्यास त्याबद्दल त्याच्यावर रागावणें म्हणजे निवळ खुनशीपणा होय. कारण राजाज्ञाभंग करण्याचें सामर्थ्य त्याला नसल्यामुळें त्यानें निरुपायास्तव तें नुकसान केलेले असतें. बरें दुसऱ्या कोणी आपलें नुकसान केलेंच असलें तरी त्याबद्दल आपण कां म्हणून संतापावे बरें? कारण अशा प्रकारचें नुकसान आपण अन्य जनांचें अनेकवार केलें असतें. आपलें नुकसान करणारा न्यायाधीश असल्यास आपण असें समजावे कीं, त्याचें आपल्या गुन्ह्यासंबंधाचे मत खरें असून आपलें स्वतांचें कदाचित् खोटें असेल. ज्यानें तुझें नुकसान केले तो राजा असल्यास तुझ्या हातून खरोखरीच अपराध घडला असला तर त्यानें आपला न्याय केला असें मनांत आण. बरें, तूं अपराधी नसून तुला त्यानें विनाकारण शासन केलें असेल, तर तें धैर्याने सहन कर. आपणांस एकादा आजार आला असतां किंवा एकादे संकट आलें असतां, तें आपण धैर्यानें सहन केलें तर त्यापासून आपणांस म्हणण्यासारखे दुःख होत नसतें. एकाद्या सत्पुरुषाकडून तुझें नुकसान घडले असतां, तें नुकसान नसेल असें तूं समज. कोणी तुझी आगळीक केली असतां, तीबद्दल त्याला अन्य कोणाकडून तरी शिक्षा होईल, किंवा त्याची तोच स्वतांला शिक्षा करून घेईल, असें मनांत आणून स्वस्थ रहावें.

---

* जो क्रोधवश होतो तो कोणतें पाप करणार नाहीं? क्रोधाविष्ट मनुष्य गुरुला सुद्धा मारील. रागावलेला मनुष्य साधुपुरुषांला देखील दुर्भाषणानें ताडन करील. कोपायमान झालेला मनुष्य बोलावें काय आणि बोलूं नये काय हें कांहींएक जाणत नाहीं. जो एकदा रागास चढला, तो कोणतेंही कर्म करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं, आणि तो पाहिजे तें बोलण्यास प्रवृत्त होईल.

आपल्या शत्रूंनी आपलें नुकसान केलें असतां, आपण जे इतके संतप्त होतों, त्याचें कारण असें कीं, आपण स्वतांवर पराकाष्ठेचे प्रेम करितों. यामुळे आपणांस वाटतें कीं, आपल्या शत्रूकडून आपणांस कोणत्याही प्रकारें तोशीस पोचू नये. प्रत्येक मनुष्याचे अंतर्याम पाहिले असतां, तें राजास शोभेसे असतें. त्याला वाटतें कीं, आपल्या ताब्यांत सर्वांनी रहावे; परंतु तो स्वतः मात्र कोणाच्या कह्यांत रहाण्यास तयार नसतो. या वृत्तीस्तव आपल्याठायी उद्दामपणा वसत असतो. त्यामुळें आपण क्रोधवश होतों. साधारणतः पाहतां आपला उद्दामपणा किंवा अज्ञान याच्या पायीं आपण जेव्हांतेव्हां रागावतो. दुष्ट मनुष्यांनी दुष्कर्मे केली असतां, त्याबद्दल विस्मय किंवा रोष पावणें हें निवळ अज्ञान होय. आपल्या शत्रूने आपणांस अत्यंत मोठा अपकार केला, किंवा आपल्या मित्रानें आपल्याशी कपटाचें वर्तन केलें किंवा आपल्या पुत्रानें अथवा सेवकानें आपला कांहीं अपराध केला तर त्यांत कांहीं नवें नाहीं, हा आपला जनांचा नित्य क्रमच आहे, असा विवेक आपण केला पाहिजे. मनुष्य कितीही सुजन असला तरी त्याच्या पासून कांहीं तरी अप्रिय घडण्याचा संभव असतो. मित्र अगदीं कपटी निघाला तरी त्यास क्षमा करावी. एकाद्यावर उपकार केला असतां, तो कृतघ्न झाला तर त्याच्यावर रुष्ट होऊं नये. कोणी मोठा लोभी असला तर त्याला गय करावी. तो मोठा बदफैल असला तरी त्याच्याकडे कान्हाडोळा करावा. '**आला कोप जन्हि तन्हि न सोडिती सहज क्षमेस सुरसिक ते,**' ही मोरोपंताची उक्ति नेहमी स्मरणांत ठेवावी. आतां उद्दामपणाविषयीं म्हटले तर ही गोष्ट ध्यानांत आण कीं, आपल्या देशाचें अकल्याण करणे हें अत्यंत घोर पातक होय. देशामध्यें रहाणारा जानपद हा त्या देशाचा अंशरूप होय. यास्तव त्या जानपदाचें नुकसान करणें म्हटलें म्हणजे सर्व देशाचे नुकसान करणें होय. जर एकंदर देश पवित्र असून त्याचें नुकसान करणें हें महत्पातक आहे, तर ज्या व्यक्तींचा संघ जमून देश झालेला असतो, त्याही परम पवित्र आहेत. आतां ही समग्र पृथ्वी केवळ एक महाराष्ट्ररूप होय. या राष्ट्रांतील एकंदर मानव हे परस्परांचे देशबांधव आहेत. तेव्हां त्यांपैकीं कोणासही त्रास किंवा दुःख देण्याची बुद्धि अत्यंत गर्ह्य आहे; तर उलट आपण परस्परांचे होईल तेवढें साहाय्य करणें हा आपला धर्म होय. म्हटलें आहे :-

जीविते यस्य जीवन्ति दीना मित्राणि बांधवाः ।
सफलं जीवितं तस्य आत्मार्थे कोन जीवति ।। * सु.

हातानीं पायास किंवा पायांनी हातांस साहाय्य करण्याचें वर्जिलें तर उभयतांचेही नुकसान व्हावयाचें नाहीं काय? अशीच गोष्ट एकंदर मानवजातीची आहे. त्याचें कल्याण परस्परांवर सर्वस्वी अवलंबून आहे. ह्या आपल्या देहाचे निरनिराळे अवयव जसे आपआपलीं कामें करून परस्परांच्या व एकंदर देहाच्या संरक्षणास व वृद्धीस साहाय्यभूत होतात, तद्वत् आपण या जनसमाजांत परस्परांस सर्व प्रकारे साहाय्य केलें पाहिजे. असें आपण करू तरच आपला हा समाज कायम राहून प्रत्येक व्यक्तीचे रक्षण व उन्नति ही होणार आहेत. कारण आपणांस समाज करून राहिल्यावांचून गति नाहीं. तेव्हां ह्या अत्यंत आवश्यक समाजस्थितीमधल्या निरनिराळ्या व्यक्ति परस्परांच्या हितास न जपतां आपल्या पुरतें पाहूं लागल्या तर

* जो जिवंत असल्यानें त्याचे दिन मित्र व बांधव जगतात, त्याचें जीवित सफल होय. केवळ आपल्यासाठीं कोण जगत नाहीं?

समाजघटना कायम रहाणें शक्य नव्हे. यासाठीं जो आपला गुन्हा करितो, त्याच्यावर आपण हात करूं नये. दुसरें असें कीं, या संसारांत कोणीही सर्वथा शुद्ध नाहीं. प्रत्येकाच्या हातून कमीजास्त प्रमाणाने अपराध घडत असून, त्याचें मन थोडेंबहुत बिघडलें असतें. तेव्हां एकाने दुसऱ्यास या दोषाबद्दल शासन करणें रास्त नव्हे.

आपल्या बरोबरीच्यांवर, किंवा आपल्याहून श्रेष्ठांवर किंवा आपल्याहून कमी योग्यतेच्या मनुष्यांवर रागावण्याचें आपण सोडिलें पाहिजे. आपल्या बरोबरीचे जे असतात, त्यांच्यावर रागावणे हें मोठें धोक्याचें असतें; आपल्या वरिष्ठांवर रागावलें असतां त्यास निवळ त्वेष म्हणतात. आपणाहून जें कनिष्ठ असतात, त्यांच्यावर रागावणें हा नीचपणा होय. जो आपणांस अपकार करितो, त्यास आपण अपकार करणें हा मोठाच मूर्खपणा असून, त्यापासून मनुष्याची विपत्ति वाढते. ज्या मनुष्यावर आपण रोष करितों, तो मनुष्य पुढें कधीं तरी आपल्या किती उपयोगीं पडण्याजोगा आहे याचा आपण नीट शांतपणे विचार करूं तर आम्हा मनुष्यांमध्ये कधींही दुफळी व वैर माजावयाचें नाहीं; आणि परांनीं केलेल्या अपकारांबद्दल आपण त्यांवर उपकारच करून त्यांची मैत्री जोडूं. एकाद्याला क्षमा करण्यास आपण तयार नसतो तेव्हां आपण असा विचार करावा कीं, अन्य सर्व जनांनींही जर आपल्याशी असेंच खुनशीपणाचे वर्तन केलें तर त्यापासून आपलें हित होईल काय? आपल्या हातून वेळोवेळा, दुसऱ्यांचा अपराध घडत असतो. अशा प्रसंगीं त्यांनीं आपणांस क्षमा करावी अशी आपण इच्छा करितो. परंतु आपण स्वत: मात्र इतरांवर क्षमा करण्यास तयार नसतो हें केवढे विचित्र बरें? दुसरें असें कीं, ज्या मनुष्यावर संतापून आपण त्याला आपल्या समोरून हांकून काढितों, त्याच मनुष्याचे, प्रसंग पडला असतां पाय धरण्याची पाळी येते. तर कोणी आपणाशी वैर केलें असतां, किंवा आपल्याठायीं इतरांविषयीं वैरबुद्धि वसत असल्यास वैराचे कारण जें परस्परांमधलें वैमनस्य तें काढून टाकून, आणि परस्परांचे अपराध विसरून, परस्परांचें सख्य जोडणे हें किती सौख्यप्रद आहे म्हणून सांगूं! कोणी तुजवर रागावला असतां, त्याचा राग त्वां त्याच्यावर उपकार करून दवडावा; आणि त्याच्याशीं सलोखा करावा. एक पक्ष हार घेऊन पुनरपि मैत्री करण्यास राजी होईल तर वैमनस्याचें कारण तत्काळ मिटेल. दुसरा प्रतिकार करण्यास प्रवृत्त झाला तरच कलह माजत असतो. 'एका हाताने टाळी वाजत नाहीं,' अशी जी म्हण आहे, ती यथार्थ आहे. दोन पक्षांमध्ये कलह उपस्थित झाला असतां, जो आपल्या रोषास आळा घालून हार घेतो, आणि कलह करण्याचें सोडून देतो. तो उत्तम मनुष्य समजावा. कोणी तुला प्रहार केला असतां त्यावर तूं उलट प्रहार करूं नको तर तेथून निघून जा. कारण तूं त्याच्यावर उलट प्रहार केलास तर तो तुजवर आणखी प्रहार करण्यास प्रवृत्त होईल. अशा प्रकारें परस्परांमध्यें एक वेळ झगडा माजला कीं मग त्यांतून वाटेल तेव्हां सुटून जाण्याची सवड उरणार नाहीं. या प्रकरणी रामदासाचें एक वचन आहे तें असें:-

कोप आरोपणा खोटी । कोपें कोपचि वाढतो
मोडतो मार्ग न्यायाचा । अन्याय प्रबळे बळे

म्हणून हाच साधु पुढें म्हणतो:-

भल्यानें कोप सांडावा। शांतीने असतां बरें
क्षुल्लकें कोप पाळावा। भल्याचें काम तों नव्हे

चांगल्या मनुष्यास कोणी बोध केला असतां, त्याला त्याबद्दल हर्ष होतो. परंतु दुष्ट मनुष्य असतो त्याचा कोणी दोष काढिला असतां, त्याला तो सहन होत नाहीं. एकाद्या मेजवानीस तूं गेलास असतां, तेथें तुझी कोणी थट्टा केली, किंवा कोणी तुला टोंचून बोलला, तर त्याबद्दल तुला फार वाईट वाटणें साहजिक आहे. असा अनुभव तुला आला असतां, त्वां अशा नीच जनांची

कोधो मूलमनर्थाना क्रोध: संसारबंन्धनम्।
धर्मक्षयकरः क्रोधस्तस्मात्क्रोधं विपर्जयेत्।। * सु.

दुष्टबुद्धि आणि द्वेष यांहूनही क्रोधाचें स्वरूप प्रखर आहे. दुष्ट बुद्धि किंवा द्वेष या वृत्तीस्तव मनुष्याला इतरांस दुःख होतांना पाहून समाधान वाटतें. परंतु क्रोधामुळे हें दुःख साक्षात् उत्पन्न होते. पूर्वोक्त उभय वृत्ति ज्याच्याठायीं असतात, त्याला एकाद्यावर अरिष्ट आले असतां संतोष वाटतो. परंतु क्रोधवृत्ति ज्याच्याठायीं असते. तो हें अरिष्ट निर्माण करून दुसऱ्यास कष्टी करतो. तें यदृच्छेने त्याच्यावर प्राप्त होईपर्यंत थांबत नाहीं. परंतु स्वतांवर कोणी असें अरिष्ट आणलेलें त्याला खपत नाही. क्रोध हा मानवी स्वभावास केवळ विषरूप होय. निसर्गत: पाहता आपण परस्परांवर प्रेम करावे असें आहे. परंतु क्रोधाच्या योगाने आपण परस्परांचे दीर्घद्वेषी देतो. निसर्ग आपणांला एकमेकांस साहाय्य करावयाला सांगतो. पण आपण क्रोधवश होऊन परस्परांस अपाय करण्यास प्रवृत्त होतो. दुसरें असें कीं, क्रोध जो आहे तो पराकाष्ठेच्या शंकेखोरपणामुळे उद्‌भवतो. तो ज्याच्याठायीं उद्‌भवतो तो वरवरून मोठा धैर्यवानसा भासतो, पण वस्तुतः पाहतां त्याचें मन मोठे दुर्बळ असून विकृत झालेलें असतें. इतर जन आपली अवहेलना करितात अशा संशयाचा विचार ज्याच्या हृदयांत भिनतो, त्याच्याहून नीच असा इतर कोणीही नाहीं परंतु जो मनुष्य खरा मर्द असून, ज्याला स्वताची योग्यता चांगली कळत असते. तो परांनी केलेल्या अपकारांस मुळींच मोजीत नसतो. त्यांचा प्रतिकार करण्यास तो सहसा प्रवृत्त होत नाहीं. एकाद्या कठीण शिलेवर मारलेले दगड तिला यत्किंचित्‌ही इजा केल्यावांचून उलटतात, आणि कधीं कधीं ते मारणारांसच येऊन लागतात; तद्वत् ज्याचें हृदय थोर असतें त्याला परांनी केलेल्या अपकारापासून यत्किंचितही अपाय घडत नाहीं. याप्रमाणें जो सर्व अपकार व अपमान हे तुच्छ मानून त्यापासून आपलें चित्त उद्विग्न होऊं देत नाहीं, तो मोठा योग्य पुरुष समजावा. दुसऱ्याने अपकार केला असतां त्याचा सूड उगविण्यास जो प्रवृत्त होतो, तो आपणांस त्यापासून पीडा झाली असें दर्शवितो. ज्याचे चित्त अशा प्रकारे परकृत अपकार मुळें क्षुब्ध होत नाही, तो थोर मनाचा समजावा. अशा क्षमाशील पुरुषाचें वर्णन एका कवीने येणेप्रमाणें केलें आहे:-

धन्या: खलु महात्मानो ये बुद्धया क्रोधमुत्थितम् ।
निरुन्धन्ति महात्मानो दीप्तमग्निमिवांभसि ।। * सु.

---

* क्रोध अनर्थाचें कारण आहे. क्रोधामुळें संसारबंधन घडतें. क्रोधाच्या योगानें धर्मक्षय होतो. तस्मात् क्रोध वर्जावा.

* पेटलेला अग्नि जसा पाण्याच्या योगानें शमवावा, त्याप्रमाणें जे उत्पन्न झालेल्या क्रोधाचा बुद्धीच्या साहाय्यानें निरोधं करितात, ते महात्मे धन्य होते.

जो तुला अपाय करितो, तो एकतर तुझ्याहून बळकट असेल किंवा अशक्त असेल. तो अशक्त असला तर त्याला क्षमा करावी, आणि तो बळकट असला तर त्याच्याकडून आणखी अपाय न होईल अशी तजवीज करावी. कोणीकडूनही पाहतां क्रोधास अवकाश नाहीं. म्हणूनच म्हटले आहे की:-

क्षमाशास्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति
अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति ।। * सु.

तुला जें हें अल्प जीवित प्राप्त झालें आहे, त्याचा उपयोग असा कर कीं, तेणेंकरून तुला स्वतांला आणि इतरांला शांतीचा अनुभव घडावा. जीवमान आहे तोंपावेतों सर्वांस प्रिय होऊन जाण्याचा यत्न करावा; आणि अंती तुझें देहावसान झालें असतां, तुझ्याबद्दल सर्वांनीं शोक करावा. तूं आपल्या नोकरांवर, आपल्या वरिष्ठांवर, किंवा आपल्या राजावर कां म्हणून रागावतोस? आपल्यावर जे अवलंबून असतात, त्यांवर तूं कां रुष्ट होतोस? त्यांना त्यांच्या दोषांबद्दल क्षमा कर. तुझें मरण अगदीं सन्निध आहे हें ध्यानांत ठेव. तें प्राप्त झालें म्हणजे आपले एथील सर्व भेदाभेद मिटून आपण सगळे समान होऊन जाऊं. तर जें थोडें जीवित शेष उरले आहे, तें शांतींत व स्वस्थतेंत घालूं या. आपण मेलो तर बरें होईल असें कोणास वाटूं देऊं नये. आपणांस सर्वांत अधिक जी मरणभीति ती सर्वदा उपस्थित असतां आपण यःकश्चित् अनिष्टांस कां बरें दाद द्यावी? या संसारामध्यें परस्परांशीं भांडण्यांत किंवा दगाबाजी करण्यांत कोणता अर्थ आहे बरें? ज्याच्यावर तुझा एक दात असतो, त्याचा प्राण घेण्यापलीकडे आणखी तें कोणतें शासन तूं त्याला करणार? परंतु तूं त्याच्या वाटेस मुळींच गेला नाहीस तरी तो एके दिवशीं मरणारच आहे. तेव्हां त्याला अपाय करण्याची तूं व्यर्थ खटपट कशाला करितोस? जो त्याचा नाश एक वेळ निश्चयानें व्हावयाचा, त्याबद्दल तूं आज विनाकारण परिश्रम करून आपल्या चित्ताचे स्वास्थ्य नष्ट करीत आहेस. अशा कांहीं दगदगींत न पडतां, आपण या संसारामध्यें आहों तोपर्यंत इतर जनांशीं गुण्यागोविंदांनीं वर्तू, आणि आपल्यामुळे कोणाही मनुष्यास दुःख किंवा भीति वाटणार नाहीं असें सर्वदा वर्तन करूं. इतरांची निंदा, द्वेष, मत्सर किंवा नुकसान करण्याचें आपण कधींही मनांत आणू नये. कोणीं आपलें थोडेबहुत नुकसान केलें तर तें केवळ अल्प काळापुरतें आहे असें समजून तें मोठ्या मनानें सहन करावे. आपल्या पाठीशीं मृत्यु सर्वदा उभा ठाकलेला असतो. तेव्हां या जीविताची काय शाश्वति आहे?

◆◆◆

---

* क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं। दुष्ट तयाप्रति काय करी तृण नाहीं तेथे पडिला दावाग्नि। जाय तो विझोनि आपसया. तुकाराम

प्रकरण चवथें

मरणाच्या संबंधानें समाधान

तूं आपल्या प्रिय मित्राच्या मृत्यूबद्दल खेद प्रगट केला आहेस. यावरून असें दिसते कीं, तो आणखी कांहीं वर्षे जगावा अशी तुझी इच्छा होती. परंतु येणेंकरून तुझ्या ठायींची शांति आणि न्यायानुवृत्ति नष्ट झाली असें मात्र दिसतें. इतर व्यवहारांमध्ये तुझ्या ठायींचे हे सद्गुण चांगले दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु या मित्रवियोगसमयी तुझ्या गुणांनी तुला सोडले असें दिसतें. अशा समयी तुझीचशी काय, पण सर्व जनांची अशीच अवस्था होते. मीं असे पुष्कळ लोक पाहिले आहेत कीं, जे इतर जनांशीं मोठ्या न्यायाने वर्तन करितात, तेच अशा समयी निसर्गास अन्यायानें दोष लावतात. आपण अनिष्ट प्रसंगीं दैवास दोष देत बसतों. 'माझ्या मित्राचा नाश अकालीच कां झाला? त्याच्या ऐवजीं दुसऱ्या कोणास तरी कां बरें मृत्यु प्राप्त झाला नाहीं? तो आमका तमका अगदीं थेरडा झाला असून त्याचें जिणे इतरांस व स्वतांस त्रासदायक झालें आहे. पण त्याला कसलें तें मरण येत नाहीं. आणि याच आपल्या मित्राला कसें अल्प वयांतच जावें लागलें? असें आपण म्हणतों. परंतु मी तुला असें विचारितों कीं, त्वां निसर्गाचे करणें मान्य करावे हें योग्य दिसतें, कीं तुझा हुकूम निसर्गाने ऐकावा हें योग्य दिसतें, याचा तूं विचार केला आहेस काय? तुला जर एक वेळ निश्चयानें जावें लागणार आहे, तर तें केव्हांही जावे लागले म्हणून त्यांत तुझें काय बिघडले? आपलें आयुष्य दीर्घ व्हावें अशी इच्छा आपण करूं नये. तर आपलीं या संसारांतलीं कर्तव्यें करण्यापुरतें आयुष्य आपणांस प्राप्त झालें म्हणजे पुरे. दीर्घायुष्य प्राप्त होणें न होणे हें दैवाधीन आहे. परंतु जें आयुष्य आपणांस प्राप्त झालें असेल, तेंच दीर्घ करण्यास मात्र आपल्याठायीं धैर्य हवें आहे. आयुष्य दीर्घ करण्याचा उपाय म्हटला म्हणजे त्याचा एक क्षणही वायां जाऊं देऊं नये. आपल्या आयुर्दायामध्यें आपल्या आत्म्याची उन्नति व्हावी व त्याच्या एकंदर गूढ शक्ति विकास पावाव्या असा उद्योग अहर्निश केल्यानें आयुष्यास दीर्घत्व येतें. हाच बोध पुढील पद्यांत निर्दिष्ट केला आहे–

श्लोकेन वा तदर्धेन तदर्धार्धाक्षरेण वा ।
अवंध्यं दिवसं कुर्याद्दानाध्ययनकर्मभिः ।। * सु.

मनुष्य ऐंशी वर्षें जगला, पण त्यानें तीं सारी वर्षे सुस्तींत व आळसांत घालविली, तर त्याचा काय उपयोग बरें? अशा मनुष्याच्या जीविताचें कांहींएक सार्थक्य झालें नाहीं. तो आपला नुसता पुष्कळ वर्षे

---

* एक श्लोक किंवा अर्धा श्लोक किंवा त्याहूनही कमीं अक्षरें प्रतिदिवशीं शिकावीं. दानधर्म, अध्ययन, व सत्कर्म यांच्या योगाने प्रत्येक दिवस फलद्रुप करावा.

जगला होता इतकेंच कायतें. वस्तुतः पाहतां तो अगदीं तरुणपणीच मेला असें समजावयाचे. कोणी म्हणेल कीं, तो ऐंशीं वर्षे जगला ना? परंतु ही त्याच्या आयुष्याची गणना त्याच्या मरणाचा दिवस लक्षांत आणून लोक करितात. लोकदृष्टीनें जो मनुष्य अल्प वयांत मरण पावला असतो, त्यानें जर चांगला जानपद, सन्मित्र व सत्पुत्र यांस अनुरूप अशीं कर्तव्यें केली असलीं, किंबहुना ऐहिक संबंधाची इतर एकंदर कर्तव्ये त्यानें योग्य प्रकारे बजाविलीं असलीं, तर त्याच्या आयुष्याचें सार्थक्य झालें म्हणून समजावे. म्हटले आहे:-

स जीवति गुणा यस्य धर्मो यस्य स जीवति ।
गुणधर्मविहिनो यो निष्फलं तस्य जीवितम् ।। ** सु.

त्याची उमर पुरी झाली नाहीं तरी त्याचें जीवित पूर्ण झालें, यांत कांहीं शंका नाहीं. मनुष्य नुसता ऐंशी वर्षे जगला तर त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. त्याच्या जीवितांत आणि वृक्षादिकांच्या जीवितांत कांहींएक भेद नाहीं. बा लुसिलिअसा, मी तुला अशी विनंति करितों कीं, आपलें आयुष्य दीर्घ होण्याची हाव त्वां धरू नये. तर सुवर्णरत्नादिकांची जशी किंमत फार मोठी असून, त्यांचा आकार अगदीं लहान असतो, तद्वत् तुझें आयुष्य अगदीं अल्प झालें तरी तें अतिमोलाचें करण्यास मनापासून झट. आयुष्याची परिगणना करावयाची ती वर्षांच्या संख्येप्रमाणे करूं नये. तर आपल्या आयुर्दायामध्यें आपल्याकडून जी कृत्यें घडतात, त्यांच्या योग्यतेप्रमाणें व संख्येप्रमाणें करावी. जो मनुष्य दैवगतीस न जुमानितां या संसारातील एकंदर कर्तव्ये योग्य प्रकारें करून परिणामी नीतिबलेंकरून परम कल्याणास पात्र होतो, त्या मनुष्याची नुसत्या जरठ झालेल्या मनुष्याशी तुलना केली असतां, त्यामध्यें तू कोणांस श्रेष्ठ म्हणशील बरें? पहिला मनुष्य मेला तरी तो जिवंत आहे म्हणून समजावे; आणि दुसरा जिवंत असूनही मृतवत लेखावा. पहिल्याची आपण तारीफ करावी, आणि त्यास धन्य पुरुषांच्या वर्गांत गणावें. त्याचें वय कितीही अल्प असतां, तो हा लोक सोडून गेला असला तरी त्यानें आपल्या वयाचा सद्व्यय केला असें समजावे. कारण त्याच्या हृदयांत सत्याचा प्रकाश फांकून तो सदाचारसंपन्न झाला. अशा मनुष्याची इतर सामान्य जनांत गणना करावयाची नाहीं. तो नीतिबलेंकरून अमर होऊन राहिला म्हणून समजावें. तो येथें कितीही थोडी वर्षे जगला तरी त्याची कीर्ति पिढ्यानपिढ्या कायम रहावयाची. तो गत झाला तरी त्याची आठवण अक्षयी रहावयाची. आयुष्य दीर्घ असूं नये असें माझें मत नाहीं. परंतु तें अल्प असलें तरी त्याचें साफल्य व्हावयास काहीएक हरकत नाहीं, असें माझें म्हणणे आहे. माझा जो प्रत्येक दिवस जात आहे, तो मी शेवटलाच समजत आहें. मी कधीं जन्मलों, आणि मी आपणांस तरुण समजतों किंवा काय? असें तूं मला कां म्हणून विचारतोस बरें? मी अगदी थोडीं वर्षे जगलों तरी माझी आत्मोन्नति व्हावयास कांहींएक हरकत नाहीं. आयुष्याचें अल्पत्व किंवा दीर्घत्व हें केवळ बाह्य होय. मीं किती वर्षें जगावें हें माझ्या स्वाधीन नाहीं. तो यदृच्छेचा खेळ होय. परंतु मी किती वर्षें नीतीनें वर्तेन हें मात्र माझ्या हातचे आहे. म्यां आपले आयुष्याचे दिवस सदाचारांत घालवावे, अनाचारामध्ये मग्न होऊन विटंबना करून घेऊं नये. नुसती पुष्कळ वर्षें जिवंत रहाण्यापेक्षां कांहीं तरी सत्कर्म नित्य करावें. कोणती आयुर्मर्यादा दीर्घ म्हणून जर तूं पुसशील

** ज्याच्या अंगी सद्गुण असतात, व ज्याच्या हातून सदाचार घडतो. तोच जिवंत आहे म्हणावयाचा. सद्गुण आणि सदाचार हीं ज्याच्या ठायीं नाहींत, त्याचें जीवित निष्फल होय.

तर माझ्या मतें ज्ञानबलेंकरून पूर्ण सदाचारांत जें आयुष्य वेंचेल, तें कितीही अल्प असलें तरी अतिदीर्घ समजावें. ज्यास ज्ञानप्राप्ति होऊन सुनीतीचें वळण लागतें, तो पुरुष सर्वांहून अधिक वर्षे जगला असें समजावें. असा पुरुष आपल्या जीविताचें सार्थक्य करून आपलें उत्कृष्ट उदाहरण इतर मानवास घालून देतो. तो मरणास कदापि भिणारा नव्हे. त्याचें येथें देहावसान होऊन एक तर तो उत्तम लोकाप्रत जाईल. बरें असा उत्तम लोक पुढें कोठें नसून देहावसानाबरोबर त्याचा सर्वस्वी नाश व्हावयाचा असला, तरी त्याबद्दल त्यास कांहीएक वाटावयाचें नाहीं. त्याच्या मनाचा थोरपणा एवढ्याच कारणावरून यत्किंचित्ही कमी व्हावयाचा नाहीं. तो फार वर्षें जगला नाहीं तरी त्याचा चरित्रमहिमा सर्वजण गातात; आणि त्याच्या चरित्राचे अनुकरण जो कोणी करूं जाईल, त्याचें कल्याण होण्यासारखे असतें. मरण कोणास सुटलें नाहीं. तें सर्वांस एकदां प्राप्त व्हावयाचें. जो आज दुसऱ्याचा घात करितो, तो उद्या त्याच्या मागून मृत्युपंथानें जातो. अशा ह्या सर्वांस प्राप्त होणाऱ्या मरणाविषयीं मनुष्याने विनाकारण खेद करीत बसणे योग्य नव्हे. तें टाळण्याविषयी आज त्वां कितीही प्रयत्न केला तरी तें अक्षयींचे कदापि टळावयाचे नाहीं.

◆◆◆

प्रकरण पांचवें

मित्रनाश

तुझ्या प्रिय मित्राच्या मरणामुळें तूं अगदींच शोकाकुल झाला आहेस. अशा अमर्याद शोकानें विव्हल होणें तुला योग्य नव्हे. परंतु त्वां मुळींच शोक करूं नये असें माझ्याने तुला सांगवत नाहीं. तरी तूं शोक न करशील तर बरें इतकें मात्र मला म्हणावें लागतें. कसाही प्रसंग आला तरी मनाची समता अढळ राखण्याचे धैर्य फारच थोड्यांना होत असतें. ज्याने सर्व सुखदुःखांस न जुमानण्याचा पूर्ण निर्धार केला असून, जो पक्का उदासीन बनला असतो, त्यालाच हें साध्य असतें. तथापि अशा वैराग्यसंपन्न पुरुषासही मित्रवियोगजन्य दुःख थोडं तरी झाल्यावांचून रहाणार नाहीं. परंतु त्याच्या चित्तांतून तें लागलेंच कमी व्हावयाचे. मित्र वियोगजन्य दुःखामुळे अश्रू गाळावे. पण ते लागलीच आवरावे. मित्राबद्दल जरासुद्धां शोक करूं नये हे कांहीं चांगले नव्हे. पण तो बेसुमार मात्र करूं नये. यावरून मी तुला अगदीं कडकडीत व्रत आचरावयास सांगत आहें असें तूं समजू नको. जे आपल्या मित्रासाठीं अमर्याद दुःखाक्रोश करितात, आणि एकसारखे अश्रू ढाळितात, त्यांचा असा इरादा दिसतो कीं, आपण जितका अधिक शोक करूं, तितक्या मानानें गत झालेल्या मित्राविषयींचें आपल्या ठायीं किती प्रेम होतें तें जनांस दिसून यावें. परंतु अशानें आपण आपल्या मित्राबद्दल वरवरून मात्र शोक केला असें होतें. त्याच्याविषयी आपणांस वास्तविक दुःख झालें नसतें. केवळ एकांतांत बसून आपल्या मित्राची आठवण करून शोक करणारा विरळा. लोकांदेखत मात्र घळघळां अश्रू गाळावयाचे हा मोठाच मूर्खपणा होय. मीं तुला शोक करूं नको असें सांगितल्यावरून तूं मला असा उलट प्रश्न करिशील कीं, 'तर मग मी माझ्या प्रिय मित्रास अगदीं विसरावे कीं काय?' याचे उत्तर असें कीं, तूं आपला सारा जन्म जरी त्याच्याबद्दल शोक करीत बसलास तरी तो तूं कितीसा करणार बरें. तुझें आयुष्य तें केवढे? असें आहे त्यापेक्षा तुझ्या शोकानें त्याची आठवणही अगदीं अल्प काळ रहाणार आहे. परंतु कालेंकरून माझ्या मानसिक स्थितींत पालट झाला असतां त्याच्यासाठी तूं शोक करावयाचें सोडून देशील, आणि तुझी वृत्ति पुनरपि उल्हासयुक्त होईल. कालमहात्म्य असें कांहीं विलक्षण आहे कीं, या संसारांत अत्यंत मोठा शोक मनुष्यास झाला असलां तरी तो कालांतरानें सर्व नाहीसा व्हावयाचा. तूं हा स्वमित्रवियोगजनित शोक जितका कमी करीत जाशील, तितका तो तुझ्याठायींचा लवकर नष्ट होईल, तो वाढवावा तितका वाढतो, व कमी करावा तितका कालेंकरून कमी होतो. हा शोक तूं कितीही जपून करण्याचें मनांत आणिलेंस तरी तो एक वेळ समूळ नष्ट व्हावयाचा. परंतु येथें ही एक गोष्ट ध्यानांत वागविली पाहिजे कीं, आपल्या प्रिय मित्राची स्मृति आपणांस जेव्हांजेव्हां होईल तेव्हांतेव्हां

ती आनंदजनक होईल अशी खबरदारी आपण नित्य घेतली पाहिजे. ज्याची आठवण झाली असतां मनुष्याचें चित्त उद्वेग पावतें असें कांहीं असलें तर त्याचें स्मरण करण्यास मनुष्य तयार नसतो. आपल्या गत मित्राची आठवण झाली असतां, थोडेंसें वाईट वाटणे इष्ट होय. अशा वाईट वाटण्यांतच एका प्रकारचें समाधान आहे. गत मित्राच्या स्मरणाची तुलना कडवट मधुर फलाशीं करण्यासारखी आहे. फल प्रारंभी थोडेंसें तुरट लागलें तरी अंमळशानें तें मधुर लागतें; तद्वत्च मित्राची आठवण झाली असतां थोडीशी हळहळ वाटते. पण ती लवकरच नाहींशी होऊन त्याच्या गुणांची व नाना कृत्यांची आठवण होते. यामुळें चित्तास एका प्रकारचें समाधान होतें. या समाधानापासून वाटणारें सुख परम शुद्ध असतें. आपले सद्गुणी मित्र या संसारातील तापत्रयापासून मुक्त होऊन सुखधामांत आहेत असें आपल्या लक्षांत आल्यानें आपणांस मोठें समाधान वाटतें. माझ्या गत मित्रांची स्मृति मला आल्हादजनक व प्रिय वाटते. ते जिवंत होते तोंपर्यंत मी सर्वदा असें मानी कीं, तें मला कधीं तरी अंतरणार खास; व ते गत झाल्यानंतरही त्यांची आठवण माझ्या मनांतून मुळींच बुजली नाहीं. त्यांची आठवण मला जेव्हांतेव्हां होत असते. तर हे ल्युसिलिअसा, तुझा विवेक जें तुला सांगेल, त्याप्रमाणें वर्तत जा. दैवास व्यर्थ दोष देत बसूं नको. आपण आपल्या मित्रांशी मोठ्या प्रेमानें वागावें कारण त्यांचा आपला केव्हां वियोग होईल याचा नेम नाहीं. ते किंवा आपण एकाद्या लांबच्या प्रवासास गेलों असतां, किंवा एकाच गावात असून कांहीं कामांत गुंतलो असतां, परस्परांस भेटल्यावांचून आपले कैक दिवस लोटतात याची आठवण कर. यावरून तुझ्या ध्यानांत येईल की, ते जिवंत असतां आपण त्यांच्या सहवासास पुष्कळ वेळां मुकलेले असतो. परंतु जे लोक आपले मित्र जिवंत असतां त्यांची फारशी परवा करीत नाहींत, परंतु ते गत झाल्यावर मग पराकाष्ठेचा शोक करितात, त्यांला काय म्हणावें बरें? ते मृत झाल्यावर मग त्यांच्याविषयीं आपल्याठायीं प्रीति आहे असें ते दर्शवितात, आणि मोठमोठ्यानें शोक करितात. मनातला हेतु कीं, आपल्या हृदयांत त्यांच्याविषयी प्रेम नव्हतें असें लोकांस वाटू नये. याप्रमाणें ते आपल्या मानभावी प्रेमाचे प्रदर्शन करितात. पण हें करणें निषिद्ध होय. आपणांस दुसरे मित्र असले तर त्यांना आपण कमी लेखितों, आणि त्यांच्या संबंधानें प्रतिकूल अभिप्राय प्रगट करितों. याप्रमाणे ते मृत मित्रांहून कमी योग्यतेचे आहेत असें आपण भासवितों. आतां ज्यांचा एकच मित्र असतो, त्यांचें मात्र मोठेच नुकसान होतें. कारण आपलें समाधान करण्यास कोणी दुसरा मित्र आपण केलेला नसला तर त्यासारखी विपत्ति फारच थोडी. एकाद्याचा एकच अंगरखा होता तो कोणीं चोरून नेला असतां, तो कपाळावर हात मारून घेऊन शोक करीत बसला, व थंडींचे निवारण करण्यास दुसरें कांहीं तरी पांघरूण पाहत नाहीं, तर त्याला तूं मुर्ख नाहीं म्हणणार काय? अशीच गोष्ट गत मित्राविषयीं शोक करणाराची आहे. तुझा एक प्रिय मित्र गमावला तर त्याच्याऐवजीं दुसरा एकादा मित्र करून त्यावर प्रेम कर. गत मित्राबद्दल शोक करीत बसण्याऐवजी दुसरा एकादा मित्र पाहण्यांत विशेष हित आहे. मी जो हा तुला बोध करीत आहें, तो सामान्य असून त्वां पुष्कळ वेळां ऐकला आहे. पण हा बोध मी तुला वारंवार करीत रहाणार. आजपर्यंत पुष्कळांच्या तोंडून किंवा लेखांच्याद्वारें जरी हा बोध तुला प्राप्त झाला आहे, तरी तो पुनःपुनः करण्याजोगा आहे. ज्याच्या शौकाचा अंत बोधाने व विवेकाने होत नाही. त्याचा तो शोक कालांतरानें नाहीसा होतो. विवेकी मनुष्य मित्रवियोगजनित शोकामुळें अगदीं बेजार होऊन जावा हें मोठें लांछनास्पद आहे. तर हा तुला शोक कालांतरानें जावा यापेक्षां तो त्वां आपण होऊन घालवावा हें युक्त होय. जी

गोष्ट, तुझी कितीही इच्छा असली तरी, तुला फार वेळ करितां यावयाची नाहीं, ती करण्याचें तूं होईल तितकें लवकर सोडून दे. दुसरें असें कीं, कोणी मनुष्य एकसारखा शोक करूं लागला म्हणजे त्याचा इतर जनांस कंटाळा येतो. तो त्याचा शोक नवा असतो तोपर्यंत त्याचें समाधान करण्यास त्याचे ओळखीचे लोक झटतात. पण तो आपला एकसारखा शोक करीत राहिला तर त्याचा तेच जन उपहास करूं लागतात. कारण त्याचें तें ढोंग आहे किंवा मूर्खपणा आहे असें त्यांच्या मनांत येणे साहजिक आहे. हे ल्युसिलिअसा, हा असा बोध मी तुला आज करीत आहें खरा, परंतु माझा एक मित्र मरण पावला तेव्हां माझीही अशीच दशा झाली होती. माझा शोक फारच अनावर होऊन त्यांत मी अगदीं बुडून गेलों होतों. या माझ्या व्यंगाबद्दलही मी आज स्वतांस या लेखाअन्वयें दोष देत आहें असें तूं समज. मला जो हा अनावर शोक झाला होता, त्याचें कारण असें कीं, तो माझा मित्र माझ्या पूर्वी मरण पावेल असें मला वाटलें नव्हतें. तो वयानें माझ्याहून फारच लहान होता असें मी समजत होतों. ज्या क्रमाने आम्ही या जगांत जन्म पावलों, त्याच क्रमानें आम्हांस मृत्यू प्राप्त होईल असें मला वाटत होतें. पण हा माझा श्रम होता. वस्तुतः पाहतां आपल्या स्वतांच्या मरणाबद्दल जसा आपण विवेक करावयाचा, तसाच तो आपल्या मित्रांच्या मृत्युबद्दल करणें उचित होय. म्यां त्या प्रसंगीं असा विवेक केला पाहिजे होता कीं, माझा मित्र मजहून लहान आहे खरा, तरी तो केव्हां मरेल याचा काय नेम? माझ्या मागून तो मरावा हें जरी खरें आहे, तरी तो कदाचित् माझ्या पुर्वीही मरण पावेल! असा विवेक मीं केला नाहीं म्हणून त्याच्या मृत्यूमुळें मला एकदम असा धक्का बसला. सांप्रत मी सर्वदा असे मनांत वागवीत असतीं कीं, या जगांतील सर्व वस्तुजात नुस्ते मरणाधीन आहे, एवढेंच नव्हे तर तें केव्हां नाश पावेल याचा कांहीं नेम नाहीं. जें कांहीं घडावयाचें तें कदाचित् आजच घडेल, नेम कोणी सांगावा? हे ल्युसिलिअसा, आणखी त्वां असें लक्षांत वागवावें कीं, ज्या आपल्या प्रिय मित्राच्या मृत्यूबद्दल आपण आज शोक करीत आहों, त्याला जी गति प्राप्त झाली आहे, तीच गति आपणालांही एक वेळ प्राप्त व्हावयाची आहे. हाच भाव पुढील पद्यांत उत्कृष्ट प्रकारें व्यक्त केला आहे:-

एकेऽद्य प्रातरपरे पश्वादन्ये पुनः परे ।
सर्वे निःसीम्नि संसारे यांति कः केन शोचते ।। * सु.

आणि ज्ञाते पुरुष जें सांगतात, तें खरें असेल तर जो आपल्या पूर्वी मेला असें आपण समजतो, त्याला फक्त आमच्या पूर्वी रवाना केलें आहे, असें मानिलें पाहिजे.

◆◆◆

* या अमर्याद संसारामध्यें आज एक, उद्या दुसरा, परवां तिसरा, असे सर्व एकामागून एक चालले आहेत; तेव्हां कोणी कोणाचा शोक करावा?

प्रकरण सहावें

वृद्धापकाळासंबंधानें समाधान

माझ्याठायीं वार्धक्याचीं सर्व चिन्हें दिसू लागली आहेत. नुकताच मी माझ्या खेड्यांतल्या घरीं गेलों होतों. हें घर नीट करण्यास दररोज कांहींना कांहीं खर्च करावा लागे. त्यामुळे मी अगदी त्रासून गेलो. तेव्हां त्या घराची रखवाली करण्यासाठी ज्या मनुष्यास मीं ठेवले आहे, तो म्हणाला: 'यांत कांहीं माझा अपराध नाहीं. हें घर फार जुने झालें असून जिकडूनतिकडून मोडकळीस आलें आहे.' हें घर मीं स्वतः बांधलें होतें. तेव्हां माझी स्वतांची उमर किती झाली आहे, आणि माझी गात्रें कशीं शिथिल होत चाललीं आहेत हें तुझ्या लक्षांत येईल. ह्या घरासभोंवती हिंडत असतां, जी जी वस्तु माझ्या दृष्टीस पडली, ती पाहून मी त्याला दोष देऊं लागलो. मी म्हणालों: 'ह्या झाडाची मरामत चांगली झाली असती तर ही चांगली पोसली असतीं. ह्या झाडांवर तर मुळी एक पानही नाहीं. यांच्या फांद्यांना गाठी आल्या असून त्या बहुतेक सडल्या आहेत. यांच्या बुंध्यांवर शेवाळ आणि घाण पाहा किती माजली आहेत तीं? यांना चांगलीं आळीं खणून वरचेवर पाणी घातलें असतें तर यांची अशी दशा झाली नसती.' हें ऐकून तो रखवालदार माझ्या पायांची शपथ देऊन म्हणाला कीं, 'यांची मी अगदीं मनापासून मरामत करीत असून याला नित्य पाणी घालीत असतों. ही चांगली पोसत नाहींत याचें कारण हीं फार जरठ झाली आहेत हें होय.' हें तो म्हणाला तेव्हां मला आठवण झाली कीं, ही झाडे मीं माझ्याच हाताने लाविलीं असून, त्याला पहिली पालवी फुटतांना मीं माझ्या डोळ्यांनी पाहिली होती. मी माझ्या घराच्या दरवाज्यापाशी परत आलों तो तेथें एक अगदीं गलितांग झालेला जख्ख म्हातारा माझ्या दृष्टीस पडला. त्याच्यावर प्रेतकळा आली असून तो अगदीं वाकलेला होता. मी माझ्या नोकराकडे त्याच्याविषयी चौकशी करूं लागलो, आणि म्हणालों कीं, 'हा असा प्रेतरूप झालेला मनुष्य अजून कशाला वांचला आहे? तेव्हां तो म्हातारा म्हणालाः 'अरे मला तूं ओळखत नाहींस काय? मी तुझा लहानपणींचा सोबती असून तुझ्या कोठवळ्याचा मुलगा आहें.' पण त्याच्या बोलण्यावर माझा विश्वास बसेना. मी म्हणालों कीं, 'ह्याला म्हातारचळ लागल्यामुळे हा कांहीं तरी बरळत आहे.' पण त्यानें आणखी कांहीं लहानपणाच्या गोष्टी सांगितल्यावरून मला त्याची ओळख पटली. सारांश काय कीं, माझ्या तारुण्याच्या वेळचे घर, वाडी, झाडें, मित्र वगैरे सारी अगदीं जरठ झालेलीं मीं पाहिली, तेव्हां मला माझ्या वार्धक्याविषयीं खात्री झाली. आतां या स्थितीमध्यें मीं समाधान मानून शांत रहाणें उचित होय. या स्थितीमध्यें किती सुख आहे तें, तिचा कसा उपयोग करावा हें मनुष्यास कळल्यावाचून, त्याच्या ध्यानांत यावयाचे नाहीं. उदाहरणार्थ, असें पाहा कीं, कित्येक फळें अशीं असतात

कीं, तीं चांगली पक्क होऊन सडावयाच्या बेतास आल्यावांचून मधुर लागत नाहींत. जे मद्यपानांत मोठें सुख मानितात, त्याला शेवटला मद्याचा पेला अगदीं गुंग करून जमीनदोस्त करितो, तरी तो मोठा आल्हादजनक होतो. ज्यापासून अत्यंत सुखानुभव व्हावयाजोगा असतो, त्याचा अनुभव अगदी शेवटीं व्हावा असा निसर्गक्रम आहे. वार्धक्याचीही गोष्ट अशीच आहे. त्यामुळें सर्व गात्रे विकल होऊन जिणे मात्र परस्वाधीन होतां कामा नये. आतां वृद्धापकाळामुळे केवळ मरणोन्मुख अवस्था झाली तरी तीही माझ्या मते वाईट नव्हे. कारण अशा स्थितीमध्यें मनुष्यास कोणत्याच प्रकारच्या सुखाची अपेक्षा नसते. याप्रमाणें सर्व सुखाशेचें निर्मूलन होणे हें किती आनंदजनक व स्पृहणीय आहे म्हणून सांगू! परंतु येथें तूं असें म्हणशील कीं, मनुष्याने याप्रमाणें अगदीं मरणाच्या दारी बसून प्रतिक्षणी मरणाची अपेक्षा करीत रहाणे हें फारच कंटाळवाणे आहे. याचें समाधान असें कीं, एक तर ही अशी मरणाभीति वृद्ध मनुष्याप्रमाणे यौवनसंपन्न पुरुषाच्याही दृष्टीपुढे नित्य असली पाहिजे. कारण आपल्या वयाप्रमाणे आपणांस मृत्यू येईल याचा कांहीं नेम नाहीं. आपल्या आयुष्याचे बाल्यावस्था, यौवनावस्था, प्रौढावस्था व जरठावस्था असे विभाग होतात. यांपैकीं कोणताही विभाग मनुष्याचा व्यर्थ जातां कामां नयें. प्रत्येक दिवस आपला शेवटला समजून तो सार्थकी लाविला पाहिजे. आपल्या आत्म्याच्या उन्नतीचा प्रयत्न प्रतिदिनीं करावा हें योग्य होय. जीवित क्षणभंगुर असल्या कारणानें त्याचें साफल्य करण्यास एका घडीचीही दिरंगाई करणें योग्य नव्हे. आजचा दिवस मावळून उद्यांचा दिवस आपणास उगवेलच याचा कांहीं नेम नाहीं. यास्तव जो प्रत्येक दिवस आपणांस मिळत आहे, त्याबद्दल आपण निसर्गाचे आभार मानावे. ज्याचें सर्वदा असे वर्तन असतें कीं, त्याला उद्यां आपलें काय होईल याची काळजी नसतें, तो मनुष्य धन्य होय. माझें या जीवितांतलें कर्तव्य मी करून चुकलों आहें असें ज्याला नित्य वाटत असतें, त्याचा प्रत्येक दिवस सुखांत जात असतो. माझ्याविषयी पुसशील तर मला आतां कशाचीही गरज उरली नाहीं. माझें उरलेले आयुष्य मी शांतींने घालवीन. मी सर्व बंधनांपासून मुक्त झालो असल्या कारणानें मला सर्व मार्ग मोकळे झाले आहेत. मला आणखी जगण्याची आवश्यकता वाटत नाहीं. मी पाहिजे तेव्हां मरण्यास तयार आहें.

◆◆◆

प्रकरण सातवें

मुलांचें शिक्षण

आपल्या लेंकरांस मुळारंभापासूनच सुशिक्षण देणें इष्ट होय. त्यांना कह्यांत ठेवण्याचें काम मोठें कठीण आहे. तीं चिडखोर होणार नाहींत, किंवा त्यांचा उत्साह व चलाखी ही कमी होणार नाहींत अशी व्यवस्था आपण केली पाहिजे. या संबंधाने आपण नेहमी चांगली काळजी घेतली पाहिजे. कोणत्या गोष्टी त्यांस अपायकारक होण्यासारख्या असतात याचे आपण नीट बारकाईने अवलोकन केलें पाहिजे. आपल्या बालकांच्याठायीं ज्या ज्या वृत्ति विकास पावल्या पाहिजेत, व ज्या निर्मूळ झाल्या पाहिजेत, त्यांची वृद्धि किंवा क्षय कोणत्या गोष्टींनी होण्यासारखा असतो हें कधींकधीं आपणांस चांगलेसें कळत नसतें. मुलांस थोडेंसें स्वतंत्रपणें वागण्याची मोकळीक दिल्याने त्यांच्या मनांची उन्नति होते. त्यांच्यावर एकसारखा नेहमी दाब ठेविला तर त्यांच्या मनांची अवनति होते. त्याचप्रमाणे लहान मुलांच्या हातून एकादे चांगले काम झालें असतां, त्याला नेहमी शाबासकी देत गेल्यानें त्याला तसेंच आणखी पुढें वर्तन करण्याचा उत्साह येतो. परंतु ह्या दोन्ही उपायांमुळे मुलांच्याठायीं उद्दामपणा व रागीटपणा ह्या वृत्ति विकसित होण्याचा संभव असतो. तेव्हां यासंबंधाने आपण सर्वदा काळजी घेतली पाहिजे. मुलाचें मन या अनिष्ट वृत्तींपासून मुक्त राहून त्याची खरी उन्नति होण्यासाठीं त्यांस कोठें दाबावें व कोठें उत्तेजन द्यावे याचा आपण सुमार ठेविला पाहिजे. कोणत्याही वस्तु मोठ्या काकुळतीस येऊन मागण्याचा प्रसंग मुलांस येऊ देऊं नये. कोणत्याही वस्तूचा त्याला फाजील नाद लागेल असें करूं नये. त्यांनीं एकादी वस्तु मागितली असतां ती देण्यासारखी असल्यास ती त्याला तत्काळ द्यावी, आणि ती देतांना त्याला असें म्हणावें की, 'ही वस्तु तुम्हीं माझ्याकडे मागावी आणि म्यां तुम्हांस द्यावी अशीच आहे. तुमचे वर्तन चांगले आहे म्हणून तुम्हांस ही मी देतों. यापुढेंही तुम्ही असेच वर्ताल तर तुमच्या इच्छा मी अशाच पूर्ण करीन.' ते आपल्या बरोबरीच्या सोबत्यांशीं खेळत असतां, त्याला कोणी विनाकारण मारणार वगैरे नाहीं, किंवा ते कोणावर रागावणार नाहींत अशी आपण खबरदारी ठेवावी. ज्यांच्याशी भांडण्याचें त्याला कारण पडेल, त्यांच्याशी त्यांचा सलोखा होईल अशी कांहीं तरी तजवीज आपण योजावी. त्याचप्रमाणे जे खेळ ते इतर मुलांबरोबर खेळतील, त्यांमध्यें दुसऱ्यास विनाकारण दुःख देण्याचा त्यांचा इरादा नसून त्यांच्यावर फार तर हार लावण्याचाच त्यांचा उद्देश आहे किंवा कसें तें नेहमीं पाहिलें पाहिजे. एकाद्या खेळांत किंवा विद्याभ्यासांत त्यांची सरशी झाली किंवा त्यांच्या हातून एकादें वाखाणण्यासारखें काम झालें तर त्याबद्दल ते गर्वानें फुगून न जातील किंवा फुशारकीं न मारितील अशी आपण व्यवस्था राखावी. कारण त्यांना फुशारकीं मारण्याची एकदा सवय लागली म्हणजे

ते फुगून जाऊन, त्यांच्या अंगीं नसता अभिमान उत्पन्न होतो. त्यांला आपण नेहमीं खेळण्यास थोडीशी परवानगी द्यावी. तरी ते आळशी किंवा सुस्त न होतील अशी तजवीज ठेवावी; आणि त्यांना चैनबाजीची तर मुळींच चट लागूं देतां कामा नये. गोडगोड अन्नें खाण्याची किंवा इतर सुखविषयांची गोडी लागून, त्यांच्या अंगी नाजूकपणा व सुखलालसा उत्पन्न होऊं दिल्यास ते तापट होण्याची भीति असते. ज्या मुलांस हवें तसें वर्तन करण्याची सवय होते, आणि ज्यांस मनाला वाटेल तसा सुखोपभोग घेण्याची मोकळीक मिळते, तीं अतिशयित बिघडून जातात. मुलांचा पाहिजे त्या गोष्टीसंबंधीचा हट्ट चालूं दिला, किंवा तीं कळ करून रडूं लागलीं असतां, त्यांचे डोळे पुसून त्यांची हरउपायानें समजूत घालण्याचा प्रयत्न केला, किंवा सर्व बाबतींत त्यांच्या लहरीप्रमाणे त्यांस वर्तूं दिलें, तर त्यांचा स्वभाव असा बनतो कीं, त्याला कोणतीही अनिष्ट गोष्ट जरा सुद्धां खपत नाहीं.

आपण नेहमी असें पाहतों कीं, मनुष्यापाशीं जितकी अधिक दौलत असतें तितका त्याला संताप अधिक. हा प्रकार मोठमोठ्या धनाढ्य व अधिकारी लोकांमध्यें दृष्टीस पडतो. अशा सुखास लालचावलेल्या मनुष्याच्या डोक्यांत जर करितां थोडासा अभिमान किंवा हलकटपणा असला तर त्याची वृत्ति बेफाम होण्यास उशीर लागत नाहीं. धनाढ्य किंवा अधिकारी मनुष्य मोठा गर्विष्ठ असल्यास त्याची खुशामत करणारे लोक त्याच्या सभोंवतीं जमा होऊन त्याला असा तब्यती व लहरी करून सोडतात कीं, त्याच्या अंगीं तापटपणा वाढत रहातो. गर्विष्ठ मनुष्याला खुशामत करणारे लोक म्हणतात कीं, ''काय, तुम्हांला त्यानें असा जबाब द्यावा? तुमच्या दौलतीच्या मानानें तुम्ही आपला दबदबा राखीत नाहीं. तुम्ही आपला पुष्कळच कमीपणा करून घेता.'' सारांश या तोंडपुजे लोकांची एकाद्याला चढवून देण्याची अशी कांहीं लकब असते कीं, मनुष्य कितीही शहाणा व सुशिक्षित असला तरी त्याला त्यांच्या बोलण्यानें अगदीं मोहनीच पडते. यास्तव लहान मुलांची नसती वाहवा मुळींच न होऊं देण्याविषयी काळजी घ्यावी. त्यांच्या कानीं नित्य सत्य गोष्टी पडतील अशी व्यवस्था करावी. वडिलांचा वचक, विनय, आज्ञाधारकपणा, कर्तव्यपरता आणि सन्मान्यबुद्धि या सद्‌गुणांचा त्यांच्याठायीं विकास होऊं द्यावा. एकाद्या वस्तूविषयी ते कळ करून रडूं लागले असतां, ते रडें बंद करून उगी राहिले म्हणजे त्यांस ती वस्तु द्यावी. आईबाप संपन्न असले तरी त्यांच्या संपन्नतेचें वारें त्यांच्या लेकरांना लहान वयांत लागूं देतां कामां नये. मुलांनी कांहीं वाईट गोष्ट केली असतां त्यांचा निषेध अवश्य करावा. त्यांचे भलतेच लाड करूं नयेत.

मुलांच्या जोपासनेसाठीं जे नोकरचाकर ठेवावयाचे, आणि त्यांच्या शिक्षणासाठी जे शिक्षक ठेवावयाचे, ते चांगले सौम्यवृत्तीचे व शांतिप्रिय असावे. कारण मुलांची वृत्ति एकाद्या लतेप्रमाणें कोमल असल्या कारणानें ती ज्याच्या साहचर्यानें असते, त्याचा आश्रय करून वाढून केवळ तन्मय होऊन जाते. पुष्कळ मुलांच्या ठायीं त्यांच्या चाकरमाणसांचे व त्यांच्या गुरूंचे गुण आणि चालचलणूक हीं येतात. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता प्लेटो याच्यापाशीं एका गृहस्थानें आपला मुलगा विद्याभ्यासाकरितां नेऊन ठेविला होता. हा मुलगा या महागुरूच्या घरीं कांहीं वर्षे राहिल्यावर आपल्या पित्याच्या घरीं पुनः आला. तेथें त्यानें आपल्या बापाला एका नोकरास मोठ्यानें शिवीगाळ करितांना ऐकिलें. तेव्हां तो बापाला म्हणाला: 'हा असला प्रकार प्लेटोच्या हातून कधींही होत नसतों. तेथें असतां एक दिवस सुद्धां असले अपशब्द माझ्या कांनीं पडले

नाहीत.' या एका उदाहरणावरून सद्‌गुरूच्या उपदेशांचेही गृहशिक्षणापुढें कधीं कधीं मुळीच चालत नसतें हें चांगले ध्यानांत येण्याजोगे आहे. कारण मुलाला पुष्कळ दिवसपर्यंत आपल्या घरांतील आईबाप वगैरे माणसांचा सहवास घडून, त्यांच्या मनांवर पुष्कळ बरेवाईट संस्कार घडल्यावर मग त्यांची गुरूशीं गांठ पडते. हा गुरू कितीही कुशल असला तरी गृहशिक्षणानें मुलांच्या मनांवर घडलेल्या संस्कारांचें परिमार्जन पुढें होतां होत नाही. मुलांस जें अन्न खाऊ घालावयाचे, तें साधं असून मित असावें. त्याला जो कपडालत्ता द्यावयाचा, तोही फार मोठ्या किंमतीचा नसावा. ज्या दर्जाच्या मुलांबरोबर त्याला शाळेत वगैरे बसण्या हिंडण्याचा प्रसंग यावयाचा, त्यांच्या सारखा त्यांचा पोषाख असावा. नाहीं तर बाकीच्या मुलांचे कपडे साधे व गरिबीचे असून, त्यांचे कपडे बहुमोलाचे व मोठे इष्कीचे असले तर तेवढेंच त्याला गर्व वहाण्यास कारण व्हावयाचें. अशा प्रकारे इतर मुलांच्या बरोबरीचेच आपण आहों, त्यांच्यापेक्षा आपल्यांत कांहीं विशेष नाहीं, असें मानण्याची संवय मुलांला लहानपणापासूनच लागली असतां, पुढें त्यांची कोणीं बरोबरी करण्याचा प्रयत्न केला तरी त्याबद्दल त्याला फारसा राग येणार नाहीं.

◆◆◆

प्रकरण आठवें

चाकरांशीं कसें वर्तन ठेवावें

तुझ्याकडून जे येतात त्यांनीं मला वेळोवेळां सांगितल्यावरून मला असें कळले आहे कीं, तूं आपल्या चाकरांशी मोठ्या रहसाळीनें वागतोस. हें मोठें शहाणपणाचें काम आहे. यावरून तूं मोठा चतुर आहेस असें दिसतें. ते तुझे चाकर आहेत काय? नाहींत. ते इतर मनुष्यासारखें मनुष्य आहेत; किंबहुना ते तुझ्या कुटुंबांतील मनुष्य आहेत असें त्वां मानिलें पाहिजे. त्याला दैव प्रतिकूल असल्यामुळे ते तुझ्याइतके श्रीमान् नाहींत, इतकेंच काय तें. एरवी ते तुझे गरीब स्थितीतील मित्रच आहेत असें त्वां समजले पाहिजे. दैव अनुकूल असल्यामुळें त्यांच्या सारखी दुसऱ्यांची सेवा करण्याचा तुला प्रसंग आला नाही. एवढ्यावरून त्वां फुगून जाऊं नये. कदाचित् दैव प्रतिकूल होऊन सांप्रतच्या ऐश्वर्यास मुकून तुला त्यांच्या सारखीच कोणाची तरी सेवा करण्याचा प्रसंग येणार नाहीं कशावरून? यास्तव जे कोणी आपल्या सेवकजनांस पंक्तीस घेऊन जेवावयास बसण्यांत कमीपणा मानितात, त्यांचें मला हसूं येतें. असें त्याला कां वाटतें म्हणून विचारशील तर धन्याच्या पंक्तीस बसून चाकरानें जेऊं नये अशी जनरूढी आहे एवढेंच ते कारण सांगतील. हे असे अभिमानी दौलतवान् लोक भोजनास बसले म्हणजे त्यांचा थाट पाहावा. त्यांच्या शुश्रूषेस चाकरमाणसें अगदीं तत्पर हो. ऊन त्यांच्या आसमंतात भागीं खडा पाहरा करीत असतात. हे राजश्री नाना परींचीं पक्वान्ने खूप रगडून झोडीत असतां, बापड्यांनी त्यांच्याकडे टकटकां पाहत जिकडेतिकडे गुपचूप उभें रहावें, आणि त्यांस लागेल तो पदार्थ पुरवावा. अशा थाटानें ते जेवीत असतां कोणी चाकर खोकला, किंवा शिंकला तर त्याला एकादी लात किंवा बुकी मिळावयाची! कोणीं एकादा शब्द चुकून बोलला तर त्याला लागलीच जबर दंड व्हावयाचा. कधीं कधीं तर हे रावसाहेब मध्यरात्र उलटून जाईपर्यंत मित्रमंडळीसह भोजनास बसून चंगळ उडवीत असतात. आणि बिचारे नोकर जिकडे तिकडे चित्रासारखे उभे राहून त्यांचा तो तमाशा मुकाट्याने पाहत असतात. भुकेनें त्याचीं खपाटें वळलेलीं असलीं तरी त्यांना तोंडांतून एक शब्दसुद्धा काढण्याची छाती नसते. परंतु अशा छांदिष्ट मनुष्याचे सेवक त्याच्या पश्चात् त्याची हवी तशी विटंबना करीत असतात. जे आपल्या नोकरांला आपल्या समक्ष बोलण्यासवरण्याची मुळींच कधीं बंदी करीत नाहींत, इतकेंच नव्हें तर जे त्यांच्याशी मन मोकळे करून निरनिराळ्या विषयांवर बोलतात, अशा धन्याचे सेवक त्यांच्यासाठीं आपले प्राणही देण्यास तयार होतात; इतकी त्यांची त्यांवर निष्ठा बसते. आतां हें खरें कीं, भोजनास बसल्यावर चाकरांस वाटेल तें बोलण्याची परवानगी दिली असतां, ते परस्परांशी बोलून पुष्कळच गोंगाट करितात. तरी पण त्यांच्यावर सक्ती करून त्यांची तोंडेंच मुळीं बंद करणें कांहीं योग्य नव्हे.

'जितके चाकर ठेवावे तितके शत्रु वाढविल्यासारखें होतें' अशी जी एक म्हण आहे ती कोणातरी गर्विष्ट मनुष्याने प्रचारांत आणिली असावी. खरें पाहता चाकरलोक कांहीं स्वभावतः आपले शत्रु नसतात. तर आपण आपल्या दुर्वर्तनामुळें त्यांस आपले शत्रु करीत असतो. त्यांना आपण किती अमानुष व निष्ठुर रीतीनें वागवत असतो तें तर येथें माझ्यानें लिहवत देखील नाहीं. त्यांची आपण निवळ पशूंत गणना करीत असतों. धनी भोजनास बसून मोठी चंमण मारीत असतां, त्यास लागेल तो पदार्थ पुरविण्यांत तत्पर असावें; त्यास कोणता पदार्थ आवडतो, त्याच्या मंदावत जाणाऱ्या क्षुधेचे उद्दीपन कोणत्या मसाल्यांनीं होऊन त्याच्या तोंडांत दोन घास अधिक जातील, याची काळजी बिचाऱ्या स्वयंपाक्यांस रात्रंदिवस लागलेली असते. ते प्रत्येक पक्वान्न फार जपून तयार करितात. त्यांत जरा कांहीं बिघडलें कीं त्यांच्यावर धन्याची इतराजी होऊन बिचाऱ्याला नोकरीस मुकण्याची पाळी यावयाची. नोकरांस बरोबर घेऊन जेवावयास बसले असतां आपला कमीपणा होईल असें ज्यांस वाटत असतें, अशा दिमाखखोर मनुष्यास माझें असें विचारणें आहे कीं, तुझी आणि ज्यास तूं आपले सेवक समजतोस त्यांची उत्पत्ति एकाच बीजापासून झालेली नाहीं काय? त्यांचा जीव तुझ्या जिवासारखाच असून, तुझ्याप्रमाणेंच त्यांचे श्वासोच्छ्वास नादि जीवितव्यापार चालून, शेवटीं ते तुझ्याप्रमाणेंच मृत्यु पावतात ना? आतां त्यांच्या अंगी सभ्यता कमी असते असें म्हणंशील तर तीही तुझी भ्रांति आहे. त्यांची स्थिति तुझ्यासारखी अनकूळ असती तर त्यांच्या अंगीं पुरी सभ्यता बाणली असती. दुसरें असें कीं, दौलतीच्या जोरावर जे धनाढ्य लोक आपल्या सेवकांशी असें दुर्वर्तन करीत असतात, त्यांची ती दौलत केव्हां नष्ट होईल याचा नेम नसतो. एकवेळ मोठे लक्ष्मीवान् असलेले लोक दैव प्रतिकूल होतांच भिकेस लागून अन्नासाठी दारोदार हिंडतांना आपण किती पाहतों बरें? एकदा धनीपणा भोगून त्यांस अशी पराधीनता प्राप्त झाली असतां त्यांची दैन्यावस्था काय सांगावी? तेव्हां जी स्थिति तुला कर्मधर्मसंयोगानें प्राप्त होण्याचा संभव आहे, त्या स्थितींत तुझे सेवकजन आज आहेत म्हणून त्यांचा धिक्कार करणें तुला युक्त नव्हे. नोकरांशी कसें वर्तन करावें याविषयीं मी येथें अधिक पाल्हाळ करूं इच्छीत नाहीं. आपण त्यांस फारच तुच्छ लेखीत असून, त्यांशीं मोठ्या दिमाखानें आणि निष्ठुरपणानें वर्तन करीत असतों. हें कांहीं चांगलें नव्हे. हेंच सारे माझ्या या संबंधाच्या बोधाचें सार आहे. तुझ्याहून जे कोणी श्रेष्ठ असतील त्यांनीं तुझ्याशीं जसे वर्तावें अशी तूं इच्छा करितोस, तद्वत् तूं आपल्या सेवकांशीं वर्तन ठेव. माझ्या सेवकांवर माझा पूर्ण अधिकार आहे; तेव्हां मीं त्यांच्याशीं कसेही वर्तन केले म्हणून काय झालें? असा विचार तुझ्या मनांत येईल तेव्हां तूं लागलीच असेही मनांत आण कीं, तुझ्याहून जो कोणीं वरचढ असेल, तोही तुझ्यावर ताबा चालवितांना असाच विचार मनांत आणीत असेल. परंतु तूं असें समजत असशील कीं, मी स्वतंत्र आहे; माझा कोणीं धनी नाहीं. यावर माझें असें म्हणणें आहे कीं, तूं तूर्त तरुण आहेस. पुढें कदाचित् तुला कोणाची तरी ताबेदारी करणें प्राप्त होईल. क्युबा, क्रिसस, दरायस बादशाहाची आई, प्लेटो, डाओजेनीस वगैरे माणसांस केवढ्या उतार वयांत दुसऱ्यांची ताबेदारी करावी लागली याची आठवण कर. यास्तव तूं आपल्या सेवकांशी ममतेनें आणि सौजन्यानें वर्तन कर. त्यांच्याशी मन मोकळे करून बोलत चालत जा. हरप्रसंगी त्यांची सल्लामसलत घे. त्याला पंक्तीस घेऊन भोजन करीत जा. परंतु असा बोध तुला मीं केल्याबद्दल मोठे कुलीन व सभ्य म्हणविणारे जन मला दोष देऊं लागतील. तें म्हणतील कीं, या बोधाप्रमाणें वागलें असतां आपला फारच कमीपणा व अवमानना होईल. परंतु अशांस माझें इतकेंच

विचारणें आहे कीं, याहूनही अत्यंत नीचपणाची व अनीतीची कर्मे करितांना त्याला कशी बरें लाज वाटत नसते? तीं कर्मे इतकी निंद्य असतात कीं, त्यांचा येथें उल्लेख करण्यासही मला संकोच वाटतो. आमच्या पूर्वजांचें आपल्या सेवकांशी कसें रहसाळीचें वर्तन असे याचा विचार अंमळ मनांत आण. त्यांचे सेवक त्यांस पितृतुल्य मानीत; आणि तेही आपल्या सेवकांस आपल्या अपत्याप्रमाणे लेखीत. ते आपल्या कुटुंबातलेच समजून त्यांच्यावर ममता करीत. त्यामुळें चाकर माणसांची त्यांवर पूर्ण श्रद्धा बसून, ते त्यांच्यासाठीं प्राणही देण्यास सिद्ध असत. ह्याप्रमाणें सेवकांचा मान होऊं लागला म्हणजे किती विश्वासाने व इमानानें ते आपल्या धन्याची सेवा करितात म्हणून सांगू? यासाठीं माझा तुला असा बोध आहे कीं, त्वां आपल्या सेवकांस आपल्या लेकरांप्रमाणे मानून त्यांला पंक्तीस घेऊन जेवीत जा. तूं म्हणशील कीं, गुराखी वगैरे ज्या सेवकांच्या नोकऱ्या अगदीं हलक्या प्रतीच्या आहेत, त्यांना मी वगळीन. पण ही तुझी भ्रांति आहे. त्यांची योग्यता जी गणावयाची ती त्यांच्या कामगिऱ्यांवरून नव्हे, तर त्यांच्या आचरणावरून होय. कारण आचरण जें आहे तें सर्वांच्या हातचे आहे. आपलें आचरण शुद्ध ठेवीन असें कोणी म्हटल्यास तें त्याला साध्य होण्याजोगे आहे. परंतु धंद्याची गोष्ट तशी नाहीं. तो ज्याला त्याला यदृच्छेनें प्राप्त होतो. मी अमुकच धंदा करीन आणि अमुक करणार नाहीं असा कोणाचाही नियम चालावयाचा नाहीं. दैवयोगानें त्याला जशी स्थिति प्राप्त होईल, तसा त्याला उद्योगधंदा मिळावयाचा. तुझ्या नोकरांपैकीं कित्येक जण तुझ्या दृष्टीनें तुझ्याबरोबर बसून जेवण्याला लायक नसतील. परंतु जे तुला आज तसे आहे तसे वाटत नाहींत, ते पुढें तसे कदाचित् होतील. हें लक्षांत आणून त्वां त्यांस आपल्या पंक्तीला घेण्यास काकू करूं नये. त्यांचें बोलणें चालणें घाणेरडे आहे असें तुला वाटत असल्यास त्यांचा तो दोष तुझ्यासारख्या चांगल्या. लोकांशी सतत बोलल्याचालल्यानें जाईल हें ध्यानांत ठेव. हे ल्युसिलिअसा, त्वां जे मित्र शोधावयाचे ते बाहेर बाजारांत किंवा दरबारांतच तेवढे शोधावे असें नाहीं. तूं मनावर घेशील तर ते तुला तुझ्या घरांत देखील आढळतील. मालमसाला कितीही चांगला असला तरी कारागीर चांगला कुशल नसल्यास त्याची माती होते. हें लक्षातं ठेवून तूं आपल्या नोकराशी चांगल्या रीतीनें वागून ते तुजवर प्रीति करितील असें कर; म्हणजे त्यांपैकीं कोणी तरी असा निपजेल कीं, तो तुझ्या जिवाचा मित्र होईल. एकाद्या मनुष्याची जी पारख करावयाची, ती जर कोणी त्याच्या पोषाखावरून किंवा त्याच्या ऐपतीवरून करूं लागला तर तो मोठाच मूर्ख समजावा. उदाहरणार्थ एकाद्या मनुष्यास घोडा विकत घ्यावयाचा असतां, तो त्याच्या अंगावरील जीन वगैरे सरंजामाकडेच पाहून त्याची किंमत करूं लागला तर त्यास आपण वेडा नाहीं काय म्हणणार? मनुष्याची पारख त्याच्या स्थितीवरून करणें बरोबर नव्हे. त्याची बाह्य स्थिति पाहतां, त्याला इतरांची परिचर्या करावी लागत असली तरी त्याचें मन बद्ध नसेल तर तो कोणाचा ताबेदार असला तरी त्यामुळें त्याची मानसिक अवस्था केवळ निर्बाध असेल. अगदीं स्वतंत्र असा या जगांत कोण आहे? कोणाची विषयवासना अनावर होऊन तो त्या वासनेचा अगदीं ताबेदार बनला असेल. कोणीं असा लोभी असेल कीं, त्या वृत्तीचा तो अगदीं गुलाम बनला असेल. महत्त्वाकांक्षा, संकटादिकांची भीति इत्यादि वृत्ति प्रबल होऊन त्यांचा तो दास झाला असेल. कोणा मनुष्यास मोठा अधिकार प्राप्त झाला असला तरी तो एकाद्या कुलटेच्या नादीं लागून तिचा बंदा बनलेला असेल. मोठ्या कुळांत उत्पन्न झालेले असे पुष्कळ तरुण पुरुष मी तुला दाखवीन कीं, जे नृत्यांगनांस मोहून जाऊन त्यांचे अगदीं मिंधे बनले आहेत. याप्रमाणें

कोणाचे ना कोणाचे तरी मुद्दाम दास बनलेले जन अत्यंत निंद्य होत. ह्या मुद्दाम पतकरलेल्या दास्यासारखें नीचत्व आणणारें दुसरे काहींही नाहीं. तेव्हां अशा छांदिष्ट व व्यसनी जनाचें बोलणे मनास आणून, त्वां आपल्या सेवकजनांशी अभिमान सोडून ममतेनें वागूं नये, हें कांहीं योग्य नसें. त्यांनीं तुझी भीति बाळगावी, त्यापेक्षां त्यांच्या चित्तांत तुजविषयीं पूज्यत्वबुद्धि वसावी हें युक्त होय, असें मी म्हणतो. याचा अर्थ जर कोणी असा समजत असतील कीं, मी सेवकांस हवी तशी स्वतंत्रता देऊं सांगत असून, धन्यांस त्यांच्या पदवी पासून खालीं ओढू इच्छीत आहे, तर हा त्यांचा भ्रम आहे. आपल्या सेवकानी आपणांवर प्रीति करावी असें ज्यास वाटत असेल, त्यानें हें ध्यानांत ठेवावें कीं, त्यांच्या मनांत आपणांविषयी भीति वसत असली तर तेथें प्रीतीला मुळींच अवकाश नसतो. यासाठी तुझे सेवक तुला भिणार नाहींत, असें करण्याविषयीं त्वां झटावे हें योग्य होय. त्याला एकाद्या अपराधाबद्दल शासन करण्याचा प्रसंग आला असतां, नुसत्या शब्दांपलीकडे दुसरी शिक्षा करूं नये. लाता, बुक्या किंवा फटके यांचा प्रयोग जें कोणी बहिरे व मुके असतील त्यांवर करणें योग्य होईल. सेवकांच्या ज्या अपराधांबद्दल आपणांस राग येतो, त्या सर्वांनीच म्हणजे आपलें नुकसान होत असतें अशातला कांहीं अर्थ नाहीं. परंतु आपला स्वभाव छांदिष्ट असल्यामुळें आपणांस त्यांचा येवढ्यातेवढ्यावरून मोठा राग येत असतो. आपल्या इच्छेप्रमाणें एकादी गोष्ट झाली नाही कीं लागलीच आपली मर्जी खप्पा होऊन आपण सेवकांवर दातओठ खाऊं लागतों; त्याला शिवीगाळ करितों; त्याला लाताबुक्या देतों. अशा समयीं आपण कोणीं मोठे राजेच आहों अशी घटकाभर आपली वृत्ति होऊन जाते. अशा लोकांना राजांची उपमा देण्याचे कारण असें कीं, राजांची कोणी यत्किंचित्ही आगळीक केली असतां, आपलें मोठे नुकसान झालें असें समजून ते तत्काळ रागास चढतात. वस्तुतः पाहता ते मोठे समर्थ असून इतर जन केवळ दुर्बल असतात. तेव्हां अशा दुर्बल जनांकडून त्यांचें फारसें नुकसान होण्यासारखें नसतें; पण ही गोष्ट ते रागाच्या भिरिरींत अगदीं विसरून जातात. कित्येक तर असे दुष्ट स्वभावाचे असतात कीं, त्याला आपलें सामर्थ्य किती आहे तें चांगले ठाऊक असतें. या गोष्टीचा त्यांना विसर असा कधींही पडत नसतो. तथापि ते जात्याच दुष्ट स्वभावाचे असल्यामुळें दुसऱ्यास दुःख देण्याचे एकादें निमित्त पाहत असतात. ही त्यांची वृत्ति अत्यंत गर्ह्य होय. पण या प्रकरणी येथें आणखी पाल्हाळ करण्याचें मला प्रयोजन दिसत नाही. कारण तूं सुज्ञ असून तुझे या संबंधाचे आचरण निर्दोष आहे हें मी जाणून आहें. ज्यांच्याठायीं सदाचारप्रवृत्ति पूर्णपणें विकसित झाली असते, त्यांच्याठायींची ही सहसा बदलत नाहीं. ती सर्वदा स्थिर रहाते. दुराचारप्रवृत्तीचें असें नाहीं. ती वेळोवेळां बदलत असते. ती बदलून म्हणजे नेहमी चांगली होतेच असें मात्र कोणी समजू नये.

◆◆◆

प्रकरण नववें

खरी थोरवी

तूं जें मजपाशीं गाऱ्हाणे करितोस कीं निसर्ग आणि दैव हीं दोन्हीं मला प्रतिकूल झालीं आहेत, त्यावरून तूं आपल्या मनाचा भित्रेपणा मात्र व्यक्त करीत आहेस. या क्षुद्र वृत्तीचा त्याग करशील तर तुला अत्युच्च सौख्य प्राप्त होण्याजोगे आहे. ज्ञानाचें सामर्थ्य असें विलक्षण आहे कीं, त्याच्यापुढे उच्चकुलोप्पत्ति किंवा मोठी धनाढ्यता यांची कांहींच मातबरी नाहीं. या लोकीं कोणी केवढ्याही दर्जाचा असला तरी मरणोत्तर त्याची गति सारखीच व्हावयाची. तूं आपल्या उद्योगबलेंकरून रोमन सरदाराच्या पदवीस पोचला आहेस. परंतु हा तुझा दर्जा सर्वांसच प्राप्त होण्याची मुळींच शक्यता नाहीं. राजदरबारांत साऱ्यांचाच प्रवेश होत नसतो. त्याचप्रमाणें लष्करांतही जी बढती मिळत असते, ती फारच थोड्यांला मिळण्याचा संभव असतो. ती मिळण्यास योद्ध्याच्या अंगीं कांहीं विशेष गुण असावे लागतात. पुन: ती प्राप्त करून घ्यावयास पुष्कळ जिवापाड श्रम करावे लागतात. परंतु सुस्वभाव आणि सद्वृत्ति हीं सर्वांस साध्य होण्यासारखीं असतात. यांच्या प्राप्तीने आपणा सर्वांस थोर होतां येतें. ज्ञान जें आहे तें एकास अनुकूल होतें आणि दुसऱ्यास प्रतिकूल होतें असें कदापि घडत नसतें. सॉक्रेटीस कांहीं मोठ्या खानदानीच्या कुळांत जन्मला नव्हता. क्लिआंथीस तर आपल्या हातानें पाणी काढून बागांतील झाडास घालीत असे. प्लेटो कोणी मोठा थोर पुरुष होता ह्यणून त्याला ज्ञानदेवतेनें माळ घातली होती असें नाहीं, तर ज्ञान संपादनाच्या योगानें त्याच्याठायीं खरी थोरवी आली. अशा महापुरुषांची उदाहरणे त्वां लक्षांत आणून निराश होतां कामा नये. तूं ज्ञानाची कास धरिशील तर तूही त्यांच्या सारखाच होशील. या सत्पुरुषांस अनुरूप असें तूं वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करिशील तर तुझे ते पूर्वज होते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं; आणि सदाचाराच्या योगानें जी थोरवी प्राप्त होण्यासारखी असते, तिच्या संबंधानें तुजहून दुसरा कोणीही वरचढ होण्याचा संभव नाही अशी तुझ्या मनाची पूर्ण खात्री होईल. तर यापूर्वी होऊन गेलेल्या सत्पुरुषांचे तूं अनुकरण करून त्यांस अनुरूप असें आपलें आचरण ठेवण्यास मनापासून झट. प्लेटो म्हणतों, 'असा कोणताही राजा नाहीं कीं, ज्याचा कोणी तरी पूर्वज एक वेळ दास होता; आणि असा कोणीही दास नाहीं कीं ज्याचा पूर्वज राजा नव्हता.' या मानवी संसारामध्यें सर्वदा एकसारखा असा विलक्षण पालट होत आहे कीं, रावाचा रंक व रंकाचा राव होण्यास मुळींच उशीर लागत नाहीं. यावरून पाहतां खरा सभ्य व कुलीन कोण बरें? माझ्यामतें ज्याच्या ठायीं सदाचारप्रवृत्ति अढळ झाली आहे, तो सभ्य समजावा. याहून दुसरी सभ्यतेची कसोटी कोणतीही नाहीं. ह्या कसोटीव्यतिरिक्त पाहतां, सर्व मनुष्य केवळ सारखेच समजावयाचे. जगाच्या आरंभापासून

तों आज दिनपावेतों मनुष्य सदाचाराच्या योगानें थोर पदवीस चढला आहे, आणि दुराचाराच्या योगानें नीच स्थितीप्रत पावला आहे. बाह्य थाटमाट किंवा वैभव जें आहे तें केवळ व्यर्थ होय. त्याच्या योगानें मनुष्यास खरा थोरपणा प्राप्त होत नाहीं. तर खऱ्या थोरपणाचे अधिष्ठान आपल्या अंतर्यामी आहे. आपण कितीही हीन स्थितीमध्ये असलों तरी हा मनाचा मोठेपणा आपणांस साध्य होण्यासारखा असतो. अशी कल्पना कर कीं, तूं सरदाराच्या कुळांत जन्मलास नसून एकाद्या सामान्य दरजाच्या कुळांत तुझें जन्म झालें असतें, तरी तूं आपल्याठायींच्या सदाचाराच्या योगानें सर्व कुलीन लोकांहून सुखी व स्वतंत्र झाला असतास. परंतु हें होईल कसें? असा तूं मला उलट प्रश्न करशील. याला माझें उत्तर असें आहे कीं, तूं लोकाचाराची मुळीच परवा केली नाहींस तर तुला या मानसिक थोरपणांतच सौख्य वाटेल. साधारण लोकांची समजूत पाहतां, ते बाह्य स्थितीवरूनच एकाद्यास उच्च किंवा नीच मानीत असतात. निःसीम सदाचार ज्याच्याठायीं बिंबला असतो, त्याला पुनः दुराचारांत निमग्न होण्याची भीति नसते खरें सौख्याचे जीवन काय तें याच अवस्थेंत संभवतें. या संसारांत आपली चुकी मिळून एवढींच होते कीं, ज्या गोष्टी सुखास साधनीभूत असतात, त्यांवरच आपण सुखाची कल्पना करितों. यामुळें असें होतें कीं, आपण सुखाच्या प्राप्तीसाठीं जितका अधिक प्रयत्न करितों, तितके तें आपणास अधिकच दुरावते. खरें सौख्य म्हटलें म्हणजे त्यास कशाचाही धोका नसावा; आणि त्याविषयी बेभरंवसा असा कदापि नसावा. परंतु हा सौख्यप्राप्तीचा मार्ग चुकून जन आडमार्गांत शिरल्यामुळे त्याला अनेक कारणांनी नेहमी काळजी लागली असतें. त्यांची जीवितयात्रा मोठी धोक्याची होऊन, त्यांला हें ऐहिक जीवन मोठे कष्टप्रद होतें; किंबहुना तें तसें होण्यास ते स्वतःच कारण होतात. याप्रमाणें जो अनिष्ट परिणाम टाळण्यासाठीं ते एवढी खटपट व घाई करितात, त्यांतच ते अधिकाधिक गुरफटून जातात; ते इतके कीं, त्यांतून बाहेर पडण्याचा त्यांस मार्गच मुळीं मिळेनासा होतो.

◆◆◆

प्रकरण दहावें

प्रवासाविषयीं

मी हल्लीं नामेन्टनम् येथील माझ्या शेतवाडीस येऊन राहिलों आहें. मी येथें कां आलों म्हणशील तर शहरांतील लोकांचा मला त्रास आला म्हणून नव्हे. परंतु मला ज्वर येण्याचा सुमार दिसला, किंबहुना त्याची बहुतेक चिन्हे माझ्याठायीं दिसूं लागली म्हणून मी शहरांतून पळालो. ही ज्वराची चिन्हें दिसू लागतांच मी आपली गाडी तयार करण्यास नोकरांला सांगितले. माझ्या वैद्यानें माझी नाडी पाहून म्हटलें कीं, ती चांगली चालावी तशी चालत नसून ज्वरास आरंभ झाला आहे. तरी मीं तत्काळ निघण्याचा निश्चय केला. कारण मला त्यावेळीं गालिओची उक्ति आठवली. तो आकेआ येथें असतां त्याला ताप भरला. तेव्हां तो म्हणाला कीं, मला हा जो ताप आला आहे, तो या प्रांताच्या हवेमुळें होय. माझ्या देहांत कांहीं बिघाड झाल्यामुळें नव्हे. ही गोष्ट मीं माझ्या स्त्रीला सांगितली. तेव्हां ती म्हणाली कीं, तुमच्या आरोग्याचें जेणेंकरून रक्षण होईल तें तुम्हीं करावें. माझ्यावर तिचें निष्कपट प्रेम असल्या कारणानें मला कांहीं बरेंवाईट झालें असतां, ती तत्काळ अस्वस्थ होते. यासाठी तिचे आरोग्य चांगले रहावे म्हणूनच केवळ मी आपल्या प्रकृतीची काळजी घेत असतो. माझ्या वार्धक्यामुळें मी पुष्कळ अडचणींपासून मुक्त झालो आहें. तथापि माझ्या शरीरीं आराम नाहीं हे एक मला मोठेंच अरिष्ट वाटतें. माझ्या स्त्रीची मला सर्वदां अशी विनंति असते कीं, म्यां आपल्या प्रकृतीची विशेष काळजी घ्यावी. या तिच्या प्रेमाच्या विनवणीस्तव मीं आपल्या प्रकृतीस एवढा जपत असतों. एरवीं मला आतां माझ्या प्रकृतीची मुळींच परवा नाहीं. आपणांवर ज्यांचें निष्कपट व सांद्र प्रेम असतें, त्यांच्या त्या प्रेमास मान देऊन त्यांस संतोष वाटेल अशी वागणूक आपण ठेवणे योग्य होय. आपल्या प्रिय मित्रांसाठीं आपण आपलें मरण जितके टाळवेल तितके टाळावें, हें आपलें कर्तव्य आहे असें मी समजतों. आतां याप्रमाणें मृत्यूशी झगटण्यांत आपणांस पुष्कळ क्लेश सोसावे लागतात हें खरें आहे. तथापि हे क्लेश आपल्या प्रिय मित्रांप्रीत्यर्थ आपण सहन करणें योग्य होय. कारण आपणांस वाटेल तितके दिवस आपण जिवंत राहू असें सदाचारी मनुष्याने म्हणतां उपयोगी नाहीं. तर त्यानें जितके दिवस या लोकीं रहाणें योग्य आहे, तितके दिवस तो जगला पाहिजे. जो कोणी आपल्या प्रिय स्त्रीची किंवा मित्रांची बिलकुल परवा न करितां आपल्या जीविताचा अंत करूं पाहतो, व आपणास मरण यावें अशी प्रति क्षणीं इच्छा करितों, तो मोठाच दुर्बल समजावा. आपण आपल्या जिवाशी सर्वदा असा संकल्प करावा कीं, या जीविताचा आपणांस कितीही कंटाळा आला असला, किंवा त्याविषयी आपल्या मनांत कितीही उत्कट औदासिन्य वसत असले, तथापि आपण जगल्यानें आपल्या मित्राचे प्रिय होण्यासारखें

असल्यास आपण मरण टाळण्यास झटूं. आणखी असें कीं, आपण अगदी वृद्ध झालों असूनही जर करितां आपल्या एकाद्या मित्रास आपल्यापासून फायदा किंवा सुख होत असेल, तर ह्या वार्धक्यावस्थेंत अगदीं बेताबातानें वागून प्रकृतीस मनापासून जपणें योग्य होय. पुनः वृद्धपणी आरोग्य असण्यांतही मोठा फायदा व आनंद आहे. एकाद्या मनुष्यावर जर त्याच्या पत्नीचें सांद्र प्रेम असलें, तर त्यासारखें समाधान दुसऱ्या कोणत्या गोष्टींत आहे बरें? ह्या तिच्या अत्युत्कट प्रेमास्तव तो आपल्या प्रकृतीस पुष्कळ जपू लागला तर तो त्याचा दोष आहे असें कोण म्हणेल? माझी पालिना तर मजविषयीं सर्वदा चिंताक्रांत असते; आणि तिच्यामुळे मलाही माझी भीति वाटत असते. आतां मीं खेड्यांत जाऊन राहिल्याने माझा काय फायदा झाला म्हणशील तर मी रोमनगरीची कुंद व घाणेरडी हवा सोडून निघतांच माझा स्वभाव पालटल्या सारखे मला वाटलें. मी आपल्या शेतवाडीतील घरीं येऊन पोचली तेव्हां माझी शक्ति किती वाढली म्हणून सांगू! मी येथें येऊन पोचताच मला अशी तीव्र क्षुधा लागली कीं, मला केव्हां भोजन मिळतें असें होऊन गेलें. याप्रमाणें तूर्त माझी प्रकृति चांगली ताळ्यावर आली आहे. माझी विकृति पार नाहींशी होऊन मला पुष्कळ आराम वाटत आहे; आणि मी आपला अभ्यास पुन: नेटाने करूं लागलो आहे. परंतु हें स्थळ अभ्यासास हवे तसें अनुकूल नाहीं. ज्याच्या मनाचा जोम कायम असतो, त्याला कोणतेंही संकट किंवा दगदग प्राप्त झाली तरी त्याला तिचें काहींएक वाटत नसतें. तो जाईल तेथें त्याला आपलें मन एकाग्र करितां येतें. परंतु ज्याचे मन दुर्बल झालें असतें, त्यानें अभ्यासासाठी कितीही चांगले स्थल निवडून काढलें, आणि सर्व त्रासापासून तो कितीही मुक्त झाला असला, तथापि, तो जाईल तेथें त्याच्या मनाच्या स्वास्थ्यास विघात करणारें कांहीं ना कांही आढळेल. सॉक्रेटिसापाशीं एक गृहस्थ येऊन अनुतापपूर्वक बोलूं लागला कीं, 'मीं इकडूनतिकडे भटकण्यांत व्यर्थ काळ दवडिला. त्यापासून माझा काहींएक फायदा झाला नाहीं.' यावर सॉक्रेटिसनें असें उत्तर केले कीं, 'अशी तुझी अवस्था झाली यांत मुळींच नवल नाही. कारण तूं आपलें मन बरोबर घेऊन हिंडलास; तें कांहीं तुला कोठे ठेवून जातां आलें नाहीं.' पुष्कळ लोकांची अशीच अवस्था असते. त्याची मने विकृत असल्यामुळें ते दुःख भोगीत असतात. त्यांच्या मनांच्या दुर्बलतेमुळे त्याला चिंता व भीति हीं वाटत असून, त्यांच्या हातून अनन्वित कर्मे घडत असतात. अशा मनाचे लोक मोठमोठे समुद्र ओलांडून पलीकडच्या देशी गेले, किंवा शहरोशहर व गावोगावी हिंडले तर त्यापासून त्यांचें काय हित होणार आहे बरें? ज्या गोष्टींमुळें तुला त्रास होत असेल, त्यापासून तुला मुक्त व्हावयाचें असल्यास तूं त्यांपासून पळून दुसऱ्या जागी जाण्यांत कांहींच अर्थ नाही; तर त्वा आपल्या मनाचा कां पालट केला पाहिजे. तूं अथेन्स, रोड्स किंवा दुसऱ्या कोणत्या तरी नगरीत गेलास तरी तेथल्या लोकांच्या चालीरीतींचा तुला काय उपयोग? तू तेथें जाऊन राहिलास तरी तुझी चालचलणूक जी आहे तीच कायम रहाणार. धनसंपदा जवळ असल्यानें मोठे सौख्य प्राप्त होतें असें तुझे मत असलें तर दारिद्र्यमूलक दुःखाचा अनुभव तुला सर्वदां घडेल. कारण तुजपाशी पुष्कळ दौलत असली तरी दुसऱ्याची दौलत आपल्यापेक्षा अधिक आहे असें पाहून, त्याच्या इतकी आपली दौलत व्हावी अशी इच्छा तुला होईल; आणि तेवढ्या मानानें आपण दरिद्री आहों असें तुला वाटेल. पुनः अशी कल्पना करूं कीं, मोठमोठ्या मानाच्या पदव्या मिळाव्या यांतच मोठे सौख्य आहे असें तुला वाटत आहे. तर दुसऱ्या कोणांस मोठ्या मानाचा अधिकार मिळालेला पाहून तुला वाईट वाटेल. दुसऱ्याची मानमान्यता होऊन सर्वत्र कीर्ति पसरलेली पाहून तुला मोठें

दुःख होईल. तुझी महत्पदप्राप्तीची इच्छा इतकी उत्कट होईल कीं, दुसरा आपल्याहून श्रेष्टपदास पोंचलेला पाहून तुला मोठा त्वेष येईल. परंतु आपण किती जणांहून वरचढ आहों याचा विचार तूं काहीच करणार नाहींस. आतां तुला मरण प्राप्त होणे हें अत्यंत मोठे अनिष्ट वाटत असल्यास एकादा संकटप्रसंग आला असतां, किंवा तो प्राप्त होण्याचा संभव असल्यास तूं अगदीं घाबरून जाशील. ध्यानीं मनीं स्वप्नी मरणभीति वसल्यामुळें तूं अगदी गांगरून जाशील. अशी तुझ्या मनाची अवस्था असल्यास तूं मोठमोठ्या शत्रूंच्या तावडींतून सुटून आपल्या घरीं स्वस्थपणे बसलास तरी तुला दुःख झाल्यावांचून रहाणार नाही. अशा प्रकारें मन जेव्हांतेव्हां अस्वस्थ झाल्यानें अगदीं खात्रीच्या गोष्टीविषयीं देखील तुझ्या मनांत भीति उत्पन्न होईल. याप्रमाणें भावी संकटांबद्दल आजच भीति बाळगीत बसण्याची सवय तुला लागली तर स्वास्थ्य व समाधान हीं तुला कदापि प्राप्त होणार नाहींत. कारण तूं दुःखाचे मूळकारण टाळण्याचे सोडून केवळ प्राप्त झालेलें संकट टाळण्याचा प्रयत्न करीत असतोस. परंतु वस्तुतः पाहतां, दुःखास पाठ द्यावी तितकें दुःख अधिकच पाठीस लागतें. ज्या मित्रांवर तूं प्रीति करीत असतोस, त्यां पैका एकादा गमावला असतां, आपली मोठीच हानि झाली असें तुला वाटेल. तरी अशा प्रकारें मित्रमरणास्तव शोक करणें हा मोठाच मुर्खपणा होय. आपल्या घराच्या आसपास असलेल्या शोभिवंत वृक्षांचीं पाने गळून पडली असतां एकाद्याने शोक केल्यास त्याला जसा आपण मूर्ख म्हणतों, तद्वत्च मित्रनाशाबद्दल शोक करणारासही म्हटले पाहिजे. वृक्ष जसा पर्णहीन असला तरी जिवंत असूं शकतो, तद्वत् आपला मित्र गत झाला तरी तो स्मृतिरूपानें जिवंत राहूं शकतो. आज जशी तुझ्या वृक्षांची पानें पिकून झडून पडतील, तसाच उद्या तुझा एकादा मित्र मरणवश होईल. ज्याप्रमाणें वृक्षांस पुनरपि नूतन पालवी फुटेल हे लक्षांत आणून, त्याची पिकलेली पाने गळली म्हणून आपण कष्टी होत नाहीं, त्याचप्रमाणें आपले जुने मित्र गत झालें तरी त्यांबद्दल आपण शोक करूं नये. तेच मित्र जरी आपणांस पुनरपि मिळाले नाहींत तरी दुसरे नवे मित्र आपणांस मिळण्याचा संभव असतो. दुसरें असें कीं, आपल्या वृत्तीत सर्वदा पालट होत असतो. प्रतिदिवशीं, प्रतिघटकेस आपल्या चित्तांत कांहीं ना कांहीं फेरबदल होत असतो. तेव्हां जी मनोवृत्ति आपली आज झाली आहे, ती सर्वकाळ कायम रहाण्याचा मुळींच संभव नाहीं. आणखी असें कीं, आपल्या स्वतांच्या आयुष्याचा क्षय प्रतिक्षणीं होत आहे. कित्येकांच्या आयुष्याचा क्षय त्वरित झाल्यामुळे आपल्याला तो तत्काळ दृष्टीस पडतो. पण हा क्षय प्रत्येकाचा अगदीं न समजतां एकसारखा होत चालला आहे. या गोष्टीचा त्वां अवश्य विचार करावा; आणि तुला ज्या प्रसंगामुळें दुःख होत असेल, त्याच्यापायी तूं हैराण होऊं नको. कोणत्याही गोष्टींची व्यर्थ आशा करीत बसू नको, किंवा त्या प्राप्त झाल्या नाहीत म्हणून निराश होऊं नको. सर्व चिंतेचे मूळ यांतच आहे. कोणत्याही गोष्टीची फाजील आशा बाळगू नको, तर तिच्या संबंधाने आपली थोडीबहुत निराशा होण्याचा संभव आहे हें ध्यानांत वागीव. त्याच प्रमाणें कोणत्याही गोष्टीबद्दल निखालस निराश असें कदापि होऊं नको. तिच्या संबंधानें कांहीं तरी आशा बाळगणे रास्त होय. याप्रमाणें आशा व निराशा यांचें मिश्रण सर्वदा अंतर्यामीं वसूं द्यावे.

नुसत्या प्रवासानें कोणाचा कांहींएक फायदा व्हावयाचा नाहीं. प्रवासाच्या योगानें आपल्या विषयासक्तीस आळा पडतो, किंवा वासना आवरितां येतात अशातला कांहीं अर्थ नाहीं. त्याच्या योगानें आपल्या संतापाची कारणे कांहीं दूर होत नाहींत. त्याच्यायोगानें प्रेमपात्र जनांचा मोहपाश तुटत नाहीं. सारांश काय

कीं, प्रवासाच्या योगानें मनुष्याच्या मनातील पापवासनेचें निर्मूलन होत नाहीं. त्याच्या योगानें आपली विवेकशक्ति कांहीं वाढत नाही, व आपल्या श्रमाचा निरास होत नाहीं. प्रवासामुळें इतका मात्र फायदा होतो कीं, नवे प्रांत, अपरिचित लोक, विचित्र देखावे यांच्याकडे मन लागून कांहीं वेळ करमणूक होते. मुले जशी एकादी अपूर्व गोष्ट दृष्टीस पडली म्हणजे तिकडे टकमका पाहत उभीं रहातात, तद्वत् आपली अवस्था होते, इतकेंच कायते. प्रवास करण्याचा नाद लागल्याने चित्ताची चंचलता मात्र वृद्धिंगत होते. याप्रमाणें चित्तचांचल्य वाढल्यानें कोणत्याही गोष्टीचा पुष्कळ वेळपर्यंत नीट विचार करण्याचें सामर्थ्य नाहींसें होतें. चित्ताची अस्थिरता व उतावळेपणा हीं तर इतकी वाढतात कीं, मन एकाच जागी फार वेळ रमत नाहीं. प्रवासप्रिय जन एकाद्या गांवीं येऊन पोंचले नाहींत तों लागलीच तेथून केव्हां जाऊं असें त्यांस होऊन जातें. स्थलांतर करणाऱ्या पक्ष्याप्रमाणें त्यांची अवस्था असते. आज या गांवी भरारी मारिली तर उदयिक दुसऱ्याच गांवाकडे मोरच्या फिरविला. असे ते सतत परिभ्रमण करीत असतात.

प्रवासाच्या योगानें निरनिराळ्या राष्ट्रांची माहिती होते. या भूतलावरील कित्येक अद्भुत देखावे आणि विचित्र सृष्टिसौंदर्य हीं प्रवासाच्या योगानें दृष्टिगोचर होतात. परंतु अशा प्रवासांनी म्हणजे प्रकृति सुधरेल, किंवा शहाणपण वाढेल असें म्हणतां येत नाहीं. ज्या ज्ञानाची चाड आपणास अवश्य असली पाहिजे, आणि जें आपणांस अद्यापि प्राप्त झालें नाहीं, त्याची प्राप्ति आपणांस करून घेणें असेल, तर आपण तें सतत विद्याभ्यासाच्या योगानें व ज्ञानी पुरुषांनी लिहून ठेवलेल्या हे महान् महान् ग्रंथांचें दीर्घकाळपर्यंत परिशीलन करून मिळविलें पाहिजे. या व्यासंगांत आपण आपलें सारें आयुष्य वेंचणें योग्य होय. अशा दृढ अभ्यासाच्या योगानें आपल्या मनाचें दुर्बलत्व नाहींसें करून पराधीनतेपासून त्याचें मोचन करावें. कोणत्या गोष्टीचा परित्याग करावा व कोणत्या गोष्टीचे अवलंबन करावें, त्याचप्रमाणें कोणती गोष्ट आवश्यक आणि कोणती अनावश्यक आहे, कोणती न्याय्य व प्रामाणिकपणाची आहे व कोणती या उलट आहे याविषयीं जोपर्यंत तुझ्याठायीं अज्ञान वसत असतें, तोपर्यंत तुजकडून योग्य प्रकारें प्रवास घडला असें कदापि म्हणतां येणार नाही. तर तूं केवळ इकडून तिकडे भटकलास असें म्हणावे लागेल. अशा रीतीनें प्रवासाची दगदग करून तुझ्या चित्तास यत्किंचित्ही समाधान प्राप्त व्हावयाचें नाहीं. कारण तूं जिकडेतिकडे जाशील तिकडे तिकडे तुझ्या वृत्ति व तूं केलेलीं कुकर्मे तुजबरोबर यावयाचीं. तीं जशीं काय तुझ्या पाठुंगळीस चिकटलीं असतात. त्यांच्या ओझ्याखाली तूं दडपून जाऊन अगदीं जेरीस येशील. अशा प्रकारे ज्याचे चित्त अस्वस्थ झालें असतें. तो मनुष्य कितीही सधन असला तरी त्यास स्थलांतर करून काहीएक फायदा व्हावयाचा नाहीं. तर मानसिक व्याधि दूर करणारे औषध त्यानें प्रथम शोधिलें पाहिजे. कोणाचा एकादा पाय मोडला असतां, किंवा त्याचा दुसरा एकादा अवयव बिघडला असतां, तो बरा व्हावा या हेतूनें तो लागलीच गाडींत बसून किंवा तारवावर चढून कोठें तरी प्रवासास जावयास निघतो काय? नाहीं. तर तो आपल्या वैद्यास बोलावून आणितो, आणि जो कोणता अवयव बिघडला असेल, तो दुरुस्त करण्यासाठीं औषधोपचार सुरू करितो. अशीच अवस्था मनाचीही आहे. तें कोणत्या तरी कारणानें बिघडलें असलें, किंवा त्याला उद्वेग प्राप्त होण्यासारख्या गोष्टी आपल्या हातून घडल्या असल्या तर देशोदेशीं हिंडून त्यांस सुस्थिति प्राप्त होणे नाहीं. हे मानसिक रोग तर असे कांहीं दुर्धर असतात कीं, त्याचें निवारण इतस्ततः भ्रमण केल्याने सहसा होणारें नव्हे. दुसरें असें कीं, प्रवासाच्या योगानें कोणी मोठा वैद्य किंवा वक्ता होतो असेही म्हणतां येत

नाही. जिकडेतिकडे भटकत रहाणाराच्या हातून कोणतींही शास्त्रें किंवा कला यांचें अध्ययन व्हावयाचें नाहीं. तूं म्हणशील कीं, 'प्रवास केल्यांनें मनुष्याच्या अंगीं शहाणपणा नाहीं काय वाढत? हा एक वाढला तर पुरे आहे. इतर सर्वे प्रकारचें धन त्यापुढे कःपदार्थ आहे.' यावर माझें असें म्हणणें आहे कीं, तूं कितीही लांबचा प्रवास केलास, तरी वासना, दुर्वृत्ति व भीति यांपासून तूं कदापि मुक्त व्हावयाचा नाहींस. यांपासून मुक्त होण्याचा गुण एकाद्या दूरच्या स्थलांत असता तर सर्व लोक मोठमोठे जमाव करून त्या स्थलीं जावयास निघालें असते. तेव्हां तात्पर्य काय कीं, तूं जमिनीवरून किंवा समुद्रांतून प्रवास करीत असलास तरी जोपर्यंत या अनिष्ट मनोव्याधींचीं कारणें तुझ्याठायीं कायम असतात, तोपर्यंत त्या व्याधींपासून तुला पीडा होत राहील. प्रवासाच्या योगाने ज्या गोष्टी तूं टाळू पाहतोस, त्या तुझ्या बरोबरच असतात. तेव्हां त्यापासून तूं प्रवासाच्या योगानें मुक्त झाला नाहीस तर त्यांत नवल तें कोणतें? यासाठीं प्रथमतः त्वां आपल्या मनाची सुधारणा करावी. ज्या दुर्वृत्तींच्या व दुर्वासनांच्या ओझ्याने तूं त्रस्त झाला असतोस, तें त्वां फेकून द्यावें; आणि आपल्या सर्व तुष्णांस आळा घालावा. आपल्या हृदयांतील सर्व दुर्बुद्धीचें निर्मूलन करावें. तुझा प्रवास तुला आनंदजनक व्हावा असें वाटत असल्यास तुझ्याबरोबर प्रवास करणाऱ्या सोबत्यांसही त्वां अवश्य सुधरावें. तूं लोभी व नीच सोबत्यांच्या संसर्गानें असशील तोपर्यंत तुझ्याठायीं लोभवृत्ति कायम राहील. तूं गर्विष्ठ मनुष्याशी बोलण्याचालण्याचा क्रम ठेविशील तोपर्यंत तुझ्याठायींचा ताठा कदापि कमी व्हावयाचा नाही. सर्वदा क्रूर कर्मे करणारांच्या सहवासाने तूं असलास तर तुझ्या अंगचा कठोरपणा तिलप्रायही कमी व्हावयाचा नाहीं. व्यभिचारी लोकांशी तुझी संगति घडली असतां, तुझ्याठायीं विषयवासनेचें उद्दीपन झाल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां तात्पर्य काय कीं, तुला सर्व प्रकारच्या दुराचारापासून निर्मुक्त व्हावयाचें असेल तर त्वां कुसंगतीचा सर्वथा त्याग करावा. असत्संगापासून उद्भवणाऱ्या अनर्थाचे वर्णन पुढील सुभाषितांत उत्तम प्रकारे केले आहे:-

पात्रमपात्री करुते दहति गुणं स्नेहमाशु नाशयति ।
अमले मलं नियच्छति दीपकज्वालेव खलमैत्री ।। * सु.

लोभ, विषयासक्ति, क्रूरता, दंभ हे मोठे भयंकर शत्रु होत. यांच्या संसर्गानें तुझें अतिशयित नुकसान व्हावयाचें. पण हे शत्रु तर तुझ्या अंतर्यामीं वास करीत आहेत. हे उद्दाम न व्हावे यासाठीं त्वां सत्संग करावा. सज्जनाच्या संगाने आपल्याठायीं निरनिराळ्या सद्वृत्ति उत्पन्न होण्याचा संभव असतो. हरएक बऱ्या वाईट प्रसंगीं कसें वर्तन करावें हें साधुजनांच्या सहवासानें चांगले कळतें. प्राप्त झालेल्या नानानुसारें कसें वर्तन करावे, मरणादि घोर प्रसंग आले असतां आपलें धैर्य कसे अढळ राखावे, मोठी विद्वत्ता संपादन करून, वक्तृत्वशक्तीचे शुष्क प्रदर्शन करून, लोकांस गार करण्यापेक्षां स्वहृदय सुसंस्कृत करून, कोणताही कठीण प्रसंग आला तरी त्यास तोंड देण्याचें धैर्य आपल्याठायीं कसें विकसित करावे हें सज्जनसंगतीनें कळतें. साधुसंगाचें महात्म्य पुढील बोधवचनांत सुंदर रीतीनें सांगितलें आहे-

---

* खलांची मैत्री दिव्याच्या ज्योतीप्रमाणें पात्र म्हणजे जो योग्य आहे (पक्षीं भांडे) त्यास अपात्र म्हणजे अयोग्य (पक्षी घाणेरडें) करिते, त्याच्या अंगचा गुण (पक्षी वात) जाळून टाकिते, त्याच्याठायींचा स्नेह (पक्षी तेल) नाहींसा करिते, तो मनाचा निर्मळ असतां त्याच्याठायीं मला म्हणजे दोष (पक्षीं काजळ) उत्पन्न करिते.

बुद्धि वर्धयति श्रियं वितनुते वैदग्ध्यमामुंचति
श्रेयः पल्लवयत्सघानि दलयत्युन्मीलयत्युन्नतिम् ।
विज्ञानं परिशोधयत्युपचिनोत्युचैः कलाकौशलं
किं किं नारमते हरेरिव कथाजर्यं सतां संगतम् ।। * सु.

या दुःखमय आणि संकटप्रचुर संसारामध्ये ज्याला सुखाचा काळ जावासें वाटत असेल, त्यानें ज्या अनिष्ट गोष्टी पुढें घडावयाच्या त्यांची परवा करूं नये; आपला निश्चय सर्वदा अढळ राखावा. विपत्तिमुलक सर्व पीडा मोठ्या धैर्यानें सहन कराव्या. त्यामुळे कधीही घाबरून जाऊं नयें, किंवा चित्त व्यग्र होऊं देऊं नयें. निसर्गतः आपल्याठायीं धैर्याचे बीजारोपण झालें आहे. कांहीं प्राण्यांच्या अंगीं स्वभावतःच मोठा घातुकपणा असतो. कांहीं प्राण्यांच्याठायीं मोठा कावेबाजपणा असतो. कांहींकांच्या अंगीं भितरेपणा असतो. अशीच आम्हा मानवाच्या ठायीं मोठी तेजस्विता व धैर्य ही ठेविली आहेत. या वृत्तीच्या साहाय्यानें आपणांस सर्वदा व सर्वत्र मोठ्या प्रामाणिकपणानें व सरळपणानें वागता येतें. हे गुण अंगीं विकास पावले असतां, आपणांस कीर्तीव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीही चाड वाटत नाहीं. इतर सर्व गोष्टी त्यापुढें कस्पटासमान वाटतात. त्यांमुळे आपण कशाचीही भीति बाळगीत नाहीं, किंवा कसाही दुर्धर प्रसंग आला तरी त्यास हार जात नाहीं. हे गुण अंगीं असल्याने आपणांला कोणतीच गोष्ट असह्य वाटत नाहीं; आणि आपण कशाचेही अंकित होत नाहीं. घोर संकटें किंवा मृत्यु प्राप्त झाला असतां घाबरून जावे हें साहजिक आहे. परंतु त्यांचें वास्तविक स्वरूप जो स्पष्टपणें ध्यानांत आणील, त्याचें हें भयाचें काहूर तत्काळ विरून जाईल. केवळ अज्ञान तमामुळें आपणांस ह्या गोष्टी भयप्रद वाटतात. रात्रीच्या अंधारांत ज्या वस्तु भयंकर भासतात, त्या दिवसास पाहिल्या तर केवळ शुल्लक दिसतात, आणि त्यापासून आपण इतके घाबरल्याबद्दल आपलें आपणांसच हंसूं येतें. मृत्यु व इतर घोर प्रसंग हे वरवरून भयंकर दिसतात. तथापि ते लोकप्रवादास्तव जनांस तसे भासतात. हे ल्युसिलिअसा, अशा प्रसंगास जें भ्यावयाचे, तें त्यांत भिण्यासारखे तरी काय असतें याचा नीट विचार कर. मला पदोपदी असे लोक आढळतात कीं, त्यांच्या हातून ज्या गोष्टी घडण्याजोग्या नसतात, त्या ते मुळीं अशक्यच समजतात; आणि ते आह्यांला असा दोष देतात कीं, मानवी स्वभावास असह्य किंवा अशक्य अशा गोष्टींचा आम्ही जनांस बोध करीत असतो. परंतु माझा त्यांच्या सामर्थ्याविषयीं असा अभिप्राय आहे कीं, त्यांलाही मी सांगतों त्या गोष्टी करितां येतील. परंतु ते त्या करण्याचें मनावर घेत नाहींत इतकेंच काय तें. जे कोणी या बोधाप्रमाणें वर्तन करण्याचा निर्धार करितील, त्यांना तो मुळीच अशक्य वाटणार नाहीं. तो कानीं पडला असतां जितका त्यांस कठीण वाटतो, तितके तद्नुसार वर्तन करणे त्यांस कठीण जाणार नाहीं. हा बोध कठीण असतो, म्हणून तद्नुसार वागण्याचें आपणांस धैर्य होत नाहीं, असें कोणीं समजूं नयें; तर त्याप्रमाणें वागण्याचें आपणांस धैर्य होत नाहीं म्हणून आपणांस तो कठीण वाटतो. आतां या प्रकरणीं तुला उदाहरण हवें असल्यास सॉक्रेटिसाचें आहे. ह्या महासहनशील साधूवर

* साधुजनांच्या संगतीने बुद्धीची वृद्धि होते; ऐश्वर्याचें वर्धन होतें, अंगीं कुशलता येते, कल्याण वाढत जातें, पापबुद्धीचा नाश होतो, उन्नतीचा विकास होतो, सत्य ज्ञानाचा लाभ होतो. अंगी असलेल्या कलाकौशल्याचें खरें चीज होतं. ह्याप्रमाणें साधुसंगाच्या योगानें केवढे तरी फायदे होतात.

वाय ५३८-१७

मोठमोठे घोर प्रसंग गुदरले होते. पदरी दारिद्र्य तर अठराविश्वे होतें; आणि संसारासंबंधीं दुःखाचे ओझे त्याच्या शिरीं केवळ दुर्वह होतें. तो ज्या ज्या युद्धास गेला तेथें त्याला जिवापाड श्रम करावे लागले; आणि तो युद्धभूमीवरून जिवानिशीं सुटून घरीं आला तर तेथें त्याची स्त्री मोठी कृत्या असल्यामुळें त्याला सुख कसलें तें मुळीच लाभत नसें. त्याची स्त्री अशी तापट स्वभावाची व कजाग होती कीं, त्याचा एक दिवस देखील घरीं कलहावांचून जात नसे; अणि त्याची मुलेही मोठी उनाड असून त्याचें मुळींच ऐकत नसत. त्यांचा स्वभाव त्यांच्या आईसारखाच बहुतेक होता. यामुळें तो मोठ्या घोर रणामध्ये शत्रूंशी लढत असला, किंवा घरीं स्वस्थ बसून राहिला तरी त्याला दुःख व त्रास सारखाच होत असे. सत्तावीस वर्षेपर्यंत त्यानें हातीं शस्त्र घेऊन स्वदेशरक्षणासाठीं प्रयत्न केला. पण शेवटीं त्याच्या प्रिय देशास परतंत्रता प्राप्त होऊन, तो तीस जुलमी सरदारांच्या हातीं गेला. हे बहुतेक सारे सॉक्रेटिसाचें मोठे वैरी होते. त्याच्यावर आलेला शेवटला घोरप्रसंग म्हटला म्हणजे त्याजवर अत्यंत मोठ्या गुन्ह्याचा आरोप होऊन त्या साऱ्यांची शाबिदी झाली; आणि त्याला कारागृहवास प्राप्त होऊन अंतीं विषप्राशन करून मरावें लागलें. परंतु या सर्व गोष्टींमुळें सॉक्रेटिसाचें मन जरासुद्धा क्षोभ पावले नाहीं; आणि त्याच्या चर्येंत मुळींच पालट झाला नाहीं. ही त्याची शांत व स्थिरवृत्ति आमरण कायम राहिली. त्यानें आपल्या नांवाला डाग लागेल असें कोणतेंही कर्म कधीं केलें नाहीं. त्याला म्हणजे कधीं विशेष उल्हास वाटला, किंवा कधीं विशेष खेद वाटला असें मुळींच घडले नाहीं. त्याच्यावर इतके बरेवाईट प्रसंग आले, पण त्याच्या चित्ताची समता कधींही नष्ट झाली नाहीं. या प्रकरणी दुसरें उदाहरण हवें असल्यास केटोचें आहे. त्याच्यावर तर सॉक्रेटिसाहूनही दुर्धर प्रसंग आले. तरी त्याला त्यानें मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. शेवटीं त्याला मरण प्राप्त झालें. तथापि तो यत्किंचित्ही घाबरला नाही. या पुरुषाच्या चरित्रावरून असा बोध घेण्यासारखा आहे कीं, जो खरा धैर्यशाली पुरुष असतो, तो दैव कितीही प्रतिकूल झालें तरी कदापि डगमगत नाहीं. केटोचें सारें वय, देशांतल्या देशांत युद्धे चालली होतीं, त्यांत गुंतून गेले यावरून तुझ्या ध्यानांत येईलच कीं, सॉक्रेटिसाप्रमाणेंच यालाही पुष्कळ काळ परतंत्रतेंत काढावा लागला. त्याच्यावर बरेवाईट प्रसंग पुष्कळ गुदरले. परंतु त्याच्या वृत्तींत लवमात्रही पालट झाला नाहीं. सर्व प्रसंगीं त्याच्या चित्ताची स्थिरता व दृढ निश्चय ही तिळप्रायही ढळली नाहींत. सीझर आणि पाँपि या उभयतांमध्यें जबरदस्त विरोध माजून राहिला, तेव्हां कांहीं जणांनी सीझरचा पक्ष धरिला आणि कांहीं जण पाँपीकडचे झाले. परंतु केटोनें यांपैकी कोणाचाही पक्ष न धरिता केवळ राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे रक्षण करावें यासाठीं सैन्याची जमाजम केली. पुढें त्याच्या पक्षाचा मोड झाला तेव्हां त्यानें आपल्या पराजित सैन्यास आफ्रिकेच्या वाळवंटांतून पायीं चालवून नेले. कांहीं सैन्यास तर त्यानें आपला सारा गाशा टांकून द्यावयास सांगून वाळूच्या टेंकड्यांवरून नेलें. याप्रमाणे त्या वैराण मुलखांतून कूच करीत असतां; वाटेत त्याला तहान लागली तर कोसांचे कोस पाणी मिळण्याची मुष्कील पडे; आणि एकादे ठिकाणी पाणी सांपडलें तर आपल्या सर्व सैन्याचें पाणी पिऊन झालें म्हणजे मग शेवटी तो स्वत: पीत असे. याप्रमाणें कडक उनांतून व तापलेल्या रेतीवरून पाण्याचें हाल काढीत कूच करण्याची सवय त्यानें आपणा स्वतांस व आपल्या सैनिकास लाविली. त्याला अधिकार व मान हे किती तुच्छ वाटत असत, याचें तुला एकच उदाहरण सांगतो. त्याला ज्या दिवशीं अधिकारावरून काढिले, त्याच दिवशीं तो आपल्या मित्रमंडळीबरोबर मोठ्या आनंदानें खेळला. त्याला मोठ्या बलाढ्य पुरुषांचीही परवा वाटत नसें. याचे

प्रमाण तर त्यानें सीझर व पाँपि या उभय समर्थ पुरुषांशी विरोध केला यावरून स्पष्ट दिसत आहे. हे दोघेही पुरुष असे प्रबल होते कीं, त्यांशीं विरोध करण्याचें धैर्य कोणासही झालें नसतें. शेवटीं त्यानें देशत्याग करून आत्मघात केला. यावरून त्याला देशपार होणे व मृत्यु हीं किती तुच्छ वाटत होती हें उघड होत आहे. या पुरुषांइतके धैर्य व दृढनिश्चय हीं आपणांससुद्धां प्रात होण्याजोगी आहेत. हीं प्राप्त व्हावीं असें ज्यास वाटत असेल, त्यानें प्रथमतः सर्व विषयोपभोगांचा तिरस्कार केला पाहिजे. कारण विषयोपभोगांच्या योगानें मनास व शरीरास दुर्बलता प्राप्त होते; आणि विषयांचा जितका अधिक उपभोग घ्यावा, तितकी त्यांविषयीची इच्छा अधिकच वाढते. विषयोपभोगाप्रमाणेंच धनाचाही तिरस्कार केला पाहिजे. कारण धन परदास्य केल्यावांचून प्राप्त होत नसतें. यासाठीं सोने, रुपैं, रत्नें वगैरे जैं द्रव्य असल्यानें सुखाचा जीव विनाकारण धोक्यांत पडतो व निरंतरची चिंता लागून रहाते, त्याला शिवूं सुद्धां नयें. स्वातंत्र्य जें आहे तें कांहीं फुकाचें प्राप्त होत नसतें. त्याचें तुला महत्त्व वाटत असल्यास त्वां इतर सर्व वस्तु त्यापुढें क्षुल्लक गणल्या पाहिजेत.

◆◆◆

प्रकरण अकरावें

एकांतवासांत राहून कोणत्या प्रकारें काळ दवडावा

मनुष्याला संसाराची सर्व दगदग सोडून एकांत रहावयाचें असल्यास त्यानें आपला हा स्वस्थतेचा काळ अशा रीतीनें दवडावा कीं, त्याच्याकडून व्यक्तिमात्राचे व एकंदर जनसमाजाचें कायावाचामनेंकरून कांहीं ना कांहीं कल्याण होत असावें. राष्ट्रांतील निरनिराळे हुद्दे वहिवाटण्याची योग्यता तरुण पुरुषांच्या अंगांत आणून देण्याच्या कामीं झटणारे, किंवा गुन्हेगार व फिर्यादी यांचे पक्ष घेऊन खटले चालविण्यासाठी वकील तयार करणारे शिक्षक हे जसे जनसमाजाच्या उपयोगी पडतात म्हणावयाचे, तद्वत्च जे तरुण जनांस नाना परी बोध करून सन्मार्गास लावितात, तेही जनसमाजाच्या उपयोगी पडतात. तरुण जनांच्याठायीं सदाचार अगदीं बेताचाच असतो. त्यांस तो शिकविणे अवश्य होय. लोभ, महत्त्वाकांक्षा, विषयसुख इत्यादिकांमध्यें जे मग्न झाले असतात, त्याला हातीं धरून त्यांच्या त्या वाईट क्रमापासून त्यांस पराङ्मुख करणें इष्ट होय. अशा उद्योगांत जो एकांतवासी पुरुष गुंतलेला असतो, तो घरीं बसून जनहित करितो असें म्हणावयाचें. जो पुरुष तरुण जनांस पवित्रता, शहाणपणा, आचरणाची निर्दोषता, मरणाविषयींची बेपरवाई, सदसद्विवेकाची महती इत्यादिकांची ओळख करून देतो, तो राष्ट्रांतील मोठ्या निःपक्षपात न्यायाधीशांपेक्षांही थोर समजावा. यास्तव तूं जर आपला वेळ अभ्यासामध्ये घालविशील, आणि संपादिलेल्या ज्ञानाचा उपयोग जनांस करून देण्याचा क्रम ठेविशील, तर लौकिककामें मोठ्या दक्षेतनें करून ज्या मानाच्या पदव्या वगैरे तुला प्राप्त व्हावयाच्या, त्यांस तूं मुकलास असे तुझ्या मनांत कदापि यावयाचे नाहीं. अशानें तुझ्या चित्ताचा उद्वेग नाहीसा होऊन तुजपासून इतरांसही त्रास पोंचावयाचा नाहीं; आणि तुला पुष्कळ मित्र मिळून तूं चांगल्या लोकांस मान्य होशील. कारण जो पुरुष सदाचारी असतो, तो कितीही दरिद्री किंवा अकुलीन असला तथापि त्याचा सदाचार कदापि लोपावयाचा नाहीं. त्याचें तेज दूरवर फांकावयाचें; आणि हें तेज ओळखण्याची योग्यता ज्याच्या अंगीं असते. तो सदाचार प्रशंसनीय मानून त्याचें अवलंबन करण्यास सर्वदा झटतो. जो मनुष्य सभ्य जनांशीं बोलण्याचालण्याचें अगदीं सोडून देऊन एकएकटा रहातो, त्याचा एकांतवास मात्र अहितकर होय. अशा एकांतवासांत त्याच्याकडून कोणताच परोपकाराचा उद्योग होत नसतो. अशा एकांतवासी मनुष्यास या आपल्या स्थितीचा लवकरच कंटाळा येऊन, तो पुनः लौकिकांत वागण्याची इच्छा करूं लागतो. असा मनुष्य मग सामर्थ्य असल्यास घरें बांधण्याचे बेत धरितों जुनी घरें पाडून टाकितो. किंवा दुसरे कांहीं तरी फेरफार आपल्या वतनवाडींत करीत असतो. याप्रमाणे कांहीं ना कांहीं काम काढून तो चित्तास करमणूक करीत असतो, आणि कधींकधीं तर भलभलत्या फंदात पडून आपल्या काळाचा

अपव्यय करितो वस्तुत: पाहतां त्याला या आपल्या फुरसतीचा सद्व्यय करितां येण्यासारखा असतो. कधीं आपण आपला सगळा काळ कांहीं ना कांहीं उद्योग करण्यांत घालवितो. कधी आपण अगदीं स्वस्थ बसून असतो. कोणताच उद्योग आपणांस करावासा वाटत नाहीं. आपला सारा काळ अशा रीतीनें जात असतो की, तो आपण कसा घालविला याची आपणांस मुळींच आठवण नसते. अशा रीतीनें ज्या वृद्ध मनुष्यांचा काळ गेलेला असतो, त्यांच्यासारखें लाजीरवाणें जिणें कोणाचेंही नसेल. असा मनुष्य जगात पुष्कळ दिवस राहिल्याची निशाणी काय ती बालसफेती ही होय. आतां आपण लौकिक व्यवहार सोडून एकांतवास पतकरावयाचा तो सुमार पाहून पतकरिला पाहिजे. योग्य समय प्राप्त झाल्यावांचून लौकिकाचा त्याग करणें युक्त नव्हे. आपण व्यवहाराचा त्याग केल्यानें जनांत आपला दुर्लौकिक होतां कामा नये. जगाच्या व्यवहाराची दगदग याला सोसेना म्हणून हा संसार सोडून एकांतांत जाऊन बसला आहे अशी आपली बेअब्रू होऊं नये. समरभूमीवर मोड होण्याचा रंग आला असतां, खरे शूर वीर जसे शत्रूस पाठ न दाखवितां मागें पाय घेतात. त्याहूनही अधिक प्रशंसनीय असा आपला व्यवहारत्याग लोकांस भासणे उचित होय. या जगांतील व्यवहार असा कांहीं अनिश्चयात्मक व धरसोडीचा असतो कीं, त्यांत राहिल्यांने सदाचारी मनुष्याच्या हातून सत्कार्य घडण्यास कधींकधीं प्रत्यवाय येतो. तरीपण अशा प्रसंगीं त्यानें व्यवहारास पराङ्मुख होणें इष्ट नव्हे. त्यानें अंगीकारिलेला उद्योग सोडून देऊन पळून जाणें कांहीं योग्य होणार नाहीं. स्वरक्षणासाठीं तो कोठेही दडून बसला तरी त्याचा तेथें निभाव लागेल असें सहसा म्हणवत नाहीं. अशा मनुष्यानें व्यवहारांत राहूनच आपला उद्योग नेकीनें करावा. पण त्यांत आपला साराच वेळ मोडूं देऊं नये. तर त्यांतल्या त्यांत थोडीशी फुरसद साधून लोककल्याणाचें एकादें कृत्य त्यानें करीत असावें. त्यानें स्वदेशाच्या उपयोगी पडण्यात सर्वदा झटावें. देशाची बाजू राखण्यासाठीं त्याला युद्ध करण्याचा प्रसंग आला असतां, त्यानें खुशाल शस्त्र धारण करून शत्रूशी संग्राम करावा. देशकार्य करण्याची इच्छा मनांत धरून त्यानें एकादा लौकिक अधिकार मिळविण्याचीही इच्छा धरण्यास कांहीं हरकत नाहीं. संस्थानातील एकादी कामगिरी त्याला मिळाली नाहीं तरी वकिलीचा धंदा शिकून त्यानें लोकांस न्याय मिळवून देण्यास झटावें. बरें, हा धंदा चालविण्याची त्यास मनाई झाल्यास त्यानें आपल्या देशबांधवांस खासगी रीतीनें सल्लामसलत देऊन त्यांचे व्यवहार सुरळीत चालतील असें करावें. सारांश काय कीं, त्याच्या देहांत प्राण आहे तोपर्यंत त्यानें स्वदेशबांधवांच्या हितासाठी जें जें कांहीं करण्याजोगे आहे तें तें त्यानें करीत असावे. आतां हें त्याचें कर्तव्य केवळ एका विवक्षित नगरीपुरतेच आहे असें त्यानें समजता कामा नये. तर त्यानें हें सारे जग आपला देश असून, त्यांत रहाणारे एकंदर मानव आपले देशबांधव आहेत असें समजले पाहिजे.

अयं निज: परो वेति गणना लघुचेत्साम् ।
उदारचरितानां तू वसुधैव कुटुंबकम् ।। * सु.

या साधूक्तींतल्याप्रमाणें त्याचें वर्तन होणे इष्ट होय. याप्रमाणे त्याच्या कर्तव्याची मर्यादा विस्तृत होऊन त्याच्या सद्वर्तनास पुष्कळ अवकाश सांपडेल. तुला तुझ्या स्वतांच्या देशांत न्यायाधीशाचा हुद्दा प्राप्त झाला

* हा माझा हा परका असें मानणें हे क्षुद्रबुद्धि मनुष्याकडून घडते; जे थोर मनाचे पुरुष असतात, त्यांस ही सारी वसुधा आपलें कुटुंब आहे असें वाटतें.

नाहीं, किंवा तुला शहरांत राहून वकिलाचा वगैरे धंदा करावयास मिळाला नाहीं, किंवा शहराच्या व्यवस्थेत तुझें साहाय्य घेतलें नाहीं, तरी त्याबद्दल तूं कष्टी होऊं नये. परंतु तूं आपल्या स्वतांच्या अपराधामुळे मात्र या स्वदेशसेवेस मुकूं नये. कोणतीही सार्वजनिक कामगिरी बजावण्याचा प्रसंग आला तर तूं ती पतकरण्यास कांकूं करूं नये. स्वदेशाच्या रक्षणासाठीं तुला परकीयांशी समर करण्याचा प्रसंग आला असतां, आपणाला सेनापतित्व मिळाले नाहीं म्हणून तूं रुसून बसू नको. एकाद्या साधारण योद्धयाप्रमाणें तुला लष्करांत सामील व्हावें लागून अगदीं मागच्या रांगेंत राहून शत्रूशीं साम्ना करावा लागला तरी त्याबद्दल मनांत कांहींएक आणूं नको. तर कायावाचामनेंकरून देशरक्षणासाठी मोठ्या धैर्यानें झट. शत्रूशीं लढतांना तुझे दोन्ही हात तुटून तुला शस्त्रधारण करितां आलें नाहीं, तर समरभूमीवर मोठ्या धैर्यानें उभा राहून आपल्या पक्षाकडील वीरांना उत्तेजन दे. कदाचित् तुझी वाचा बंद झाली तरी आपल्या बाजूकडील लढवय्यांच्या पाठीशी मुकाट्याने उभा राहून त्यांस धीर दे, पण त्यांस समरांगणांत सोडून शत्रूस पाठ अशी सहसा दाखवू नको. जो खरा देशभक्त आहे, त्याच्या हातून स्वदेशरक्षणार्थ होणारा उद्योग कदापि व्यर्थ जावयाचा नाहीं; आणि तो कोणत्याही स्थितींत असला तरी हा स्तुत्य उद्योग त्याला करितां येण्यासारखा असतो. कित्येक दिव्य औषधें अशीं असतात कीं, त्यांच्या नुसत्या वासानें किंवा स्पर्शानें रोगांचा परिहार होत असतो. अशीच गोष्ट सदाचाराची आहे. सदाचारी पुरुष कोणत्याही अवस्थेंत असला तरी त्याच्या हातून सत्कार्य घडल्यावांचून रहावयाचें नाहीं. त्यास तुम्ही हवातसा प्रतिबंध करा, मोठी दहशत घाला, किंवा त्याला कारागृहांत नेऊन ठेवा, तरी तो सर्व ठिकाणीं नीतीनें वागून कांहीं ना कांहीं जनहित करील. तो कोणाच्या जुलमास, जाचास किंवा एकाद्या घोर प्रसंगास मुळींच जुमानीत नसतो.

आतां तूं असें म्हणशील कीं, जो मनुष्य लौकिकांत वागण्याचें सोडून देऊन आपले दिवस एकांतांत घालवीत असतो, तो कीतीही नीतीनें वागला तरी त्याचा अन्य जनांस फारच थोडा उपयोग होण्यासारखा असतो. व्यवहारांत वागत असतां मोठमोठे प्रसंग आल्यामुळे योजलेले हेतू सिद्धीस जाण्याचा रंग दिसेनासा झाला, किंवा वतनाच्या वगैरे अडचणींमुळें आपला व्यवहार नीट चालेनासा झाला, म्हणजे सगळा रोजगारधंदा सोडून घरीं स्वस्थ बसतां येणे हा मी मोठाच सद्गुण समजतों. या संसारामध्यें असा कोणताही प्रसंग नाहीं कीं ज्यामध्ये सदाचारी पुरुषास थोडेबहुत नीतीनें वागता येण्यासारखे नसतें. उदाहरणार्थ अथेन्सनगरी तीस जुलमी सरदारांच्या तावडीत सांपडली होती, तेव्हां तेथील रहिवाशांची स्थिति अतिशयित निकृष्ट झाली होती. त्या दुष्टांनी त्या नगरीतील अतिशयित नीतिमान् व हुषार अशा तेराशें पुरुषांचे प्राण घेतले होते. एवढ्यांनेच तें तृप्त झाले नाहींत; तर ते प्रतिदिवशी कांहीं ना कांहीं तरी क्रूर कर्म करून लोकांच्या हृदयांत भीति व शोक हीं उत्पन्न करीत असत. सगळी नगरी तर शत्रूकडील शिपायांनी भरून गेली असून, त्यांच्यामुळे सगळ्या रहिवाशांना सर्वदा धास्ती वाटे. अशा अवस्थेमध्ये त्या नगरीतील जनांस स्वास्थ्याचा यत्किंचित् तरी अनुभव घडत होता असें कोण म्हणेल? या हतभाग्य व दीन नगरवासी जनांला आपलें स्वातंत्र्य पुनरपि प्राप्त होईल अशी मुळींच जागा नव्हती, आणि हे दुष्ट लोक जी जुलूम जबरी नागरिक जनांवर करीत होते, तींतून मुक्त होण्याचा कांहीं एक उपाय त्यांस सुचत नव्हता. हा असा कहर सर्व नागरिकांवर गुदरत असतां, त्यांच्यामध्यें सॉक्रेटिस हा होता. त्यानें नगरींतील प्रमुख जन अगदीं दुःखी

झाले होते त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न चालविला. आपलें स्वातंत्र्य आपणांस परत मिळत नाहीं असें वाटून ज्यांची अगदीं निराशा झाली होती, त्यांला नाना परी बोध करून, त्यांची निराशा दूर करण्याची त्यानें खटपट केली. जे मोठे धनवान् होते; त्यांला आपलें धन जाईल अशी काळजी रात्रंदिवस वाटत होती. अशा धनलोभी जनांस आपल्या अनावर लोभाबद्दल पस्तावा होऊं लागला, तेव्हां त्यानें त्यांचा अनेक प्रकारीं निषेध केला. जे कोणी त्याच्या पक्षाचे असून तो सांगेल तें ऐकण्यास तयार होते, त्यांला त्यानें या कठीण प्रसंगीं कसें वर्तन करावे. तें स्वतांच्या आचरणानें दाखवून दिले. त्या तीस जुलमी पुरुषांची तर त्याला मुळींच भीति वाटत नसे. तो त्यांच्या जवळून अगदीं न घाबरता जात येत असे. परंतु अशा या सत्पुरुषास अथेनियन लोकांनी अंतीं कारागृहांत कोंडून ठेवून त्याचा प्राणघात केला. ज्यानें शत्रूच्या मोठ्या सैन्यासही कधी जुमानिलें नाही, त्याचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा घाट कृतघ्न अथेनियन लोकांनी घातला. त्याचें स्वतांच्या तर्फेनें काय म्हणणे आहे तें देखील त्यांनीं ऐकून घेतलें नाहीं. इतका त्या सत्पुरुषाच्या चरित्राचा उल्लेख येथे करण्याचा उद्देश एवढाच कीं, सर्व राष्ट्रावर भयंकर प्रसंग गुदरला असतां, ज्ञाता पुरुष कोणत्या प्रकारें वर्तन करितों हें तुझ्या ध्यानांत यावें. या महापुरुषांच्या चरित्रावरून असा बोध घ्यावयाचा कीं, राष्ट्रावर कसाही प्रसंग आला असला, राष्ट्रांतील लोकांची मनें कशींहीं बदललीं असलीं, आणि दैवगति कशीही प्रतिकूल असली, तरी आपण प्रसंग पडेल तसें वर्तन करण्यास सर्वथा तत्पर असलें पाहिजे. इतर सामान्य जनांप्रमाणें भयानें गांगरून किंवा चकित होऊन जातां कामां नये; आणि अगदीं हतवीर्य व निराश होऊन हातपाय गाळून दैवास दोष देत बसणें योग्य नाहीं. चोहोंकडून मोठमोठी घोर संकटे आलीं, शत्रूच्या तरवारीखाली सांपडून चराचरां कापून प्राणनाश होण्याचा समय आला, किंवा त्याच्या हातीं लागून, हातापायांत शृंखला पडून जन्मभर कैदेंत खितपत पडावें लागण्याचा प्रसंग आला, तरी देखील जो बिलकुल डगमगत नाहीं, किंवा घाबरून जाऊन हातपाय गाळून बसत नाहीं, किंवा संकटें टाळण्यासाठीं इकडूनतिकडे पळत सुटत नाहीं, तो खरा धैर्यशाली पुरुष समजावा. सगळेच लोक सारखे संकटांत सांपडले असतां, बाकीच्यांस सोडून जो पलायन करितो, तो वाईट मनुष्य समजावा. अशा प्रसंगीं एकाद्याच्या हातून कोणतेंच जनाहित होण्यासारखें नसल्यास, किंवा त्याच्या खटपटीमळें उलटें राष्ट्राचें नुकसान होण्याचा संभव असल्यास, त्यानें कोठे तरी एकांतांत बसून आपला फुरसतीचा वेळ स्वस्थपणें अभ्यास करण्यांत घालवावा.

◆◆◆

प्रकरण बारावें

ढोंगाविषयीं

तूं सर्वदा प्रवास करीत असूनही जर नेहमीं अधिकाधिक सदाचारी व्हावयाचा प्रयत्न करीत राहिलास तर मला त्या गोष्टीचा मोठाच आनंद वाटेल, व मी तुझी त्याबद्दल तारीफ करीन. हा तुझा सदाचारी व्हावयाचा प्रयत्न त्वां एकसारखा चालू ठेवावा अशी माझी तुला विनंति आहे. परंतु या प्रकरणीं माझा तुला असा बोध आहे कीं, हा प्रयत्न जो तूं करीत आहेस, त्यांत तुझी दृष्टी आपल्या वास्तविक हिताकडेच असावी. कित्येक लोक लोकांस दाखविण्यासाठीच केवळ नीत्याचरणाचा मोठा आव घालीत असतात, त्यांच्यासारखे वर्तन त्वां कदापि करूं नये. त्याचप्रमाणें कोणतीही गोष्ट जी करावयाची ती लोकांस मोठी विलक्षण वाटावी व त्यांनीं तिचें चोज करीत रहावें म्हणून करावाची असा विचार त्वां मनांत आणूं नये. प्रत्येक बाबतींत तुझें आचरण साधे असावें, व तुझें खाणेंपिणें व वस्त्रप्रावरण हीही अगदीं साधीं असावीं. जेणेंकरून लोक तुला विक्षिप्त म्हणतील अशी कोणतीच गोष्ट त्वां करूं नये. त्याचप्रमाणें वैराग्याचें मोठें कोंग करून जनांत त्याचें प्रदर्शन करण्याच्या भरीस तूं पडूं नको. उदाहरणार्थ डोकींचे केश वाढवून न मोठमोठ्यां जटा होऊं देणे, दाढीचे केश वाढवून त्याच्या जटा होऊं देणे, जमिनीवर निजणें, सोन्यारुप्यास अगदीं स्पर्शही न करणें इत्यादि गोष्टी केवळ लोकांत नुसतें ढोंग वाढविण्यासाठीं आहेत असा माझा अभिप्राय आहे. यामुळें लोकांत तुझा गवगवा होईल एवढेच कायतें. परंतु ही लोकस्फीतीची इच्छा परम दूषणीय होय. दुसरं असें कीं, लोकांला आपलें हें आचरण मुळींच आवडणार नाही. ते आपली याबद्दल विनाकारण अवहेलना मात्र करितील. अमुक एका मनुष्याचें तत्त्वज्ञानाकडे लक्ष लागून तो त्याच्या परिशीलनांत व तद्नुसार वागण्यांत आपला फुरसतीचा वेळ घालवितो, असें नुसते लोकांना कळले तर ते त्याची निंदा व द्वेष करण्यास प्रवृत्त होतात. त्यांत आणखी वर निर्दिष्ट केल्यासारख्या लोकाचाराविरुद्ध गोष्टी आरंभिल्या असतां आपल्या फजितीस पारावार नसतो. यासाठीं आपले बाह्य आचार होतां होईतों जनरीतीविरुद्ध नसावें. आपण सदाचारसंपन्न असलो तर आपलें अंतर्याम त्यांच्या अंतर्यामांहून भिन्न असेल एवढेंच काय तें. आपल्या अंगावरची वस्त्रे फार भपक्याचीं नसावीं किंवा फार घाणेरडीही नसावी. अंगावर सोन्यारत्नांचे डागिने घालण्याची फारशी हौस नसावी. पण अगदींच सोन्यारुप्याला स्पर्श करावयाचा नाहीं असा निर्धार करण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. सारांश काय कीं, आपलें आचरण लोकांच्या आचरणाहून चांगले ठेवण्याविषयीं झटावे पण तें त्यांच्या अगदीं विरुद्ध ठेवण्याची बुद्धि वाईट. अशानें काय होईल कीं, ते आपला तिटकारा करून आपल्या वाऱ्यासही यावयाचे नाहींत. असें ते करूं लागले म्हणजे मग त्यांस

सन्मार्गास लावण्याचें जें आपलें कर्तव्य त्यास आपण अंतरूं. आपल्या विक्षिप्तपणाचा व नुसत्या वैराग्याचा त्यांस कंटाळा व तिरस्कार वाटून त्या गोष्टींचें अनुकरण करणें त्यांस मुळींच आवडावयाचें नाहीं; आणि मग ज्या आपल्या सदाचरणाचें त्यांनीं अनुकरण करावें अशी आपणांस इच्छा असते, तेंही त्यांस वर्ज्य व तिरस्करणीय वाटेल. ज्ञानाचा प्रथम सुसंस्कार म्हटला म्हणजे आपल्याठायीं व्यवहारज्ञान उत्पन्न व्हावें; मनुष्यमात्राविषयी अंतःकरणांत दया उत्पन्न व्हावी; अन्य जनांशीं मोठ्या रहसाळीनें व मित्रत्वानें वर्तन करण्याची सर्वदा बुद्धि व्हावी. परंतु वर निर्दिष्ट केल्यासारखा विक्षिप्तपणा व ढोंग आपण करूं लागलो तर आपण इतर लोकांशीं तुटून वागल्यासारखे होईल. आपलें सदाचरण पाहून इतर जनांस चांगले वाटावें असें आपल्या मनांत असतें. परंतु हें आपलें सदाचरण असें असूं नये कीं, तेणेंकरून तें इतरांस उपहासास्पद व कंटाळवाणें वाटेल. निसर्गनियमांप्रमाणे वर्तन ठेवणें हा आपल्या सदाचरणाचा मुख्य उद्देश असतो. यास्तव देहास पीडा होईल असें आपलें वर्तन नसावें. स्वच्छतेच्या सामान्य नियमांसही जुमानणें, अंगावर अगदीं घाणेरडे कपडे घालणें, निखालस बेचव व निःसत्व असें अन्न सेवन करणें, ह्या गोष्टी निसर्गाविरुद्ध होत. उत्कृष्ट पक्वान्नें व सुंदर वस्त्रें यांची इच्छा धरून त्यांच्या प्राप्तीसाठीं झटल्यानें जसे आपण विलासी बनतों, तद्वत्च ज्या वस्तु अतिशयित उपयोगी असून, ज्या अल्प खर्चानें प्रात होण्यासारख्या असतात, त्यांचा अव्हेर केला असतां आपण निवळ वेडे ठरतों. ज्ञानी पुरुषाने आपलें खाणें पिणें बेताबाताचें ठेवावे व वस्त्रप्रावरण ल्यावयाचें तें अगदीं साधें पण स्वच्छ असावें. यार संबंधाने त्यानें विनाकारण हाल सोसण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. आपला वस्त्रान्नाचा वगैरे खर्च अगदीं माफक असला तरी त्यापासून आपले हाल होण्याचा किंवा जनांत आपला उपहास होण्याचा संभव नसतो. आपण आपलें आचरण शुद्ध ठेवून लाकाचारही पाळवेल तितका पाळण्यास झटावें. आपलें आचरण लोकांस प्रशंसनीय वाटावें, इतकेंच नव्हे तर तें त्यांस अनुकरणार्हही वाटावे, याविषयीं आपण सावधगिरी ठेवावी. यावर तूं कदाचित् जशी शंका घेशील कीं, या हेतूच्या सिद्धीसाठीं आपण इतर जनासारखेंच वागावें कीं काय? त्यांच्या आमच्या आचरणांत कांहींच भेद नसावा कीं कसें? या शंकेवर माझें असें म्हणणें आहे कीं, सामान्य लोकांच्या आणि आपल्या आचरणांत पुष्कळच अंतर असावें. परंतु तें, जो कोणी आम्हांस अगदीं बारकाईनें पाहील, त्याच्याच ध्यानांत येईल असें असावें. जो कोणी आमच्या घरीं येईल, त्यानें आमच्या घरांतील सामानसुमान वगैरे पाहून चकित होण्यापेक्षां आमचें आचरण पाहूनच चकित होणें इष्ट होय. अगदीं मडक्यागाडग्यांशीं गांठ असली तरी जो हीं मातीचीं भांडीं सोन्यारुप्याच्या भांड्यांप्रमाणें समजतो, तो जसा थोर मनाचा पुरुष मानावयाचा, तसाच जो सोन्यारुप्याचीं भांडी जवळ असतां तीं मातीच्या भांड्यांप्रमाणेंच लेखितो, तोही मनुष्य थोरच गणावयाचा. धनसंपदा अनुकूल असतां ज्याला आपलें आचरण शुद्ध ठेवितां येत नाहीं, तो मनाचा दुर्बल समजावा. ज्याला भयमुक्त व्हावयाचें असेल, त्यानें आपली आशा समूळ खुंटावी. परंतु लोभहीनता व भयहीनता या दोन्ही गोष्टी परस्परविसदृश आहेत असें तूं म्हणशील. तर हे ल्युसिलिअसा, तूं असें पक्के ध्यानांत वागीव कीं, ह्या दोन्ही गोष्टी परस्परविरुद्धशा भासतात, तथापि त्या परस्परावलंबी असतात आशेमागून भय उत्पन्न व्हावें हा नियमच आहे. ह्या उभय मनोवृत्ति मनाच्या साशंक वृत्तीपासून उद्भवतात. दोहोंचेही विषय समानच असतात. कारण आशा आणि भय हीं भावी गोष्टींविषयी उद्भवतात. या वृत्ति उत्पन्न होण्याचे प्रबळ कारण असें आहे कीं, ज्या गोष्टी आपणांस वर्तमानकाळीं प्राप्त झाल्या

असतात, त्यांनीं आपण संतुष्ट नसतो; तर आपलें भावी गोष्टींकडे लक्ष लागलेले असतें. याप्रमाणे पुढला विचार करण्याचा जो गुण मनुष्याच्याठायीं असल्यामुळें त्याचें आज अतिशयित मोठें हित होत आहे, तोच गुण आशा व भीति यांनीं त्रस्त झालेल्या मनुष्यांस अनेक प्रकारीं पीडाकारक होतो. पशूंना साक्षात् जे धोक्याचे प्रसंग येतात, तेवढेंच टाळण्याविषयीं ते प्रयत्न करितात; आणि पलायन वगैरे करून त्यांचें संकटनिवारण झालें म्हणजे त्यांच्याठायीं त्या संकटांची भीति उरत नाहीं. त्यांची भयस्मृतिही तत्काळ विनष्ट होते. परंतु आम्हां मानवांची गोष्ट तशी नाहीं. आम्हांस गत काळीं प्राप्त झालेल्या व भविष्यकाळी प्राप्त होणाऱ्या अनिष्ट गोष्टींबद्दल सर्वदा भीति वाटत असते. या अनिष्टशा भासणाऱ्या गोष्टींपैकी कित्येक तर आपल्या कल्याणाच्या असतात. तथापि त्यांमुळे गत काळी जें आपणांस भय वाटलें होतें त्याची स्मृति जागृत होऊन आपण त्रास पावतों, आणि भविष्यकाळीं ज्या गोष्टी घडणाऱ्या असतात, त्यांची भावी भीति आजच मनांत येऊन आपण कष्टी होतों. वर्तमानकाळीं ज्या गोष्टी घडत असतात, त्यांमुळेंच केवळ कष्ट पावणारा असा मनुष्य विरळा.

◆◆◆

प्रकरण तेरावें

मंडळींत जाऊन बसणेंउठणें

त्वां मंडळींत जाऊन बसण्याउठण्याचा क्रम ठेवूं नये. कारण तुझ्याठायीं अद्यापि मनाची दृढता आली नाहीं. माझी स्वतांची वृत्तिसुद्धां अद्यापि स्थिर झाली नाहीं. ही माझी दुर्बलता मला अनेक प्रसंगीं दिसून आली आहे. मी जेव्हांजेव्हां मंडळींत जाऊन बसतो, तेव्हां माझ्या वृत्तींत कांहीं ना कांहीं पालट झाल्यावांचून रहात नाहीं. ज्या एकाद्या मनोविकाराचें म्यां दमन केलें असतें, तो पुनरपि उत्तेजित होतो. जे दोष मीं माझ्या हृदयांतून काढून टाकिले असतात, ते पुनरपि माझ्याठायीं प्रवेश करितात. मनुष्यास एकादा रोग जडला असतां, त्यांतून तो बरा झाला म्हणजे त्याच्या अंगीं पुष्कळच अशक्तता येते. अशा स्थितीमध्यें त्याचा तो रोग पुनः उलटण्याची जशी फारच भीति असते, तद्वत्च आपल्या मनाच्या विकारांचे आहे. ते विकार पुष्कळ दिवस आपल्या मनास जडलेले असून, ते एक वेळ काढून टाकिले असतां, त्यामुळें मन फारच दुर्बळ झाल्या कारणानें ते पुनरपि मनास जडण्याचा दृढ संभव असतो. पुष्कळ लोकांच्या समुदायांत बसून त्यांचें भाषण आपल्या कांनी पडल्यानें आपलें मोठें नुकसान होतें. प्रत्येकाच्या संसर्गामुळे आपल्या चित्तास कांही ना कांहीं मळ लागतो; कोणता ना कोणता तरी कुविचार आपल्या मनांत ठसतो, किंवा त्याचें उद्दीपन होतें; आणि विशेष हें कीं, हा सारा पालट आपल्याठायीं अगदीं नकळत होत असतो. जितक्या जास्त समुदायाशीं आपलें संघटन होतें, तितकी आपणांस या संबंधाची भीति जास्त असते. नाटकें तमासे वगैरे पाहावयास गेल्याने तर आपली नीति बिघडण्याचा संभव फारच असतो. कारण तेथें आपल्या निरनिराळ्या विषयवासना उद्दीपित होऊन आपणांस अनेक दुर्व्यसनें जडण्याचा संभव असतो. मी जनसमाजांत जितका जितका मिसळतों, तितके तितके माझ्याठायीं लोभ, महत्त्वाकांक्षा, विलासीपणा, क्रूरपणा, अमानुषपणा इत्यादि दोष थोड्याबहुत प्रमाणानें वाढतात. ज्याचें मन कोमल असतें, त्याचा पालट होण्यास उशीर लागत नसतो. ज्याच्याठायीं सत्य आणि सदाचारप्रीति हीं पूर्णपणें ठसली नसतात, त्याच्या वृत्तींत लोकांच्या साहचर्यानें फरक पडण्याचा दृढ संभव असतो. कुसंगतीचा परिणाम अशा मनांच्या लोकांवर तत्काळ होतो. फार काय पण मोठमोठ्या सदाचारी पुरुषांस सुद्धा कुसंगाच्या योगानें पापमळ लागला आहे. मग सामान्य जनांची ती कथा किती? असत्संगाचा परिणाम पुढील पद्यांत सांगितला आहे:-

दुष्टतां दुष्टसंसर्गाददुष्टमपि गच्छति ।
सुराबिन्द्रुनिपातेन पंचगव्यघटी यथा ।। * सु.

---

* चांगला मनुष्य सुद्धा दुष्टांच्या संगतीनें दुष्ट होतो. कसा? तर ज्याप्रमाणें पंचगव्याच्या भांड्यामध्यें दारूचा थेंब पडला असतां तें अमंगळ होते, तसा.

आपण सदाचारानें वागण्याविषयीं केवढेंही निश्चयाचें व्रत केलें तरी दुराचारी जनांच्या संगतीचा प्रभाव कांहीं विलक्षण असतो. त्यांच्या संसर्गानें आपला व्रतभंग होण्याचा संभव असतो. एकादा जरी बदफैल किंवा लोभी मनुष्य असला, तरी त्याच्या दुर्वर्तनामुळें पुष्कळ जनांचें नुकसान होत असतें. त्याचप्रमाणें एकाद्या नामर्द मनुष्याशीं सदोदित संघटन घडल्यानें आपल्याठायीं थोडथोडा कमकुवतपणा येऊं लागतो. आपल्या शेजारी एकादा लक्ष्मीवान् पुरुष असला म्हणजे आपल्याठायीही थोडासा धनलोभ उत्पन्न होतो. एकाद्या मलीन आचरणाच्या पुरुषाशी आपला संबंध जडला असतां, त्याचा दोष आपणांस लागून आपणही मलीन आचरणाचे बनतो; आणि आपल्याठायींचा प्रामाणिकपणा नष्ट होतो. असा जर एकएकट्या मनुष्याच्या संसर्गाचा प्रभाव आहे, तर जेथें सदाचारी पुरुषावर जनसमाजामध्यें चोहोंकडून कहर उसळतो, तेथें त्याचा तो सदाचार कायम रहाण्याचा कितीसा संभव आहे बरें? हाच आशय पुढील पद्यांत सुचित केला आहे:-

बहुर्भिर्मूर्खसंघातैरन्योन्यपुशवृत्तिभिः
प्रच्छाद्यन्ते गुणाः सर्वे मेघैरिव दिवाकरः ।। ** सु.

अशा जनसमाजाप्रमाणें एक तर तुला वर्तन करावें लागेल, किंवा त्याचा तिरस्कार तरी करावा लागेल. परंतु या दोन्ही गोष्टी तुला करितां कामा नये. कारण जर तूं त्यांचें अनुकरण केलेंस तर त्यांच्या पैकीं जे कोणी दुष्ट असतील, त्यांतला तूं एक होशील; आणि त्यांचा द्वेष केल्यास तूं बहुतांचे वैर संपादिल्यासारखें होईल. या कारणास्तव त्वां त्यांच्या वाऱ्यासच मुळी जाऊं नये हें प्रशस्त होय. ज्याच्या सहवासाने तुझ्या ठायींचा चांगुलपणा वृद्धिंगत होण्याचा संभव असेल, अशाच जनांशी संघटन ठेव. कांहीं झालें तरी मोठमोठ्या मंडळ्यांत जाऊन बसण्याउठण्याचें कधीं मनांतही आणू नको. त्याचप्रमाणें आपलें पांडित्य मिरविण्याच्या उद्देशाने कोणाशीं वादविवाद करूं नको, किंवा जनांस उपदेश करण्याचा डौल घालू नको. आतां लोकांची समजूत पडण्यासाठीं त्यांच्याशीं एकाद्या गोष्टीच्या संबंधानें वादविवाद करणें, किंवा त्यांस एकाद्या नीतितत्वाचा उपदेश करणें हें कांहीं वाईट नाहीं. असें त्वां अवश्य करावें, अशी माझी इच्छा आहे. पण तें कोणाबरोबर? ज्यांला तूं काय बोलत आहेस तें समजण्याचीही पंचाईत असते. त्यांशीं बुद्धिवाद करण्यांत काय अर्थ? अशा लोकांपुढे तूं कितीही कंठशोष केलास तरी त्यापासून कांहींएक निष्पन्न व्हावयाचें नाहीं. तथापि एकादा दुसरा योग्य मनुष्य तुला आढळल्यास त्वां त्याला स्वमतांचा बोध करावा हें इष्ट होय. यावर तूं मला असा प्रश्न करिशील कीं, 'तर मग मीं जी ही विद्या संपादन केली आहे ती कशासाठी बरें?' याचे उत्तर असें कीं, तुझे हे श्रम व्यर्थ गेले असें तूं कदापि मानूं नये. तुझ्या स्वतांच्या मनावर या विद्येनें संस्कार झाला आहे तेवढ्यांतच त्वां संतोष मानून रहावें. मी आज डिमॉक्रिटसच्या एका ग्रंथाचें अवलोकन करीत असतां, मला दोन सुंदर वचने आढळलीं आहेत. तीं तुला येथें लिहून कळवितों. तो म्हणतो कीं, 'एक मनुष्य हजारांच्या जागीं आहे, आणि हजार मनुष्यें एकाच्या जागीं आहेत असें मी

** मेघ जसे एकमेकांवर आपटून सूर्याला केवळ आच्छादून टाकितात, त्याप्रमाणें पुष्कळ मूर्ख लोकं एकत्र जमले असतां, ते आपआपल्या ठायींच्या पशुवृत्तींमुळे कोणामध्ये कांहीं चांगले गुण असल्यास ते छपवून टाकितात.

मानितों.' त्याचा हा अभिप्राय एका गृहस्थास कळला तेव्हां त्यानें त्यास पुसलें: 'अहो, तुमच्या ह्या कलेच्या योगानें जर अगदीं थोड्या जनांचें कल्याण व्हावयाचें आहे, तर तिचें संपादन करण्यासाठीं तुम्ही इतके परिश्रम कां करितां बरें?' या प्रश्नास त्यानें असें उत्तर दिलें कीं, 'माझ्या या कलेस अगदीं थोडे मनुष्य पुरतात, एक असला तरी पुरतो, आणि मुळींच कोणी नसला तरी पुरतो.' हें त्याचें म्हणणें सर्वस्वीं सत्य आहे. असाच अभिप्राय एपिक्युरस एके ठिकाणीं प्रगट करितो. तो आपल्या एका शिष्यास म्हणतो: 'हें जें मी लिहीत आहें, तें पुष्कळांसाठी नव्हे, तर तें केवळ तुझ्यासाठी आहे. हा सारा ज्ञानाचा विनिमय तुजमजमध्येंच झाला तरी तो पुष्कळच आहे असें मी समजतों.' हे ल्युसिलिअसा, त्वां ही सुवचनें चांगली ध्यानांत ठेवावीं. यांतील बोध तुझ्या मनांत चांगला ठसला तर तुला आपलें ज्ञान पुष्कळ लोकांपुढे मिरवून होणारा आनंद केवळ तुच्छ वाटेल; व तूं मोठा विद्वान् व वक्ता आहेस अशी तुझी ख्याति झाल्यानें जें तुला समाधान वाटण्यासारखें आहे, त्याची तूं मुळींच परवा करणार नाहींस. पुष्कळ मनुष्य आज तुझी वाहवा करीत असतील. परंतु त्यांस तुझ्याठायींचा चांगुलपणा कळल्याने तुझें काय हित व्हावयाचें आहे बरें? तुझ्याठायींचा चांगुलपणा तुलाच हितकर असावयाचा. त्याचें प्रदर्शन करण्यांत अर्थ तो कोणता?

◆◆◆

प्रकरण चौदावें

पुस्तकांची निवड

तुझ्याठायीं पुष्कळ ग्रंथांचें अवलोकन करण्याची इच्छा उत्पन्न झाल्यानें मिळेल तो ग्रंथ वाचण्यास तूं प्रवृत्त होशील. परंतु अशानें तुझ्या मनास चंचलता प्राप्त होऊन तूं घोटाळ्यांत पडशील. यासाठीं ही तुझी इच्छा आवरण्यास त्वां जपले पाहिजे. त्वां आपलें चित्त स्थिर राखावे, आणि कांहीं निवडक ग्रंथांचेंच परिशीलन करावे. असें तूं करिशील तरच तुला काहीतरी तत्वबोध होऊन तो तुझ्या स्मरणांत राहील. ज्याचे चित्त चोहोंकडे भ्रमण करितें त्याचें एकाच कोणत्या तरी गोष्टीकडे लक्ष लागत नाहीं. जे सर्वदा प्रवास करीत असतात, ते पुष्कळ ठिकाणीं मुक्काम करितात, पण ते फारच थोडे मित्र जोडितात. ज्यास पुष्कळ ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, त्यांचीही अवस्था अशीच आहे. पुष्कळ निरनिराळ्या विचारांचे ग्रंथ वाचून मन व्यग्र होऊं देण्यापेक्षा कोणता तरी उत्तम ग्रंथ निवडून त्याचें दीर्घ कालपर्यंत मननपूर्वक अध्ययन केलें तर पुष्कळ हित होण्यासारखें असतें. पुष्कळ ग्रंथ भराभर वाचून टाकल्यानें मोठी विद्वत्ता अंगीं येते असें तूं समजत असशील तर ती तुझी चुकी आहे. जें अन्न आपण भराभर घशात कोंबून देऊन गिळितों, व पोटांत फार वेळ टिंकू न देतां वमनाच्या किंवा मलाच्या रूपानें ज्याचें उत्सर्जन करितों, त्या अन्नाच्या योगानें देहाचें पोषण होत नाहीं. एकादा रोग झाला असतां, त्यावर औषधोपचार करावयाचे ते जर आपण वेळोवेळां पालटूं लागलों, तर आपल्या अंगातला रोग बरा न होतां उलट आपली प्रकृति अधिकच बिघडते. ज्या जखमेस आपण आज एक उद्या एक अशीं पुष्कळ औषधें लावितों, ती बरी न होतां उलट अधिकच चिडते. वृक्ष एका जागीं लावून मग तेथून दुसऱ्या ठिकाणी लाविला, तेथून उपसून तिसऱ्या ठिकाणी लाविला, असें करूं गेल्यास तों कधींही वाढीस लागावयाचा नाहीं. तेव्हां सारांश काय कीं, पुष्कळ ग्रंथ भराभर वाचून टाकण्याची संवय झाल्यानें आपलें कांहींच हित व्हावयाचें नाहीं. अशा वाचनानें मन मात्र व्यग्र होऊन घोंटाळ्यांत पडतें. बुद्धीचे पोषण मुळींच होत नाहीं. यासाठीं तुजपाशी जो ग्रंथसंग्रह आहे, तेवढा सगळा तुला वाचून टाकितां आला नाहीं तरी त्याबद्दल त्वां कष्टी होऊं नये. थोडेच का ग्रंथ होईनात, पण त्यांचें अध्ययन उत्कृष्ट प्रकारें करण्याचा त्वां निर्धार करावा. आज एक ग्रंथ वाचिला, उद्या दुसरा हातीं घेतला, असा क्रम त्वां कधींही ठेवू नये. एकाद्यास पुष्कळ पक्वान्नें लागोपाठ खाण्याची जशी आशा सुटते, पण तीं पचविण्याचें सामर्थ्य त्याच्या जठराच्याठायीं नसल्याकारणानें अजीर्णादि विकार त्यास जडतात, अशीच गत पुष्कळ ग्रंथ एकामागून एक वाचून टाकल्यामुळें आपल्या मनाची होण्यासारखी असते. यासाठीं जे ग्रंथ अत्युत्कृष्ट आहेत असा विद्वज्जनांचा अभिप्राय असेल, असेच ग्रंथ त्वां निवडावे, आणिं त्यांचें पुनःपुनः

शोधपूर्वक व मननपूर्वक पर्यालोचन करावें. आतां तेच तेच ग्रंथ वाचून तुला कंटाळा येण्याचा संभव आहे. यासाठीं त्वां मनाची करमणूक होण्यासारखे दुसरे कोणते तरी ग्रंथ वाचावे. परंतु त्यांमुळे तुझ्या विचारांत घोटाळा होतां कामा नये. घरांत बसून बसून कंटाळा आला असतां, जसे आपण एकाद्या आरामवटिकेंत जाऊन सुखानें बसतों, तद्वत्च आपल्या करमणुकेसाठीं व ज्ञानप्राप्तीसाठीं निवडलेले ग्रंथ वाचण्याचा क्रम ठेवावा. प्रतिदिवशीं त्वां अशा तत्वांचें परिशीलन करावे कीं, जेणेकरून तुझ्याठायीं दारिद्र्य दुःख सहन करण्याचें सामर्थ्य येईल; मरण प्राप्त झालें असतां त्यांत घाबरून जाण्यासारखें कांहीं नाहीं असा बोध प्राप्त होईल; संसारांत जे इष्टानिष्ठ प्रसंग प्रतिपदी येत असतात, त्यामुळें चित्त व्यग्र न होऊं देण्याचे धैर्य अंगीं दृढ होईल. याप्रमाणें ज्या उपयुक्त तत्वांचा अभ्यास तूं प्रतिदिवशीं करिशील त्यांपैकीं कांहीं तत्वें तुझ्या ठायीं दृढ होऊन तदनुसार तुझें आचरण होण्याविषयी त्वां प्रयत्न करावा. मी जे ग्रंथ नेहमी वाचीत असतो, त्यांतला कांहीं ना कांहीं बोध माझ्या चित्तांत ठसेल असें करण्यास मी सर्वदा झटत असतो. मी आज एपिक्युरसाचा एक ग्रंथ वाचीत असतां, मला त्यांत एक सुंदर वचन आढळले. तो म्हणतो: 'जो मनुष्य दरिद्री असूनही संतुष्ट असतो, तो मोठा प्रामाणिक समजावा.' परंतु जो मनुष्य विपन्नावस्थेतही संतुष्ट असतो त्यास दरिद्री कोण म्हणेल? जो अशा स्थितींतही संतुष्ट असतो तो मोठा श्रीमान्च समजला पाहिजे. ज्याची अगदीं कमी ऐपत असते, तो दरिद्री नव्हे; तर ज्यास आणखी द्रव्य मिळावे अशी आशा वाटत असते, तो मनुष्य दरिद्री समजावा. एकाद्या मनुष्याचा खजिना केवढाही मोठा असला, त्याच्याकडे धान्यदिकांची समृद्धि हवीतितकी असली, तो दररोज कितीही मिष्टान्नांचें भक्षण करीत असला, व्याजबट्ट्याचें वगैरे त्याला पुष्कळ उत्पन्न असलें, तरी इतरांस अर्थप्राप्ति होतांना पाहून जर त्याला मोठा लोभ सुटेल, आपल्यापाशीं असलेली संपत्ति पाहून त्याचें समाधान न होतां जर तो आणखी धनप्राप्तीची हांव धरूं लागेल, तर त्याच्या त्या संपन्नतेचा काय उपयोग बरें? किती ऐपत जवळ असली म्हणजे मनुष्यास श्रीमंत म्हणावें असा तूं मला प्रश्न विचारिशील, तर त्याचें उत्तर असें कीं, नैसर्गिक गरजा भागण्यापुरती आपली ऐपत असून ती आपणांस पुरेशी वाटावी म्हणजे आपण समृद्ध झालो म्हणून समजावे. लोकांपाशी शेकडों, हजारों पुस्तकं आणि मोठमोठालीं ग्रंथालये असून काय कामाची? त्यांचे मालक त्या पुस्तकांची कधीं यादीही जर वाचणार नाहींत तर तीं त्यांस असून नसून सारखींच. ज्याला विद्याध्ययन करावयाचे आहे, त्याला पुष्कळ पुस्तकांचा संग्रह केवळ मोठ्याशा ओझ्याप्रमाणें होय. ह्या सर्व पुस्तकांपासून त्याला कांहीं ज्ञान प्राप्त होतें असें सहसा म्हणवत नाहीं. यास्तव थोडेच ग्रंथ निवडून त्यांचें तूं सतत परिशीलन करिशील तर तुझें हित होईल. पुष्कळ ग्रंथ अर्धवट चावलेसे करून टाकण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. अलेक्झॅन्ड्रिया येथें चाळीस हजार ग्रंथांचा संग्रह जाळून टाकिला. हा ग्रंथसंग्रह करण्याकडे ज्या राजांनी आपल्या वित्ताचा व्यय केला, ते राजे धन्य होत. एका ग्रंथकारानें या ग्रंथसंग्रह करणाऱ्या राजांची मोठी तारीफ करून म्हटलें आहे कीं, या त्यांच्या उद्योगावरून त्यांचा थोरपणा किंवा वैभव ही सूचित होतात. परंतु माझ्या मतें यांत त्यांचा थोरपणा किंवा वैभव ही दिसून तर येत नाहींत, पण हा त्यांचा अत्याचार होय. लोककल्याण व्हावें किंवा ज्ञानवृद्धि व्हावी ह्यणून त्यांनीं हे ग्रंथ गोळा केले नव्हते, तर आपला बडेजाव लोकांच्या नजरेस यावा म्हणून त्यांनीं हा वित्तव्यय केला. कित्येक अक्षरशून्य श्रीमंतांची अशी चाल असते कीं, आपल्या घरांतील दिवाणखान्यास शोभा यावी म्हणून ते पुष्कळ ग्रंथांचा संग्रह करितात. हे ग्रंथ वाचून आपलें ज्ञान वाढविण्याचें त्यांच्या

मनांत कधीही येत नसतें. आपण अशा या डौल मिरविणाऱ्या जनांचें अनुकरण करून पुष्कळ ग्रंथांचा संग्रह करण्याचा नाद सोडून द्यावा; आणि जितके ग्रंथ आपल्यापाशी असल्यानें आपलें काम भागण्यासारखें असतें, तितकेच ग्रंथ आपण मिळवावे. तूं म्हणत असशील कीं, माझ्या वित्ताचा व्यय सुंदर व मोलवान् भांडी व इतर शोभेचें सामान घेण्यांत करावा, त्यापेक्षां तें पुस्तके खरेदी करण्यांत खर्चिलें तर असें आहे कीं पुष्कळ हित होईल. परंतु माझें या प्रकरणी मत पुसशील तर जितक्या ग्रंथांची आवश्यकता असते, त्यापेक्षां अधिक ग्रंथ जमा करण्याचा नाद आपणांस लागला तर तो दूषणीयच होय. जो मनुष्य स्फटिक, हस्तिदंत वगैरे पदार्थांच्या चित्रविचित्र वस्तु गोळा करून त्यांचें आपल्या गृही प्रदर्शन करण्याची हाव धरितो, त्यांचे तें करणें जसें अक्षम्य आहे, तद्वत्च जो अज्ञात अशा ग्रंथकारांच्या कृति पैदा करण्याकरितां अनेक देश धुंडाळितो, आणि जे कांहीं बरेवाईट ग्रंथ सापडतील ते एकत्र करण्याचा हव्यास धरितो, परंतु त्या ग्रंथांतलें एक अक्षर ही कधीं वाचण्याची ज्याला बुद्धि होत नाहीं, तर जो त्यांचे पुठ्ठे व नावे पाहूनच संतोष मानितो, अशा नराचेंही करणे अक्षम्य कां समजू नये बरें? ज्यांना कधीं पुस्तक उघडण्याचीही बुद्धि होत नाहीं, अशा पुष्कळ आळशी लोकांच्या घरांत अभ्यासास बसावयाच्या खोल्या म्हणून असून, त्यांत शेकडों ग्रंथ एकावरएक रचून ठेविले असतात. परंतु हे पुस्तकसंग्रह ते इतर छानछोकीच्या सामानाप्रमाणेंच समजून मिळवीत असतात. यांवांचून आपल्या घराला शोभा येणार नाहीं असा त्यांचा समज असतो. याप्रमाणें निरनिराळ्या काळीं होऊन गेलेल्या मोठमोठ्या विद्वान् ग्रंथकारांचे उत्कृष्ट ग्रंथ हे शोकीजन, त्यांचे पुठ्ठे पाहून किंवा त्यांवर काढलेलीं मजेदार चित्रे पाहून, केवळ शोभेसाठीं विकत घेऊन आपल्या दिवाणखान्यांत रचून ठेवितात. त्या महाकृतींचा उपयोग भिंती शोभविण्यापुरता व लोकांत आपली दौलत मिरविण्यापुरताच आहे असें ते मानितात.

◆◆◆

प्रकरण पंधरावें

तालीमबाजी

आपले पूर्वज देहाच्या आरोग्याचें मोठेंच महत्त्व मानीत. मनुष्य जितका निरोगी व सशक्त असेल तितका चांगला अशी त्यांची समजूत असे. परंतु इतक्यानेंच मनुष्यास सुखप्राप्ति व्हावयाची नाहीं. तर मनुष्यानें आपलें मन ज्ञानाभ्यासानें सुसंस्कृत करणें अत्यावश्यक होय. ज्यास सत्यज्ञानप्राप्ति झाली नाहीं, त्याचें मन विकारवश असतें. याप्रमाणें मन विकृतावस्थेंत असलें तरी देह चांगला पुष्ट व सशक्त असण्याचा संभव असतो. परंतु हें देहाचे नुसते आरोग्य असून काय कामाचे? एकादा मनुष्य वेडा असला तरी देखील त्याचा देह चांगला पुष्ट व टणखर असण्याचा संभव असतो. पण हा गलेलठ्ठपणा असून काय उपयोग? यासाठीं मनाचे आरोग्यच प्रधान असून, तें संपादण्याकडे मनुष्यानें आधीं लक्ष पुरविलें पाहिजे. देहाचें आरोग्य हें केवळ गौण असून, त्याची प्राप्ति मनुष्यास सहज होणारी असते. कारण सत्य ज्ञानाच्या प्रकाशानें जो मनुष्य वर्तूं लागतो, त्याला देहाचें आरोग्य केवळ करतलामलकवत् होतें. ज्या मनुष्यास ज्ञानाच्या योगानें सुविचार प्राप्त झाला असतो, तो आपले हातपाय कसरतीच्या योगानें चांगले कसविण्याच्या किंवा आपली छाती रुंद होईल असें करण्याच्या फंदात फारसा पडणार नाहीं. त्याचप्रमाणें नाना प्रकारचे पौष्टिक व शक्तिवर्धक पदार्थ खाऊन अंगास पुष्टता आणण्याच्या भरीस तो पडणार नाहीं. कारण तो जाणतो कीं, त्यानें आपला देह कितीही पुष्ट केला तरी त्याचें वजन किंवा टणखरपणा एकाद्या सामान्य बैलाच्या इतकाही होणार नाहीं. दुसरे असें कीं, तालमीच्या निरनिराळ्या प्रकारांनी देहास कसविण्याची खटपट केल्यानें मनास मंदत्व व जडत्व हीं प्राप्त होतात. यासाठीं मनुष्याने नेहमीं हें ध्यानांत वागवावें कीं, जेणेंकरून मनाच्या निरनिराळ्या शक्तीचा विकास होऊन तें चांगलें प्रशस्त होईल अशी आपण खबरदारी ठेविली पाहिजे, केवळ देहाच्या शक्तीकडे व पुष्टतेकडे लक्ष पुरवून मनाची खराबी करूं नये. हाच बोध पुढील सुंदर सुभाषितांत ग्रथित केला आहे:-

मतिरेव बलाद्गरीयसी यदभावे करिणामियं दशा ।
इति घोषयतीव डिण्डिमः करिणो हस्तिपकाहतः क्वणन् ।। * सु.

जे कोणी आपल्या देहाच्या निगेकडेच फक्त लक्ष पुरवितात, त्यांस पुष्कळ त्रास व दुःख हीं सोसावीं लागतात. तालमीचा त्यांना शोक असतो, त्यांचा तींत बराच वेळ जाऊन, त्यांचीं सारीं गात्रे ग्लान होतात;

---

* हत्तीच्या पाठीवर वसलेला महात डंका वाजवीत आहे. त्याच्या नादाचा असा अर्थ आहे कीं, बुद्धि अंगसामर्थ्याहून वरिष्ठ आहे, म्हणून हत्तीची ही अशी दशा झाली आहे.

वाय ५३८-१८

आणि मग त्यांचें मन विद्याभ्यासाकडे लागनोसें होतें. कारण त्यांचा सारा दम तालीमबाजींत निघून जाऊन, विद्याध्ययनास लागणारी मनाची तरतरी व हुषारी त्यांच्याठायी उरत नाहीं. दुसरें असें कीं, तालीमबाज मनुष्य पुष्कळ पौष्टिक खुराकाचें सेवन करीत असल्यामुळें त्याच्याठायीं जाड्य उत्पन्न होऊन, त्याची बुद्धि मंद होते. याप्रमाणे देह जो केवळ मनोरूप राजाचा दास, त्याचें स्तोम मागून त्या दासाला अनुरूप अशा दुर्वृत्ति मनुष्याच्याठायीं उच्छृंखल होतात. मग त्याच्या दुःखास पारावर उरत नाहीं. ज्या लोकांचें याप्रमाणें स्वदेहवर्धनाकडेच लक्ष लागतें, त्यांस एकादे दिवशीं तालीम, कसरत वगैरे करून अंगातून चांगला घाम निघाला नाहीं तर तो त्यांचा दिवस व्यर्थ गेला असें वाटतें. तालीमबाज लोकांनी पुष्कळ तालीम केली म्हणजे त्यांच्या अंगांतून घाम निघून त्यांचा घसा कोरडा पडतो, आणि त्यांस कांहीं तरी प्राशन करावेसें वाटतें. परंतु याप्रमाणें नेहमी अंगांतून घाम जाऊन लागलेली तहान भागविण्यासाठीं दूध वगैरे पिण्याची संवय लागल्यानें मनुष्याच्या जठरास विकृति जडते. तेव्हां अशा जबऱ्या मेहनतीची कसरत वगैरे करण्याचा नाद मनुष्यानें सोडावा, आणि व्यायामाचे कांहीं साधे प्रकार आहेत त्यांचें अवलंबन करावें हें चांगले. हे व्यायामाचे साधे प्रकार म्हटले म्हणजे, लांब लांबच्या सहली करणें, दौड करणें, मुगदल फिरविणें, उड्या मारणें, कमानी टाकणें वगैरे होत. यामुळें शरीर चांगले सरळ राहून अंगांत चपलता येते. असला कोणता तरी एकादा साधा व्यायाम करण्याचा सराव ठेविल्यानें तो अगदीं अल्प श्रमानें होऊन चांगला अंगवळणीं पडतो. याप्रमाणे अल्पश्रमसाध्य असा एकादा व्यायाम थोडा वेळ करून लागलीच विद्याभ्यास करण्यास लागावें. हा मानसिक व्यायाम मात्र त्वां रात्रंदिवस करणें योग्य होय. मानसिक व्यायाम अत्यल्प श्रमाने होऊन मनाच्या निरनिराळ्या शक्ति अल्पायासानें विकसित होतात. मानसिक व्यायामास शीतोष्णादिकांच्या योगानेंही प्रत्यवाय घडत नसतो; फार काय पण मनुष्य कितीही जरठ झाला तरी देखील हा त्याचा व्यायाम अप्रतिहतपणें चालतो. यास्तव त्वां आपलें मन सुसंस्कृत करण्याचा परिश्रम सतत चालवावा. त्यांत कदापि खळ पडूं देऊं नये. हा श्रम जितका तूं अधिक करिशील तितका तो अधिक श्रेयस्कर होईल. तूं कितीही वृद्ध झालास तरी तुझ्याठायीं मानसिक व्यायामानें प्राप्त झालेलें सामर्थ्य कदापि कमी होणार नाही. तर तें सर्वदा वाढतच राहील. आतां त्वां सर्वदा पुस्तकें वाचीत किंवा लिहित बसावें, असे माझें मत नाहीं; तर त्वां आपल्या मनास वेळोवेळां थोडीशी विश्रांति अवश्य द्यावी. तरीपण हा व्यायाम अगदींच सोडून देणें बरें नव्हे. मनास थोडीशी ग्लानि आली असतां, तो कांहीं वेळ सोडून पुनरपि करावयास लागावें.

◆◆◆

प्रकरण सोळावें

निद्रा

मनुष्याचें जावित आधींच अल्प असतें. त्यांतूनही याचा पुष्कळ काळ व्यर्थ जातो. यासाठीं त्यानें सकाळीं लवकर उठण्याचा क्रम ठेवावा. म्हणजे त्याला पुष्कळ वेळ मिळेल. जो मनुष्य सूर्योदयानंतर बिछान्यावर घोरत पडून रहातो, तो सुस्त समजावा. कित्येक तर असे झोंपाळू असतात कीं, त्यांचें एकदोन प्रहर दिवस आल्यावर उजाडतें! कित्येक तर असे विचित्र असतात कीं, ते रात्रीची कामें दिवसास उरकितात, आणि दिवसाची कामे रात्रीस करूं पाहतात. रात्रभर बदफैली करून व मद्यादिकांचें यथेष्ट सेवन करून त्यांच्या अंगांत अशी सुस्ती येते कीं, त्यांच्या डोळ्यांतली तंद्रा संध्याकाळ होईपर्यंत जात नाहीं. अशा जनांस रात्रिंचर म्हणण्यास हरकत नाहीं. इतर जनांचे व्यवहार सारे दिवसास होऊन ते रात्रीस सुखनिद्रा घेतात. परंतु निसर्गाविरुद्ध वर्तणाऱ्या या जनांचा साराच क्रम उलटा असतो! अशा रात्रिंचर जनांविषयीं एका कवीने असें म्हटले आहे कीं, त्यांना सूर्योदयाचे किंवा सूर्यास्ताचे कधीं दर्शन घडत नसतें. अशा जनांची वृत्ति केवळ दिवाभीतासारखी होते. ह्या मनुष्यांचें सारें जन्म व्यर्थ जातें. त्यांचें आयुष्य खुंटून ते लवकर मरण पावतात, किंबहुना ते केवळ मृतवत् असतात. ते आपल्या रात्री सुरा आदिकरून मादक पदार्थांचे सेवन, गाणेंबजावणें, नाचतमाशे, अत्तरगुलाब, पानसुपारी इत्यादिकामध्यें घालवितात, आणि मोठमोठाल्या मेजवान्या करून उत्तम उत्तम पक्कान्नाचें सेवन करितात. तरी त्यांच्या या ऐषआरामीपासून त्यांस वास्तविक सुख असें कदापि लाभत नाही

जो कोणी सदुद्योग करण्याचें मनावर घेऊन आपला प्रत्येक दिवस चांगल्या प्रकारें घालवील, त्याचें अल्पही आयुष्य मोठे दीर्घ झाल्यासारखें होईल. कारण मनुष्याच्या हातून किती सदुद्योग घडला, व त्यानें आपल्या जीविताचें साफल्य कसें काय केलें, हें पाहून त्याचें आयुष्य दीर्घ झालें किंवा अल्प झालें हें समजलें पाहिजे. आपण सगळ्या दिवसाचा चांगला उपयोग करून रात्रींतूनही कांहीं वेळ सत्कार्यी लावावा. मेजवानीप्रीत्यर्थ आणलेले पक्षी चांगले लठ्ठ व्हावे म्हणून त्यांस अंधारांत स्वस्थ बसवून ठेवण्याची वहिवाट आहे. अशीच गत, जे व्यायाम केल्यावांचून स्वस्थ निजून वेळ काढतात, त्यांची होते. आळसामुळें अंग फुगून, त्यांच्या गात्रात चरबी दाटून तीं नरम होतात, आणि त्यांचा अंगलोट अगदीं बेडौल होतो. त्यांच्या अंगाची कांतिही नष्ट होते, आणि ते एकाद्या आजारी माणसाप्रमाणें फिकट दिसतात. त्यांची शक्ति हळूहळू कमी होत जाते; आणि त्यांच्या देहांत अनेक विकृति उत्पन्न होतात. परंतु हे सारे अनिष्ट परिणाम केवळ गौण होत. याहूनही अनिष्ट परिणाम त्यांच्या मनावर होतात. कित्येक वेडसर होतात. कित्येकांला कांहींच नीट समजेनासे होतें. कारण ते सर्वदा डोळे झाकून अंधारांत पडून राहिल्यामुळें त्यांच्या बुद्धीस जाड्य येतें.

जे कोणी दिवसास कोठे तरी अंधारांत निजून रहातात, आणि रात्र झाली कीं उठून सगळे आन्हिक विधि उरकितात, आणि केवळ रात्रिंचरांप्रमाणें आपलें आयुष्य कंठितात, त्यांची फारच वाईट अवस्था होते. त्यांच्याठायी सर्व प्रकारच्या दुर्व्यसनाची वृद्धि होते. तीं त्यांस आवरता आवरत नाहींत. ते सर्व कांहीं गोष्टी निसर्गक्रमाविरुद्ध करूं लागतात. त्यांचा सदाचार सुटतो; आणि त्यांचें सारे आयुष्य बदफैलीत जातें. या लोकांच्याठायीं मद्यप्रीति अनावर होऊन ते मद्यपानांत अगदी दंग होऊन जातात, त्यांच्या तोंडांत सुराताईनें प्रवेश केला की मग त्यांना तिच्यावांचून कांहींच सुचेनासें होतें. क्षुधेने किंवा तृषेनें ते कितीही त्रस्त झाले असले तरी त्याची त्यांना मुळीच परवा वाटत नसते. याप्रमाणें रिकाम्या पोटांत मद्यरूप विषाचा प्रवेश होऊन तें त्यांचा देह अगदीं जाळून टाकितें. अशा रीतीनें अगदीं बेहोष होऊन मग ते भोजनास बसतात. पण त्यांची भूक अगदीं मेल्यामुळे त्याला फारसें अन्न जात नाही; आणि भोजन चालले असतां देखील ते मद्याचे प्याल्यांवर प्याले झोंकित असतात. यामुळे त्यांचें आरोग्य अगदीं बिघडून जातें. त्याचप्रमाणें इतर सर्व दुर्व्यसनाचा त्यांच्याठायीं अतिरेक होतो. मद्यादिकांच्या कैफाने बहुतेक बेशुद्ध होऊन ते भलभलते ढंग व अनाचार करितात. अशा प्रकारें ते सारी रात्र घालवितात, आणि उजाडलें म्हणजे अगदीं ग्लान व मलूल होऊन बिछान्यावर पडून रहातात. सूर्यास्त होऊन अंधार पडला म्हणजे या असामींचे फटफटीत उजाडतें. मग स्नानादि विधि उरकून व भोजन आटपून ते पुनः सहल करावयास निघतात. याप्रमाणें जनरीतीस सोडून वागण्यांतच ते मोठी फुशारकी मिरवितात. त्यांना वाटतें कीं, जगाच्या धोपट मार्गानें जाऊन सामान्य लोकांप्रमाणें आपले व्यवहार चालविण्यांत पुरुषार्थ तो कोणता? परंतु माझें मत पुसशील तर मी अशा मनुष्यास जिवंत असून मेलेलेच समजतों. जे दिवसाचा प्रकाश वर्जून रात्रीस दिव्याच्या उजेडानें आपले व्यवहार करूं पाहतात, त्यांची केवळ प्रेतवत् अवस्था असते. आतां हा अस्वाभाविक व निसर्गविरुद्ध क्रम हे बदफैल जन कां स्वीकारितात म्हणशील तर त्याला आपले भलभलते ढंग दिवसास हवे तसे चालविता येत नाहीत. त्यांची वृत्ति अगदीं बिघडलेली असली तरी त्यांस कांहीं तरी लोकलज्जा म्हणून वाटत असतेच. यासाठी सर्वजन झोपी गेल्यावर ते बाहेर पडून आपलीं दुर्व्यसनें यथेष्ट चालवितात. हा सर्व जनरीतीविरुद्ध आचार बदफैल लोकांकडून घडतो, याचे मुख्य कारण असें कीं, त्याला सुखाच्या लौकिक साधनांनीं सुखप्राप्ति होत नसते. यामुळें त्याला जगाच्या रीतीविरुद्ध कांहीं तरी करावेसे वाटतें. असें करण्यांतच त्यांना एकाप्रकारे पुरुषार्थ वाटतो. पुनः असें केल्याने लोकांत त्यांच्यासंबंधाने पुकारा होऊ लागतो. हा पुकारा त्यांच्या कानीं आल्याने त्यांना मोठी धन्यता वाटत असते. त्यांचे पेहराव, त्यांच्या गाड्याघोडीं, त्यांचें एकंदर ऐश्वर्य हीं पाहून जसे लोकांना नवल वाटतें, तद्वत्च त्यांचा हा विक्षिप्तपणा व विलास पाहून लोकांना कौतुक वाटतें. एवढ्याच गोष्टीने ते अगदीं चढून जातात. यासाठीच ते आपलीं सारी आन्हिक कर्मे रात्रीस उरकतात, आणि रात्रीचीं कामें दिवसास करितात. इतर लोकांच्या हातून चुकून व केवळ अज्ञानामुळे एकादी गोष्ट घडते, व तीबद्दल त्यांस मनापासून वाईट वाटत असतें. परंतु या रात्रिंचर अत्याचारी मनुष्यांस कुकर्म करण्यांतच मोठी फुशारकी वाटते; व त्या बद्दल त्यांचा दुर्लौकिक झाला असतां त्याचें त्यांस मुळींच वाईट वाटत नाहीं; तर उलट त्याविषयी त्यांस हर्ष वाटत असतो. तर हे ल्युसिलिअसा, ह्या अनाचारी पुरुषाचें अनुकरण करण्याचें आपण कधीं मनांत आणूं नये. निसर्गास अनुसरून जो वर्तनक्रम असेल, त्याचें आपण निश्चयानें अवलंबन करावें. त्यापासून कदापि च्युत होऊं नये. जे कोणी हा निसर्गक्रम सोडीत नाहींत, त्यांचे सर्व व्यवहार सुरळीतपणे व सुखाने चालतात. परंतु जे या क्रमाविरुद्ध वागतात, त्यांचें जीवित कष्टमय होतें.

◆◆◆

प्रकरण सतरावें

सणाचे दिवस

कित्येक सण असे येतात कीं, त्यांमध्यें लोक चांगली चांगली पक्वान्नें करून खातात व मद्यादिकांचें यथेष्ट सेवन करितात. याप्रमाणें घरोघर आहारविहारांची चंगळ चालली असतां जो मनुष्य आपलें मन आवरून धरून इतर लोकांप्रमाणे कोणत्याही फंदात पडत नाहीं, तर आपलें सारे आहारविहार नेमस्त राखितो, तो थोर मनाचा मनुष्य समजला पाहिजे. अन्य जनांस संमत असे सणाचे दिवस आपणही पाळावे. मात्र ते यांच्याहून निराळ्या रीतीनें पाळावे असें माझें मत आहे. आतां ते कसे पाळावे याविषयीं मोठमोठ्या ज्ञात्या पुरुषांचे जें मत आहे, तें मी तुला निवेदन करितों. कांहीं दिवस असे निवडावे कीं त्या दिवसांत अगदीं साधें, स्वस्त व थोडें अन्न त्वां भक्षण करावे, आणि अगदीं मोठेंघाटें वस्त्रप्रावरण अंगावर घ्यावें; आणि त्वां आपल्या मनाशीं असा विचार करावा कीं, ज्या गरिबीस लोक इतके भितात तिचा अनुभव एकंदरींत इतका वाईट नाहीं. आज धनधान्यादिकांची पूर्ण अनुकूलता असली तरी पुढें कदाचित तुला विपन्नावस्था प्राप्त होईल. यासाठीं ती भोगण्यास तुझ्या मनाची आजच तयारी असावी. तुला पुढें कधीं तरी जे संकटप्रसंग प्राप्त व्हावयाचे, त्यांस तोंड देण्याचें धैर्य तुझ्याठायीं आज समृद्धीच्याकाळीं विकास पावलेलें असावें. उदाहरणार्थ असें पाहा कीं, युद्धकुशल पुरुष शांतीच्याकाळी आपली शस्त्रविद्या सतत अभ्यासानें व एकमेकांशी लुटपुटीच्या लढाया करून जागृत ठेवितात. ते नाना प्रकारच्या कसरती व शस्त्रांच्या कारवी करून आपल्या देहाला चांगला व्यायाम होईल असें करितात. मनातला हेतु कीं, युद्धप्रसंग आला असतां, त्यांला आपलें युद्धकौशल्य उत्तम प्रकारें दाखविता यावें. हाच नियम सर्व प्रकारच्या अभ्यासास लागूं आहे. कोणताही घोर प्रसंग आला असतां, त्यास मनुष्यानें घाबरू नये असें असल्यास त्यानें त्या प्रसंगाचा थोडथोडा अनुभव पूर्वींपासून घेतलेला असावा. जे दारिद्र्याचा प्रतिमासीं थोडथोडा अनुभव घेत रहातात, त्यांना साक्षात् दारिद्र्य प्राप्त झालें असतां कांहींएक भीति वाटेनाशी होते. एकाद्या अगदीं गरीब मनुष्यांप्रमाणे त्वां शिळे व रुक्ष अन्न खाण्याची संवय करावी; एवढेंच नव्हे तर तुझा पोषाख व निजावयाचा बिछाना ही सुद्धा अगदीं गरीब मनुष्यासारखीं असावीं. हें असें व्रत त्वां महिन्यांतून तीन चार दिवस चालवावें. परंतु हें व्रत केवळ करमणुकेसाठी त्वां आचरू नये. तर तुला अशा स्थितींत काळ कंठण्याचा सराव व्हावा म्हणून त्वां त्याचें अवलंबन करावे. असें व्रत वेळोवेळा आचरिल्यानें तुझ्या ध्यानांत येईल कीं, आपला निर्वाह अगदीं थोड्या वस्तूंनीं होण्यासारखा असतो. तो चालविण्यास आपणांला मोठ्या वित्ताची मुळींच आवश्यकता नसतें. दैव कितीही प्रतिकूल असलें तरी आपला चरितार्थ चालण्यास कांहींएक

अडचण पडणार नाहीं. हा असा अनुभव आल्यानें हे ल्युसिलिअसा, तुला मोठा आनंद होईल. आतां याप्रमाणे व्रताचरण करून दारिद्र्याचा अनुभव घेण्याचा त्वां सराव केल्यानें आपण मोठें सत्कृत्य केलें असें मात्र तूं समजूं नये. कारण जो हा दारिद्र्याचा अनुभव तूं महिन्यांतून तीन चार दिवस घेणार तेंच हजारों गरीब मनुष्यांस नित्यशः सोसावें लागत असतें. तुझे हें करणें इतक्यापुरतेंच प्रशंसनीय असतें कीं, तुला सर्व गोष्टींची अनुकूलता असून, तूं हें मुद्दाम करीत असतोस. दारिद्र्याचा अनुभव कधींकधीं घेत राहिल्यानें तें आपणांस कायमचे प्राप्त झालें असतां, सहन करण्यास अगदीं सोपे जातें. याचप्रमाणें दुसरेही संकटप्रसंग सोसण्याची तयारी आपण आजपासूनच करून ठेवावी हें चांगले. अशी तयारी आपण अगोदरपासून करून ठेवणार नाहीं तर दैवाच्या प्रतिकूलतेमुळें आपणांवर संकटप्रसंग आले असतां, आपण अगदीं घाबरून जाण्याचा संभव असतो. या जगांत साधेल तेवढा सुखानुभव घ्यावा असा उपदेश करणारा तत्त्ववेत्ता एपिक्युरस याचा असा क्रम असे कीं, तो वर्षांतून कांहीं दिवस उपवास करीत असे. तो आपल्या एका शिष्यास पाठविलेल्या पत्रांत असें लिहितों कीं, 'मीं आज दोन अडीच आण्यांत माझा सारा भोजनखर्च आटपला. तुरुंगांतील कैद्यांस देखील याहून अधिक भत्ता मिळत असतो. ज्यांना देहांतशासन व्हावयाचें असतें, त्यांच्या भोजनास सुद्धां याहून अधिक खर्च लागतो. कैद्यांस जे अन्नपाण्याचे हाल केवळ शिक्षेस्तव सोसावे लागतात, तेच मुद्दाम सोसण्याची जो आपण होऊन सवय लावून घेतो, तो मोठ्या मनाचा मनुष्य समजावा. असा क्रम त्यानें ठेविला असतां तो दैवकृत हानीस बिलकुल मोजीत नाहीं.' तर हे ल्युसिलिअसा, या थोर पुरुषाच्या मताप्रमाणें वर्तन ठेवण्यास त्वां लागलाच आरंभ करावा. तूं या व्रताकारणें कांहीं दिवस नेमूण ठेव. या दिवसांत त्वां सारा लौकिक व्यवहार सोडून देऊन स्वस्थ घरीं बसावें, आणि या वेळीं तुझें खाणेंपिणें, वस्त्रप्रावरण वगैरे अगदीं गरिबीचीं असावी. ह्याचप्रमाणे जे कोणी दरिद्रावस्थेमध्यें रखडत असतील, त्यांच्याशी त्वां परिचय करावा, आणि त्यांची वास्तविक स्थिति काय आहे तें विचारून घ्यावे. आपल्या ऐश्वर्याच्या ताठ्याने तूं कंगाल जनांचा धिक्कार करूं नये. तूं धनसंपन्न असूं नये असें मी म्हणत नाहीं, तर ती धनसंपन्नता त्वां तुच्छ लेखावी. आपण तिला कधीं तरी मुकू अशी भीति तुझ्या चित्तांत वसूं नये. यासाठीं ही धनसंपन्नता तुला अनुकळ नसली तरी तूं सुखाने रहाशील अशी त्वां आपली समजूत करून घ्यावी; आणि लक्ष्मी केवळ चंचल आहे, ती केव्हा जाईल याचा नेम नाहीं असें त्वां लक्षांत वागवावें; आणि ती अनुकूल नसली तरी आपलें कांहींएक अडावयाचें नाहीं असा तूं आपल्या मनाचा निश्चय करावा.

◆◆◆

प्रकरण अठरावें

असंतोषाचा निषेध

हे ल्युसिलिअसा या संसारामध्यें जीं मानीव अनिष्टें आहेत त्या सर्वांमध्यें आपल्या दैवास बोल लावून कुरकुर करीत बसणे हें मात्र खरें अनिष्ट होय. या निसर्गक्रमामध्यें आपणांस कांहीं तरी अपायकारक आहे असें जो मानितो, त्याच्यासारखा दुःखी मनुष्य दुसरा कोणीही नाहीं, असा माझा अभिप्राय आहे. ह्या संसारामध्यें एकादेसमयीं आपणांवर कोणताही खराच असह्य प्रसंग आला असतां, त्यामुळें आपल्या जीविताचाच मुळीं अंत व्हावयाचा. परंतु असा कोणता घोर प्रसंग आपणांवर कोसळण्यासारखा असतो बरें? व तो कोसळलाच तर त्यांत आपली इतिश्री होऊन दुसऱ्या अशाच अनिष्ट प्रसंगांपासून आपण नाहीं काय अक्षयींचे सुटणार? लोकांच्या समजुतीप्रमाणें जे अनिष्ट प्रसंग आपणांवर येतात, ते विवेकदृष्टीने पाहिले असतां त्यांचें अनिष्टत्व व्यर्थ आहे असें आपल्या लक्षांत येतें. मला एकादा आजार जडला तर मी असें मानीन कीं, हा माझ्या दैवासच लागलेला आहे. माझ्या कुटुंबांतील माणसांस कांहीं क्लेशकारक अशा विकृति जडल्या, सावकारानें अव्वाच्या सव्वा व्याज आकारून व माझ्यावर पुष्कळ देणें काढून माझ्या घरादाराचें लिलांव केले, माझें घर मजवर एकाएकीं कोसळून पडलें, मला मोठमोठ्या जखमा झाल्या, मजवर मोठे जिवावरचे प्रसंग आले, तर मी असें मानीन कीं, ह्या गोष्टी मनुष्यास नेहमी घडत असून त्या केवळ क्षुल्लक होत. मानवी संसारांत त्या आपल्या नेहमी घडावयाच्या त्यांत विलक्षण असें कांहीं नाहीं. त्या केवळ निसर्गक्रमाप्रमाणेंच घडत असतात. मुद्दाम मलाच तेवढा त्रास देण्याकरितां त्या कोणी घडवीत नसतो. दुसरें असें कीं, मी स्वतांला या विश्वाचा एक अंश समजतों. यास्तव जे कांहीं अनिष्ट व कठीण भासणारे प्रसंग मजवर येत असतात, ते सर्व ह्या विश्वक्रमाप्रमाणें घडत असतात. यासाठीं त्यांमुळें मी कदापि कष्टी होणार नाहीं. तर ते मी मोठ्या धैर्याने सोशीन. अशा प्रसंगीं मी आपलें समाधान तिळप्रायही कमी होऊं देणार नाहीं, व शोकवश होणार नाहीं. ज्या गोष्टींबद्दल आपण खेद करितों व भय बाळगितों, त्या साऱ्या या आपल्या जीवितास लागलेल्या आहेत. त्या सहन केल्यावांचून आपणांस गत्यंतर नाहीं. त्यापासून सुटण्याची कोणीं कधीं आशा करूं नये, किंवा त्या टाळण्यासाठी कोणा देवतेची काकळूत करूं नये. हे ल्युसिलिअसा, तुला एकादा आजार झाला असतां, किंवा एकादेसमयीं अन्नद्वेष होऊन कोणत्याच प्रकारच्या अन्नावर तशी इच्छा जाईनाशी झाली असतां, त्याबद्दल तूं त्रास पावूं नये. ह्या गोष्टी नेहमी घडावयाच्या. त्याबद्दल उद्वेग पावण्यांत काय अर्थ आहे? तुला सांप्रत आपल्या जिवाची भीति वाटत आहे. परंतु तूं हें लक्षांत आण कीं आपलें आयुष्य दीर्घ व्हावें अशी जी तुझी इच्छा होती तदनुसार तुला सांप्रत वृद्धत्व

प्राप्त झालें असून या वृद्धत्वास अनुरूप अशी व्यंगता तुझ्या ठायीं आली आहे. ही व्यंगता म्हणजे तुलाच नव्यानें प्राप्त झाली आहे असें नाहीं, तर जो कोणी वृद्ध होतो त्यास ती नियमाने प्राप्त व्हावयाची. आपण एकादा लांबचा प्रवास करावयास निघालो असतां मार्गातील धुरळ्यानें, चिखलानें व पावसानें आपली वस्त्रे वगैरे मलीन झाली तर त्याबद्दल जसे आपण नवल मानीत नाहीं, तद्वत्च जठरावस्थेंत आपल्याठायीं विकलता उत्पन्न झाली असतां, तीबद्दल आपण खेद पावणें योग्य नव्हे. तूं म्हणत असशील कीं, 'मी आणखी पुष्कळ वर्षें जिवंत राहू इच्छितों. पण दीर्घायुष्यामुळें गात्रांस प्राप्त होणारी शिथिलता किंवा दुसरी कोणतीही गैरसोय सोसण्यास मी तयार नाहीं. परंतु हें तुझें म्हणणें मर्दपणास शोभत नाहीं. हे ल्युसिलिअसा, माझें तुला असें सांगणें आहे कीं, तुला जें वैभव अनुकूल आहे, त्याच्या धुंदींत मनास वाटेल तसें वर्तण्याची इच्छा त्वां कदापि करूं नये. आम्हां मानवांचें जीवित हा मोठाच समरप्रसंग होय. या समरामध्यें ज्या कोणांस इकडूनतिकडे धांवपळ करावी लागत असते, मोठमोठ्या उंच व बिकट ठिकाणी चढावे उतरावे लागत असतें, हातावर शीर घेऊन मोठमोठीं धोक्याची कामे करावीं लागत असतात, त्यांच्या शौर्याची ख्याति होऊन, त्यांस इतर सैनिकांचें प्रमुखत्व प्राप्त होणें योग्य होय. परंतु स्वबांधव प्राणसंकटामध्यें सापडून कष्ट पावत असतां, जे आपल्या घरीं स्वस्थ बसून सुखासमाधानामध्यें कालक्रमणा करूं पाहतात, त्यांचे जीवित केवळ निंद्य होय.

◆◆◆

एपिक्टेटसची बोधवचने

पुस्तक पहिलें

संसारयात्रा

निसर्गाचा असा क्रम दिसून येतो कीं, जें नीतीस अनुसरून असतें तें उपयुक्तही असावयाचें.

खरें पाहता या विश्वातील वस्तु व व्यापार बरे किंवा वाईट म्हणतां येत नाहींत. परंतु त्यांचा उपयोग मात्र मनुष्याकडून बरा किंवा वाईट होत असतो. असा विचार करून मनुष्यानें आपलें चित्त शांत व स्थिर ठेवून ऐहिक गोष्टींस मनापासून जपावें. कोणत्याही गोष्टींविषयीं बेपरवाई किंवा अविचार त्याने दर्शवूं नये. ही गोष्ट फांसे खेळणारांचे उदाहरण देऊन स्पष्ट करूं. फांसे व त्यांवरच्या खुणा पाहिल्या तर त्यांत कांहींच अर्थ नसतो. बरें फांसे कसे पडतील याचाही कांहीं नेम नसतो. परंतु फांसे पडल्यावर त्यांवरच्या खुणा नीट बारकाईनें पाहून खेळणारे आपला खेळ चालवितात. आपण आपल्या संसारातही असेंच सर्वदा वर्तन ठेविलें पाहिजे. ज्या वस्तु या सृष्टीमध्यें आहेत, व जे व्यापार निसर्गक्रमास अनुसरून नित्यश: घडत आहेत, त्यांत पालट करण्याचें सामर्थ्य आपल्याठायीं नाहीं. तेव्हां त्यांचें ज्ञान करून घेऊन त्यांच्या अनुरोधानें आपण वर्तन करावें हें योग्य होय. ऐहिक बाह्य गोष्टी आपणांस कितीही अनुकूळ किंवा प्रतिकूळ असल्या तरी त्या बऱ्या किंवा वाईट म्हणणें रास्त नव्हे. तर बरेंवाईट जें निवडावयाचें तें सारें आपल्या अंतर्यामीं असतें; आणि ह्या अंतर्यामावर आपला पूर्ण ताबा असतो. या अंतर्यामाव्यतिरिक्त जेवढे कांहीं आहे तेवढें बरें किंवा वाईट, हितकर किंवा अहितकर म्हणूं नये.

असें आहे तर मग आम्हीं बाह्य गोष्टींविषयीं उदास असावें कीं काय? नाहीं. बाह्य गोष्टींविषयीं उदासीन होणे हें निसर्गक्रमास विरुद्ध असून, हा आपला मोठाच दोष होय. अशा गोष्टींची अवश्य परवा करावी. तरीपण त्यांमुळें चित्ताची शांति व स्थिरता त्या ढळू देऊं नयेत. कारण ज्या गोष्टींचा माझ्या हिताहिताशी वास्तविक संबंध असतो, त्यांच्या संबंधानें मला कोणाकडूनही हरकत व्हावयाची नाहीं, किंवा कोणी मजवर जुलूम करावयाचा नाहीं. परंतु ज्या गोष्टी प्राप्त करून घेण्यासंबंधानें मला इतरांकडून हरकत किंवा जुलूम होण्यासारखा असतो, त्या माझ्या स्वाधीनच्या नसून बऱ्याही नव्हत किंवा वाईटही नव्हत. पण या गोष्टींचा बरावाईट उपयोग करणें आपल्या हातचें आहे. बाह्य गोष्टींकडे लक्ष पुरवून त्यांचें ज्यांस अवधान धरावें लागतें, त्यांच्या चित्ताची स्थिरता कायम रहाणें मोठे कठीण आहे खरें; परंतु तें अशक्य नाहीं. आणि ज्यास ते अशक्य वाटत असेल, त्याला खरे सौख्य लाभावयाचें नाही.

मनुष्य कोणतीही गोष्ट करूं लागला असतां, तो आपल्या सामर्थ्याचाच तेवढा विचार करून रहात नाहीं, तर तिच्या सिद्धीचाही तो अवश्य विचार करितो, क्रिसिपस असें म्हणतो कीं, पुढें घडणाऱ्या गोष्टींचें

जोपर्यंत मला ज्ञान होण्याचा मार्ग नाहीं, तोपर्यंत ज्या गोष्टी निसर्गक्रमास अनुसरून आहेत, त्या मिळविण्यास जी स्थिति अतिशयित अनुकूळ असेल, तिचा मी अवलंब करीन. असें करूनही एकादा अनिष्ट प्रसंग मजवर आला असतां त्यास मी सर्वदा तयार असेन. त्यामुळें यत्किंचित्ही कष्ट पावणार नाही.

धान्य पेरले असतां त्यास जी कणसें येतात, तीं पक्व होऊन वाळलीं म्हणजे तोडावीं लागतात. तीं न तोडितां तशींच ताटांवर राहूं दिल्यास त्यांचा काय उपयोग बरें? त्यांनीं ताटांवरच्या ताटांवर वाळून सडून जावे म्हणून तीं निर्माण झालेली असतात काय? समजा कीं, त्यांस मनुष्यांप्रमाणे ज्ञान असून, त्यांनी आपणांस तोडूं नये अशी देवाची प्रार्थना केली असती, तर ती योग्य झाली असती काय? कणसें कधीही न तोडितां तशींच ताटांवर राहू देणें त्या कणसांला मोठेंच अनिष्ट होय. अशीच गोष्ट मनुष्याचीही आहे. कणीस जसें पक्व झाल्यावर तोडिलेंच पाहिजे तसेंच मनुष्यास वृद्धत्व आलें असतां मरण प्राप्त व्हावें हें रास्त असून त्यांत कांहींएक अनिष्ट नाही. असें असतां या मरणभीतीनें आपल्या चित्तास विनाकारण क्षोभ होत असतो याचें कारण एवढेच कीं, आपणांस आपल्या व स्वतांच्या संबंधाचे ज्ञान मुळींच नसतें. ज्या गोष्टी आपणांस अवश्यमेव घडाव्याच्या, त्या निमूटपणें सोसण्याची कोणाचीही तयारी नसते. त्या प्राप्त झाल्या असतां त्याबद्दल आपण शोक व आक्रोश करितों. परंतु त्या सहन केल्यावांचून गति नसते. अशा प्रकारें आपण निरुपाय झालों म्हणजे हें आपलें नशीब असें आपण म्हणतों. पण जें अवश्यमेव घडावयाचें त्यासच जर नशीब म्हणावयाचे, तर आपणांस घडणाऱ्या सर्वच गोष्टी तशा होत परंतु जर कोणी असें म्हणेल कीं, जेवढ्या क्लेशद गोष्टी आपणांस घडतात, तेवढ्यांसच नशीब म्हणावें, तर त्याचें असें समाधान करावयाचें कीं, जें जन्मास आलें त्यास मरण नेमलेलें आहे. यास्तव तें अनिष्ट म्हणतां येत नाहीं. परंतु कोणीं असें म्हणेल कीं, आपण शत्रूच्या तलवारीच्या वारानें मेलों किंवा रस्त्याने चाललो असतां गाडीखाली सापडून गतप्राण झालों किंवा नौकेत बसून चाललों असतां समुद्रांत पडून मेलों, किंवा एकाद्या अपघातानें प्राणांस मुकलों, किंवा एकाद्या जुलमी राजानें विनाकारण देहांतशासन केलें, तर आपणांस दुःख होऊं नये काय? यावर असें समाधान आहे कीं, हा मृत्युलोक सोडून निजधामास तूं कोणत्याही मार्गानें गेलास तरी सारखेंच. खरें म्हटलें असतां एकाद्या वैऱ्याच्या किंवा जुलमी राजाच्या हातून त्वरित मरण प्राप्त झालें असतां तें सर्वात उत्तम होय. हा निजधामाचा मार्ग अगदीं जवळचा होय. कोणी जुलमी राजा आपल्या मानेवर तलवार ठेवून ती सहा महिनेपर्यंत कापीत राहिला असें कधीं झाले आहे काय? पण एकादा ज्वर लागला असतां, त्यामुळें मनुष्य वर्षसहा महिने खितपत पडून व पुष्कळ हाल सोसून शेवटीं मृत्यू पावतो. हे निरनिराळे मरणप्रसंग आपणांस इतके भयावह वाटतात याचें कारण एवढेच कीं, त्यांचें वर्णन ज्या शब्दादिकांच्या योगानें केलेलें असतें, त्यांमुळें आपल्या चित्तांत भलत्याच कल्पना उद्भवतात. खरें पाहतां त्यांत भिण्याजोगें कांहींच नाहीं.

आपण जलप्रवासास निघालों असतां, जशी सर्व प्रकारची सावधगिरी घेऊन मग नौकेवर पाय ठेवितों, तसेंच आपणांस या संसारांत सर्वदा वर्तन केलें पाहिजे. जलप्रवासास निघतांना आम्ही पहिल्यानें नौका कशी काय आहे तें पाहतों; मग तीवरचा तांडेल व खलाशी हे आपआपल्या कसबांत पुरे वाकबगार आहेत कीं नाहींत याची चौकशी करितों; आणि शेवटीं कोणता दिवस व कोणता तास नौका हांकारण्यास अनुकूळ

आहे तें मुकरर करून मग नौकेवर चढतों. याप्रमाणें सर्व गोष्टींचा अगोदर तपास करून जलप्रयाण करीत असतां, मध्येंच मोठें वादळ झालें, तर त्याला आमचा काय बरें इलाज? जेवढी खबरदारी आम्हांला घेता आली तेवढी सारी आम्ही घेऊन चुकलो. आतां या तुफानांतून पार पाडून नेणें हें तांडलाचें काम. पण दैवयोगानें त्या तांडलाचा कांहींएक उपाय न चालून, तारूं फुटून बुडूं लागलें तर त्याला आम्ही काय करावें बरें? अशा समयास आमचें काम एवढेच कीं, आम्ही लवमात्रही घाबरूं नये, व मोठ्यानें किंकाळी फोडून देवाला किंवा दैवाला विनाकारण दोष देऊं नये. तर जो जन्मास आला तो एक वेळ अवश्य मरावयाचा, हा सिद्धांत ध्यानांत आणून मोठ्या धैर्यानें मरणास सिद्ध व्हावें. कारण मी कांहीं अमर नव्हें; तर मनुष्यजातीचा एक प्राणी असून विश्वाचा एक अत्यल्प अंश आहें. जसा तास हा दिवसाचा एक अंश असून, तो प्राप्त होऊन लवकरच निघून जातो, तद्वत् माझी अवस्था आहे. अशी जर माझी वास्तविक अवस्था आहे, तर मला कोणत्याही प्रकारें मरण प्राप्त झालें तरी म्यां त्यास का भ्यावे? मी बुडून मेलों काय, आणि ताप येऊन बिछान्यावर पडून मेलों काय सारखाच. कोणत्याना कोणत्या मार्गानें माझ्या ह्या जीविताचा एक वेळ अवश्य शेवट व्हावयाचा. मग तो कसाही झाला तरी त्यांत माझें काय बिघडलें?

वस्तुमात्राचे वास्तविक स्वरूप लक्षांत आणावें

जी वस्तु पाहून तुझें चित्त मोहित होतें, किंवा जीमुळें तुझें कांहीं तरी हित होतें, किंवा जी तुला प्रिय वाटते, तिचें वास्तविक स्वरूप काय आहे, तें लक्षांत आणून मग तिजविषयीं बोलत जा. उदाहरणार्थ, एकाद्या सुंदर काचपात्रावर तुझें मन बसलें असतां, तें काचेचें पात्र असून, तें केव्हा तरी पटकन् फुटावयाचे असें तुझ्या स्मरणांत असलें म्हणजे मग तें कधीं धक्का वगैरे लागून फुटल्याने तुला इतकें वाईट वाटावयाचें नाही. अशीच गोष्ट तुझ्या प्रिय बालकाची किंवा स्त्रीची आहे. तीं मरणाधीन आहेत हें तूं मनांत वागवून त्यांवर प्रेम करीत असलास तर त्यांच्या मरणकृत वियोगानें तूं कष्टी होणार नाहींस.

तूं एकादे कृत्य करण्यास उद्युक्त झालास तर त्या कृत्याचें एकंदर स्वरूप मनांत आण; म्हणजे मग तें करितांना ज्या इष्टानिष्ट गोष्टी घडावयाच्या, त्यांमुळे तुझे चित्त व्यग्र होणार नाहीं.

सामान्य मनुष्याचें एकादें बालक, बंधु किंवा पिता मृत झाला असतां, तो क्लेश पावून स्वतांस हतभाग्य समजतो. परंतु असाच एकादा प्रसंग ज्ञानी पुरुषावर आला तर तो सहसा क्लेश पावत नाहीं. तो असा विवेक करितो कीं, प्रियजनवियोगामुळें मला कदापि पीडा होणें नाहीं. तर माझें मनच सर्व पीडेचें कारण आहे. बाह्य वस्तूंनी माझ्या मनाला क्लेश पोंचावयाचा नाहीं. पण त्यांत भ्रांतिमूलक कल्पनांचा प्रवेश होऊन, तें विनाकारण त्रस्त होत असतें. हा असा विवेक आपल्याठायीं प्रतीत होऊन, प्रत्येक दुःखप्रसंगाच्या वेळीं आपल्या मनास दोष देण्याचा क्रम ठेविल्यास, आपली उन्नति निश्चयानें व्हावयाची. परंतु आपली वृत्ति मूळारंभापासून या क्रमाविरुद्ध झालेली असते. आपण बाल्यावस्थेत अतां पायाखाली पाहिल्यावांचून चालल्यामुळे ठेच लागून पडलो तर आपली आई किंवा दाई आपणांस इकडेतिकडे पाहत चालल्याबद्दल दोष देण्याऐवजी, ज्या दगडास पाय अडखळून आपण पडलों असतो, त्या दगडास मारीत सुटते! पण त्या निर्जीव दगडाने काय केलें असतें बरें? मुलाच्या वेडेपणासाठीं त्या दगडाने वाटेंतून एकीकडे व्हावयाचें

होतें काय? हा आपला वेडेपणाचा क्रम अगदीं बाळपणापासून वृद्धपणापर्यंत चालू असतो; आणि खरें पाहतां ज्याच्या चित्तावर ज्ञानाचा योग्य संस्कार झालेला नसतो, तो कितीही वयोवृद्ध असला तरी केवळ बालच होय.

मनुष्यास जी कोणत्याही गोष्टीपासून पीडा होते, ती त्या गोष्टींचा परिणाम नव्हे, तर तीविषयीं आपला जो भ्रामक अभिप्राय झालेला असतो, त्यामुळें आपलें चित्त विषाद पावतें. उदाहरणार्थ मरण जें आहे तें भयावह नाहीं. तें वस्तुत तसें असतें तर सॉक्रेटिसाला तें तसें भासले असतें. परंतु खरें पाहता मरणाविषयीं जो जनांचा सामान्यतः अभिप्राय असतो, तोच केवळ भयोत्पादक असतो. यासाठीं एकाद्या गोष्टीपासून आपणांस प्रत्यवाय घडला असतां, किंवा तीमुळें आपणांस दुःख अथवा त्रास झाला असतां, आपण त्याबद्दल आपणांवांचून इतर कोणांसही दोष देणें रास्त नव्हे. कारण त्या गोष्टीसंबंधानें आपल्या मनांत भ्रममूलक कल्पना येऊं द्यावी हाच मुळी आपला अपराध होय. ज्यास सत्यज्ञानप्राति झालेली नसते, तो स्वतांस कांहीं कष्ट झाले असतां, इतरांस निरर्थक दोष देत असतो. परंतु ज्यास हें ज्ञान प्राप्त होतें, तो त्याबद्दल स्वतांसच दोष देऊं लागतो; आणि ज्याच्या ठायीं सत्यज्ञान पूर्णपणे उदित होतें, तो मग आपणांस किंवा इतरांस कोणांसही दोष देईनासा होतो.

कोणत्याही बाह्य गोष्टींच्या संबंधाने तुला श्रेष्ठत्व प्राप्त झालें असलें तर त्याबद्दल गर्व वाहूं नको. तुझा एकादा अश्व आपल्या सुबक बांध्याबद्दल गर्व करील तर तो त्यास शोभण्यासारखा आहे. परंतु असा सुंदर अश्व मजपाशीं आहे म्हणून जर तुझ्या मनांत गर्व उत्पन्न झाला, तर त्वां आपल्या मनाशीं असा विवेक करावा कीं, माझ्या अश्वाचा चांगुलपणा पाहूनच मीं एवढा गर्वानें फुगून गेलों आहें खरा, पण त्यांत माझा स्वतांचा कांहींच चांगुलपणा नाहीं. तर मी आपलें अंतर्याम निर्दोष करून आचरणाची शुद्धता राखण्यास मनापासून झटावें. अशा रीतीनें प्राप्त होणाऱ्या चांगुलपणाचा मीं अभिमान बाळगावा हें युक्त होय. रामदास म्हणतो, **'सांडितां विवेकें मिथ्या अभिमान । तरी समाधान पावशील.'**

मनुष्यानें धैर्यवानहीं असावें व भीरुही असावें

कित्येकांना हा शिरोलेख विरोधात्मक वाटण्याचा संभव आहे. परंतु या दोन्ही वृत्ति चित्तांत वागवून आपणांत हवी ती गोष्ट करितां येण्याजोगी आहे किंवा कसें तें चांगले सूक्ष्म दृष्टीनें पाहूं. कारण भयवृत्ति व धैर्यवृत्ति ह्या परस्परविरुद्ध असून, त्या एकसमयावच्छेदेंकरून एकत्र बसतील असें वाटत नाहीं. परंतु हा सिद्धांत सामान्य जनांस असंभवीसा वाटला तरी तो मला तसा वाटत नाहीं. सृष्टीमध्यें जे व्यापार घडत असतात, त्यांचा बरावाईट उपयोग करून घेणें आपल्या हातीं असतें. परंतु हे व्यापार आपल्या इच्छेप्रमाणे घडण्याचा संभव नसतो, यास्तव ते चांगले किंवा वाईट म्हणणें योग्य नव्हे. अशा व्यापारांच्या संबंधानें आपण धैर्य दर्शवावें; आणि ज्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या असतात, त्यांच्या संबंधाने भिऊंन वागावें. कारण आपली बुद्धि जशी बरीवाईट असेल, तसें आपल्या हातून बरेंवाईट वर्तन घडण्याचा संभव असतो. यास्तव ही बुद्धि शुद्ध राखण्यासाठीं नेहमी सावधगिरी ठेविली पाहिजे. आपल्याठायीं दुर्बुद्धीचा विकास होण्याची अपणांस सर्वदा भीति वाटावी हे उचित होय. आतां ज्या गोष्टी आपल्या हातच्या नसतात, त्या कितीही प्रतिकूळ असल्या तरी त्या धैर्यानें सहन करणें इष्ट होय. यावरून पाहतां उभय वृत्ति आपणांस एकेच वेळीं प्रगट करणें कसें प्राप्त होतें हें चांगले लक्षांत येईल.

असें आहे तरी आपण वनमृगांप्रमाणें सर्वदा नाश पावत असतों. पारधी लोक मृगांस भेडसावण्याकरितां एके बाजूस कांहीं तरी उभें करीत असतात, आणि दुसरे बाजूस जाळीं पसरून ठेवीत असतात. या भयोत्पादक वस्तु पाहून ते बिचारे मृग मागें पळत सुटतात. पण मागें परततात तों जाळ्यांत सांपडून नाश पावतात. याप्रमाणें ज्या वस्तूंस त्यांनीं खरें पाहतां भिऊं नये, त्यांपासून पलायन करून, ज्यांस त्यांनीं भ्यालें पाहिजे, त्यांत सांपडून मरण पावतात. आम्हां मानवांचीही अवस्था अशीच आहे. ज्या गोष्टी आपल्या सामर्थ्याबाहेरच्या असतात, त्यांसंबंधानें आपण विनाकारण भय प्रगट करितो; आणि ज्या गोष्टी आपल्या आटोक्यांतल्या असतात, त्यांविषयीं आपण बेपरवा असतो आपण आपलें चित्त कितीही व्यग्र होऊं दिलें, कितीही अविचार केला, एकादें लज्जास्पद कर्म करण्यास कसेही प्रवृत्त झालो, एखाद्या वस्तूच्या लोभास गुंतून कशीही खटपट केली, तरी त्यापासून आपल्या सामर्थ्याच्या बाहेरची कोणतीही गोष्ट साध्य होण्यासारखी किंवा टाळण्यासारखी नाही. आपणांवर एकादा दुर्धर प्रसंग गुदरला, किंवा एकादा रोग किंवा अपघात होऊन असह्य पीडा होऊं लागली, किंवा मरणसमय प्राप्त झाला, किंवा देशत्याग करून कोठे तरी परागंदा व्हावे लागलें, किंवा कोणत्या तरी कारणावरून आपला दुर्लौकिक चोहोंकडे पसरला, तर आपणांस अतिशयित दुःख होऊन ह्या गोष्टी टाळण्याचा आपण प्रयत्न करितों. हें कांहीं चांगले नव्हे. ज्या गोष्टींच्या संबंधांने आपण धीटपणा दाखविला पाहिजे, त्यासंबंधानें तो न दाखविता, त्याचा अस्थानी प्रयोग केला असतां, अविचार, निर्लज्जपणा, कर्तव्यपराङ्मुखता, वल्गना करण्याची बुद्धि इत्यादि दोष आपल्या अंतर्यामी उत्पन्न होतात; आणि ज्या गोष्टीसंबंधानें आपण भीति बाळगिली पाहिजे, त्यासंबंधानें ती मुळींच मनांत येऊं दिली नाहीं तर आपल्याठायीं भ्याडपणा, नीचपणा इत्यादि वृत्ति उत्पन्न होऊन, आपण सर्वदा भीति व दुःख यांनी त्रस्त होत असतों. स्वतांच्याठायीं असद्वृत्तींचा विकास होऊन, हातून असत्कर्म घडण्याची ज्याला भीति वाटते, त्याला स्वतांच्याठायींच्या दुराचारप्रवृत्तीस प्रतिरोध करण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल. परंतु ज्या गोष्टी त्याच्या शक्तीबाहेरच्या असतात, त्यांविषयीं जो भीति बाळगितो, तो त्यांचें निवारण करण्याचा व्यर्थ प्रयत्न करून मनास नसती अस्वस्थता व त्रास हीं करून घेतो, आणि सर्वदा भयाकुल होतो. वस्तुतः पाहतां देहास होणारी एकादी पीडा किंवा मरण ही कांहीं साक्षात् भयप्रद नसतात तर या गोष्टींची अनिष्ट कल्पनाच तेवढी भयंकर असते.

यासाठीं मरणासारख्या परस्वाधीन गोष्टींसंबंधानें आपण धीट असावें; आणि त्यांसंबंधाच्या असत्य कल्पना मनांत न येऊं देण्यासाठीं झटावें. भीति बाळगावयाची ती या भासमय कल्पनांसंबंधाची. परंतु आपलें वर्तन याच्या उलट असतें. मरणादिकांस आपण भितों, परंतु या अनिष्टशा वाटणाऱ्या गोष्टींसंबंधाच्या कल्पनांविषयीं आपण बेपरवा, निष्काळजी व उदास असतों. अशा गोष्टींला सॉक्रेटिस केवळ बागुलबावा म्हणत असे. मुले एकाद्या गोष्टींविषयी हट्ट घेऊन रडूं लागलीं म्हणजे त्याला भय घालण्याकरितां कांहींतरी वेडेवांकडे सोंग दाखवितात अणि त्यांना त्याचें खरें स्वरूप ठाऊक नसल्यामुळें त्यात भिऊन तीं चूप होतात. आमची या संसारांत अशाच प्रतीची वागणूक असते. आपण मरणादि सृष्ट व्यापारांस अज्ञानास्तव विनाकारण घाबरून जात असतों. मूल जसें बागुलबावाच्या खऱ्या स्वरूपाविषयीं अज्ञान असतें, तद्वत् या नैसर्गिक

व्यापारांसंबंधानें आपलें अज्ञान असतें. मरण हा एक बागुलबावाच आहे. त्याचें खरें स्वरूप नीट तपासून पाहा. आज किंवा पुढें केव्हां तरी ह्या देहापासून आत्म्याचा वियोग अवश्य झाला पाहिजे. असा हा जडचैतन्याचा वियोग आजपर्यंत होत आला असून पुढेही तो तसाच होत रहावयाचा. असें आहे त्यापेक्षां हा वियोग आजच घडला तर त्याबद्दल त्वां आपलें चित्त कां म्हणून क्षुब्ध होऊं द्यावे? तो आज व्हावयाचा राहिला तरी तो पुढे कधीं व्हावयाचा नाहीं काय? या सर्व विश्वाचाच मुळी असा क्रम आहे की, आज जें वस्तुजात आहे, त्याचा कालांतरानें प्रलय होऊन पुनरपि नूतन वस्तुजात निर्माण व्हावयाचें. हा उत्पत्तिप्रलयाचा क्रम अनदिकालापासून अप्रतिहत चालला असून, पुढेही तो अनंत कालपर्यंत असाच चालू रहावयाचा. त्यास कदापि खळ पडणे नाहीं. असा जर सर्व विश्वाचा क्रम आहे, तर त्यापुढें आपल्या ह्या क्षुद्र देहाचा तो काय पाड? हा आपला देह पाहिला असतां, तो अनेकविध विकृतींचें केवळ माहेरघर आहे. अशा विकारवश जीविताचा अंत व्हावा असें पुष्कळांस वाटत असतें. अशा जनांस हा मृत्युरूप दुःखनिवृत्तीचा मार्ग चांगला आहे. परंतु ज्यांस या देहांत राहून कांहीं सुख वाटत असेल, त्यांनी त्याच्या अनुषंगानें असणाऱ्या पीडाही सहन करण्यास तयार असावें; तरी अशा जनांनी कधीं तरी अवश्यमेव प्राप्त होणारें जें मरण त्याविषयीं कदापि भीति बाळगूं नये; तें प्राप्त झालें असतां त्यास धैर्यानें सिद्ध व्हावें.

यावर कोणी असा प्रश्न करील कीं, 'तर मग म्यां इतउत्तर जिवंतच राहूं नये कीं काय?' या प्रश्नास माझें असें उत्तर आहे कीं, त्वां अवश्य जिवंत रहावे. परंतु इतर वस्तुमात्रांप्रमाणें विश्वाला तुझी आवश्यकता आहे म्हणून त्वां अस्तित्वांत रहावें. या विश्वांत केव्हां निर्माण व्हावें हें जसे तुझ्या इच्छेवर अवलंबून नव्हतें, तद्वत्च तुला येथें किती दिवस रहाणें आहे तें ही तुझ्या इच्छेवर अवलंबून नाहीं.

या सर्व विचारांचा ज्यांच्या हृदयावर सुपरिणाम होतो, आणि ज्याला त्यांतील खरें रहस्य समजते, त्यांना शांति, धैर्य आणि मुक्ति हीं प्राप्त होतात. सामान्य जनांची अशी समजूत आहे कीं, दासादि जे हीन गणिलेले जन आहेत, त्यांला हे तत्वविचार शिकवूं नयेत. परंतु जो खरा ज्ञाता आहे तो असें समजतो कीं, ज्या पुरुषास हे विचार अवगत होतात, तो कोणत्याही दर्जाचा असला तरी त्यास खरें श्रेष्ठत्व व स्वातंत्र्य हीं प्राप्त होतात. खरा स्वतंत्र तो होय कीं ज्यास आपल्या मनावर ठसलेल्या विचाराप्रमाणे वर्तन करितां येतें. दुराचारी व्हावें असें कोणालाही मनापासून वाटत नसतें. तथापि दुराचारप्रवृत्ति किती जणांची सुटलेली असते बरें? तेव्हां अशा मनुष्यांस कोण स्वतंत्र म्हणेल? त्याचप्रमाणे दुःख, चिंता व भय यांपासून जो मुक्त झाला तो खरा स्वतंत्र समजावा. ज्याच्याठायीं ह्या वृत्ति कायम असतात, त्याला कदापि स्वतंत्र म्हणतां येणार नाहीं. असा मनुष्य दास्याचा अनुभव घेत आहे असें मानिल्यास चालेल. आपल्या या देशच्या कायद्याप्रमाणें पाहतां दासांस पढवूं नये असें आहे. परंतु तत्वज्ञांच्या मतें ज्यास ज्ञानप्राप्ति होऊन तदनुसार वर्तन करण्याचें सामर्थ्य आलें नाहीं, त्यास दासांमध्यें गणावें असें आहे. ज्याच्या चित्तास शांति प्राप्त झाली नाहीं, त्यास कोण श्रेष्ठ व स्वतंत्र म्हणेल? कोणास द्रव्य संपादण्याची हांव सुटून ते द्रव्याचे केवळ दास बनतात. कोणी विषयसुखाच्या भरीं भरून विषयवासनांचे केवळ दास होतात. कोणी विषयसुखाला लंपट होऊन विषयवासनांचे केवळ गुलाम बनून जातात. कोणी एकाद्या अनियंत्रित व आपढंगी राजाची कृपा

संपादण्याची इच्छा धरून त्याच्या चरणीं केवळ मिलिंदायमान होतात. अशा निरनिराळ्या फंदांमध्यें निमग्न होणाऱ्या जनांस पदोपदीं दुःखानुभव घडला तर त्यांत नवल ते कसचें? हें दुःख तुला टाळावयाचें असेल तर त्वां या परस्वाधीन विषयांची लालसा धरूं नये. यांचा लाभ किंवा हानि झाली असतां, त्वां त्याबद्दल हर्ष किंवा विषाद पावूं नये. तर तुझ्या अंतर्यामाच्याठायीं जे निरनिराळे विकार उद्भवत असतात, त्यांपासून आपली मुक्ति कशी होईल याची चिंता तुला अहर्निश असावी.

ज्ञात्याच्या व मूर्खाच्या भीतीचे कारण

या सृष्टींतील ज्या व्यापारांच्या योगानें प्रथम दर्शनीं आपलें हृदय एवढें विव्हल होत असतें, ते आपल्या इच्छेनुरूप पालटणारे नसून, त्यांवर आपला कदापि ताबा चालणें नाहीं. या व्यापारांचा मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांवर परिणाम होऊन त्यास वस्तुज्ञान होत असतें. अशा प्रकारें जे विचार व कल्पना त्याच्याठायीं उद्भवतात, तद्नुसार तो या सृष्टिगत व्यापारांस इष्टानिष्ट लेखीत असतो. तेव्हां अर्थात हें उघड आहे कीं हे विचार व ह्या कल्पना आपल्या स्वाधीनच्या असून, त्या आपणांस हव्या तशा व हव्या तेव्हां पालटतां येतील. एकादा अपरचित असा महाध्वनि झाला असतां, किंवा कांहीं एकाएकीं कोसळलें असतां, किंवा एकाद्या मोठ्या संकटाचें चिन्ह दिसून आलें असतां, किंवा दुसरे असेंच कांहींतरी अवचित घडले असतां, मोठ्या ज्ञात्याचेंहि चित्त कांहीसें गलबलून जाणें स्वाभाविक आहे. अशा समयीं तो भयानें थरथरां कांपूं लागून अगदीं फिका पडेल. परंतु तो एकाएकीं इतका घाबरून जातो याचें कारण आपणाला कांहींतरी अनिष्ट प्राप्त होईल असें त्याचें मत असतें हें नव्हे; तर अकस्मात् प्राप्त होणाऱ्या प्रसंगांमुळें त्याचें चित्त क्षोभ पावून, त्याची बुद्धि कांहीं वेळ कुंठित होते. परंतु हा ज्ञाता पुरुष तत्काळ शुद्धीवर येऊन असा विवेक करितो कीं, या प्रसंगांमुळें आपल्या चित्तांत भीतीचा प्रवेश होण्याचे मुळींच कारण नाहीं. परंतु मुर्खांची अवस्था याहून अगदीं भिन्न होते. त्यांच्या चित्तावर या आकस्मिक प्रसंगामुळे जे अनिष्ट परिणाम होतात, त्यांचें अनिष्टत्व वास्तविक आहे असा त्यांचा समज होऊन ते त्यांस भितात. ज्ञात्या पुरुषासारखा विवेक करण्याचें त्यांस सामर्थ्य नसल्या कारणानें त्यांच्या चित्तांत व मुद्रेंत जो सकृत्दर्शनीं पालट होतो तोच कायम रहातो. या प्रसंगांसंबंधाची नीति केवळ भासमय असून व्यर्थ शीण देणारी आहे असें त्यांस सहसा वाटत नाहीं.

आपल्या अंतर्यामाच्या क्षणांत क्षोभ पावणाऱ्या या अवस्थेस्तव त्यास एकाद्या पात्रांतील उदकाची उपमा दिली असतां साजेल. पात्रांतील उदकावर पडलेले सूर्यकिरण जसे पाणी हललें म्हणजे हलतात, परंतु वस्तुतः पाहतां ते केवळ स्तब्ध असतात, तद्वत्च आपल्या अंतर्यामावर निसर्गगत व्यापारांची जी प्रतिमा उठते, ती विकृत भासते याचें कारण अंतर्याम क्षोभ पावतें हें होय. वस्तुतः हे व्यापार कांहीं विकृत नसतात. मनुष्याच्या अज्ञानतमोमय व भ्रांत चिताचीही गोष्ट अशीच आहे. त्याला सत्यसिद्धांतांचा व सदाचाराचा कितीही बोध केला, तरी त्याच्या चित्तांतील अज्ञानतमाचा कदापि निरास होत नाहीं; आणि त्याची भ्रांतावस्था जात नाहीं. याचे कारण एवढेच कीं, त्याच्याठायीं सद्भाव व सदाचारप्रीति हीं विकास पावलेलीं नसतात. या उभय वृत्तींचा त्याच्याठायीं विकास झाल्याने त्याच्या मनावर सद्बोधाचा सुपरिणाम होऊन त्याची आत्मोन्नति होईल.

वाय ५३८-१९

खरीं आणि खोटीं दर्शनें

आपणांस या सृष्टींत जी दर्शनें घडतात, त्यांचे चार वर्ग करितां येतात. पहिल्या वर्गातील वस्तुदर्शनें यथावत् असतात. दुसऱ्या वर्गांतील दर्शनांचा वस्तूंच्या अभावास्तव केवळ अभावच असतो. तिसऱ्या वर्गांतील दर्शने अशीं असतात कीं तत्सूचित वस्तु अस्तित्वांत असूनही तीं इंद्रियगोचर होत नाहींत; आणि चवथ्या वर्गांतील दर्शनांनी सुचविलेल्या वस्तुच मुळीं अस्तित्वांत नसतात. हे दर्शनांचे चार वर्ग ध्यानांत वागवून ज्ञाते पुरुष सत्यासत्यविवेक करीत असतात.

आपणांस वास्तविक ज्या कारणामुळें क्लेश होत असतो, त्या कारणास उपाय योजणे इष्ट होय. उदाहरणार्थ कित्येक पंडितमन्य जन तत्वज्ञतेचा आव घालून, जनांत असत्य सिद्धांतांचें प्रणयन करून, अज्ञ जनांस भ्रमांत पाडितात. यामुळे ज्या गोष्टीं वास्तविक कल्याणाच्या नसतात, त्या अज्ञ जनांस कल्याणप्रदशा वाटतात. या भ्रांतीचें निरसन करण्याचा योग्य उपाय म्हटला म्हणजे त्यांच्या असत्य सिद्धांतांचे अप्रयोजकत्व स्थापित करून, त्यांच्या ऐवजीं सत्य सिद्धांतांचे प्रणयन करावें हा होय. एकादी दुष्ट सवय आपणांस लागून, तीमुळें आपण त्रस्त होत असल्यास तिचे निर्मूलन करण्याचा योग्य उपाय म्हटला असतां, त्या सवईविरुद्ध दुसरी एकादी चांगली सवय आपणांस लावून घेणे हा होय.

मरण प्राप्त होणें हें अनिष्ट वाटलें असतां, आपण लागलीच असा विचार करावा कीं, अनिष्ट गोष्टी टाळणें हें योग्य आहे तरी मरण केवळ अपरिहार्य आहे. तें टाळण्यास मजपाशी कोणता उपाय आहे बरें? मी कोठें पळून गेलों असतां माझें मरण टळेल? असें एकादे स्थळ किंवा जनसमाज दाखवा कीं जेथें मी गेलों असतां माझें मरण चुकेल. माझी काया अमर करणारी एकादी दिव्य वनस्पति किंवा कांहीं मंत्रतंत्र मला सांगा पाहूं. जर मरण चुकविण्यास असा कोणताच उपाय उपलब्ध नाहीं, तर म्यां काय करावें बरें? मला कांहीं केल्या मरण चुकवितां येणारें नव्हें, तर त्यासंबंधाची भीति माझ्या मनांतून म्यां काढून टाकूं नये काय? मरणसमय आला असतां म्यां भयकंपित होऊन शोकाकुल कां म्हणून व्हावें? आपणांस मरणादि संकटांचे एवढे दुःख वाटतें याचे कारण असें कीं, आपण असंभाव्य, अशक्य अशा गोष्टींची इच्छा करून, त्या प्राप्त झाल्या नाहींत म्हणजे आपल्या चित्तास उद्वेग होतो. या संसारातील ज्या बाह्य गोष्टी माझ्या इच्छेनुरूप मला पालटितां येण्यासारख्यां असतात, त्या मी पालटण्याचा उद्योग करितों; आणि या माझ्या उद्योगास कोणाकडून प्रत्यवाय घडला असतां, मी त्याच्यावर तुटून पडतों. परंतु जेव्हां कित्येक गोष्टींमध्ये माझा कांहींएक इलाज चालण्यासारखां नसतो, किंवा दुसऱ्याकडून घडणारा प्रतिकार नाहींसा करण्याचें मजमध्यें सामर्थ्य नसतें, तेव्हां मी हतवीर्य व निराश होऊन देवास किंवा दैवास बोल लावितों. पण हें माझें निवळ अज्ञान होय. माझें एकट्याचे नुकसान व्हावें म्हणून या प्रचंड विश्वाच्या क्रमामध्यें कोणी मुद्दाम पालट करीत आहे असें कोण म्हणेल? तर मरणभीति चित्तांतून काढून टाकून मी सर्वदा सत्कृत्ये करण्यांत माझा काळ घालवीन; आणि इतर जनांचीही सत्कृत्ये करण्याकडे प्रवृत्ति व्हावी असा मी प्रयत्न करीन. मला एकादें सत्कृत्य करण्याचें सामर्थ्य नसलें, किंवा तें करण्यास माझी स्थिति प्रतिकूळ असली, तर तें अन्य जनांकडून तरी व्हावें अशी इच्छा व प्रयत्न मी अवश्य करीन.

वादकुशल पंडितांशी वादप्रतिवाद करून स्वसंमत सिद्धांतांची सत्यता स्थापित करण्याची मला मुळींच इच्छा नाहीं, व फुरसतही नाहीं. माझ्या अंतर्यामातील दोष काढून व माझ्याठायींच्या दुर्वृत्तींचें निर्मूलन करून, मी सदाचारी कसा होईन याचीच मला अहर्निश चिंता लागली आहे. या चिंतेपुढें मला दुसरें कांहींच सुचत नाहीं. माझ्याठायींचें पांडित्य मिरवून माझें काय हित व्हावयाचें आहे?

सर्व मानव परस्परांचे बांधव आहेत

तुझी जन्मभूमी कोणती, असें सॉक्रेटिसाला कोणीं विचारिले असतां, तो म्हणे कीं, 'हें जग माझी जन्मभूमि आहे.' अथेन्स किंवा कॉरिन्थ माझी जन्मभूमि आहे असें तो कधींही म्हणत नसे. मी अथेन्स नगरीतील रहिवासी आहें, असें तूं कां म्हणतोस बरें? या नगरीतील ज्या सांदीकोंदींतील घरांत किंवा वाड्यांत तुझें क्षुद्र शरीर मातेच्या उदरांतून बाहेर पडलें, त्या घराचें किंवा वाड्याचें तूं कां बरें नांव सांगत नाहींस? वास्तविक पाहतां हेंच तुझें जन्मस्थान असतें. परंतु तूं एवढ्या लहानशा जागेचें नांव न सांगतां, ज्या नगरात तुझ्या मातापितरांचें तें तुझ्या जन्मकाळचें घर किंवा वाडा असतो, त्याचें तूं नांव सांगतोस. अशा प्रकारें तूं ज्या राष्ट्रांतील एक व्यक्ति असतोस, तें राष्ट्र आज पिढ्यानपिढ्या ज्या भूमींत नांदत आलें आहे, ती भूमि तूं आपली जन्ममूभि म्हणतोस. आतां जे ज्ञाते पुरुष या जगाचा एकंदर क्रम पाहून विचार करीत असतात, त्यांच्या लक्षांत असें येतें कीं, सर्व मानवजाति हें एक महाराष्ट्र असून, त्यांतील एकंदर रहिवासी परस्परांशी बंधुत्वाच्या नात्यानें बद्ध आहेत. या जगांतील समग्र मानवप्राणी एकाच बीजापासून उत्पन्न झाले आहेत. त्यांची शरीररचना समान असून, सर्वांच्याठायी विवेकशक्ति बीजरूपानें आढळते. यास्तव हे सर्व मानव एकाच राष्ट्रांतले, किंबहुना एकाच कुटुंबांतले, आहेत असें समजून, जर कोणी ज्ञाता पुरुष म्हणेल कीं, हें सारे जग माझा देश असून, ह्या प्रचंड राष्ट्रांतला मी जानपद आहें, तर तें केवळ योग्य होय. गीतेमध्यें कृष्णानें अर्जुनास अशाच आशयाचा बोध केला आहेः–

सनियम्येंद्रियग्राम सर्वत्रसमबुद्धयः ।
ते प्रान्पुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ।।*

'मजपाशी पैसा नाहीं, माझा चरितार्थ कसा चालावा?' अशी जो कुरकुर करितो, तो पळून जाणाऱ्या गुलामांहूनही नामर्द आणि भितरा समजावा. गुलाम लोक आपल्या धन्याच्या घरांतून काय घेऊन पळून जातात बरें? ते आपल्या बरोबर कितीशी दौलत घेऊन जातात? आपल्या दोनचार दिवसांच्या निर्वाहास पुरेल इतकी सामग्री फार तर चोरून ते पलायन करितात. पुढें ही सामग्री संपली तरी ते आपल्या गावाकडची वाट चालून, नाहीं का जात? त्यांना हा जो जमिनीवरील किंवा समुद्रावरील प्रवास करावयाचा असतो, त्यांत ते आपला निर्वाह कांहींना कांहीं युक्ति योजून करीत असतात. मार्गांत अन्न मिळाले नाहीं म्हणून ते भुकेनें मरून पडले असें कदापि घडत नाहीं. परंतु तुला मात्र आपला योगक्षेम चालविण्यास आवश्यक

* आटोपुनि इंद्रियगण सर्वांठायी सदैव समबुद्धि मातेंचि पावती ते सर्वांचिया हितीं निरत. मोरोपंत.

असे जे अन्नादि पदार्थ ते कदाचित् मिळण्याची पंचाईत पडेल अशी भीति वाटून, तूं रात्रंदिवस तळमळ करीत असतोस. हे हतभाग्य मनुष्या, तुझा योगक्षेम चालेनासा झाला तर त्यापासून तुला फार तर मरण प्राप्त होईल एवढेंच ना? ज्वरादि रोग होऊन किंवा एकादा अपघात होऊन जसें तुला मरण येतें, तसेंच हेंही मरण होय. या मरणास त्वां कां म्हणून भ्यावें? मला माझ्या मरणाबद्दल मुळींच भीति वाटत नाहीं, असे उद्‌गार तूं आपल्या मित्रांपाशीं कैक वेळां काढिले असशील. पण हें मरण तुला अन्नाची पंचाईत पडून प्राप्त झालें तर तें तुला इतकें भयंकर कां वाटावे? परंतु तूं म्हणशील कीं, माझीं प्रिय माणसें माझ्या पश्चात् भुकेनें व्याकुळ होऊंन प्राण सोडितील. पण त्यांत विशेष तें काय आहे? त्यांस अन्न मिळाले नाहीं तर त्यांची तुझ्याहून कांहीं निराळी गति होणार आहे काय? तुझ्या प्राणांचा जसा अंत व्हावयाचा, तसाच त्यांच्याही प्राणांचा नाहीं का अंत व्हावयाचा? जी तुझी गति तीच त्यांची गति यासाठीं तुला दारिद्र्यावस्था प्राप्त होऊन तुझी अन्नान्नगत झाली तरी ती तूं धैर्यानें सहन करावी. अशा अवस्थेमध्यें तुला हा लोक सोडून जाण्याची पाळी आली तरी तूं असें मनांत आणावें कीं, जी गति मोठमोठ्या धनाढ्य पुरुषांस व जुलमी सत्ताधीशांस अवश्य प्राप्त व्हावयाची, तीच मलाही प्राप्त व्हावयाचा समय आला आहे. तुला ही गति अन्नाच्या कमताईमुळें क्षुधा लागून प्राप्त व्हावयाची, आणि घनसंपन्न जनांस अमित आहारविहार केल्यामुळें अजीर्णादि बहुत क्लेशप्रद रोग जडून, किंवा मद्यपानादि आरोग्यविघातक दुर्व्यसनें लागून, ती प्राप्त व्हावयाची, इतकाच काय तो भेद.

भिकारी माणसे चांगली वयोवृद्ध होऊन अगदीं वांकलेलीं सुद्धा आपण नाही का नेहमी पाहत? अशा कंगाल जरठ माणसांची स्थिति पाहावी तर त्यांना घर ना दार. थंडी, वारा, ऊन व पाऊस यामध्यें तीं रात्रंदिवस अगदीं उघड्यावर पडलेली असतात. लोकांनी दिले उष्टेंपाष्टें अन्न खाऊन त्याला आपला जठराग्नि शांत करावा लागतो; आणि तोही सर्वदा शांत होतो असें नाहीं. तरी त्यांचे म्हणजे कधीं भुकेनें किंवा दुसऱ्या कशामुळें हाल होऊन प्राण गेले आहेत असें आढळत नाहीं; तर उलट याप्रमाणें त्याला हाल सोसण्याची सवय लागून, तीं मरणास देखील जुमानीत नाहींत; आणि त्याला मरण येतां येत नाहीं. याप्रमाणें जर अगदीं कंगाल माणसे देखील आपली प्राणयात्रा चालवून अगदीं म्हातारीं होत तोपर्यंत जगतात, तर मग तुझ्यासारख्याचा चरितार्थ कांहीं तरी उद्योग करून चालणार नाहीं काय? पोटासाठीं कोणताही प्रामाणिकपणाचा धंदा करावा लागला तरी त्याबद्दल तुला लाज वाटण्याचें कारण नाहीं. आपल्या चारतीर्थासाठीं कोणाचा बोजा उचलावा लागला तरी त्यामध्यें कांहींएक कमीपणा नाहीं. अशा प्रकारे उद्योग करण्यांत मुळींच अनीति नाहीं.

तुला कोणतीही स्थिति प्राप्त झाली तरी तीबद्दल लाज वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण अमुक एका प्रकारची स्थिति प्राप्त करून घ्यावी हें कांहीं तुझ्या स्वाधीनचें नाहीं; आणि तूं कितीही प्रयत्न केलास तरी ती तुला सुटावयाची नाहीं. तुझे आई बाप जात्याच गरीब असले, किंवा त्यांनीं आपली सारी दौलत दुसऱ्या कोणास देऊन टाकिली, किंवा ते जिवंत असून आपली एक कवडीही तुजकरितां खर्चीत नसले तर त्यांत तुला लाज वाटण्यासारखे तें काय आहे? यांत तुझा कांहींएक अपराध नाहीं. ज्ञात्या पुरुषांचें

असें म्हणणें आहे कीं, जें दोषार्ह असतें तें लज्जास्पद असून, त्याबदलच कोणी कोणास दोष देणे युक्त होईल. हें जर खरें आहे तर जी गोष्ट मनुष्याच्या हातची नव्हे, तीबद्दल त्यास कां म्हणून दोष द्यावा बरें? तुझ्या पित्याची जी आज स्थिति आहे, तिला तूं कारण झाला आहेस काय? किंवा ती सुधारण्याचें सामर्थ्य तुला आहे काय? याप्रमाणें जी गोष्ट तुझ्या शक्तीबाहेरची आहे, ती तुला प्राप्त झाली नाहीं म्हणून त्वां कां लज्जित व्हावें? किंवा तिची अपेक्षा तरी कां करावी? आपल्या निर्वाहासाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहाणें नीट नव्हे. स्वत: श्रम करून जें कांहीं प्राप्त होईल त्यांत समाधान मानून रहावें. आजची वेळ कशी तरी टळली, उद्यां आपणांस कांहीं खावयास मिळेल कीं नाहीं याची काळजी करीत बसणें बरें नव्हे. आपल्या जवळचें द्रव्य आपले चाकर किंवा दुसरे कोणी लुटतील याविषयीं चिंता वाहणे इष्ट नव्हे. खरें ज्ञान प्राप्त झाल्यानें या सर्व अनिष्टांस भिण्याचे कांहींएक कारण उरत नाहीं, अशी मनुष्याची समजूत होऊन त्याच्या मनाचें समाधान व शांति हीं अढळ होतात. गीतेंत कृष्णानें शांति प्राप्त करून घेण्याचे उपाय येणेंप्रमाणें कथन केले आहेत:-

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ।। *

ही शांति सर्वांसच प्राप्त होत नाहीं. नुसती पुष्कळ विद्वत्ता संपादिल्यानें, किंवा चांगले वादपटुत्व अंगीं असलें म्हणजे ही शांति प्राप्त होते असें कोणी समजूं नये. सत्य ज्ञानाचा पूर्ण संस्कार मनुष्याच्या मनावर झाल्यावांचून खऱ्या शांतीचा अनुभव घडणें नाहीं. सुविचाराच्या योगानें मनुष्यानें आपल्याठायींचा भ्याडपणा, नीचपणा व द्रव्यलोभ ह्या वृत्तींचें निर्मूलन केलें पाहिजे. सुखसंपादनार्थ किंवा दुःखपरिहारार्थ विनाकारण परिश्रम करून त्यानें कष्टी होऊं नये.

आपली विवेकशक्ति वाढवून सत्यासत्यविमर्षणाचें सामर्थ्य आपल्या अंगीं चांगलें येईल असें करणें इष्ट होय. परंतु हें सामर्थ्य प्राप्त झाल्यानेंच केवळ जो आपणास कृतार्थ समजत असेल, तो वेडा समजावा. या सामर्थ्याचा सदुपयोग झाला पाहिजे. तो अर्थात् असा कीं, मनुष्यांस खरें सौख्य कसें प्राप्त होईल, आपल्या इच्छेनरूप कोणत्या गोष्टी घडण्याजोग्या असतात आपणांस कांहीं अनिष्ट प्राप्त झालें असतां अन्य कोणास कां दोष देऊं नये, किंवा गुन्हेगार समजूं नये, आणि या विश्वाच्या क्रमास अनुरूप असें आपलें आचरण कोणत्या प्रकारें ठेवावें, ह्या गोष्टी विवेकाच्या योगानें समजल्या पाहिजेत. नुसत्या कोट्या काढून, किंवा शब्दपांडित्य करून काही निष्पन्न व्हावयाचें नाहीं. अशा शुष्क पांडित्य मिरविणाऱ्या जनांस ज्ञानाचे खरे रहस्य कळले नाहीं. म्हणून समजावें; आणि तें त्यांस कोणीं समजून देईन म्हटलें तर ते असे ज्ञानलवदुर्विदग्ध असतात कीं त्यांचें समाधान होतां होत नाहीं. अशा दुराग्रही व वृथा गर्व वाहणाऱ्या मनुष्यांचा स्वभाव भर्तृहरि येणेंप्रमाणें वर्णन करितो:-

---

* सर्व काम सांडूनि । संगत्यागे निस्पृह होऊनि । मोह अहंकार त्यजूनि । शांति पावतो ।। मुक्तेश्वरी

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रम्हाऽपि नरं न रञ्जयति ।। ✻

अशा लोकांच्या वाऱ्यासही कोणीं जाऊं नये. कारण ते स्वतः भ्रांतिजालांत गुरफटलेले असून इतरांस त्यांत गोंवण्यास कमी करावयाचे नाहींत. कित्येक लोक असे असतात कीं, त्यांला ज्ञानी पुरुषांचा बोध केवळ शुष्क वाटतो. या बोधासंबंधानें ते असा अपवाद घेतात कीं, हा लोकांस प्रिय वाटणारा नसून, तदनुसार कोणी वागेन म्हणेल तर त्याला तें साधावयाचें नाहीं. यासाठीं हा बोधच मुळीं अप्रोजक होय. पण असा अपवाद घेणारे जन केवळ अज्ञ असून त्यांला मानवी स्वभावाचें फारच थोडें ज्ञान आहे असें समजावें.

आतां दारिद्र्य तुला नकोसें वाटतें याचे कारण एवढेंच कीं, अन्नावांचून आपला प्राण जाईल असें भय तुझ्या चित्तांत बसत असतें. परंतु वास्तविक पाहता तुला क्षुधाभय नसतें; तर आपणापाशीं द्रव्य नसल्यास आपणास एकादा स्वयंपाकी ठेवितां येणार नाहीं, आपली सेवा करण्यासाठीं चाकरमाणसें पगार देऊन ठेवण्याचें सामर्थ्य आपणास असणार नाहीं, हे विचार तुझ्या मनांत येऊन तुला दारिद्र्य अनिष्ट आहेसें वाटतें. आपले पाय चेपावयाला, आपल्या अंगांत पोषाख चढवावयाला, आपल्या भोजनाची ताटेंवाट्या धुऊन पुसून साफ करून त्यांत उत्तमउत्तम पक्वान्नें वाढून आपणापुढें आणून ठेवावयाला चाकर असावे असें ज्यास वाटत असतें, तो चांगला धट्टाकट्टा असून मुद्दाम आजारी बनण्याची आवड धरितो असें माझें मत आहे. ज्यांस सेवकांची अनुकूलता नसते, असे गरीब मजूर वगैरे लोक व खरें ज्ञाते पुरुष कसें अगदीं निरोगी रहातात याचा विचार कर. सॉक्रेटिस, डाओजिनिस, क्लिऑन्थिस आदिकरून साधुपुरुषांची चरित्रे लक्षांत आण. म्हणजे तुला कळून येईल कीं, तुझें सेवकांवांचून चांगले चालण्यासारखें असून, तुझ्या आरोग्याला तिलप्रायही धक्का बसावयाचा नाहीं. अशा साधुपुरुषांचे अनुकरण करून तूं जगांत वर्तण्याचा निर्धार केलास तर तुला कशाचेंही भय न उरून तूं कोठेंही सुखानें रहाशील. वित्तादि ज्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नव्हत, त्यांच्या अभावास्तव वृथा खेद करीत बसण्याऐवजीं त्या अनुकूळ नसल्या तरी मी कदापि डगमगणार नाहीं असा तूं आपल्या बुद्धीचा निश्चय कर. आतां तुला जर अशी भीति वाटत असेल कीं, मला आपल्या घरीं आश्रय देऊन माझा कोणीही संभाळ करणार नाहीं, तर मी तुला असा प्रश्न करितो कीं, लोकांना तूं जो इतका निरुपयोगी व तुच्छ वाटत आहेस हा अपराध कोणाचा बरें? एकादे स्वयंपाकाचें भांडे चांगले उपयोगाचे आहे असें स्वयंपाक्याला वाटलें तर तें तो टाकून देईल काय? आणि त्यानें अविचारानें तें फेकून दिलेंच तर दुसऱ्या कोणाच्या तरी नजरेस तें पडून त्याच्या लक्षांत त्याचा उपयोग अवश्य येईल; आणि तें तो उचलून आपल्या घरीं नेईल. अशी जर यःकश्चित् भांड्याची गोष्ट आहे, तर तुलाच तेवढा अगदीं निरुपयोगी व टाकाऊ असें लोक कां मानितील बरें? अशी जर तुझी खरोखरीच अवस्था झाली असून तुझा एकाद्या शेतवाडी राखणाऱ्या कुत्र्यांप्रमाणेही उपयोग होण्यासारखा नसला, तर तूं जिवंत रहाण्यांत तरी काय पुरुषार्थ आहे?

✻ करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें धरूं ये सुखें चित्त पै जाणत्याच न जाणे न नेणे अशा पामराला बुझावूं शकेना विधाता तयाला. वामन.

आपला चरितार्थ चालण्याचे कोणतेंही साधन आपणास अनुकूळ असणार नाहीं, असें भय एकाद्या सदाचारी पुरुषास वाटत असल्यास त्यानें आंधळे, पांगळे वगैरे अगदीं अपंग जनांचा निर्वाह कसा चालतो तें ध्यानांत आणावे, म्हणजे त्याची खात्री होईल कीं, त्यालाही निर्वाहाची कधीं पंचाईत पडणार नाहीं. जो चांगला योद्धा असतो त्याला त्याचा मुशाहिरा अवश्य मिळावयाचा. त्याचप्रमाणे जो चांगला भक्कम मजूर असतो किंवा कुशल चांभार असतो, त्यालाही माध्यान्हीची कधीं पंचाईत पडली आहे असें सहसा घडत नाहीं. अशीच गोष्ट सदाचारी पुरुषाची आहे. तो आपल्या नीत्याचरणानें व ज्ञानबलेंकरून इतर जनांस गुरुस्थानी असल्या कारणानें त्याचा कोणी अव्हेर करितील, किंवा त्यास कोणी अन्नपाण्यावांचून मरू देतील असें कदापि घडणें नाहीं. इतकेही करून त्याची अन्नान्नगत होऊन तो मरणाच्या दारी बसला तर तो असें समजतो कीं, आपली या संसारातली कामगिरी आटोपली; आपणास आतां येथून बोलावणें आलें. यास्तव आपण स्वस्थ चित्तानें निष्क्रमण करणें उचित होय. जसा एकादा योद्धा समरभूमीवर शत्रूशीं मोठ्या धैर्यानें व निकराने युद्ध करीत असतां, त्याला त्याच्या सेनापतीनें मागें परतण्याचा इशारा करितांच तो तसाच बिनतक्रार माघारीं फिरतो, तद्वतच् सदाचारी पुरुष देहावसानसमयास सिद्ध होईल. अशी ज्याची सर्वदा सिद्धता असते, त्याला कशाचीही परवा वाटत नाहीं. धनवंतांच्या किंवा जुलमी राजांच्या पुढें अगदीं नम्र होऊन वीतभर पोटासाठीं त्यांची हांजीहांजी करण्याचा त्याला पुरा कंटाळा असतो; आणि त्यांच्यापासून होणाऱ्या उपद्रवास तर तो कधींही मोजीत नाहीं. ज्याच्याठायीं सत्य ज्ञानाचा उदय होऊन सुनीतीचा पूर्ण विकास होतो, त्याची याप्रमाणें स्थिति असते. परंतु ज्यास ह्या गोष्टी अनुकूळ नसतात, ते या संसारांत ज्या त्या गोष्टीसाठीं वृथा कष्टी होतात. आपला पोषाख चांगला असावा, आपल्या जवळ सोनेंरत्नें पुष्कळ असावीं, आपल्या पदरीं सेवकजनांचा मोठा समुदाय असावा अशी इच्छा करकरून जे विनाकारण झुरतात; त्यांच्यासारखे हतभाग्य कोणीही नसतील. अशा नरांची दशा पुढील पद्यांत सांगितल्याप्रमाणे होते:-

जन्मैव व्यर्थतां नीतं भवभोगप्रलोभिना ।
काचमूल्येन विक्रीतो हन्त चिंतामणिर्मया ।। * सु. र.

मृत्यूविषयीं

या संसारामध्ये सर्वदा दुःख व त्रास सोसावा लागल्यामुळें कित्येक लोक त्यापासून मुक्त होण्याची इच्छा करीत असतात. या साडेतीन हातांच्या देहासाठी मनुष्यास नाना प्रकारीं खटपट करावी लागते. आपला निर्वाह चालावा म्हणून त्यास लोकांची पाय धरणी करावी लागते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कांहीं तरी धंदारोजगार करून पोटाची खळी कशीबशी भरिल्यावांचून सुटका नसते. या पोटासाठीं त्यास दाही दिशा हिंडावें लागतें. अगदीं दुष्ट, क्रूर व लहरी मनुष्यांची त्याला मनधरणी करावी लागते. हा सारा व्याप त्यास कधीकधी असह्य होऊन आपलें एकदांचें देहावसान होईल तर बरें असें वाटूं लागतें, आणि तो थोडासा अविचारी असल्यास आत्महत्त्याही करावयास प्रवृत्त होतो पण हें त्याचें करणें सर्वथा निषिद्ध होय. असें जो करूं जाईल, तो मोठाच भ्याड समजावयाचा. निसर्गक्रमानुसार आपल्या जीविताचा अंत

* या संसारातील विषयभोगांची अतिशयित आवड धरून, मीं आपलें जन्म व्यर्थ घालविलें. हा जीवितरूप चिंतामणि म्यां काचेच्या मोलानें विकिला.

होईल तेव्हां त्यास आपण धैर्यानें सिद्ध असावें. संसारात त्रासून मुद्दाम आपल्या जीविताचा अंत करणें ज्ञात्यास उचित नव्हे. ज्ञानबलेंकरून ज्याच्या चित्तांतून देहप्रीति विनष्ट झालेली असते, त्याला चोरांनीं लुटून अगदीं कफल्लक करून सोडिलें, किंवा जुलमी राजाने त्याच्या वित्ताचें हरण करून त्यास कारागृहांत घातले, किंवा हालहाल करून ठार मारिलें तरी त्याबद्दल त्याच्या चित्तास यत्किंचित्ही उद्वेग प्राप्त व्हावयाचा नाहीं; आणि तो जीवितनाशाचा प्रत्यक्ष समय येईपर्यंत आपण होऊन त्याचा नाश करण्यास कदापि उद्युक्त व्हावयाचा नाहीं.

एवढे मात्र सर्वदा लक्षांत ठेवावें कीं, मनुष्य जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्या हातून सर्वदा सत्कर्म घडावें; आणि त्यानें कोणत्याना कोणत्या प्रकारें इतर जनांच्या उपयोगीं पडण्यास झटावें. परंतु जेथें सदाचार व परोपकार यांस मुळींच अवकाश न मिळून केवळ निर्माल्यवत् जगण्याची पाळी येईल, तेथून निघून एकाद्या अटव्य अरण्याचे सेवन करावे हें उत्तम. दुर्जनांच्या सहवासानें दुष्कर्म करून पोट जाळण्यापेक्षा वनांत पशूंच्या संगतीनें राहून कंदमुळांवर निर्वाह करणें चांगले. हाच भाव भर्तृहरीनें येणेप्रमाणें सूचित केला आहेः–

वरं पर्वतदुर्गेषु भ्रान्तं वनचरैः सह ।
न मूर्खजनसंपर्कः सुरेन्द्रभुवनेष्वपि ।। **

आत्मज्ञान

ज्या मनुष्यास वाटत असतें कीं, मी इतरांहून अमुक एका बाबतींत श्रेष्ठ आहें, किंवा जो वास्तविकपणें पाहतां तसा श्रेष्ठ नसून, केवळ भ्रमामुळें ज्याला तसें वाटत असतें, तो मनुष्य अज्ञ असल्यास गर्वानें फुगून जातो. एकादा जुलमी राजा म्हणत असतो कीं, मी मोठा सत्ताधीश आहे. पण माझें त्यास असें विचारणे आहे कीं, तूं मोठा सत्ताधारी असलास तरी मला तुझा काय उपयोग? मी ज्या धंद्याचा अंगीकार केला आहे, तो माझा अप्रतिहतपणें चालेल असें करणें तुझ्या हातीं आहे काय? बरें ज्या अनिष्ट गोष्टींचा तूं स्वतः तिरस्कार करीत असतोस, त्या तुला कदापि प्राप्त होणार नाहींत असें करण्याचें तुला सामर्थ्य आहें काय? त्याचप्रमाणे ज्या इष्ट गोष्टींची तूं अपेक्षा करीत असतोस, त्या सर्वदा प्राप्त होत रहातील अशी शाश्वति तुला वाटते काय? तूं समजत असतोस कीं, तुझा अधिकार सर्वांवर चालत असून तुला कोणावरही अवलंबून रहाण्याची गरज नाहीं. पण तूं नौकेंत बसून चाललास तर तुझा प्राण तांडलाच्या हातीं आहे असें नाहीं का म्हणावयाचे? किंवा तूं रथांत बसून मार्गक्रमण करीत असतां सारथ्याच्या हुशारीवर व प्रामाणिकपणावर तुझें जीवित नाहीं का अवलंबून असत? याचप्रमाणें दुसऱ्या पुष्कळ बाबतींमध्यें तुझे जिणें केवळ दुसऱ्यांच्या आधीन असतें. असें असतां तुं आपल्या सत्ताधीशत्वाचा वृथा डौल कशासाठीं मिरवितोस? हे जुलमी पुरुषा, तूं म्हणत असशील कीं, सारे जन माझ्या सेवेमध्यें सर्वदा तत्पर असतात. पण मी म्हणतों कीं, मीं सुद्धां माझें भोजनाचें ताट धुऊन पुसून साफ ठेवण्यास झटतों. याप्रमाणें मी माझ्या ताटाची जशी काय सेवाच करीत असतो. म्हणून ताट मजहून श्रेष्ठ समजावयाचें काय? ताट माझ्या उपयोगीं पडतें म्हणून मी त्याला एवढें जपत असतों. एरवीं मीं त्याची मुळींच परवा केली नसती. त्याचप्रमाणें मी

* वनचरांसह शैलवनांतरें । निजमुखे फिरणे तरि तें बरें जरि घडे सहवासचि पामरीं । तरि जळो असणें सुरमंदिरीं. वामन.

माझ्या घोड्याचीही चाकरी करितों. त्याला दाणापाणी वगैरे वेळच्या वेळीं घालून त्याला धुऊन पुसून त्याचा खरारा करितों. कारण तो मला व माझें ओझें वाहून नेण्याच्या उपयोगीं पडतों. मी जशी माझ्या घोड्याची शुश्रूषा करितों, तद्वत्च लोक तुझी सेवा करितात; आणि खरें म्हटलें तर तुझी योग्यता माझ्या घोड्याहून अधिक आहे असें तुझ्या सेवकांपैकीं एकासही वाटत नसतें. तुझ्या स्थितीची स्पृहा कोणासही होत नाहीं, आणि तुझें अनुकरण करावे असें कोणाच्या कधीं मनातही येत नाहीं. सॉक्रेटिसाचे अनुकरण करून जसे सहस्रावधि लोक सदाचारसंपन्न व सुखी झाले, तसे तुझे पाहून वागणारे कितीसे लोक असतील बरें? हे जुलमी राजा, तूं म्हणत असशील कीं, माझें डोकें उडविण्याचें तुला सामर्थ्य आहे. होय आहे खरें. पण या तुझ्या अंगच्या सामर्थ्यास्तव तुला भ्यावयाचें म्हणजे एकाद्या प्राणहारक ज्वरास किंवा जरीमरीस भिण्यासारखेंच होय. यापलीकडे तुझी योग्यता काहीएक नाहीं; आणि मनुष्याचा नाश करणाऱ्या रोगराईंस देवता कल्पून त्यांचा क्षोभ निवारण्याकरितां जसे लोक त्यांची पूजार्चा करितात, तद्वत्च लोक तुला मानीत असतात. याप्रमाणें लोकांनीं तुला कितीही मानिलें, व तुला ते कितीही भिऊन वागले, तरी त्याबद्दल तूं शेफारून जाण्यांत काय अर्थ आहे?

लोक जुलमी राजांस व त्यांच्या सैनिकांस कां भितात म्हणून कोणी मला विचारील, तर त्याचें कारण मी असें सांगेन कीं, त्यांच्यापासून होणाऱ्या पीडेसंबंधानें लोकांची मते भ्रामक असतात, म्हणून ते त्यांस भितात. वस्तुतः पाहता मनुष्याच्या चित्तास कोणत्याही बाह्य गोष्टींनीं विकार होण्यासारखा नाहीं. तें त्यांपासून सर्वथा अलिप्त आहे. असें आहे तरी तें आपणांस पीडा झाली असें विनाकारण मानून घेतें. जुलमी सत्ताधीश एकाद्या मनुष्याच्या पायांत बेडी घालून त्यांस प्रतिबंधांत ठेवूं लागला असतां, त्या मनुष्याचा देहभाव गेला नसल्यास तो त्या सत्ताधीशाची करुणा भाकील, आणि म्हणेल कीं, 'मला प्रतिबंधांत ठेवूं नका. मला एक वेळ क्षमा करा.' परंतु ज्याचा देहभाव विगलित झाला आहे, आणि ज्याच्या चित्ताची भ्रांति नष्ट झाली आहे, तो असें म्हणेल कीं, 'मला प्रतिबंधांत ठेवून तुला संतोष किंवा फायदा वाटत असल्यास तूं माझ्या पायांत खुशाल शृंखला घाल. परंतु मी तुझी परवां मुळींच करीत नाही. मीं स्वतंत्र आहें. कसा म्हणशील तर माझ्या अंतर्यामावर कोणाचा कधींही ताबा चालावयाचा नाहीं. तूं माझ्या जड देहाचें काय हवें तें कर. त्याची मला मुळींच परवा नाहीं. आतां तुझ्यापाशीं मी कांहीं निमित्तानें आलों तर तेवढ्यानेंच तूं फुगून जाऊं नको. माझ्या घरांतल्या भोजनपात्राची किंवा माझ्या घोड्याची जशी मी शुश्रूषा करितों, तद्वत्च तुझी मी करणार. केवळ स्वार्थापुरता तुझा माझा संबंध; स्वार्थ साधण्यापलीकडे तुझी मला गरज नाहीं किंवा परवाही नाहीं.'

हे माझे उद्गार वाचून कोणी म्हणेल कीं, हें आपमतलबीपणाचें वर्तन आहे. परंतु हा प्राणीमात्राचा स्वभावच आहे. जो तो आपल्यापुरतें पाहत असतो. याप्रमाणें तो आत्मलाभ साधीत असतां त्याच्या हातून परहितही होत असतें.

आपल्या शक्तीबाहेरील गोष्टींविषयीं आपल्या चित्तांत विचित्र व वेडगळपणाचे विचार व कल्पना येऊन, आपण तद्नुसार वागू लागलों असतां, ज्या इष्टही नव्हत व अनिष्टही नव्हत, अशा गोष्टींची आशा किंवा भय बाळगून आपण व्यर्थ शीण पावतो. ज्याच्या चित्तांत दया, माया वगैरे सौम्य वृत्ति कधींहीं उत्पन्न

व्हावयाच्या नाहींत, अशा जुलमी व गर्विष्ठ मनुष्यांचें मनोधारण करण्यास आपण प्रवृत्त होतों; इतकेंच नव्हे, तर त्यांला प्रसन्न करून घेण्याकरितां त्यांच्या चाकरमाणसांचीही आपण पायधरणी करीत असतों.

परंतु ज्या मनुष्याला नित्यानित्यवस्तुविवेक करण्याचें सामर्थ्य प्राप्त होऊन स्वकल्याण कशांत आहे तें पूर्णपणें कळत आहे, त्याला या जगामध्यें सौम्यपणें व शांतपणें रहाण्यास कोणत्या गोष्टीनें प्रत्यवाय घडतो बरें? गतकालीं जो इष्टानिष्ट अनुभव घडला असतो, आणि भविष्यकालीं जो घडावयाचा असेल, त्याविषयीं मनास व्यर्थ उद्वेग होऊं न देण्यासाठी प्रयत्न करण्यास काय हरकत आहे? कोणी म्हणेल कीं, 'तुला दारिद्र्य प्राप्त झालें असतां तुझी काय अवस्था होईल याचा विचार तूं कधीं मनांत आणिला आहेस काय?' असा प्रश्न करणारास मी इतकेंच सांगेन कीं, दरिद्रावस्था आली तर तींत कोणत्या प्रकारें वर्तन करावें हें मला पूर्णपणे अवगत असून, मी तदनुसार मोठ्या धैर्यानें वागण्यास झटेन. बरें दैवगतीनें माझ्या हातीं राज्याधिकार आला, तरी देखील तो कसा निर्दोषपणें चालवावा हें मला माहीत आहे; आणि हा चालवीत असतां कितीही त्रास व संकटें सोसावीं लागलीं तरी तीं मी एकंदर देशाच्या कल्याणाकडे दृष्टि देऊन मोठ्या धैर्यानें सोसण्यास तयार होईन. मला कांहीं कारणावरून देशपार केलें, तर त्याबद्दल मला यत्किंत्ही खेद वाटावयाचा नाहीं. कारण मला ठाऊक आहे कीं, मी कोठेंही गेलों व कोठेंही असलों तरी माझें काहीएक वाईट व्हावयाचें नाहीं. कारण माझ्या स्वतांच्या देशांत जें माझें बरें असेल, तें कांहीं त्या स्थानाच्या प्रभावामुळें नव्हे, तर माझ्या चित्तांत वसत असलेल्या विचारांमुळें मला तो इष्टानुभव घडत असतो; आणि मी कोठेही गेलों तरी ह्या माझ्या विचारांचा अपहार करण्यास कोणालाही सामर्थ्य नाहीं. वस्तुतः पाहतां या दुनियेमध्ये निखालस माझे असे हे विचार मात्र होत. मजवर कितीही घोर प्रसंग आले तरी या विचारास मी सहसा मुकणार नाहीं; आणि हे विचार मी आपल्या चित्तांत वागवीत असेन तोपर्यंत ते मजपाशीं रहाणारे असून, स्थलभेदानें किंवा बाह्य स्थितिभेदानें ते नाश पावणार नाहींत; आणि त्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टींची अपेक्षा मला उरणार नाहीं. कोणी म्हणेल कीं, 'असें तूं म्हणतोस तर आज तुला मरण प्राप्त झालें असतां, तूं त्यांस सिद्ध आहेस काय?' होय आहे. आज माझ्या देहाचे विसर्जन होऊन तो पंचत्वास मिळण्याचा समय प्राप्त झाला असतां, मी त्यास तयार आहे. यांत भयावह तें काय आहे? मला आज मरण प्राप्त झाल्यानें या विश्वातला कोणता पदार्थ समूळ विनाश पावणार आहे? किंवा कोणती अपूर्व गोष्ट घडून येणार आहे? जर नाहीं, तर एकाद्या जुलमी सत्ताधीशाचा माझ्यावर क्रोध होऊन, त्याच्या सेवकांच्या तीक्ष्ण तलवारींनीं माझा प्राणघात होईल अशी भीति मला कां म्हणून वाटावी? त्यांच्या तलवारीचा प्रयोग माझ्या देहावरच काय तो होईल ना? मी जो चिदंश त्यावर तर त्यांचा कांहीं परिणाम होणार नाहीं? हा माझा चिदंश या देहरूप बंधनापासून कधींच मुक्त झाला आहे. यास बंधांत ठेवण्याचें सामर्थ्य कोणासहीं नाहीं. माझ्या देहाची हवी ती दशा करण्याचें, किंवा माझें सारें वित्त हरण करून मला अगदीं कंगाल करून सोडण्याचें सामर्थ्य सत्ताधीशाच्या अंगीं असेल. पण त्याची मला काय परवा? तो मला देशांतून हांकून देईल, किंवा मला शृंखलाबद्ध करून कारागृहांत घालील, इतकेंच ना? पण त्याचीही, मला मुळींच भीति वाटत नाहीं. या सर्व अनिष्टांचा माझ्या देहावर कांहींही परिणाम झाला तरी माझ्या चित्ताचे स्थैर्य अढळ राहील; आणि या कलेवरास सोडून जाण्यास मी सर्वदा सिद्ध असेन. इतकी माझी सिद्धता असल्यावर मग

मोठ्या सत्ताधीशांच्या सामर्थ्यास मीं कां भ्यावें? गीतेमध्यें हाच बोध विशेष व्यापक रीतीनें येणेंप्रमाणें केला आहे:-

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यांस्तांस्तितिक्षस्व भारत ।। *

जुलमी सत्ताधीश माझ्या पायांत शृंखला घालून मला बंदींत ठेवील, किंवा फार तर माझें डोके उडवील, इतकेंच ना? पण माझ्या मनावर तर त्याची कांहीं सत्ता नाहीं? तें त्याला कदापि प्रतिबंधांत ठेवितां येणार नाहीं, किंवा त्याचा नाशही करण्याचें त्याला मुळींच सामर्थ्य नाहीं. मग मला त्याची भीति ती कां वाटावी? यासाठींच मनुष्यानें आपण कोण हें चांगलें ओळखिलें पाहिजे.

सदरीं प्रतिपादन केल्याप्रमाणें मला सत्ताधीशाची मुळींच परवा नाहीं. तरी कोणी म्हणेल कीं, 'सत्ताधीशांच्या मर्जीतल्या किंवा हुजूरच्या लोकांस त्वां भ्यालें पाहिजे. कारण त्यांस तू प्रसन्न करून घेणार नाहींस तर तुझा राजदरबारीं प्रवेश होणार नाहीं.' या लोकांचीही मला मुळींच परवा नाहीं. मीं दरबारांत प्रवेश करण्याची हांव धरिली तरच ते मला प्रतिबंध करणार ना? पण मी अशी हांवच मुळीं धरणार नाहीं. यावर कोणी अशी शंका घेईल कीं, 'तर मग तूं राजद्वारीं कशासाठीं रखडत असतोस?' या शंकेचे समाधान असें कीं, या संसाररूप नाटकामध्यें एकादी भूमिका स्वीकारून आपल्या जीविताचें काहीतरी सार्थक्य करावें असें माझ्या मनांत असल्या कारणानें मी असा राजद्वाराशीं असतो. पण मला तेथें एकादी कामगिरी मिळण्याचा रंग दिसेनासा झाला तर मी ती प्राप्त करून घेण्यासाठीं मुद्दाम खटपट करणार नाही. तिच्या प्राप्तीसाठीं कोणाची विनवणी करणार नाहीं, किंवा कोणाला लांच वगैरे देऊन प्रसन्न करून घेणार नाहीं. मला दरबारचा एकादा हुद्दा मिळाला नाहीं तर मी असें मनांत आणीन कीं, आपल्या गुणांची तेथें बूज व्हावयाची नाहीं, तेव्हां व्यर्थ खटपट करण्यांत काय होशील? दुसरें असें कीं, मोठमोठाले हुद्दे मिळवून ते वहिवाटण्याची जे हांव धरितात, त्यांला म्हणजे सर्वदा सुख लाभतें अशांतला कांहीं अर्थ नाहीं. त्याला ज्या सत्ताधीशांपासून हे अधिकार प्राप्त होतात, त्यांची त्यांवर केव्हां इतराजी होऊन त्यांला आपल्या अधिकारास मुकावें लागेल याचा नेम नसतो. तेव्हां अशा या परस्वाधीन गोष्टींची अपेक्षा मला मुळींच नाहीं. आणखी असें कीं, सत्ताधीशाकडून मनुष्यास एकादा मोठा हुद्दा प्राप्त झाला तरी तो चालविण्यास लागणारा चांगुलपणा व हुशारी हीं त्यास त्या हुद्याबरोबर प्राप्त होत असतात काय? अर्थात् नाहीं. मग अशा क्षुल्लक गोष्टींची मीं कां आकांक्षा धरावी बरें? एकादा मनुष्य अंजीर किंवा बदाम फेंकूं लागला असतां, ते गोळा करण्यांस मुलें जशी मोठ्या उत्कंठेनें धांवतील, आणि ते मिळाले नाहींत तर एकमेकांस लोटावयास लागून एकमेकांशी भांडतील, तसे जाणते पुरुष ह्या क्षुल्लक वस्तूंसाठीं मुळींच धावणार नाहींत, किंवा एकमेकांशीं कलह करणार नाहींत. बरें, सदरील मनुष्य बदामांच्याऐवजीं शिंपा फेंकूं लागल्यास त्या वेंचण्यास मुलें सुद्धां धांवणार नाहींत. मी सरकारी हुद्दे या फेंकलेल्या बदामांसारखे समजतो; त्यांच्या प्राप्तीची अपेक्षा बालिश जन करितील; पुष्कळ द्रव्य कमावण्याची संधि आल्यास बालिश जन ती साधण्यास झटतील. लष्करांतील मोठमोठ्या कामगिऱ्या आणि पदव्या मिळविण्याची हांव बालिश जन धरितील. अशा महत्वाकांक्षी जनांनीं हवी असल्यास सत्ताधीशांची किंवा त्यांच्या कृपेंतल्या लोकांची मनोधारणा करावी. अशा जनांच्या चरणी

* कौंतेया सुखदुःखे हीं देती विषय इंद्रिये; धरीसी जी इच्छा क्षणहि न लगतां पुरविण्या. वामन.

त्यांनीं मिलिंदायमान व्हावें. मला तर तो पैका, त्या पदव्या, ते हुद्दे केवळ मुलांकडे फेकलेल्या अंजिरांप्रमाणें वाटतात. त्यांच्या प्राप्तीसाठी मी मुद्दाम असा कधींच झटणार नाहीं; आणि म्हणून ते मला प्राप्त झाले नाहींत तर मला लवमात्रही वाईट वाटणार नाहीं. एकादा अंजीर माझ्या हातीं अवचित आला तर मी तो खाईन. यापलीकडे त्याचें मला काहीएक मोल वाटणार नाहीं, तो घेण्यासाठीं मी खालीं लवणार देखील नाहीं: मग त्याच्या प्राप्तीसाठीं दुसऱ्यांशी धक्काबुक्की करून त्याला खालीं पाडणें, किंवा आपण खालीं पडणें असा कांहीं प्रकार मजकडून कोठून व्हावयाला? जेथें ही अधिकारादि प्राप्त व्हावयाचीं, तेथें माझा प्रवेश व्हावयासाठीं मी कदापि आर्जव करणार नाहीं. कारण मला विवेकबलें करून असें कळलें आहे कीं, असल्या गोष्टींत काहीएक तथ्य नसून त्या प्राप्त झाल्यानें माझें काडीइतकेंही हित व्हावयाचें नाहीं. हाच भाव भर्तृहरीनें पुढील पद्यांत बोधित केला आहे:-

परेषां चेतांसि मतिदिवसमाराध्य बहुधा
प्रसादं किं नेतुं विशसि हृदयक्लेशकलिलम् ।
प्रसन्ने त्वयन्तः स्वयमुदितचिंतामणिगुणे
विविक्तः संकल्पः किमभिलषितं पुष्यति न ते ।। *

वाईट मनुष्यांशी आपण कसें वर्तन ठेवावे

ज्ञानी पुरुष आपणांस असें सांगतात कीं, सर्व मनुष्यांचा स्वभाव सारखाच असतो. अमुक एक गोष्ट अमुक एका प्रकारची आहे अशी आपली खात्री झाली म्हणजे तिला आपण संमति देतों; त्याचप्रमाणें अमुक एक गोष्ट अमुक एका प्रकारची नाहीं अशी आपली खात्री झाली असतां, ती तशी नाहीं असें आपलें मत होतें. परंतु एकाद्या गोष्टींविषयीं खात्रीपूर्वक कांहीं कळले नाहीतर तीविषयीं आपला अनिश्चय असतो. त्याचप्रमाणें एकादी गोष्ट माझ्या हिताची असली तर मी ती करण्यास प्रवृत्त होतों; ती स्वहिताची आहे अशी खात्री होऊनही तीपासून पराङ्मुख होणें स्वभावींच अशक्य आहे. हिताची गोष्ट कोणती तें समजलें असतां अहितकर गोष्टीचा पाठलाग करणें हा मनुष्याचा स्वभावच नव्हे. हे सिद्धांत जो ध्यानांत वागवील, तो सामान्य जनांचें दुराचरण पाहून त्यांजवर रुष्ट होणार नाहीं. कोणी म्हणतात कीं, अमुक मनुष्य मोठा चोर आहे. पण हा असा चोर बनण्याचें कारण काय असावें, याचा जो सूक्ष्म दृष्टीनें विचार करील, त्याच्या लक्षांत असें येईल कीं, त्या चोराच्या चित्तास इष्टानिष्ट गोष्टींसंबंधांची भ्रांति जडलेली असते. या त्याच्या भ्रांतीबद्दल आपणांस राग येणें योग्य नव्हे. तर आपण त्याची कींवच केली पाहिजे. अशा भ्रांतिष्ट मनुष्यास त्याचा भ्रम दाखवून दिला असतां, तो तत्काळ शुद्धीवर येऊन आपल्या पापाचारापासून परावृत्त होतो. हा त्याच्या चित्तांतील भ्रम गेला नाहीं तोपर्यंत त्याच्या हातून दुराचरण घडलें तर त्याबद्दल त्या बापड्यावर आपण कां रागवावें?

---

* पराव्यांचीं चित्तें प्रतिदिवशीं संतुष्ट करण्या; मना कारे व्हावें बहु विवश त्वां बा उबगण्या; स्वयें हो आत्मत्वीं अतिमुदित चिंतामणिगुणा; धरीसी जी इच्छा क्षणहि न लगतां पुरविण्या. वामन.

यावर कोणी असा प्रश्न करील कीं, 'तर मग या चोराचा नाश करूं नये काय?' नये, मुळींच करूं नये. त्याच्या संबंधानें असा विवेक करावा कीं, या मनुष्याच्या चित्तास भ्रांति झाली असल्या कारणानें याला बरें काय व वाईट काय हें जाणण्याचें ज्ञान नाहीं. यासाठीं त्याचा नाश करणें सर्वथा योग्य नव्हे. कारण असें पाहा कीं, एकादा मनुष्य आंधळा किंवा बहिरा असला तर त्याला आपण कधीं मारून टाकण्याचा विचार मनांत आणितों काय? जर नाहीं, तर ज्ञानचक्षु उघडले नसल्यामुळें ज्याला तत्त्वबोध झालेला नसतो, त्याचा वध करण्याची बुद्धि किती अमानुषत्वाची दर्शक आहे बरें? या जगांत ज्ञान ही अत्यंत अमोल वस्तु असून, ती त्या बापड्यास प्राप्त झाली नाहीं म्हणून आपण त्याच्यावर दातओठ खाणे योग्य होईल काय? कदापि होणार नाहीं. असें आहे त्यापेक्षा एकाद्या मनुष्याच्या हातून दुष्कर्म होत असल्यास, हे मनुष्या, तूं त्याचा तिरस्कार किंवा द्वेष करणें उचित नव्हे. तर त्याची त्वां कींवच करावी. 'तो मोठा चांडाळ आहे,' किंवा 'तो मोठा दुरात्मा आहे,' अशा दुर्वचनांचा त्याच्या संबंधाने प्रयोग करूं नको. त्याला जो तूं एवढा दोष देण्यास उद्युक्त होतोस, त्या तुझ्या ज्ञानाचा उदय इतका त्वरित कोठून झाला?

आतां आपणांस एकाद्या चोरट्या माणसाचा जो इतका राग येतो, त्याचें कारण पाहूं जातां इतकेंच दिसतें कीं, ज्या वस्तु आपणांस अतिप्रियशा वाटतात, त्यांचा तो अपहार करितो. तर याला उपाय मिळून इतकाच दिसतो कीं, मनुष्याने वस्त्राभरणावर एवढें प्रेम ठेवूं नये, म्हणजे त्यांचें हरण करणाऱ्या चोराचा आपणांस मुळींच क्रोध यावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें स्वस्त्रीच्या सौंदर्यास मनुष्यानें मोहित होऊन तिजवर पराकाष्ठेचें प्रेम करूं नये. म्हणजे तो व्यभिचारी मनुष्यांवर संतापणार नाहीं. हे मनुष्या, तूं आपल्या मनाशीं असा विवेक कर कीं, जेंवित्त किंवा कलत्र खुद्द तुझें असें आहे, त्याला चोर किंवा व्यभिचारी यांच्यापासून मुळींच अपाय घडावयाचा नाहीं; तर ज्या वस्तु तुजहून बाह्य असून, ज्यांचा तुजशीं अर्थाअर्थी कांहींएक संबंध नाहीं, व ज्या तुझ्या हातच्या नव्हत, त्यांचा ते अपहार करणार. तेव्हां अशा वस्तु तूं तुच्छ लेखून त्यांचा अव्हेर केलास तर तुला कोणावरही रागावण्याचें प्रयोजन उरणार नाहीं. परंतु जर करितां त्यांचा अभिलाष केलास, तर तूं अन्य कोणावर रुष्ट होण्याऐवजी आपल्या स्वतांवरच रागवावें हें योग्य होय.

याच गोष्टीचा अंमळ बारकाईनें विचार कर. असें समज कीं, तुझ्यापाशीं मोठमोठीं उंची वस्त्रें असून, तुझ्या शेजाऱ्यापाशीं तीं तसली वस्त्रें नाहींत. आतां तूं तीं वस्त्रें बाहेर उनांत वाळूं घातलीं असतां, त्यांवर त्या तुझ्या शेजाऱ्याची नजर गेली; आणि मनुष्याचे खरें हित कशात आहे त्याचें त्या बापड्यास ज्ञान नसल्यामुळें त्याच्या मनांत त्या वस्त्रांविषयीं इच्छा उत्पन्न होऊन त्यानें तीं तुझी दृष्टि चुकवून लांबविलीं, तर त्यांत अपूर्व तें काय घडलें? जसा तुला सुंदर वस्त्रांचा अभिलाष आहे, तसाच तो त्याला असून त्यानें तुझी चोरी केली तर त्यांत नवल तें कोणतें? अगदीं क्षुधेनें व्याकुळ झालेल्या मनुष्यांच्या समोर तूं भाकरी खात बसलास, आणि त्यांला त्यांतली थोडीशी दिली नाहींस, तर ते तुझ्या हातची हिसकावून घ्यावयाला चुकतील काय? ती त्यांना तूं मुळीं दाखविली नाहींस, तर ते तुजवर हल्ला करणार नाहींत. अशीच गोष्ट तुझ्या उंची वस्त्रांची आहे. ती सुरक्षित रहावी असें तूं इच्छीत असल्यास तीं मुळीं लोकांच्या नजरेसच पडूं देऊं नको. म्हणजे त्यांविषयीं दुसऱ्यांच्या मनांत लोभ उत्पन्न होऊन, त्यांचा अपहार करण्याची बुद्धि

त्यांस होणार नाहीं. या प्रकरणीं माझा स्वतांचा थोडासा अनुभव येथें सांगतो. माझ्या देवघरांतील देवाच्या मुर्तींपुढें मी लोखंडी दिवा ठेवीत असें. एके दिवशीं रात्रीं देवघरांत कांहीं आवाज झालेला माझ्या कानी पडला. त्यासरसा मी खालीं धावून जाऊन पाहतो तो तो दिवा कोणी लांबविला. मग मीं मनांत म्हटलें कीं, ठीक आहे, उद्या मातीची पणती देवापुढें ठेवतों. मग पाहूं, चोर ती चोरून नेतो काय. पण त्या पणतीकडे कशाला चोर पाहतो? एकाद्यापाशीं कांहीं असलें तर तें चोरीस जावयाचें. तुझ्यापाशी वस्त्र असलें तर त्याला चोराचें भय. पण तें नसलें तर कोठून भय असणार? तर तात्पर्य काय कीं, अन्य जनांपासून किंवा इतर कोणत्याही प्रकारें प्राप्त होणाऱ्या अनिष्टांसंबंधानें त्वां असाच विवेक केला पाहिजे.

हें जीवित जलप्रवासरूप आहे

तूं एकाद्या तारवावरून जलप्रवास करीत असतां तें कोणत्या तरी बंदरांत नांगरून, पाणी आणण्याकरितां तुला किनाऱ्यावर पाठविलें, तर पाणी घेऊन येतांना वाटेत तूं कांहीं कंदमुळें किंवा चांगल्या शिंपा पाहतोस, आणि त्या जमा करण्यासाठीं अंमळ इकडेतिकडे गमतोस. पण तारवावर परत लवकर गेलें पाहिजे ही गोष्ट तुला विसरतां कामां नये. तुझें लक्ष तारवाकडे एकसारखे असलें पाहिजे. तांडेल तारू हांकारण्याची तयारी करून तुला केव्हां हांक मारील याचा नेम नाहीं; त्यानें हांक मारिली कीं, तुला लागलीच शिंपा वगैरे तेथेंच टाकून तारवावर गेलें पाहिजे. अशीच गोष्ट आपल्या या जीविताची आहे. येथें आपणांस कंदमुळे व शिंपा यांच्या ऐवजी बायकामुलें मिळालेलीं असतात; आणि तीं जवळ करण्यास आपणांस काहीएक प्रत्यवाय व्हावयाचा नाहीं. परंतु विश्वनायकाचें बोलावणे येतांच तुला तीं सारीं सोडून जाणें प्राप्त आहे. बायकामुलांच्या लोभास गुंतून मी आणखी थोडा वेळ राहीन म्हणशील तर तें कांहीं एक चालावयाचें नाहीं. तुला वृद्धदशा प्राप्त झाली असतां या संसाराचा गुंता करवेल तितका कमीच केला पाहिजे. कारण या स्थितींत तर तुला केव्हां बोलावणे येईल याचा नेम नसतो; आणि तें आलें कीं तुला तत्काळ जावें लागणार तेव्हां शेवटची निरवानिरव करण्याची फारशी अडचण किंवा संकट तुला मुळींच वाटूं नये.

सुखदुःखाचा निवाडा

या संसारामध्यें सर्व गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणें घडाव्या अशी इच्छा त्वां कदापि करूं नये. त्या कशाही घडत असल्या तथापि आपणांस त्याची परवा नाहीं. अशी वृत्ति तूं ठेविशील तर तुला या संसारांत सुख लाभेल.

आपल्या देहाला एकादा रोग जडला असतां, तेणेंकरून त्याच्या व्यापारांस प्रत्यवाय घडतो. आपल्या मनाच्या व्यापारांस त्यापासून काहींएक अंतराय येणें नाहीं. जो कांहीं अंतराय येतोसा वाटतो. तो आपल्या चित्ताचा केवळ भ्रम होय. अशीच गोष्ट एकंदर बाह्य अनिष्टांची आहे. त्यामुळें देहास काय पीडा होईल ती; चित्तास त्यापासून यत्किंचित्ही विकार होण्यासारखा नाहीं.

तर मग आपणांस ज्या ह्या अनेक गोष्टींमुळें दुःख व त्रास होतो, त्यांचा अर्थ काय? असा कोणीं प्रश्न केल्यास त्याचें उत्तर एवढेंच कीं, आपल्या चित्तांत या गोष्टीसंबंधाने भ्रामक कल्पना व विचार येतात, त्यामुळे आपणांस त्या अनिष्टशा वाटतात. आपली प्रिय माणसे किंवा आपले जिवलग मित्र आपणांस सोडून

गेले असतां, किंवा एकादे दृढ परिचयाने प्रिय झालेलें स्थान किंवा सवय आपणांस सोडणे प्राप्त झालें असतां, आपणांस जें वाईट वाटतें, त्याचें कारण केवळ आपल्या चित्तांत भ्रामक कल्पना असतात हें होय. या संबंधाने आमच्यांत आणि लहान मुलांत कांहींएक अंतर नसतें म्हटलें असतां चालेल. मुलांची आई किंवा दाई जरा नजरेआड झाली कीं, तीं रडून आकांत करितात. पण हातांत कांहीं ठेवून त्याला उगी केलें तर तीं आपलें रडे तत्काळ विसरून हसूं खेळूं लागतात या संसारांत आपणही असेच हर्षविषाद पावत असतों. पण ही आपल्या ठायींची बालिशता गेली पाहिजे. ही जाण्याचा मार्ग एकच आहे. तो कोणता म्हणाल तर वस्तुमात्राविषयींच्या आपल्या कल्पना शुद्ध झाल्या पाहिजेत.

आपण कोणत्याही बाह्य गोष्टींनीं हर्ष किंवा विषाद पावूं नये. आपल्या इष्टमित्रांचा, आपल्या वसतिस्थानाचा किंवा आपण जे अनेक उद्योगधंदे करितों, त्यांचा, किंबहुना आपल्या स्वतांच्या देहांचा आपल्या अंतर्यामाशीं कांहींएक संबंध नाहीं. त्यापासून आपल्या चिदंशास कांहींएक विकार होणे नाहीं. हा सिद्धांत लक्षांत बाळगून सदाचारापासून च्युत होऊं नये. आपला असा या संसारांत एक चिदंश होय. इतर सर्व काही आपल्याहून पर आहे. या चिदंशाव्यतिरिक्त अन्य कशाचीही आपण अपेक्षा किंवा आवड धरूं नयें. या चिदंशाची जेणेंकरून उन्नति होईल, असें करण्यास आपण सर्वदा झटलें पाहिजे. सर्व बाह्य विषय आपणांस कांहीं काळ प्राप्त झालेले असून, ते आपल्याकडून केव्हा जातील याचा कांहीं नेम नसतो यासाठीं त्यांविषयीं आपल्या चित्तांत आसक्ति कदापि उत्पन्न होऊं देऊं नये. ह्या विषयांस मुकण्याची आपणांस पाळी आली असतां त्याबद्दल आपण लवमात्रही उद्वेग पावूं नये. कारण जें आपलें मुळींच नव्हे, तें आपणांपासून गेलें तर त्याबद्दल आपण कां शोक करावा? जे हा शोक करितात, ते आईस किंवा दाईस रडणाऱ्या मुलांप्रमाणेच होत. मुलांचें एकादें खेळणें कोठें सांडलें तर तीं जशीं ओकसा बोकशीं रडतात, तद्वत्च बाह्यविषयासक्त पुरुषांची गोष्ट आहे. त्यांचे ते विषय नष्ट झाले असतां, त्यांस अनावर शोक होतो. पण हा शोक केवळ व्यर्थ होय.

आपणांस आपल्या प्रियजनांचा किंवा एकाद्या आवडत्या स्थलाचा वियोग झाला असतां, आपण अगदीं बेदील होतों, आणि त्याची पुनःपुनः आठवण करून शोकाकुल होतों. परंतु असें करणें ज्ञात्यास शोभत नाहीं. त्यानें असा विवेक करावा कीं, मी ज्या गोष्टींविषयीं शोक करीत आहें, त्या अशाश्वत असून, आपलें जीवितही केवळ क्षणभंगुर आहे. तेव्हां त्या गोष्टींचा आणि आपला संयोग अल्प काळ टिकणारा असून, त्यांचा आपला वियोग केव्हां घडेल याचा नेम नसतो. तर अशा गोष्टींविषयीं वृथा शोक करीत बसणें हा निवळ बालिशपणा आहे. प्रसंग येईल तसें वागण्यास नेहमी सिद्ध राहून, कोणत्याही स्थितींत आपल्या चित्ताची स्थिरता अढळ राखण्याचा जो प्रयत्न करील, तो कोठेंही असला तरी त्याला सुखानुभव घडेल. हे सारे इंद्रियतृप्तीचे विषय केवळ मुलांस दिलेल्या खाऊसारखे किंवा खेळण्यासारखे आहेत. मुले प्रौढ झालेलीं नसतात तों पर्यंत त्यांस त्यांत मोठें सुख व मौज वाटते. पण तींच प्रौढावस्थेत आलीं म्हणजे त्यांचें मन बाळपणच्या खेळांत किंवा खाऊंत रमेनासें होतें. अशीच गोष्ट पुरुषाच्या मनाची होणें इष्ट होय. ज्ञानाच्या योगानें त्याच्या ठायींचें अज्ञान व तन्मूलक भ्रम हीं जाऊन, त्यास स्वतांचें खरें हित कशात आहे तें कळले पाहिजे. भ्रमनिरास झाल्यावांचून आपली मानसिक उन्नति होणें नाहीं; आणि मानसिक उन्नति झाली नाहीं तर आपणांस खरें सौख्य लाभावयाचें नाहीं.

चित्ताची शांति व थोरवी जेणेंकरून प्राप्त होईल, तें करण्यास मनुष्यानें सर्वदा उद्युक्त असावें. या संसारांत त्यास कशीही स्थिति प्राप्त झाली तरी तींत त्यानें संतोष मानून पूर्ण समाधानानें रहावें; आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून व मोहांपासून निर्मुक्त असावें.

ज्याच्या अंगीं सामर्थ्य असेल, त्यानें या जगांतील दुरचार कमी करण्याविषयीं कायावाचामनेंकरून अहर्निश झटावें. परंतु असें सामर्थ्य ज्यास नसेल, त्यानें निदान आपलें अंतर्याम निर्मळ राखण्याविषयीं मनापासून प्रयत्न करावा. त्यानें आपल्या चित्तांतून खेद, भय, लोभ, मत्सर, हेवा, द्वेष, विषयासक्ति इत्यादि दुर्वृत्ति काढून टाकाव्या. असें तो करील तर त्यास खऱ्या सुखाचा अनुभव घडेल. परंतु याव्यतिरिक्त इतर बाह्य विषयांचा हव्यास धरिल्यानें त्याला परतंत्र होऊन सर्वदा दुःखांत व शोकांत आयुष्य कंठावें लागेल. या विषयांच्या प्राप्तींत खऱ्या सौख्याचा लेशही नाहीं. भर्तृहरि म्हणतो:-

भोगास्तुंगतरंगभंगचपलाः प्राणाः क्षणध्वंसिनः
स्तोकान्येव दिनानि यौवनसुखं स्फीतिः क्रियासु स्थिता
तत्संसारमसारमेव निखिलं बुद्धा बुधा बाधकाः
लोकानुग्रहपेशलेन मनसा यत्नः समाधीयताम् ।। *

मानसिक शक्ति

तुला कोणताही प्रसंग प्राप्त झाला तरी त्याच्या संबंधानें आपल्या कोणत्या मानसिक शक्तीचा आपणांस उपयोग करितां येण्यासारखा आहे त्याचा विचार करून वागत जा. उदाहरणार्थ एकादी रूपवती स्त्री तुझ्या दृष्टीस पडली असतां, तिच्या त्या रूपास मोहून न जाण्याचें सामर्थ्य तुझ्याठायीं विकास पावलें पाहिजे. या सामर्थ्यास मनोनिग्रह असें म्हणावयाचें. एकादें मोठ्या श्रमाचें काम तुला करणें प्राप्त झालें असतां, तुझ्याठायीं अविश्रांतपणे सतत परिश्रम करण्याची शक्ति वृद्धि पावली पाहिजे. तुझी कोणी निंदा केली, किंवा तुला विनाकारण शिवीगाळ केली तर तुला तीबद्दल संतापतां कामा नये. तुझ्या अंगीं असल्या गोष्टी सहन करण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे. याप्रमाणें हरएक प्रसंगीं निरनिराळ्या मानसिक वृत्तींचा तुझ्या ठायीं विकास होऊन तुझ्या अंगीं खरा सदाचार वृद्धिंगत झाला पाहिजे; आणि त्वां कोणत्याही प्रसंगीं सामान्य जनांप्रमाणें मोहवश होऊं नये.

प्रियवस्तुवियोग

तुझ्याकडून एकादी वस्तु गेली असतां ती माझी हरवली असें म्हणूं नको. तर ती जेथून तुला प्राप्त झाली, तेथें परत गेली असें मानून स्वस्थ रहा. तुझा पुत्र किंवा स्त्री मृत झाली असतां, तीं तुला जेथून मिळाली तेथें परत गेली असें समज. त्याचप्रमाणें तूं आपल्या वतनवाडीस मुकलास तर असें मनांत आण कीं, ती जेथून मला मिळाली तेथेंच ती आहे. तूं म्हणशील कीं, जो माझ्या ह्या प्रिय वस्तूंचा अपहार

* लाटांच्या परि भोग भंगुर तसे प्राण क्षणें सोडिती; तारुण्यांतिल सौख्य अल्प विभवा कमाविणें न स्थिति; या साठीं भव तत्वहीनचि असें जाणोनि विद्वज्जनीं; कल्याणार्थ जनाचिया सतत कीं यत्ना धरावें मनीं. वामन

करितो, तो मोठा दुरात्मा आहे. परंतु असें म्हणण्यास तुला काय अधिकार आहे? ज्याने तुला ह्या वस्तु दिल्या, तो त्या कोणाच्या तरी द्वारे तुजपासून परत नेतो. त्यांत तुला खेद मानण्यासारखें काय आहे? जोपर्यंत तो तुला ह्या वस्तु देत असतो, तोपर्यंत त्यांचा उपयोग त्वां दुसऱ्याच्या वित्ताप्रमाणें करावा. प्रवासी जसे एकाद्या धर्मशाळेंत उतरून तेथल्या जागेचा एक दोन दिवसांपुरता उपयोग करून पुनः मार्गस्थ होतात, तद्वत् तुझी या संसारातील वस्तूंच्या संबंधाची अवस्था आहे. म्हटलें आहे–

येषु येषु दृढं वद्धा भावना सुष्टवस्तुषु ।
तानि तानि विनष्टानि दृष्टानि किमिहोत्तमम् ।। * सू. र.

शांतीचे महात्म्य

तुझ्याठायीं सत्य ज्ञानाचा उदय व्हावा अशी तुझी इच्छा असल्यास त्वां संसाराकडे फारसें लक्ष पुरवितां कामा नये. माझ्या धंद्याकडे म्यां दुर्लक्ष केलें तर माझा चरितार्थ चालण्याची पंचाईत पडेल, किंवा माझ्या चाकरमाणसांस त्यांच्या दुर्वर्तनाबद्दल जेव्हांचें तेव्हां शासन केलें नाहीं तर तीं केवळ निरुपयोगी होतील, असले विचार तुझ्या मनांत येऊं देऊं नको. शोक व भय यांपासून जो मुक्त झाला, तो क्षुधेनें व्याकुळ होऊन मरण पावला तरी त्यांत त्यास कांहीं अनिष्ट वाटत नाहीं. परंतु ज्याचें चित्त नेहमी भयशोकादिकांनीं त्रस्त होत असतें, त्याला मोठी दौलत अनुकूळ असूनही व्यर्थ होय. त्याचप्रमाणें आपला एकादा चाकर दुर्वृत्त असलेला पुरवला; पण आपलें चित्त खिन्न असेल तर तें कदापि इष्ट नव्हे.

यासाठीं आपण लहानसान गोष्टींपासून आरंभ करावा हें उचित होय. तुझें थोडेंसें तेल सांडले, किंवा तुझे दूध कोणीं चोरून नेले, तर त्याबद्दल तूं आपल्या चित्तास वाईट वाटूं देऊं नको; तर उलट तूं असें मनांत आण कीं, असली लहानसान अनिष्टे सहन करण्याची सवय लागल्यानें तेवढी आपणांस शांति प्राप्त होईल. हे जे तुझे पदार्थ गेले, तें तुझ्याठायीं विकास पावणाऱ्या शांतीचें तेवढें मोलच आहे असें त्वां मानावें. कारण कोणतीही गोष्ट मोबदल्यावांचून प्राप्त होत नसते. त्याचप्रमाणें तूं आपल्या चाकरास हाक मारीत असतां, त्यानें ती कदाचित् ऐकिली नसेल, किंवा ऐकून न ऐकल्याचें त्यानें मीष केलें असेल; तर त्याबद्दल तूं त्याच्यावर रागावू नये; आणि तेवढ्या पुरती तुझी सहनशीलता वाढल्यामुळें तुझे हितच झालें असें तूं मनांत आणावें. मोरोपंताची या प्रकरणीं अशी उक्ति आहेः–

सुज्ञें ताप सहावा द्यावा तापप्रदासही न ताप ।
हाच कवि आणखी एके ठिकाणी म्हणतोः–
साधु कृतोपद्रवही प्रतिकूल नहोति ते जनां तरुसे ।।

कोणती गोष्ट इष्ट आहे

आपली आत्मोन्नति व्हावी अशी तुझी इच्छा असल्यास तुला बाह्य वेष किंवा स्थिति पाहून लोक तुला बेअक्कल किंवा मुर्ख म्हणत असले, तरी त्याबद्दल तूं कांहींच मनांत आणूं नको. आपल्या अंगीं ज्ञान

* ज्या ज्या सृष्ट वस्तूंच्या ठायीं दृढ भावना धरावी, त्या पाहतां पाहतां नष्ट होतात. तेव्हां या लोकी उत्तम असें काय आहे बरें? वाय ५३८–२०

आहे असें सुद्धां कोणास दाखविण्याची इच्छा धरूं नको. इतकेंही करून तुजविषयीं कोणाच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न झाली असतां, तेवढ्यानेंच फुगून जाऊं नको. तर यांत आपला कांहीं तरी उणेपणा आहे असें तूं समज. कारण आपली बाह्य स्थिति व अंतर्यामीची स्थिति या दोहोंचा मेळ घालणें कठीण आहे. जो कोणी बाहेरील थाटमाटाकडे किंवा चांगुलपणाकडे लक्ष पुरवील, त्याचें आपल्या अंतर्यामाच्या स्थितीकडे अवश्य दुर्लक्ष व्हावयाचें. पुनः निसर्गक्रमास अनुसरून त्याचें वर्तन व्हावयाचें नाहीं; आणि जो अंतर्यामाच्या सुस्थितीकडे लक्ष पुरवून निसर्गानुसार वागू पाहतो, त्याचें बाह्य स्थितीकडे निखालस दुर्लक्ष व्हावयाचें.

कोणत्याही बाह्य गोष्टीवर आपण मन ठेविलें असतां तीमुळें परवश व्हावें लागतें

आपली स्त्री, आपली मुलें, आपले मित्र चिरायु असावे अशी जो अपेक्षा करूं जाईल, तो महामूर्ख होय. अशी जो इच्छा करितो, तो, जी गोष्ट आपल्या हातची नव्हे, ती आपल्या इच्छेप्रमाणें व्हावी, असें मनांत आणितो म्हणावयाचें. त्याचप्रमाणें आपल्या नोकराकडून कोणतेंही वाईट काम होऊं नये असें जो इच्छितो, त्याची ती इच्छा केवळ व्यर्थ होय. कारण मनुष्यमात्र चुकीस पात्र आहे. आतां आपण जो सद्वर्तनाचा स्तुत्य क्रम आरंभिला आहे, तो कदापि सोडावयाचा नाहीं, असा जर तूं निर्धार करिशील, तर तो तुला साध्य होण्यासारखा आहे. तर हा निश्चयीपणा अंगीं वाढविण्यास झट; जी कोणती गोष्ट मनुष्यास साध्य होण्यासारखी असते, तिचाच त्यानें हव्यास धरावा हें युक्त होय.

ज्या मनुष्यास पराधीन व्हावयाचें नसेल, त्यानें आपल्या हातच्या नव्हत अशा कोणत्याही गोष्टींची अपेक्षा करूं नये. त्या सर्वदा तुच्छ मानाव्या. असें तो करणार नाहीं तर त्यास अत्यंत खेदजनक जशी परवशता प्राप्त होईल. डेमिट्रियसानें निरोबादशहास असें उत्तर केलें म्हणतात कीं, तूं माझा प्राण घेईन म्हणतोस, पण निसर्ग तुझ्या प्राणावर टपला आहे. माझ्या ह्या क्षुद्रदेहावर किंवा वित्तावर मी चित्त ठेवीन तर मी परवश झालोंच म्हणून समजावें. कारण यांचा मला लोभ असल्यास त्यांस जो कोणी अपाय करूं पाहील, त्याच्या चरणांचा मी दास बनून, त्याच्यापाशीं स्वतांच्या किंवा स्ववित्ताच्या रक्षणासाठीं करुणा भाकीन; आणि मग ज्यांस माझें नुकसान करण्याचें सामर्थ्य आहे, त्यांनीं मला कोणत्या बाबतींत अपाय करावा तें मीं त्यांस दाखवून दिल्यासारखे होईल. उदाहरणार्थ एकादा सर्प मनुष्यास भिऊन लपूं लागला असतां आपलें डोकें पहिल्यानें छपवूं पाहतो. यावरून स्पष्ट होतें कीं, त्याचें तें डोकें पहिल्यानें ठेंचलें पाहिजे. मनुष्याचीही गोष्ट अशीच आहे. तो जी गोष्ट अत्यंत मोलवान् मानितो, तिला अपाय करावा असें त्याच्याहून बलाढ्य असणाऱ्या मनुष्यास वाटत असतें. यास्तव तूं कोणत्याही बाह्य गोष्टीची आवड धरू नको, म्हणजे तुला कोणासही भिण्याची गरज उरणार नाहीं किंवा कोणाची खुशामत करावीसें वाटणार नाहीं.

तूं एकाद्याच्या घरीं मेजवानीस गेलास असतां, तुझ्या पुढें एकादे पक्वान्न वाढलें तरच तें त्वां सभ्य रीतीस अनुसरून भक्षण करावें. पण वाढणारा एकादे पक्वान्न तुला न वाढतां दुसऱ्यांस वाढण्यासाठी तुझें ताट सोडून पुढें गेला असतां, त्वां त्याचा हात धरून आपल्या ताटांत तें पक्वान्न वाढावयास लावणे हें सभ्यतेस अनुसरून नाहीं. बरें, एकादें पक्वान्न अजून तुझ्या पानावर आलें नाहीं तर तें लवकर खावयास

मिळावे म्हणून तें ठेविलें असेल तेथून घेण्यासाठीं भोजनावरून उठणें तर त्याहूनही वाईट. हा जसा भोजनसमयीचा शिष्टाचार त्वां अवश्य पाळिला पाहिजे, व तो तूं पाळितोसही; तद्वत् त्वां या संसारात वर्तन केलें पाहिजे. तुला एकादी प्रिय वाटणारी वस्तु प्राप्त झाली नाहीं तर तीबद्दल त्वां उतावीळ होतां कामां नये, किंवा ती प्राप्त झाली नाहीं म्हणून उगाच धडपड करूं नये. ती दैव योगानें प्राप्त झाली, किंवा मुळींच कधीं लाभली नाहीं, तरी तूं आपल्या चित्ताची स्वस्थता नष्ट होऊं देऊं नये. फार तर काय, पण ती प्राप्त होण्यासारखी असली तरी देखील तिची आकांक्षा न धरणें यांतच खरा पुरुषार्थ आहे. डाओजिनीस, हिराक्लिटस वगैरे साधुपुरुषांनी अशा वस्तूंचा अव्हेर केला, म्हणून ते एवढी शुद्धता व नीतिमत्ता पावले. गीतेंत ब्रम्हवेत्त्याचें जें लक्षण सांगितलें आहे, तद्वत् मनुष्याचे सर्वदा आचरण असणे इष्ट होय. ते लक्षण असेः-

न हृष्येत् प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रम्हविद्ब्रम्हणि स्थितः ।। *

आपलें अंतर्याम शोकाकुल होऊं देऊं नये

एकाद्यास पुत्रवियोग घडला असतां किंवा त्याचें वित्त नष्ट झालें असतां, तो दुःखानें विव्हल होतो. तरी पण तूं हें मनांत वागवावें कीं, अशा बाह्य अनिष्टांच्या योगाने त्याला खरी विपत्ति प्राप्त होत नसते. त्याला जो एवढा खेद होतो, त्याचें कारण अमुक एका अनिष्ट गोष्टीमुळे त्याला त्रास होतो हें नव्हें, तर त्या गोष्टीसंबंधानें त्याची जी कल्पना झाली असते, त्या कल्पनेमुळें त्याला खेद होतो. असे पुष्कळ जन आढळतात कीं, त्याला तीच गोष्ट घडली असता मुळींच खेद वाटत नाहीं. तेव्हां त्या गोष्टींत अंगचेंच कांहीं अनिष्ट असते असें म्हणवत नाहीं. तरी पण त्याची ती अवस्था पाहून तुझ्या मनांत त्याच्याविषयीं थोडासा कळवळा वाटावा हें रास्त आहे; व त्याचें दुःख पाहून दुःखित होण्याचा प्रसंग आला तरी कांहीं चिंता नाहीं. मात्र तूं आपलें अंतर्याम शोकमग्न होऊं देऊं नये.

आपणांस जी स्थिति प्राप्त होईल, तदनुसार वर्तन करण्यास सिद्ध असावें

संसार हें एक नाटक आहे. या नाटकांत तुला जी भूमिका प्राप्त होईल, ती बजावण्यास त्वां सर्वदा तत्पर असावें. ही तुझी भूमिका अगदीं लहान असली किंवा फार मोठा असली तरी तीबद्दल तूं खेद किंवा आनंद मानूं नये. एकाद्या गरीब मनुष्याचें किंवा आंधळ्यापांगळ्याचें किंवा एकाद्या बादशहाचें सोंग आणावे लागलें. तरी तुला त्याची बतावणी अगदीं मनापासून केली पाहिजे. त्यांत यत्किंचित्ही व्यंग दिसू न देण्याची त्वां खबरदारी घ्यावी. मला हें सोंग नको, दुसरें मिळेल तर मी तें घेईन, अशी कुरकुर करण्याचा तुला मुळींच अधिकार नाहीं.

माझे पुढें कसें होईल याची चिंता त्वां कदापि करूं नये. कारण तुला कशीही अवस्था प्राप्त झाली तरी तींत तूं समाधान मानून आपलें कर्तव्यासाठी मनापासून झटलास तूर तुझें काहींएक वाईट व्हावयाचें नाहीं. असें केल्यानें परिणामी तुला सुखच मिळेल. रामदास म्हणतोः-

---

* हर्षेना प्रिय होतां अप्रिय होतांहि घाबरा नोहे; स्थिरबुद्धि न जो मूढ ब्रम्हीं ब्रम्हज्ञ तो स्थिर स्वांतें. मोरोपंत.

समाधान तें सभाग्य । असमाधान तें अभाग्य ।

तुजवर एकाद्या हिंसक पशूनें हल्ला केला असतां तूं जसा त्याच्याशीं लढून आपला जीव बचावण्याचा प्रयत्न करितोस, तद्वत्च या संसारांत तुला दुष्ट पुरुषांशीं प्रसंग पडला असतां, त्यांचा तो दुष्टपणा घालविण्यास त्वां उद्युक्त असावें. असें करण्यांत तुझा प्राणनाश झाला तरी कांहीं चिंता नाहीं. चांगले लोक तुझी कीर्ति गातील; आणि तूं सत्कर्म करण्यांत आपल्या जिवाची आहूति दिलीस म्हणून ते तुझी सर्वदा वाखाणणी करितील. मरण कोणासच चुकलें नाहीं. कोणी कशाही व्यापारांत गुंतलेले असले तरी त्यांस मरण अवश्य प्राप्त व्हावयाचें. असें आहे त्यापेक्षां मी कांहीं तरी दयेच्या, जनहिताच्या, राष्ट्ररक्षणाच्या, किंवा एकाद्या नीतीच्या कृत्यांत गुंतलों असतां, मला मरण प्राप्त व्हावें. अशी माझी इच्छा आहे. बरें असें एकादे सत्कर्म करण्याचें सामर्थ्य मजमध्यें नसलें, किंवा तें करण्यास माझी स्थिति अनुकूळ नसली, तर माझ्या स्वाधीनचें इतकें तरी निदान आहे कीं, मी आपली स्वतांची सुधारणा करीत असतां मला मरण प्राप्त व्हावें. माझ्या चित्तास जेणेंकरून शांति प्राप्त होईल, तें मीं सर्वदा करीत असावें. या संसारांतील माझें हरएक कर्तव्य म्यां काळजीपूर्वक करावें, आणि खऱ्या उन्नतीचें व सौख्याचें साधक असें जें ज्ञान तें प्राप्त करून घेण्यास अहर्निश झटावें, असा माझा निर्धार आहे. असें करीत असतां मला मृत्यु प्राप्त झाला तर मी आपणास मोठा धन्य समजेन.

खरी निवड

लोकमतानें जें दुश्चिन्ह गणिलें जातें, तें वस्तुतः पाहतां तसें नव्हे. त्यापासून माझा हा क्षुद्र देह, किंवा माझें हें यःकश्चित् वित्त, किंवा माझा लौकिक, किंवा माझें कुटुंब यांस यत्किंचित्ही अपाय घडणें नाहीं. कारण कोणत्याही प्रकारचे चिन्ह दिसून आलें तरी त्याचा उपयोग करून घेणें माझ्या स्वाधीनचें आहे.

ज्या कार्यामध्यें आपल्या स्वतांच्या पराक्रमानें सिद्धि मिळण्याचा संभव असतो, असेंच कार्य तूं हातीं घेशील तर तुला सर्वदा यश प्राप्त होईल.

एकाद्या मनुष्याचा जनांत बहुमान झालेला तुझ्या दृष्टीस पडला किंवा त्याच्या हातीं मोठी सत्ता असली, तर तो खरा सुखी असेल असें तूं मानूं नको. खरें सुख नीत्याचरणानें प्राप्त होत असतें; आणि हें नीत्याचरण पाहिजे त्यास साध्य होण्यासारखें असून, तें ज्यास साधतें, त्याचा कोणी हेवा किंवा द्वेष करीत नाहीं. अशा मनुष्यास मोठा अधिकार किंवा राजसत्ता प्राप्त व्हावी अशी इच्छा कदापि होत नाहीं. ज्यास याप्रमाणें खरें सुखी व्हावयाचें असेल, त्यानें आपल्या हातच्या नव्हत अशा सर्व गोष्टी तुच्छ मानाव्या. हाच बोध मोठ्या व्यापक शब्दांनीं पुढील सुभाषितांत उत्तम रीतीनें केला आहे:-

लोभमूलानि पापानि व्याधयो रसमूलकाः ।
स्नेहमूलानि दुःखानि त्रयं त्यत्तवा सुखी भवेत् ।। *

---

* लोभाच्या योगानें मनुष्याची पापकर्माकडे प्रवृत्ति होते. षड्रसयुक्त अन्नांच्या यथेष्ट सेवनांने नाना व्याधि देहास जडतात. स्नेहसंबंधांमुळें वारंवार दुःखाचा अनुभव घडतो. यास्तव या तिहींचा त्याग करून मनुष्यानें सुखी व्हावें.

एकाद्या मनुष्यास कोणीं शिवीगाळ किंवा मारहाण केली असतां तीपासून त्यास कांहीं प्रत्यक्ष अपकार घडतो असें नाहीं, तर तीबद्दल त्याची जी कल्पना झाली असते, तीमुळें त्यास खेद वाटतो. एकाद्यानें तुला राग आणण्यासारखें वर्तन केलें असतां, त्वां असें समजावे कीं, तुझ्या मनांतील कल्पनेमुळें तुला हा राग आला. यास्तव जो बाह्यतः तुला अनुभव घडतो, त्यामुळें तूं आपलें चित्त व्यग्र होऊं देऊं नको. तर कोणताही अनुकूल किंवा प्रतिकूल अनुभव घडला तरी तूं अंमळ शांत चित्ताने विवेक करून त्यांत वास्तविक तथ्य काय आहे तें लक्षांत आणावे. असें तूं करिशील तर तुझ्याठायीं हळूहळू मनोनिग्रह विकसित होईल.

मरणादि जीं अनिष्टें तुला एवढी भयंकर दिसतात, तीं त्वां आपल्या डोळ्यांपुढे नेहमी ठेवावी. त्यांतूनही मरणाचा विचार तर तुझ्या मनांत नेहमीं घोळावा. असें तूं करिशील तर तुला या संसारातली कोणतीच अवस्था एवढी प्रिय किंवा अप्रिय वाटणार नाही.

जनकृत निंदास्तुतीविषयीं बेपरवा असावें

तुला ज्ञानप्राप्तीची आकांक्षा असल्यास तूं जनांची निंदा किंवा उपहास सहन करण्यास सिद्ध झालें पाहिजे. लोकांनी तुझी विटंबना कितीही केली तरी तीबद्दल तुला यत्किंचित्ही विषाद वाटतां कामा नये. त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊन तूं आपला ज्ञानप्राप्तीचा मार्ग सहसा सोडूं नये, किंवा तुला तो कदापि अप्रियसा वाटूं नये. याप्रमाणें तूं आपला स्तुत्य क्रम अप्रतिहतपणें व केवळ निश्चयानें चालविलास, व तदनुसार वर्तन करण्याचा प्रयत्न करीत राहिलास, तर ज्या मनुष्यांनी तुझा प्रथम उपहास केलेला असतो, तेच तुला मान देऊं लागतील. असा निश्चयीपणा तूं न दाखवितां, जर करितां त्यांच्या अवहेलनेस भिऊन आपला स्तुत्य क्रम सोडून देशील, तर तुझी विटंबना ते द्विगुणित करितील.

एकाद्या मनुष्यास संतुष्ट करण्याच्या इराद्यानें तूं बाह्य गोष्टींकडे लक्ष पुरवूं लागशील, तर तूं सन्मार्गापासून च्युत झालास म्हणून समज. तूं असल्या लोकाराधनेच्या फंदांत बिलकुल पडूं नको. तर आपला ज्ञानप्राप्तीचा क्रम निश्चयाने चालीव. आपल्याठायींची योग्यता दुसऱ्यास दाखविण्याऐवजी ती आपली आपणच नीट लक्षांत आणून, आपल्या अंगी जे कांहीं दोष असतील, ते काढून टाकण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें आपलें आपणांस समाधान वाटलें म्हणजे पुरे आहे. दुसरे आपणाविषयी काय म्हणतील याची आपण मुळीच परवा करूं नये. याप्रमाणें जनांच्या निंदास्तुतीची परवा न करितां जो आत्मोन्नति करण्यास झटेल, तो पुरुष धन्य होय.

प्रत्येकानें आपलें कर्तव्य करावें

माझा कोणी मानसन्मान करणार नाहीं, किंवा मला कसलीही मानाची पदवी वगैरे न मिळून माझा, कोठेंही कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, असें विचार मनांत आणून आपण कष्टी होऊं नये. आपला कोणी मान ठेवीत नाहीं हें अनिष्ट समजूं नये. लोकांच्या करण्यानें आपणांस कदापि अनिष्ट प्राप्त होणें नाहीं. लोकांनी तुला मेजवानीस आमंत्रण करावें, किंवा तुला मोठा हुद्दा मिळावा हें कांहीं तुझ्या हातचें नव्हे. तेव्हां तुझा असा मान झाला नाहीं म्हणून तूं कां म्हणून कष्टी व्हावें? आणि एवढ्यावरूनच तुझा कोठेंही कांहीं उपयोग होणें नाही असें तुला कां बरें वाटावें? वास्तविक पाहतां तुझी खरी योग्यता वाढविण्याचें

केवळ तुझ्या हातीं आहे. तूं आपलें आचरण सुधरण्याचा प्रयत्न अहर्निश करीत राहिलास तर तुझी योग्यता मोठमोठ्या लौकिकवान् व सत्ताधीश पुरुषांहून अधिक होऊन, तुझ्या हातून पुष्कळ जनहित होईल.

तूं म्हणशील कीं, अशाने माझ्या मित्रांचे माझ्या हातून कांहींएक बरें व्हावयाचें नाहीं. परंतु हें तुझें म्हणणें व्यर्थ आहे. तुजकडून त्यांला पैसाअडका किंवा मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळणार नाहींत, एवढेंच ना? परंतु ह्या गोष्टी तुझ्या हातच्या तरी आहेत काय? त्या केवळ परस्वाधीन होत. त्या तुला स्वतांलाही प्राप्त होण्याचा संभव नाहीं. मग त्या दुसऱ्यांस देण्यास तुला कोठून सामर्थ्य असणार?

यासाठीं जें तुला प्राप्त होण्यासारखें असून तुझ्यापाशीं नित्य रहाण्याजोगें असेल, तें त्वां प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा. पवित्रता, विश्वासूपणा, मनाचा थोरपणा इत्यादि सद्वृत्ति माझ्याठायीं उत्पन्न होऊन विकसित झाल्या असतां, त्यांस मी कधींही मुकणार नाहीं. तर ह्या सद्वृत्ति प्राप्त होण्याचा मार्ग कोणी दाखवून दिला असतां, त्याचें मी निश्चयानें अनुसरण करीन. या उत्तम गोष्टींचा अव्हेर करून, ज्या गोष्टी सवर्था चांगल्या नव्हत, त्या प्राप्त करून घेण्याविषयीं मला कोणीं उपदेश केल्यास मी त्याला अविचारी समजेन. तेव्हां तात्पर्य काय कीं, पवित्र व विश्वासू मित्रापुढें मला मोठी दौलतही तुच्छ आहे.

आतां कोणी म्हणेल कीं, या सदाचारप्राप्तीच्या मार्गाचें अवलंबन म्यां केलें तर मी स्वदेशसेवेस अंतरेन. पण ही देशसेवा कोणत्या प्रकारची बरें? तुला आपल्या देशांत मोठमोठ्या हवेल्या किंवा धर्मशाळा बांधता येणार नाहींत, एवढेच ना? पण त्यांत काय बिघडलें? लोहाराकडून आपणाला जोडे मिळाले नाहींत, किंवा चांभाराकडून हत्यारें मिळालीं नाहींत, तर त्याबद्दल आपण त्यांवर रागावलों असतां, आपणांस कोणी वेडा नाहीं का म्हणणार? अशीच गोष्ट तुझी आहे. तुझ्याकडून अमूक एका प्रकारची देशसेवा घडली नाहीं तर त्याबद्दल तूं कां कष्टी व्हावें? तुझ्या योग्यतेप्रमाणें तूं आपलें कर्तव्य करावें एवढेंच तुझें काम. तूं स्वत: आपलें वर्तन सुधरून, आपल्या देशबांधवांपैकीं एकादा मनुष्य तरी सदाचारी केलास, तर तेवढी तूं स्वदेशसेवा बजावलीस असें नाहीं का होणार? असा विचार तूं आपल्या मनांत आणशील तर, 'मी आपल्या देशाच्या कांहीं एक उपयोगी पडणार नाही.' असें तुला कधींही वाटणार नाहीं.

तूं म्हणशील कीं, 'तर मग मीं माझ्या देशांत कोणता हुद्दा पतकरून रहावें?' याचें उत्तर एवढेंच कीं, तुला कोणताही हुद्दा मिळाला तरी तो तूं प्रामाणिकपणानें व नेकीनें चालवावा; आणि आपल्या ठायींची सदाचारप्रवृत्ति कदापि नष्ट होऊं देऊं नये. देशसेवेचा हव्यास धरून तूं सदाचाराचा त्याग करिशील, तर तुझा तुझ्या देशास कांहींएक उपयोग व्हावयाचा नाहीं.

लोकांकडून मान मिळावा अशी इच्छा असल्यास त्यांस योग्य मोबदला दिला पाहिजे

एकाद्या मेजवानीच्या प्रसंगीं तुजकडून दुसऱ्या कोणाचा विशेष मान झाला, किंवा एकादा मोठा हुद्दा तुला न देतां दुसऱ्यास दिला, किंवा एकाद्या प्रकरणांत तुझी मसलत न घेतां दुसऱ्याची घेतली, तर त्याबद्दल तुला वाईट वाटण्याचे मुळींच कारण नाहीं. जर ह्या गोष्टी इष्ट असल्या तर तुझ्या कोणा तरी देशबांधवास त्या मिळाल्याबद्दल तुला हर्ष वाटणें योग्य आहे. परंतु त्या अनिष्ट असल्यास त्या तुला प्राप्त झाल्या नाहींत

म्हणून खिन्न होण्याचें काहींएक प्रयोजन नाहीं. आणखी त्वां हें ध्यानांत ठेवावें कीं, ज्या गोष्टी तुझ्या हातच्या नव्हत, त्या प्राप्त करून घेण्यासाठीं इतराप्रमाणे त्वां उद्योग केला नाहीं तर त्या तुला त्यांच्याप्रमाणें प्राप्तही होणार नाहींत. तेव्हां त्या प्राप्त झाल्या नाहींत म्हणून तुला कां बरें वाईट वाटावे?

कारण जो कोणी दुसऱ्यांच्या दारीं खेपा घालून त्यांची पायधरणी किंवा खुशामत करणार नाहीं, त्याला त्यांच्याकडून कोणताही लाभ होण्याचा कसा बरें संभव असेल? ज्यांस त्यांच्याकडून लाभ होतो, ते जशी त्यांची परिचर्या करितात, तशी जर तो करणार नाहीं, तर त्याला तें कसें प्रसन्न होतील? लोकांकडून मिळणारी मान्यता किंवा पदवी कांहीं फुकटची नव्हे. तिचा योग्य मोबदला दिलाच पाहिजे. तो मोबदला देण्यास जो तयार नसेल, त्यानें ती मिळविण्याची इच्छा धरणें हा अन्याय होय. व्यवहारांत आपणांस कोणतीही वस्तु हवी असली तरी तीबद्दल योग्य मोबदला दिलाच पाहिजे. एरवीं ती वस्तु मिळणें नाहीं. ज्याला हा मोबदला देणें नसेल, त्यानें त्या वस्तूची अपेक्षा करूं नये, हा जसा न्याय आहे, तसाच लोकांकडून मिळणाऱ्या मानासंबंधानेंही आहे. तुला कोणीं मेजवानीस बोलावलें नाही तर त्वां असें समजावें कीं, त्याच्याकडे मिळणाऱ्या पाहुणचाराबद्दल योग्य मोबदला तूं त्यास दिला नाहींस, म्हणून त्यानें तुझी परवा किंवा आठवण केली नाहीं. त्याची तूं कधीं खुशामत करितास, किंवा त्याची मर्जी प्रसन्न करून घेण्याची खटपट केली असतीस, तर त्यानें तुझा बहुमान केला असता. हा त्याजकडून मिळणारा मान तुला हिताचा वाटत असल्यास त्याची तूं मनोधारणा करण्यास झट. परंतु असा कांहीं मोबदला त्याला तूं दिल्यावांचून तुझा त्यानें मानसन्मान करावा असें तूं इच्छीत असल्यास, तुला केवळ वेडा व लोभी म्हणावयाचें.

परंतु ज्या मनुष्याचें आचरण निंद्य असतें, अशा मनुष्याकडून आपणांस मान मिळावा म्हणून आपण त्याची खुशामत करावी, किंवा त्याच्या चाकरमाणसांकडून आपली बेअदबी करून घ्यावी हें मुळींच इष्ट नव्हे.

निसर्गाचा हेतु

आपणांस या संसारांत कसाही अनिष्ट प्रसंग प्राप्त झाला तरी आपण कोणत्या प्रकारें वर्तन करावें, हे, दुसऱ्यावर तसे प्रसंग आले असतां, आपण त्याचें कसें समाधान करितों याचा विचार केल्यास, आपल्या लक्षांत येईल. उदाहरणार्थ एकाद्या मनुष्याचा पेला मुलाच्या हातून पडून फुटला, तर आपण लागलीच म्हणत कीं, जाऊं द्या, मूलच तें, त्याला काय समजतें. पेला काचेचा होता म्हणून फुटला. यांत नवल तें काय झालें? तेव्हां आपला स्वतांचा असाच एकादा पेला फुटला असता, तो जसा काय दुसऱ्याचाच फुटला असें समजून सदरील विवेक करावा हें योग्य आहे. हाच विवेक याहूनही मोठ्या अनिष्ट प्रसंगीं करावा. एकाद्याचें मूल किंवा स्त्री मरण पावली असतां, आपण म्हणतों कीं, या संसारांत असेंच रहाटगाडगें चालावयाचें. आतां एक गाडगें भरून वर आलें आहे, तर क्षणभरानें तें रितें होऊन खालीं जावयाचें. मरण मनुष्यमात्रास चुकलें नाहीं. असा विवेक त्याच्याशी करून त्याचें समाधान आपण करितों. पण असाच प्रसंग आपणा स्वतांवर आला असतां, आपण लागलीच पराकाष्ठेचा शोक करावयास लागतों, आणि म्हणतों कीं, मी केवढा हतभाग्य मनुष्य! पण दुसऱ्यावर ज्या वेळीं असाच प्रसंग आला होता, त्या वेळीं आपण त्याचें कसें समाधान केलें, याची आठवण या समयीं आपण करून आपलेंही समाधान करून घ्यावें हें उचित होय.

मनाचे स्थैर्य

कोणा जुलमी मनुष्यानें तुला रस्त्यांतील झाडास बांधून घालून, प्रत्येक येणाऱ्या जाणाऱ्या माणसानें तुझ्या देहावर वाटतील तसे प्रहार करावे असा हुकूम फर्माविला, तर तुला त्याचा किती राग येईल बरें? परंतु तूं स्वतः आपल्या मनाची अशीच अवस्था करीत आहेस. प्रत्येक इष्टानिष्ट प्रसंगानें तें व्यग्र होऊं देत आहेस. काणी तुझी निंदा केली किंवा तुझें इतर प्रकारें कांहीं नुकसान केलें, तर त्याबद्दल तुझ्या चित्तास उद्वेग प्राप्त होऊन तें अस्वस्थ होत आहे. याबद्दल तुला कांहींच वाटूं नये काय? तूं मनावर घेशील तर या इष्टानिष्ट गोष्टींसंबंधाने तुला दूर, पूर्ण उदासीन रहातां येईल.

मनुष्यानें कधींही बदलूं नये

तूं कोणतेही काम हातीं घेतांना मागचा पुढचा नीट विचार करावा. नाहीं तर पुढें कोणतीं संकटें येतील याचा विचार न करितां कोणत्याही कामास प्रथमतः मोठ्या उत्साहानें आरंभ करून पुढें कांहीं विघ्नें प्राप्त झालीं असतां, तें तूं सोडून देशील तर त्यासारखें लाजीरवाणे कांहींएक नाहीं. या प्रकरणीं भर्तृहरीचे एक सुंदर वचन आहे. तें असें:-

आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ।। ✻

उदाहरणार्थ, तुला कुस्तेगिरीमध्यें सरशी मिळवावयाची असल्यास एकाद्या तालमीच्या आखाड्यांत जाऊन तेथील वस्ताद सांगेल तसें वागलें पाहिजे. तो तुला सांगेल कीं, तूं अमुक प्रकारचें खुराक खावें; अमुक मिष्ट पदार्थ वर्जावे; अमुक वेळीं उन्हांत किंवा थंडींत तालीम वगैरे करावी, मद्यादि पदार्थांचे सेवन करूं नये, हे सारे नियम तुला मनापासून पाळले पाहिजेत. यांतली अमुक एक गोष्ट मला आवडत नाहीं किंवा पसंत नाही असें म्हणून चालावयाचें नाहीं. तो सांगेल तसें तुला निमूटपणें वागलेंच पाहिजे. त्याच्या बरोबर तक्रार करून चालणार नाही. याप्रमाणे तुझी तयारी झाल्यावर मग तुला एकाद्या पहिलवानाशीं कुस्ती घेण्याचा प्रसंग आल्यास त्याच्याशीं पकड करितांना माझा हात किंवा पाय मोडेल अशी कुरकुर करून चालावयाचें नाहीं. कारण तूं कोणाशीं कुस्ती खेळला नाहींस तर तुला कोण कुस्तेगीर म्हणेल बरें?

या सर्व गोष्टी लक्षांत आणून जर मग तुला कुस्तेगिरी संपादावयाची असेल तर तूं त्या उद्योगास खुशाल लाग. परंतु पुढें प्राप्त होणारा सारा अनुभव आज लक्षांत आणिल्यावांचून तूं त्या उद्योगास लागशील, तर कांहीं वेळानें तुला अनिष्ट अनुभव घडून, तूं त्या उद्योगापासून परावृत्त होऊन दुसराच कोणता तरी आरंभिशील. याप्रमाणें एकाद्या मुलासारखा वागून तूं चित्ताची चंचलता मात्र प्रगट करिशील, आणि जनांच्या उपहासास पात्र होशील? वानर जसा पाहिलेल्या गोष्टीची नक्कल करितो, पण त्यास कोणतीच गोष्ट चांगली

✻ आरंभितात खल विघ्नभयें न, येती विघ्नें स्वकार्य तरि मध्यम सोडिताती केलें जरी बहुत जर्जर विघ्नघातें प्रारब्ध उत्तम जनीं न विसंबिजेतें. वामन.

करितां येत नाहीं, तशी तुझी अवस्था होईल. आज एक गोष्ट बरीशी वाटली कीं ती तिच्या नादीं लागावें; पण ती अंमळशानें वाईट दिसली कीं ती सोडून दुसरीच एकादी हातीं घ्यावी. या दुसरींतही कांहीं अनिष्टानुभव घडला कीं तिचा नाद सोडून तिसरीच्या फंदात पडावयाचें. असा जो क्रम ठेवतो, त्याला कोणतीच गोष्ट पूर्णपणे साध्य न होऊन वृथा शीण मात्र पुष्कळ होतो. या बुद्धिचांचल्याचे मुख्य कारण असें कीं, तो कोणतीच गोष्ट मागला पुढला विचार करून हातीं घेत नाहीं; आणि हातीं घेतलेल्या गोष्टीच्या सिद्धीसाठीं सतत नियमानें परिश्रम करण्याचा गुण त्याच्या अंगीं नसतो. त्याला त्या गोष्टीची आवड प्रारंभी अतिशयित असली तरी ती कालांतरानें अगदीं कमी होऊन तो तीविषयीं पक्का उदासीन बनतो.

एकाद्या ज्ञानी पुरुषाचा संवाद कानीं पडला असतां, आपणही त्याच्यासारखें ज्ञानसंपन्न व्हावें अशी इच्छा पुष्कळांच्याठायीं उद्भवते; आणि ते ज्ञानसंपादनाच्या उद्योगास लागतात. परंतु अशा जनांनी आपण कोणत्या उद्योगास प्रवृत्त झालों आहों याचा नीट विचार करावा. ज्ञानप्राप्तीस आवश्यक असे जे बुद्ध्यादि गुण ते आपल्याठायीं कितपत वसत आहेत याचा त्यांनी पुरा विचार करावा. जो कोणता उद्योग किंवा धंदा आपण हातीं घ्यावयाचा, त्यास अनुरूप अशी आपल्या देहाची व मनाची स्थिति आहे किंवा कसें हें त्यांनीं अवश्य पाहावें. कारण सर्वांला सर्वच गोष्टी साधण्यासारख्या नसतात.

तूं साधुवृत्ति धारण करण्याचा निर्धार करून पूर्ववत् आहारविहार ठेवूं लागलास व कोणावर रागरुसवा करूं लागलास, तर तुझा उद्देश कधीं तरी सिद्ध होईल काय? कधीं नाहीं. तुझ्याठायीं खरें साधुत्व आलें पाहिजे तर तूं सर्वदा फार जपून वागलें पाहिजे; आपल्याठायींच्या दुर्वृत्तींचें दमन करण्यास त्वां मनापासून झटले पाहिजे; संसाराचा सर्व गुंता सोडून तुला विरागी बनलें पाहिजे; तुला कोणींही तुच्छ लेखिलें, किंवा तुझ्या शेजाऱ्यांनीं तुझा हवा तसा उपहास केला, तरी तुला तें सारें सहन केलें पाहिजे. तूं कोठेंही गेलास तरी तुला मानापमानाची मुळींच परवा करितां कामा नये; सर्व प्रसंगीं मोठ्या गरिबीनें वर्तन केलें पाहिजे.

ही अशी वृत्ति धारण करून जगाचे आघात सोसण्यास तूं तयार आहेस किंवा कसें याचा पहिल्यानें आपल्या मनाशीं विचार कर. जर तुझ्या ठायीं एवढी सहनशीलता नसेल, तर असल्या फंदांत तूं न पडशील तर बरा. मनाची शांति, स्थिरता व स्वातंत्र्य हीं कांहीं फुकट लाभावयाचीं नाहींत. हीं प्राप्त करून घेण्यास भगीरथप्रयत्न करावे लागतात. या प्रयत्नांस साजेल अशी तुजमध्यें योग्यता असली तरच तुला सद्वर्तन साधावयाचें. नाहीं तर आज ज्ञानी पुरुष व्हावयाचा उद्योग आरंभिला, आणि उद्यां त्यांत बहुत कष्ट आहेत असें आढळून आलें असतां, तो नाद सोडून देऊन दुसरीच कोणती तरी कला साध्य करण्याच्या खटाटोपास लागावयाचें. पुढें त्यांतही यश येणे कठीण आहेसें वाटलें असतां, तिसऱ्याच कोणत्या तरी गोष्टीला हात घालावयाचा. असें जो करूं जाईल, त्याचें तें आचरण बालिशपणाचें समजावें. तेव्हां सारांश काय कीं, मनुष्यानें कोणताही उद्योग आरंभिला असतां, तो कांहीं झालें तरी सोडू नये. दृढ निश्चय धरून तो पार पाडावा. यांतच खरा पुरुषार्थ आहे.

◆◆◆

पुस्तक दुसरें

कर्तव्यकर्मे

या संसारामध्यें आपल्या नात्याचे जन असतात; त्यांच्या संबंधाने आपणांस कांहीं कर्तव्ये करणें उचित होय. ज्याशीं आपलें पुत्राचे नातें असतें, त्या आपल्या पित्यास वृद्धापकाळ प्राप्त झाला असतां, त्याचा आपण अवश्य प्रतिपाळ करावा. त्याची शुश्रूषा करण्यास सर्वदा तत्पर असावें. समयविशेषीं त्यानें आपणास शिवीगाळ केली किंवा कांहीं शासन केलें, तर तें पुत्रधर्मास्तव निमूटपणें सहन करावें. आपला पिता स्वभावानें वाईट असला तरी त्याच्या संबंधाच्या तुझ्या कर्तव्यांत यत्किंचित्ही अंतर पडूं नये. कारण निसर्गक्रमाप्रमाणे तुझें त्याचें नातें जुळलें असल्या कारणानें तुला त्याचा धिक्कार किंवा अवमान मुळीच करितां कामा नये. त्याचप्रमाणें तुझ्या भावानें तुझें कितीही नुकसान केलें असलें, तरी तूं आपल्या बंधुधर्मास जागून त्याच्या संबंधाचे हरएक कर्तव्य मनापासून करीत जावें. तुजसंबंधाच्या त्याच्या वर्तनाचा विचार तूं कदापि मनांत आणूं नये. तर आपलें कर्तव्य आपण कोणत्या प्रकारें बजावीत आहों, याचाच तूं विचार ठेवावा. कारण तुजशीं कोणीं कितीही विरोध केला किंवा तुझें नुकसान करूं पाहिलें, तरी त्याच्या हातून तुझें वास्तविक अहित असें कांहींच व्हावयाचें नाहीं. तुला त्याच्यापासून अपकार घडला असें जें वाटतें, ती तुझी केवळ कल्पना आहे. ही भ्रामक कल्पना चित्तास शिवूं न देण्याविषयीची सावधगिरी ठेवावी.

याचप्रमाणें आपल्या शेजाऱ्यांशीं, आपल्या देशबांधवांशीं, आपल्यावरील अधिकाऱ्यांशीं कसें वर्तन करावें, व त्यांच्यासंबंधानें आपली कर्तव्यें कोणती याचा त्वां सर्वदा विचार ठेवावा, आणि तदनुसार वर्तन ठेवण्यास अहर्निश झटावें. इतर जन आपणाशीं कसे वर्तत आहेत, याविषयी तूं कांहींच मनांत आणू नये.

दास्याविषयीं

कोणे एके प्रसंगीं मला एका सधन मनुष्यानें विचारिलें कीं, देवांला प्रिय होईल अशा रीतीनें मला माझें भोजन उरकावयाचें आहे, तर म्यां काय करावें? मीं त्याला म्हटले: तूं आपलें भोजन योग्य प्रकारें, विचारपूर्वक, परिमितपणें, व्यवस्थितपणें व शांतपणें करावें, म्हणजे तें देवांला अवश्य प्रिय होईल. तूं आपल्या चाकराकडे गरम पाणी मागितलें असतां, त्यानें तें कोंबट किंवा थंड आणून दिलें, किंवा तूं काय सांगतोस त्याकडे त्याचें मुळीं लक्षच नसलें, अथवा तूं हाक मारीत असतां, तो मुळीं घरांतच नसला, तर तूं अगदीं रागास चढून संतापून जावें हें कांहीं देवास प्रिय व्हावयाचें नाहीं. तूं म्हणशील, अशा निष्काळजी उद्दाम मनुष्यांचे अपराध कोण सहन करील? पण हे धनांध मनुष्या, हे तुझे सेवक तुझे बांधव

नव्हत काय? तुझ्याप्रमाणेंच ते ह्या भूमातेचीं लेंकरें असून तुझ्या व त्यांच्या हाडांमांसाची व आत्म्यांची उत्पत्ति एकाच ठिकाणाहून नाहीं काय झाली आहे? असें असतां केवळ धनाढ्यतेच्या बळावर जाऊन किंवा अधिकारमदानें फुगून तूं त्यांला आपले हुकूमबंदे समजत आहेस काय? ज्यांच्यावर तूं हा ताबा चालवीत आहेस, त्यांचें तुझें बंधुत्वाचे नाते आहे तें विसरतोस काय? पण तूं म्हणशील कीं, मीं हे दास विकत घेतले आहेत, तेव्हां त्यांनी माझी सेवा मनापासून केलीच पाहिजे. तींत ते यत्किंचित्ही चुकतील तर त्यांस शासन करण्याचा मला अधिकार आहे. पण हे अभिमानी पुरुषा, हा जो तुझा त्यांचा सेव्यसेवक भाव आहे, तो या मर्त्यलोकींच्या पामर जनांनी करून ठेवलेल्या नियमानुसार आहे. पण हे नियम सहसा योग्य नव्हते. ते नीतीस व निसर्गास अनुसरून मुळींच नाहींत. तेव्हां अशा ह्या क्षुद्र व दोषयुक्त नियमांच्या बलावर त्वां अंध होऊन निसर्गाच्या परम पवित्र नियमांकडे दुर्लक्ष करावें हें केवढें निंद्य कर्म आहे? हे गर्विष्ठ मनुष्या, तुझ्या मृत वाडवडिलांनीं जे हे कायदे करून ठेविले आहेत, त्यांत कांहीं दोष नाहींत असें तूं कदापि मनांत आणू नको.

ह्या दासांची अवस्था तुला प्राप्त होऊन तुजवर धनीपणा मिरविणाऱ्या कोणा मनुष्यानें तुजशी असें निर्घृणतेचें वर्तन केलें तर तुला तें सहन करवेल काय? जर नाहीं, तर असा नियम ध्यानांत ठेव कीं, जी गोष्ट आपणा स्वतांस सहन होण्यासारखी नसते, ती दुसऱ्यास करण्याचें कधींही मनांत आणू नये. 'आपल्यावरून जग पारखावें,' ह्या म्हणींतील सारही असेंच आहे. जर तुला दास्य आवडावयाचें नाही, तर तें इतरांनी तुझें करावें अशी इच्छा त्वां धरूं नये. तूं इतरांस दासांप्रमाणें वागवूं लागलास तर तूं स्वतः पहिल्या प्रतीचा दास आहेस असें म्हणावें लागेल. कारण असें आहे कीं, सद्गुणाचें आणि दुर्गुणाचें कधींही जुळावयाचें नाहीं, या सिद्धांताअन्वयें पाहतां स्वातंत्र्य व दास्य यांचें कधींही जुळूं नये असें आहे. तेव्हां सारांश काय कीं, तूं इतरांस दासांप्रमाणें वागवूं लागलास तर तुझ्या स्वातंत्र्याचा तेवढ्या मानानें अपहार होऊन तुझ्याठायीं दास्याचा प्रादुर्भाव झाला म्हणून समजावें.

जे निरोगी असतात त्यांस रोग्यांकडून सेवा करून घेणें कधींही आवडावयाचे नाहीं; त्याचप्रमाणें आपल्या कुटुंबांतील कोणीं माणसें आजारी असावीं असें त्यांस वाटणार नाही; तद्वत्च जे जात्या स्वतंत्र आहेत त्यांना आपली सेवा दासांनी करावी अशी इच्छा कधींही होऊं नये; किंवा आपल्या जवळील माणसें दास्यावस्थेंत असावीं असें त्यांच्या मनांत कदापि येऊं नये.

मित्रत्वाविषयीं

ज्या कोणत्या गोष्टीविषयीं मनुष्याच्या मनांत आसक्ति असते, त्या गोष्टीवर त्याचें प्रेम आहे असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. आतां वाईट गोष्टींविषयीं किंवा ज्या गोष्टींशीं त्याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नसतो, अशा गोष्टींविषयीं कोणी मनुष्य आसक्ति दर्शवील म्हणावें तर तें सहसा संभवनीय नाहीं. तर तो चांगल्या गोष्टींविषयींच केवळ आसक्ति दर्शवीत असतो असें म्हणावें लागतें; आणि जर तो चांगल्या गोष्टींविषयी आसक्ति दर्शवितो हें खरें आहे, तर त्यांवर त्याचें प्रेमही असतें असें मानावे लागतें. तर मग असें उघड होतें कीं, ज्याला चांगल्या गोष्टी कोणत्या हें कळत असतें, त्यालाच कोणत्या गोष्टींवर प्रेम

करावें तें समजत असतें. परंतु ज्याला चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, आणि कोणत्या वाईटही नव्हत व चांगल्याही नव्हत, हें निवडण्याचें सामर्थ्य नसतें, त्याला कोणत्याही गोष्टीवर कसें प्रेम करितां येईल बरें? यावरून असा सिद्धांत होतो कीं, प्रेम करणें हा गुण ज्ञात्यांसच साध्य आहे.

येथें कोणी असें म्हणेल कीं, 'मी अज्ञान असूनही माझ्या लेंकरांवर प्रेम करितो हें कसें? पण हा प्रश्न करणाऱ्यास माझें असें विचारणे आहे कीं, तूं आपणास मूर्ख म्हणतोस याचें कारण काय? तुझ्यांत कोणता उणेपणा आहे बरें? तुला आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करितां येत नाहीं काय? सृष्टींत ज्या निरनिराळ्या गोष्टी घडत आहेत, त्यांचें ज्ञान तुला होत नाही काय? तूं आपल्या निर्वाहासाठी अन्नवस्त्रादि पदार्थ मिळवीत नाहींस काय? इतक्या साऱ्या गोष्टी तूं करीत असतां तूं मूर्ख कसा? तर याचा उलगडा एवढाच कीं, या संसारांत पदोपदी घडणाऱ्या गोष्टींनी तुझें चित्त व्यग्र होतें, आणि तुला क्षणोक्षणी उद्वेग प्राप्त होतो. एकादी गोष्ट तूं घटकेंत चांगली म्हणतोस आणि घटकेत वाईट म्हणतोस. सारांश काय कीं, या सृष्टीतील हरएक गोष्टीमुळे तुला हर्षशोकादि होऊन तूं आशा, भय, मत्सर इत्यादि वृत्तींनी त्रस्त होतोस; आणि तुझ्या चित्तांत क्षणोक्षणी पालट होतो. या कारणास्तव तूं आपणास मूर्ख समजत आहेस.

आणखी तुझ्या अशा स्थितीस्तव तुझें प्रेमही क्षणांत पालटणारें असतें. धनादि मुखविषयांसंबंधानेंच तुझ्या ह्या वृत्तींत पालट होत असतो असें नाहीं, तर मनुष्यांच्या संबंधानेंही तुझी वृत्ति चंचल असते. जो मनुष्य तुला कांहीं वेळ चांगलासा वाटतो, तोच तुला क्षणभरानें वाईट वाटूं लागतो. यामुळें त्याशीं तूं कांहीं वेळ मित्रत्वानें वागतोस, आणि त्याच्यावरचें तुझे प्रेम उडालें म्हणजे तूं त्याशीं वैर करूं लागतोस. घटकेंत त्याची तूं वाखाणणी करितोस आणि घटकेंत त्याला दोष देऊं लागतोस. याप्रमाणें जो एकाद्या मनुष्याविषयीं अज्ञानानें फसून जातो, तो त्याचा मित्र म्हणतां येईल काय? अर्थात् नाहीं. एकाद्या मनुष्याची केवळ लहर लागून दुसऱ्यावर प्रीति जडली, तर त्याच्याविषयीं त्याच्या मनांत खरें प्रेम वसत आहे असें कोण म्हणेल? त्याचप्रमाणें जो एकाद्याची निंदा करून पुनः त्याच्याविषयीं पूज्यत्वबुद्धि प्रगट करितो, त्याचें त्याच्यावर दृढ प्रेम बसलें आहे असें मानितां येईल काय? मुळींच नाहीं. कुत्र्याचीं पिले कशी एकमेकांस मोठ्या ममतेनें चाटतात व एकमेकांबरोबर मोठ्या आनंदानें खेळतात. त्यावरून वाटतें कीं, या पोरांमध्यें परस्पर प्रेम मोठें असावें. परंतु हें त्यांचें एकमेकांमधलें प्रेम कितपत आहे तें पाहावाचें असल्यास एकादा मांसाचा तुकडा त्यांच्या अंगावर फेंकावा. म्हणजे तीं त्या तुकड्यासाठीं कशी परस्परांशी भांडूं लागतील तें दिसून येईल. फार कशाला तुझ्या मुलावर तुझें मोठे प्रेम असेल, व तोही तुजवर अतिशयित प्रीति करीत असेल; पण या परस्परप्रेमाची कसोटी पाहावयाची असल्यास जमिनीच्या एकाद्या तुकड्या संबंधानें तुझ्या त्याच्यामध्यें लढा पडूं द्या म्हणजे पाहा कसे तुह्मी एकमेकांस पाण्यांत पाहू लागाल ते. तुझा मुलगा तुझ्या मरणाची वाट पाहत बसेल, आणि तो लवकर मरावा असें तूं इच्छिशील. मग तूं म्हणूं लागशील कीं, पाहा या पोरास मीं इतके दिवस लहानाचा मोठा केला असून, व त्याचा प्रतिपाळ उत्तम प्रकारें केला असून, तो माझ्या मरणाची इच्छा करीत आहे. त्याचप्रमाणें ज्या पोरावर तुझें इतकें सांद्र प्रेम असे, आणि ज्याच्या जिवास तूं स्वतांहून जास्त जपत असत, त्याच आपल्या पोटच्या गोळ्याचा वित्तलोभास्तव प्राणघात करण्यास देखील तूं तयार होतोस. तेव्हां तुझ्या ह्या प्रेमास काय म्हणावें? यावरून एवढे सिद्ध होतें कीं,

राज्य, धन, अधिकार, लौकिक यांविषयी मनुष्याच्या मनांत तृष्णा उत्पन्न होऊन ती अनिवार झाली असतां, तो पिता, पुत्र, बंधु इत्यादिकांचीं नाती पार विसरून जाऊन त्यांविषयींचें सारे प्रेम एकीकडे गुंडाळून ठेवितो, आणि प्रसंगीं त्यांचा प्राण ही घ्यावयास उद्युक्त होतो. धनादिकांच्या लोभामुळे मनुष्य कसा अमानुष कर्मे करण्यास प्रवृत्त होतो तें पुढील पद्यांत निवेदन केलें आहे:-

मातरं पितरं पुत्रं भ्रातरं वा सुहृत्तमम् ।
लोभाविष्टो नरो हन्ति स्वामिनं वा सहोदरम् ।। सु. *

यासाठीं असल्या वरकांती प्रेमास कोणीं भुलून जाऊं नये. मनुष्यास या जगामध्यें आत्मलाभाहून दुसरें काहींही प्रिय नाहीं. या आत्मलाभाच्या आड कोणी आलें असतां, मग तो त्याचा साक्षात् पिता असो कीं पुत्र असो, कीं प्रिय मित्र असो, त्याचा तो द्वेष करूं लागेल, त्याला शिव्याशाप देऊं लागेल, किंबहुना त्याचा प्राणही घेईल. आत्मपरता ही वृत्ति मनुष्याच्याठायीं निसर्गसिद्धच आहे. स्वार्थसाधु मनुष्य एवढा अविचारी बनतो कीं, त्याच्या हितास कांहीं दैवी प्रत्यवाय आला असतां तो दैवासही शिव्या द्यावयास चुकत नाहीं, इतकेंच नव्हे तर देवाच्या मूर्ति, देवळें वगैरे तोडून मोडून टाकण्यासही तो उद्युक्त होतो.

यास्तव मनुष्यास पवित्रता, स्वदेश, स्वतांचे संबंधिजन, इष्टमित्र हीं आपल्या स्वार्थाआड येण्यासारखीं आहेत, असे वाटतां कामा नये. असें त्यास वाटेल तर पवित्रतादिकांचा नाश झालाच म्हणून समजावें; आणि असें त्यास वाटलें नाहीं तर त्यांचें रक्षण होण्यास हरकत नाहीं. स्वार्थपरता अनिवार आहे. समग्र जीवकोटीच्याठायीं हें ममत्व प्रकर्षेकरून वसत आहे. मग हें ममत्व आपल्या ह्या जडदेहा संबंधाचें असो, कीं आपल्या चित्तासंबंधाचें असो, कीं कोणत्याही इतर बाह्य विषयासंबंधाचें असो. ज्या कोणत्या गोष्टीसंबंधानें आपल्या ठायीं ममत्व वसत असतें, त्या गोष्टीकडे आपल्या चित्ताचें लय लागलेले असतें. ती साध्य करून घेण्यास आपण अहर्निश झटत असतो. हें लक्षांत आणिलें म्हणजे आपणांस असें दिसून येईल कीं, कोणावर खरें प्रेम करावयाचें तर त्याच्याठायीं आपलें चित्त जडलें पाहिजे. जेथें चित्त नाहीं तेथें मित्रत्व संभवत नाहीं. आपल्याठायीं खरें मित्रत्व उद्भवले पाहिजे असें ज्यास वाटत असेल, त्याला एकच उपाय आहे तो हा कीं त्याच्याठायीं पवित्रता, सत्वशीलता, विश्वासूकपणा, मनोनिग्रह, परोपकारबुद्धि इत्यादि सद्वृत्तींचा विकास जेणेंकरून होईल, तें केवळ त्याच्या हिताचें आहे असें त्याला वाटलें पाहिजे, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय न होऊन जर तो स्वार्थ व सदाचार ही भिन्न आहेत असें मानून चालेल, तर त्याच्या ठायीं नीतिमत्ता विकास पावण्याचा मुळींच संभव नाहीं. तो नीतिमत्तेचा आव घालीत असेल, तर त्याचें ते निवळ ढोंग आहे असें समजावें.

सद्वर्तनानेंच आपला खरा स्वार्थ साधणार आहे असें जोपर्यंत मनुष्यांच्या मनावर ठसत नाहीं, तोपर्यंत ते परस्परांचा द्वेष व नाश करण्यास सिद्ध होतात. आजपर्यंत मनुष्यांमनुष्यांमध्यें व राष्ट्रांराष्ट्रांमध्यें जे कलह माजले आहेत, त्यांचें कारण हेंच होय. दोघे मित्र किंवा बंधु एका दिलानं वागत आहेत असें पाहून जर

* जो मनुष्य लोभाविष्ट असतो, तो आपली माता, पिता, पुत्र, बंधु, प्रियमित्र व धनी यांचा वध करण्यास प्रवृत्त होतो.

कोणी असा तर्क करील कीं, त्यांच्या चित्तामध्यें परस्परांविषयीं दृढ स्नेह वसत आहे, तर तो त्याचा निवळ भ्रम होय. परस्परांविषयी आपल्या चित्तांत निष्कपट प्रेम वसत असून, आपला स्नेह कधींही तुटावयाचा नाहीं अशा त्यांनीं कितीही शपथा वाहिल्या व वल्गना केल्या, तरी त्या खऱ्या मानूं नयेत. कारण ज्याच्याठायीं सदाचारप्रीति विकास पावली नाहीं, त्याच्या चित्तांत ममत्वबुद्धि वसत असल्या कारणानें तो केव्हां काय करील याचा नेम नसतो. त्याचें चित्त सर्वदा चंचल असून, त्याच्या मनांत जी कल्पना भरेल, व जशी त्याची वृत्ति होईल, तसा तो क्षणोक्षणीं पालटणारा असतो. अशा मनुष्यांची जी पारख करावयाची ती, ते कोणत्या मातापितरांच्या पोटीं जन्म पावले, किंवा कोणत्या शिक्षकाच्या शिक्षेंत होते, ह्या गोष्टी पाहून करण्यांत अर्थ नाहीं. तर ते आपलें हित कशांत आहे असें मानितात याचा तपास करावा, म्हणजे त्यांची खरी पारख होते. जर तें बाह्य विषयांच्या प्राप्तीनें स्वहित होतें असें मानीत असले तर ते खरे, कधीं न पालटणारे व विश्वासू मित्र होतील याविषयीं मुळींच आशा करावयास नको. त्यांच्या ठायीं खरा सदाचार कदापि सांपडावयाचा नाहीं. खरी माणूसकी त्यांच्यामध्यें आहे असें देखील म्हणवत नाहीं. कारण ते धनादि बाह्य वस्तूंच्या लोभास्तव परस्परांशीं भांडून परस्परांचे प्राणही घ्यावयास उद्युक्त होतील; एकमेकांचा उपहास व द्वेष करितील; रानावनात किंवा दुसऱ्या कोठें एकमेकांस एकटे गांठून मारहाण करितील, किंवा जवळ कांहीं असेल तें लुटतील; सरकारादिवाणांत एकमेकांवर बनावट खटले आणून, किंवा एकमेकांविरुद्ध खोटी साक्ष देऊन एकमेकांचें नुकसान करितील. हीं अशीं कर्मे करणाऱ्या नराधमांस मनुष्य कोण म्हणेल? या शिवाय आणखी ते दारुबाजी, जुवेबाजी, व्यभिचार इत्यादि अत्यंत वाईट व्यसनांमध्यें निमग्न झाल्यामुळें त्यांचीं व त्यांच्या संसर्गानें इतराची मनें अत्यंत नीच होतात. परंतु जे पुरुष आपल्या मानसिक उन्नतींतच आपलें खरें हित आहे असें मानितात, आणि ही उन्नतिसत्य वस्तुज्ञानाच्या योगानें करण्याचा प्रयत्न करितात, त्यांचें परस्परांशी कोणतेंही नातें असलें, व त्यांचा परस्परांशी कितीही कमी किंवा जास्त परिचय असला, तरी ते परस्परांचे खरे मित्र आहेत म्हणून समजावें. त्यांच्याठायीं विश्वासूकपणा, पवित्रता, परोपकार इत्यादि सद्वृत्ति विकसित झाल्यामुळे त्यांच्या चित्तांत खरें मित्रप्रेम वसत असतें. असे पुरुष परस्परांच्या सद्गुणांमुळें परस्परांचे मोठे मित्र होतात; आणि त्यांची ती मैत्री कदापि बदलत नाहीं, किंवा कमी होत नाहीं.

यावर कोणी असें म्हणेल कीं, तो अमुक एक मनुष्य मजवर आजपर्यंत एकसारखी माया करीत आला आहे, तर तो यापुढेंही अशीच माया नाहीं करणार काय? असा प्रश्न करणारा निवळ वेडा होय. त्याला माझें असें सांगणें आहे कीं, तो मनुष्य आपला मतलब साधत आहे तोपर्यंत तुजवर माया करील. पण तो मतलब साधेनासा झाला, किंवा तो पुढें आणखी साधण्याचा संभव नसला, तर तो तुझी मुळींच परवा करणार नाहीं. आपल्या पायांतले जोडे फाटून निरुपयोगी झाले नाहींत तोंपर्यंत जसे ते झाडून पुसून साफ राखितों, किंवा एकादे भांडे फुटून निरुपयोगी झालें नाहीं तोपर्यंत जसे आपण तें घांसून धुऊन साफ करीत असतों, तद्वत् तो तुझ्याशी वर्तन करीत आहे हें तूं खास समज. परंतु तूं म्हणशील : 'माझ्या बायकोचें तर मजवर निष्कपट प्रेम आहे. ती मजकडे इतकीं वर्षे राहून माझ्या सेवेंत सर्वदा तत्पर असते; तेव्हां तिचे मजवर प्रेम नाहीं असें कसें म्हणतां येईल? आणि तें तिचे प्रेम कधीतरी भंग पावेल असें मीं कां मानावें'?

हा ही तुझा निवळ श्रम आहे. आजपर्यंत अशा किती अगदीं प्रेमळ दांपत्यांची तुटातूट यःकश्चित कारणांवरून झाली आहे बरें? मनुष्य बाह्य विषयांत सुख आहे, व तें प्राप्त झाल्यानें आपलें हित आहे असें मानूं लागलें म्हणजे त्याची स्वार्थैकपरता अनावर होऊन, तें आपला सारा स्नेहसंबंध व लगाबंधा क्षणामध्यें तोडून मोकळे होत असतें. या पशुवृत्तीमुळें मनुष्य आपला स्त्रीधर्म, मातृधर्म किंवा पितृधर्म कांहींएक ओळखतनासें होतें. यास्तव ज्यास कोणाचा खरा मित्र होणे असेल, किंवा दुसऱ्याची खरी मैत्री संपादावयाची असेल, त्यानें सदरील गोष्टींचा अवश्य विचार करावा. त्यानें बाह्य विषयांची चाड धरूं नये, आणि आपल्या चित्तांतील एकंदर दुर्वृत्तींचे निर्मलून करावें.

असें त्यानें केलें तर त्याला खरी शांति प्राप्त होऊन, त्याच्याठायींची चंचलता नाहीशी होईल. मग त्यास स्वतांला दोष देण्याचे किंवा पश्चात्ताप पावण्याचें काहीएक कारण उरणार नाहीं; आणि जो कोणी दुसरा मनुष्य त्याच्या सारख्याच वृत्तीचा असेल त्याच्याशीं तो अगदीं प्रेमानें वागेल. त्याच्या संबंधानें त्याच्या मनांत दुजाभाव असा कदापि वसणार नाहीं. परंतु जो कोणी त्याच्यासारखा नसेल, त्याच्यावर तो संतापणार नाहीं; तर त्याच्याशीं तो सौम्यपणें व नम्रतेनें वर्तन करील. तो केवळ अज्ञान आहे असें समजून त्याला तो क्षमा करील. खरें सौख्य कशात आहे हें त्यास कळत नाहीं म्हणूनच केवळ तो सन्मार्गापासून भ्रष्ट झाला आहे असें समजून तो त्याची कींव करील; आणि 'कोणीही मनुष्य मुद्दाम सत्यज्ञानपराङ्मख असतो असें नाहीं; तर त्याला तें ज्ञान प्राप्त होण्याची अनुकूलता नसते, म्हणून तें त्यास प्राप्त झालें नसतें,' ही प्लेटोची उक्ति ध्यानांत आणून तो त्या अज्ञान मनुष्याशीं कोणत्याही प्रकारें कठोरपणाचें वर्तन करणार नाहीं.

याप्रमाणें ज्याच्याठायीं सत्य ज्ञानाचा उदय होऊन ज्याचा आपपरभाव नाहीसा झाला आहे, त्याच्याच ठायीं खऱ्या मित्रत्वाचा विकास झालेला असतो. एरवी कोणी कितीही वेळां एका पंक्तीस बसून जेवले, किंवा एका घरांत राहिले, किंवा एकमेकांच्या संगतीने त्यांनीं लांबलांबचे प्रवास केले, किंबहुना एका आईबापांच्या पोटीं ते जन्म पावले, तरी त्यांच्याठायीं खरें परस्परसख्य उत्पन्न झालें आहे असें म्हणतां येत नाहीं. जोपर्यंत त्यांच्याठायीं हिंस्त्र पशूंस अनुरूप अशी स्वार्थबुद्धि वसत असते, तोंपर्यंत त्यांच्या अंगीं खरें मित्रत्व कदापि उत्पन्न व्हावयाचें नाहीं.

काळप्रसंग

दुसऱ्यांच्या ठायींच्या दुर्गुणामुळे तुला अपाय घडण्याचें कांहींएक कारण नाहीं. दुसऱ्यांसारखी तुझ्याही ठायीं नीचता उत्पन्न व्हावी, किंवा दुसऱ्यांप्रमाणे तूंही अगदीं हतभाग्य व्हावें हें मुळींच उचित नव्हे. कोणी हतभाग्य आहे असें तुला आढळून आल्यास तूं असें समजावें कीं, हा हतभाग्यपणा त्याला त्याच्या कर्मांमुळें प्राप्त झाला आहे. वस्तुतः पाहता या जगांतील सर्व मनुष्यांस खऱ्या सौख्याचा अनुभव घडण्यास कांहींएक हरकत नाहीं. ज्या बाह्य गोष्टी आपल्या सुखास विघातकशा वाटतात, त्यांचा आपल्या खऱ्या सुखाशीं मुळींच संबंध नाहीं. त्या कोणीं आपणांपासून हिरावून नेल्या, किंवा त्या आपल्यापाशीं पुष्कळ असल्या, तरी आपलें सुख किमपि कमी किंवा अधिक व्हावयाचें नाहीं. आपल्या वास्तविक सुखाच्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा संबंध केवळ आपल्या अंतर्यामाशी असून, त्यांस कोणाकडूनही अंतराय घडावयाचा नाहीं. त्या केवळ आपल्या स्वाधीनच्या असून त्यांकडे आपण ज्या मानानें लक्ष पुरवू त्या मानानें आपलें हित व्हावयाचें. हाच आशय पुढील पद्यांत सुचविला आहेः–

को देशः कानि मित्रणि कः काल कौ व्ययागमौ ।
कश्चाहं का च मे शक्तिरिति चिन्त्यं मुहुर्मुहुः ।। सु. ✻

कोणी असें म्हणेल कीं, अमुक एका मनुष्याचा मजशी वियोग घडल्यामुळें तो दुःख पावत आहे हें कसें? या प्रश्नाचें समाधान असे कीं ज्या गोष्टी केवळ बाह्य होत, त्यांशी आपलें हिताहित गुंतले आहे असें त्यानें कां मानावे बरें? तुजशीं त्याचें साहचर्य घडलें होतें तेव्हां तूं मर्त्य प्राणी असून केव्हां कोठें निघून जाशील याचा नेम नाहीं, असा विवेक त्यानें कां केला नाहीं? हा विवेक त्यानें त्या वेळीं केला असता तर त्याला आज तुझ्या वियोगामुळें दुःख झालें नसतें. जे बाह्य सुखविषय तुला आज प्राप्त झाले आहेत, त्यांनीं तुझ्या चित्तास हर्ष वाटून त्यांमध्ये तूं अगदीं गुंतून गेलास, तर पुढें त्या सुखविषयांची हानि झाली असतां, तुला खेद वाटणार नाहीं काय? ह्या खेदापासून आपली मुक्ति व्हावी असे तूं इच्छीत असल्यास कोणत्याही बाह्य गोष्टींवर आपलें चित्त जडूं देऊं नको. या पृथ्वीतलावरील कोणतीही जडवस्तु शाश्वत नाहीं, व कोणताही प्राणी अमर नाहीं. सर्वांस उत्पत्ति व विनाश ही आहेत. असा विवेक करून त्यांविषयीं आपल्याठायीं ममत्वबुद्धि वसूं देऊं नये. बाह्य विषयांचा संयोगवियोग केवळ अल्प काळ व्हावयाचा आहे. तेव्हां त्याबद्दल विवेकी पुरुषानें कां म्हणून शोक करावा?

ज्ञाते पुरुष आपणांस सांगतात कीं, हें विश्व एकसूत्री असून, एकाच महातत्वापासून विकास पावलें आहे. व पुनरपि त्यांतच तें विलय पावावयाचें. हा विकास आणि विलय या विश्वास पुनःपुनः प्राप्त होत असतो. या विश्वांतील कांहीं वस्तु आज विलय पावून, त्यांच्या जागी कांहीं वेळानें दुसऱ्या उत्पन्न व्हावयाच्या. त्याही पुढें कांहीं काळानें विलय पावून, त्यांच्या ठिकाणीं तिसऱ्याच निर्माण व्हावयाच्या. हा असा क्रम या जगांत सर्वकाळ एकसारखा चालू आहे. तो कदापि बंद व्हावयाचा नाहीं. तेव्हां अमुक एक वस्तु मला प्राप्त झाली किंवा मजकडून नाहींशी झाली याबद्दल मीं हर्ष किंवा विषाद कां मानावा? असा विवेक करून, आपण आपलें मन थोर करावें, आणि जो काहीं बाह्य अनुभव घडेल, त्या संबंधानें केवळ उदासीन असावें; आणि आपल्या अंतःकरणाची शुद्धि करण्यास झटावें.

आपण कोण, आपल्या संसाराची शाश्वति कोठवर आहे, आपल्या इष्टमित्रांचा सहवास आपणांस कितीवेळ घडण्यासारखा आहे, आपणांस प्रिय वाटणाऱ्या एकंदर वस्तु किती काळ टिकणाऱ्या आहेत, या गोष्टींचा जो विवेक करील, त्यास या जगांत शोक असा कदापि व्हावयाचा नाहीं. तो आपल्या मनांत असें वागवील कीं, आपलें स्वतांचे जीवित क्षणभंगुर असून, आपल्या आसपासच्या एकंदर वस्तु केव्हां नाश पावतील याचा नेम नाहीं. तेव्हां त्यांच्याविषयी स्वचित्तांत आसक्ति उत्पन्न होऊं देणें हा निवळ मूर्खपणा आहे. कोणी म्हणेल कीं, 'पण माझी माता माझ्या वियोगास्तव शोक करीत आहे त्याचें कसें? तिला हें तत्त्वज्ञान कोठें कळत आहे?' याचे समाधान असें कीं, हा तिचा शोक नाहींसा करण्यास आपण अवश्य झटावें. दुसऱ्यांच्या शोकाचें निवारण करण्याचें सामर्थ्य आपल्याठायीं असल्यास आपण त्याचा उपयोग करण्यास सहसा आळस करूं नये. इतकेंही करून त्यांचा शोक दूर झाला नाहीं तर त्यास आपला काय

✻ माझा देश कोणता, माझें खरें हित चिंतिणारे मित्र कोणते, सध्यांचा काळ कसा आहे. माझा आदाखर्च काय आहे, माझें सामर्थ्य कोठवर आहे, इत्यादि गोष्टींचा मनुष्यानें वारंवार विचार करावा.

उपाय? पण त्याचें हृदय शोकाकुल होतें म्हणून आपणही त्यांच्याबरोबर शोक करीत बसण्यांत मुळींच शहाणपणा नाहीं. दुसऱ्यांचें दुःख शमविण्याचें सामर्थ्य आपल्याठायीं नसलें तरी आपल्या स्वतांच्या चित्तांतून शोक समूळ काढून टाकतां येण्याजोगा आहे.

तूं कोठेंही गेलास तरी तुला विपत्ति प्राप्त होण्यासारखी आहे. तुझे इष्टमित्र कोठेंही असले तरी ते केव्हां तरी मरण पावणार. जो जन्मला त्याला मरण चुकणें नाहीं. आपण अगदी वृद्ध होईपर्यंत जगावें अशी तुझी इच्छा असल्यास तुझ्या पुष्कळ प्रिय जनांचा अंत तुझ्या दृष्टीसमोर व्हावयाचा. जो या दुनियेमध्यें पुष्कळ दिवस राहील, त्याला पुष्कळ इष्टानिष्ट गोष्टींचाही अनुभव घडणें स्वाभाविक आहे. चोऱ्या, मारामाऱ्या, खून, जुलूम, छळ आदिकरून गोष्टी या संसारांत आपल्या नेहमी घडावयाच्या. या प्रपंचाची रहाटीच अशी आहे. वारा, पाऊस, थंडी, उष्णता, प्रवास, कुसंगति, दुर्व्यसने, दुराचार इत्यादि गोष्टींमुळें मनुष्याच्या देहावर सर्वदा इष्टानिष्ट परिणाम घडावयाचे. अशा प्रसंगांस घाबरून जाऊन खेद करीत बसणें व आपण मोठे हतभाग्य आहों असें मानणे हें कांहीं चांगले नव्हे. अशी आपली चित्तवृत्ति झाली असतां, आपणांस सर्वस्वीं परतंत्रता प्राप्त होऊन, आपलें सर्व सुखसमाधान सहस्रवधि बाह्य गोष्टींवर अवलंबून राहील; आणि ह्या गोष्टी हव्या तशा पालटण्याचें तर आपल्या अंगी सामर्थ्य नसावयाचें.

या प्रपंचाचा जो नीट विचार करील, त्याच्या असे लक्षांत येईल कीं, आपलें या लोकींचे जिणे हा केवळ एक मोठाच युद्ध प्रसंग होय. यांत कांहींकांनीं रात्रंदिवस जागरूक राहून स्वपक्ष रक्षण केलें पाहिजे. कित्येकांनीं हेर बनून शत्रूची बारीक बातमी काढिली पाहिजे. कित्येकांनीं हातांत समशेर घेऊन सर्वदा युद्धाला उद्युक्त असलें पाहिजे. याप्रमाणें कोणीं कांहीं कोणी कांहीं अशी कामगिरी स्वीकारून ती मनापासून बजाविली पाहिजे. सर्वांनीं एकच कामगिरी पतकरून चालावयाचें नाहीं. खंदक खणणारे, बुरूज उभारणारे, बारीक बातमी काढणारे, हातात शस्त्रें घेऊन लढणारे, सैनिकांस समयोचित हुकूम देणारे वगैरे सर्वजण आपआपली कामें दक्षतेनें करणार नाहींत, तर सर्व सैन्यांत गोंधळ माजून सगळ्यांचाच नाश होण्याची जशी भीति आहे, तद्वत् आपण या संसारांत प्राप्त स्थित्यनुरूप स्वकर्तव्य करणार नाहीं तर आपली फजिती व्हावयाची. ऐहिक सुखविषयांची आवड धरून जो स्वकर्तव्यपराङ्मुख होतो, त्याच्यासारखा नीच कोणीही नाहीं.

पुष्कळ लोक या संसारांतील अनिष्ट प्रसंगांला भितात याचें कारण उघडच आहे कीं, त्याला क्षुद्र जीं जडपदार्थाधीन सुखे त्यांची आवड अतिशयित असते. त्याला असें वाटतें कीं, मनास वाटेल तितका वेळ सुखशयन करावें. आपण कितीही वेळ निजलों तरी आपणांस कोणीही उठवूं नये. उठल्यावर हवा तितका वेळ जांभया देत व अंग पिळीत स्वस्थ बसून रहावें. मग उठून मुखमार्जनादि विधि करावे, आणि लहर लागल्यास कांहीं वाचीत बसावे, किंवा कांहीं तरी लिहावे. नंतर स्नानादि विधि आटपून यथेष्ट भोजन करावें. भोजनोत्तर थोडीशी वामकुक्षि करून उठावें; आणि मग कोणी तरी मित्र मिळवून त्यांच्याबरोबर गंजिफा वगैरे खेळण्यांत किंवा गप्पा मारण्यांत कांहीं वेळ काढावा. याप्रमाणें घरीं बसून लोळून आळस आला म्हणजे थोडीशी सहल करावयास म्हणून घराबाहेर पडावें. मग बरोबर मित्र घेऊन ज्या कोणत्या व्यसनाचा नाद असेल तें मनसोक्त रीतीनें पुरवावे. इतकें करून थकून भागून घरीं यावें आणि पुनः मिष्टान्नाचें मनमुराद सेवन करून, रात्रीच्या समयास उचित अशा एकाद्या घाणेरड्या व्यसनांत मग्न व्हावें. याप्रमाणें

आपला नित्यक्रम अप्रतिहतपणे चालावा अशी ज्याची इच्छा असते, त्याच्या देहाची व मनाची हळूहळू किती अवनति होते म्हणून सांगूं! अशा रीतीनें आपल्या अमोल आयुष्याचा जो अपव्यय करूं पाहतो, तो जिवंत असूनही मेलाच समजावा. अशा नरास खरें सौख्य कदापि लाभावयाचें नाहीं. त्यावर सर्वदा अनिष्ट प्रसंग गुदरून तो आमरण दुःखांत व विपत्तीत रखडावयाचा.

याप्रमाणें जो मनुष्य ऐहिक सुखविषयांत दंग झालेला असतो, अशा मनुष्याशीं मीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं नये हें युक्त होय. तरीपण माझ्या देहाचें किंवा माझ्या देशबांधवांचें किंवा एकंदर मानवजातीचें हित होण्याचा संभव असल्यास मी अशा मनुष्याशी संबंध ठेवीन. आपल्या पायांतला जोडा फाटला असतां, जसे आपणांस चांभाराच्या दाराशी जाणें भाग पडतें, तद्वतच मी हा प्रसंग समजेन; आणि जशी मला त्या चांभाराची कांहींएक भीति वाटत नाहीं, किंवा त्याची मी खुशामत करीत नाहीं, तसें मी अशा मनुष्याशी वर्तन करीन. हें माझें वर्तन त्यास उद्दामपणाचे वाटल्यास फार तर माझी इष्टकार्यसिद्धि व्हावयाची नाहीं इतकेंच. पण त्याच्याकडून होणारें हित केवळ क्षुल्लक असून, त्यामुळें मनुष्याचे फारसें अडावयाचें नाहीं.

परंतु कोणी म्हणेल कीं, अशानें माझा स्वभाव कसा ममताळू होईल? यांचे समाधान असें कीं, मनुष्यानें आपलें मन उदार व प्रसन्न ठेवावें, म्हणजे त्याच्याठायीं हा गुण अवश्य उत्पन्न होईल. ह्या गुणाच्या प्राप्तीसाठीं मनुष्याने अगदीं नीचवृत्ति धारण करून ज्याच्या त्याच्यापाशीं केविलवाण्या मुद्रेने करुणा भाकण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. आपल्या संबंधिजनांचे कल्याण व्हावें म्हणून दुसऱ्याची मनोधारणा करणें, किंवा त्यांचें कोणीं अकल्याण केलें असतां, त्यांस दोष देणें, हे मुळींच इष्ट नव्हे. दुसऱ्यांच्या हितासाठीं पराराधना करून, स्वतांच्या नीचवृत्तीचें प्रदर्शन, किंवा दुसऱ्याचा अगदीं दास बनून जावें हें मला मुळींच रुचणार नाही. अशा वृत्तीनें माझ्याठायीं उत्पन्न होणारा प्रेमळपणा मला नको. यापासून माझें किंवा दुसऱ्या कोणाचें बिलकूल कल्याण व्हावयाचें नाही. मनुष्यानें दुसऱ्यावर अवश्य माया करावी. पण तीसाठीं परांचे अगदी गुलाम होऊन जाणें सर्वथा इष्ट नव्हे. सॉक्रेटिसाची आपल्या लेंकरांवर माया नव्हती काय? अवश्य होती. पण तीमुळें त्यानें आपल्या मनाचें स्वातंत्र्य कदापि नष्ट होऊं दिले नाहीं; किंवा तीबद्दल त्यानें कोणापाशीं कधींही दैन्य भाकिलें नाहीं. या उदात्त वृत्तीस्तव त्याच्या हातून साधुपुरुषास अनुरूप असेंच वर्तन आमरण घडलें. तो समरभूमीवर शत्रूंशी लढत असतां, किंवा आपल्या राष्ट्राच्या सुस्थितीसाठीं इतर प्रमुख पुरुषांबरोबर खलबतें करीत असतां, किंवा त्याच्यावर वृथा आरोप येऊन त्याची चौकशी चालली असतां, किंवा अंती त्यास देहांत शासनाची शिक्षा झाली असतां, त्यांने आपल्या चित्ताची समता तिळप्रायही ढळू दिलीं नाहीं. आणि आपल्या लेंकरांचे आपल्या मागे कसें होईल याचा विचार त्याच्या मनांत येऊन त्याचा सदाचार लवमात्रही कमी झाला नाहीं. सामान्य जनांचा असा स्वभाव असतो कीं, ते आपल्या मुलांचे किंवा आईचें किंवा इतर इष्टमित्रांचे निमित्त सांगून एकांदे नीच कर्म करण्यांस प्रवृत्त होतात. परंतु जो खरा ज्ञाता आहे, त्याला कोणत्याही मनुष्याप्रीत्यर्थ सदाचारच्युत होण्याचें प्रयोजन दिसणार नाहीं. एकादी वस्तु तुला आनंदजनकशी वाटली असतां, तिचा नाश केव्हां होईल याचा नेम नाहीं, असा विचार त्वां तत्काळ मनांत आणावा. उदाहरणार्थ आपल्या गोजिरवाण्या प्रिय बाळकाचें चुंबन घेतांना त्वां आपल्या मनांत लागलींच म्हणावें कीं, हे बालका, तुझा माझा आज हा समागम आहे. पण उदयिक तुजवर किंवा मजवर मृत्यूची

झडप येऊन तुझा माझा वियोग होण्याचा संभव आहे. येथें कोणी असें म्हणेल कीं, हे केवळ अभद्र शब्द होत. पण मला यांत कांहींएक अभद्र वाटत नाहीं. कारण मृत्यू हा शब्द एका नैसर्गिक व्यापाराचा निदर्शक आहे. इतर नैसर्गिक व्यापारांचे सूचक शब्द जसे कोणी अभद्र म्हणत नाहीं, तद्वत् यांतही कांहीं अभद्रपणा नाहीं. शेतें पिकली म्हणजे जशीं कणसें कापितात, किंवा झाडांची पाने व फळें पिकली म्हणजे जशी तीं गळून पडतात, तद्वतच् मनुष्याचा आयुदार्य संपला म्हणजे त्याच्या देहाचें विसर्जन होतें. यांत अस्वाभाविक तें काय झालें? आणि ह्या सृष्ट व्यापाराचे ज्या शब्दांनी वर्णन करावयाचें, ते शब्द तरी कसे अभद्र म्हणावे? अखिल वस्तूंचा विलय होऊन त्यांच्या जागीं दुसऱ्या उत्पन्न व्हाव्या हा निसर्गक्रमच आहे. त्यास भद्राभद्र म्हणण्याचा अधिकार आम्हां क्षुद्र मानवांस कोठून आला बरें?

एकांतवास

जो अनाथ झाला त्यास एकांतवासी म्हणावयाचें. कारण जो खरोखरीच एकटा रहात असतो, त्याला एकांतवासी म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें एकादा मनुष्य पुष्कळ लोकांच्या समागमानें असला, तरी तो एकांतवासी नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. समजा कीं, ज्या आपल्या पुत्रावर किंवा बंधूवर किंवा मित्रावर आपण आधार ठेवून असतों, ते गत झाले असतां आपण अगदीं एकटे पडलों असें रोमसारख्या भरवस्तीच्या नगरींत राहूनही म्हणतों. आपल्या आसपास पुष्कळ लोक असून आपल्या पदरींही पुष्कळ दासदासी असतील, पण ह्या सर्वांच्या समागमांत राहूनही आपण एकटेच राहिलों असें म्हणतों. यावरून असें उन्नीत होतें कीं, जो मनुष्य निराधार होतो, तो आपणांस एकटा समजतो, आणि आतां आपणांस कोणी तरी सहज अपकार करील असें त्यास वाटतें. आपण प्रवास करीत असतां आपणांस चोरांनी गांठलें तर आपण मनांत म्हणतो कीं, आपण यांच्या हातीं एकटे सांपडलों. यावरून हें स्पष्ट होतें कीं, मनुष्याचा एकटेपणा नाहीसां होतो तो केवळ कोणता तरी मनुष्य भेटल्यानें नव्हे; तर त्याची एकाद्या विश्वासू, प्रेमळ व उपयोगी मनुष्याशीं गांठ पडली असतां, तो आपणास एकटा समजत नाहीं. मनुष्य स्वभावच असा आहे कीं, त्याला कोणा तरी प्रेमळ व विश्वासू मनुष्याचा सहवास आवश्यक वाटतो. असें आहे तरी मनुष्याने अशा सहवासाची मुळींच गरज ठेवूं नये. त्यानें आपल्या अंतर्यामाची अशी तयारी ठेवावी कीं, तो कोठेंही असला व त्याला कशीही स्थिति प्राप्त झाली तरी मी एकटा आहे असें त्याला कदापि वाटूं नये. आपण स्वतांशींच बोलत व विचार करीत बसण्याची सवय करावी. आपला इतर वस्तूंशी कोणत्या प्रकारचा संबंध आहे; यापूर्वी आपणांवर जे बरेवाईट प्रसंग आले, त्या वेळीं आपण कोणत्या प्रकारें वर्तन केले; सांप्रत त्या प्रसंगांसंबंधानें आपलें वर्तन कसें काय आहे; कोणत्या गोष्टींमुळें आपण अद्यापि क्लेश पावत आहों; ह्या क्लेशांपासून आपण कसे मुक्त होऊं, व त्यांच्या परिणामांचें कसें परिमार्जन करावें; आपल्याठायीं कोणता उणेपणा आहे, आणि तो कोणत्या उपायांनी दवडावा, या गोष्टींचें आपण मनन करावें.

सीझरानें आपल्या शेजारच्या राष्ट्रांस पादाक्रांत केल्यामुळें आपणांस आज शांतीचा अनुभव घडत आहे, असें आपण म्हणतों. सांप्रत कोठें दंगेधोपे व लढाया होत नाहींत. लुटारू लोक व चांचे लोक यांचा उपद्रव नाहींसा झाल्यामुळें पाहिजे तिकडे पाहिजे तेव्हां सुरक्षितपणे प्रवास करण्याची सोय झाली आहे.

परंतु आपणांस ज्वरादि रोग झाले असतां, किंवा जहाज फुटून पाण्यांत बुडून मरण्याचा समय आला असतां, किंवा भूमिकंप, विद्युत्पात इत्यादि उत्पात होऊन प्राणसंकट ओढवलें असतां, आपल्या मनाची शांति अढळ राखण्याचें सामर्थ्य या सीझराच्या ठायीं आहे काय? त्याचप्रमाणें ममत्व, शोक, चिंता, मत्सर, लोभ इत्यादि मानसिक विकारांपासून आपणांस मुक्त राखण्याचें सामर्थ्य अशा पराक्रमी पुरुषाच्याठायीं आहे काय? बिलकुल नाहीं. परंतु जे ज्ञानी पुरुष आहेत, ते आह्यांस असें आश्वासन देतात कीं, आम्ही त्यांची कास धरिल्यास आमची या सर्व विकारांपासून मुक्ति होऊन, आम्हांस शांतीचा अनुभव घडेल. त्यांचा बोध आम्ही ऐकूं तर आम्ही कोठेंही असलों व कांहींही करीत असलों, तरी आम्हांस शोक करण्याचें प्रयोजन उरणार नाहीं. आम्हांस कोणत्याही गोष्टीचा संताप किंवा तिरस्कार वाटावयाचा नाहीं. आमच्या सदाचारास कोणत्याही प्रकारचा अंतराय येणार नाहीं. तर आम्ही सर्व प्रकारच्या अनिष्टांपासून मुक्त होऊन केवळ स्वस्थपणें आयुष्यक्रमण करूं. अशा शांतीचा ज्यास लाभ घडला, तो अगदीं एकटा असला तरी त्यास त्याचें कांहीं एक वाटावयाचें नाहीं. कारण त्याच्या मनाची अशी खात्री होते कीं, मजवर कोणताच अनिष्ट प्रसंग यावयाचा नाहीं. चोराचिलटापासून किंवा भूकंपादि उत्पातांपासून मला यत्किंचित्ही पीडा व्हावयाची नाहीं. मी जिकडे पाहतों तिकडे सर्व शांत व स्थिर आहे असें मला दिसतें. मी कोणत्याही वाटेने गेलों, कोणत्याही नगरांत असलों, कोणत्याही जनसमुदायांत मिसळलों, कोणाच्याही शेजारीं राहिलों, किंवा कोणताही प्रसंग मजवर आला, तरी मला त्यापासून कांहींएक अपाय घडणें नाहीं. आपणांस या जगांत जगावयाचें आहे तोपर्यंत अन्नवस्त्रादि निर्वाहाचे पदार्थ कोठें तरी मिळतील. हे पदार्थ मिळतनासे झाले म्हणजे असें समजा कीं, येथून निघण्याचा आपणांस इशारा झाला. आपलें मरणाचें द्वार उघडलें असून, आपणांस आतां येथून निष्क्रमण केलें पाहिजे. हें जें आपणांस जावयाचें आहे, तें कांहीं कोठें भयंकर ठिकाणीं नव्हे, तर जेथून आपण पैदा झालों तेथेंच आपणांस पुनरपि जाणें आहे. ज्या महाभूतांच्या संयोगाने आपणांस हें जिणें प्राप्त झाले, त्यांतच आपला पुनः लय व्हावयाचा. तेव्हां त्यांत भिण्यासारखें तें काय आहे? ज्यांशीं आपला शाश्वतचा स्नेह असून, ज्यांचे आपण केवळ अंशभूत आहों, त्यांतच आपण पुनः जाऊन मिळाल्याबद्दल आपणांस उलट समाधान वाटलें पाहिजे. असा जो विवेक करितो त्याला या विश्वातील सूर्य, चंद्र, तारांगण, पृथ्वी, समुद्र, आदिकरून वस्तुजात पाहून परम आल्हाद वाटतो. त्याला एकटेपणा असा कोठेच वाटत नाहीं; व तो कोठेही असला तरी आपण अनाथ आहों असें त्याच्या मनांत येत नाहीं.

पण कोणी म्हणेल कीं, मी एकटा असतां मला कोणी दुस्मानानें येऊन ठार मारिलें तर कसें? त्यास मी असें उत्तर देईन कीं, वेड्या, तो तुला ठार मारणार नाहीं, तर तुझ्या ह्या क्षुद्र देहाला तूं आत्मस्वरूपी असून ह्या जडदेहाचें तुजवर केवळ आवरण आहे. हाच सिद्धांत गीतेत कृष्णाने प्रणीत केला आहे :-

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि।। *

* देहधारी न हा बद्ध ।। जो अवध्य यमासी सर्व देहांत भारता ।। पूर्ण सत्ता चिन्मय भूतें तरी नाशवंत ।। खेद करीत कशाचा नवेसि अर्जुना तूं योग्य ।। भव आरोग्य तुकया. तुकाराम.

असा तूं विवेक करिशील तर तुला कोठेही एकटेपणा किंवा निराधारपणा वाटणार नाहीं. या प्रकरणीं मुलांचें आचरण पाहा कसें असतें तें. त्यांस आपण एकटीं सोडून गेलों असतां, तीं माती, दगड वगैरे जमा करून घरकुलें बांधून, किंवा दुसरी कांहीं तरी करमणूक काढून आपला वेळ घालवितात. असें जर मुलें एकटी असतां वर्तन करितात, तर माझा मित्र देशांतरास गेला, किंवा मृत झाला असतां, मी एकटा झालों असें मानून का बरें शोक करीत बसावें? मुले केवळ अज्ञान असूनही जर त्यांना आपली करमणूक करितां येते, तर मीं विवेक व ज्ञान यांच्या बलेकरून कां बरें समाधान मानूं नयें?

भांडखोर व खुनशी लोकांचा निषेध

जो आपणांशी विरोध किंवा वैर करितो, त्याचा आपण समाचार घेतला नाहीं तर लोक आपणांस कमी लेखितील असें ज्याला वाटत असतें, तो मोठाच अविचारी व नीच समजावा. जनांची समजूत अशी दिसते कीं, आपल्या वैऱ्यास अपकार करण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगी नाहीं, त्यास तुच्छ मानावें. परंतु माझें मत पुसाल तर ज्याला दुसऱ्याचें बरें करण्याचें सामर्थ्य नसतें त्यालाच तुच्छ लेखावें. जो सदाचारी व ज्ञाता पुरुष असतो, तो आपण स्वतः तर कोणाशीं कलह करीत नाहीं, पण इतरांसही कलहापासून करवेल तेवढें पराङ्मुख करितो. या प्रकरणीं महासाधु सॉक्रेटिस या उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें आहे. तो स्वतः तर कोणाशीं कधीं कलह करीत नसे. परंतु दुसऱ्यांसही परस्परांशी कलह करूं देत नसे. त्याच्याशीं वाद करण्यांत पुष्कळ पंडितमन्य लोक येत असत. पण तो कोणासही कधीं उण्या उत्तरानें दुखवीत नसे. त्याची बायको आणि मुलें तर त्याच्याशी सर्वदा विरोध करीत. पण तो त्यांना एकही शब्द कधीं टाकून बोलत नसे. इतकी त्याची शांत वृत्ति असे.

सॉक्रेटिसासारखी ज्याची वृत्ति बनली असते, त्याला दुसऱ्याशीं कलह करण्याचें मुळीं प्रयोजनच उरत नाहीं. कारण त्याला कोणत्याही गोष्टीमुळें विस्मय किंवा संताप वाटत नाही. दुराचारी जनांकडून अनिष्ट गोष्टी सर्वदा घडावयाच्या हें तो जाणत असतो. कोणीं त्यास शिव्या दिल्या असतां, तो मनांत म्हणतो कीं, हा एवढेच करून राहिला. यानें मला मारिलें नाहीं हा याचा मजवर उपकारच झाला. बरें कोणी त्याला मारिलें तर तो असें समाधान मानील कीं, यानें मला जखम केली नाहीं, हा याचा उपकार समजला पाहिजे. बरें कोणीं त्याला जखमही केली, तर त्यानें मला ठार केलें नाहीं हा त्याचा मजवर उपकारच झाला असें तो मानील. कारण त्या बापड्याच्या अंगीं अज्ञान वसत आहे. मी मनुष्य जातीचा प्राणी आहें. यास्तव मला दुसऱ्याशीं हिंस्र पशूसारखें वर्तन करितां कामा नये; तर सर्वांशीं ममतेने वागले पाहिजे; असें त्याच्या मनांत कोठून येणार? पुनः, जो आपणांस अपकार करितो त्याला त्याची ती कृतिच अपायकारक होते. तेव्हां मीं आणखी त्यास कशासाठीं शासन करावें? असा विचार त्याच्या मनांत येत नाहीं. हे असे क्षमाशीलतेचे विचार त्याच्या मनांत यावयास त्याला कांहीं तरी ज्ञान व्हावें लागतें. ह्या ज्ञानाच्या अभावामुळें त्या बापड्याची अशी वृत्ति बनलेली असते. अशा तुझ्या अज्ञान शेजाऱ्यानें तुला अपकार केला, किंवा तुझी कांहीं तरी वस्तु फोडून तोडून टाकिली तर त्यामुळें तुझ्या हातून कांहीं अनाचार घडला असें होतें काय? जर नाहीं, तर त्याबद्दल त्वां कां खेद पावावे.

याप्रमाणें तुला कोणीं अपकार केला असतां, त्वां एकाद्या हिंसक पशूप्रमाणें त्याच्या अंगावर तुटून जाऊन त्याला उलट अपकार करणे कदापि रास्त होणार नाहीं. कारण तुझ्याठायीं याहून सौम्य असे गुण आहेत. त्या गुणांचा तूं सर्वदा उपयोग करून त्यांचा आपल्या अंगीं विकास होईल असें केलें पाहिजे. दया, क्षमा, शांति या वृत्ति तुझ्याठायीं विकास पावल्या तरच तुझ्या अंगीं खरें मनुष्यत्व येणार. क्रूरपणा, खुनशीपणा वगैरे उग्र वृत्ति ह्या पशूंलाच योग्य होत. त्या मनुष्याला शोभत नाहींत. या क्षमावृत्तीचें महात्म्य पुढील सुभाषितांत कथन केलें आहे:-

क्षमाबलमशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा ।
क्षमा वशीकृतिर्लोके क्षमया किं न सिद्ध्यति ।। * सु०

अश्वादि पशूंच्याठायीं त्यांच्या त्यांच्या स्वभावानुरूप कांहीं उपजत गुण असतात. तसेंच मनुष्याच्याही ठायीं मनुष्यत्वास अनुरूप असे कांहीं गुण आहेत. उदाहरणार्थ, असें पाहा कीं, अश्वाच्या ठायीं वेगानें धावणें हा धर्म आहे. श्वानाच्याठायीं घ्राणेंद्रियांची शक्ति तीव्र असल्यामुळें कोणत्याही वस्तूचा सुगावा काढण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं असतें. हे गुण त्यांच्याठायीं नसले तर त्यांचें अश्वत्व व श्वानत्व नष्ट झालें म्हणून समजावें. अशीच गोष्ट मनुष्याचीही आहे. त्याच्याठायीं प्रामाणिकपणा, विश्वासूकपणा, परोपकारीपणा इत्यादि सद्वृत्ति लोपल्या असतां, त्याचें मनुष्यत्व गेलें म्हणावयाचें. असा सदाचारहीन मनुष्य खरोखरीच हतभाग्य होय. अशा मनुष्यापाशीं कितीही दौलत असली, व त्याचा संसार केवढाही मोठ्या थाटाचा असला, तरी तो विपन्नच समजावा. कारण जेवढ्या बाह्य वस्तु आहेत तेवढ्या साऱ्या त्याच्या अशा म्हणतां येत नाहींत. पुनः, त्याला तो केव्हां मुकेल याचा नेम नसतो. ज्यांच्या कृपेने त्या त्याला प्राप्त झाल्या असतात, त्यांची अवकृपा झाली कीं ते त्या त्याच्याकडून लागलीच हिरावून घेतील. परंतु त्याच्या अंगच्या गुणांची गोष्ट अशी नाहीं. ते त्याच्याकडून कदापि नष्ट होणें नाहीं. मनुष्याचें खरें वित्त काय तें हेंच होय. सौम्यता, सहवास, प्रियता, सहनशीलता, दयालुता इत्यादि सद्वृत्ति ज्याच्या ठायीं विकसित होतात, तोच खरा संपन्न समजावा. मनुष्यत्वाचे खरे गुण काय ते हेच होत. भतृहरी नें हा नीतिबोध पुढील बोधवचनांत उत्कृष्टप्रकारें केला आहे:-

प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यम्
काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभावः परषाम् ।
तृष्णास्त्रोतो विभंगो गुरुषुच विनयः सर्वभूतानुकंपा
सामान्यः सर्वशास्त्रेष्वनुपहतविधिः श्रयसामेष पन्थाः ।। *

हे गुण ज्याच्याठायीं नाहींत, त्यास मनुष्य म्हणणें वाजवी होणार नाहीं. अशा गुणांनी जो मंडित असेल, त्याच्याशीं मी स्नेह करण्यास तयार आहें. असा मनुष्य मला शेजारी मिळावा, किंवा प्रवासांत सोबतीस मिळावा अशी मी इच्छा करीन. तोच जर रागीट, खुनसी, तक्रारी असा असेल तर त्याचें मला

---

* अशक्तांचे बल म्हटलें म्हणजे क्षमा होय. जे शक्तिमान् असतात, त्याला क्षमा भूषणास्पद होते. क्षमेच्या योगानें पाहिजे त्यास वश करून घेतां येतें. क्षमेला असाध्य असें या लोकीं कांहीं एक नाहीं.

* कोणाचा प्राण घेण्यास प्रवृत्त न होणें, परक्याच्या धनाचा अपहार करण्याची बुद्धि होऊं न देणें; सर्वदा सत्य बोलणें; योग्य कालीं आपल्या शक्तीप्रमाणें परोपकार करणें; परांच्या तरुण स्त्रियांशीं कदापि भाषण न करणे; आशेच्या प्रवाहास प्रतिबंध करणें; वाडवडिलांशीं विनयानें वर्तणें; सर्व प्राणिमात्रावर दया करणें; हा असा कल्याणाचा सर्व साधारण मार्ग एकंदर शास्त्रांनी विहित केला आहे.

वारेंही नको. जो मनुष्य क्षुल्लक कारणानें संतापून जाऊन दुसऱ्यांचीं डोकीं फोडण्यासही तयार होतो, त्याला मनुष्य कोणीं म्हणावें! नुसत्या बाहेरच्या आकारावरून जर कोणतीही वस्तु ओळखावयाची असेल, तर मेणाचीं केलेली केळींहीं खऱ्या केळ्यांप्रमाणें स्वादिष्ट व पौष्टिक आहेत असें म्हणावें लागेल. परंतु नुसत्या आकारावरून कोणी कशाचीही पारख करीत नसतो. अशीच गोष्ट मनुष्याची आहे. त्याचा माणसासारखा आकार असून त्याला कान, नाक, डोळे, वगैरे सर्व अवयव माणसासारखे असले तरी त्याचें मन मनुष्यत्वास अनुरूप असें नसेल तर त्यास मनुष्य म्हणणें योग्य नव्हे. जो दुसऱ्यानें केलेला हिताचा बुद्धिवाद ऐकण्यास तयार नसतो, आणि जो आपली चुकी नीटपणें कळली तरी ती कबूल करीत नाही, त्या मनुष्यास लोक पशु म्हणतात. कोणाशीं कसें अदबीनें व नम्रतेनें वागले पाहिजे हें ज्याला कळत नाहीं, त्याचा लोक धिक्कार करून, त्याच्या अंगीं माणूसपणा नाहीं म्हणतात. त्याचप्रमाणें जो दुसऱ्यावर एवढ्यातेवढ्या कारणास्तव रागावून त्याला मारावयास धावतो, त्याला एकाद्या हिंसक पशूची उपमा देणें योग्य होय.

जें कल्याणप्रद असेल, त्याचा पाठलाग करावा; आणि जें अपायकारक असेल, त्याचा अव्हेर करावा, हा प्रत्येक प्राण्याचा स्वभाव आहे. यास्तव जो कोणी आपल्या कल्याणाच्या आड येतो, किंवा आपणांस अपाय करितो, तो आपला पिता, पुत्र किंवा बंधु असला तरी त्यास आपण आपला वैरी लेखितों. कारण आपणांस स्वहिताहून कांहींएक प्रिय वाटत नसतें. यावरून पाहता बाह्य वस्तु कल्याणप्रद किंवा अपायकारक आहेत अशी मनुष्याची समजूत झाली तर पितापुत्र, किंवा बंधुभगिनी ही परस्परांचीं मित्र आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक स्थळीं आपले शत्रुच शत्रु असून, ते आपला घात करण्याचे बेत किंवा आपली नालस्ती करीत आहेत असें आपणांस वाटतें. परंतु आपलें खरें कल्याण केवळ आपल्या अंतर्यामाच्या शुद्धीवर अवलंबून असून, आपल्याठायीं सद्वृत्तीचा विकास झाल्यानें आपलें सुख वाढेल, व असद्वृत्तींचा विकास झाल्याने आपणांस दुःख होईल असा ज्याच्या बुद्धीचा निश्चय होतो, त्यास कोणाशीं वैर किंवा कलह करण्याचें प्रयोजन मुळीच उरत नाहीं. कलहास कारण ज्या जड वस्तु त्यांचा त्याच्या सुखाशीं कांहींएक संबंध नसतो. यामुळे त्यांसाठीं कोणाशीं भांडावेंसें त्यास वाटत नाहीं. दुसरें असें कीं, ह्या वस्तु प्रिय वाटून जे त्याचें त्या संबंधानें नुकसान करितात, त्यांस खरें ज्ञान प्राप्त झालें नसल्यामुळें स्वतांचें वास्तविक कल्याण कशात आहे तें मुळीच कळत नसतें. तेव्हां अशा अज्ञान हतभाग्य मनुष्यांशीं भांडत रहाण्याचें त्यास मुळींच आवडणार नाहीं.

या गोष्टी लक्षांत ठेवून सॉक्रेटिस आपल्या कुटुंबांतील मनुष्यांशी वागत असे. त्याची स्त्री मोठी कर्कशा असून त्याचा मुलगा अगदीं उद्धट होता. तरी त्यांच्यावर तो कधीं रागावत नसे, किंवा त्यांचा द्वेष करीत नसे. या सत्पुरुषांचे अनुकरण करून, मनुष्य आपल्याठायीं दया, क्षमा, व शांति यांचा विकास करण्यास झटेल तर त्यास कौटुंबिक सौख्याचा अनुभव घडेल, व राष्ट्रांतील लोकांचें परस्परसख्य वाढून त्यांत शांतीची चिरवसति होईल. निरनिराळ्या राष्ट्रांत धुमसत असलेला कलहाग्नि विझून, तीं परस्परांशीं सलोख्यानें वागतील. असा मनुष्य कोठेंही गेला तरी त्यास कोणाचीही भीति उरणार नाहीं; आणि तो कोणत्याही अनिष्ट

गोष्टीस जुमानणार नाहीं. कारण त्याची खात्री असते कीं, कोणत्याही बाह्य गोष्टीचा आपल्या खऱ्या सौख्याशीं यात्किंचित्ही संबंध नाहीं. हें खऱ्या सौख्याचे व शांतीचें बीज लक्षांत आलें असतां, तदनुसार स्ववर्तन ठेवणें हें मनुष्याचें परम कर्तव्य होय. पण 'नळी फुंकिली सोनारे इकडून तिकडे गेलें वारे,' अशी मनुष्याची वृत्ति असल्यामुळें ह्या गोष्टी त्यानें कितीही वेळां ऐकिल्या तरी त्याप्रमाणें वर्तन करण्याची त्यास बुद्धि होत नाही, हें मोठेंच वाईट होय.

◆◆◆

पुस्तक तिसरें

ज्ञानी पुरुषाचें वर्तन

त्वां आपणांस अशी शिस्त लावून घ्यावी कीं, तूं एकांतात किंवा लोकांत वागत असलास तरी तुझें आचरण शुद्ध व निर्दोष असावें.

सर्वदा मूकभाव धारण करावा; कधी कोणाशीं बोलण्याचा प्रसंग आला असतां, जेवढे अगदीं अगत्याचें असेल, तेवढेच त्वां थोडक्या शब्दांत बोलावें. उगीच कांहीं तरी पाल्हाळ लावूं नये. किंवा अनावश्यक, अप्रयोजक व ग्राम्य अशा कोणत्याही विषयावर बोलण्याची सवय ठेवूं नये. कोणाही मनुष्याची निंदा किंवा स्तुति करूं नये. अंगी वक्तृत्वबल असल्यास आपल्या श्रोतृजनांचें चित्त सदाचार व पवित्रता यांकडे वळेल असें करण्यास सर्वदा तत्पर असावें. पण जेथे श्रोतृसमुदाय आपल्या उपदेशास पात्र नसेल तेथें मुकाट्याने बसावें हें उत्तम होय.

कोणतीही गोष्ट किंवा वस्तु पाहून हसूं नये. ज्या त्या गोष्टीचा उपहास करीत बसूं नये. आपली ही वृत्ति पाहिजे तेव्हां आवरण्याचे सामर्थ्य अंगीं असावें.

कोणत्याही गोष्टीचा खरेपणा पटविण्याकरितां शपथा कधींही वाहूं नयेत. तरी आपल्या जिवलग मित्राचें किंवा आपल्या प्रिय मातापितरांचें किंवा आपल्या देशाचें रक्षण आपल्या शपथेनें होण्यासारखें असल्यास ती घेण्यास कांहीं चिंता नाहीं.

परक्यांनी किंवा नीचवृत्तीच्या जनांनी मेजवानीस बोलाविले असतां सहसा जाऊं नये. तरीपण एकादे प्रसंगीं अशा लोकांची आणि तुझी कोठें गांठ पडली असतां, त्यांशीं फारच सावधगिरीने वागावें; त्यांचा संसर्ग जितका टाळवेल तितका टाळावा; आणि त्यांचें पाहून कोणत्याच अनाचारांत किंवा फंदात पडूं नये. कारण असें चित्तांत वागवावें कीं, आपला एकाद्या दुराचारी मनुष्याशीं संसर्ग होऊन त्याच्याबरोबर आपण बोलूं चालूं लागलों तर आपली वृत्ति बिघडण्याचा दृढ संभव असतो. आपल्याठायीं मूळची कितीही शुद्धता असली तरी तिचा काहीएक उपयोग होत नसतो. म्हटलें आहे:-

दुर्जनजनसंसर्गात्सज्जनपुरुषोऽत्रदोषमायाति ।
रावणकृतापराधाज्जलधरेपि बन्धनं प्राप्तम् ।। * सु.

---

* दुर्जनांच्या संगतीनें सज्जन पुरुषास दोष लागतो. रावणानें रामाचा अपदोष केल्यांमुळे बिचाऱ्या सागराला सेतूबंधन घडलें.

तुझ्याठायीं सॉक्रेटिसासारखें कांहीं सामर्थ्य नाहीं. हा महासाधु कोणांच्याही संगतींत असला तरी त्यांची चित्तवृत्ति आपल्या वाक्प्रभावानें लागलीच पालटून टाकीत असे; आणि त्यांचें लक्ष आपल्या सद्बोधाकडे लागेसें करीत असे. हें सामर्थ्य सर्वांसच कोठून प्राप्त व्हावयाला? यासाठीं तुला नीच जनांचा समागम सर्वथा टाळला पाहिजे; नाहीं तर त्यांच्यासारखी तुझी वृत्ति व्हावयास उशीर लागणार नाहीं. दुराचारी जनांच्या अंगीं तुला पालटण्याचें एवढे सामर्थ्य असतें. याचे कारण इतकेंच आहे कीं, त्यांला आपला दुराचार खरा सुखसंपादक आहे असें मनापासून वाटत असतें; आणि तुझ्याठायींची सदाचारप्रीति वरकांती असून केवळ बोलण्यापुरती असते. याप्रमाणे तुझ्याठायीं सदाचारप्रीति पूर्णपणे बिंबली नसल्या कारणानें तुझें भाषण इतरांस केवळ शुष्क व कोरडें वाटतें. तुझी स्वतांची वृत्ति क्षणोक्षणी पालटते असें लोकांच्या नजरेस आलें असतां, त्यांना तुझा बोध ऐकण्याचा कंटाळा येतो. याप्रमाणें तुझ्या कोरड्या वाक्पांडित्याचा इतर जनांवर कांहींएक परिणाम तर होत नाही, पण त्यांच्या सहवासानें तुझ्याठायीं मात्र पापप्रवृत्ति जागृत होते. सारांश काय कीं, तुझी त्यांच्यावर छाप तर बसत नाहींच, पण त्यांचा मात्र तुजवर पुरा पगडा बसतो. कारण उघडच आहे कीं, जेथे विश्वासबल परम दृढ असतें, तेथें तें केवळ दुर्जय असतें. यासाठीं जोपर्यंत तुझ्या ठायीं सत्य सिद्धांत दृढ झाले नाहींत, आणि कोणाशीं कसाही प्रसंग आला तरी आपलें चित्त सहसा पालटणार नाहीं अशी तुझी जोपर्यंत खात्री झाली नाहीं, तोपर्यंत सामान्य जनसमुदायांत मिसळण्याचा तुला प्रसंग आला असतां फारच जपलें पाहिजे; नाहीं तर या सामान्य जनांच्या अंगच्या दुराचाररूप प्रचंड अग्नीपुढें तुझ्याठायींचें सदाचार बोधरूप मेण केव्हां वितळून जाईल याचा नेम नाहीं.

देहाच्या निर्वाहास ज्या वस्तूंची आवश्यकता असते, त्यांचें त्वां अगदीं परिमित संपादन करावें. जेमतेम योगक्षेम चालला म्हणजे पुरे. याहून अधिक वित्तार्जनाची अपेक्षा नसावी. जनांत आपलें वैभव वाढावें, किंवा आपणांस हवा तसा विलास करावयास मिळावा, अशी इच्छा तूं कदापि करूं नये.

तुझा विवाह होण्यापूर्वी त्वां कडकडीत ब्रम्हचर्य पाळावे; आणि आपल्या लग्नाच्या स्त्रीशींही बेताचा संबंध ठेवावा. अगदीं स्त्रैण होऊन जाऊं नये. आपण स्त्रीसुखाची परवा करीत नाहीं अशी फुशारकी लोकांत मिरवू नये; आणि जे कोणी स्त्रीसुखाचा निसर्गक्रमानुसार अनुभव घेत असतील, त्याचा उपहास किंवा अवहेलना करूं नये.

कोणी तुला असें सांगितलें कीं, अमुक एक मनुष्य तुझी निंदा करीत आहे, तर त्याचें ऐकून तूं रागास चढूं नये. आणि आपल्यावर जो कांहीं दोषारोप झाला असेल, तो उडविण्याचा प्रयत्न करूं नये. तर त्या चहाडखोरास असें म्हणावे कीं, त्या निंदकाला माझे आणखी दुसरे दोष ठाऊक असते तर तो एवढेच बोलून थांबता ना.

पहिलवानांच्या कुस्त्या किंवा इतर स्पर्धेचे खेळ पाहावयास तूं फारसा जाऊं नको; आणि कधीं गेलास तर कोणत्याही पक्षाचा अभिमान धरून त्याला जयप्राप्त व्हावा अशी इच्छा प्रकट करूं नको. ज्याच्या अंगीं वास्तविक सामर्थ्य असेल, त्याला जय मिळेल असें मनांत आणून तूं केवळ उदासीनपणे ते पाहत रहा. या प्रमाणें तुझी वृत्ति असल्यास कोणत्याही पक्षास जय प्राप्त झाला तरी त्याबद्दल तुला हर्ष किंवा विषाद

वाटणार नाहीं. हे तमासे पाहून गेल्यावर त्यांवर बऱ्यावाईट टीका करण्याची ही संवय ठेवूं नको. अमुक एका पक्षाने आपलें कसब किंवा सामर्थ्य चांगल्या किंवा वाईट प्रकारें दाखविलें असलें तरी त्यापासून तुझ्या चित्तांत काहीतरी चांगला पालट होण्यासारखा आहे काय? मुळींच नाहीं. मग असल्या खेळांच्या संबंधानें एवढी बकवा ती कशाला करावी? अशी बकवा तूं करीत रहाशील तर त्यावरून तुझी वृत्ति नीच आहे असें मात्र म्हणावें लागेल.

एकाद्या मोठ्या पदवीच्या मनुष्याशीं तुझी गांठ पडली असतां, अशा प्रसंगीं सॉक्रेटीस किंवा झिनो यांनी कसें वर्तन केलें असतें याचा विचार मनांत आणून तदनुसार त्याशीं वागण्याचा प्रयत्न कर.

एकाद्या मोठ्या सत्ताधारी पुरुषाच्या भेटीस तुला जाणें प्राप्त झालें असतां, त्वां असें मनांत आणावें कीं, तो तुला कदाचित् घरीं भेटावयाचा नाहीं, त्याचा देवडीवाला तुला मज्जाव करील, तुला पाहून तो आपला दरवाजा लावून घेईल, किंवा तो तुजकडे पहाणार देखील नाहीं. एवढ्या साऱ्या गोष्टी सहन करूनही तुला त्याच्यापाशीं जावेंसें वाटत असल्यास खुशाल जा; आणि मग तो जो कांहीं उपमर्द करील, तो निमूटपणें सहन कर. त्यानें मजशीं असें वर्तन करावयाचें नव्हतें अशी कुरकुर करत बसूं नको. कारण असल्या बाह्य अनिष्टानुभवांनीं खिन्न होऊन जाणें हें मूर्खाचें काम आहे.

मंडळींत बसून आपल्या स्वतांच्या कृत्यांसंबंधानें किंवा आपणांवर आलेल्या संकटांसंबंधानें बकवा करूं नये. कारण आपल्या संबंधाची कोणतीही गोष्ट सांगत बसण्यांत तुला कितीही सुख वाटत असलें, तरी ती ऐकण्याचा दुसऱ्यास कंटाळा आल्यावांचून रहाणार नाहीं.

उगीच हास्यरस पिकविण्याची बुद्धि तूं कधींही धरूं नये. कारण विनोदपर भाषण करून लोकांस हांसविण्याची सवय तुला लागली असतां, तुझ्याठायीं नीचवृत्ति उत्पन्न होण्याचा संभव आहे; शिवाय तुझ्याविषयीं लोकांच्या मनांतली आदरबुद्धि तितकी कमी होण्यासारखी असते.

एकाद्या अश्लील व अनीतीच्या विषयावर कोणी बोलूं लागले असतां, त्याचें तें बोलणे कदापि ऐकू नये. त्यांत मोठाच धोका आहे. मंडळींत असा एकादा विषय कोणी काढिला असतां. त्याचा त्वां सर्वथा निषेध करावा. पण असें करण्याचें तुला सामर्थ्य नसल्यास निदान इतकें तरी करावे कीं, त्याचें तें बोलणें आपणांस संमत नाहीं, व मुळींच आवडत नाहीं असें त्यास आपल्या मुद्रेनें वगैरे दाखवावें; आणि त्याचें बोलणे संपेपर्यंत त्यास उत्तेजनपर असा एक शब्दही बोलूं नये.

संवयीविषयीं

आपल्या अंगची एकादी कला किंवा गुण कायम राखून वाढविण्याचा उपाय म्हटला म्हणजे तदनुकूल आपलें वर्तन ठेवावें. आपल्या अंगीं पुष्कळ लांबचा प्रवास करण्याची शक्ति यावी असें असेल तर जेव्हांतेव्हां दूरदूरच्या गावीं जाण्याचा अभ्यास ठेवावा. मोठी दौड करण्याचें सामर्थ्य अंगीं वसावें असें असल्यास नित्य थोडथोडें धावण्याचा क्रम ठेवावा. आपणांस मोठ्यानें स्पष्ट व शुद्ध वाचता यावें असें वाटत असल्यास नित्य मोठ्याने वाचण्याची संवय ठेवावी. चांगले सुंदर अक्षर लिहिता यावें अशी इच्छा

असल्यास नेहमीं अक्षर वळविण्याचा निश्चय करावा. असा नित्य अभ्यास केला नाहीं तर कोणताच गुण किंवा शक्ति आपल्या अंगीं कायम रहावयाची नाहीं. उंदाहरणार्थ, तूं दहापंधरा दिवस स्वस्थ घरांत पडून रहा, आणि मग एकाद्या लांबच्या ठिकाणी जाऊन ये; म्हणजे तुझे पाय कसे दुखूं लागतात तें पाहा. यावरून असें सिद्ध होतें कीं, कोणतीही गोष्ट तुला चांगली करितां यावी असें वाटत असल्यास ती त्वां सतत करण्याची सवय ठेवावी.

हाच नियम मानसिक गुणांस लागू आहे. एकादे समयीं तुला क्रोध आला असतां तूं असें समजूं नये कीं, मजकडून एवढीच एक वाईट गोष्ट घडली. पण त्वां असें मनांत आणावे कीं, या एका प्रसंगामुळे तुझ्या अंगीं तेवढी तामसी वृत्ति वाढली. आगीवर जसें थोडथोडें तेल घालीत राहिलें म्हणजे तिचा जाळ वाढतच रहातो, तद्वत् या क्रोधवृत्तीचें आहे. आज थोडा राग आला, उद्या थोडा आला, असें करितां करितां ती वृत्ति अगदीं दृढ होऊन अनावार होते. अशीच गोष्ट विषयासक्तीची आहे. एकादे प्रसंगीं विषयास मोहून जाऊन आपल्या हातून अनाचार घडला असतां, तूं असें समजू नये कीं, आपल्याकडून हें एवढेंच वाईट काम घडलें. तर याप्रमाणें जेव्हांतेव्हां विषयकामनावश होण्याची तुला संवय लागून, तुझ्याठायीं विषयासक्ति दृढावत जात आहे असें त्वां खास समजावें.

जयासि वाटे शीण व्हावा । तेणें विषय चिंतीत जावा
विषय न मिळतां जीवा । तळमळ सुटे

मनुष्याच्याठायीं जे गुण किंवा जें सामर्थ्य पूर्वी कधीं नव्हतें, तें त्याच्याठायीं अंकुरित होऊन वृद्धिंगत होण्यासारखें असतें. मात्र त्याच्या दृष्टीस अनुरूप असे व्यापार त्याच्या हातून झाले पाहिजेत. आपल्या हृदयांतील कुवृत्तींचेंही असेंच आहे. उदाहरणार्थ एकादे समयीं तुझ्याठायीं लोभवृत्ति जागृत झाली असतां, लागलीच विवेकबलेंकरून तिचें दमन केलें, व त्या वृत्तीच्या पायीं कोणकोणते अनर्थ उद्‌भवण्याजोगे आहेत, त्यांचें ज्ञान चित्तांत उदित झालें, म्हणजे त्या वृत्तीचें तत्काळ निर्मूलन होतें. परंतु अशा प्रसंगीं विवेकाचे साहाय्य घेतलें नाहीं तर ती वृत्ति उद्दाम होऊन पुनरपि तिचें उद्दीपन करणारी एकादी गोष्ट उपस्थित झाली असतां, त्या मानानें तिचे बल वृद्धिंगत होतें. याप्रमाणें ती वृत्ति हळूहळू वाढत जाऊन अनावर होते; आणि मग अर्थतृष्णा व इतर तदनुषंगानें असणाऱ्या तृष्णा उच्छृंखल होऊन विवेकाचें कांहींएक चालतनासें होतें. याप्रमाणें मनुष्याचें मन विकारवश झालें म्हणजे त्यांतून निरनिराळे विकार जातां जात नाहींत. मनुष्यास ज्वर आला असतां, जसा त्याच्या प्रकृतीवर फारच वाईट परिणाम घडतो, व ज्वर नाहींसा झाला तरी तन्मूलक परिणामाचें परिमार्जन होऊन प्रकृति ताळ्यावर येण्यास पुष्कळ अवधि लागतो, तद्वत्‌च मनुष्याच्या मनाचें आहे. त्यात कुवृत्तींचा प्रादुर्भाव होऊन तें विकृत झालें असतां ती विकृति जातां जात नाहीं; आणि अशा विकृतावस्थेंत एकाद्या कुवृत्तीचें उद्दीपन करणाऱ्या गोष्टी घडून आल्या तर ती वृत्ति अधिकच प्रबल होते. यासांठी प्रत्येक दुर्गुणांचे निमूर्लन अगदीं प्रारंभीच करण्यास मनुष्यानें झटलें पाहिजे.

तुला आपला रागीट स्वभाव टाकावयाचा असल्यास तो वाढण्याजोग्या कोणत्याच गोष्टी करूं नको. कोणत्याही प्रसंगी राग आला असतां, तो तत्काळ दाबण्याचा प्रयत्न कर. आपण आज किती दिवस मुळींच

रागावलो नाहीं, याचा नेहमीं हिशोब ठेव. याप्रमाणें हळहळू क्रोधवृत्तीचें दमन करण्याचा अभ्यास दृढ निश्चयानें एकसारखा चालीव. त्याचप्रमाणें तुझ्याठायींची कामवासना नाहींशी व्हावी असें वाटत असल्यास कोणतीही सुंदर स्त्री दृष्टीस पडली असता, तिचे लावण्य पाहून तिला मोहित होऊं नको. 'आहा, केवढे सुंदर हिचें रूप! ज्या पुरुषाची ही पत्नी असेल तो खरोखरी धन्य होय,' असले विचार तूं मनातही येऊं देऊं नये. कारण याप्रमाणें मोहवश झाल्यानें तुला तिची इच्छा होऊन तूं कदाचित् व्यभिचारही करण्यास प्रवृत्त होशील परंतु याप्रमाणें जगांत सर्वत्र अनाचार वाढला असतां, त्यापासून कोणकोणते अनर्थ उद्भवतात याचा तूं आपल्या मनाशीं शांतपणे विचार करून या मोहापासून अगदीं प्रारंभापासूनच मुक्त रहा; नाहींतर असें होईल कीं, तुझ्या मनांत परस्त्रीविषयीं इच्छा उत्पन्न झाली असून, ती स्वतः जारिणी असल्यामुळें तुझी दुष्ट कामना तृप्त करण्यास राजी झाली, व तुला तिनें प्रेमसूचक निरोप वगैरे पाठविला, किंवा ती तुझ्या अगदीं गळीं येऊन पडली, तर मग आपल्या कुवासनेचे दमन करून तिला झिटकारून देण्याचे सामर्थ्य तुजमध्यें मुळींच उरणार नाहीं.

परंतु हा मनोनिग्रह करण्याचें सामर्थ्य तुजमध्यें उत्पन्न होऊन वृद्धिंगत व्हावें अशी तुला इच्छा असल्यास त्वां सर्वदा आत्मपरीक्षण करावें. कोणत्या आचरणाचा काय परिणाम होईल याचा विचार करून, तें आपल्या हातून कां घडतें याचा नीट बारकाईने शोध करावा; आणि एकादें दोषयुक्त कर्म आपल्या हातून जितके वेळां होईल तितकेवेळां त्याबद्दल स्वतांचा निषेध करून पुनरपि तसें न करण्याचा निर्धार करावा; आणि हा निर्धार अढळ राहून तदनुसार तुझें वर्तन व्हावें, यासाठीं तूं साधू संगति जोडावी; आणि सत्समागम घडण्याची शक्यता नसल्यास एकाद्या साधुपुरुषानें लिहून ठेवलेला सद्बोध व त्याचा चरित्रमहिमा यांचें पुनःपुनः मनन कर. एकाद्या सज्जन पुरुषाचें उदाहरण व बोधवचनें डोळ्यांपुढें सतत ठेवून तदनुसार स्ववर्तन कोठवर होतें व कोणत्या गोष्टीत आपण उणें आहों, याचा नित्य आपल्या मनाशीं तपास कर.

याप्रमाणें सदुपायाची योजना तूं अहर्निश करिशील तर या संसारातील मोहप्रसंगांस न जुमानण्याचें सामर्थ्य तुजमध्यें हळू हळू वाढत जाईल. कोणताही मोहप्रसंग प्राप्त झाला असतां, एकदम बेहोष होऊन जाऊं नये. तर मनाला अंमळ आवरून धरून त्या प्रसंगाचें वास्तविक स्वरूप ध्यानांत आणावे. त्यास वश झाल्याने कोणकोणते परिणाम उद्भवतील याचा शांतपणे विचार करावा. त्या प्रसंगामुळे चित्त कदापि क्षुब्ध होऊं देऊं नये. तर त्याच्या ऐवजी दुसऱ्या कोणत्या तरी सत्कृत्यांत मन घालून किंवा तें करण्याचा बेत करून, मोहमूलक दुराचारप्रवृत्तींचे दमन करावें. याप्रमाणें सर्वदा स्ववर्तन सुधारण्याचा क्रम ठेविल्यास, तुझ्याठायीं कोणत्याही प्रसंगीं धैर्यबळ कायम राखून, अखंड नीत्याचरण करण्याचें सामर्थ्य उत्पन्न होऊन विकास पावेल. हे सामर्थ्य जर तुजमध्यें निर्माण होणार नाहीं तर तुझें वाक्पांडित्य व्यर्थ होय. 'बोलणें फोल झालें। डोलणें वायां गेलें.' अशी तुझी दशा होईल.

जो कोणत्याही प्रसंगास किमपि जुमानीत नाहीं, व त्यांस सहसा वश होत नाहीं, तोच खरा कुस्तेगीर. हे क्षुद्र मनुष्या, धैर्य धर. असा ज्या त्या प्रसंगानें व्यग्र होऊं नको, मनाचें स्वातंत्र्य, सदाचार, शांति हीं जो संपादन करूं जाईल, त्याला या प्रपंचांत अनेकविध प्रसंगांशीं सर्वदा अढळ धैर्यानें झगटलें पाहिजे. हे प्रसंग असे प्रचंड असतात कीं, त्यांच्या झपाट्यापुढें विवेकाचें कांहींएक न चालून मनुष्य त्यांस हार

जात असतो. पण या प्रसंगांचें वास्तविक स्वरूप ज्ञानाच्या योगानें एक वेळ ज्ञात झालें म्हणजे त्यांचें सामर्थ्य विवेकावर कांहींएक चालत नाहीं. परंतु या प्रकरणी एक मात्र नेहमीं सावधगिरी ठेविली पाहिजे कीं, या प्रसंगांस एकदा वश झालें असतां पुनरपि त्यांस वश व्हावें लागतें. कारण एक वेळ त्यांचा अंमल आपल्या मनावर बसला कीं तो तेथून ढळतां ढळत नाहीं. यासाठीं पहिल्या पासूनच त्याच्या हारीं जावयाचें नाहीं असा कृतसंकल्प असावा. आजच्या वेळे पुरता मी या मोहप्रसंगांस वश होईन, आणि पुनः तो प्राप्त झाला असतां त्याचें कांहींएक चालू देणार नाहीं, असें जो म्हणतो तो वेडा समजावा. कारण एकदा त्याचा आपणांवर पगडा बसला कीं तो टाळण्याचें तेवढें आपलें सामर्थ्य कमी झालें म्हणून समजावें. याप्रमाणें दुराचारप्रवृत्ति हळूहळू वृद्धिंगत होऊन, तिचा पूर्ण अंमल आपल्या चित्तावर बसला म्हणजे तिचें निवारण किंवा दमन करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं उरत नाहीं. इतकेंच नव्हे तर संवईच्या योगानें दुराचारप्रवृत्ति आपल्याठायीं इतकी दृढ होते कीं, आपल्या हातून पापाचरण होत आहे याचेंही भान मनुष्यास उरत नाहीं! मी माझा अमुक एक दुर्गुण किंवा दुर्व्यसन उद्यांपासून सोडण्याचा नेम करीन; आज तर मला तें पुरवून घेऊं द्या, अशी जो चालढकल करील, त्याचें तें व्यसन किंवा दुर्गुण नाहींसा न होतां उलटा वाढतच जाऊन, त्याच्या हाडींमासीं अगदीं खिळून जाईल. मग तो जातां जाणार नाहीं. सवईचें एवढें विलक्षण बळ आहे.

येथें कोणी शंका घेईल कीं, नीतीनें वागावयाचें असा नुसता निर्धार केल्यानें मनुष्य निर्दोष होईल काय? अर्थात नाहीं. पण असा निर्धार करितां करितां त्याच्याठायीं हळूहळू निर्दोषता वाढत जाईल. सदरी निर्दिष्ट केल्याप्रमाणें नित्य आत्मपरीक्षण करून प्रत्येक मोहसमय टाळण्यास दक्षतेनें झटलों तर आपल्या ठायींचे सगळे नाहींत तरी पुष्कळ दोष निर्मूळ होतील, हा कांहीं लहान फायदा नव्हे. सारांश काय कीं, जे कोणी हें आत्मपरीक्षण करण्याचें काम व मोहप्रसंग टाळण्याचा प्रयत्न लांबणीवर टाकतात, ते दुराचारापासून कदापि मुक्त व्हावयाचे नाहीत. निर्लज्जपणा, नीचपणा, परतंत्रता, रागीटपणा, मत्सरीपणा इत्यादि दोषांपासून मुक्त होण्याचा निर्धार आजचा उद्यांवर टाकण्याची ज्याला सवय होते, त्यानें असें मनांत आणावे कीं, अशी दिरंगाई केल्यामुळें आपल्या हातून पुष्कळ अनन्वित कर्मे होत असतात; ही कर्मे पुनःपुनः आपल्या हातून घडू लागलीं म्हणजे त्यांची आपणांस संवय लागते; आणि कालेंकरून ही संवय इतकी दृढ होते कीं, तिचे निर्मूलन करण्यास मोठे प्रयास लागतात. ह्यासाठीं जी गोष्ट उदयिक करण्याजोगी असते, ती आजच करूं लागावें हें परम उचित होय. कारण उद्यां काय संकटे किंवा अंतराय येतील याचा कांहीं नेम नसतो. शिवाय आजचें काम उद्यांवर टाकलें तर उद्या पुनः तें परवांवर टाकण्याची आपणांस बुद्धि होण्याचा संभव असतो; आणि याप्रमाणें एक एक दिवस लांबणीवर पडून पुढें दुराचाराची संवय दृढ आल्यांमुळें तो टाळण्याचे सामर्थ्य आपल्या अंगीं उरत नाहीं.

वादविवाद

आपणांस चांगला विवेक करितां यावा यासाठीं कांहीं, कांहीं गोष्टींचें ज्ञान अगत्याचें आहे. आतां या गोष्टींचे ज्ञान प्राप्त झालें. तरी त्यांचा उपयोग प्रत्येक प्रसंगीं कोणत्या प्रकारें करावा हें सर्वांसच कळत नसतें. एकाद्या अज्ञान मनुष्याशीं वाद करण्याचा प्रसंग आला असतां, त्याच्याशीं कोणत्या प्रकारें भाषण करून त्याची समजूत घालावी हें फारच थोड्यांना कळत असतें. अज्ञान मनुष्यानें काहीं तरी अकांडतांडव

करून वितंडवाद आरंभिला असतां, त्याची चुकी मोठ्या युक्तीनें दाखवून त्याला वाटेवर आणण्याचें काम मोठें कठीण आहे. परंतु पुष्कळ लोक अशा अडाणी वाद करणारापुढें निरुपाय होऊन म्हणतात कीं, हा फारच अज्ञान आहे. याच्याशीं वाद केल्यानें काय निष्पन्न होणार आहे? याप्रमाणें त्याला नावें ठेवून त्याला ते तुच्छवत् लेखितात.

परंतु अशा समयीं जो खरा सन्मार्गदर्शक असतो, त्याचें वर्तन अगदीं भिन्न असतें. व्यवहारांत एकादा मनुष्य वाट चुकला असतां, त्याला वाटाड्या जसा खरी वाट दाखवून देतो, पण तो वाट चुकला म्हणून त्याचा तो उपहास करीत नाहीं किंवा त्यास दोष देत रहात नाहीं, तद्वत्च ज्ञात्यानें अज्ञान्याशीं वर्तन करणें योग्य होय. जो कोणी सन्मार्गच्युत झाला असेल, त्याची युक्तीच्यावाटे समजून घालून त्याला वाटेवर आणावें हें ज्ञात्याचें परम कर्तव्य होय. याप्रमाणें सत्याचें ज्ञान ज्यास होईल, तो मग सन्मार्ग सहसा सोडणार नाहीं. परंतु ज्याच्या अंगीं जनांस सन्मार्ग दाखविण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यानें अज्ञानी मनुष्यांची निदान हेलना तरी करूं नये. तर आपल्याठायीं हें सामर्थ्य नाहीं म्हणून त्यास वाईट वाटावें.

आतां हें उपदेशाचें काम कांहीं सोपें नाहीं. तें जो कोणी करू जाईल, त्याच्यावर संकटे येण्याचा संभव असतो. धनाच्या किंवा सत्तेच्या मदाने जो प्रमत्त झालेला असतो, त्याला दुसरें सारें कांहीं तुच्छ वाटत असतें. तो आपल्या पागेंतील घोड्यांची निगा चांगलीं रहावीं म्हणून अश्वविद्येंत निष्णात अशा पुरुषांची त्या कामावर नेमणूक करितो. तें काम भलत्याच मनुष्यावर कदापि सोंपीत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या देहाची सुस्थिति रहावी, व कांहीं तरी इजा झाली असतां ती लवकर बरी व्हावी, यासाठीं तो चांगल्या कुशल वैद्याचे साहाय्य घेऊन, तो सांगेल ते औषधादि उपचार करून पथ्यपाणी संभाळितो. ज्याला औषध विद्येचा गंधही नाहीं अशा कोणातरी मनुष्यानें सांगितलेले औषधोपचार तो कधींही करणार नाहीं. याप्रमाणें या प्रपंचांतील हरएक गोष्टीविषयीं तो सावधगिरी घेतो, आणि तिच्या संबंधानें योग्य मनुष्याची मदत घेतो. पण या सर्व गोष्टींहूनही उच्चतर असें जें आपलें अंतर्याम, त्यांतील दोष काढून टाकून त्याची उन्नति करण्यासाठीं तो कधीं कोणाचें साहाय्य घेतों काय? त्याची तो मुळीं फारशी परवाच करीत नाहीं. इतर सर्व गोष्टींविषयीं तो जितका दक्ष असतो, तेवढ्या मानानें तो या आपल्या अत्यंत मोलवान् व खऱ्या वित्ताविषयीं निष्काळजी असतो. त्याला त्याचा उत्कर्ष कसा करावा हें जाणून घेण्याची मुळींच आवश्यकता वाटत नसते. दुसऱ्या कोणीं ती त्याला दाखवून दिली तर तो त्याचें सांगणे मनास आणीत नाहीं. इतकेंच नव्हे तर या परम महत्त्वाच्या गोष्टीसंबंधानें त्याच्याशीं जो कोणी बुद्धिवाद करूं जाईल, त्याच्यावर डोळे वटारून तो त्याला उलट असें विचारील कीं, या गोष्टीचीं तुला काय पंचाईत? या प्रकरणीं मला बोध करणारा तूं कोण? याप्रमाणें तो त्या उपदेशकावर संतापला असताही जर तो उपदेशक त्याला या गोष्टींबद्दल पुनःपुनः त्रास देऊं लागेल, तर तो अधिकारांध मनुष्य त्याला ताडनही करण्यास चुकणार नाहीं. मला स्वतांलाही अशी एकाद्याच्या कानींकपाळीं ओरडण्याची फार सवय असे. पण या माझ्या खोडीमुळें मला बरेंच प्रायश्चित्त मिळाले आहे.

सुखानुभव घेण्यास आपण एकाएकीं प्रवृत्त होऊं नये

एकाद्या सुखविषयाचा उपभोग घेण्याचा तुला मोह पडला असतां त्यास लागलींच वश होऊं नको. त्याचा उपभोग घेतला असतां उपभोगकाळीं आपणांस कोणता अनुभव घडेल आणि उपभोग आटोपल्यावर आपली काय दशा होईल, याचा अगोदर शांतपणे विचार करावा. विषयोपभोगाच्या अंती तुझ्या चित्तास त्यापासून अनुताप होऊन स्वतांस दोष देण्याची पाळी येण्यासारखीं असेल तर त्वां त्यापासून प्रारंभीच परावृत्त व्हावें हें योग्य होय. याप्रमाणें ज्या विषयोपभोगाचा परिणाम अनिष्ट असतों, त्यापासून आपण निवृत्त झाल्यानें आपणांस त्याबद्दल संतोष वाटण्याजोगा असतों.

परंतु याप्रमाणें दूरवर विचार करूनही जर तुला विवक्षित सुखाचा अनुभव घ्यावा असें वाटत असेल, तर निदान इतकी तरी सावधगिरी ठेव कीं, त्या सुखाचें खरें स्वरूप तुझ्या लक्षांत आलें असून, त्याच्या वरकांती झकाकीस तूं भुलला नाहींस. परंतु या सुखास मुळींच भाळून न जाणें हें किती हिताचें आहे व परिणामीं तुला अशा वैराग्यापासून किती समाधान वाटण्यासारखें आहे याचा तूं अवश्य विचार करावा.

आपले सारे व्यवहार खुले असावे

कोणतीही गोष्ट रास्त आहे अशी तुझी पुरी खात्री झाल्यावर मग ती कोणाच्याही देखत करण्यास कदापि भिऊं नको. तिच्या संबंधानें लोकांचे मत कसेंहीं प्रतिकूळ असलें तरी त्याची मुळीच परवां करूं नको. एकादी गोष्ट अनितीची असल्यास ती छपविली असतां योग्य होईल. परंतु ती नीतीस अनुसरून असेल तर तीबद्दल लोक आपणांस दोष देतील अशी भीति बाळगण्याचें काय कारण आहे?

स्वार्थ

एकाद्याच्या घरीं आपण मेजवानीस गेलों असतां, तेथें आपली भूक मोठी आहे म्हणून पाहिजे तितके अन्न मागून खाणें हें आपल्या क्षुधेपरता विचार केला असतां रास्त आहे. पण मेजवानीस आलेल्या इतर पाहुण्यांस अन्न पुरलें पाहिजे हा विचार केला असतां, आपण आपल्या अधाशीपणास अंमळ आळा घालणें हे योग्य होय. याचप्रमाणें या प्रपंचांतील जीवनार्थकलहामध्यें मनुष्यानें वर्तन केलें पाहिजे. केवळ आपल्यापुरता विचार करावयाचा, दुसऱ्याचें कांहीं झालें तरी परवा नाहीं, अशी वृत्ति असणें योग्य नव्हे.

प्रत्येकानें आपली शक्ति पाहून वर्तन करावें

तूं आपल्या शक्तीबाहेरचें एकादें काम करण्याचा बेत करिशील तर त्यांत तुझी फजिती होऊन तुझ्या आटोक्यांतलें एकादें काम तुजकडून झालें असतें त्यासही तूं मुकशील.

प्रत्येकाला आपली योग्यता कळावी कशी? असा कोणीं मला प्रश्न केल्यास त्यास मी उलट असा प्रश्न करीन कीं, एकाद्या बैलावर सिंह धावून आला असतां, तो बैल त्याच्याशी सामना करावयास पुढें सरसावतो काय? त्याला आपलें सामर्थ्य चांगले कळत असून, तो त्या सिंहाच्या तावडींतून सुटून जाण्याचा कांहीं तरी इलाज करणार नाहीं काय? असे जर केवळ विवेकहीन पशूसही स्वसामर्थ्यज्ञान असतें, तर आम्हां

विवेकशील जनांस तें कां बरें नसावें? खरें पाहतां जेथें सामर्थ्य आहे, तेथें त्या सामर्थ्यांचे ज्ञानही अवश्य असतें. आतां आपल्या ठायीं कोणतेंही सामर्थ्य जें असतें, तें कांहीं अवचित आले नसतें. तें प्राप्त करून घ्यावयास पुष्कळ परिश्रम व अभ्यास करावा लागतो.

देहाच्या निवळ गरजा भागविण्यापुरतें वित्तार्जन करावें

आपणांस केवढा मोठा जोडा पाहिजे हें असें आपण आपल्या पायांचें माप घेऊन ठरवितों, तद्वत्च आपण किती अर्थ संपादन करावा याचे माप आपल्या देहाच्या गरजांवरून घ्यावयाचें. या पलीकडे आपणांस खटपट करण्याची जरुरी नाहीं, असा आपण निर्धार केला असतां आपला योगक्षेम चांगला चालतो. परंतु हें माप सोडून आपण अधिक वित्तार्जनाचा हव्यास धरिला तर आपणांस व्यर्थ शीण होऊन नाना क्लेश भोगावे लागतील. जोडा जसा पायांच्या बेताचा केला नाहीं तर त्यापासून पायांस इजा होण्याचा संभव असून, आणखीं चालताहीं चांगलें येत नाहीं, त्याचप्रमाणें तो केवळ गरज भागविण्यापुरता साधा व टिकाऊ असला म्हणजे पुरे असें न मानितां, त्यावर नकशी वगैरे काढून घेण्याची, किंवा तो नाना प्रकारच्या रंगांनी रंगवनू घेण्याची इच्छा धरिल्यास, पुष्कळच खटपट करावी लागून विनाकारण द्रव्यनाश करावा लागतो. चरितार्थास लागणाऱ्या एकंदर वस्तूंची गोष्ट अशीच आहे. त्या जितक्या कमी व साध्या असतील, तितका आपणांस त्या प्राप्त करून घेण्यासंबंधानें शीण कमी.

स्त्रियांची योग्यता

स्त्रियांस यौवनावस्था प्राप्त झाल्यापासून त्यांच्यावर पुरुष प्रेम करूं लागून त्यांस प्रसन्न राखण्यास झटतात; आणि त्याही आपला देह सुंदर व मोहक दिसावा म्हणून तो नाना वस्त्राभरणांनीं मंडित करितात, आणि पुरुषांचे चित्त हरण करण्यास हर उपायांनें झटतात. यापलीकडे आपलीं कांहींएक योग्यता नाही असें त्यांस वाटत असतें. परंतु ही त्यांची समजूत नाहींशी झाली पाहिजे. पुरुषांनी त्यांच्या लावण्याकडे पाहूनच त्यांची किंमत न करितां त्यांच्याठायीं विनय, पातिव्रत्य इत्यादि सुगृहिणीस अनुरूप असे गुण कितपत आहेत तें अवलोकन करून त्यांची योग्यता मानावी.

जड देहाची फाजील निगा करूं नये

जो मनुष्य आपल्या देहाच्या सुस्थितीकडेच सर्वथा लक्ष पुरवितो, तो मंदबुद्धि समजावा. स्वदेह चांगला पीळदार दिसावा म्हणून तालीम वगैरे करावी, तो चांगला पुष्ट व्हावा म्हणून उत्तम उत्तम पदार्थांचें सेवन करावे, तो सुबक दिसावा म्हणून उंची उंची वस्त्रें ल्यावीं, यामध्येच जो सर्वदा दंग होतो, तो देहाचें नसतें स्तोम माजवून आपल्या मनाच्या उन्नतीस अंतरतो. खरें म्हटले असतां त्यानें आपल्या मनाच्या निरनिराळ्या शक्ति वाढवून, त्यास सत्यज्ञानानें मंडित करावे हें त्याचें परम कर्तव्य आहे. देहाची जी निगा राखावयाची, ती जीवित कायम राहून आरोग्य असावें एवढ्यापुरतीच, याहून अधिक लक्ष त्याकडे पुरविण्याची आवश्यकता नाहीं.

वाय ५३८-२२

खरा चांगुलपणा

एक वक्तृत्वकलासंपन्न तरुण पुरुष एके समयीं एपिक्टेटसपाशीं आला असतां, त्याचा नट्टापट्टा व इषकी पोषाख पाहून तो त्याला म्हणाला :-

कांहीं कुत्रे घोडे वगैरे प्राणी इतर स्वजातीयांहून चांगले असत नाहींत काय?

वक्ता - होय, असतात खरे.

एपिक्टेटस - त्याचप्रमाणें कांहीं पुरुष इतर पुरुषांहून चांगले नसतात काय?

वक्ता - अर्थात् असले पाहिजेत. कां नसावे?

एपिक्टेटस - आपण कांहीं प्राणी इतर स्वजातीयांहून चांगले म्हणत असतों, ते त्यांच्या जातीला कांहीं विशेष अशा गुणांस्तव नव्हे काय? कुत्रे, घोडे वगैरे प्राण्यांच्याठायीं निसर्गत: निरनिराळे गुणधर्म असून, त्यांचा उद्देशही अगदीं परस्परभिन्न आहे. तेव्हां अर्थात् असें कीं, ज्या प्राण्याच्याठायीं त्याच्या जातीस उचित असे गुणधर्म इतर तज्जातीयांहून अधिक असतात, त्याला आपण इतरांहून चांगला म्हणतों, आणि हे गुणधर्म प्रत्येक प्राणिजातीचे भिन्न असल्या कारणानें चांगुलपणाही भिन्नभिन्न प्रकारचा असला पाहिजे, नाहीं काय?

वक्ता - होय, असला पाहिजे.

एपिक्टेटस - तर मग ज्या गोष्टींनी कुत्र्यास चांगुलपणा येतो, त्या घोड्यास कांहींएक उपयोगाच्या नाहींत; आणि ज्या गोष्टीमुळें घोडा सुरेख म्हटला जातो, त्या कुत्र्यास शोभावयाच्या नाहींत. कारण त्यांचे स्वभाव भिन्न असतात. हे खरें ना?

वक्ता - होय, हें वास्तविक आहे.

एपिक्टेटस - याचप्रमाणें ज्या गुणांच्या योगानें मल्लाची वाखाणणी होते, तेच गुण दांडपट्टा खेळणाराच्या अंगीं असले तर तो स्वकलेंत कुशल नसून, उलट त्याची उपहास्यता मात्र नाही काय व्हावयाची?

वक्ता - होय, झालीच पाहिजे.

एपिक्टेटस - तर मग मनुष्य जो चांगला म्हणावयाचा, तो त्याच्या जातिस्वभावाच्या उत्कर्षास्तव नाहीं काय?

वक्ता - यांत काय संशय?

एपिक्टेटस - तर मग हा मनुष्याचा जातिस्वभाव कोणता तो अवश्य समजला पाहिजे. तूं एकाद्याची केवळ निरपेक्ष बुद्धीनें वाखाणणी करूं लागलास तर ती त्याच्या अंगच्या सदाचारास्तव करितोस, किंवा दुराचारास्तव बरें?

वक्ता – अर्थात् तो सदाचारी असला तर.

एपिक्टेटस – तो मित आहारविहार करणारा असला तर तूं त्याची वाहवा करिशील, कीं तो बदफैल असला तर त्याला बरा म्हणशील?

वक्ता – तो मित आहारविहार करणारा असला तरच त्याला कोणी तरी वाखाणील.

एपिक्टेटस – तो मनोनिग्रही असला तर त्याला तूं बरा म्हणशील, की त्याचें वर्तन अगदीं बेताल असलें तर त्याला तूं बरा म्हणशील?

वक्ता – जो मनोनिग्रह करील तोच मला स्तुत्य वाटेल.

एपिक्टेटस – तर मग हे तरुण पुरुषा, तुझ्या अंगीं हे गुण असलें तरच तुला कोणी चांगला म्हणणार आहे, हें लक्षांत आणून, त्वां या गुणांच्या संपादनार्थ मनापासून झट. देहास नुसत्या वस्त्राभरणांनीं भूषित करून लोकांकडून आपणांस चांगले म्हणून घेण्याची आवड धरू नको. सद्‌गुणांकडे दुर्लक्ष करून नुसता देह सुशोभित करण्याची खटपट तूं कितीही केलीस, तरी तुला अभिज्ञ लोक कुरूपच म्हणतील. कारण तूं कांहीं हाडामांसाचा व केसांचा जड देह नव्हेस. हा तुझा देह कितीही सुंदर व सुशोभित असला तरी त्यापासून तुला खरा चांगुलपणा प्राप्त झाला असें समजूं नको, सॉक्रेटिसनें अथेन्स येथील एका अतिसुंदर व यौवनसंपन्न पुरुषास काय म्हटले तें लक्षांत आण. तो त्यास म्हणाला, 'हे तरुण पुरुषा, तूं सुंदर होण्याचा अवश्य प्रयत्न कर. पण हें सौंदर्ये तुला तुझ्या केशकलापाच्या नीटनेटकेपणानें किंवा तुझी कांति तेजःपुंज असल्यानें प्राप्त होणारें नव्हे. तर तें तुझ्या चित्तांतील सारे दोष व दुर्मतें यांचा नाश होऊन त्यांत सद्‌गुण व सत्य विचार यांचें बीजारोपण झालें म्हणजे तुला खरें सौंदर्य प्राप्त होईल.'

वक्ता – तर मग आपण आपल्या देहाच्या संबंधानें कसें काय वर्तन करावे?

एपिक्टेटस – त्याच्या संबंधानें तुला मुळींच काळजी बाळगण्याची जरूर नाहीं. कारण तो निसर्गसिद्ध असून त्यांत फेरफार करण्याची बिलकुल आवश्यकता नाहीं.

वक्ता – काय? तो स्वच्छही राखूं नये?

एपिक्टेटस – तो स्वच्छ तर अवश्य राखिला पाहिजे. पण तो निर्मळ व निरोगी राखण्यापलीकडे त्याची अधिक निगा करण्याची जरूर नाहीं. ज्याला स्वतांस प्राप्त झालेल्या ज्ञानाचा प्रसार करावासें वाटतें, त्यानें आपला देह व वस्त्रें कदापि मलीन ठेवू नयेत. त्यानें आपलें आरोग्य राखण्यास अवश्य झटावे, नाहीतर त्यांचा गलिच्छपणा किंवा रोडपणा पाहून लोकांला त्याची किळस येण्याचा संभव असतो; आणि मग त्यांस त्याचा उपदेश ऐकावासेंही वाटत नाहीं. कारण त्यांला वाटतें कीं, याचें ज्ञान शिकून याच्यासारखेंच व्हावयाचें ना? यासाठीं जो ज्ञाता आहे, त्यानें आपला देह सुस्थितींत राखून नेहमीं आनंदी रहावें; आणि आपल्या मनांस कोणत्याही प्रकारची चिंता किंवा त्रास वाटूं देऊं नये. तो अगदी वित्तहीन असला तरी त्याला कशाचीही अपेक्षा नसावी. घरदार किंवा वतनवाडी वगैरे त्याचें कांहींएक नसलें तरी त्यानें सर्वदा शांतचित्त असावें. ही त्याची शांति मोठमोठ्या सत्ताधीशांस व धनाढ्य पुरुषांसही लाभत नसते. तो अगदीं कंगाल

असला तरी त्याचा देह चांगला सुदृढ असण्यास कांहीं हरकत नसते. तो जितका चांगला राखवेल, तितका राखणें हें त्याचें एक कर्तव्यच आहे. त्याचे हाल असे सहसा होऊं देऊं नयेत. कोणी तरुण मनुष्य मजकडे शिष्यत्वाच्या नात्यानें आला असतां, त्याचा पोषाख नीटनेटका व केश वगैरे चांगले विंचरलेले असलें तर मला तो नापसंत न वाटतां, उलट आपण जनांस चांगलें दिसावें अशी त्याला आवड आहे, हें पाहून मला त्या गोष्टीचा आनंदच वाटेल. याप्रमाणें त्याच्या बुद्धीचा चांगुलपणाकडे आधींच कल असला तर त्याला उपदेश करणाराचें काम एवढेंच राहील कीं, त्याला खरा चांगुलपणा कशात आहे तें दाखवून देऊन, तो मिळविण्याचा मार्ग कोणता तें त्याला समजून सांगावें. मी अशा मनुष्यास असा बोध करीनं कीं, हे तरुण पुरुषा, आपण चांगलें दिसावे अशी तुझी इच्छा आहे ती फार उत्तम आहे. पण हा चांगुलपणा तुझ्या विवेकबुद्धीच्याठायीं आहे हे ध्यानांत ठेव. तुला कोणत्या गोष्टी आवडतात, कोणत्या आवडत नाहीत, तूं कोणत्या गोष्टी प्राप्त व्हाव्या म्हणून प्रत्यहीं परिश्रम करीत असतोस, आणि कोणत्या टाकाव्या अशी तूं मनापासून इच्छा करीत असतोस, हें कळल्यानें तुझ्याठायीं चांगुलपणा आहे किंवा नाहीं याचा ज्ञाते पुरुष निर्णय करितील. कारण तुझी वृत्ति सात्विक राखून तुझ्या वासनांचे यथोचित दमन करण्याचें तेवढें तुझ्या स्वाधीन असतें. तेव्हां स्वचित्ताची उन्नति करण्यांतच तुझा खरा चांगुलपणा व्यक्त होणार आहे. तुझा हा देह वस्तुतः पाहता केवळ मृत्तिकेचा गोळा आहे. त्याला नटवून सुशोभित करण्याच्या व्यर्थ खटपटींत तू कशासाठीं पडतोस? कारण तो केव्हां नष्ट होईल याचा नेम नाहीं. पण तुझ्या चिदंशाची गोष्ट तशी नाहीं. तो अमर आहे. तेव्हां सारांश काय कीं, मनुष्यानें आपला देह सर्वदा स्वच्छ राखावा. पण तो वस्त्रालंकारांनी नटविण्यांत कांहींएक अर्थ नाहीं. वस्त्रें जीं परिधान करावयाचीं ती साधी व स्वच्छ असावीं. म्हणजे झाले.

आपलें कोणीं नुकसान केलें असतां आपण तें कां सहन करावें

कोणीं तुझें नुकसान केलें किंवा तुझी निंदा केली तर त्वां असें समजावें कीं, त्याला असें करणे वाजवी वाटलें म्हणून त्यानें तें केलें. तुझ्या समजुतीप्रमाणें त्याच्या हातून कसें बरें वर्तन घडावे? आतां या त्याच्याकडून घडणाऱ्या अपकारापासून आपलें नुकसान झालें असें जें तुला वाटत आहे, तो मात्र तुझा भ्रम आहे. कारण त्यांत तुझें काहीएक वास्तविक नुकसान झालें नसतें. त्याच्यापासून घडणाऱ्या अपकारानें तुझें अंतर्याम कदापि बिघडावयाचें नाहीं. असा विवेक करून तूं कोणावरही संतापण्याचें सोडून दे. सर्वदा क्षमाशील व सौम्य वृत्ति धारण कर; आणि कोणीं कधीं तुला अपकार केलाच तर त्याला तसें करणें बरें वाटलें म्हणून त्यानें तें केलें असें म्हणून स्वस्थ हो.

क्षमा

आपल्या इष्टमित्रांकडून किंवा इतर कोणाकडून आपलें कांहीं नुकसान झालें असतां, आपण असा विवेक करावा कीं, हा माझा सहोदर बंधु किंवा जिवाचा मित्र किंवा तो आणि मी एकाच भूमातेचे पुत्र असल्या कारणानें त्याला मी क्षमा करावी हें योग्य होय.

खरी थोरवी

जर कोणी मनुष्य म्हणेल कीं, मी अमुक एका मनुष्यापेक्षा श्रीमंत आहे किंवा मी मोठा बोलका आहें, ह्मणून मी त्याच्याहून बरा आहें, तर तें त्याचें म्हणणें खोटें आहे. कारण तो दुसऱ्याहून श्रीमंत असला

तर त्याची दौलत दुसऱ्याच्या दौलतीहून अधिक आहे, व तो त्याहून चांगला वक्ता असेल तर त्याचें वक्तृत्व त्या दुसऱ्या मनुष्याच्या वक्तृत्वाहून चांगले असेल, इतकेंच. परंतु तो कांहीं दौलत किंवा वक्तृत्व नव्हे. तेव्हां त्यांत त्याला फुशारकी मिरविण्यासीरखें तें काय आहे? खरें म्हटलें असतां त्याचें अंतर्याम जर दुसऱ्याच्या अंतर्यामाहून चांगलें असेल तर मात्र तो त्याहून चांगला समजावा.

मनुष्यास वाटतें तसें तो वर्तन करितो

मनुष्याच्या हातून दुराचार घडला असतां आपण त्याचा धिक्कार करूं नये. तर आपण आपल्या मनाशीं असा विवेक करावा कीं, त्याला जें बरेंसें वाटलें तें त्यानें केलें. त्याची बुद्धि कोती असून, त्याला खरें ज्ञान प्राप्त झालें नसल्यामुळें आपलें खरे हित कशात आहे तें त्याला कळले नसतें; म्हणून त्याच्या हातून अनाचार घडत असतो. त्याला आपलें वास्तविक सुख कशांत आहे तें नीट समजून दिलें, तर तो तदनुसार वर्तव्यास कदापि कुचराई करणार नाहीं. तेव्हां त्याला हें ज्ञान झालें नसतें तोपर्यंत त्याच्या हातून दुराचार घडला असतां, तूं त्याबद्दल त्याच्यावर कां क्रोध करावा बरें? एकादा मनुष्य जन्मांध किंवा मुका असला तर त्याच्या त्या व्यंगाबद्दल त्यावर कोणी रागावतो, कीं त्याची कींव करितो? अशा मनुष्याची जर दया करावयाची, तर ज्याचे ज्ञानचक्षु सत्य ज्ञानाच्या योगानें उघडलें नसतात, त्यावर आपण कां दया करूं नये? या जगांत मनुष्याकडून जे मोठमोठे अनाचार घडत आहेत, त्यांचें कारण केवळ ते करणारांस खरें वस्तुज्ञान प्राप्त झालें नसतें हें होय. राष्ट्राराष्ट्रांमध्ये मोठे समरप्रसंग होऊन, प्रचंड मनुष्यसंहार जो होत असतो, त्याचेही कारण केवळ मनुष्याचे अज्ञानच होय. या अज्ञानामुळे त्याच्याठायीं द्वेष, मत्सर, तिरस्कार, उद्दामपणा, अविश्वास, चंचलता, लहरीपणा इत्यादि दुर्वृत्ति अनावर होऊन त्याच्या हातून अनन्वित कर्मे होत असतात. यास्तव सर्व पापाचे मूळ जें अज्ञान त्याचा निरास करण्यास ज्ञात्याने कायावाचामनेंकरून झटले पाहिजे.

ज्ञात्यानें सामान्य जनांस बोध करण्याऐवजी आपलें वर्तन स्वसंमत सिद्धांतांप्रमाणे राखावें

जे सामान्य जन केवळ अनभिज्ञ असतात. त्यांस ज्ञात्यानें आपले तात्विक सिद्धांत सांगत बसण्यांत फारसा अर्थ नसतो; तर त्यानें स्वसंमत सिद्धांतांप्रमाणें वर्तन करून त्यांस दाखवावें. उदाहरणार्थ एकाद्या मेजवानीस आपण गेलों असतां, तेथें भोजनाच्या नियमांसंबंधानें वाक्पांडित्य करीत बसण्यांऐवजी त्या नियमांप्रमाणे स्वत: भोजन करून मंडळीस दाखवावें. या प्रकरणीं सॉक्रेटिसाचें कसें वर्तन असें तें लक्षांत आणा. तो साधू आपल्याठायींच्या ज्ञानाचे कधीं कोठेही प्रदर्शन करीत नसें. कोणी त्याच्यापाशीं बोलावयास आला असतां, तो त्याच्याशीं असें वर्तन करीत असे कीं, त्याचें मन सदाचाराकडे तत्काळ वळून तो त्याचें अंतेवासित्व स्वीकारीत असे. अशी त्याची चित्तवेधक वागणूक असे.

अडाणी लोकांत तुला संमत अशा एकाद्या सिद्धांतासंबंधानें वाद उपस्थित झाला असतां, त्वां मुकाट्यानें बसावें. कारण बोलतां बोलतां एकादे समयीं तुझ्या तोंडांतून कांहीं विचार असे निघतील कीं, त्यांचें खरें रहस्य तुला चांगले अवगत झालें नसेल. अशा तुझ्या उद्गारांवर कोणीं प्रतिपृच्छा करून तुला कुंठित केलें असतां, तूं स्वत: घोटाळ्यांत पडशील, व तुजविषयीं त्यांचा अभिप्राय फारच प्रतिकूल होईल. तोच तूं निमूटपणे बसून राहिल्यास ते फार तर एवढेंच म्हणतील कीं, याला कांहींएक येत नाहीं. पण असें त्यांनीं म्हटल्यानें तुला प्राप्त झालेलें ज्ञान किमपि न्यून होतं नाहीं. अशी तुझी वृत्ति होईल तरच तुझ्याठायीं सत्य ज्ञानाचा सुसंस्कार व्हावयास लागला म्हणून समजावें.

वाय ५३८-२३

मेंढरें जशीं भक्षण केलेल्या अन्नाचें पचन करून आपापल्या पालकांस दूध व लोकर यांच्या रूपाने त्यांच्या निगेचा मोबदला देतात, तद्वत् ज्ञात्यानें वर्तन करणें उचित होय. गुरुमुखानें प्राप्त झालेल्या ज्ञानाचें मनन व निदिध्यास करून तदनुसार स्ववर्तन करण्यास अहर्निश झटावें. भक्षिलेल्या अन्नाचें मेंढरें जशीं वमनादिकेंरून स्वपालकापुढें प्रदर्शन करीत नाहींत, तद्वत् ज्ञात्यानें स्वतांस प्राप्त झालेल्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याचें वर्जिलें पाहिजे. अशा कोरड्या प्रदर्शनांत कोणताही लाभ नाहीं. म्हटलें आहे : **यः क्रियावान् स पंडितः**

व्रतस्थपणा

तूं आपल्याठायींच्या वासना दमन करण्याचा निर्धार करून तत्साधक एका व्रत आचरीत असलास, तर त्याबद्दल जनांत डौल मिरविण्याचें कांहींएक कारण नाहीं. कोणताही कठीण प्रसंग सोसण्याचा किंवा एकादे श्रमाचें काम करण्याचा सराव देहास व्हावा ह्यणून तदनुकूल अशी जी कांहीं गोष्ट करावयाची, ती लोकांस दाखविण्यापुरती करूं नये. तर तींत आपलें स्वतांचें हित आहे असें समजून ती मुकाट्यानें करीत असावें. तिच्या संबंधाने व्यर्थ बभ्रा होऊं देऊं नये.

ज्ञानी आणि अज्ञानी

जो अज्ञानी असतो त्याचा असा समज असतो कीं, आपलें जें कांहीं हित किंवा नुकसान होत असतें, तें बाह्य गोष्टींच्या योगानें. परंतु जो ज्ञानी असतो, त्याला वाटतें कीं, आपलें जें कांहीं हिताहित व्हावयाचें, तें आपल्या स्वतांच्या अंतर्यामावर अवलंबून असतें.

ज्याची आत्मोन्नति होते तो कोणाची निंदा करीत नाहीं, कोणाची स्तुति करीत नाहीं, कोणाला दोष देत नाहीं, कोणाच्या संबंधानें कुरकुर करीत नाहीं; आत्मश्लाघा करीत नाहीं. कोणत्याही गोष्टीच्या संबंधाने त्याची निराशा झाली, किंवा तिजसंबंधानें कोणाकडून प्रत्यवाय घडला तर तो त्याबद्दल स्वतांसच दोष देतो. कोणी त्याची स्तुति केली असतां, तो तीमुळें चढून जात नाहीं, किंवा कोणी त्यास दोष लावला असतां, त्याचें निवारण करण्याचा प्रयत्न तो करीत नाहीं. आपली वृत्ति फार कोमल आहे. तेव्हां तीमध्यें केव्हां कोणता अनिष्ट फेरबदल होईल याची त्याला सर्वदा भीति असते. कशी? तर जसा एकादा आजारांतून नुकता उठलेला मनुष्य अशक्त असल्यामुळें आपल्या प्रकृतीस फारच जपतो, थंडी, वारा व ऊन हीं आपल्या अंगास फारशी लागूं देत नाही. ज्ञानसंपन्न पुरुष कोणत्याही ऐहिक लाभाचा हव्यास धरीत नाहीं; व सर्व कुवृत्ति व दुर्वासना यांचा त्याग करण्यास प्रत्यहीं झटत असतो. त्याला कोणत्याही गोष्टीची हाव अशी मुळींच नसते. कोणीं त्याला वेडा किंवा अशिक्षित म्हटलें तर त्याचें त्याला मुळींच कांहीं वाटत नाहीं. सारांश काय कीं, शत्रूपासून असें स्वरक्षण करण्यास एकादा मनुष्य झटतो, तद्वत् तो दुराचारापासून स्वरक्षण करण्यास सर्वदा दक्ष असतो.

तर्कशास्त्राची आवश्यकता

आपल्याठायींच्या विवेकशक्तीच्या योगानें सर्व कांहीं गोष्टींचें यथार्थ ज्ञान प्राप्त होऊन आपल्याठायीं सद्वृत्तींचा विकास होण्यासारखा असतो. यास्तव ही प्रधानशक्ति चांगलीं विकास पावावी हें सर्वथा इष्ट

होय. परंतु हा विकास इतर कोणत्याही गोष्टीच्या साहाय्यानें होण्याजोगा नाहीं. कारण ही शक्ति इतर सर्व गोष्टींची नियामक आहे. यास्तव ज्या नियमांच्या सहाय्यानें निर्दोष विवेक करितां येण्यासारखा असतो, त्यांचें ज्ञान आपण अवश्य प्राप्त करून घ्यावें.

कोणी म्हणेल कीं, आपल्या अंगचे दोष काढून टाकण्यास आपण झटावें म्हणजे पुरे. ही घटपटादि खटपट आपणांस हवी कशाला? याचे समाधान असें कीं, हे दोष काढून टाकण्याचा प्रयत्न त्वां अवश्य करावा; व ते कसे काढून टाकावे या प्रकरणीं ज्ञात्या पुरुषांचा बोध ऐकावा. पण हा जो बोध तू ऐकशील, तो खरा आहे कीं खोटा आहे, याचा निर्णय करण्याचें तुजमध्यें सामर्थ्य नसलें तर तुझा त्यावर कसा विश्वास बसावा? आणि 'तुमचें हें म्हणणे कशावरून खरें मानावे?' असा प्रश्न तूं त्या ज्ञात्या पुरुषास केला असतां, त्यानें जर म्हटले कीं, 'या खरेंखोटें निवड्याच्या भानगडींत आपण कशाला पडूं या? आपलें मुख्य कर्तव्य काय तें आपल्याठायींचे दोष काढून टाकण्याचें आहे.' तर त्याचा बोध तुला कसा सत्य वाटावा बरें?

या कारणास्तव ज्ञानप्राप्तीच्या आरंभी तर्कशास्त्राचा अभ्यास विहित केला आहे, तो योग्य होय. आपणांस धान्य मापावयाचें असलें म्हणजे पहिल्यानें माप खरें आहे कीं खोटें आहे, हें ज्याप्रमाणें आपण तपासून पाहतों, त्याचप्रमाणे आपल्या विवेक शक्तीचे आहे. प्रत्येक गोष्टीचा खरेंखोटेंपणा योग्य प्रकारें समजावा अशी ज्याची इच्छा असेल, त्याला शुद्ध विवेक करण्याचे नियम अवश्य अवगत झाले पाहिजेत. परंतु तर्कशास्त्राचा अभ्यास करणारानें हें लक्षांत ठेवावें कीं, धान्याचें माप जसे धान्यावांचून व्यर्थ होय. तद्वत् तर्कशास्त्र ज्ञानसामग्रीवांचून शुष्क होय. सत्यासत्यविमर्षणास तें केवळ साहाय्यभूत आहे. ज्या गोष्टींच्या संबंधानें तें उपयोगांत आणावयाचें त्यांचें ज्ञान अवश्य संपादन केलें पाहिजे.

वैय्याकरण आणि ज्ञानी पुरुष

एकाद्या ज्ञानी पुरुषाचा ग्रंथ समजण्यास अंमळ कठीण असला तर त्याचा अर्थ समजून सांगणाराचें आपणांस साहाय्य घ्यावें लागतें. हा समजून सांगणारा अर्थात् भाषाविषयामध्यें मोठा प्रवीण असला पाहिजे. त्याला मुख्यत: व्याकरण चांगले यावें लागतें. पण या वैय्याकरणाचा उपयोग ग्रंथ समजून देण्यापुरता आहे. त्या ग्रंथांत जो ज्ञानाचा बोध केलेला असतो, त्याचाच फक्त मनुष्याच्या वर्तनावर परिणाम होण्यासारखा असतो. ज्याला आपलें आचरण सुधरून सदाचारी व सुखी व्हावयाचें आहे, तो नुसती व्याकरणाचीं सुत्रे घोकीत राहिला तर त्यापासून कांहींएक निष्पन्न व्हावयाचें नाही. तर त्यानें एकाद्या ज्ञात्या पुरुषाच्या बोधपर ग्रंथाचेच अध्ययन केलें पाहिजे. हा ग्रंथ अंमळ दुर्बोध असल्यास व्याकरणसूत्रांची आवश्यकता लागेल एवढेंच काय तें. यावरून पाहता ज्ञानी पुरुषाची व त्यानें केलेल्या सद्बोधाची जी योग्यता आहे, तिच्या पासंगासही वैय्याकरण व त्यानें पठन केलेली व्याकरणसूत्रे पुरणार नाहींत. खरें महत्त्व काय तें ज्ञानाचें आहे. व्याकरणादि भाषाविषय केवळ गौण होत. त्यांची मातबरी गूढ अर्थाचा परिस्फोट करण्यापुरती. याहून अधिक योग्यता त्यांत नाहीं. दुसरें असें कीं, एकाद्या साधू पुरुषाच्या ग्रंथांचें अर्थज्ञान साहित्यशास्त्रज्ञाच्या सहाय्यानें उत्तम प्रकारें प्राप्त झालें असूनही जर त्या बोधाप्रमाणें मनुष्याचे वर्तन होत नाहीं, तर त्या कोरड्या अर्थज्ञानाचा काय उपयोग? क्रिसिपसच्या एकाद्या दुर्बोध ग्रंथाचे मीं अध्ययन केलें असून मला त्या महात्म्याच्या बोधाचें सार व्याख्यानरूपानें कथन करावयास सांगितले असतां, जर करितां त्याच्या बोधाप्रमाणें माझें वर्तन सुधरले नसेल, तर मला नुसते वाक्पांडित्य करण्याची लाज वाटेल.

गुणसंपादन

एकाद्या ग्रंथाची भाषा चांगली शुद्ध सोपी व रसाळ असली तर तो वाचावासा वाटतो; तद्वत्च एकाद्याचें भाषण रसभरित असून शब्दांची वगैरे योजना अतिमनोहर असली तर त्याकडें श्रोत्यांचें मन लागतें. ज्याच्या अंगीं वाक्सामर्थ्य असतें, त्याच्या हातून बहुत जनहित होण्यासारखें असतें. अज्ञान जनांची मोहक व प्रेमळ शब्दांनीं समजूत घालून, त्यांस सन्मार्गवर्ती करण्याचें काम वक्तृत्वाच्या योगानें चांगले करितां येतें. यास्तव हा वक्तृत्वगुण अंगीं असणें हिताचे आहे. तो ज्याच्या अंगीं असतो. त्याच्या बोलण्याकडे लोकांचें लक्ष लवकर लागून, ते त्याच्या अगदीं अर्ध्या वचनांत रहातात. एवढा या गुणाचा प्रभाव आहे. तरीपण त्याच गुणाच्या उत्कर्षाकडे सर्वदा लक्ष पुरवून इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणे योग्य नव्हे. कित्येक लोक याच एका कलेत गुणसर्वस्व आहे असें समजून तिच्या प्राप्तीच्या नादांत सर्व काळ दवडितात. परंतु अशा नादी जनांला असें सांगावयाचे कीं, ह्या गुणाचा योग्य विनियोग विवेकशक्तीच्या योगानें करितां यावयाचा. तेव्हां तिची हेळसांड कदापि करितां कामां नये. मनुष्याच्या अंगच्या एकंदर कला व गुण यांची योग्य योजना विवेकाच्या योगानें करितां येते. यासाठीं या प्रधान शक्तीचा योग्य विकास करण्याकडे मनुष्यानें अवश्य लक्ष पुरविलें पाहिजे. या एका शक्तीची न्यूनता असली तर इतर गुण व कला यांचा सदुपयोग होणें नाहीं. देहांतील सर्व ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिर्ये व मन यांचें नियमन करण्याचें सामर्थ्य विवेकशक्तीच्या ठायीं असतें. ही शक्ति नसेल तर इतर साऱ्या शक्ति असून नसून सारख्याच. दुसरें असें कीं, विवेकशक्तीचा पूर्ण विकास होऊन चित्तांतील सर्व दुर्वासनांचा व दुर्वृत्तींचा विनाश झाल्याने मनुष्य सदाचारी व सुखी होतो; आणि त्याच्या अंगीं इतर कोणतेही गुण नसले तरी त्याच्या सुखानुभवांत यत्किंचित्ही न्यूनता पडत नाहीं. परंतु तोच अविवेकी व दुराचारी असल्यास, दुसरे कितीही गुण त्याच्याठायीं असले तरी तो दुःखी होतो. विवेकबलेंकरून चित्ताची शुद्धि झाली नसतें तोपर्यंत आपणांस अनिष्टानुभव घडतो आणि आपण दुसऱ्यास दोष देऊं लागतो. तात्पर्य काय कीं, या एका शक्तीवर सर्व मनुष्यजातीचे सुख किंवा विपत्ति अवलंबून आहे. यासाठीं तिचा विकास करण्यास अहर्निश झटले पाहिजे.

यावर कोणी अशी शंका घेईल कीं, इतर उपयुक्त शक्तीकडे व गुणांकडे मनुष्यानें अगदीं दुर्लक्ष करावे कीं काय? अर्थात् नाहीं. मनुष्यानें निसर्गप्राप्त शक्तींचा व गुणांचा विकास साधल्यास अवश्यमेव करावा. पण त्या शक्ति व ते गुण केवळ गौण होत. त्यांपैकीं कांहीं आपल्या अंगी नसले तरी त्यांवांचून आपलें अडावयाचें नाही. यासाठीं त्यांचें वृथा स्तोम माजवून त्यांच्या प्राप्तीकरितां प्रयत्न करण्यांत सारा वेळ दंग होऊन विवेकाच्या व चित्ताच्या शुद्धीकडे दुर्लक्ष करणें हें कदापि हिताचे नव्हे. तर विवेकाची व सदाचाराची उन्नति अत्यंत महत्त्वाची समजून ती करण्यांत आपला सारा वेळ वेंचावा. हा मनुष्याचा प्रधान व्यवसाय असावा. इतर सारे व्यवसाय केवळ गौण होत. हे व्यवसाय प्रधान व्यवसायाच्या अनुषंगाने करितां येतील तेवढे खुशाल करावे.

परंतु जगाची रीत पाहावी तर ती अगदीं उलट दिसते. कल्पना करा कीं, कोणी प्रवासी दूर देशाहून स्वदेशी परत येत असतां वाटेत एकादी सुंदर धर्मशाळा पाहतो, आणि तींत कायमचा मुक्काम करितो. तर आपण या इसमास असें म्हणूं कीं, हे मनुष्या, तुझा हेतु स्वदेशीं जावयाचा असतां, तूं जो हा या धर्मशाळेत

कायमचा राहिला आहेस याचा अर्थ काय? अरे, या सारख्या किती चांगल्या चांगल्या धर्मशाळा व कुरणे तुला वाटेंत लागलीं असतील बरें? तीं जशी तूं सोडून येथवर आलास तसेंच हेंही स्थळ सोडून तुला स्वदेशी गेलें पाहिजे. तुझे इष्टमित्र तुझी रात्रंदिवस चिंता करीत आहेत. त्यांस भेदून त्यांची चिंता त्वां दूर केली पाहिजे. आपल्या देशांत राहून तेथील जानपदास उचित अशीं कर्तव्यकर्मे तुला करावयाचीं आहेत. त्याचप्रमाणें विवाह करून गृहस्थाश्रमास अनुरूप असे सारे व्यवहार तुला केलें पाहिजेत. शिवाय स्वदेशांतील लहानमोठ्या कामगिऱ्या बजावून तुला एकंदर राष्ट्राच्या हितास झटलें पाहिजे. तूं जो या लोकी जन्मास आला आहेस, तो कोठलें तरी रमणीय स्थळ पाहून तेथें सुखानें रहाण्यासाठीं नव्हे. तर ज्या देशांत तूं जन्म घेतला आहेस, त्या देशांत राहून तेथल्या लोकांच्या उपयोगीं पडण्यांत त्वां आपले आयुष्य वेचले पाहिजे. तेव्हा या धर्मशाळेंत राहून तुझें जीवित कसें सफळ होईल? हाच बोध गुणलुब्ध जनांस करावयाचा. या प्रपंचांतल्या कोणत्याही कला किंवा गुण पाहिले तरी त्यांची मातबरी सदाचारापुढे मुळींच नाहीं; आणि हा सदाचार चित्त व विवेक यांच्या शुद्धीनें प्राप्त व्हावयाचा. या संसारांत जे बरेवाईट प्रसंग निसर्गक्रमानुसार प्राप्त होतात, त्यांच्या संबंधाने योग्य विवेक मनुष्यास करितां आला पाहिजे. कांहीं झालें तरी त्यानें सद्वर्तनाचा नियम ढळूं देऊं नये. ज्या गोष्टी हातून घडल्या असतां चित्तास उद्वेग प्राप्त होण्यासारखा असतो, त्या करण्यास कदापि प्रवृत्त होऊं नये. कशीही दैवगति प्राप्त झाली तरी तींत चित्ताची समता नष्ट होऊं देऊं नये. सर्वदा समाधानवृत्ति राखावी. एकादा अनिष्ट प्रसंग आला असतां, कोणासही दोष देऊं नये, किंवा कोणाशी वैर करूं नये. ह्या व अशाच दुसऱ्या सद्वृत्ति चित्ताच्याठायीं विकास पावण्यासाठीं अहर्निश उद्योग करणें हे मनुष्याचें प्रधान कर्तव्य आहे. हें त्याच्या हातून घडलें नाहीं तर त्याच्या जीविताचें साफल्य व्हावयाचें नाहीं. परंतु बहुत जन असें आहेत कीं, त्यांच्या हातून हें कर्तव्य घडण्यास पुष्कळ अंतराय येतात. त्यांस या प्रपंचांत एकादा नाद लागून, त्यांतच त्यांचा सारा काळ जातो. कित्येकांस कोणती तरी एकादी कला किंवा गुण प्राप्त करून घेण्याचा हव्यास लागून, रात्रंदिवस त्याला त्याचा धौशा लागतो. त्याला त्यांच्या ह्या क्रमापासून परावृत्त करण्याची खटपट केलीं तर ते म्हणतात कीं, ही कला किंवा हा गुण मोठा मोहक असून उपयुक्तही आहे म्हणून; आम्ही त्याचें संपादन एवढ्या असोशीनें करीत आहों. पण अशा गुणलुब्ध जनांला असें सांगावयाचे कीं, हें निरनिराळे गुण व कला केवळ प्रवाशास वाटेंत लागणाऱ्या धर्मशाळांप्रमाणें होत. प्रवासी जसा धर्मशाळांचा कामापुरता उपयोग करून आपल्या देशाकडे चालता होतो, तद्वत्च गुणलुब्ध मनुष्यानें स्वतांस प्रिय वाटणाऱ्या गुणांचें या जीवितयात्रेत प्रसंगोपात्त संपादन करून त्यांचा यथोचित उपयोग करून घ्यावा. पण त्यानें वर निर्दिष्ट केलेल्या आपल्या प्रधान कर्तव्याकडे सर्वदा लक्ष ठेविले पाहिजे. त्याची हेळसांड एक क्षणभरही करू नये.

दृढनिश्चय

देशाचे कायदे जसे राजशासनभीतीस्तव आपण सर्वदा निश्चयानें पाळितों, तद्वत्च जे नीतिसिद्धांत आपणांस कळले आहेत, तदनुसार वर्तन करण्याचा दृढ संकल्प करावा. याप्रमाणें सद्वर्तन करीत असतां, कोणीं कांहींही म्हटलें तरी त्याची मुळींच परवा करूं नये. त्यापासून अंतर्यामास कांहींएक अपाय होणें नाहीं.

दिरंगाई

जो वर्तनक्रम तुला विवेकबलेंकरून उत्कृष्टसा वाटूं लागला आहे, तदनुसार स्ववर्तन ठेवण्याचें तूं किती दिवस लांबणीवर टाकणार बरें? जे नीतिसिद्धांत तुला संमत झाले आहेत, तदनुरूप तुजकडून वर्तन घडत आहे काय? मुलाला जसें कोणत्याही गोष्टीसंबंधानें पुनःपुनः शासन करून वाटेवर आणावें लागतें, तसें तुला करण्याची कांहींएक आवश्यकता उरली नाहीं, तुला प्रौढदशा प्राप्त होऊन बरें काय व वाईट काय हें चांगलें समजत आहे. तें तुला कोणीं पुनःपुनः समजून सांगण्याची मुळीं गरज उरली नाही. असे असतां आपलें वर्तन सुधरण्यासंबंधानें तूं आळस किंवा हेळसांड करशील तर तुझ्या ज्ञानाचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें सदाचारणाचा नियम वारंवार करून तो मोडशील तर तुझ्याठायीं निश्चयीपणाचा विकास न होऊन, तुझी कांहींच उन्नति वहावयाची नाहीं; आणि मग तुझ्या आणि इतर अडाणी मनुष्यांच्या जिण्यांत कांहींच अंतर उरणार नाही.

तर यापुढें तूं आपल्या विवेकाप्रमाणें वागण्याचा प्रयत्न कर. ज्या गोष्टी तुला नीतीच्या वाटतील त्याप्रमाणें वागण्यास कोणालाही भिऊं नको. याप्रमाणें सद्वर्तनाचा नियम चालवीत असतां, तुला फारच त्रास होईल, किंवा तुला एकाद्या बाह्य सुखास मुकावें लागेल, किंवा तुझा दुर्लौकिक होईल. पण या गोष्टींस तुला मुळींच भितां कामां नये. हे प्रसंग मनुष्याच्या खऱ्या परीक्षेचे असतात. या प्रसंगांस हार गेलें असतां आपले कधीं कधीं जन्माचें नुकसान होत असतें. यासाठी केलेला नियम पाळण्यास मनःपूर्वक झटलें पाहिजे. त्यांत यत्किंचित् ही खळ पडूं देऊं नये.

सॉक्रेटिस जो आपल्या नैतिक उन्नतीस्तव इतका लौकिक पावला, त्याचें कारण एवढेंच कीं, कसाहीं प्रसंग आला तरी त्यानें आपलें आचरण विवेकशुद्ध ठेविलें. या पुरुषाच्या योग्यतेस तूं पावला नाहींस तरी त्याचें अनुकरण करण्यास मनापासून झटणें हें तुझें परम कर्तव्य होय.

◆◆◆

वाय ५३८-११०५-१.२०२०

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुखपृष्ठ मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.